ग

ग पु. मराठी वर्णमालेतील अठरावे अक्षर आणि तिसरे व्यंजन.

ग पु. गर्व; अहंमन्यता; वृथाभिमान. गर्व शब्दाचा संक्षेप. (वा.) **'०' ची बाधा, पीडा होणे** – गर्वाचा ताठा; गर्व : 'श्रीची प्राप्ति झाली म्हणजे 'ग' ची बाधा व्हावयाचीच.' – गुप्तमंजूष.

ग वि. (समासात) १. गमन करणारा, जाणारा. जसे :– उरग–उराने, पोटाने जाणारा, सरपटणारा. २. पोचला आहे, दाखल झाला आहे असा; समाविष्ट; अंतर्वर्ती. जसे :– भूमिग, बुद्धिग, खग, जलग. [सं. गम्]

ग स्त्रीला उद्देशून वापरले जाणारे संबोधन. (अगे, गे याचे संक्षिप्त रूप.)

गइ वि. १. दुर्बळ. २. अनास्था.

गइमेढके न. गईचा खांब.

गइ(ई)सर–रा पु. गइमेढक्यावरील आडवा लांब वासा.

गई स्त्री. १. (अपराधाबद्दल) गय ; दयाबुद्धीने केलेला कानाडोळा; माफी; क्षमा. २. उपेक्षा; दुर्लक्ष; हयगय : 'नका गई करूं आईकाल ज्या कानीं ।'– तुगा २९२. [सं. गत]

गई स्त्री. १. खालचा इंद्रकट; गईसरा; घराच्या पायथ्याच्या शेवटी आश्रयार्थ उभारलेल्या मेढीवर घालतात ते आडवे लाकूड; आढ्याला जोडलेले फाटे घराच्या चारी भिंतीवरील ज्या तुळईवर ठेवण्यात येतात ती तुळई. २. तुळईजवळची छपराची जागा. (ना.)

गई स्त्री. गाय : 'जनाई दासी गरिब बिचारी गई ।' – नामना ८८. (मावळी)

गईक वि. दंश करणारा.

गईगुदर स्त्री. दिरंगाई; वेळ मारून नेणे; अळंटळं ; टाळाटाळ : 'वजीर पैका द्यावयाची गईगुदर करितात.' – मइसा ६.६.३२.

गईगोळा पु. पावसाळ्यात गईसऱ्यास चिकटवून वाळवलेली गोवरी, शेणगोळा. (को.)

गईब–प, गयब वि. १. अदृश्य; हरवलेला; नाहीसा झालेला; गहाळ; मागमूस नसलेले. २. मृत; मेलेला : 'राजा गईब जाहला ...'– सभासद ४२. (क्रि. होणे.) [फा. गाइब]

गईबत १. ईर्षा २. पराक्रम.

गउ स्त्री. गाय : 'दहा छिद्राचे एक चिटके । कचकोल ते पात्र ओमण निके। अंगावरी घेतले हरिखे । चर्म कवतुके गउचे ।' – नाली. [सं. गो]

गऊपोत स्त्री. गव्हाच्या दाण्यासारख्या मण्यांची पोत.

गगन न. आकाश; अंतरीक्ष; नभ; आभाळ : 'गगन मुठीं सुवावें । मशकें केविं ।।'– ज्ञा १.७४. [सं.] (वा.) ० **कापणे, थरारणे** – आकाश दणाणणे; भयंकर कृत्य करणे. **गगनबावडा दाखविणे** – ताणणे; दमवणे (कोल्हापूर भागात गगनबावडा हे गाव आहे यावरून). (कर.) **गगनात भरणे** – आकाशात भरारी मारणे; 'दुसरा गरुड उपजता भरला गगनीं न मंदिरीं राहे ।' – मोआदि ४.३४. **गगनाशी गाठ बांधणे, लावणे** – (उंच उडणे) महत्कृत्य करणे; अचाट पराक्रम करणे. **गगनाशी दिवस भांडणे** – १. उन्हाळ्यात दिवस मोठा होणे. २. दिवस कमी कमी व्हायला प्रारंभ होणे. **गगनाशी भांडणे** – आकाशाशी बरोबरी करणे (उंच वृक्ष किंवा गर्विष्ठ माणूस यासंबंधी योजतात.) **गगनीची वीज कोसळणे** – आकाशाची कुऱ्हाड पडणे; भयंकर संकट येणे : 'गगनींची वीज जाणो कोसळली त्यावर ।' – विक २०. **गगनी दिवा लावणे** – प्रख्यात होणे; पुष्कळ प्रसिद्धीस येणे.

गगनकाळी स्त्री. आकाशरूपी कालिकादेवी : 'कीं भूगोळकांचां देऊळीं : रती अनंगे पूजिली गगनकाळी'– रुस्व ४७५.

गगनगज पु. ऐरावत; दिग्गज : 'गगनगजाचे शुंडादंड । तैसे सरळ बाहुदंड ।'– एरुस्व १.४४.

गगनगतवाणी स्त्री. आकाशवाणी : 'ऐशी गगनगतवाणी ब्रह्मेनि आइकिली' – श्रीकृष्णच २.

गगनगर्ती वि. आकाशाला पोचेल अशी (राक्षसी). (गो.)

गगनगर्भ पु. आकाशाची पोकळी; अंतराळ. [सं.]

गगनगाठा पु. तुपात तळून वर साखर पेरलेले रव्याचे गाठे.

गगनचुंबित, गगनचुंबी वि. आकाशाला पोचण्याइतके उंच; आकाशाशी स्पर्धा करणारा (इमारत, झाड इ.).

गगनदीप पु. सूर्य : 'तो झांकिला गगनदीप तरी झळाळी ।' – र ३२.

गगनमणि–णी पु. सूर्य : 'गगनमणिकरींच्या तम केव्हां तरि काय हो शिवे कमला ।'– मोविराट १.१६. [सं.]

गच वि. घट्ट. पहा : **गच्च**
पु. दाटीवाटीने एकत्रित असलेला जमाव किंवा वस्तु : 'आम्ही जागा पाहून तोफा सुरू मोगलाच्या गचावर फौजेच्या केल्या.' – पेद १.१.

गच पु. ठोका; टोल : 'काळोखी रात्र अंधारी दुसरे प्रहरीं । वाजतो गच अखराचा राजदरबारीं ।'– होला ९५. [ध्व.]

गचक पु. गाडीरस्त्यावरील खड्डा. (व.) [ध्व.]

गचक स्त्री. १. विपुलता; गर्दी. २.चैनबाजी; चंगळ; ऐषाराम.
क्रिवि. १. विपुलतेने; दाटीने; चेंगराचेंगरीने; रगडून; कचकावून; भरपूर (पाऊस, पीक, पैका, चांगल्या वस्तू) २. प्रशस्तपणे; बेलाशक; निर्धोक (मेजवानी, धुमाळी).

गचकण–न–र, गचदिशी क्रिवि. मऊ वस्तूमध्ये दुसरा पदार्थ शिरताना होणाऱ्या आवाजाप्रमाणे; गच जसा आवाज होऊन (घशात पाणी येणे, चिखलात पाय जाणे इ.).

गचकणी स्त्री १. हिसका; झटका. २. पहा : **गचकी**

गचकणे अक्रि. १. हिसका बसणे; आचकणे; हबकणे; आचका बसणे (खळग्यात किंवा पुरता न टेकलेल्या दगडावर अवचित पाय पडून). २. (ल.) मरणे; गचणे; परीक्षेत नापास होणे. [सं. गम्]

गचकळणे अक्रि. १. गचका खाणे (व्यापारात निभाव न लागल्याने). २. नदी इ. मध्ये नाकातोंडात पाणी जाऊन घाबरे होऊन खालीवर होणे. ३. (ल.) हालअपेष्टांशी झगडणे; संकटांत खितपत राहणे.

गचकळी, गचंगळी स्त्री. १. गटंगळी; डुबकी (बुडत्या माणसाची). २. (ल.) निकराचा झगडा, प्रयत्न; सर्व प्रकारे खटपट; धडपड.

३. आरंभिलेल्या कार्यात भयादिकांमुळे कुंठित होण्याची अवस्था. [ध्व.] (वा.) **गचकळ्या खाणे, गचंगळ्या खाणे** - १. अडखळत, चाचरत बोलणे किंवा वाचणे. २. डुबक्या खाणे (पाण्यात).

गचका पु. १. अकस्मात बसणारा हिसका, झटका, धक्का, आचका; गोता (क्रि. बसणे.) २. (ल.) खड्डा, दगड इ. हिसका बसण्याची जागा (ज्यामुळे गचका बसतो अशी). ३. (ल.) दुर्दैवाचा घाला, तडाखा, ठोकर; व्यवहारातील तोटा. ४. (ल.) फास; जाळे; चोरखळी; सापळा; खड्डा. ५. एखाद्या लेखातील दुर्बोध स्थळ, मेख, कोडे. ६. मऊ व आवाज होणाऱ्या पदार्थात मारलेला गुद्दा, ठोसा. [ध्व. गच्.] (वा.) **० खाणे** – नापास होणे; अयशस्वी होणे : 'एस. एस. सी. परीक्षेत गचके खाल्याने..' – लटिके १.०५. – **० देणे** – जोराची उचकी येणे : 'ते दोनतीनदा गचकं देऊन गप झालं बघ.'– विभूत ८४.

गचकी स्त्री १. पहा : **गचका** १, २, ४. २. बारीक, लहान ढेकर किंवा उचकी. (क्रि. देणे.)

गचक्या वि. खाचखड्ड्याचा; विषम; सपाट नसणारा.

गचगच स्त्री : १. चिखलात होणारा वस्तूचा आवाज. २. (ल.) रेंदाड; चिखल. ३. ढिलाई. ४. अडगळ; गळाठा. पहा : **गचपण** : 'न कळतां करीं कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें । गचगचेंत पडतां तें। चमत्कारें नव्हे ।।' – दास १९.९.१३. ५. गोंधळ.

गचगच क्रिवि. घाईघाईने खाताना होणाऱ्या आवाजाप्रमाणे आवाज होऊन; मचामचा. (क्रि. खाणे, जेवणे.)

गचगचीत वि. १. गजगजीत; लबलबीत; बुळबुळीत; चिकण (चिखल). २. (ल.) भरपूर; विपुल; रगड; दाट (पीक, पैसा, आयात जिन्नस, मेजवानी, उधळपट्टी). ३. गजबजीत; तत्पर; चूर; उद्योगी; कामसू; गोंगाटाचे (गाव, घर). [ध्व.]

गचगिरी स्त्री. १. चुनेगच्ची. २. चुनेगच्चीची क्रिया; चुनेगच्ची करणे.

गचणे अक्रि. चिखलासारख्या पदार्थात रुतणे. पहा : **गचकणे** [ध्व. गच]

गचपच स्त्री. रेंदा; चिखल, राड. पहा : **गचकण**

गचपच वि. दाटीचा; गर्दीचा; गडगंज भरलेला : 'भरल्या बाजारांत । मोठं दुकान कोणाचं । गचपच पसाऱ्याचं । किल्ली कुलुप सोन्याचं ।'– वलो ४१. (व.) [ध्व.]

गचपड पहा : **गचपण** ३

गचपण न. १. कचरा; पडझड; गळाठा; अडगळ. २. पसाऱ्याची किंवा अडगळीची स्थिती. ३. गवत, लव्हाळा इ. रानटी झाडे उगवलेली जागा; ऐतण; ऐचण.

गचबुच वि. गप्प; शांत : 'अभिमानी जिजा तोंडाने काही बोलत नव्हती. गचबुच होती.' – आआशे १३५.

गचमुड्डी स्त्री. चिकार गर्दी. (गो.)

गचवटा पु. गालाला घेतलेला चिमटा; गालगुच्चा : 'त्याचा (मुलाचा) गचवटा घेऊन तिनं विचारलं...' – ऊन ४६.

गचं(चां)दा, गचोंदा, गचं(चां)दी, स्त्री. १. हिसका; धक्का; आचका (सजीव प्राण्याला बसलेला). (क्रि. देणे, मारणे.) २. पहा : **गचांडी**

गचा पु. दाटी; गर्दी; समुदाय.

गचागच–चा क्रिवि. १. ढसाढसा; मटामटा; गटागटा. (क्रि. पिणे, खाणे, गिळणे.) उतावीळपणाने गिळताना होणाऱ्या आवाजाप्रमाणे. २. झोपेची झापड येण्याच्या स्थितीप्रमाणे. एकसारखी क्रिया असताना योजतात. ३. पहा : **गचकण–न** [ध्व. गच्]

गचाटी,गचां(चों)डी, गचोरा स्त्री. पु. हाताचा पंजा मानेवर ठेवून दिलेला धक्का; अर्धचंद्र. (क्रि. देणे, मारणे.) २. (धरण्याच्या वेळी) मान; गळा. (क्रि. धरणे). 'शिवराम्या, गचांडी सोडून माझे छातीवरून ऊठ.'– बाळ २.१४४.

गचाड न. १. झाडे, गवत इत्यादींचे दाट रान. (को.) २. निबिडपणा, घनता; अभेद्यता (अरण्य, झाडीझुडूप यांची).
वि. पुष्कळ; भरपूर. (व.)

गचापिची स्त्री. एकमेकांची गच्ची (मानगुटी) पिचकण्यापर्यंत झालेले भांडण. (व)

गचाबीच क्रिवि. दाटीने; गर्दीने; खेटून. [ध्व.]

गचाबोचा पु. मान व ढुंगण; फरा व ढुंगण (जनावराचे). (वा.) **० एक असणे** – फार लठ्ठ असणे; गबदुल होणे (अतिशय लठ्ठ बैल, थलथलीत किंवा पुष्ट माणूस यासंबंधी वापरतात.)

गचाबोची स्त्री. खेचाखेच, चेंगराचेंगरी; फार दाटी. (ध्व.)

गचावणी स्त्री. गटंगळी; गचकळी.

गचावणे अक्रि. १. गचकळणे; गटंगळ्या खाणे; खालीवर बुचकळ्या खाणे (बुडणाऱ्या माणसाने). २. उद्योगधंद्यात नुकसान येणे. ३. अडखळणे; बोबडी वळणे; धैर्य सुटणे. ४. खुंटणे; तूट पडणे. ५. मरणे. (कु.)

गचाळ–ळी–ळ्या, गचाळखोर वि. १. गलिच्छ; घाणेरडा २. बकबक करणारा; चेष्टेखोर; वाचाळ. ३. गबाळ; भोंगळ; गैदी; अव्यवस्थित (माणूस, वर्तणूक, कृत्य.). ४. नेभळट. [क. गयाळ = अव्यवस्थित]

गचाळकी, गचाळी स्त्री. १. गप्पाटप्पा; निरर्थक सांगणे किंवा बोलणे. २. गबाळपणा; वाईट, घाणेरडे चाळे.

गची स्त्री. १. गळा; मान : 'तो गचिये धरुनि माघारा । आंतु घाली ।।' – राज्ञा ६.२३६. २. गचांडी; अर्धचंद्र : 'म्हणे आता यासिं गचि देऊन दवडा ।' – पंच ४.४.

गचुंडे न. गचांडी; मान.

गचेंडा वि. मोठा; धट्टाकट्टा; दांडगा; गबदुल; लठ्ठनिरंजन. (को.)

गचोटा पु. (गालाला घेतलेला) चिमटा. (क्रि. घेणे) (माण.)

गचोटा पु. 'हिडमिसी'. – (तंजा.)

गचोरा पु. धान्याची कणसे निसवणे; कणसे येणे.

गचोरा पु. मुठीने मारलेला गुद्दा, ठोसा, धक्का.

गच्च क्रिवि. ताणून; घट्ट; आवळून; मजबुतीने; बळकट; खेटून; दाटीने; खच्चून; ठेचून (बांधणे, आवळणे, कोंडणे इ.)
वि. १. आवळ; घट्ट (गाठ, पदार्थ इ.) २. निबिड; घन (दाटी, झाडी). [ध्व. गच] [फा. गच = ठासून भरलेला चुना]

गच्च पु. १. चुना : 'स्वल्पमात्र दरज असेल तरी गच्च लावून पाझर न फुटे असें करावें.' – मराआ ३२. २. चुनेगच्ची : 'तळघरांत गच्च करावा.' – मराआ ३२. [फा. गच]

गच्च वि. गुपचूप; गप्प; स्वस्थ : 'उरलेल्या वेळात तंबाखूची गुळणी तोंडात धरून कुठेतरी गच्च बसलेला असे.'– भुज ३०.

गच्चगार क्रिवि. हालचाल किंवा आवाज न करता : 'झाडं गच्चगार उभी होती.'– पेरणी १११.

गच्चबुच्च क्रिवि. न बोलता; गप्प : 'सर्वजण गच्चबुच्च बसले.' – आआशे २०६.

गच्चा पु. १. चांगले भरदार कणीस (धान्याचे) (नाशिक). २. भरगच्च कणीस असण्याची स्थिती. ३. (निंदार्थी) लठ्ठ, फुगीर गाल; गालांचा फुगीरपणा. (वा.) **० धरणे –** भरीव, पुष्ट होणे.

गच्चा पु. मध्य; मधला भाग. (व.)

गच्चाबुच्चा पु. कांकू करणे; अळंटळं. (क्रि. खाणे, येणे, लावणे.) क्रिवि. अडखळत; अळंटळं करीत. (क्रि. बोलणे, करणे.) [ध्व.]

गच्ची स्त्री. १. चुन्याची केलेली भुई; आगाशी; चुना बसवून केलेली जमीन. पहा : **गच्च.** २. छत. [फा. गचू = चुना, फा. गची = चुन्याचे बांधकाम]

गच्ची स्त्री. गर्दी; चेंगराचेंगरी; दामटी वळण्याची स्थिती.

गच्ची स्त्री. (नाविक) डोलकाठीला आडवी टांगलेली काठी सुरक्षित ठेवण्यासाठी वापरलेले बंद आणि दाताळी.

गच्ची स्त्री. मानेला दिलेली ढोसणी; गचांडी; मानेचा काटा; नरडी; मानगुटी.

गच्ची स्त्री. गाल; गालफड. (चिमटा घेणे, चपराक देणे इ. वेळी वापरतात.)

गच्चू पु. टाळा; हकालपट्टी. (क्रि. देणे.) पहा : **डच्चू** (कर) [ध्व.]

गच्छ पु. गणित किंवा भूमितिश्रेणीतील पदसंख्या. [सं.]

गच्छ पु. **१.** समुदाय; संघात. **२.** जैनांतील पंथ, शाखा. उदा. तपागच्छ.

गच्छ, गच्छंती न. स्त्री. गमन; दूर पळणे; पळ; तोंड काळे करणे; काढता पाय घेणे. (क्रि. करणे, म्हणणे.) : 'केलें गच्छ भाद्रपद वद्यातिल षष्ठीस।'– ऐपो ३९७. [सं. गम्] (वा.) **० काढणे** – पळ काढणे : 'फारसेच काही अंगावर प्रकरण येईल असे धोरण दिसले तर आपला गांठोड्याला रामराम ठोकून गच्छ काढिलें म्हणजे झालें.' – मोचन २८.

गच्छणे अक्रि. जाणे. (भूतकाळी प्रयोग) : 'ऐशीं तो कठणोत्तरें वदुनियां मातेसवें गच्छला ।'– बस्वलिंग, गजगौरीव्रत १६. [क.]

गच्छंती स्त्री. १. समाप्ती; नाश; मृत्यू : 'इंग्लंडात तर दोघांची गच्छंती झाल्याचे वर्तमानसुद्धा पत्रांतून जाहीर झालें होतें.'– नि ७३२. (क्रि. करणे, होणे.) २. पराभव; सामर्थ्यभंग.

गच्यागोदड पु. १. गुंतागुंत. २. विचका. (झाडी.)

गज पु. १. लोखंडी सळई किंवा तिचा लांब तुकडा (जाळी, खिडकी, कठडा यांतील.) २. (पाणरहाट) पोहऱ्याच्या काठाशी बसवलेला लोखंडी तुकडा. ३. बंदुकीत दारू ठासण्याची लोखंडी सळई. ४. (विणकाम) वशारन्यांच्या गाठी देताना तंग ठेवणारी लोखंडी सळई. ५. सारंगी इ. तंतुवाद्ये वाजविण्यासाठी वाकवलेल्या लाकडी काठीला दोन्ही टोकांना घोड्याचे केस बांधून तयार केलेली धनुकली. ६. लांबीचे एक परिमाण; २४ तसू किंवा २ फूट लांबीचे कापड, शेतजमीन मोजण्याचे लोखंडी किंवा लाकडी पट्टीचे एक माप; वार (सरासरी ३ फूट); कापड मापण्याचे साधन (इंग्रजी यार्डाबरोबर याचे प्रमाण धरतात.) ७. वरील मापाच्या लांबीची पट्टी : 'त्यास तट, गजाप्रमाणे नेमून द्यावे.' – चित्रगुप्त ३५. ८. वरील मापाने मापलेले परिमाण (कापड इत्यादीचे); गजाने परिमित वस्त्रादी पदार्थ. ९. सामर्थ्य; प्रमाण; शक्ती. १०. विहीर इत्यादिकांच्या बंदिस्तीस गजांचे प्रमाण भरले असता जे चिन्ह दाखवतात त्या चिन्हापर्यंतचे बंदिस्तीचे अंग, काम. [फा. गझ्]

गज पु. तळे, विहीर यांची पाळ, वरवंडी, काठ.

गज पु. हत्ती. [सं.] (वा.) **गजस्कंधी बसणे** –मिळालेल्या वैभवात जुनी पहिली ओळख विसरणे; गर्वाने फुगणे. आढ्यतेखोर होणे.

गज पु. अडकण; कांब; नाग; वारण.

गजकर्ण न. अतिशय खाजणारा व पसरत जाणारा एक त्वचारोग. [सं.]

गजकर्णी स्त्री. अपानवायूला ऊर्ध्व करून कंठाशी आणून पोटातील दूषित पदार्थ ओकून टाकण्याची क्रिया.

गजकर्णी स्त्री. गजकर्ण हा रोग बरा करणारी वनस्पती.

गजका पु. हुंदका. [ध्व.]

गजकाठ्या स्त्री. अव. न्हाणवलीच्या मखरांचे खांब.

गजकिंकरी स्त्री. गोखरू; सराटा. (व.) [सं.]

गजकुटी वि. गजपुटाने सिद्ध केलेले (औषध).

गजकुंडी स्त्री. बारुत फोडण्याचे साधन.

गजकुंत–कोंत पु. हत्तीला टोचण्याचा भाला. [सं.]

गजकुंभ न. हत्तीचे गंडस्थळ : 'स्वर्गातें गजकुंभ भेदुनि कीं सत्कीर्ति ही धाडिली ।' – वैराग्यशतक श्लोक ४३. [सं.]

गजकोंत पु. हत्तीची झूल : 'सांबळी झेलितां । गजकोंती गुसळितां ।' – शिव १०४५. [सं.]

गजक्रीडित–करण न. (नृत्य) डावा हात अंचित करून कमरेवर ठेवणे, उजवा हात लताहस्त करणे व उजवा पाय दोलित करणे.

गजगज स्त्री. १. गलबला; गजबज; गोंगाट (गर्दीतील माणसांचा); गडबड : 'सुखसमयाची गजगज ।'– वेसीस्व ३.२४. २. चिवचिव; किलबिल (चिमण्यांची). [सं.गज्= ओरडणे]

गजगज वि. भरपूर; पोटभर : 'समर्थ जेविले गजगजा ।' – सप्र १५.३५.

गजगज पु. उष्मा; उकाडा. (गो.)

गजगजणे अक्रि. १. गजबजणे; उद्योग व्यवसायामुळे भरलेले असणे (घर, गाव). २. भरुन येणे : 'रायां गहिंवर गजगजे ।' – वेसीस्व २.८ [ध्व.]

गजगजाट पु. गजबजाट; धोशा; गडबड; गाजावाजा (कृत्यांचा); गर्दी; कलकलाट (माणसांचा); किलबिलाट; चिवचिव; गुंजारव; गुणगुण; गोंगाट (माशा, पक्षी यांचा). [ध्व.]

गजगजीत वि. १. गलबललेले; गजबजलेले; गोंगाटाने, आवाजाने भरलेले (घर, गाव इ.) २. गडबड्या (माणूस). [ध्व.]

गजगति–ती स्त्री. गंभीर व रुबाबदार चाल; डौलदार गती; डौलदार चालणे; ठुमकत जाणे; ऐश्वर्यवान ठुमका, तोरा; संथ गती : 'गजगती जगती

प्रति दाविते ।'– वासीस्व ५९

वि. रुबाबदार चालीचा; गजगतीचे वैशिष्ट्य असलेला. [सं.]

गजगमा, गजगामिनी स्त्री. गजगतीने, ऐटीने चालणारी स्त्री; [सं.]

गजगा पु. सागरगोटा; गजरगोटीचे, एका काटेरी वेलाचे फळ. [क. गजुगे]

गजगाजला पु. बोलबाला : 'हल्ली लिहिण्यावाचण्याचा गजगाजला आहे.'– लो. टिळकांचे पन्नास वर्षांचे चरित्र. १.७.

गजगोटा पु. समारंभात बार काढण्यासाठी दारू भरलेला व मोठा बार होणारा एक गोटा. (ना.) [ध्व.]

गजगोटी स्त्री. सागरगोटा.

गजगौरीव्रत न. १. भाद्रपदातील स्त्रियांचे एक व्रत; हस्त नक्षत्रात सूर्यप्रवेश होण्याच्या वेळचे व्रत. यात शंकर, पार्वती व गणपती यांच्या सोन्याच्या मूर्ती करून त्या सोन्याच्या हत्तीवर बसवून ब्राह्मणाला दान देतात. २. हत्तीवर बसविलेल्या पार्वतीचे पूजन. [सं.]

गजघटा–घंटा स्त्री. हत्तींचा कळप, समुदाय : 'जैसे न गणिजे पंचाननें । गजघंटांतें ।।' – ज्ञा १.९२. [सं. घटा–कळप]

गजघंटा, गजघाट स्त्री. १. हत्तीच्या गळ्यातील घाट. २. (ल.) वाचाळ, कर्कश, कजाग स्त्री; (विशेषत:) मोठ्याने भाषण करणारी स्त्री. ३. गुप्त गोष्ट फोडणारा मनुष्य; ज्याच्या पोटात काही राहत नाही असा.

गजचर्म न. १. हत्तीचे कातडे. २. घोड्याचा एक रोग. यात अंग वारंवार झाडणे, अंगावर चट्टे पडणे व हत्तीच्या अंगाप्रमाणे अंग खरखरीत होणे ही लक्षणे होतात. – अश्वप २.२५२. [सं.]

गजचर्या स्त्री. हत्तीवर बसण्याची विद्या; हत्ती चालवण्याचे कौशल्य : 'कुस्तीशिवायचे खेळ व कसरतीचे प्रकार म्हणजे रथचर्या, गजचर्या, अश्वचर्या, तलवारीचे युद्ध व गदायुद्ध होत.'– व्याज्ञा १.३६ [सं.]

गजछाया, गजछायापर्व स्त्री. न. भाद्रपदी अमावास्येला सूर्य व चंद्र हस्तनक्षत्री येणे; या योगाची पर्वणी. हस्तनक्षत्री सूर्य असताना मघानक्षत्रयुक्त त्रयोदशी येणे. [सं.]

गजझंपा पु. (संगीत) मृदंग, पखवाज यावर वाजविला जाणारा एक ताल. याच्या मात्रा पंधरा व विभाग चार असतात. [सं.]

गजढाल–ला–ळा स्त्री. हत्तीवरील मोठा ध्वज; निशाण : 'गजढाला आंदोळती ।'– जै ६७.४८.

पु. निशाणाचा हत्ती : 'लाविला गजढाळा ।'– ऐपो १४.

गजढाल पहा : **ढालगज** : 'त्यावरुन आईसाहेब बोलली की, मी बायको गजढाल असे लोक म्हणतात.' – भारतवर्ष आमात्य बावडेकर कैफियत १८.

गजणे अक्रि. **१.** शरीरात जिरले जाण्याइतपत मर्दन करणे; चोळणे (तूप, उटी इ.). **२.** चोळणे; रगडणे, घासणे.

गजणे अक्रि. (प्रा.) मागे टाकणे, वरचढ होणे.

गजतजरीज गजाच्या मापाने : 'जमिनीची गजतजरीज लांबी पूर्व–पश्चिम गज इमारतीशिवाय पाये दिवाल गज ४२'– पेठे दप्तर २.१.

गजताल पु. (संगीत.) पखवाजावर वाजविला जाणारा एक ताल. मात्रा सोळा, चार समभागांत. [सं.]

गजदंत पु. १. (हत्तीचा दात) हस्तिदंत. २. घोड्याचा हत्तीसारखा बाहेर आलेला दात, सुळा. असा घोडा अशुभकारक मानतात. ३.(संयुक्त हस्त नृत्य) खांद्याच्या सरळ रेषेत दोन्ही हातांची कोपरे उंच करणे व डोक्याच्या प्रत्येक बाजूला हाताची बोटे एकमेकांना चिकटवून, उंच करून त्यांना थोडा खळगा पाडणे. [सं.]

गज(झ)नी स्त्री. अर्धसुती व अर्धरेशमी, एका बाजूने रंगीत व वर पट्टे किंवा रेघा असलेले कापड; गजनी येथे तयार होणारे उंची कापड.

वि. वरील कापडाची (चोळी, परकर इ.). 'काढिली गझनी चोळी'– आआशे २२४. [फा. गिझनी]

गजनी स्त्री. गजर; आळवणी, जयघोष : 'त्या सुळीचं झालं पानी । हरिनामाची गजनी ।' – लोसामा ५.१८.

गजनेत्र, गजनेत्री वि. १. हत्तीच्या डोळ्यांप्रमाणे डोळे असणारा; बारीक, मिचमिच्या डोळ्यांचा. २. अर्ध–दृष्टीचा, उलट्या बाहुल्या असलेला.

गजपण पहा : **गचपण**

गजपति–ती पु. १. हत्तींचा धनी, हत्ती बाळगणारा ऐश्वर्यवान माणूस. २. गजदळाचा सेनापती. ३. (विनोदार्थी) धोतराऐवजी गजा (पंचा) नेसलेला. ४. ऐरावत : 'का मांदुरी लोकांचा घोडा । गजपतिही मानी थोडा ।' – ज्ञा १६.२२५ ५. ओरिसा येथील राजांचे बिरुद. (सं.)

गजपिंपळी स्त्री. १. एक औषधी झाड, मिरवेल. २. मिरवेलीवर आलेल्या शेंगा (औषधी).

गजपूट–ठ–ठी न. औषध तयार करण्याची क्रिया. एक गज औरसचौरस व खोल खळगा खणून त्यात गोवऱ्या, बकरीच्या लेंड्या, इ. जळण खालीवर घालून त्यामध्ये रसायन किंवा औषधी द्रव्य ठेवून त्याला केलेला अग्निसंस्कार. (क्रि. देणे, करणे.)

गजब पु. १. गहजब, कडक जाचणूक; कहर; जुलूम. (क्रि. करणे, मांडणे, चालवणे) : 'पर्वर्दिगार मोठा गजब जहाला.' – चित्रगुप्त ४५. २. जोरांचे, दबावाचे भाषण; गालिप्रदान; शिव्या देणे; मारणे; चवताळून अंगावर जाणे. (क्रि. करणे.) ३. दु:सह तडाखा, दैवाचा जबर घाला; अवसान खचण्याजोगे संकट; दु:खप्रद दैवी घटना. (क्रि. होणे, गुदरणे.) ४. हद्द, परिसीमा, कमाल. (फा.)

गजबज स्त्री. १. गडबड; गलबला; गोंगाट (अनेक माणसांच्या बोलण्याचा) : 'गजबज ऐकोनि थोर । उपरीवरी चढला उषावर ।' कथा १.७.२४. २. खळबळ, मनातील अस्वस्थता : 'तेथ मनीं गजबज जाहाली ।' – ज्ञा १.१८५. ३. गडबड, गोंधळ (दु:खदायक कृत्याचा) : 'गजबज बहु झाली माय धांवोनि आली ।'– मइसा ३३. [ध्व.]

गजबजणे अक्रि. १. गलबल, गडबड, धामधूम, गजगज असणे, भरलेले असणे, उद्योगात असणे (घर, गाव.) २. विस्मय पावणे; घाबरणे; गोंधळणे; खडबडणे; धैर्य सुटून घाबरे होणे. 'ऐसी उदास वाक्यें ऐकोनी। मनीं गजबजली त्रिभुवन जननी ।'– ह २७.१०१. ३. दाटणे, कोंदलेले, भरलेले असणे; कोंदणे : 'नाना रंगीं गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे ।'– ज्ञा १५.२४०. ४. (अकर्तृक) खळबळ उडणे, हाहाकार होणे : 'तंवं गजबजिलें अंबरीं । देवतांगणु ।'– दाव १११. [ध्व.]

गजबजाट पु. मोठा गोंगाट. [क. गिजगुट्ट]

गजबजीत वि. १. गजबजलेले; गजगजीत; गलबलीत; उद्योगाने, गजबजीने भरलेले (घर, गाव.) २. गडबड्या (मनुष्य).

गजबा गहजब; अवकृपा; राग.

गजबाक पु. अंकुश.

गजबार पु. गलबला : 'पालक पाळईना चिमण्याबाईंचा गजबार ।' – वा १६४.

गजबार पु. हार : 'झेंडु फुलांच्या माळा गळ्यामधि फुलांचा गजबार ।'– एहोरा १.८५.

वि. टवटवीत : 'मळा माणसात आणला. हिरवा गजबार करून टाकला.'– रैत ६५.

गजबारणे अक्रि. टवटवीत होणे : 'परिस्थितीच्या चटक्यांनी चरकून गेलेलं तिच्या तारुण्याचं फूल गजबारून उठलं.' – चिताक १०६.

गजबाव स्त्री. चुन्यात बांधलेली विहीर; पायऱ्या असलेली विहीर.

गजबीड पु. (कुस्ती) कुस्तीतील एक डाव. प्रतिपक्षाच्या पाठीवर असताना दुसरा पट पायाने स्थानभ्रष्ट करणे.

गजबू पु. गोंधळ; गजबज, गोंगाट : 'तंव यादवां गजबु जाला ।' – उषा १३७१.

गजभार पु. १. गजदळाचा समावेश असलेले सैन्य. २. हत्तींचा कळप, झुंड.

गजभोंगळी स्त्री. छपराच्या मोहोटीच्या पानाच्या वर चार बोटे उंचीच्या खिट्या मारून त्यावर बसवलेला लोखंडी लांब तुकडा (कौले घसरू नयेत म्हणून). दोन खिट्यांमधील अंतर साधारण पाच पन्हाळींचे असते.

गजमुड्डी स्त्री. गर्दी, दाटी, (गो.) पहा : **गचमुड्डी**

गजर पु. १. अनेक वाद्यांचा एकत्रित नाद, घोष : 'गजराची भिक्षावळ मिरविली ।'– ऐपो २१०. २. प्रहराप्रहराच्या शेवटी तास वाजविणे; तासांचे टोल; घड्याळाच्या घंटेचा आवाज. (क्रि. लावणे.) ३. कथेत होणारा जयघोष; कीर्तनात ईश्वरनामाचा जयजयकार; नामस्मरणाची टाळी. ४. (ल.) मोठा आवाज; उंच स्वराची आरोळी, ५. डांगोरा; दवंडी. ६. लौकिक, धिंडवडा. (क्रि. करणे.) ७.जुलमाचा कहर. [सं. गज् = नाद करणे.]

गजर पु. चांदीच्या सळईवर बारीक सूत गुंडाळून केलेला एक दागिना : 'रामलक्ष्मण दोन्ही काठाचे पदर । सावळी सीताबाई मधीं ठुशीचा गजर ।' – लोसामा ५.६.

गजरगोटा, गजरपटा पु. सागर – गजरगोटीचे बी. हा खडा मुली खेळायला घेतात. (हेट).

गजरगोटी, गजरी स्त्री. १. सागरगोट्यांचे झाड. २. सागरगोटा.

गजरा पु. १. सागरगोटा. २. लाखगोटी (लहान मुलांच्या खेळांतील).

गजरा पु. १. फुले दोऱ्यात गुंफून करतात ती माळ. हा केसात, हातात घालतात. २. मोती इ. चे काकण, बांगडी. ३. (सोनारी) दाभणाच्या जाडीच्या एका घोट्याच्या मापाच्या व दोन्ही टोकांना फासे केलेल्या अशा चांदीच्या सळईवर एक बारीक सूत गुंडाळून तयार केलेला दागिना. [हिं.]

गजरा पु. आवली.

गजरा पु. (संगीत) मृदंग, तबला यांच्या दोन्ही वाद्यांच्या पुडाच्या काठावर वादीची गुंफलेली वेणी.

गजरा–रो पु. ज्यांचे मांस खाण्यायोग्य आहे असा एक पक्षी. (कु.)

गजरेदार वि. गजऱ्याच्या आकाराचा (अंगरखा) इ. : 'गजरेदार आंगरखे जाऊन पोकळ आंगरख्यांची भर पडली.' – नि २८.

गज(झ)ल पु. स्त्री. एक फारसी वृत्त प्रकार व गायन प्रकार. प्रियकर आणि प्रेयसी यांच्यामधील प्रेम हा या काव्यप्रकाराचा प्रमुख विषय असतो. ईश्वराला प्रियकर समजूनही अशी गीते रचली जातात. एका गझलात सामान्यत: ५ ते ७ शेर (श्लोक) असतात. प्रत्येक शेराची दुसरी पंक्ती सयमक असते. प्रत्येक शेरात वेगवेगळा विषय असतो. पहिल्या शेराला 'मतला' व शेवटच्या शेराला 'मक्ता' असे नाव आहे. . [फा.]

गजलगोष्टी स्त्री. अव. गप्पागोष्टी, बोलणे, संभाषण, पहा : **गजाल**

गजवज्र न. खड्ग, तलवारीचा एक प्रकार. [सं.]

गजवा–वे पु. न. पैशाची थैली, पिशवी; पैशाचा कसा; खिसा. [फा. गझावा = हत्तीच्या किंवा उंटाच्या पाठीवरील पिशवी]

गजवार वि. गजाने मोजून दिलेले : 'वाटिलें ठाण कुणाला गजवार ।'– ऐपो २००.

गजविभाड पु. हत्तीचे निर्दालन करणारा : 'जेवि सिंह होऊनि गजविभाडु : परि लोकांतु नसे'– ज्ञाप्र ७८२.

गजवेल स्त्री. आंबेमोहोर तांदळाची एक जात.

गजशावा न. हत्तीचे पिल्लू.

गजश्रद्धा स्त्री. प्रारंभी मोठा डौल किंवा गाजावाजा दाखवणारे व परिणामी अगदीच क्षुद्र ठरणारे काम किंवा त्याचा प्रकार. भपकेदार व विस्तृत पण निरर्थक काम, डोंगर पोखरून उंदीर काढणे.

गजस्कंध स्त्री. हत्तीची अंबारी. [सं.]

गजस्नान न. (हत्तीला स्नान घातल्यावर किंवा त्याने स्वत: सोंडेने स्नान केल्यावर तो आपल्या अंगावर पुन्हा धूळ, चिखल उडवतो त्यावरुन) निष्फळ प्रयत्न; विपरीत फळ मिळालेला प्रयत्न; बरे होण्याकरिता योजले असता उलट रोग वाढवणारे उपाय. [सं.]

गजक्षेओ न. हत्तीचे पिल्लू.

गजंब पु. गर्दी; दाटी.

गजा–जे पु. न. नेसायचा फार लहान पंचा.

गजागजधूर पु. सर्वश्रेष्ठ : 'किं वर्णो महिमा गजागजधुरा'– वेळापूर शिला ४.१.१४.

गजानन पु. कापूस तोलून घेताना वजनाच्या बाजूला लावतात तो साधारण एक किलो वजनाचा दगड.

गजानंद वि. (विनोदाने) गजाने (पंचाने) आनंद पावणारा, अल्पसंतुष्ट.

गजानृत्य पहा : **गजी** : 'गजानृत्य हे धनगरांचे खास नृत्य होय.'– मस ३६२.

गजाल स्त्री. १. गोष्ट; निरर्थक गप्पा; गजलगोष्टी. (क्रि. सांगणे, करणे.)

(कु.) २. आरडाओरड; कोलाहल, गडबड. (राजा. गो.) [ध्व.]

गजांकुश पु. सराट्यांची एक जात.

गजांत लक्ष्मी १. दाराशी हत्ती झुलण्याइतकी म्हणजे हत्ती पोसण्याइतकी श्रीमंती, अतोनात श्रीमंती, वैभव. २. (विनोदाने) अतिशय दारिद्र्य; धोतर विकत घेण्यासाठी पैसे नसल्याने गजा (पंचा) विकत घेण्याची पाळी येणे. ३. (विनोदाने) अंगावरील गजकर्ण, नायटे.

गजिवेल स्त्री. करवतीसारखे दाते असलेली तलवार. ही तलवार शत्रूच्या चिलखताला अडकवून त्याला ताब्यात घेता येत असे.

गजी स्त्री. धनगरांचा नाच : 'धनगरांची कसबी पोरे गोळा होऊन गजी नाचू लागली.' – धनगर ६२.

गजी स्त्री. हत्तीण : 'गजी गजशावै नेणों किती । काढी रुतीबाहेरी ।' – एभा १७.४४७. [सं. गज]

गजी स्त्री. तासून चौरस केलेली लाकडाची कडी; लांब व बारीक सुळक्याचे लाकूड.

गजी स्त्री. लांब, अरुंद व भरड पोताचे कापड, जाळे; गजवे. [फा. गझी = एक जाडेभरडे कापड]

गजीव वि. चुनेगच्ची, बांधीव (विहीर, इ.). [फा. गच् = चुना]

गजेकौतुक पु. १. महदाश्चर्य. २. बढाई (कु.).

गजेरी स्त्री. १. नदी, समुद्र, खाडी इ. च्या भरतीने, पुराने वाहून, आलेला गाळ, मळी. २. त्या गाळाने बनलेली जमीन, पुळण.

गजेंदर वि. १. प्रचंड, अवाढव्य, मोठी, विस्तृत, अफाट (इमारत, धंदा, कारखाना, खाते, गोष्ट, थाटमाट, खर्च). २. विशाल; मोठा (देश, उद्ध्वस्त प्रांत, अरण्ये, पीक, सैन्य, संपत्ती इ.). [सं. गज+इंद्र]

गज्जल पहा : **गजल** : 'आपल्या त्या गज्जलसारख्या मधुर शब्दांनी मला जायला सांग.' – रूरा ९७.

गझी पहा : **गजी**

गट पु. १. विशिष्ट उद्दिष्टाने वा विचाराने एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह; मंडळी; टोळी; जमाव; समुदाय; एका कटातील किंवा जमावातील मंडळी; मेळा : 'कौन्सिलांत कांहीं गट असतात.' – के १४.६.३०. २. भरगच्च टोळी, जमाव (सैन्य, जनावरे यांचा); कंपू,जथा. ३. वीट, दगड (सोने, रूपे इ. ची) : 'तो त्याजवळ सुमारें दोन हजार रुपयांचे चांदीचे गट अनामत ठेवून परत आपल्या गांवीं गेला.' – मराठी तिसरें पुस्तक २ (१८७३). ४. (किराणा दुकान) वजनांचा संच. ५. रास; ढीग; काही विशिष्ट संख्यांचा समुदाय. ६. विभाग. (क्रि. पाडणे). ७. अंश; तट; गण; तुकडी; दल. [क. गट्टि]

गट–गट एखादा पदार्थ त्वरेने गिळतांना होणारा आवाज.

गटकन–र–दिनी–दिशी क्रिवि. भरभर; एकदम (खाणे, पिणे याचा वाचक); गटगटा; ढसढसा; मटमटा; गट्ट आवाज होईल असे.

गटकळी, गटकळणे पहा : **गचकळी, गचकळणे**

गटकावणे पहा : **गट्ट करणे**

गटकी स्त्री. गंडा; चट्टा : 'चार उपद्व्यापी माणसें लोकांना गटकी घालून आपल्या मनाची हौस पुरवून घेतात.' – गोट्या १४६.

गटगट–टा क्रिवि. १. पहा : **गटकन** (क्रि. पिणे.) : 'फळें खातीं गटगटां ।' – भारा किष्किंधा १५.१११. २. उकळणे, कढणे या वेळी होणाऱ्या आवाजाप्रमाणे. (क्रि. शिजणे, वाजणे.)

गटगटणे, गटगटावणे अक्रि. १. गटकन गिळणे, ढसढस पिणे, मटमट खाणे. २. गदगद उकळणे, कढणे (तांदूळ, डाळ, भाजी इ.).

गटगटणे अक्रि. गरगरीत, वाटोळी बसणे, तंग बसणे, 'जरिकांठ कंचुकी ताठ गांठ गटगटली ।'– प्रला २३८. [सं. ग्रंथि]

गटगटीत वि. टपोरे, मोठे व सुंदर, वाटोळे व भरदार (डोळे).

गटगटीत वि. ढिले; खिळखिळीत; सैल; डगमगीत; गट्गट् करणारे; हलणारे (यंत्र).

गटगटे न. बोंबील; काड्या (मासा). (अलिबाग)

गटगट्या पु. ओला बोंबील.

गटगिळ्या, गटगीळ वि. दुसऱ्यांचा पैसा खाणारा; हरामखोर.

गटगोळा, गटंगोळा पु. बकाणा; गटाणा; तोंडभर मोठा घास खाणे; कोंबणे (क्रि. करणे, करून टाकणे.)

गटगोळा वि. भेदरलेला, थिजल्यासारखा, घाबराघुबरा, : 'भावाच्या बोलण्यानं भिऊन गटगोळा झाला होता.' – सीए ६७.

गटचर्चा स्त्री. एखाद्या वर्गाचे किंवा समूहाचे अनेक छोट्या समुहात विभाजन होऊन त्या विभाजित गटात स्वतंत्ररीत्या पूर्वनिर्देशित सूचनांप्रमाणे विशिष्ट बाबींवर करण्यात येणारी चर्चा.

गटण न. स्त्री. (संगीत) ताल; मात्रा; काळ. पहा : **गठण**

गटणे अक्रि. ठासून उभे राहणे; गटाने उभे राहणे : 'विर सारे नटले, लढु लढु गटले, नाहीं कुणि हटले ।'– ऐपो २४०.

गटणे अक्रि. फसणे; पेचात येणे.

गटपट स्त्री. दाट परिचय; गाढ मैत्री, दोस्ती. [गु.]

गटपट स्त्री. सटपट, गडबड. (व.) पहा : **लटपट**

गटपट, गटंपटं, न. १. फुशारकी किंवा डौल मिरविण्याचे भाषण. २. अप्रासंगिक किंवा चुकवाचुकवीचे भाषण; ठकबाजीची किंवा मूर्खपणाची सबब. ३. गडबडगुंडा. ४. सतरापंधरा बाता. (क्रि. लावणे, मांडणे, चालविणे, लागणे, चालणे.) [सं. गट्]

गटपटणे अक्रि. गोंधळणे, भांबावणे, लटपटणे. (ना.)

गटबाजी स्त्री. १. (समाज) समान राजकीय अथवा सामाजिक हितसंबंध असलेल्या समूहाने, समाजगटाने आखलेले धोरण, केलेली कृती. २. स्वार्थासाठी एकत्र येणे; फायदा होईल अशा पक्षात किंवा समूहात सामील होणे : 'ग्रामीण भागात सर्वत्र आढळणारी भांडणे व गटबाजी येथेही आहे.' – चंद ३.; तट.

गट(टा)र न. १. रस्त्याच्या बाजूचे घाण पाणी वाहून नेणारी मोरी, नाली. २. (मुद्रण) फर्मा ठोकताना दोन पृष्ठांमधील सोडलेले अंतर. [इं.]

गटरगावंज्या वि. वाटेल तो पदार्थ (खायला) व वाटेल ती परिस्थिती ज्याला चालते असा, बिनतक्रारी (माणूस). (व.)

गटरफटर न. सटरफटर , क्षुद्र गोष्टी; हलक्यासलक्या वस्तूंचा संग्रह; अनेक किरकोळ वस्तूंचा एकत्र साठा.

गटरे न. गठडे, साठवलेला पैसा : 'कुप्पात आपल्या बाचं गटरं पुरल्यावानी हुडकाय लागलाईसा ते ?' – रैत १४९.

गटवणे सक्रि. १. जाळ्यात ओढणे; वश करून घेणे : 'हरिकाका अन् मी–आमचं काम गिऱ्हाईक गटवण्याचं.'– व्यव ५३. २. फसवणे.

गट विमा (अर्थ.) अनेक व्यक्तींचा समावेश असलेल्या गटाने सामूहिक रीत्या उतरविलेला विमा. या पद्धतीत विम्याचा हप्ता कमी बसतो.

गटगळी पहा : **गटांगळी**

गटागट–टा, गटाट–टा क्रिवि. भराभर, ढसढसा. [क. गुटुगुटन]

गटाणा पु. बकाणा; मोठा घास. (क्रि. करणे.)

गटाणा पहा : **घाटा, घाटाणा.**(वा.) **० होणे**– तिळपापड होणे, जळफळाट होणे : 'खळ्यावरून भाताच्या गाड्यांची रांग आली तेव्हा बनूताईचा गटाणा झाला.'– आआशे ३८१.

गटापर्चा पु. मलाया द्वीपकल्पातील एक झाड, याचा रस आटवून त्याचा केलेला रांधा. हा पाण्यात शिजवला म्हणजे लवचीक बनतो व वाळवल्यावर पुन्हा कठीण होतो. याच्या चाकूच्या, काठ्यांच्या मुठी, ठसे वगैरे करतात. [मलाया–गटा = गोंद, पर्चा = झाड.]

गटारगप्पा, गटारबातमी स्त्री. १. गावातील खऱ्याखोट्या गोष्टींसंबंधी चविष्टपणे निष्फळ बोलणे. २. अफवा, अविश्वासार्ह बातमी : 'न्हाव्याने ही गटारगप्पा ठरवली.' – काआ ११३.

गटारगंगा स्त्री. १. घाणेरड्या पाण्याचा प्रवाह. २. (ल.) घाणेरड्या गप्पा.

गटारयंत्र न. १. निराधार, खोट्या अफवा उत्पन्न करणारा. २. गावातील कुटाळ लोकांची चकाट्या पिटण्याची चव्हाट्यावरील जागा. (पूर्वी पुण्यात संध्याकाळच्या वेळी गटारावरील फरशांवर बसून लोक गप्पा मारीत त्यावरून.)

गटाळणी, गटाळी स्त्री. भटकंती. (वा.) **गटाळण्या, गटाळ्या घालणे –** भटकंती करणे; रिकामटेकडे हिंडणे; उंडारणे : 'बजाची ही सून पोराला पाळण्यात टाकते आणि गटाळण्या घालीत गावभर फिरते.' – गागो १. 'त्याच्याच जिवावर भाकरतुकडा खात होता आणि दिवसभर गावात गटाळ्या घालीत हिंडत होता.'– भुज १३२.

गटांगळी स्त्री. डुबकी (बुडत्या माणसाची). नाकातोंडात पाणी जाणे. (वा.) **० खाणे** – १. पाण्यात बुडणे, नाकातोंडात पाणी जाणे. २. (ल.) नापास होणे : 'मी मॅट्रीकला दोन गटांगळ्या खाल्या.' – लटिके ६.

गटी स्त्री. मैत्री, सलगी, जूट : 'काजी दाउतखान गटीत असतो.' – पेद ३४.१९ पहा : **गट्टी**

गटुणा–ना, गटुंगा वि. ठेंगणा पण मजबूत, लहान आकाराचा पण सुदृढ.

गटोळा वि. वाटोळा, गोलाकार.

गट्ट पहा : **गट** (वा.) **० करणे –** १. दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणे. २. उधळपट्टीने फस्त करणे. ३. मटकावणे; एका घासात खाणे, गिळणे.

गट्ट पहा : **गटुणा**

गट्टगोळा होणे जागच्याजागी खिळल्यासारखे होणे : 'पाटील घाबरून गट्टगोळा झाला.' – गागो ७४.[क. गट्टि = गोळा, सामर्थ्य, काठिन्य]

गट्टण स्त्री. गट्टी, गाठ : 'आपले व आमचे स्नेहाची प्रेममयतेची गट्टण आहे ही सर्वांस वाईट आहे.' – नाग १.३२

गट्टा पु. (संगीत) स्वरमिळवणीत बारीक बारीक दुरुस्त्या करण्यासाठी मृदंगाच्या वादीच्या खाली घालतात ते, सुताच्या रिळासारखे लाकडाचे साधारण दोन इंच लांबीचे व एक इंच जाडीचे तुकडे.

गट्टा पु. १. पहा : **गट** १, २. २. गठ्ठा. ३. (क्व.) पहा : **गड्डा**

गट्टाण न. गठडी, नाश. (गो.)

गट्टी स्त्री. १. दाट मैत्री; सलगी; परिचय. २. निकट संबंध; एकी; एकत्रपणा; संघ; समुच्चय; पहा : **गट** १. (क्रि. करणे, मोडणे,) [क. गट्टी]

गट्टीचो(सो)ड्या पु. एक शिवी : 'अरं तो गट्टीचोड्या कशाला ऱ्हातोय' –वळीव ७१. [क. गंटुकळ्ळ]

गट्टीफू स्त्री. अबोला; मैत्री न ठेवणे; कट्टी करणे. (क्रि. करणे.)

गट्टू पु. भिंतीत, दारात बसवलेला लाकडाचा तुकडा : 'दरवाजा उघडण्याकरिता पकडावयाचा त्याच्यावरील गट्टू तुला दिसतो का ? ' – अभिनय ७१.

गट्टू पु. १. गडू; अंदाजे अर्धा लिटर पाणी मावेल असे पितळी भांडे. (खा.)

गट्टू पु. (बिडाचे काम) उसाच्या चरकातील मादीच्या डोक्यावरील टोपणीखिळा.

गट्टू वि. ठेंगणाठुसका पण मजबूत, पुष्ट, गोल अंगाचा, गुटगुटीत.

गट्याळ वि. खडबडीत; खराब : 'गट्याळ वाटेवरचे गचके सोशीत मंजुळा छकड्यात बसली होती.'– वारी १११.

गठडी स्त्री. १. गुंज. २. जमाव.

ग(गं)ठडी–डे, गठडी–डे स्त्री. न. १. गाठोडे; लहान मोट; गठ्ठा (कापडचोपड, चिरगूट पांघरूण इ. चा). २. लहान गाठोडे; पुरचुंडी (एखाद्या वस्त्राच्या पदरात थोडेसे रुपये, धान्य, गोटे, चुनखडी, साखर इ. बांधलेली.). ३. (ल.) गुप्त द्रव्य; मालमत्ता; भांडवल; पुंजी; संग्रह. ४. (ल.) दारूच्या अंमलात किंवा भूतबाधेने किंवा इतर प्रसंगी हातपाय पोटाशी घेऊन निश्चेष्ट, गाठोड्याप्रमाणे पडलेला माणूस. ५. गठ्ठा, बांधलेली वस्तू, पार्सल. [सं. ग्रंथ, क. गंटु] (वा.) **० उपटणे, उचलणे, पार करणे, लांबवणे** – दुसऱ्याची मालमत्ता घेऊन पळणे, अपहार करणे. **० करणे, बांधणे** (हातापायांची) – १. हातपाय पोटाशी घेऊन पडणे, पाडणे. २. एखाद्याचे हातपाय एकत्र करणे, मोट बांधणे. ३. मंत्राने एखाद्याच्या हातातील शस्त्रे काढून घेऊन त्याला हतबल करणे, बांधणे, शक्तिहीन करणे. ४. गोंधळविणे, निरुत्तर करणे, कुंठित करणे, पराभव करणे. (वादविवादात) **० पुरणे –** द्रव्य पुरणे. **० होणे, वळणे** – १. गुंडाळले जाऊन गठ्ठा होणे, हातपाय एकत्र बांधले जाणे. २. शक्तिहीन, निराश्रित होणे, लोळत पडणे, कुजणे (ताप इ. मध्ये) ३. मरणे. ४. वठणीवर आणणे, सरळ करणे.

गठण स्त्री. न. (संगीत) मृदंग वाजवण्यातील एक प्रकार, ताल.[सं. ग्रंथन]

गठण न. उद्देश. (वा.) **० गाठणे, गठणास आणणे** – आपल्या उद्देशांशी अथवा विचारांशी मिळते करणे, जमविणे. **गठणास येणे** – उद्देश, विचार, परिणाम यांच्याशी मेळ पडणे, पाडणे, पटवून घेणे.

गठणे उक्रि. वेढणे, गुंडाळणे. (बे.) (वा.) **गठून येणे –** एकत्र होऊन

येणे, जुळून येणे : 'येसाजी शिंदे यांनी ४००० फौज व २ हत्ती ऐसें गठूनच आले'. – ऐलेसं २५७५.

गठणे अक्रि. फसणे.

गठळ वि. अव्यवस्थित, गबाळ. पहा : **गढळ**

गठळी स्त्री. १. गुंडी. २. सुरकुती (सुतामधील). ३. (रक्त इ. ची सुकून झालेली) बारीक गोळी; न विरघळलेली बारीक गोळी; गुठळी.

गठाण स्त्री. मोठी गाठ, गाठोडे, आवळलेला बोजा. (व.) [सं. ग्रंथन]

गठाण न. गठ्ठा, (कापसाची) गाठ.

गठाण्या पु. हमाल; सामान बांधून त्याची ने आण करणारा.

ग(गं)ठीछोड वि. १. (गाठोडे सोडणारा) गाठोडे सोडून चोऱ्या करणारा, भामटा; गुप्त ठेवा चोरणारा; बिलंदर; अट्टल (चोर) : 'गठीछोडे द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती ।' – दास ३.७.५० २. (उप.) कृपण; कद्रू; जो आपला पैसा, मालमत्ता फार जपून ठेवतो तो. [हिं.]

गठुडे पहा : **गाठोडे** : 'हालकडीचं गठुडं काढलं.' – मळणी ३४.

गठोळी स्त्री. १. पुरचुंडी; लहान गाठोडे (कपडे इ. चे).

गठ्ठ वि. १. घट्ट; गट्टू; बांधेसूद (शरीर). २. मांसल, गोंडस (अवयव).

गठ्ठा पु. जून झालेली चवारी सुपारी.

गठ्ठा पु. १. बिंडा, दिंड, बांधलेला मोठा बोजा (कापड इ. चा); भारा (लाकडे, पाने यांचा); (सामा.) घट्ट आवळलेले ओझे. २. (क्व.) गट : 'अकस्मात भलतेकडून पांच दाहाशें दोनशें असे गठ्ठ्यांनी शिरून शत्रूस दुभंग करावें.' – मराचिथोरा ५५. ३. लबका; घट्ट गोळा; लगदा (मुरंबा, दही यांचा). ४. (ल.) भांडवल; पुंजी; द्रव्य; मालमत्ता. ५. **गठ्ठा** स्त्री. जुडी; मोटकुळी; मोळी; पुडका; बोचके; दप्तर. [सं. ग्रंथ] [क. गट्टी = गोळा]

गठ्ठा पु. पखवाज किंवा तबला आवळण्याचा वादीत घातलेला लहान लाकडी ठोकळा. हे ठोकळे तीन इंच लांब व दीड इंच गोल असून सुमारे आठ असतात. हे खाली वर केल्यामुळे तबल्याच्या स्वरात चढउतार होतो. गट्टू.

गठ्ठी, गठ्ठू पहा : **गट्टी, गट्टू**

गठ्ठीचोर, गठ्ठूचोर वि. अट्टल चोर. पहा : **गठीछोड १**

गठ्ठीजोड, गठ्ठूजोड वि. (गाठीशी गाठ घालणारा) कद्रू; पैसे राखणारा. पहा : **गठीछोड २**

गठ्ठ्यांचा खेळ चवारी सुपाऱ्यांनी खेळला जाणारा खेळ : 'आमचे आवडीचे खेळ म्हणजे गठ्ठे व आट्यापाट्या.' – आत्मवृत्त ७२.

गठ्या पु. १. कवड्यांच्या खेळातील फेकण्याची मोठी कवडी, कवडा, पैसा. २. पहा : **गठ्ठा**

गठ्या पु. (अशिष्ट) शिस्न; पुरुषांचे जननेंद्रिय.

गठ्यागोंधळ पु. १. (अशिष्ट) बदफैली प्रकार, जातींमध्ये किंवा स्त्रीपुरुषांमध्ये अनिर्बंध व्यभिचार; अगम्यागमन; गोत्रगमन. २. (ल.) घोटाळा, गोंधळ, सावळागोंधळ, सबगोलंकार.

गड पु. गायवाडा, गोठा (व.).

गड पु. लोखंडी त्रिशूळ. या त्रिशूळाचा वापर हत्तीची देखभाल करणारा भोई जातीचा कामगार करीत असे.

गड पु. १. किल्ला, दुर्ग (मुख्यत्वे डोंगरावरचा) : 'ढेंकणासी बाज गड उतरचढ केवढी ।।' – तुगा ३२६४. २. उभ्या चढाचा डोंगर, पहाड. (वा.) **० पावणे –** एखादी गोष्ट बळकाविणे.

गड स्त्री. अडचण; घोळ; उपद्रव; संकट; अत्यवस्था; निकड; आणीबाणीची वेळ. (क्रि. येणे, लागणे, पडणे, वारणे, टळणे, चुकणे, सरणे, टाळणे, चुकवणे, संभाळणे, सारणे.) [सं. गड = अडथळा]

गडक पहा : **गरक**

गडकरी पु. १ किल्यातील नोकर, शिपाई. २. गडाचा बंदोबस्त करणारा, गडावरील अधिकारी. ३. (कर.) माहुताच्या हाताखालचा माणूस.

गडका, गडखा, गडखी पु. स्त्री. १. (राजा.) फळे, फुले तोडण्याची लाकडी आकडी. (राजा) पहा : **गरखी** २. (उप.) उंच सडसडीत स्त्री. वि. गिऱ्हाइकाला चातुर्याने आपल्या दुकानी ओढणारा (वाणी इ.).

गडकी पु. गडकरी; गडावरील लोक : 'गडकी गलादाणा गडावर नेतात.' – ऐसंसाखं ७.१८.

गडकोट पु. किल्लेकोट, (सामा.) गड, किल्ले : 'गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय होय.'– मराआ २६.

गडकोन पु. पुढे आलेली टेकडी.

गडखळ न. पेच; लचांड; उपद्रव; अडचण.
वि. वर्चस्व किंवा प्रावीण्य मिळण्यास कठीण (एखादी गोष्ट); अजिंक्य (किल्ला); कडा तुटलेला; धोक्याचा; उभट; बिकट (रस्ता); घोटाळ्याचा; गोंधळाचा; भ्रांतिदायक; क्लिष्ट; गूढ (पुस्तकातील विषय, वाक्य).(राजा)

गडखाप स्त्री. अडचण; संकट; गंडांतर (ना.).

गडखोल पु. घोड्याचा गळा.

गडखोला पु. घोड्याच्या गळ्यातील दोरीचे वळे.

गडगच्च वि. दाट; पुष्कळ; विपुल.

गडगच्चा पु. चेपाचेपी; दाटी; (लोक, अभ्रे, धूळ, वस्तू वगैरेची). (क्रि. जमणे, मिळणे, येणे, मोडणे, विरणे.). पहा : **गरगशा**

गडगड–डा क्रिवि. धडधड, करकर इ. आवाज होऊन (मेघगर्जना, गाडी–खटारा इ. चा.); पोटात वाजणाऱ्या आवाजाप्रमाणे : 'कडकड शब्द उडाला, गडगड गगनांत खांब जों चिरला ।' – रामबडवे – मोरोपंत चरित्र (प्रस्तावना). [ध्व.]

गडगड–डी स्त्री. गुरगुर; खरखर; घडघड; गडगडाट; गर्जना.

गडगडणे अक्रि. १. गडगड आवाज होणे; धडधडणे; गुरगुरणे; कडाडणे (मेघ, गाडी इ.). २. मोठी गर्जना करणे, ओरडणे (वन्य पशू इ. नी). ३. गडगड आवाज करीत खाली पडणे; गडगडत खाली येणे. ४. (ल.) मरणे. ५. (ल.) अधिकारच्युत होणे : 'फडणीस अधिकारावरुन गडगडले होते.' – अस्तंभा ३५. ६. (अकर्तृक) पोटात गुरगुर आवाज होणे.

गडगडा पहा : **गडगा** : 'रस्त्याचे बाजूने गडगडावजा भिंत घालून ..' – गार १०१.

गडगडा पु. १. विहिरीवरचा पाणी काढण्याचा रहाट. २. सडकेवरून गडगड जसा आवाज करीत जाणारा गाडा.

गडगडा वि. ओलेचिंब.

गडगडाट पु. मोठी गर्जना; खडखडाट; गुरगुर; गडगड आवाज. [ध्व.]

गडगडा धोंडा गोलाकार, ओबडधोबड दगड; गडगडत जाईल असा दगड.

गडगडांवचे सक्रि. १. मूग, चणे वगैरे पाटावरून खाली तिरकस लोटून निवडणे. २. नारळाचा कीस बारीक करणे. (गो.)

गडगडी स्त्री. पाणी काढायचे लोखंडी चाक; खराडी; पुली. (बडोदा)

गडगडीत पु. कोरडा आणि खडकाळ : 'तव गडगडीत कूप उदके वोसंडला'– नाम ९२१.

गडगडेप न. गडगडाट. (गो.) [ध्व.]

गड(डं)गणे(ने)र न. केळवण; लग्न, मुंज यापूर्वी होणारा एक समारंभ; (वधू किंवा वर यांच्या स्वतःच्या) घरी थाटाने मेजवानी करून आप्तेष्टांना जेवायला घालणे; तसेच हे आप्तेष्ट (वराला किंवा वधूला) आपापल्या घरी मेजवानी देतात ती. यात भोजनोत्तर घरचा आहेर देतात. [क. गडू+नीर = पाण्याचा तांब्या व पाणी. पाहुण्यास द्यायची मेजवानी]

गडगप, गडगप्प क्रिवि. हरवलेल्या, गैरविल्हे लागलेल्या, गहाळ झालेल्या, गिळंकृत केलेल्या, दडपलेल्या, खाल्लेल्या स्थितीत.

गडगर्ज पु. मोठी गर्जना : 'मेघ गर्जती आकाशीं । तैसा गजांसी गडगर्ज ।'– एरुस्व ८१८.
वि. प्रसिद्ध : 'गडगर्जे बंधमोक्ष पाही ।' – एभा १८.१२७.

गडगर्जना न. गडगडाट; मोठी गर्जना : 'येऊनि नाना मेघपटळें । गडगर्जनें गगन झाकोळे ।' – एभा ११.४०९.

गड(डं)गळ–ळी वि. ओबडधोबड व गोलसर; खडबडीत व भोपळसुती; कसाबसा, ओबडधोबड तोडलेला, फोडलेला (दगड, खडक.).

गडगंच, गडगच्च–च्चा क्रिवि. दाटीने, चेंगराचेंगरीने, पुरेपूर; विपुलतेने.

गडगंच, गडगंज स्त्री. अतिशय वैपुल्य; रेलचेल; दाटी, गर्दी (वस्तूंची).
वि. १. गच्च, दाट लोकवस्तीचे; (धनधान्यादिकांचा) भरपूर पुरवठा असलेले; चांगले पोसले जाणारे; सुखवस्तू (गाव, घर). २. पुष्कळ; रगड; भरपूर (वस्तू, पदार्थ). अलोट; पुरून उरण्याइतके. ३. पूर्ण; समग्र; भरपूर; वाढता (सरंजाम, स्वारी, आटाळा). ४. ऐवजदार; श्रीमंत; ऐपतदार (व्यापारी). ५. गंभीर; गाढ (झोप). ६. (सामा.) अलोट, पुष्कळ, पुरून उरण्याजोगे. [क. गड = पुष्कळ, खात्रीचा, गंज = रास]

गडगंज वि. फट न ठेवता गच्च सांधलेला (सांधा).

गडगंजा पु. घोटाळा; अव्यवस्था; गर्दी. (व.) पहा : **गडगंच, गडगंज**

गडगा–घा–घे पु. न. १. दगडांची ओबडधोबड रचलेली ताल, भिंत, ढीग. २. बांध, बंधारा. (को.) ३. पार, चौथरा. (अलिबाग)

गडगा, गरगा पु. खड्डा; बीळ; खाच. (प्रां)

गडगिळ्या, गडगीळ वि. गिळंकृत करणारा; गटगिळ्या. पहा : **गटगीळ**

गडगूप पु. बुंध्याला अनेक ताटे फुटणारी जोंधळ्याची एक जात.

गडघेणा वि. (किल्ला सर करण्याइतके) कठीण; असाध्य; दुर्घट.

गडचीप वि. गप्प; गुपचूप. 'आपण आपलं गडचीप असावं ते बरं.'– जैत १२७.

गडजाती स्त्री. किल्लेकोट; किल्लेजात; विविध किल्ले : 'सेनाधुरंधर प्रांतांतील गडजाती पाहून हुताशनी करावयासी नागपुरास येतील.'– नाग १.२०.८.

गडण–णी स्त्री. मैत्रीण, सखी : 'न लगा गडणी आम्हां तैश्या ।' – तुगा ३२१.

गडणे अक्रि. १. आत शिरून पुरला जाणे; गाडला जाऊन आच्छादित असणे. २. तंग, घट्ट बसणे (वस्त्र). ३.(ल.) मग्न, चूर असणे; ग्रासलेला असणे. ३. कायम होणे, चिकटणे (कचेरीत, कामधंद्यात.). [सं. गाढ]

गडणे अक्रि. १. परिचय, ओळख होणे. २. (मुलांचा खेळ) एका बाजूकडे असणे; खेळगडी होणे; [सं. गाढ.]

गडत–द न. गर्द काळोखी; दाट अंधारी. (क्रि. पडणे, येणे.) : 'डोळ्या गडद पडे भारी ।'– परमा १०.९४.
क्रिवि. १. दाट, घोर, निबिड, किट्ट (काळोख). २. गाढ; चूर; घोर (झोप, अभ्यास, अंमल, धुंदी, कामकाज). ३. घन, गर्द, दाट, निबिड (जंगल, अरण्य). ४. एकसारखा, संततधार, मोठा, जोराचा (पाऊस) ५. काळाकुट्ट (ढग). ६. भडक; गहिरा (रंग). [फा. गर्द = धूळ]

गडत–ता, गडद–दा पु. बंदुकीचा प्रकार : 'गडताचा मार सोसवत नाही.'– साब ४६.

गडत, गडद वि. मृतप्राय; नष्टप्राय; मालवलेला; हरवलेला; अदृश्य; अगदी नाहीसा झालेला; बुडालेला; पुरलेला; गिळंकृत; दडपलेला; लयास गेलेला; कत्तल केलेला. [फा. गरत]

गडद स्त्री. अंधारकोठडी; भुयार : 'किल्ले लोहगड पायनाळ्यास सरकारचे कोठीची गडद आहे.'– बाबारो ३. [सं. गर्ता]

गडद न. दाट काळोख : 'जें अज्ञानाचे गडदें पडे ।'–राज्ञा ४.२०३.

गडद न. अंबार, पेव, साठ्याचे ठिकाण : 'कडबा गवत नेऊन शिवनेरीच्या गडदात सांठवितो.'– पेद १०.३५.

गडद स्त्री न. खाण; पोखरण; खड्डा; खाच; खळगा. [सं. गंड = खंदक]

गडदणे उक्रि. जमिनीत पुरून, लपवून ठेवणे; (वस्तू, पैसा इ.) [हिं. गाडना]

गडदणे अक्रि. १. एक होणे, मिसळला जाणे : 'फांद्यांचा पालापाचोळा पण मातीत गडदून बसला होता.'– आआशे ३८९. २. पुरणे; झाकणे. [सं. गड=खंदक]

गडदन न. गरदन, गर्दन; गळा. [फा. गर्दन]

गडदर–रा, गडधर–रा स्त्री. पु. १. (प्रां.) ओबडधोबड व मोठा खळगा, खाच : 'गारीं आणी गडधरां ।' – दास ५.१.३७. २. आड, विहीर.

गडदर पु. लोल. – (तंजा.)

गडदा पु. किरवी (खेकडे) पकडण्यासाठी बांबूचा केलेला नळा.

गडदू–धू पु. १. दाबण्याकरिता ठेवलेले वजन; जड ओझे; बोजा. २. (ल.) बोजा, आवश्यक कर्तव्य; जबाबदारी; आपल्या वाडवडिलांच्या किंवा आपणांपूर्वी होऊन गेलेल्या अधिकाऱ्यांच्या मागील उदाहरणाप्रमाणे पाळण्यासारख्या वहिवाटी, संस्कार, नेमणुकी.
वि. १. बळकट; घटमूठ; लडदू; धडधाकट; धिप्पाड; धष्टपुष्ट (माणूस, जनावर). २. मोठाड; दांडगा; रपाट; भरभक्कम (वजन, ओझे वस्तू).

गडदू पु. दगड, धोंडा : 'गांवचे उत्तरेस गडदू.....'– आत्मवृत्त १४. (वा.)

(उरावर) गडदू रचून ठेवणे – एखादे मोठे संकट उपस्थित करणे.

गडधा वि. आळशी; संथ.

गडनिविसी, गडनिसी स्त्री. गडनीस यांचे काम किंवा हुद्दा.

गडनीस पु. किल्ल्यावरील हिशेबनीस.

गडप–ब वि. बेपत्ता; नष्ट; अदृश्य; गिळंकृत; अंतरलेल्या स्थितीत; सापडायची नाही किंवा केव्हाही बातमी लागायची नाही अशा स्थितीत अथवा जागेत; ठावठिकाण लागणार नाही अशा प्रकारे. [फा. घर्ब = गुप्त होणे] (वा.)० **करणे** – दडपून टाकणे; लाटणे; दाबणे; गिळंकृत करणे : 'कां पाठवितों, कळले जरि करिल व्यूहनद गडप यातें ।'– मोद्रोण ११.५६ ० **होणे** – नाहीसा होणे, दृष्टीला न पडणे.

गडपति–ती पु. किल्लेदार; किल्ल्यावरील मुख्य अधिकारी. हा गडावरील चौकी, पहारा इ. च्या बंदोबस्ताचेही काम पाहत असे.

गडबड स्त्री. १. धांदल; दंगल; धामधूम; घोटाळा. २. हुल्लड; दंगा; कोलाहल; कल्ला; गलबला. ३. घालमेल; अव्यवस्था; मिसळ; भेसळ; बिघाड. चोरीमारी. ४. चलबिचल; एकाग्रता नसणे; व्यग्रता (मनाची). ५. धांदल; तिरपिट; तारांबळ; उतावीळ; घाई; गर्दी. ६. (ल.) बंड; दंगा. ७. (ल). दबावाचे, घाबरून सोडणारे भाषण किंवा व्यवहार. [क. गडबडि] (वा.) ० **करणे, ० सडबड करणे –** (काम चांगले होते किंवा वाईट होते इकडे लक्ष न देता) घाईने, गडबडीने कसेतरी उरकणे.

गडबड स्त्री. (हमाली) खाचखळग्याची, उंचसखल, खडबडीत जमीन.

गडबडगुंडा पु. १. (एखादा संस्कार किंवा काम) उतावळीने व अव्यवस्थितपणे करणे. २. महानुभावपंथातील लग्नाला हा शब्द लावतात : 'भक्ति आणि भावार्थाचा गडबडगुंडा केला । एकाजनार्दन पायीं मानभाव झाला ।'– भज ४१. ३. पुन्हा पुन्हा जमिनीवर लोळण घेणे; गडबडा लोळणे (लहान मुलाने रडताना). ४. लोळण्याचा एक खेळ. ५. गुप्त व गूढ प्रकाराने घात करणे; पैसा खाणे, लाटणे, दाबणे. ६. घोटाळा, घालमेल करणे; विस्कळितपणे विवरण करणे; अव्यवस्थितपणे आणि घाईघाईने उरकलेले काम. ७. सावळागोंधळ. (व.) ८. (ल.) व्यभिचार : 'याणें केला गडबडगुंडा ।'– राला ७४.

गडबडणे : अक्रि. १. गडबड होणे; गोंधळणे; घाबरून, गोंधळून जाणे; घोटाळा, गलबल, धांदल, उतावीळ, तारांबळ, आवेश यांनी युक्त होणे. पहा : **गडबड** : 'गडबडले सुर गेले सत्याच्या नायका पुसायातें ।'– मोमंत्र ३.५९. २. गमावणे; हरवणे. ३. गैरविल्हे लागणे; अव्यवस्थित होणे; विस्कटणे. ४. गडगडत, ठणठणत, खडखड आवाजाने खाली येणे; उलथेपालथे होणे; कोसळणे; ढासळणे : 'घाय गडबडती धोंडे ।' – ज्ञा ७.८०.५. गडबडा लोळणे; लोटांगण घालणे : 'देखोनि राघवपदाब्जरजास वाटे । लोटांगणीं गडबडीं सुख फार वाटे ।'– वामन, भरतभाव ६०. ६. चित्त व्यग्र होणे; भ्रमणे. ७. ठरल्याप्रमाणे काम न होता बिघडून भलतेच होणे. ८. (ल.) मरायच्या बेतात येणे. [क.अडबडिसु]

गडबडा क्रिवि. शोकातिरेकाने, अस्ताव्यस्तपणे, दु:खाने, गडबड असा आवाज होईल असे जोराने, झपाट्याने (लोळणे) : 'गडबडां धरणीवरि लोळते । वदवती न कवीसहि लोळ ते ।'– वामन भामाविलास ४.

गडबडाट पु. अतिशय गडबड गोंधळ; कमालीचा घोटाळा; आरडाओरड.

गडबडाध्याय पु. गोंधळ; घालमेल; ब्रह्मघोटाळा.

गडबडी स्त्री. गडबड; धांदल; घाई; धावपळ; घोळ; दंगा.

गडबड्या वि. १. धांदरट; घालमेल्या; उतावळ्या. २. अस्थिर चित्ताचा; चंचल; ३. उद्योगी; खटपट्या. ४. अजागळ.

गडबेडी अंदूप्रमाणेच एकप्रकारची पायातली साखळी.

गडलगप वि. क्रिवि. १. हरवलेला; गेलेला; अदृश्य. २. हरवण्याच्या, खाऊन फस्त करण्याच्या, गहाळ होण्याच्या स्थितीत असलेले.

गडवई पु. गडकरी; गडाच्या कामाला योग्य अधिकारी : 'एका घरचे भाऊबंद एक, दोन तीन आहेत आणि इतकेही गडवई त्यांस किल्लेचे मामले ..... सांगावेच लागतात.' – मराआ २८.

गडवा पु. १. विशिष्ट आकाराचे धातूचे भांडे; खालीवर चिंचोळा व मध्ये फुगीर असा तांब्या, गडू. २. तांब्याच्या आकाराचे मडके; (उत्तर हिंदुस्थान) रंगपंचमीला गाणाऱ्या व नाचणाऱ्या स्त्रिया डोक्यावर जो पाण्याचा कलश घेतात तो. (व.) [क. गडू]

गडवीपण न. गडकरी या पदाचा कारभार.

गडवीपणा पु. गडावरील कामकाजाचे ज्ञान असणे : 'यास्तव तुकोजी साळोंकी यांसी आपणाकडे पाठविले आहेत. गडवीपणाच्या कारभारास योग्य आहेत.'– पेद १७.१२१.

गडसंद–ध स्त्री. १. निकडीचा प्रसंग; जरुरीची वेळ किंवा हंगाम. २. निकड; तातडी; ताण; नेट; झेंगट (एखादे काम, गोष्ट यांचे). (क्रि. होणे, पडणे, येणे, लागणे.) ३. अत्यंत समयोचित प्रसंग; अत्यंत जरुरीचा, उपयोग होईल असा निकडीचा हंगाम किंवा वेळ : 'हा तों गडसंदीचा ठाव ।'– तुगा २२७८. ४. (व्यापक) अडचण; संकट; कचाट. ५. अडचणीची व धोक्याची जागा. ६. आणीबाणीची जूट; संकटाच्या वेळची एकी : 'ते गडसंधीचे येती समस्त । संग्रामासी ।'– ख्रिपु १.१७.११०. गडसंड असेही रूप आढळते.

गडसंधी स्त्री. १. रचना; ठेवण; व्यूह; स्थिती; मांडणी; स्थापना : 'रतबाचे आमचे दरम्यान येमाजीपंत येसी गडसंधि आहे.' – पेद २६.७६. २. अवधी; अवसर.

गडसा पु. कोयता.

गडंगज वि. फट न ठेवता गच्च सांधलेला (सांधा). (गो.)

गडंत वि. गाडलेले. (व.)

गडा स्त्री. सीमा, मर्यादा. [का. गडी = मर्यादा]

गडा स्त्री. झाडावरील पाने, फुले काढायची आकडी. पहा : **गडका–खा**

गडाड पु. १. मोठा गडगडाट, गर्जना, घडघडाट, गलबला इ. २. आवेश, उत्साह : 'अभ्यासाच्या गडाडीं। प्राण खवळल्या कडाडीं ।'– एभा १४.४३०.

वि. १. अतिशय चढीचा, उभट, मोठ्या उतरणीचा (उतार). २. खोल : 'ये नदिचें पाणि गडाड ।' – पंच ४.९. [ध्व.]

गडाडणे अक्रि. १. गडगडणे; घडघडणे; गरजणे; गाजणे; गुरगुरणे; घुमणे (मेघनाद, गाडा, जनावर, पोट). [ध्व.]

गडाडणे अक्रि. सांकेतिक मरणे; कामावरून बडतर्फ होणे; फसणे; मोडणे; ढासळणे (बेत, कट).

गडाला पु. १. ओबडधोबड खड्डा, भोक, खाच. २. (ल.) अवघड जिकिरीचे कार्य; घोटाळ्याचे प्रकरण. (प्रां.) [सं. गड = खंदक, अडथळा.]

गडालोही कडेलोट.

गडाविणे उक्रि. मित्रभाव दाखवून वळवणे; लाडीगोडी लावणे; भुरळ घालणे; फूस लावणे; गटवणे (नेहमी वाईट अर्थी प्रयोग).

गडि (डी) ण–णी स्त्री. गडणी; सोबतीण; सखी; मैत्रीण : ‘गडिण वडिल भोळी सावळी रम्य लीला ।’– हमुविरा ८२; ‘मग बोलाऊन आपल्या गडिणी ।’– भवि २२.४८.

गडियागडणी स्त्री. मैत्रिणी; कुमारिका; सोबतिणी; सख्या.

गडियांगडी क्रिवि. दर, प्रति, प्रत्येक गड्याला, माणसाला.

गडी पु. १. मनुष्य : ‘आम्ही ज्ञानी सुज्ञ गडी ।’ – विक ९५. २. हाताखालचा माणूस; हस्तक; बगल्या; आडकाम्या माणूस; मुलगा; छोकरा; मोलकरी; मजूर; चाकर इ. ३. सहचर, सोबती (सहाध्यायी, गुरुबंधू, वर्गबंधू, खेळगडी, एका धंद्यातील सहकारी); मित्र : ‘मला माझा तूं हंस गडी राया ।’ – र १८. ४. (धंदेवाचक शब्दाच्या पुढे) व्यक्ती; असामी; माणूस, जसे :– ब्राह्मण–भट्ट –मुशाफीर – शिपाई गडी : ‘येतांचि विक्रम लवे श्रीहरिचा दयितदास वीर गडी ।’ – मोविराट ४.८९. ५. खेळातील भागीदार; भाग घेणारी मंडळी. ६. (सोंगटी इ. खेळ) भिडू; जोडीदार. (क्रि. धरणे, मिटणे, तोडणे, फुंकणे). : ‘पुरे पुरे तुझी कान्हो गडी रे ।’– मध्व १७३. [क. गडी] (वा.) **गड्याने गडी साधणे** – आधी एक नंतर त्याच्या सहाय्याने दुसरा अशी साखळी बांधणे; सुताला सूत जोडणे : ‘गड्यानें गडी बांधून कर्नाटक आपले करावें’ – पेदभा २८ पत्र ८४.

गडी स्त्री. १. गढी; लहानसा भुईकोट (गड याचे अल्पत्व) : ‘आली उंच उज्जनीची गडी ।’ – ऐपो ४३४. २. पहा : **गट्टी**

गडी–ड्डी स्त्री. पेंढी; जुडी (भाजी, गवत, काठ्या). [क. गड्डे]

गडी–ड्डी स्त्री. (सोनारी) चौकोनी दोन इंची घन किंवा सुमारे ४० ते ६० भारांचा ठोकळा. याला वाट्यांसारखे लहान लहान खळगे असून त्यात मण्यांचे अर्धे गोल भाग ठोकून तयार करतात. (खा.)

गडीखेच स्त्री. मुलांचा स्काउटचा एक खेळ.

गडीगंज पहा : **गडगंज**

गडीगुप्प वि. शांत; गप्प; ‘सगळीकडे कसे गडीगुप्प होते.’– भुज १२९.

गडी फू फारकत; ताटातूट; कट्टी; पृथकत्व : ‘राजकारण व वाङ्मय यांची अजीबात गडीफू कशी होऊं शकेल ? ’– प्रतिभा ४.६.

गडीबापई पु. नोकरचाकर : ‘म्हातारीकोतारी, पोरंबाळं, गडीबापई आणि बाया....’ – काआ ९२.

गडीमाणूस पु. (सामा.) १. मजूर; घरकाम्या नोकर; चाकर. २. पुरुष.

गडीलेप पु. मुलांचा एक खेळ.

गडीवान पु. गढेवान; हत्तीची चाकरी करणारा नोकर.

गडीसीडी क्रिवि. कानाकोपऱ्यात; एकांतात : ‘गडीसीडी असावे ।’– सूत्रपाठ ३५.

गडु–डू पु. गंडमाळा, गलंड रोग.

गडुवा पहा : **गडवा**

गडू पु. पाणी पिण्याचे लहान उभट भांडे; लहान तांब्या; बुटकुली.

गडे स्त्री. मुदत; मर्यादा : ‘मियां दिन्हली सातां दिवसांची गडे ।’ – उगी ६७.

गडे उद्‌गा. संबो. १. लाडक्या माणसाला – विशेषत: मैत्रिणीला – हाक मारताना, काही सांगताना स्त्रिया वापरतात : ‘गडे अनुसूये. सांग सांग कीं बाई !’ – शाकुंतल. २. नवऱ्याशी लडिवाळपणे बोलतानाही वापरतात. जसे :– ‘मला सांगायचं गडे !’

गडे न. असम राहिलेली शेष संख्या, दोहोंनी भागल्यास शेष उरते अशी (३, ५, ७ इ.) संख्या, एकीबेकी खेळण्यातील विषम (एकी) संख्या. (गो.)

गडेकरी वि. हत्तीच्या पुढील भालाईत (माणूस). हत्ती बिथरला असताना हे लोक आपल्या भाल्यांनी त्याला टोचून टोचून ताळ्यावर आणतात. त्यांच्याजवळ काट्यांचे चिमटे ही असतात व ते वरील प्रसंगी हत्तीच्या पायांत अडकवतात. पहा : **गडकरी** ३ : ‘हरकामे, गडेकरी, साठमार व बारनिशी कारकून यांनी आपआपलीं कामें करावींत.’ – ऐरापुप्र ११.६३२. [सं. गड्ड = भाला]

गडेगडप शिमगी पौर्णिमेला (शोकगीताप्रमाणे) एक ताली ढोल वाजवून अंगात एक प्रकारचा अवसर आणणे. हे अवसर आलेले लोक रात्रभर भटकून दुसरे दिवशी ठरावीक वेळी शुद्धीवर येतात. (गो.)

गडेफाडे न. दोहोंनी भागल्यास शेष उरत नाही अशी (२,४,६,८) संख्या; सम संख्या, (चिंचोक्यांच्या खेळातील) बेकी. (गो.)

गडेल वि. जाड, खडे असलेला.

गडेश्वर वि. डोंगरावरील तपस्वी.

गडोबा पु. गुराखी, सोबती : ‘गाईचा गडोबा गोठणीला उभा ।’ – बा १८.

गडॉ पु. गडी; सोबती (शाळेतील). (गो.)

गडॉ पु. गोटी. (गो.)

गड्डुर स्त्री. गड्डी; चळत; उतरंड. (व.)

गड्डा पु. कानाची लोंबणारी पाळ : ‘तिच्या कानाचा गड्डा धरुन तिला खाली वाकवत म्हणाला ...’– आभाळ ९१–९२.

गड्डा पु. १. भाजीपाल्याचा दळदार कांदा (कोबी, नवलकोल इ.). २. ढेप, डिखळ, गोळा, लगदा, कांदा. (कमळकांदा, मुरंब्याचा लगदा, नारळात कधी कधी होणारा गड्डा, एके ठिकाणाहून उपटून दुसऱ्या ठिकाणी लावण्यासाठी न्यायच्या रोपट्याच्या किंवा हुंडीच्या मातीचा घट्ट गोळा ज्याला चिकटला आहे अशा मुळ्या.) ३. बटाटा. (बे.) ४. (ल.) साठा, संग्रह, कंद. उदा. शहाणपणाचा गड्डा. [क. गड्डे]

गड्डा पु. नदीतील लहान लहान खांडवी; कोरडी जागा.

गड्डा पु. गळू, फोड, नारू, मूळव्याध इ. चा मूलभूत अंश. – (तंजा.)

गड्डा पु. खड्डा. (व.) [सं. गर्त]

गड्डा पु. गर्व; अभिमान. (व.)

गड्डा पु. चाकाचे आरे ज्यात बसवतात तो चाकाचा मधला भाग, तुंबा. (कर. गो.)

गड्डासणे अक्रि. नाहीसे करणे; लपविणे. (गो.)

गड्डालिका स्त्री. १. लांबलचक गद्य वाक्य; गद्य लेखाचा लांब भाग किंवा अशा भागांची मालिका. २. श्रमाने साधलेली गद्यरूप कविता, गाथा, चूर्णिका; रम्य, सुंदर गद्याचा छोटासा भाग; अलंकारिक रूपकांची वाक्यपरंपरा. ३. (ल.) कंटाळवाणी गोष्ट; चर्पटपंजरी (प्रपंचादी संबंधी). (क्रि. लावणे.)

गड्डी स्त्री.(कागदाच्या) दहा दस्त्यांचा जुडगा, गठ्ठा. [क. गड्डे]

गड्डी स्त्री. गढी; भुईकोट किल्ला.

गड्डू वि. ठेंगणा पण मजबूत; घट्टमूठ व खंबीर; मजबूत पण आटोपसर.

गड्याळ–ळी वि. १. घाणेरडा; अव्यवस्थित; बेशिस्त; माभळभटी (मनुष्य, व्यवहार, भाषण). पहा : **गदळ**

गड्याळी, गड्याळकी स्त्री. अव्यवस्थितपणा; गैदीपणा; घोटाळा.

गड्येकार पु. गाडीवाला. (गो.)

गढणे अक्रि. १. तल्लीन होणे. पहा : **गडणे** [सं. गाह्]

गढणे क्रि.१. झपाटले जाणे. २. बुडून जाणे.

गढळ वि. १. वोखट; विद्रूप; निरुपयोगी; जीर्ण; गदळ. २. भिकार; नादान; नालायक; वाईट. ३. अमंगळ, घाणेरडा, द्वाड, कुचकामाचा; गदळ (माणूस, पशू, जमीन, वस्तू).

गढा, गढी स्त्री. १. लहान भुईकोट किल्ला; गावचा मातीचा किल्ला. देशमुख, देशपांडे, पाटील यांना राहण्यासाठी पूर्वी गढ्या असत : 'किल्ले व गढिया बळकावून आम्हांशीं बेदिल !'– भाब ३५. २. पांढऱ्या मातीची किंवा विटांची अतिशय अरुंद भिंत. (व.) ३. सोनाराचे एक हत्यार. [क. गडि]

गढीबंद वि. १. ज्याच्या मालकीची गढी आहे असा (जमीनदार). २. जो गढीत अडकून पडला आहे असा.

गढुळणे उक्रि. १. गढूळ होणे, करणे; गदळणे; रेंदाडणे; मळकट करणे; दूषित होणे. २. (ल.) क्षोभविणे; चवताळविणे; दंगल, गडबड माजविणे.

गढूळ वि. १. खडूळ; गदळ; रेंदाड; मातीने युक्त; राड; शबल; अस्वच्छ : 'किंवा गढूळ झालें असतां उदक । स्थीरावल्या दावी पवित्र मुख ।'– नव २४.१४९. २. तांबडसर (डोळा). ३. (ल.) क्षुब्ध; अस्वस्थ; व्यग्र; कलुषित; विकारवश (राग, दुःख, क्लेश, संशय, हेवा इ. मनोधर्मामुळे.). ४. दूषित; पूर्वग्रहयुक्त. ५. अशुद्ध; गोंधळाचा; लबाडीचा; खोडसाळ (हिशेब). ६. अंदाधुंदी, बंडाळीने व्याप्त (राज्य, देश.). ७. आचारभ्रष्ट, धर्मभ्रष्ट (जात, वर्ण व्यक्ती).

गढूळ वळण अतिशय नफा घेणाऱ्या व्यापाऱ्याची लोभी वृत्ती.

गढेकरी पु. किल्ल्यातील शिपाई, नोकर. पहा : **गडकरी**

गढेकोट पु. गढी : 'गढेकोट रचलेला होता.' –जैत ४.

गढ्ढा पु. खळगा, खड्डा : 'समोर भयानक गढ्ढा आहे.' – पेआ १८९. [सं. गर्ता]

गण पु. १. जमाव; संख्या; समुदाय; मेळा; समूह : 'या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां ।'– ज्ञा ३.९६. २. पंथ; जाती; वर्ग; विभाग; वर्ण. ३. तीन गुल्म सैन्य (२७ रथ, २७ हत्ती, ८१ घोडे, १३५ पायदळ.). ४. गणपतीदेवाच्या हाताखालचा क्षुद्र देवतावर्ग, प्रमथादी शिवगण, शंकराचे सेवक. ५. पंथ, संप्रदाय (न्यायशास्त्र, धर्म यांतील). ६. जमाव; समुदाय; राशी; पुंज; संघ. समासात – अहर्गण, मासगण, वर्षगण इ. = दिवस, महिने, वर्षे, तारे यांचा समूह. ७. सेवक, भक्त यांचा समूह. ८. (ल.) देवाच्या उत्सवातील चोपदार, चवरी वारणारा, पालखी उचलणारा इ. प्रत्येक माणूस, व्यक्ती. [सं.]

गण पु. (ज्यो.) फलज्योतिषातील एक संज्ञा. हे गण तीन असून देवगण, मनुष्यगण व राक्षसगण अशी त्यांची नांवे आहेत.

गण पु. मंगल प्रसंगी जेवायला किंवा समारंभाला बोलावलेल्या मंडळीतील एक पुरुष. याच्या उलट सुवासिनी. पहा : **गणसवाशीण** [सं.]

गण पु. (ग.) १. संख्या; रक्कम; बेरीज; जमा. २. गुण्यांक व गुणकांक एक कल्पून केलेला गुणाकार; वर्ग. [सं. गण् = मोजणे]

गण पु. (व्या.) धातूचे रूपाख्यात, धातुपाठातील भ्यादी, अदादी गण. [सं.]

गण पु. (शाप.) कोटी; वर्ग; प्रत. [सं. गण् = मोजणे]

गण पु. मानस; अभिप्राय; हेतू; खरा उद्देश.

गण पु. अक्षरांच्या गुरुलघुत्वावरून दिलेली संज्ञा. गण तीन अक्षरांचा होतो. हे गण आठ असून म, य, र, स, त, ज, भ, न अशी त्यांची नांवे आहेत.

गण पु. तमाशातील ईश्वरस्तुतिपर प्रारंभीचे गीत (बहुधा गणपतीचे) : 'माझें नमन आधीं गणा ।' – ऐपो ७. [सं.]

गण पु. खेळातील डाव. (ना.)

गण पु. गणपती देवता, गजानन. [सं.] (वा.) ० **नमणे**, ० **नेमणे** – १. गणपतीची आराधना करणे, आराधनेसाठी गणपतीची स्थापना करणे. २. धंद्याला लागणे, एखाद्या कार्याला विधिपूर्वक आरंभ करणे. ० **देणे, पुजणे** – १. ठोक देणे, मारणे, २. डाव (खेळातील) देणे किंवा घेणे. (व.) **गणचौथ पुजणे** – मारणे; चोप देणे. (ना.)

गण पु. (सांकेतिक) राघोबादादा पेशवे यांचे शागीर्द : 'श्रीमंतांचे तेथें गणांचा कारखाना.'– ऐलेसं १२७८.

गणक पु. १. कुंडली मांडणारा, पंचांग पाहणारा ज्योतिषी, जोशी; पंचांग करणारा ज्योतिषी : 'ब्राह्मण बोलाविले गणक जोशी ।' – ह २३. ६६. २. मोजणारा, हिशेब करणारा. [सं.]

गणक, गणंग पु. १. भाताप्रमाणे शेतात उगवणारे गवत. २. रानभात. (बे.)

गणक पद्धती १. मते मोजण्याची पद्धती. २. (अर्थ.) बँकेत पैशाचा भरणा करण्याकरिता किंवा पैसे काढून घेण्याकरिता उपयोगात आणली जाणारी पद्धती.

गणकयंत्र न. कमीतकमी वेळात माहिती व ज्ञान, सुसूत्रपणे, हवे त्या स्वरूपात मांडणारे यंत्र, संगणक.

गणकेतन, गणचिन्ह न. कुलचिन्ह; देवक; एका गणाचे दुसऱ्या गणापासून वेगळेपण दाखविणारे चिन्ह. आदिवासी जमातीत प्रत्येक जमात आपले कुलचिन्ह पूजनीय मानते.

गणगटा पु. कणीस काढलेले जोंधळ्याचे ताट : 'गणगट्याला चिंच्चचा

गोळा लावून तो तोंडात रवी फिरवल्यागत फिरवत राहावा.'– वळीव ४१.

गणगण, गणगणणे, गणगणा, गणगणीत, गणगणाट, गणगण्या पहा : **गिणगिण** इ.

गणगणभोवरी स्त्री. मुलांचा एक खेळ; अंगाऱ्या भिंगोऱ्या.

गणगणी शअ. प्रत्येकी; प्रत्येकाकडून; दर; हर. पहा : **गणीक** (को.) [गणचे द्वि.]

गणगर स्त्री. काटेकणगी. पहा : **कणगर** (गो.)

गणगी स्त्री. (बुरडी) उदबत्त्या वगैरे करण्यासाठी केलेली जाड चोय.

गणगूट न. निकण पाखडल्यानंतर निघालेली कणी, फोलकट, पहा : **मदन**

गणगोत न. कुटुंब, घराणे, नातलग, संबंध, सोयरेधायरे, भाऊबंद इ. व्यापक अर्थी : 'गणगोत मित्र तूं माझें जीवन ।'– तुगा ७६९.

गणगौर स्त्री. बायकांनी चैत्र महिन्यात काढलेली गौरीची–मिरवणूक.

गणगौळण स्त्री. तमाशातील सुरुवातीची प्रार्थना आणि वग सुरू होण्यापूर्वीचा कृष्ण व गोपी यांच्यातला संवाद.

गणणे उक्रि. १. मोजणे; हिशेब करणे; अजमास करणे. २. (ल.) समजणे; लेखणे; पर्वा करणे; मानणे; महत्त्व देणे : 'जैसे नगणिजे पंचाननें । गजघटांतें ।।'– ज्ञा १.९२. [सं. गण्, गणन = मोजणे]

गणतगर स्त्री. न. तगरी या फुलझाडाची एक जात व तिचे फूल.

गणतंत्र, गणराज्य न. (राज्य.) ज्यात सर्वोच्च सत्ता मतदानाचा अधिकार असलेल्या नागरिकांच्या हाती असून त्यांना जबाबदार असणाऱ्या प्रतिनिधींच्या आणि अधिकाऱ्यांच्या मार्फत कायद्यानुसार सत्ता राबविली जाते असे लोकनियुक्त सरकार, राष्ट्र.

गणतंत्रवाद, गणराज्यवाद पु. प्रजासत्ताक राज्यासंबंधीचा विचार; गणराज्याची रचना व कार्यपद्धती यासंबंधीचा विचार, तत्त्व, सिद्धांत.

गणता वि. मोजणारा, हिशेब करणारा : 'वरी एकपणें गणिजे । तें गणतेंनसीं दुजें ।'– अमृ ५.३४.

गणती स्त्री. १. मोजणी; मोजदाद; हिशेब; अजमास; संख्या : 'हरि ! हरि ! हरि – हरिणांतचि त्यांची केलीच त्या जनें गणती ।' – मोसभा ५.९२. २. (ल.) गणना; मान; योग्यता; गुमान; किंमत; खिजगणती. समासात – वर्षो– सालो– महिनो – खंडो – गणती = वर्षांनी इ. गणणे. ३. सीमा; अखेर (गो.) (क्रि. करणे). (वा.) **० नसणे** – निश्चित संख्या सांगता न येणे, मर्यादा नसणे. **० लागणे** – नोंद होणे; येऊन मिळणे : 'नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले ।' – ऐपो २१६.

गणदीक्षा स्त्री. १. जमावात (किंवा शिष्यमंडळीत) दाखल होण्याचा संस्कार; मंत्रोपदेश. २. पुष्कळ लोकांकरिता व्रताचरण; धार्मिक विधी. ३. ज्यात गणपती देव मुख्य आहे असा विशेष प्रकारचा संस्कार.

गणदीक्षी पु. १. अनेक जातींचा उपाध्याय; वर्णगुरू; आचार्य; पुरोहित. २. गणेशपूजेची दीक्षा घेतलेला पुरुष.

गणद्रव्य न. सार्वजनिक मालमत्ता; सामायिक ठेव; सार्वजनिक किंवा सर्वसाधारण भांडवल : 'गणद्रव्यचोरी करी ।'– गुच २८.५६.

गणन न. १. मोजदाद, संख्या मोजणे. पहा : **गणना**. २. रक्कम; बेरीज; एकूण संख्या.

गणना स्त्री. १. गणन; मोजणी अथवा हिशेब करणे; गणती; हिशेब. २. (ल.) मान; योग्यता; दर्जा; प्रतिष्ठा. ३. अंतर्भाव; समावेश; [सं. गण्]

गणनीय वि. १. मोजला किंवा गणला जाण्यास योग्य; मोजण्यालायक; अजमास करण्याजोगा. २. (ल.) लक्ष्य; विचारार्ह; वर्णनीय; सन्माननीय; मोलवान; लक्षणीय; महत्त्वपूर्ण.

गणपत पु. सापसुरळी.

गणपति–ती पु. १. गणेश देव, गजानन. २. (ल.) गणोबा; ढेरपोट्या माणूस. ३. (गुऱ्हाळ) कढईतून गूळ बाहेर ओतताना गजाननाच्या नावाने एकीकडे थोडासा काढून ठेवलेला गूळ. यावर गुरवाचा हक्क असतो. ४. (ल.) गूळ खरेदी करताना वजनाच्या पारड्यात टाकायचा दगड. [सं.] (वा.) **गणपतीचे करणे** – स्त्रीने गर्भार होणे. **गणपतीचे नाव घेणे** – प्रारंभ करणे.

गणपतिपूजन न. १. कार्यारंभी करायची गणेशपूजा. २. (ल.) कार्यारंभ.

गणपंचायतन न. गणपती, शिव, नारायण, रवी व देवी अशा पाच देवता. यांत गणपती प्रमुख असतो.

गणपूर्ति–र्ती, संख्या स्त्री. कोणत्याही सभेचे कामकाज कायदेशीर होण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी किमान उपस्थित सभासदसंख्या; आवश्यक किमान उपस्थिती. जनसंख्या पूर्ण होणे.

गणभरती पहा : **गणपूर्ती** : 'सरकारपक्षाच्या लोकांनीं संगनमत करून दडी दिली असती तर योग्य गणभरती (कोरम) नाही म्हणून अध्यक्षांना सभा बरखास्त करावी लागली असती.'– सासं २.९९.

गणब(म)णणे अक्रि. गडबडणे; कां कूं करणे; घाबरलेले अगर गोंधळलेले असणे; शंकित होणे; माघार घेणे; भय पावणे (निषेधार्थी). [ध्व.]

गणमणचे अक्रि. दाद घेणे; सांगितलेले ऐकणे. (गो.)

गणमध्य पु. पत्रिका अथवा जन्मकुंडलीतील ऐक्य आणि शत्रुत्व या दोहोंहून भिन्न (गणमैत्री किंवा गणवैर नसणे), नवरा व बायको, धनी व चाकर इ.च्या गणांचा भेद. जसे :– एकाचा देवगण तर दुसऱ्याचा मनुष्यगण.

गणमंडळी स्त्री. नेमलेली, स्थापना केलेली मंडळी; जूट; तुकडी; टोळी; गट; समूह; टोळके इ.

गणमैत्री स्त्री. जन्मपत्रिकेतील गणांमधील मैत्री; एक गण असणे; बहुतेक दोघांचा (नवरा, नवरी; धनी, चाकर) गण एक आला म्हणजे त्यास गणमैत्री म्हणतात. पहा : **गण** ३

गणवेष पु. विशिष्ट क्षेत्रातील व्यक्तींना (लष्कर, पोलिस, विद्यार्थी, पोष्ट इ.) ठरवून दिलेला विशिष्ट पोशाख : 'नुसत्या हिरव्या रंगानें ते गणवेष इतके खुलून दिसले नसते.'– सासं २.२१३.

गणवैर न. जन्मपत्रिकेतील गणांची प्रतिकूलता, वैर, शत्रुत्व. जसे : – राक्षसगण आणि मनुष्यगण.

गणश: क्रिवि. जमाती–वर्ग–टोळी–मंडळीकडून.

गणसरी, गणसुरी, गणसूर स्त्री. जिच्या पानांच्या रसाने सूज उतरते अशी वनस्पती; एक औषधी झाड.

गणसवाशीण स्त्री. १. गावाचा मेहतर, पाटील किंवा चौगुला याची

बायको; मेजवानी किंवा इतर समारंभातील एक हक्कदार व्यक्ती. गावातील स्त्रियांच्या गावभोजनात हिला पहिल्याने आमंत्रण द्यावे लागते. उत्तरेकडे पाटील किंवा त्या जागेवरील अथवा तत्संबंधीच्या माणसाला गण म्हणतात व त्याच्या बायकोला (किंवा इतर स्त्रीलाही) सवाशीण म्हणतात. २. समारंभातील भोजनप्रसंगी बोलावलेले मेहूण.

गणसुरंग स्त्री. एक औषधी वनस्पती.

गणंग, गणगट पु. न. १. धान्यातील न शिजणारा दाणा; भिजत घालूनही मऊ न होणारा व शिजवल्यानंतरही टणक राहणारा दाणा; जोंधळा इ. धान्याच्या लाह्या केल्या असता त्यातला न फुटलेला दाणा. २. (ल.) मूर्ख, टोणपा, अक्षरशत्रू, ठोंब्या, मतिमंद माणूस.

गणा पु. १. जोंधळा किंवा बाजरीच्या ताटाचा शेंडा अथवा शेंड्याचा भाग. २. साळ्या-कोष्ट्यांची चाकावरील सूत गुंडाळण्याची बोरूची किंवा वेताची कांडी, कांडीकरिता घेतलेला ताटाचा तुकडा.

गणा पु. तेल लावून करतात ती भाकरी.

गणा पहा : **गणगूट**

गणागणपा पहा : **गण्यागंप्या** : 'कुणा गणागणपांची पोरे...' – मक १९५९.

गणान्न न. १. अनेकांच्या मालकीचे (भात अथवा इतर) धान्य; सगळ्यांनी करून ठेवलेला धान्याचा पुरवठा, बेगमी. २. समाराधनेसाठी तयार केलेला स्वयंपाक; अनेकांचा एकत्र स्वयंपाक. [सं.]

गणावचे अक्रि. रेंगाळणे. (गो.)

गणांत पहा : **गळंत**

गणिक-त शअ. १. बरोबर, सह, मागे, ला : 'ओ देत होतो दर हांके गणिक।' – तोबं १३. समासात – माणसागणिक, मुलागणिक इ. २. दर; प्रत्येक (समासात) उदा. वृक्षा-खिडकी-गृहा-खेपेगणिक इ.

गणिका स्त्री. वेश्या; कलावंतीण; कसबीण : 'भिक्षा मागुनि दारोदारीं फेडिन ऋण गणिकेचें ।' – मृच्छ ३५. [सं.]

गणिकारिका स्त्री. अरणी नावाचे लहान झाड. [सं.]

गणित न. १. अवकाश आणि आकडे ह्यासंबंधीचे शास्त्र. अंकगणित, बीजगणित व भूमिती ह्या गणिताच्या तीन प्रमुख शाखा आहेत. व्यक्तीला आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या मूलभूत गणिताला व्यावहारिक गणित असे म्हटले जाते. २. हिशेब; गणनक्रिया; मोजदाद; आकडेमोड व आकडेमोडीने सिद्ध केलेले फल. (सामा.) बेरीज. ३. गणती; संख्या; माप : 'ह्याशिवाय झमकती पागा नाहीं गणित ।' – ऐपो १४०. ४. प्रश्न; ज्योतिष. (गो.) (वा.) **गणीत बोलणे** – भविष्य सांगणे.

वि. मोजलेले, गणलेले, हिशेब केलेले. [सं.]

गणितशास्त्र न. व्यक्त किंवा अंकगणित आणि अव्यक्त किंवा बीजगणित असे प्रकार ज्यात अंतर्भूत होतात असे शास्त्र. आधुनिक गणितशास्त्रात वरील प्रकारांखेरीज भूमिती, त्रिकोणमिती, स्थितिगतिशास्त्र, जलगतिशास्त्र, ज्योतिर्गणित, कलन इ. दुसरे अनेक प्रकार आहेत.

गणितश्रेढी-धी, गणितप्रमाणश्रेढी-धी स्त्री. एकाच नियमित अंकाने (अंतराने) कमी होत जाणाऱ्या अगर वाढत जाणाऱ्या संख्यांची मालिका. उदा. ५,८,११,१४ इ. किंवा १२,१०,८,६ इ. [सं.]

गणिती वि. गणित जाणणारा; गणित्या; गणितज्ञ.

गणित्र न. मोजणी करणारे, मापन करणारे यंत्र.

गणिमी स्त्री. १. गनिमी; द्वेष; शत्रुत्व; वैर. (क्रि. करणे, मांडणे, चालवणे.) २. क्षोभ, बंडाळी, दंगा, (सामा.) दंगा माजविणारी कृत्ये; दंगाफिसाद.

गणिया पु. एका गणेशस्तोत्रातील पहिला शब्द; विद्यार्थ्यांनी आपले धडे पाठ झाल्यानंतर सूर्यास्ताच्या वेळी म्हणायचे गणेशस्तोत्र. (क्रि. म्हणणे.)

गणी स्त्री. १. वाटणी. २. गणती : 'उरला ऐवज दामाशाही गणीप्रमाणे घ्यावा.' – धापइसा ३.१२.

गणेय, गणितव्य वि. गणन, हिशोब करण्यायोग्य; मोजण्याजोगे. [सं.]

गणेरी स्त्री. सोनसांवर.

गणेशकंद-कांदा पु. बांडगुळाच्या जातीची एक वनस्पती.

गणेशगोमा पु. (विरु.) गोमागणेश. लांडा कारभारी, लुडबुड्या माणूस, लटपट्या पुरुष.

गणेशटेबल पु. (उप.) पोलीस शिपाई (कॉन्स्टेबल), विशेषत: गोरा सार्जंट : 'या सर्वांनी एका य:कश्चित गणेशटेबलाच्या म्हणण्यावरून प्रथम अशा ढोबळ चुका कराव्या ....' – लोटिकेले १.३९५.

गणेशटोपी स्त्री. (मुलांच्या खेळातील किंवा क्षेत्रातील शब्द) एखाद्याला बडविण्यापूर्वी कोणी मारले हे त्याला न समजावे म्हणून त्याच्या डोक्यावर घातलेले वस्त्राचे घुंगट, असे घुंगट एखाद्याला घालण्याची क्रिया. (क्रि. घालणे.) (वा.)० **घालणे** – १. मूर्ख बनवणे, चेष्टा करणे. २. फसवणे, लुबाडणे, टोपी घालणे.

गणेशथापटी स्त्री. होळीच्या सणातील एक खेळ. एखाद्याला गणेशटोपी घालून डोक्यावर थापट्या मारणे किंवा धोतराच्या तोब्याने चोपणे. चोपणाऱ्याला ओळखले म्हणजे ज्याला चोपले त्याच्यावरील डाव जातो.

गणेशधौती स्त्री. एरंडेलांचे बोट गुदद्वारात फिरवून मळ काढणे.

गणेशपट्टी स्त्री. पुढील दरवाजाच्या वरची आडवी पट्टी; दाराच्या चौकटीचा वरचा भाग. हिच्यावर मधोमध गणपतीची मूर्ती कोरलेली असते.

गणेशपूजा पु. १. गणपतीचे पूजन. २. कथा इ. समारंभात वाटलेली खिरापत.

गणेशवात न. कापसाची २१ सुतांची चार बोटे रुंदीची वात. या वाती गणेशचतुर्थीपासून दररोज २ याप्रमाणे वर्षभर लावतात किंवा एकदम लक्ष वाती लावतात.

गणेशवेल स्त्री. आकाशवेल. या वेलीला फक्त पावसाळ्यात चांदण्यांसारखी छोटी तांबडी फुले येतात.

गणेशिया न. कोळी लोकांचे घरफोडीच्या हत्याराचे सांकेतिक नाव.

गणैक्य न. वधूवरांच्या लग्नकुंडल्यांची मैत्री. पहा : **गणमैत्री** [सं.]

गण्णाठे न. पायलीचा बत्तिसावा भाग (गो.).

गण्य पहा : **गणनीय**

गण्या पु. १. खंड्या; पाणकावळा; ढिसा; मासे खाणारा एक पक्षी. २. गणा कोष्ट्याची सूत गुंडाळण्याची कांडी.

गण्यागंप्या वि. सोम्यागोम्या, सर्वसामान्य माणूस.

गत वि. १. गेलेला; नष्ट; निघून गेलेला; जुना; मागचा. समासात – गत – इतिहास – काल इ. २. कडे, आत जाणे, आत स्थिरावणे किंवा बसणे. उदा. अतंर्गत, मध्यगत, हस्तगत, (वा.) ० **होणे** – १. लोटणे; गुजरणे; जाणे; घालवणे (वेळ, काळ). २. निघून गेलेला असणे (या जगातून); नष्ट होणे; मरणे.

गत शअ. साठी; करिता.

गत स्त्री. १. वाद्यात वाजविण्यासाठी कोणत्याही रागातील स्वरांची तालबद्ध रचना. ताल; ठेका; वाद्य वाजविण्याचा प्रकार. रीत, तान, मिलाफ. २. (संगीत) फिरक, फिरकी; झील; कंप. (क्रि. घेणे.) [सं. गति]

गत स्त्री. १. बरे होण्याचा उपाय, तोड, युक्ती. २. आश्रय. [सं. गति]

गत स्त्री. ताकद. पहा : **गती** (बे.) [सं. गति]

गत स्त्री. १. स्थिती; अवस्था; दशा; पूर्वावस्था जाऊन आलेली दुसरी अवस्था; अवस्थांतर (वाईट अर्थाने). २. भूत, पिशाच्च यांनी बाधा करायची सोडून घेतलेली मुक्ती. (क्रि. घेणे.) ३. शेवट; परिणाम; निकाल. ४. मार्ग; प्रकार; तऱ्हा (समान, सारखा, सदृश असे दाखविताना) : 'खरेंच बाई, अगदीं नाटकागत सगळें वाटत आहे.'– वेबा. [सं. गति] (वा.) ० **लावणे** – निकाल लावणे; काम करून देणे : 'अगोदर तिची (कुसात्याची) गत लावायला हवी.'– पडघ १४३.

गत भूधावि. (ज्यो.) अस्त; मधून गेलेले (ग्रहांच्या संक्रमणात नक्षत्र, राशी).

गतक न. मिष; ढोंग; बहाणा; सोंग (दारिद्र्य, वेड, दुखापत, वेदना यांचे), किंचित असता फार करणे. (क्रि. घेणे, करणे.)

गतक न. १. गद्यपद्याचा छोटासा व रसभरित चुटका; मजेदार विनोदी कवन (भाट, बंदीजन, भिक्षेकरी यांनी गाइलेले); न्यायप्रचुर वचन अथवा म्हण. २. मनोरंजक, हास्यकारक गोष्ट. (को.) ३. लांबलचक भाकडकथा; कंटाळवाणी गोष्ट. (क्रि. लावणे, लागणे.) ४. दुसऱ्याने घाबरे व्हावे किंवा चमत्कार वाटून हसे यावे, असे भाषण किंवा भाषणाची नक्कल.

गत(द)का पु. १. घामाघूम स्थिती; घामाची चिकचिक; उबणे; गदगद. २. उकाडा; उबारा; गरमी. ३. उकळणे; शिजणे; खदखद; उकळी; कढ. (क्रि. येणे.) ४. पिकणे (ताठरलेले व विकोपास गेलेले गलांड, गळू); आग, तळमळ (खरजेची). ५. उमाळा, आवेश, हुंदका, उकळी, क्षोभ (ममता, इच्छा, रडे, हास्य यांचा) (क्रि. येणे.) ६. सोटा.

गतकाळा–ळ्या वि. कांगावा, अकांडतांडव करणारा, थोडेसे मारले असता जीव तोडून ओरडणारा; श्रीमंत असून दारिद्र्याचा बहाणा करणारा; वेड्यांचे सोंग आणणारा; ढोंगी : 'गावातनं मिरवनी काढतोय काय त्यो गतकाळीचा !'– रैत ७५.

गतकाळा पु. समुदाय.

गतकुळी–ळ स्त्री. न. पूर्वज.

गतकुळी, गतकूळ वि. १. माणूस वा शेतकऱ्याच्या ग्रामत्यागाने पडून राहिलेली (जमीन, शेत, वतन, मिरास). २. मालक किंवा कोणाचा वंशपरंपरेचा हक्क नसलेली (जमीन इ.) अशी जमीन गावच्या मालकीची समजून तिची विल्हेवाट लावीत किंवा सरकार ती इनाम देत असे.

गतकेडी वि. निर्लज्ज. (बे.)

गतक्या वि. १. पहा : **गतकाळा**. २. विनोदी; नकल्या; गोष्टीवेल्हाळ.

गतणे अक्रि. १. काही एक गोष्ट होऊन जाणे. २. (ल.) मरणे. पहा : **गतला** [सं. गम्–गत]

गतधवा स्त्री. विधवा; जिचा नवरा मेला आहे अशी स्त्री : 'नगरिगतधवा ते आणि निर्वीर्य योद्धे ।'– वामन भरतभाव ३. [सं.]

गतप्राण वि. १. मृत; मेलेला. २. (ल.) भ्रांतचित्त; भयभीत; बेशुद्ध. [सं.]

गतभरणा पु. मृदंग आदी वाजविण्याच्या रीती; तान, सूर, राग, रागिणी यांचा साठा, संग्रह.

गतभर्तृका स्त्री. विधवा. पहा : **गतधवा** [सं.]

गतमत स्त्री. (मुलांच्या बोलीत) एकोपा; सल्ला; गुप्त विचार किंवा उद्देश.

गतयेडा पु. वेडाचे सोंग घेतलेला शहाणा माणूस. (अहि)

गतवीर्य वि. १. पुरुषत्वहीन; षंढ. २. (ल.) नेभळा; हताश; दुर्बल. [सं.]

गतश्री वि. दरिद्री; दैवहीन; अभागी; वैभव, संपत्ती नष्ट झालेला. [सं.]

गतसत्त्व वि. निर्जीव; निर्वीर्य; दुर्बळ. [सं.]

गतागत न. वारंवार हालचाल जा–ये करणे; पुनरपि चलनवलन; अस्तोदय : 'नेणे सूर्याचें गतागत । केला भ्रांत कंदर्पे ।'– एभा २६.८५. [सं.]

गताड न. अजस्र, अगडबंब जनावर (गाय, म्हैस). (राजा.)

गताडी स्त्री. गवाणी; गव्हाण. (कु.)

गताड्या वि. वेंधळा. (अहि.)

गतानुगतिक वि. १. पुढे गेलेल्यांच्या मागून (पूर्ण विचार न करता) डोळे मिटून जाणारा; अज्ञानाने परंपरागत चालणारा किंवा वागणारा. २. (ल.) अडाणी; मूर्ख; बुद्धीचा उपयोग न करणारा. ३. परंपरेने चालत आलेले (आचरण, गोष्ट); ठोकळेबाज.

गतायु–यू, गतायुषी–ष्य वि. १. अत्यंत वृद्ध; म्हातारा. २. ज्याचे आयुष्य संपले आहे असा; मृत : 'जैसें गतायुषी शरीरीं । चैतन्य वासु न करी ।' – ज्ञा ३.१०९; 'पैं घातयाही पायां पडतां । नुठी गतायु पंडुसुता ।' – ज्ञा १६.१२९. [सं.]

गतार्थ वि. १. समजलेला; दर्शविलेला; अभिप्रेत; अध्याहृत; सूचित केलेला. २. साधलेला; तडीस नेलेला; संपादलेला. ३. दरिद्री झालेला.

गताल(ळ)का वि. केशविहीन स्त्री; वपन केलेली स्त्री; विधवा : 'गतालकाही अंगीकारी ।'– एभा २३.२७९. [सं.]

गतावणे अक्रि. जाणे; शेवट होणे; मरणे. [सं. गत]

गति–ती स्त्री. १. जा ये; चळवळ; हालचाल; गमन; धाव; प्रयाण; चाल; प्रगती : 'रथाची गती ।।' – ज्ञा १७.३८९. २. वर्तन; वागणूक; चाल; पद्धती : 'परी ते गती समस्तां । न मनेल ययां ।।' – ज्ञा २.२०३. ३. आकाशस्थ गोलांचे एकंदर परिभ्रमण, फेरी. ४. ग्रहाची आपल्या कक्षेतील दैनिक फेरी. [सं.] (वा.) ० **करणे** – पुढे जाणे; प्रगती करणे : 'इंग्रजी भाषेत बरीच गति केली होती.' – आत्मवृत्त ६. ० **नसणे** – एखादा विषय समजण्याची स्वाभाविक बुद्धी नसणे. ० **होणे** – प्रवेश होणे; समजणे : 'त्यांची संस्कृतात गती झाली होती.' – कोरकि ४२९. **गतीवर येणे, गतीस येणे** – १. कृत्रिम (वेष, मुखवटा)

टाकून मुळावर येणे. २. ताळ्यावर येणे; पूर्वीचे वर्तन टाकणे; सुधारणे.

गति–ती स्त्री. १. स्थिती; दशा (मुख्यत्वे वाईट अर्थी) : 'पुसति बापाजी झाली हे कां गती ।' – मोअभंग सीतागीत (नवनीत २५९.) २. प्रारब्ध; दैव; घटित; नशिबाचा फेरा. ३. आयुष्यातील बाल – तरुण – वृद्ध अवस्था. ४. प्रकार; अवस्था. ५. मोक्ष; सद्‌गती; मुक्ती;, उत्तम लोक : 'उत्तम साधन आइका कोण गति अवगति ।' – तुगा ४२८. ६. गत; पर्यवसान; शेवट : 'अखेर संग्रामाच्या गति ।' – ऐपो २२. ० करणे – गत करणे; ठार मारणे. ७. इलाज; उपाय. (वा.) **गतिवर घातलेला, पडलेला** – मरणोन्मुख झालेला; मरावयास टेकलेला. **० मिळणे –** मुक्ती मिळणे. **गती करणे –** ठार मारणे.

गति–ती स्त्री. १. आश्रय; कृपास्थान : 'गति तूंचि आमुची वा आश्रय आम्हासि तूंचि मावासा ।' – मोकर्ण ४२.७. २. इलाज; उपाय : 'तसें केल्यावाचून व्यापाऱ्यांस गतीच नाही.' – विक्षिप्त १.९९. ३. खरे स्वरूप; खरा अर्थ; मर्म : 'अगा गति कळावी कर्माची.... गहन कर्माची गति म्हणोनि ।' – यथा ४.४२०. ४. आवाका; पोहोच; आटोप; टप्पा; प्रसार. (समासात) कल्पना – कौशल्य – चातुर्य – शौर्य – गती वगैरे. ५. चढती पायरी; भरभराट; सुस्थिती; आबादानी; प्रगती.

गति–ती स्त्री. वाजविण्यातील एक प्रकार, रीत : 'गति ग पखवाजावर झडती ।' – प्रला १३४.

गतिकी स्त्री. (भौ.) पदार्थांच्या गतीवर परिणाम करणाऱ्या किंवा त्यात बदल घडवून आणणाऱ्या शक्तींशी संबंधित असलेली भौतिकशास्त्राची शाखा. २. (शिक्षण) एखाद्या घटनेच्या कारणात अंतर्भूत असणारे गतिशील कार्यात्मक संबंध. यामध्ये प्रामुख्याने वर्तनामागील भावनात्मक घटकांचा समावेश केला जातो. ३. अवकाशातील पदार्थांच्या गतीचे विज्ञान.

गतिगती क्रिवि. हळूहळू. (व.)

गतिचक्र न. (यंत्र) यंत्र चालू करणारे मोठे चाक. [सं.]

गतिज ऊर्जा (भौ.) पदार्थाला त्याच्या गतीमुळे प्राप्त होणारी ऊर्जा, कार्यशक्ती.

गतिज सिद्धांत (भौ.) द्रव्यातील कण एकसारखे यदृच्छेने हालचाली करीत असतात या मूलभूत कल्पनेवर आधारलेला, द्रव्याच्या गुणधर्मांचे स्पष्टीकरण करणारा सिद्धांत.

गतिदाता वि. (इहलोकापासून, विभक्तपणापासून किंवा जन्ममरणापासून) बंधमुक्त करणारा; मुक्तिदाता; ईश्वर. [सं.]

गतिफल न. दोन ग्रहांच्या परिभ्रमणांतील वेळांचे अंतर. [सं.]

गतिबोधनशास्त्र न. (शिक्षण) स्पर्शज्ञान व लिहिता येण्यास आवश्यक असलेली स्नायूंची हालचाल ह्यांचा अंतर्भाव असणाऱ्या गिरवण्याच्या किंवा लिहिण्याच्या द्वारा शब्दज्ञान करून घेण्याचे शास्त्र. मूकबधिर मुलांना किंवा माँटेसरीच्या शिक्षणपद्धतीत लहान मुलांना लेखन–वाचन शिकविताना या शास्त्राचे उपयोजन केल्याचे आढळून येते.

गतिभंग पु. अवरोध; प्रतिबंध; अडथळा. [सं.]

गतिभ्रंश पु. खोळंबा; आडकाठी; खळ; खोटी (कोणतेही गमन किंवा चाल यामध्ये). [सं.]

गतिमंडल अंगहार (नृत्य) आखंडल स्थान करून हात रेचित करणे व उजवा पाय उद्घटित करून मत्तल्ली, आक्षिप्त, उरोमंडल व कटिछिन्न ही क्रमाने करणे.

गतिमति स्त्री. चाल आणि बुद्धी : 'तेयांचि गतिमति क्षाळली.' – लीचपू १९८.

गतिमान वि. १. चालणारा, हलणारा, गतिशील, गतीत असणारा; सारखा पुढे पुढे जाणारा. २. सुसाट, झंझावाती; तडाखेबंद. [सं.]

गतिमानता स्त्री. वेग; सतत वाढण्याची, पुढे पुढे जाण्याची क्रिया : 'दारिद्र्याची गतिमानता किंवा प्राप्तीमधला चढउतार गुन्हेगारीला विशेषेकरून कारणीभूत होतो.' – चंद २०. [सं.]

गतिमापक पु. (भौ.) शक्तीचे मापन करणारे उपकरण. [सं.]

गतिविलास पु. चालण्यातील कौशल्य : 'मुग्धा गतिविलासाचा सराउ देती.' – शिव ३४१.

गतिशास्त्र न. वस्तूंच्या गतीशी अथवा स्थितीशी संबंधित शक्तीचा अभ्यास करणारी अभियांत्रिकीची शाखा; ज्या नियमांनी पदार्थाला गती मिळते त्यांचा विचार करणारे शास्त्र.

गतिशील वि. १. गती, चेतना किंवा कृती इत्यादींनी युक्त; गतिमान. उदा. गतिशील समूह, गतिशील विचारसरणी, गतिशील प्रक्रिया. २. जंगम.

गतिहीन वि. १. आश्रय, आधार किंवा उपाय नसलेले; अनाथ. २. हालचालरहित; स्थिर; कुंठितगती. [सं.]

गत्य स्त्री. गत; अवस्था : 'गोमाजीपंताची गत्य व्हावयाची.' – ऐसंसाखं ११.१३.

गत्यंतर न.अन्य मार्ग, इलाज, विकल्प; पर्याय; उपाय. (नसणे.) [सं.]

गत्या क्रिवि. अनुसरून; रीतीने; योगे; मार्गाने; सहित. (समासात) स्वभाव, दैव – कर्म – प्रारब्ध – वस्तू – आत्म – भेद – गत्या.

गथागोवा–वी–व पु. स्त्री. १. घोटाळा; गुंतागुंत; घालमेल; पेच; गोंधळ. (लक्षणेने व शब्दश: उपयोग) : 'जन्म हेचि अकारण । गथागोवी ।' – दास ३.१.४. २. घालमेली इ. चे काम, धंदा.

गद पु. रोग; आजार : 'शरीरीं गद देतिल धडका ।' – राला ९२. [सं.]

गद स्त्री. खड्डा; चर : 'तेव्हा तिथे कुणी नसले तरी खोदलेल्या सहा गदी दिसत.' – व्यंमाक १३५.

गदक पु. मंत्र म्हणणारा : 'गदक भिषक आणि तपी । प्रतिज्ञा करोनि बैसले जपीं ।' – मोआदि ८.५० [सं.]

गदक पु. १. खदखद; कढ किंवा त्याचा आवाज. (क्रि. येणे.) २. उकळत्या वस्तूचा फेस; ऊत.

गदका पहा : **गतका**

गदगद स्त्री. १. खाज; कंड (क्रि. सुटणे) २. उब; उकाडा. ३. कढ; उकळी; कढ – उकळीचा आवाज. ४. हसणे; हसण्याचा आवाज. [सं. गद्‌गद]

गदगद–दा क्रिवि. शिजण्याचा किंवा उकळीचा खदखद असा होणारा आवाज. २. खुलेपणाने, मोकळेपणाने, आनंदाने (हसणे); 'मम अभिलाष धरूनी । गदगदां हांससी पापिणी ।।' – नव २०.२४. ३. ओक्साबोक्शी, जोराने हुंदके देऊन (रडणे.)

गदगदणे अक्रि. खदखदणे (आधणातील पदार्थ).

अकर्तृक क्रि. १. उकडणे; गदमदणे. २. उकाड्याने, गुदमऱ्याने घामाघूम होणे. ३. गदगदून येणे, जबरदस्त क्षोभ किंवा मनोवृत्तीने कंठ दाटून येणे, गहिवरणे. [ध्व. सं. गद्गद]

गद(दा)गदा क्रिवि. जोराने मागेपुढे होईल अशा प्रकारे : 'जांभळांनी लहडलेली एक फांदी मी गदगदा हलवली.' – व्यंमाक ११५.

गदगदाट पु. हसण्याचा ध्वनी : 'थोर हासे गदगदाटें ।' – मुसभा १४.४०. पहा : **गदगद** [ध्व.]

गदगदून क्रिवि. १. जोराने : 'गुत्त्यात गदगदून गदगदून हसणारा घाबू.....' – किरिस्ताव ४२. २. हुंदके देत; गळा दाटून येऊन : 'ती गदगदून रडू लागली.' – पूपु

गदगा, गदगी पु. स्त्री. चामड्याने मढविलेली काठी, सोटा; तलवारीचे हात शिकण्याचे एक हत्यार. त्याबरोबरच चामड्याची एक लहान ढाल (फरी) असते. [क. गुदिगे] [सं. गदा]

गदगी, गजगी स्त्री. खांबाखालचा दगड; खुर्ची; उथळे; तळखडा. (कर.)

गदबळणे १. अक्रि. गोंधळणे; गडबडणे; घोटाळ्यात पडणे; २. सापडेनासे होणे. [ध्व.]

गदम वि. पावसाळा संपल्यानंतर ज्या ठिकाणी फार दिवस ओल राहते असे स्थळ; पाणथळ; चिबड, दलदलीचे (शेत, जमीन). (राजा.)

गदम न. गलबत थोड्या पाण्यात असताना त्याला दिलेला टेका. पहा : **गदाम** (कु.)

गदमणे, गदमदणे अकर्तुक क्रि. उकडणे; उष्मा होणे.[सं. गज् + मद]

गदमद स्त्री. १. गुदमरा; उकाडा. २. अतिशय गदगदणे; तलखी; घामाघुमी.

गदमळणे अकर्तुक क्रि. मळमळणे; ढवळणे.

गदर–री स्त्री. न. १. बंड; गर्दी : 'महादजी पाटिलावरी आपण चालोन गदर केली.' – मइसा १५.३३. २. वैर; विश्वासघात; खोटा आरोप ३. दंगा; हल्ला; तुफान (वा.) ० **करणे –** (एखाद्याभोवती) गर्दी करणे; (एखाद्यावर) चालून जाणे. [फा.]

गदर पहा : **गजर**

गदरणे अक्रि. १. फुगून पिकण्याच्या स्थितीला येणे (फळ, गळू). २. घामाघूम होणे.

गदरा, गदरेल वि. परिपक्वतेस आलेले (विड्याचे पान, फळ). [हिं.]

गदल वि. गढूळ : 'शंकेचेनि गदलपणें । जें शुद्ध प्रमेय मैळणें ।' – राज्ञा १३.३२३. [क. गदलु]

गदळ, गदळपण न. १. घाण; गढूळपणा, रेंदा, राड (प्रवाही पदार्थातील). २. गाळ; कचरा; मळ. ३. केर; धूळ; तूस; भूस (धान्यातील). ४. (सामा.) एखाद्या वस्तूतील निरुपयोगी भाग. ५. गाळसाळ; हेंदळ; धुरळा. ६. माजलेले व घाणेरडे गवत; रान.

वि. १. घाणेरडे; मळकट; मलीन; गढूळ; भिकार; क्षुल्लक; कवडीमोल; ओंगळ; हिडीस (पाणी, माणूस, वस्तू, गोष्ट). २. क्षुब्ध (मनोविकार इ. च्या प्राबल्यामुळे). [क. गदलु]

गदळ पु. अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा; धांदल. (वस्तू, कामकाज यांतील.) वि. घोटाळ्याचे; गडबडीचे; घालमेली; गबाळी (कृत्य, पुस्तक.).

गदळणे उक्रि. १. मळकट, गढूळ करणे : 'नभ पृथ्वीरजें न गदळे ।' – एभा ७.४४८. २. घालमेल करणे; विसकटणे; दुर्दशा करणे.

अक्रि. गवत, रान भाजून खराब होणे. (पीक, शेत)

गदळप्रीति स्त्री. भयगंड.

गदळांवचे सक्रि. गोंधळात टाकणे. (गो.)

गदा स्त्री. १. लांब दांड्याचे व टोकाला मोठा गोल जोडलेले एक प्राचीन आयुध; लोखंडी अर्गळा. २. कांब. ३. (ल.) घाला; हल्ला; धाड. (क्रि. येणे, आणणे.) : 'मूळ व्यापारावर इंग्रजांनी गदा आणली.' – के १७.६.३० [सं.]

गदा पु. १. भिकारी. २. भीक; मधुकरी : 'तुका म्हणे वृत्ती सांडुनि । गदा मागत जाती ।।' – तुगा ४१२. [फा.]

गदाई स्त्री. एक भिक्षेकरी जात; मेढे जोशांच्या पाटलाची कुळी. – गांगा ३० [फा.]

गदाकवक न. (वन.) गदाबीजुके निर्माण करणारा एक कवकगट.

गदाणा पु. कंदमय वनस्पती.

गदादणे अकर्तुक क्रि. १. उकडणे; गुदमरणे; लाही लाही होणे : 'गदादीत काया समुद्रांत घाली ।' – राक खं. १.९. २. उकाड्याने उबणे; घामाघूम होणे.

गदाधर पु. पाणी पिण्याचे विशिष्ट भांडे. [सं.]

गदाम न. (नाविक) गलबते चोपडण्यास लावतेवेळी ती तराजूसारखी राहण्यासाठी दोन्ही बोडतांना, पाण्यात लाकडे उभी करून त्यांना बांधतात त्या आडव्या दांड्या. (हेट)

गदारणे क्रि. १. तृप्त होणे. २. उकडणे.

गदा(द)रोळ, गदा(द)रोळी पु. स्त्री. १. मोठा गोंगाट; गजर; ओरडणे : 'सभोंवते मिळोनि गोपाळ । गदरोळ करिताती ।' – ह १३.४५; 'करूं गदारोळी हरिकथा ।।' – तुगा १८११. २. (ल.) मोठे पांडित्य; निरूपण : 'निजमंडपीं शिशुपाळ । करीत होता गदारोळ ।' – एरुस्व १२.१. ३. लढाईतील वीरांच्या आरोळ्या. ४. लढाई; लढाईतील धुमश्चक्री : 'सांडौनि गदारोळु । मज एने घातला आळु ।' – शिव १९२. ५. खटाटोप; प्रयत्न : 'तेणें करविला हा गदारोळ । ग्रंथरचनेचा ।।' –विवेकसिंधू. [सं. गद् + आरोळ]

गदाळणे अक्रि. थकणे : 'भोलूबाई नृत्यकारणाने गदाळून गेल्यामुळे....' – एहोरा २१.

गदाळा पु. १.घाण; अनेक प्रकारच्या घाणीची राड : 'जनावरांचे शेण व गदाळा बाहेर नेऊन टाकीत.' – माआ ३०. २. गवत : 'बारका गदाळा बांधायचं जाळं घ्यावं नि कोंबड्याला धरावं.' – गोता २२३.

गदाळ्या वि. धांदरट; खुळचट.

गदिनागांठा पु. बाळी–बुगडी; जडावाचे दागिने.

गदी वि. रोगी; आजारी : 'अमृतहि पितां न स्वास्थ्यांला वरील गदी क्षण ।' – मोअंबरीष (नवनीत) पु. ३६९. [सं. गदिन]

गदी स्त्री. गाढवी : 'गदी मारगी लावली ।' – एहोरा कोकणी ३६.

गदी स्त्री. गोट्या खेळण्याचा किंवा विटी दांडूतली विटी आडवी ठेवून उडवण्याचा लहान खड्डा; गल, गली.

गदी हौदा (हत्तीचा).

गदीन वि. गदायुद्धनिपुण; गदाप्रवीण : 'श्रीकृष्ण म्हणे हा रे भीमा जरि तूं महाभुज गदीन ।' – मोउद्योग ६.१८.

गदुल्या स्त्री. उनाडक्या; थट्टा.

गदेपदे, गद्देपद्दे पु. अव. १. टाळाटाळी; अळंटळं; चालढकल; बहाणे; सबबी; लबाडीची चुकवाचुकवी. २. (सामा.) छक्केपंजे; पाचपेच; डावपेच. [सं. गद्यपद्य]

गदेरा पु. गदळ; घाण. (बे.)

गदेला पु. १. मोठी गादी; सभागृहात पुष्कळ मंडळी बसतील अशी केलेली बरीच लांबरुंद पातळ गादी : २. हत्तीच्या मानेवर घातलेली उशी. (बसणाऱ्यास दोर टोचू नये म्हणून.) [हिं. गद्दी]

गदेला पु. निरनिराळे आकार द्यायची ऐरण.

गदोगदो, गद्ना, गदनारी क्रिवि. भरभर. [क्रि. चालणे.]

गद्गद, गद्गदध्वनि–नी, गद्गद्वाणी पु. स्त्री. अंत:करण उचंबळून आल्यामुळे तोंडातून निघणारा अडखळता किंवा अस्पष्ट आवाज, उमासा; जोराचा हुंदका; दाबलेले रडणे. [सं.]

गद्दा पु. गदेला; मोठी गादी. (ना.) [हिं. गद्दी = गादी]

गद्दा स्त्री. भात : 'सव्वा मण गद्दा वो, गद्दा दिली खात्या व.....' – एहोरा २.१२२.

गद्दार वि. बंडखोर; विश्वासघात करणारा; द्रोह करणारा. [फा.]

गद्दारी स्त्री. बंडखोरी; बेइमानी; धर्मद्रोह; देशद्रोह : '१९४७ साली आम्ही हिंदुस्थानशी गद्दारी केली.' – सोबा १५.

गद्दी, गद्दी जमीन स्त्री. नदी किंवा तलाव यांच्या काठची मळईची जमीन, मळई; मळी. २. अव्वल प्रतीची भातजमीन.

गद्धा पु. गाढव. (ल.) मूर्ख. [सं. गर्दभ]

गद्धागद्धी स्त्री. मुलांचा एक खेळ.

गद्धारा पु. तलवारीचा एक प्रकार.

गद्धेकोट पु. पत्त्यांचा एक खेळ : 'निदान गद्धेकोट खेळू.' – आआशे ५९.

गद्धेपंचविशी स्त्री. ज्या काळात मनुष्य मूर्खपणाने, अविचाराने वागतो असा पंचविशीच्या आसपासचा ऐन तारुण्याचा काळ.

गद्धेमल्हार पु. (निंदार्थी) १. गाढवांच्या ओरडण्याचा मिलाफ. २. (ल.) वाईट, कर्कश गाणे इ. ३. (ल.) मूर्ख माणूस. [हिं.]

गद्य न. १. सामान्यत: आपण जसे बोलतो किंवा लिहितो ते भाषेचे रूप; छंदोचरण इ. चे नियम न लावता वापरली जाणारी सामान्य व्यवहारातील भाषा; (सामा.) छंदोरहित प्रबंध, लेखन, भाषा. २. साधी वाक्यरचना. ३. (ल.) अरसिक, बेचव, कंटाळवाणे विवेचन, नीरस लेखन.

गद्यकाव्य न. काव्यमय विचारांची व कल्पनांची गद्यमय मांडणी. [सं.]

गद्यगीत न. गद्यरूपात केलेला भावनाविष्कार. [सं.]

गद्यपद्य न. १. छंदोरहित व छंदोबद्ध रचना. २. (ल.) छक्केपंजे; डावपेच; कपट; कारस्थान; कावा; कुलंगडे; दगा. पहा : **गदेपदे** [सं.]

गद्याण–न न. ४८ गुंजा वजनाचे प्राचीन काळात वापरले जाणारे सोन्याचे नाणे : 'या लेखात गद्यान नावाच्या सुवर्णनाण्याचा उल्लेख आहे.' – पंवि २८.

गधडा पु. १. गाढव (तिरस्कारार्थी वापरतात.). २. अजाण. [हिं. गद्धा]

गधुळणे, गधूळ उक्रि. गढुळणे. पहा : **गढूळ**

गधेघाट पु. ढोरांचा कोंडवाडा. [व.]

गधेलोट पु. (कुस्ती) (गाढवे भांडतात त्यावेळच्या कृतीवरून) कुस्तीतील एक डाव. आपल्याला कोणी खाली धरले तर आपला हात जोडीदाराच्या दोन्ही पायांच्या आतून घालून जोडीदाराची मांडी आपल्या पंजाने धरून त्याच बाजूने आपण फिरून जोडीदाराला चीत करण्याचा डाव.

गध्यागाढव पु. गावाच्या शिवेचा दगड. (नाशिक)

गनगन १. गोलगोल, रिकाम्या फेऱ्या. (क्रि. मारणे) २. अंघोळ.

गनमेटल न. तांबे, जस्त व कथील यांच्या मिश्रणाने बनलेला धातू.

गना पु. (विणकाम) कापड विणताना आडवे घालायचे सूत धोट्यातील ज्या कांडीवर गुंडाळतात ती कांडी; गणा.

गनिमत न. दु:खात सुखाची गोष्ट. [फा.]

गनिम(मा)त स्त्री. लूट; मिळकत; बरकत; विपुलता. [फा.]

गनिमाई स्त्री. १. शत्रूची धाड, लूट; हल्ला. २. गनिमी कावा; गनिमी लढाई : 'शत्रूचें सामान भारी आल्यास बुणगें एकीकडे लावून द्यावें, आणि खडी फौज करून आज या ठाण्याजवळ, उद्या दुसऱ्या ठाण्याजवळ याप्रमाणे गनिमाई करावी.' – ऐलेसं ६.२७९६.

गनिमात स्त्री. १. ईश्वरी कृपा; आशीर्वाद; दया. २. चांगली गोष्ट, कृत्य. [फा. गनीमत]

गनिमी कावा, गनिमी लढाई १. पळपुटी लढाई; कजाखी. अगोदर भ्यालो असे दाखवून शत्रूला पाठीवर घ्यायचे व तो अडचणीच्या जागेत आला असे पाहून त्याच्यावर जोराने उलटून हल्ला करायचा व त्याचा फन्ना उडवायचा. समोरासमोर लढाई न करता युक्तीने, आडमार्गाने शत्रूला जेर करणे. शत्रूंशी लढताना मराठे या रीतीचा अवलंब करीत : 'आम्ही गनीमी काव्यानें राहतो....' – भाब ५८. २. (ल.) लबाडीची युक्ती; लपंडाव; कपट प्रयोग.

वि. कपटी.

गनी(ली)म पु. १. शत्रू; वैरी : 'गनीमाच्या देखतां फौजा । रणशरांच्या फुर्फरिती भुजा ।' – दास १९.९.२५. २. चोर; लुटारू: 'सेख निजाम गनीम संगमेश्वरास आला.' – इऐ ५.५०. ३. (सांकेतिक) मराठ्यांना मुसलमानांनी दिलेले नाव : 'गनीमांनी मसुरास वेढा घातला.' – इमं ३७. [फा.]

गनूदन डुलकी.(क्रि. घेणे.).

गन्जूर पु. वखार; खजिनायुक्त जागा.

गन्या वि. बावळट.

गन्यागंप्या वि. अजागळ. (अहि.)

गन्ला वि. अभिमंत्रित.

गन्सी स्त्री. समशीतोष्ण कटिबंधात आढळणारी दुधाळ गायींची एक जात.

गप–प्प वि. स्तब्ध; चूप; शांत; निश्चल.

क्रिवि. गडप; ठावठिकाणा न लागेल अशा प्रकारे. [ध्व.] (वा.) ० **करणे–**१. गट्ट करणे; मटकावणे. २. गडप करणे; नाहीसे करणे. ३. चूप करणे; गप्प बसवणे.

गप–प्प स्त्री. १. सामान्य बोलवा; उडत बातमी; अफवा; वार्ता; आवई. २. निरर्थक बोलणे, भाषण, बकवास; रिकामी वटवट; बाता. ३. खोटी बनावट हकीगत; मिथ्या गोष्ट.[फा. गोफतन, गप्] (वा.) ० **उठवणे–** अफवा पसरविणे. ० **छाटणे, तासणे, झोकणे –** एखाद्या बातमीची चर्चा चालवणे; रिकाम्या बातम्या पसरवणे : 'आम्ही कवी कवीना रीति नव्हें छाटितोंचि लाख गपा ।' – मोरोपंत. ० **मारणे –** (बोलण्यातली) थाप मारणे.

गपई स्त्री. सूत गुंडाळण्याची पट्टी.

गपकन–र, गपदिशी क्रिवि. अकस्मात; तडकाफडकी; एकदम; एकाएकी झालेल्या गोष्टींच्या आवाजासारखे. (क्रि. धरणे, बसणे, गिळणे, खाणे, मारणे, पाहणे, उचलणे.)

गपका पु. १. आवाज होऊन गट्ट केलेला घास; गटंगुळा; मटका. (क्रि. मारणे.) २. (ल.) हात मारणे; लाच. (क्रि. मारणे.) ३. हलका ढुस्सा, गुद्दा. (क्रि. मारणे.) [ध्व.]

गपगप–पा, गपागप, गपापा–पून क्रिवि. उतावीळपणे मटकावताना, गिळताना होणाऱ्या आवाजासारखे. [क.गपगपतिन्नु]

गपगार वि. शांत; स्तब्ध; आवाज न करता; हालचाल न करता : 'गाव गपगार होतं.' – गागो ४८.

गपगिरी स्त्री. वार्ता; माहिती; कुणकुण; आवई; सुगावा : '..... शास्त्रीबाबाचा (गंगाधरशास्त्र्याच्या खुनाचा) प्रकार जाला याची गपगिरी गायकवाड सरकारास तशी आम्हासहि बहुत....'– शादवे १६६.

गपच(ची)प न. सायीमध्ये कणीक मळून तळलेले पक्कान्न.

गपचीप–चूप; गप्पचीप–चूप क्रिवि. निवांतपणे; निश्चलपणे; मुकाट्याने; न बोलता.

गपछप–शप–सप स्त्री. रिकामटेकड्या गप्पा; चकाट्या. [फा.]

गपा–प्पा–प्फा स्त्री. अव. रिकाम्या बाता; बडबडी; चकाट्या : 'न सार्थक लटक्या साऱ्या गपा ।' – राला ८७. पहा : **गप.** (वा.) ० **छाटणे, मारणे** – अनेक लहानमोठ्या विषयावर फार गंभीर न होता मोकळेपणाने बोलणे : 'समोरच्या चाळीत गप्पा छाटीत बसायची त्याची एकदोन ठिकाणं वासूला ठाऊक होती.' – शिदोरी ३५.

गपाटा पु. थाप; गप्प; बात (क्रि. मारणे.) : 'कृष्णराव नांवाच्या मुंबईकरानें महाराजांच्या मुलाखतींत बरेच गपाटे मारले.' – विक्षिप्त २.५३.[हिं.]

गपाणा पु. बकाणा; मोठा घास (भाजलेले दाणे, कोरडे खाणे याचा.).

गपापणे अक्रि. वटवट, बडबड करणे.

गपाऱ्या वि. वटवट्या; बडबड्या; बरळणारा; बाताड्या.

गपांडा पु. फार मोठा घास; बकाणा : 'आंबटगोड मोहर ओरबाडून (संदिपान) त्यांचे गपागप गपांडे मारीत होता.' – हपा ११६.

गप्पागोष्टी स्त्री. अव. १. गोष्टी; कथा; हकीगती; खबरबखर. २. बकवा; बाता; रिकामी वटवट. ३. शिळोप्याच्या गोष्टी; रिकामपणचे बोलणे. (क्रि. करणे, हाकणे.)

गप्पाघोळ पु. अडगळ.

गप्पाटप्पा पहा : **गप्पागोष्टी** : 'गप्पाटप्पात वेळ घालवायचा त्यांचा नाद काही सुटला नव्हता.' – दुर्दम्य १.४२.

गप्पाड्या वि. थापा मारणारा; न घडलेल्या गोष्टी घडल्या आहेत अशा प्रकारे बोलणारा; खोटार्डा : 'पण त्यांची नावे या गप्पाड्या ग्रंथकारास कशी समजली?' – जोफु ६९.

गप्पाबहाद्दर वि. खूप गप्पा मारणारा; गोष्टीवेल्हाळ; गप्पीष्ट : 'आम्ही पोरेही लवकरच गप्पाबहाद्दर बनलो.' – मिरास ३३१.

गप्पाष्टक न. वटवट; बडबड; रिकामपणाच्या गोष्टी. (क्रि. करणे, मारणे.)

गप्पाष्टक्या, गप्प्या, गपोडा, गपोड्या, गप्पिष्ट, गप्पी, गप्पीस्त, गप्पीदास, गप्पीनाथ वि. बाता झोकणारा; वटवट्या; गोष्टीवेल्हाळ; थापाड्या; बाताड्या.

गफलत स्त्री. १. निष्काळजीपणा; बेसावधपणा; हयगय; दुर्लक्ष; गैरसावधपणा; अविचार; चूक; दोष; गलती : 'करारांत दोघांच्या झाली कांहीं किंचित गफलत ।' – ऐपो ३९५. २. हयगयीमुळे वस्तू हरवल्याची स्थिति; निष्काळजीपणाने नाहीसे होणे, न सापडणे. ३. अव्यवस्था; गोंधळ; घालमेल; (पदार्थ, वस्तू यांची) [फा. गफ़्लत]

गफलतणे उक्रि. १. गैरसावधपणाने गमावणे, पाडणे, गळणे, हरवणे. २. अव्यवस्थितपणे भेसळ करणे; स्थानभ्रष्ट करणे; ढवळाढवळ करणे; गोंधळ करणे; विस्कटणे.

गफलती–त्या वि. १. नेहमी वस्तू हरविणारा, नेहमी भलत्या ठिकाणी वस्तू ठेवणारा; विसराळू; गैरसावध; हलगर्जी. २. लबाड, अविश्वासू.

गबकन, गबकर, गबगब, गबागब, गबगबा, गबा, गबाबा, गबाबून पहा : **गपकन इ.**

गबका पहा : **गपका**

गबगबणे अक्रि. १. अतिशय पडशाने किंवा खोकल्याने पिडणे. २. अश्रूंनी डोळे भरून येणे. [ध्व.]

गबगबणे अक्रि. १. गबगुबीत, लठ्ठ होणे. याचा व्युत्क्रमानेही उपयोग करतात. २. भरगच्च दिसणे, होणे; प्रफुल्लित दिसणे. [सं. गर्भ.]

गबगबीत वि. क्रिवि. १. गुबगुबीत; तुंद; लठ्ठ; मांसल. २. भरदार; दळदार; रसभरित (फळे). ३. मसालेदार पदार्थांनी पूर्ण भरलेली (पोळी, करंजी इ.) ४. भरपूर; भरगच्च : 'तेणें पात्रें भरली गबगबीत ।' – महिकथा ३३.१९९.

गबदुल पहा : **गुबदुल**

गबदुल्ला, गबदू, गबदूल वि. ठेंगू व बळकट; घटमूठ बांध्याचा; लठ्ठ व मजबूत; वाटोळ्या अंगाचा; गलेलठ्ठ. [हिं. गबदल]

गनबा पु. जुन्या सुती कापडाचे शिवून फुले वगैरे काढून केलेले जाजम.

गबर, गब्बर स्त्री. पु. १. सोन्याचे एक नाणे. २. (ल.) अशी नाणी ज्याच्यापाशी पुष्कळ आहेत असा माणूस; श्रीमंत व्यक्ती.
वि. श्रीमंत; द्रव्यसंपन्न; धनवान : 'श्रीमान् पुरुष आणि दरोडेखोर यांमध्यें वास्तविक वाटतो तितका फरक नाहीं. दोघेही दुसऱ्याच्या वित्तावरच गबर होतात.' – सहचारिणी ६०. [हिं.]

गबरगंड वि. पैसेवाला; श्रीमंत : 'बघता बघता दिडकीला महाग असलेला नाना चांगला गबरगंड झाला.' – व्यंमाक ७५.

गबरू पु. १. रूपवान व सशक्त माणूस. २. (ल.) श्रीमंत व्यक्ती; मातबर किंवा मालमत्ता असलेला माणूस. पहा : **गब्रू**

गबागबा क्रिवि. झरझर; भरभर; घाईगर्दीने : 'अंबाडीची भाजी मी येचिती गबागबा ।' – तीसा २७५.

गबान वि. सुपीक; फायदेशीर; नफा देणारी. (जमीन, देश, व्यापार इ.) (राजा.)

गबान, गबानी न. स्त्री. किफायत; नफा; फायदा; लाभ. (राजा.)

गबारा पु. तलावाचा मध्यभाग.

गबाळ वि. निरूपयोगी; टाकाऊ : 'भोंवते मेळवूनि गबाळ ।' – तुगा १८१६. पहा : **गाबाळ**

गबाळ वि. पाणथळ. (गो.)

गबाळ, गबाळग्रंथ, गबाळणे, गबाळी, गबाळ्या पहा : **गाबाळ**

गबाळग्रंथी वि. वेंधळा; गोंधळ्या; गरीब : 'महाराष्ट्र साधा आणि गबाळग्रंथी आहे.' – इंप ९२.

गबेले न. घमेले; कोळंबे; लाकडाची पाटी (चिखल, चुना इ. वाहून नेण्याची). (को.)

गबॉ–ब्बा–बा, गब्बोटा पु. केळीच्या खुंटाची सोपटे. (गो. बे)

गब्बू वि. लठ्ठ व ठेंगणा; गुबगुबीत. पहा : **गबदूल.** २. (ल.) ऐपतदार; श्रीमंत; गबरू. ३. भरभराटीचे; श्रीमंत (शहर इ.). [सं. गर्भ]

गब्रा स्त्री. पिकावरील कीड. (ज्वारी, मका, ऊस इ. च्या गाभ्यातील.) [सं. गर्भ]

गब्रू वि. १. पठ्ठा; बहाद्दूर. पराक्रमी. २. सुंदर; तरुण. ३. गर्विष्ठ; खोटा; विद्वान; विद्वत्तेचा आव आणणारा. पहा : **गबरू** [हिं]

गभर स्त्री. तोफेचा एक प्रकार.

गभस्ति–स्ती पु. सूर्य : 'जैसा प्रगटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती ।' – ज्ञा २.२६१. [सं.]

ग(गं)भीर वि. १. खोल; अगाध (समुद्र, नदी) : 'विमल हृदय तुझें पोत गंभीर वारा ।' – मुरामा अयोध्या ५७. (हा शब्द बहुधा लाक्षणिक अर्थाने वापरतात.) २. शांत; सोशीक; भारदस्त; धीराचा. ३. विचारशील; विवेकी. ४. आतल्या गाठीचा; खोल मनाचा किंवा विचाराचा. ५. घन; भरदार; उद्दाम (मेष, सिंह, प्रवाह इ. चा ध्वनी.) ६. भयकारक; काळजी करण्यासारखी. [सं.]

गभीरतामापी पु. सागरतळाची खोली मोजण्याचे उपकरण.

गम पु. (क्व.) रोख; कटाक्ष; झोक; कल; अभिप्राय; पेच; धोरण; आशय (भाषण इ. चा).

गम पु. स्त्री. १. संयमन; कानाडोळा; क्षमा; दुर्लक्ष (अपराधाकडे). (क्रि. करणे, खाणे, येणे.) २. विराम; थोडे थांबणे; अवसान. (क्रि. खाणे.) [फा. गम = दुःख] (वा.) ० **खाणे –** धीर धरणे; क्षमा करणे; सोसणे; शांत राहणे.

गम पु. १. एक मलम; गमपलास. २. चिकटविण्याचा द्रव. [इं.]

गमक न. १. दाखला; पुरावा; कारण. २. आश्वासन; आश्रय; अंगीकार केल्याचा पुरावा; साक्ष; मंजुरी; आधार; प्रमाण; कसोटी. ३. खूप. वि. सूचक. [सं.]

गमक स्त्री. (संगीत) तान; ऐकणाऱ्याला आनंद वाटेल अशा तऱ्हेने स्वराला कंप देणे. [सं.]

गमक–का पु. १. तोरा; मिजास; चाळा; नखरा; डौल : 'नयनाचे हाणी भाले, चाले करीत गमके ।' – प्रला ११२. २. गर्व : 'इंद्रधनुष्याचा गमक । तृणतुच्छ म्यां केला ।' – वेसीस्व ४.९४.

गमकचाळिती वि. स्त्री. आलाप घेणारी : 'सर्व गमकचाळिती गानी : सरस्वती' – रुस्वन १०५.

गमखोरी स्त्री. १. गम खाणे; शांत राहणे; क्षमा करणे; सोसणे. २. गुन्हा; गुन्हेगारी : 'तथापि इकडून गमखोरी कोणे प्रकारे जहाली आहे हे तुम्हांस ठावकेच आहे.' – पेद २५.६

गमगिनी, गम्गीनी स्त्री. दुःख : 'हें ऐकून दिलास बहुत गम्गीनी व खपगी जाली.' – पया ४६७.

गमगीन वि. दुःखी; उदास : 'संध्याकाळचा ओझरता प्रकाश गमगीन आणि गंभीर असतो.' – स्मरण २५१.

गमजा, गम्जा पु. १. तोरा; ऐट; मिजास; अक्कड; गर्व; ताठा : 'संज्ञानीं सत्करूणेवांचुनि मतिचे न चालती गमजे ।' – मोविराट ६.१२०. २. थाटमाट; शृंगारिक नेत्रकटाक्ष; नखरेबाजी; मुरका; चोचला; तिरप्या दृष्टीने पाहणे; हावभाव; नटणे; फुगणे (छानछुकीचे); कामविकाराचे कृत्रिम प्रदर्शन; चाळे : 'तेहि ठाके ठुमके बहुतांपरि । गमजा उत्तम तियेचा ।' – स्वादि २.३.१७. ३. दिमाख; दांडगेपणा; चावटपणा; धिटाई; अमर्यादा (बायकोची नवऱ्याशी, मुलाची बापाशी, चाकराची धन्याशी इ.) बहुधा अनेकवचनी प्रयोग. ४. (सामा.) चोचले; चाळे; चेष्टा. [फा.] (वा.) ० **करणे –** १. दिमाख दाखविणे; गर्व करणे. २. मजेत असणे. (माण) ३. उच्छृंखलपणाने वागणे; चाळे करणे : 'गमजा करितां मनिं उमजाना, हें सुख न पुढे पडेल वजा ।' – राला ८५. ० **चालणे –** अमर्याद वर्तन खपवून घेणे. ० **न चालणे, ० न चालू देणे –** चाळ्यांना अवसर न देणे, नियंत्रण असणे.

गमजा स्त्री. आळस.

गमणूक स्त्री. रिकामे चाळे; खेळ.

गमणे अक्रि. १. आळसाने काम करणे; सुस्तपणाने किंवा हळूहळू काम करणे; निरुत्साहाने, रेंगाळत जाणे; खेळणे; घुटमळणे; रखडणे; रमत रमत फिरणे. २. मजेने वाटेल तसा वेळ घालवणे. [सं. गम् = जाणे]

गमणे अक्रि. १. शोभणे; पसंत पडणे; आवडणे : 'तशी न यमुना गमे जशि गमे निलिंपापगा ।' – केका १०८. २. दिसणे; वाटणे; आढळणे : 'कर्णवध क्षितिपाच्या चित्तास गमे क्षणक्षणी लटिका ।' – मोकर्ण ६.१. काव्यात गमिजे असे रूप आढळते : 'ज्ञानें ज्ञेय गमिजे ।' – ज्ञा ४.१४१. ३. बरे वाटणे; चैन पडणे; करमणे : 'म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे ।' – तुगा २३. ४. काळ काढणे; राहवणे; कंठणे. [सं.]

ग(गं)मत स्त्री. १. सुखासमाधानाचे कालक्रमण; चैन. २. करमणुकीची, चैनीची वस्तू, विषय, व्यापार, साधन. [सं.]

गमत न. गाबड्यावाटे किंवा गलबताच्या तळच्या फळ्यांच्या सांध्यातून आत (गमताडात) आलेले पाणी. (को.) पहा : **घमत** (को.)

गमत–डी; गमताड–डी स्त्री. १. गमत साचण्याची गलबतातील जागा. २. गमत; गलबतातील गाळ पाणी.

गमतरमत क्रिवि. आळसत खेळत; रखडत; रेंगाळत; घुटमळत; गुंगत;

हळू हळू (जाणे, येणे, खाणे, काम करणे.). (प्र.) रमतगमत.

गमती–त्या वि. करमणूक, मनोरंजन करणारा; विनोदी; दुसऱ्याचा काळ सुखाने जाईल असा हास्यविनोद करणारा. (माणूस, व्यक्ती, प्रसंग.)

गमतीदार वि. मजेदार; विनोदी.

गमदसडा, गमदासडा, गमदासरा वि. खेळणारा; खेळ्या; चाळे करणारा; रेंगाळणारा; रखडणारा; आळसाने, सुस्तपणाने काम करणारा.

गमन न. जाणे; हलणे; जाण्याची क्रिया; प्रयाण. [सं.]

गमनयोग्यता स्त्री. (शाप.) गति प्राप्त होण्याचा धर्म.

गमनागमन न. जा–ये; येरझार; वारंवार जाणे – येणे. [सं.]

गमनी वि. १. (शिवी) लुच्चा; सोदा; गुलाम; हरामखोर; दगलबाज. २. मात्रागमनी; आईच्या खाटल्यावर जाणारा. [सं.]

गमनीपण न. मात्रागमनीपणा; कपटीपणा; नीचपणा : 'वोडसेकर राजे हाटेसिंग सरदारांनी स्थापिले होते. यास अष्ट भया याचे भाऊबंद यांणी गमनीपण करून राज्यात न दबता....' – पेद २९.२३०.

गमनीय वि. १. जायला, पोचायला योग्य, गम्य; जायला सुलभ. २. आक्रमण्याजोगे. ३. सुघड; सुगम; साधण्याजोगे; प्राप्य; संपादनीय.

गमला स्त्री. फुलझाडाची कुंडी. (काशी)

गमवड बरे न वाटणे; न करमणे. (व. घाटी)

गमविणे, गमावणे, गमाविणे अक्रि. (ल.) नायनाट होणे; मरणे. उक्रि. हरविणे; पाडणे; हरपणे; सांडणे; उधळणे; घालवणे. (वस्तू, वेळ, प्रकृती) : 'स्वयं बोधा क्रीडावेळु । गमवीतु असे ।' – ऋ ७७; 'कां रे गमाविल्या गाई ।' – तुगा १८८. [सं. गम् = जाणे]

गमावा वि. चालून जाण्याचा, आक्रमण करण्याचा (मार्ग) : 'नाना उदितें दिवाकरें । गमावा मार्गु दिठी भरे ।' – ज्ञा १७.१७८. [सं. गम्]

गमावू–ऊ वि. घालविणारा; हरविणारा : 'आलें हें नांव गमाऊं ।' – संग्रामगीतें ८२.

गमासीस पु. (फळझाडात–पपनस, मोसंबी) डिंक येण्याचा रोग.

गमी स्त्री. १. शोक; दुःख : 'गमी करून कोणास न बोलतां दाखल जाले.' – मइसा ७.१४२. २. दुखवटा : 'वस्त्रें गमीचीं..' – मइसा ७. [फा. गम]

गमेल न. घमेले; पाटी; पहा : **गबेले**

गम्य वि. १. गमनीय; जाण्याजोगे किंवा जाण्यायोग्य; सुलभ : 'तेथ आम्हा नेईं सामर्थ्यें तुज खगा असे गम्य ।' – मोआदि ४.९५. २. (शब्दशः व ल.) मिळण्याजोगा. ३. प्राप्य : 'ऐसें अगाध माहात्म्य । जें सकळमार्गैंकगम्य ।' – ज्ञा ११.७३. ४. जाणण्यासारखा; समजण्यासारखा; सुलभ. समासात ह्न अनुमानगम्य, अभ्यासगम्य, म्हणजे अनुमान, अभ्यास इ. नी समजण्यास योग्य (आहे किंवा होते.). न. प्रवेश; परिज्ञान; परिचय; ज्ञान; माहिती. (क्रि. असणे.)

गम्यमान वि. ज्ञेय; जाणण्याजोगे.

गय स्त्री. १. माफी; क्षमा. २. उपेक्षा; दुर्लक्ष; हयगय. (वा.) ० **करणे** – १. चूक, अपराध माहीत असूनही दुर्लक्ष करणे; क्षमा करणे; दया दाखवणे : 'पोराबाळांचे नाव काढलेस म्हणूनच एक वेळ गय केली.' – भाबं ६२. २. सूट देणे : 'इतके दिवसाची मला गय करा म्हणजे झालं.' – मस्थि २३९. ३. झोपी जाणे.

गयगोळा पहा : **गईगोळा**

गयतमयत, गयामयत, गयामत वि. मेले गेलेले; नाहीसे झालेले : 'दरम्यान सरंजामदार लोक गयतमयत होत गेले.' – इनाम ३६. [सं. गत + मृत]

गयफ वि. गैब; गुप्त : 'भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कैसी जाली.... गयफ जाले किंवा अकस्मात गेले....' – भाब १२०. पहा : **गायब** [अर. गइब]

गयबान्या वि. बावळट. [व.]

गयरव, गहिवर पु. विवाहातील निरोपाचा समारंभ.

गयवडा पु. दैन्य; दीनवाणी स्थिती : 'मागा तो यदुरावडा गयवडा नाशील त्या आवडा ।' – आसु ५.

गया पु. गळा : 'मायबाई मना संसार घटना । गयाना चंद्रहार एक दागिना ग मना ।' – शके ३०१.

गयाराम पु. एक राजकीय पक्ष सोडून स्वार्थ, भांडण इ. कारणांनी दुसऱ्या पक्षात जाणारा.

गयाल–ळ–ळी वि. १. बिनवारस. २. पडीक; सोडलेली; टाकलेली (मिरास, वतन, जमीन, घर) : 'गांव गयाळी पडलें.' – थोमारो २.१६५. ३. परागंदा; देशोधडी झालेला (मनुष्य, कुटुंब). (राजा) ४. बेपर्वा; भिकार; नालायक. ५. अजागळ; गचाळ; बावळा; गाईसारखा भित्रा; गरीब; गबाळ : 'गयाळाचें काम हिताचा आवारा ।' – तुगा ३१२८. ६. ज्याला स्वतःला ज्ञान नाही व सांगितलेले समजत नाही असा; मूर्ख; गैदी; खुळा; भोंगळसुती; अव्यवस्थित; गोबरागणेश (मनुष्य). ७. अयोग्य; घाण; फुसकी; वाईट (वस्तू.). [सं.]

गयाली वि. गाव सोडून गेलेले – बदलापूर ३८७.

गयावया स्त्री. क्षमेची याचना; विनवणी; प्रार्थना; आराधना; काकुळती; करुणा भाकणे. (क्रि. करणे.)
क्रिवि. अति लीनतेने; करुणास्पद रीतीने; अजीजीने; दीनवाणीपणाने.

गयावर्जन न. (अप.) गयावर्दन, गयावर्धन; गयेला जाऊन करायचे पिंडप्रदान व तीर्थश्राद्ध : 'पितर उद्धरावे आपण । गयावर्जन करोनियां ।' – एभा २३. ३७८. [सं.]

गयावळ पु. १. यात्रेकरूंची तीर्थयात्रा करविणारा भिक्षुक, पंड्या; पुजारी : 'गयावळ ते गंगेचे । गंगापूतें ।' – दावि ४७४. २. (ल.) आचारविचारहीन, भ्रष्ट माणूस; धर्मशास्त्राप्रमाणे न चालणारा; मलिन; आचारहीन भिक्षुक, भट. ३. निष्ठुर माणूस. (गो.) ४. (ल.) लोचट.

गयावळ, गयापुत्र पु. १. चिक्कू; घालवेडा, वेड पांघरलेला मनुष्य. २. बावळट. पहा : **गयाळी**

गयाळ बालक.

गयेंदी स्त्री. चिखलामध्ये असणारी टोकदार तोंडाची मासोळी.

गय्या वि. मूर्ख; अडाणी. पहा : **गयाल** ६ (गो.)

गर पु. गाभा; दळ; गीर; मगज (फळातील). [सं. गृ, गर्भ]

गर पु. भिरकुंड; खोबरे; भेंड; सत्त्व.

गर अ. फारसी प्रत्यय. कर, कार, करणारा या अर्थी. उदा. सिकलगर, बाजीगर. [फा.]

गर पु. न. (ज्यो.) अकरा करणांतील पाचवे करण.

गर पु. न. विष; हलाहल. [सं.]

गर स्त्री. १. घोड्याच्या छातीतील, घशातील किंवा मानेवरील एक रोग अथवा खाज. (क्रि. भरणे.) २. खरारा न केल्यामुळे घोड्याच्या अंगावर जमलेला मळ.

गरऊ पु. गर्व; ताठा : 'वैकुंठा गरऊ खांडविला ।' – शिव ३१७.

गरक् पु. गळ.

गर(ड)क वि. १. गर्क; मग्न; विमग्न; बुडालेले (जलादिकामध्ये). २. चिंतनात निमग्न; गढलेला; गुंतलेला; विचारात चूर. ३. (ल.) निमग्न झालेला; तल्लीन; ग्रस्त; आसक्त; वाहिलेला. ४. गाढ; गडद; घोर (झोप). ५. हरवलेला; अदृश्य; नाहीसा झालेला; गडप; नायनाट झालेला; नष्ट; मृत. [फा. गर्क्] (वा.) ० **करणे –** खाणे; गिळणे; दगलबाजीने अपहार करणे. (ठेव इ.)

गरकणे अक्रि. १. लवकर मुरणे; भिनणे; आत शिरणे. २. दचकणे; बुजणे; घाबरणे; गोंधळणे.

गरकन–र, गरदिशी, गरकंडा, गरकांडा–डी, गरकी, गरगंडा पहा : **गिरकन इ.**

गरका पु. १. घेर; वेढा; परीघ. २. घेरणे; वेढा घालणे; गराडा. ३. वाटोळा, मंडलाकार फेरा; गरगरा फिरकी; गिरकांडी; चक्कर; घिरटी; प्रदक्षिणा. (क्रि. घालणे, घेणे, मारणे, बसणे.) : 'मग परमस्नेहाचा खुंट उभवोन। गरके घालिती त्यासवें ।' – नव २४.१५५. ४. (ल.) घोटाळा; गुरफटा; गूढ; घोळ. ५. शेंडीभोवतालचा घेरा. ६. शेतातील नादुरुस्त, पडीत, वाटोळा जमिनीचा तुकडा. [अर. गर्क्]

गरकी स्त्री. गरगर फिरणे; गिरकी : 'त्या गरक्यांच्या झपाट्यात त्यांची वसंतमाधववर नजर ठरेनाशी होऊन....' – मंजु ५६.

गरकू–खी स्त्री. कांबीला लहान लाकडाचा तुकडा बांधून करतात ती आकडीसारखी काठी (फळे इत्यादी काढण्याची). (को.)

गरकी पु. दाटी; गर्दी. (कु.)

गरको पु. स्त्री. एका जातीचा लसूण. याला दर्प कमी असतो.

गरगच्चा पु. गलबला; गोंगाट. (सामा.) आरडाओरडा; गवगवा. पहा : **गरगशा.** [ध्व.]

गरगट–ड–टा–डे पु. न. १. एकत्र वाटलेल्या किंवा उगाळलेल्या अथवा कढवलेल्या पुष्कळ प्रकारच्या औषधांचे सरबरीत मिश्रण; बाळंतिणीचा काढा; दाट मिश्रण. २. भाकरीसाठी दाट आमटी इ.; भाजीपाला, डाळ, पीठ यांचे सरबरीत मिश्रण; कालवण. ३. (थट्टेने) अतिशय पाणी राहून पचपचीत बनलेला भात किंवा इतर खाद्यपदार्थ. ४. खाली उरलासुरला सरबरीत गाळसाळ (औषध, काढा, इत्यादिकांचा). ५. तंबाखूवर पडणारा एक रोग. ६. औषधी, मसाला इ. वाटण्याचा, खलण्याचा दगडी खल; उखळ.

गरगटणे उक्रि. १. (दगडी खलात) खलणे; घोटणे; उगाळणे; चूर्ण करणे; वाटणे. २. गरगटाने (शेण, माती व पाणी यांच्या मिश्रणाने) सारवणे; पोतेरे घालणे; शेणमाती इ. नी. लेपाटणे. ३. चुलीवर शिजत असलेला पदार्थ ढवळणे; आटविणे; घाटणे. (माण.)

गरगटा पु. आरडाओरडा; गोंगाट : 'कुत्री चाहूल घेत आणि भुंकून गरगटा करीत.' – काआ ५४.

गरगडा पु. १. गोंधळ; घोटाळा; गर्दी; गडबड; अव्यवस्था; अंदाधुंदी (स्वयंपाक, लग्न, देणेदार, काम इ. ची). २. पहा : **गरगट १**

गरगर क्रिवि. १. चक्रासारखे सभोवती; मंडलाकार होईल असे; गिरकीत; फेरात (फिरणे, भोवंडणे) : 'चित्र गदा महोग्रा गरगर फिरवूनि सोडिली जे गा ।' – मोकर्ण ९.२६. २. अति त्वरेने; उठाउठी; भराभरा (मूल किंवा रोप यांची वाढ). [सं. गरगर]

गरगरणे अक्रि. १. गिरकांड्या घेणे; भोवती फिरणे. २. घेरी, भोवंड येणे. (मस्तकात). ३. झपाट्याने, गच्च, उफाड्याने वाढणे; फोफावणे (झाड).

गरगरा पु. १. गिरकांडी; भिरकांडी; भोवरा; गोल – गोल २. (ल.) कामाचा घोटाळा; गोंधळ. (क्रि. करणे, घालणे, पडणे.)

गरगराट पु. जोराची गिरकांडी; घेरी; फेरा : 'फांसे फिरती गरगराटे ।' – मुसभा १४.४०.

गरगरीत वि. (याच्या मागे किंवा पुढे वाटोळा हा शब्द जोडून अतिशयत्व दर्शवितात.) १. अगदी वाटोळा; भरीव व वाटोळा. २. मोठे गोल व सुंदर (डोळे); टपोरे.

गरगशा पु. १. गोंधळ; आरडाओरडा; कल्ला; गर्जना करून हल्ला करणे किंवा भोवती गर्दी करणे. २. त्रासदायक किंवा घोटाळा करणारा गलका, गवगवा; ओरड. ३. त्रास; उपद्रव; अव्यवस्था; त्यामुळे झालेला घोटाळा. (क्रि. घालणे, पडणे, होणे.) : 'मसलतीच्या प्रसंगाचा गरगशा आहे.' – पया ८५. ४. अव्यवस्थित कामकाज, धंदा; घोटाळ्याचा कारभार. पहा : **गडगच्चा**
न. तंटा; भांडण : 'तुरकाचे कांहीं गरगशा जहाले नव्हते.' – अभिं ६. [फा.]

गरगस्त–स्ती स्त्री. संकट; दुर्दशा. (व.)

गरगा पु. खाच; खड्डा; खळगा.

गरगूट न. भाताची एक जात. (गो.)

गरगोट न. चिंचेचा दाट पदार्थ. पहा : **गरगट** (व.)

गरगो(गु)टी स्त्री. मान; मानगुटी. (धरणे, आवळणे, दाबणे, बसणे इ. क्रियापदांबरोबर योजतात.)

गरज पु. मोत्यातील नर दाणा.

गरज स्त्री. १. पर्वा. २. जरुरी; आवश्यकता : (कोणत्याही वस्तूची इ.) उणीव; अडचण; चणचण. ३. ओढ; ताण; निकडीची आवश्यकता; जरूरीचा प्रसंग किंवा इच्छा. ४. हक्क; प्रयोजन : 'सुंदरतुकदेव यास कवळा करावया गरज काय?' – मइसा १५.७१. [फा.] (वा.) ० **करणे –** १. चालवून घेणे; गुजराण करणे; कसातरी निर्वाह करणे. २. हेळसांड, चालढकल करणे; कसेतरी रेटणे. ३. एखाद्याची अपेक्षा, निकड, उणीव पुरविणे. ४. (आपली साधने, शक्ती) हात राखून खर्चणे, शिल्लक टाकणे; बचत करणे; आपल्या आटोक्यात, ऐपतीत आटोपणे.

गरज १. छाती. २. हिंमत,संधी.

गरजगी–गो वि. स्वार्थाने प्रेरित होऊन बोलणारा; गरजेपुरता हांजीहांजीखोर; मतलबी : 'गरजगी लोकांनीं मनास येईल तसें नबाबास

समजाविलें.' – मइसा ६.३५७. [फा.]

गरजणी स्त्री. गर्जना; गरजण्याची क्रिया. [सं. गर्जना]

गरजणे अक्रि. १. जरूर असणे; अपेक्षा, अडचण, कारण असणे.

गरजणे अक्रि. अकर्तुक. १. गर्जना करणे; गडगडणे; धडधडणे. २. (ल.) गर्जना करणे; मोठ्याने ओरडणे; डुरकणे; आरोळी मारणे. (तोफ, वन्य पशु यांनी) : 'गरजला गजराज घनारवें ।' – र ५७. ३. गाजणे; दुमदुमणे; घुमणे; प्रतिध्वनी करणे, होणे. [सं. गर्ज]

गरजणे अक्रि. खर्च करणे. (गो.)

गरजमतलबी वि. स्वार्थसाधू : 'आम्ही उत्तर चांगले करून दाखवूं, याप्रमाणे वल्गना करितात, गरजमतलबी मोठे आहेत.' – नाग १.२०२.

गरजवंत वि. अडलेला; जरूरी असलेला; गरजू.

गरजसाधू वि. आपले हेतू साधण्याविषयी तत्पर; आपली गरज झाली की पुरे असा; स्वार्थी; अप्पलपोट्या.

गरजिणे सक्रि. गरज भागविणे, जिरविणे. (गो.)

गरजी–जू पु. १. पहा : **गरजवंत.** २. आपले श्रम वाचवणारा, वर वर किंवा उपराटपरी काम करणारा; बेताबेताने श्रम करणारा; अंगचोर. वि. ज्याला जरूरी आहे असा.

गरजेचा–ची वि. फक्त गरज भागवणारा; जरूरीपुरती; कामचलाऊ; कशीबशी : 'गडाची इमारत गरजेची करूं नये.' – मराआ ३०.

गरड पु. मोठ्याने केलेला आक्रोश. (गो.)

गरडगप क्रिवि. पुरल्या जाण्याच्या – गिळल्या जाण्याच्या – हरवल्या जाण्याच्या – चुकल्या जाण्याच्या स्थितीतील; गडप. [सं.]

गरडणे क्रि. नाहीसे करणे.

गरडा पु. १. हलकी ढेकर; गरढई. २. घरघर; श्वास (मरणोन्मुख प्राण्याचा).

गरढई, गरडई स्त्री. अजीर्णामुळे पोटातील वायू ऊर्ध्वगत होऊन घशाशी येणारा जलांश; घशाशी येणे; उचकी. (क्रि. येणे, लागणे.)

गरत, गरती स्त्री. संभावित, मर्यादशील, कुलीन स्त्री (सवाष्ण किंवा विधवा); अव्यभिचारी, पतिव्रता स्त्री. 'ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची ।' – तुगा २९६. [सं. गृहरत, गृहवती] [क. गरति]

गरता–दा स्त्री. १. गर्ता; खड्डा; खाच. २. (ल.) पोट (क्रि. भरणे.).

गरतावा पु. घरंदाजपणा; कुलीनता; मर्यादशीलता : 'गरतीचा गरतावा चुलीप पारखावा ।' – लोसामा २ संलो २२. [सं. गृहरत, गृहवती]

गरद वि. दाट; गर्द. पहा : **गडद**

गरद न. धुरळा; गरदा : 'गरद बहुत उठला.' – मइसा १.६४. [फा. गर्द]

गरद न. एक प्रकारचे रेशमी कापड.

गरदट, गरधट वि. मनस्वी; अविचारी; बेपर्वा. पहा : **गळदट**

गरदणे क्रि. भयभीत होणे; गांगरणे; भ्रांती पडणे.

गरदन, गर्दन स्त्री. मान; गळा. [फा.

गरदा पु. १. गर्दी; दाटी. २. धूळ; धुरळा. (व.) [फा. गर्द]

गरदा, गर्दा पु. १. वाळलेली व चुरलेली तंबाखूची पत्ती; जर्दा; गांजा इ. २. गांजाच्या काढ्याचा उरलेला भाग, गाळसाळ.

गरदुड, गरदोडा पु. खड्डा; खाच. (व.) [सं. गर्ता]

गरनळा, गरनाळ–ल पु. स्त्री. मोठी तोफ; कुलपी गोळ्यांची तोफ. हिचा आकार लाकडी उखळीसारखा असतो : 'गरनाळा भर गोळ्यांचा भार।' – ऐपो ११३. [हिं.]

गरनाळी स्त्री. फार मोठे गोळे टाकणारी तोफ : 'दक्षिणेकडील अंगानें गरनाळी तोफ चालू झाली.' – माप्र ७२.

गरपीडित वि. कृत्रिम विषाची बाधा झालेला.

गरफळ न. कठीण कवचाचे फळ.

गरब पु. फळातील मगज. (कु.)

गरब पु. लाकडाचा किंवा तलावाचा अंतर्भाग.

गरबखिळी स्त्री. (नाविक) जांगीत उभे केलेले नाडवळ अढळ होण्यासाठी जांगीतून व नाडवळाच्या नेढ्यातून पार नेलेला लोखंडी खिळा.

गरबगीळ क्रिवि. गर्भगळित; घाबरी; हताश : '..... या दोघींच्या दामदाटीनं ती गरबगीळ होऊन बसली.' – जामो ५२५.

गरबरणे अक्रि. पोटात गुरगुरणे; गुडगुडणे; पित्तादिकाने वांती होण्याजोगे ढवळणे. [ध्व.]

गरबा पहा : **गर्भा**

गरबीण स्त्री. (सुतारी) सरळ रेष काढण्याचे हत्यार.

गरबीन वि. गरोदर : 'पईल्यानं गरबीन खाऊ वाटली पपई ।' – राके २९४.

गरम वि. १. उष्ण; ऊन. (शब्दशः व ल.) २. कडक; तिखट; रागीट. ३. लोकरीचे उबदार (कापड इ.). ४. दाट. (बातमी इ.) : 'डेरेदाखल होतात म्हणून आवई गरम होती.' – मइसा १.५४. ५. रुष्ट; संतप्त. ६. तेजीचा (बाजार). ७. पैशाची ऊब असणे; जवळ पैसा असणे. [फा. गर्म] (वा.) ० **होणे –** रागावणे; संतापणे.

गरम गाठ; ग्रंथी; घट्टा.

गरमणे अक्रि. गरम होणे; राग येणे : 'पंडिताबाईंचे तें त्राग्याचे स्वरूप पाहताच भाऊसाहेबांची वृत्ति थोडी गरमली....' – कर्मयोग १५८.

गरमनरम वि. १. फार ऊन किंवा थंड नाही असे. (वस्तू इ.) २. (ल.) कडक व सौम्य; निष्ठुर व दयाळू; कधी कडक व कधी शांत (मनुष्य, स्वभाव, भाषण.). ३. नवे जुने; उत्तम मध्यम; चांगले व सामान्य.

गरमबाजारी स्त्री. १. फार मागणी; भारी किंमत; व्यापारातील तेजी. २. श्रीमंत होण्याची संधी साधणे : 'मध्यस्थ लोकांनीं गरमबाजारी करून....' – दिमरा २.२८२. [फा.]

गरममसाला पु. १. भाजीला घालण्याचा धने, हळकुंड, दालचिनी, हिंग इ. चा कच्चा मसाला. २. उष्ण व शक्तिवर्धक औषध, मसाले. [हिं]

गरमर–ल न. माईनमूळ. यांचे झाड दोन फूट उंच असून पानांना मसाल्यासारखा तिखट वास व रुची असते. मूळ लोणच्यात घालतात.

गरमा पु. उकाडा; उष्मा; कहाली; तलखी. पहा : **गरमी** [फा. गर्मा]

गरमाई स्त्री. वितुष्ट; तंटा : 'भिन्न इतिहासांच्या लोकांत केव्हां केव्हां थोडीबहुत गरमाई उत्पन्न झाली तर....' – आगर ३.१८५.

गरमाई स्त्री. उकाडा : 'हवेचा वाढलेला दाब व गरमाई अंगाचे पाणी पाणी करीत होती.' – पडरे १.

गरमागरम वि. १. फार उष्ण; ऊनऊन; कढत. २. (ल.) जोरदार; चिडून केलेली (चर्चा.)

गरमागरमी स्त्री. १. उष्णता; संताप; राग; क्षोभ. २. (ल.) जोराचे भांडण.

गरमी स्त्री. १. उष्णता; ऊब; उकाडा : 'दाटली दिव्याची गरमी सदनांतरी।' – प्रला १००. २. (ल.) अंगाची तलखी; काहिली; आग; ताप; रोगाची उष्णता. ३. राग; क्षोभ. ४. उपदंश; फिरंग रोग; गर्मी. [फा. गर्मी]

गरमी स्त्री. ईर्षा; महत्त्वाकांक्षा.

गररर क्रिवि. जोराने गरगर फिरणाऱ्या वस्तूच्या आवाजाप्रमाणे. [ध्व.]

गरल न. काळकूट; हलाहल.

गरवणे सक्रि. गळ टाकून मासे पकडणे; वेचणे. (को.कु.)

गरवस, गरवा वि. १. उशीराने पिकणारा; मागस (धान्य, पीक). (को.) २. महान. [सं. गुरू, गरीयस्]

गरवा, गेरवा पु. पिकांवर पडणारा एक रोग.

गरवार, गरव्हार वि. गरोदर; गर्भार : 'झालों गुरूदर जशा अत्यासन्नाप्रसूति गरवारी ।' – मोवन ८.३७. [सं. गर्भार]

गरवारशी हळकुंड बाजूला लहान कुडी अथवा कोंब फुटलेले हळकुंड.

गरवी अंबणी, गरवी शेत गौरी नाचणीची एक जात.

गरशी पहा : **गरम**

गरस स्त्री. मोठे, कठीण, टणक व तोंड नसलेले गळू, गाठ : 'दोन्ही खांद्याला दोन्ही घट्टे बांधल्या गरशी ।' – पला ८० : 'उरी उसासले गेंद लहान गरसा ।' – सला ७.

गरसळी, गरसुळी, गरसोळी स्त्री. १. गळसरी; गळ्यातील एक दागिना; काचेचे किंवा सोन्याचे मणी व मध्ये पुतळी असलेली माळ : 'तोडून गरसुळी फोडून हातचीं कांकणे ।' – ऐपो ११६. २. मंगळसूत्र : 'मंगलराज गरसळी ।' – वेसीस्व १०.८४. – (तंजा)

गरळ स्त्री. १. आस्था. २. छंद; नाद.

गरळ–ल न. विष; जहर; हलाहल : 'गरळा जें वमी मुखें ।' – ज्ञा ६.२४१.

स्त्री. १. साप, पाल इत्यादीच्या तोंडाचा विषारी फेस (गवतावर पडणारा). २. लाळ; तोंडाला सुटलेले पाणी. (क्रि. येणे.) [सं.] (वा.) ० **ओकणे –** द्वेषपूर्ण बोलणे किंवा लिहिणे : 'वृत्तपत्रांच्याद्वारे गरळ ओकले जात होते.' – निज २२८.

गरळा पु. १. काही औषधी किंवा वनस्पती विड्यात घालून चावून त्यांचा काढलेला रस (तान्ह्या मुलाला खोकला, हगवण इ. प्रसंगी आई देते तो) : 'ते माय देते गरळा तयाला ।' – सारुह १.५४ (क्रि. घालणे.) २. (ल.) लाच; मूठदाबी. (क्रि. देणे.)

गरळा पु. भात, वरी इत्यादिकांच्या लोंबीच्या देठाजवळचा भाग. (को.)

गरळी स्त्री. अजीर्णाने पोटातून घशात येणारे पाणी, अन्न इ.; घशाशी येणे. (क्रि. येणे, आणणे.) (वा.) **जेवू घालून गरळ्या आणणे –** अति आग्रह करणे; एखाद्या गोष्टीचा अतिरेक करणे.

गरंगाटा पु. पट्यापट्याचा, करकऱ्यासारखा एक मासा (गो.).[सं. गर्गाटा]

गरंगील वि. लाजरा; गायतोंड्या; भेकड; गरीब; गोगलगाय. (राजा.)

गरंडेल पु. एक प्रकारचा फटाका (आतषबाजीतील). (कु.)

गरा वि. गरवस. पहा : **गरवा** [सं. गुरू]

गरा पु. १. फळाचा गर असलेला फणसातील भाग; आठळी भोवतालचा विशिष्ट खाण्याचा अंश. 'जसे बरे गरे बहु कपी भट ।' – मोसीतागीत १४१. २. दाणेदार कणीक, रवा. ३. उसाचा करवा; गंडेरी. (कर.) [सं. गृ, गर्भ]

गरा, गराठी पु. मासे धरण्याचा गळ; गरी : 'जैसा धिवरू मिनाचेआं मुखांतु । ऐंस मांशे घाली आंतु । गरेआ झोंबता वोडोनि घेंतु । प्राणु तेयाचा ।' – क्रिपु ५३५.

गरागर–रा क्रिवि. वाटोळे, गिरकीत, वर्तुळात (फिरणे, गुंडाळणे.). पहा : **गरगरा**

गरागर्धा पु. गोंधळ; गर्गशा; कटकट : 'दाभाडीकडील गरागर्धा पडला आहे.' – पेद ३३.१७५.

गराज पु. लोखंडी किंवा लाकडी गज; कांब; कठडा (जाळी, खिडकीतील). पहा : **गराद–दा**

गराज न. गॅरेज; मोटर, गाडी इ. ठेवण्यासाठी केलेली स्वतंत्र खोली : 'एका कोपऱ्यात गराज आहे.' – स्वगत १४. [इं. गॅरेज]

गराटा पु. दरारा; दपका; बाण वेगाने जात असताना होणारा आवाज : 'त्या बाणांच्या गराट्याने 'मल्हार आया' या दहशतीनें पुरुषमात्रानें बायको सोडून दिल्लीचा रस्ता धरला.' – होकै १९.

गराठी स्त्री. गरखी; आकडी (दुबेळक्याची, शेवटाला आकडा असलेली, फळे तोडण्याची). (को.)

गराड न. जोराची वावटळ; झंझावात; वादळ. (व.)[हिं. गिर्द, गिर्दबाद]

गराडगप पहा : **गरडगप**

गराडणे अक्रि. झाडे इत्यादी तोडणे. (व.)

गराडा पु. १. घेरा; वेढा; सैन्याची टोळी (वेढा घालणारी). २. वेढा घालून बसणे. (क्रि. घालणे, देणे, पडणे.) ३. सभोवती झालेली गर्दी. ४. कुंपण; आवाराची गोलाकार भिंत; तट : 'त्या टेकाडावर रचलेला गराडा ढासळला होता.' – वारी २१४. ५. कोंडमारा.

गराडा पु. विहिरीतून पाणी काढण्याची गोल तरफ.

गराडा पहा : **गरादा, गराज**

गराडी स्त्री. १. (रस्त्यावर पडलेली गाडीची) चाकोरी : 'चेंडू गाडीच्या अरुंद गराडींत असला म्हणजे....' – कुबडीचेंडू (बडोदे) १३. २. चुन्याच्या घाणीचे चाक फिरण्यासाठी केलेला गोल खड्डा; घाणी.

गराडी स्त्री. १. झाड. २. टेंभुर्णीची काठी.

गराद–दा स्त्री. पु. गज; कांब : 'ती एक भल्या मोठ्या गरादा लाविलेली खिडकी होती.' – सूर्योदय १०२. पहा : **गराज** [पोर्तु. ग्राद]

गरादी स्त्री. चुना तयार करण्याची घाणी.

गराना पु. व्यर्थ वटवट; तक्रार.

गरारणे अक्रि. मोठा आवाज करून भोवताली फिरणे; गिरक्या घेणे.

गरारणे अक्रि. जलदीने भिजणे, मुरणे, जिरणे.

गरारणे अक्रि. १. उफाड्याने, जोराने अंकुर फुटणे, फोफावणे. (पीक, झाड); जोमात किंवा ज्वानीत येणे; रसरसणे (फळ, तरुण स्त्री) : 'गोल शरीर चहुंकडून तसें दिसंदिवस बाई गरारतें ।' – प्रला १४२. २. गोलदार, वाटोळे होणे.

गरारणे अक्रि. एकाएकी, सपाटून घाबरणे.

गरारा क्रिवि. गरगरा; वाटोळे; चक्राकार (फिरणे, गुंडाळणे, लोळणे.).

गराळ वि. गर असलेले : 'ऋतूद्भव गराळ फळेंहि खावी.' – पुरु. नोव्हें ३९.

गरांडी स्त्री. करपट ढेकर; उचकी. पहा : **गरळी**

गरांव पु. अर्धगुंज (वजनी माप). (गो.) [इं. ग्रेन]

गरिबगैबती वि. गरीबगुरीब : 'पहाता जाई दिपुन गरिबगैबती ।' – ऐपो २९०.

गरिबाई स्त्री. १. गरिबी; कंगाली; लाचारी; पराधीनता; दैन्य. २. शांतपणा; सात्त्विकपणा; थंडपणा (स्वभावाचा). [फा.]

गरिबी स्त्री. १. दारिद्र्य; पैशाची कमतरता. २. रंकपण; नादारी. ३. (ल.) सात्त्विक वृत्ती; नम्रता; शांत स्वभाव; गरीबपणा. [फा.]

गरिबीहरिपी स्त्री. १. दारिद्र्य व श्रीमंती. २. नीचता व मोठेपणा.

गरिमा पु. १. भारदस्तपणा; गुरुत्व; गांभीर्य. २. मान्यता; थोरवी; श्रेष्ठत्व; मोठेपणा : 'गरिमेतें अंगाकडे । येवोंचि नेदी ।।' – ज्ञा १३.१८८. ३. (ल.) पुष्टपणा. ४. अणिमादी अष्टसिद्धीतील तिसरी सिद्धी; शरीर वाटेल तेवढे मोठे करण्याची सिद्धी. ५. मोठेपणा; प्रचंडता : 'प्रतापगरिमा पाहे माझा ।' – भारा किष्किंधा ३.६५. [सं.]

गरिमान पु. मोठेपणा : 'ईच्या नितंबा गरिमान यावा ।' – सारुह २.५४. पहा : **गरिमा**

गरिष्ठ वि. १. फार किंवा अतिशय जड; अवजड. २. भव्य; अपरिमित; जबरदस्त; अति वजनदार. ३. प्रौढ; प्रतिष्ठित; संभावित. [सं.]

गरी पहा : **गरा, गराठी**

गरी स्त्री. फणसातील लहान गरा. (को.)

गरी स्त्री. कडब्याच्या पंचाहत्तर ते ऐंशी पेंढ्या उभ्या केलेली गंज. (व.)

गरी वि. भाजी वगैरेंची उशीरा येणारी जात; गरवी.

गरीतोड क्रिवि. ताबडतोब; लवकर; एकदम.

गरीफदारी स्त्री. गुंता; बंधन; अडचण : 'या गरीफदारीत सा महिने गेले आणखी किती दिवस जातील पहावें.' – पेद १८.८९.

गरीब वि. १. दरिद्री; कंगाल; द्रव्यहीन. २. शांत; निरुपद्रवी; सात्त्विक; थंडा; पामर; बापडा; केविलवाणा; सालस. ३. दीन; लाचार. [फा.]

गरीबखाना पु. (स्वतःच्या घराचा एक उपचार म्हणून विनयाने असा उल्लेख करतात.) गरिबाचे घर; झोपडी : 'माझ्या गरीबखान्यात रामूभय्यांचे पहिले स्वागत झाले ते असे.' – गणगोत १९७.

गरीबगाय वि. अगदी निरुपद्रवी; दीन; लाचार (मनुष्य.).

गरीबगुरीब, गरीबगुरबा पु. अव. वि. गोरगरीब; गरीब लोक (समुच्चयार्थी) : 'गरीबगुरबांचीं घरें बहुतेक वाहून गेली.'– मइसा ७.७०.

गरीबगोर वि. हीन; अनाथ; गरीबगुरीब; निराश्रित; असाहाय्य : 'औरंगाबाद सभोवते चोर राउतांनी उपद्रव फार मांडिला आहे. गरीबगोर मारले जातें.' – पेद २२.१०.

गरीबदारी स्त्री. चिंता; काळजी; विपन्नावस्था : 'सरदारी बहुत गरीबदारींत आहे.' – ऐलेसं ८११३.

गरीबनवाज, गरीबपरवर वि. दीनदयाळ; अनाथनाथ; गरिबांचा कनवाळू; गरीबांचा पालनकर्ता : 'गरिबनवाज माधवजीची दुरुनि द्वारावती देखियली ।' – अमृत ३०. धनी, मोठे लोक यांना अर्जदारांकडून ही पदवी लावण्यात येत असे. [फा.]

गरीबसार वि. लाचार; कंगाल; बापुडवाणा.

गरीर वि. उर्मट : 'थोरली बायको काहार गरीर असता....' – पेसाप ९५.

गरुइ वि. मोठी; श्रेष्ठ : 'अर्जुना हे गरुइ भक्ति । सांघितली तुज प्रति ।' – राज्ञा ९.२२७.

गरुग पहा : **गरग**

गरुड पु. १. एक पक्षिविशेष; हा चपळ, भव्य, सुंदर व पिंगट पिसाऱ्याचा, निर्भय, तीव्रदृष्टी व वेगवान असतो. म्हणून याला पक्ष्यांचा राजा (खगेंद्र) म्हणतात. २. गिधाडाची मोठी जात. [सं.] (वा.) ० **करणे –** बनवणे; फसवणे. (कु.)

गरुड पु. आखाडा; तालीमखाना : 'कीं गगन चित्रें गरुडीं घातलीं कर्पुर – चुरी चोखडी । सरावो द्यावया चहुबुडी ।' – नरुस्व ४९.५.

गरुड उडी लांबून धावत येऊन मारायची उडी.

गरुडघुबड न. अति मोठे घुबड. हे टर्की पक्ष्याएवढे असते.

गरुडझेप स्त्री. १. अचानक उडी; आकस्मित उड्डाण; गरुड जसा आकाशातून एकदम झेप घालतो त्याप्रमाणे आक्रमण : 'हिंदुत्वनिष्ठांच्या पक्षासारखा नवा पक्ष पुढे येण्यास अशीच गरुडझेप घ्यावयास पाहिजे होती.'–के १२.१२.१९३९. २. प्रगती.

गरुडनीळ वि. पाचूच्या वर्णाची.

गरुडपक्ष वि. दोन्ही कुशींवर दोन भोवरे असणारा (घोडा.) हा शुभदायक आहे. – अश्वप १.९१.

गरुडपक्षक (नृत्य) त्रिपताक हस्त एकमेकांत गुंतवून तळहात खाली नेणे.

गरुडपक्षी वि. दोन्ही बाजूंनी फासोळी कमी असलेले (जनावर). (व.)

गरुडपाच–चू; गरूडोद्गार पु. स्त्री. पाच नावाचे रत्न; राजनीळ : 'गरुडपाचूंच्या ज्योती पूर्ण । प्रभामय विराजती ।' – ह २.१६. [सं. गारुत्मत मणी]

गरुडयंत्र न. गरुडाच्या आकाराचे वाहन : 'तुज गरुडयंत्र करूनि देईन.' – पंचो ३०.११.

गरुडवेल स्त्री. गरुळ; गरोळ. पहा : **गुळवेल** [सं. गडुची]

गरुडारे न. गरुडाचे देऊळ.

गरुडासन न. १. (मल्लखांब) मल्लखांबाच्या बोंडावर एक पाय टेकून दुसरा पाय त्यावर आडवा घेऊन हात जोडून उभे राहणे. २. (हठयोग) याचे चार प्रकार – उभ्याचे दोन व ओणव्याचे दोन.

गरुत्मा पु. गरुड.

गरुरी पहा : **गरुर–री**

गरुवती स्त्री. श्रेष्ठता; गुरुत्व : 'म्हणौनि हा काव्यां रावो । ग्रंथ गरुवतीचा ठावो ।' – ज्ञा १.३३.

गरुवा वि. श्रेष्ठ; म्हातारा; मोठा : 'पिंड गरुवा माकडु । होईल हा ।।' – ज्ञा १३.५६९. [सं. गुरुवत्]

गरुवा पु. गर्व; ताठा; मगरुरी. [सं. गर्व]

गरुवार वि. गरोदर.

गरुस्ती स्त्री. दरोड्यातील वस्तू ठेवण्याची पिशवी. (कु.)

गरूर, गरूरी पु. स्त्री. गर्व; मगरुरी : 'टिपूही आतां मस्नद नसीन जाहला तो गरूरीच्या पहाडावर चढला.' – ऐलेसं ८.४३५५ : 'मग नवाब

म्हणो लागले गरूर प्रधान पंतांत फार जाहला आहे.' – पेद १०.६६. [फा. गुरुर]

गरुळ, गरोळ पहा : **गुळवेल**

गरोज–झ स्त्री. पक्ष्याची शीळ. (गो.) [पोर्तु.]

गरोडा पु. कापसावरील रोग.

गरोदर वि. गर्भार; गर्भवती. (क्रि. होणे, येणे.) [सं. गुरु + उदर]

गरॉ पु. गळ; आमिष. पहा : **गरी** (गो.)

गरौणी स्त्री. आमिष दाखविण्याचा प्रकार. (गो.)

गर्क वि. १. पहा : **गरक.** २. गडप; मृत : 'ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये.' – भाब ४७.

गर्क, गर्ग वि. घोड्याचा एक रंग. – अश्वप १.२८.

गर्का पु. कुंकवाच्या जागी मेणाने चिकटवून लावण्याची नक्षीदार टिकली.

गर्का पु. झपाटा : 'फौजेचा एक गर्का ।' – ऐपो १८.

गर्गट पहा : **गरगट** : 'आला पाला वाटूनि गर्गट घेतां पोट भरे रे ।' – अमृत ११९.

गर्गशा पु. भांडण; गोंधळ; गडबड. पहा : **गरगशा** : 'या उभयतांमध्यें कसबे मसूरचे पटेलगीचा गर्गशा देणियाबद्दल लागला होता.' – मइसा १५.३२. वि. भांडखोर; कजाग. [फा. गर्घशा]

गर्गाचार्याचा मुहूर्त सूर्योदयापूर्वीच्या पाचव्या घटकेपासून तिसऱ्या घटकेपर्यंतचा काल किंवा सूर्योदयापर्यंतची वेळ. हा शुभ मुहूर्त असून गमनास योग्य मानतात; उषःकाल; प्रभात : 'गर्गमुहूर्ते प्रयाण रामा श्रुतिवर्गानें गाइन मी ।' – आप ७२.

गर्गोड पहा : **गरगट** : 'नाना वल्लीचे रस । काडे गर्गोड कर्कश ।' – दास ३.७.३२

गर्जणे पहा : **गरजणे** : 'ते वेळीं जयजयकार शब्दीं । गर्जीनले समस्त ।' – मुआदि ४५.१४७.

गर्जन, गर्जना, गर्जित न. स्त्री. १. मेघनाद; ढगांचा गडगडाट : 'हें ना घनगर्जनासरिसा ।' – ज्ञा २८.४८४. २. आरोळी; डुरकणी; प्रचंड आवाज (वन्य पशू किंवा तोफ यांचा.).
वि. गर्जना करणारा : 'गर्जिलें निःशब्दें ।' – ज्ञा ११.१२७.[सं. गर्ज]

गर्जी वि. चाहता; शौकीन : 'माझ्या घरच्यांची कठोर मर्जी हो । याला नुमजे हा बायकांचा गर्जी हो ।।' – राम जोशी ४१.

गर्जेल पु. एक धान्यविशेष; ज्वारी, बाजरी, नाचणी इ. : 'गर्जेलाची न्याहरी तुला बाळा रे नेनं त्याला ।' – बा ८७.

गर्झरू पु. गजर; गर्जना : 'गर्झरू उठिला अद्भुतु कांपिली मेधिणी ।' – क्रिपु ७.६२.

गर्डर पु. मोठ्या लांबीचा लोखंडाचा आडवा खांब.

गर्ता स्त्री. १. खळगा : 'एवं तमाचिये पडिले गर्ते ।' – ज्ञा ९.१८५. पहा : **गरता.** २. डोळ्यांची खाच; डोळे चांगले असून न दिसणे; डोळ्याचा एक रोग : 'फुलें वडस आणि पडळें । कीड गर्ता रातांधळे ।' – दास ३.६.४०. [सं.]

गर्तिका स्त्री. सुरईसारखी, विशिष्ट प्रकारची बीजुके निर्माण करणारी पोकळी.

गर्ती, गर्तिणी पहा : **गरती** : 'पतिव्रताधर्म ऐका गे साजणी । धन्य त्या गर्तिणी पुण्यशील ।' – ब ४६७.

गर्तीण पहा : **गरती**

गर्द पु. हेराईन या मादक द्रव्याची भेसळ करून केलेली पिंगट भुकटी. ही 'ब्राऊन शुगर' म्हणून ओळखली जाते.

गर्द स्त्री. गरद, गडद धूळ; धुराळा; छाया; काळोखी : 'मनांत संशयाची गर्द आली असेल ती काढून टाकली म्हणजे साफ. कांहींच खत्रा रहात नाहीं.' – मइसा ५.१६६.
वि. १. दाट (छाया). २. धूलीभूत; गडद; निबिड (झाडी.) ३. गारद; नष्ट : 'टिपूचे संस्थान गर्द जालें हें सरकारचे दौलतीस चांगलें नाहीं.' – ऐलेसं ११.६०५६.[फा.] (वा.) **गर्देस मिळवणे –** धुळीस मिळवणे; नायनाट करणे : 'उपेक्षा केलियाने अन्यायाची बुद्धी होणार असे होते त्यांस मारून गर्देस मिळविले.' – मराआ ५.

गर्दन स्त्री. मान; ग्रीवा. पहा : **गरदन** [फा.] (वा.) **० मारणे –** ठार करणे.

गर्दनखेच पु. मुलांचा स्काउटचा एक खेळ.

गर्दनबाजी स्त्री. तळहातावर शीर घेऊन, जिवावर उदार होऊन लढणे.

गर्दनस्वारी स्त्री. (कुस्ती) प्रतिपक्षाच्या मानेला विळखा घालणे.

गर्दपोस पु. पलंगपोस; धुरळा बसू नये म्हणून (बिछाना इ. वरील) घालायचा अभ्रा, चादर, रुमाल : 'गर्दपोस काढून करू द्या नीट तकये पलंगावरले ।' – होला ९५. [फा. गिर्दपोश]

गर्द(र्दा)बाज वि. १. घोर; निबिड; दाट; घन; किर्र. (झाडी) २. भरदार; पानाफुलांनी भरगच्च (झुडूप, वनस्पती). ३. गहिरा; गाढ; काळाकुट्ट (पाऊस, अंधारी, छाया).

गर्दबाजी, गर्दाबाजी स्त्री. निबिडपणा; गर्दी; दाटी. पहा : **गर्दबाज**

गर्दभ–ब पु. गाढव; खर. [सं.]

गर्दम पु. घोड्याच्या पायाचा एक रोग. – अश्वप २.३८.

गर्दा पु. १. भांगेची पूड. २. गर्दी; दाटी; धूळ; धुरळा : 'पंढरपूरामध्ये गर्दा कशाचा उठला ।' – लोसामा २ नलो ३८. [फा.]

गर्दावा पु. गर्दी; जमाव : 'त्या गर्दाव्यात बाबा दिसेनासे झाले.' – स्मगा २२८.

गर्दास वि. घोड्याचा एक रंग; शेंडीपासून नाकापर्यंत असलेली पांढरी लकेर. – अश्वप १.२७.

गर्दी–र्द्दी स्त्री. १. फार दाटी; भरगच्ची (धूळ, चूर्ण, सुगंधी बुकणी, धूर इत्यादीची). २. (ल.) दाटी; चेपाचेपी; चेंगराचेंगरी. ३. अतिशय विपुलता; रेलचेल (पाऊस, पीक, हंगामातील उत्पन्न, जेवणातील पदार्थ यांची.) ४. मोठा गोंगाट; आरडाओरड. [फा. गर्द]

गर्दी स्त्री. घाई : 'त्याने (रुपमतीसाठी) एक वीर मनात योजिलाहि होता. परंतु लग्नाची गर्दी केली नाही.' – रूरा ७.

गर्दी–र्द्दी स्त्री. १. उत्पात; नासधूस (लुटारूंनी केलेली). २. दाणादाण; धूळदाण (सैन्याची). ३. (सामा.) अंदाधुंदी; अव्यवस्था; सैन्याचा हल्ला : 'गर्दी झाली त्यावरती ।' – ऐपो ३५८. ४. अकस्मात हुद्दा नाहीसा होणे; बडतर्फ होणे; अब्रू जाणे (मुत्सद्दी, सरदार, अधिकारी

यांची.) (वा.) ० **उडणे –** भंबेरी उडणे : 'एका टिप्पिऱ्यातच त्याची गर्दी उडाली होती.' – ऊन ३५. ० **करणे –** (कायदा) गैरकायदा मंडळीने किंवा त्यापैकी काही जणांनी बळजोरी किंवा जुलूम करणे; दंगल माजवणे. **गर्दीस मिळवणे –** ठार मारणे : 'त्यांस पानपती कोणी गर्दीस मिळविले.' – संउ ३५०.

गर्दोव(ग)र्दी क्रिवि. चारी बाजूंना; सभोवार; आसमंतात; आवतीभोवती. [फा. गिर्दागिर्द]

गर्धव पु. गाढव : 'शाप वदल्या दुर्धरा । गर्धव होसि म्हणोनी ।' – मब १९. [सं. गर्दभ]

गर्नेल–ल गरनाळ; गरनाळा

गर्बी–र्भी स्त्री. दोन भिंतींच्या मधील अंतर. (गो.) [सं. गर्भ]

गर्भ पु. १. जन्मास येणारा उदरातील जीव; पुरुषवीर्य व स्त्रीरज यांपासून तयार झालेला व स्त्रीच्या गर्भाशयात असणारा पिंड. २. मगज; गीर; मेंदू; काळजाचा कंद; (सामा.) आतील भाग. ३. (ल.) तत्त्व; कस; तात्पर्य; हाशील; सारांश; ऐवज : 'त्याजवरून येथील गर्भ सर्व अवगत जाहलाच असेल.' – पेद १.४४. ४. व्यापलेली जागा; क्षेत्रफळ. ५. मध्य; मध्यबिंदू. ६. अर्थ; भाव. ७. आतील प्रदेश, बाजू. ८. गर्भाशय; पोट : 'नाना भरतें सिंधुगर्भी ।' – ज्ञा ११.६५०. ९. आतील खोली; बाळंतिणीची खोली. १०. देवळाचा गाभारा. [सं.] (वा.) ० **कोसळणे –** भेदरून जाणे; **गर्भगळित होणे –** फार घाबरणे : 'गर्भगाळ कोसळला ।' – ऐपो ५८. ० **करणे, गर्भाचे होणे –** चैनीचे जेवणे; पोटपूजा करणे; आपल्या पिशव्या भरणे.

गर्भकर, कर्ता, कारक, जनक वि. गर्भधारणेस कारणीभूत होणारा; गर्भस्थापना करणारा. [सं.]

गर्भकांडे न. गर्भगोल; गर्भपिंड : 'जठराग्नीच्या तोंडी घालूनि गर्भाची उंडी। उकडउकडूनि पिंडी । गर्भकांडी घडिजेति ।' – एभा ७.

गर्भकुडी स्त्री. गाभारा : 'देवळाच्या गर्भकुडींत....' – अदेशी १८.

गर्भकोश पु. गर्भाशय; पोटातील गर्भ राहण्याचे ठिकाण. [सं.]

गर्भगळीत, गर्भगिळीत, गर्भगीळ वि. १. जिने गर्भ टाकला आहे किंवा जिचा गर्भ गळाला आहे अशी. २. (ल.) ज्याची पाचावर धारण बसली आहे असा; घाबरा; भ्यालेला.

गर्भगुडी स्त्री. गाणारा.

गर्भगुल्म न. गर्भ वाढीशी आनुषंगिक अशी मांसग्रंथीची वृद्धी. [सं.]

गर्भगृह न. गाभारा; माजघर. [सं.]

गर्भगोळ पु. गर्भातील मूल : 'जैसा गर्भगोळु उद्यमातें । कोणाही नेणें ।।' – ज्ञा ९.३३५.

गर्भग्रहण न. गर्भधारण; गाभ धरणे. [सं.]

गर्भघा(पा)ती वि. ज्याने गर्भ घात होतो तो; गर्भाचा घात करणारा.[सं.]

गर्भचलन न. गर्भाशयातील गर्भाची हालचाल, चळवळ किंवा त्यात प्राणशक्ती येणे. [सं.]

गर्भच्युत वि. गाभ पडलेली; धुपावलेली. [सं.]

गर्भच्युति–ती स्त्री. गाभ पडणे; धुपावणे. [सं.]

गर्भछाट पु. १. गर्भाशयात गर्भाचा नाश. २. समूळ नाश; संहार; गर्भाशयातील मूलसुद्धा कापणे.

गर्भछाट पु. निवड; वेचणी; टिपणी; निवडलेला भाग.

गर्भछाट पु. स्त्री. कुलुपी गोळ्यांचा स्फोट, धडाका.
वि. गोळ्या, छरे, खिळे, दगड इ. नी भरलेला (कुलुपी, गोळा, तोफ).
स्त्री. १. कुलुपी गोळा; २. गरनाळी तोफ.

गर्भछाया स्त्री. गर्भधारणा झाल्याची सूचक खूण, चिन्ह, दर्शन (मुखावरील टवटवी इ.) : 'तत्काळ आली तिस गर्भछाया ।' – सारुह २.२७.[सं.]

गर्भदास, गर्भदासी पु. स्त्री. जन्मापासून एखाद्याची बटीक, दासी, कुणबीण; तिचे मूल, लेकवळा (मुलगा, मुलगी); दासदासीचा पुत्र किंवा कन्या; दासीपुत्र – पुत्री. [सं.]

गर्भधनी वि. गर्भार : 'हरणी एकटी वनीं । असें रे गर्भधनी । पारधी आला।' – मनोरंजन, जुलै १९३२.

गर्भधारण न. गर्भ राहणे; गाभण होणे; गरोदर होणे. [सं.]

गर्भधारणा स्त्री. (वै.) स्त्रीबीज आणि पुरुषबीज यांचे मीलन होऊन गर्भबीज बनते. हे गर्भबीज गर्भाशयात स्थिर होऊन तेथे वाढू लागले म्हणजे गर्भधारणा झाली असे समजले जाते.

गर्भनाडी स्त्री. नाळ; वार. [सं.]

गर्भपटल न. (वै.) गर्भाशयातील गर्भाला लपेटणारा पातळ पडदा.

गर्भपत्र न. गाभ्यातून निघणारे कोवळे पान : 'तियें अंगवसां गर्भपत्रें ।' – ज्ञा १५.९९. [सं.]

गर्भपंडित पु. १. गर्भात असतानाच विद्वान झालेला पुरुष. २. (ल.) अतिशय मूर्ख, अक्षरशत्रू मनुष्य. [सं.]

गर्भपुट न. गाभ्याचा पडदा; ज्यातून सुयर बाहेर येतो तो भाग : 'कर्पूरकर्दळीचीं गर्भपुटें ।' – ज्ञा ११.२५०. [सं.]

गर्भभाव पु. तात्पर्य; गोषवारा : 'त्या कथेचा गर्भभावो । सांगा मज ।।' – कथा १.२.२८. [सं.]

गर्भरेशमी वि. १. काठाशिवाय अंगात रेशमाचे धागे असलेले (वस्त्र). २. तलम (वस्त्र).

गर्भरोजमुरा पु. जन्माला येणाऱ्या मुलीची पोटगी, तरतूद वगैरे.

गर्भवती स्त्री. १. गर्भार, गर्भारशी स्त्री; २. नवशिकी; पहिलटकरीण [सं.]

गर्भवायु–यू पु. गर्भाचा किंवा गुल्माचा वात. [सं.]

गर्भवास पु. १. गर्भाशयात, पोटात राहणे. २. जन्माचा फेरा; मुक्ती नसणे : 'तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासीं ।' – तुगा ११९३.[सं.]

गर्भवोवरा पु. गर्भ; गर्भात असलेला जीव : 'देवकीचा गर्भ वोवरा । माझा अवताररूप होय ।' – ह ३.२५.

गर्भशंकु–कू पु. मृत गर्भ बाहेर काढण्याचे शस्त्र. [सं.]

गर्भश्रीमंत, गर्भश्रीमान, गर्भसुखी वि. जन्मापासून श्रीमंत; वाडवडिलांपासून ज्याच्या घरी संपत्ती आहे असा पिढीजात श्रीमान.[सं.]

गर्भसंभव पु. गर्भ राहणे; गर्भधारणा. [सं.]

गर्भसुती वि. ताणा (उभे सूत) सुताचा व बाणा (आडवे सूत) रेशमाचा असे (वस्त्र).

गर्भसूत्र न. १. मध्यरेषा; मध्यापासूनची रेषा. २. (ज्यो.) भूमध्यापासून ओढलेली रेघ. ३. केंद्रातून जाणारी कोणतीही रेघ. [सं.]

गर्भस्तुति स्त्री. व्याजस्तुती.

गर्भस्थ वि. १. गर्भाशयात असलेला. २. मध्यवर्ती; आतील; आत किंवा मध्यात बसलेला. ३. गर्भार : 'तिघी राण्या झाल्या गर्भस्था ।' – रावि ४.२७. [सं.]

गर्भस्पंदन न. (वै.) गर्भाशयात होणारी गर्भाची हालचाल. [सं.]

गर्भस्राव, गर्भश्राव पु. (वै.) गर्भाची पूर्ण वाढ होण्याआधी तो मातेच्या शरीरातून बाहेर टाकला जाणे.

गर्भज्ञानी वि. गर्भपंडित; जन्मत: ज्ञानी, विद्वान असलेला.

गर्भा पु. १. रासक्रीडेसंबंधी हिंदी किंवा गुजराती गाणे. नवरात्रात देवीसमोर गर्भे गातात. २. गर्भारशी किंवा गर्भार होऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांची एक क्रीडा. यात देवीची पूजा करतात व वर्तुळाकार फेर धरून गाणी म्हणतात. हा संस्कार आश्विनी शु. दशमीपासून पौर्णिमेपर्यंत करतात. या वेळच्या गाण्यांनाही गर्भा म्हणतात. आश्विनी नवरात्र किंवा सर्व शुक्लपक्ष यांमध्येही हा कार्यक्रम होतो. [गु.] [सं. गर्भ]

गर्भागार पु. देवळाचा गाभारा. [सं.]

गर्भादा(धा)न न. १. गर्भधारण; गर्भ राहणे. २. त्रैवर्णिकांच्या सोळा संस्कारांपैकी एक संस्कार; गर्भस्थानाची शुद्धी होऊन गर्भधारणा सुलभ व्हावी म्हणून प्रथम रजोदर्शनानंतर जो संस्कार करतात तो. हा संस्कारविधी रजोदर्शनापासून सोळा दिवसांच्या आत करतात. [सं.]

गर्भार, गर्भारशी वि. स्त्री. गरोदर स्त्री; गर्भवती.

गर्भार्थ पु. फलितार्थ; गर्भितार्थ; ध्वनितार्थ. [सं.]

गर्भावधि–धी पु. फलित अंड्यापासून, मातेच्या शरीरात गर्भाची पूर्ण वाढ होऊन त्याचा बाह्यजगात प्रवेश होण्यास लागणारा वेळ.

गर्भावस्था स्त्री. १. गर्भ असलेली अवस्था. २. (ल.) एखादी गोष्ट प्रत्यक्षात येण्यापूर्वी असलेले तिचे स्वरूप.

गर्भाशय पु. १. (वै.) स्त्रीशरीरातील कटिगुहेत मूत्राशय आणि मलाशय यांचे दरम्यान असणारा महत्त्वाचा अवयव. यालाच बाजूने बीजनलिका जोडलेल्या असतात. २. गर्भशय्या; गर्भस्थान; कूस. ३. गर्भाची खोळ; वार; गर्भवेष्टन. [सं.]

गर्भासन न. १. योगशास्त्रातील ८४ आसनांपैकी एक आसन. २. (मल्लखांब) मल्लखांबाला हाताची गोफण बांधून दोन्ही पाय लावून केलेले आसन. [सं.]

गर्भांकुर पु. अव. (वै.) गर्भातील निरनिराळे अविकसित भाग. ह्या भागांचा नंतर विकास होऊन त्यापासून वेगवेगळे अवयव तयार होतात.

गर्भिण स्त्री. समांतर रेषा काढण्याचे सुताराचे एक हत्यार. (कु.) पहा : **गरबीण**

गर्भिणी स्त्री. १. गर्भार स्त्री. २. फळ देण्याच्या बेतात आलेली वनस्पती : 'एकें गर्भिणी उकडविली । पुटामाजीं ।।' – ज्ञा १३.२२८.

गर्भित वि. १. ध्वनित; फलित; आकलित; बांधित; समाविष्ट. २. छुपी; सूचक; अप्रकट. ३. व्यंग्य; व्यंजक.

गर्भी स्त्री. १. व्यापलेली जागा; क्षेत्रफळ. पहा : **गर्भ** ४. २. घेरा; वेढा (इमारत, लाकूड यांचा). ३. मध्य; केंद्र. ४. मधला भाग; अंश. ५. सुपारीच्या कोवळ्या घोसावरील, लोंगरावरील कोश, आवरण. (कु.) [सं. गर्भ]

गर्भी क्रिवि. पोटात असताना; जन्मापासून; जन्माला येण्यापूर्वी. समासात – गर्भी आंधळा – रोगी.

गर्भीण वि. गरोदर : 'गर्भीण नारईची पिवळी तिची काया ।' – राके १९६.

गर्भीभवन न. (वै.) फलित अंड्याचे गर्भात रूपांतर.

गर्मरू वि. तप्तमुख; तप्त चेहरा असलेला.

गर्मा, गर्मी, गर्मिणा पु. स्त्री. १. गरमा, गरमी; उकाडा; तलखी. पहा : **गरमा** : 'दोनी मंडप बुलंदीस कमी, याजमुळें गर्मिणी भारी....' – ऐलेसं १०. ५४४५. २. उपदंश रोग. या रोगाचा कौशिक सूत्रात ग्राम्य असा उल्लेख आहे. ग्राम्य = मैथुन; ग्राम्य व्याधी = मैथुन – संयोगापासून होणारी व्याधी. [फा.]

गर्मी स्त्री. १. उद्धटपणा; मग्रुरी; गुर्मी : 'इकडील मोंगलांची गर्मी राहिलीच नाहीं.' – मइसा १.२६२. २. जरब : 'गर्मी दाखवून जें मिळेल तें मेळवावें.' – पया ३२७. (क्रि. दाखवणे.) [फा.]

गर्मेजणे अक्रि. ऊन किंवा कोंबट होणे. (व.) [हिं.]

गर्रा क्रिवि. एकत्रित.

गर्ला वि. गलितगात्र.

गर्व पु. अभिमान; ताठा; तोरा; डौल; दिमाख; अहंकार; मान (क्रि. वाहणे, होणे, फुगणे.) : 'इंग्लिश लोक आपल्या उत्कृष्ट भाषेचा साऱ्या भूमंडलावर प्रसार होत चालला आहे याचा अतिशय गर्व वाहतात.' – नि ५. [सं.]

गर्वस वि. मागाहून पिकणारे (धान्य). पहा : **गरवा, गरवस**

गर्वहत वि. अहंकार दुखावलेला; भानभंग झालेला; तोरा गेलेला.

गर्वहरण न. अभिमान किंवा ताठा नाहीसा करणे. (क्रि. करणे.) : 'शिवाजीने शाहिस्तेखानाचे गर्वहरण केल्यावर....' – मालआ ४.

गर्वा पहा : **गरवा** : 'फुलावर आलेले गर्वे भात दूध घेत होते.' – सराई २.

गर्विक , गर्वित, गर्विष्ठ, गर्वी वि. अभिमानी; दिमाखखोर; मगरूर.

गर्वेल न. गरवस; गर्वे भात. (को.)

गर्वोक्ति–क्ती स्त्री. अभिमानाचे, आढ्यतेचे भाषण; (सामा.) गर्व; शेखी : 'गर्वोक्ति फाल्गुन वदे जगदेकराया ।' – वामन, भीष्मयुद्ध ७. [सं.]

गऱ्हवार, गर्व्हार, गर्व्हारशी स्त्री. गरोदर स्त्री. पहा : **गर्भारशी** : 'गऱ्हवारे हा विधि । पोट वाढविले चिंधीं ।' – तुगा ६२५.

गऱ्हण पहा : **गर्हणीय**

गऱ्हणीय, गर्हणीय वि. निंद्य; तिरस्करणीय; आक्षेपार्ह; ठपका ठेवण्यास योग्य; दूषणीय; गैर; त्याज्य; अयोग्य. [सं. गर्ह = निंदा करणे.]

गर्हा स्त्री. १. निंदा; दोष; ठपका; तक्रार : 'देवज्ञांची करूं नको गर्हा ।' – मो. २. निंदा करणे; ठपका ठेवणे. [सं.]

गऱ्हाणे पहा : **गाऱ्हाणे**

गर्हित वि. दोष दिलेला; निंदा केलेला; कुटाळी किंवा कागाळी केलेला; निंदित. [सं.]

गर्ह्य वि. निंद्य. पहा : **गर्हणीय** [सं.]

गल स्त्री. विटीदांडू, गोट्या इ. खेळण्यासाठी जमिनीत केलेला खळगा. [क. अगळु] [सं. गद]

गल पु. १. गाल. २. कल्ले. (गो. गलॅ) [सं. गल्ल]

गल पु. १. गळा; मान. २. (वै.) घसा; ग्रसनिका.

गल पु. गळ; लोखंडी आकडा; आमिष; साखळ; नांगर : 'गलु न पाहतां गीली । उंडी मीनू ।।' – राज्ञा १३.७३८.

गलकल्ला, गलगुच्छ पु. गालावरचा केसांचा झुपका; कल्ला.

गलकंबल पु. बैलाच्या मानेखालची पोळी. [सं.]

गलका पु. गलबला; गोंगाट; कल्ला; गडबड; गवगवा. [सं. कल् = कलका] [क. गलगु = मोठ्याने वटवट]

गलगचा–ची स्त्री. गाल व मान. (मावळी)

गलगल स्त्री. कलकल; बडबड. पहा : **गलका** [सं. कलकल]

गलगल पु. १. काही वनस्पतींचा चीक; भोकर इ. फळांचा चीक. २. देवमाशाची चरबी; समुद्रातील जार. [सं. गल् = गळणे.]

गलगलणे अक्रि. १. गडबडणे; अस्वस्थ होणे; चक्कर येणे. २. गोंगाट करणे; बडबड करणे; घोंगावणे; गुणगुणणे. [सं. कल् = कलकल]

गलगलणे अक्रि.(एखादे ठिकाण) जलमय किंवा दलदलीचे होणे; पाणथळीचे होणे. [सं. गल्]

गलगला पु. घोसाळे; गिलके. (ना.)

गलगलाट पु. कलकलाट; मोठी गलबल; मोठा गलबला; आरडाओरडा; मोठ्याने घोंगावणे.

गलगली स्त्री. १. दलदल; रेवण. २. थलथलीतपणा; रबरबीतपणा. [सं. गल्चे द्वि.]

गलगलीत वि. १. थलथलीत; बिलबिलीत (फार परिपक्व फळ, भात, गरा). २. मृदू व चिकट (चीक, गाळ, जार.) ३. चिकचिकीत (घाम.) (गो.)

गलगंड पु. गंडमाळा रोग.

गलगंडिका स्त्री. गळ्याच्या जवळील चेतापेशी समूह. (बे.)

गलगा पु. गवत, वाळलेली पाने इ. चा अस्ताव्यस्त पडलेला केरकचरा.

गलग्रह पु. गचांडी; गळचेपी. (क्रि. करणे.)

गलग्रह पु. १. प्रतिपदा, चतुर्थी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी, त्रयोदशी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावस्या या तिथी. (या तिथींना मुंज करीत नाहीत.) २. अनध्यायाचा दिवस.

गलग्रह पु. ज्याच्या अन्नवस्त्राचा भार त्याच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्यावर पडलेला असतो तो; खायला काळ व भुईला भार असा माणूस.

गलग्रह पु. घटसर्प; घाटसर्प. [सं.]

गलघाटी पहा : **गळघाटी**

गलची स्त्री. गळा; मानगुटी : 'बारगीरानें झटपट करून गलची धरून कटार स्कंधावर उभा चालवून वरून भार घालून दाबला' – मशियांका ८८२.

गलच्छ कंठच्छ, गलस्य कंठस्य, गलस्थ कंठस्थ वि. जीवश्च कंठश्च; अतिशय दाट; गहन (मैत्री.).

गलजोड पु. (स्था) एकावर एक असलेला सांधा.

स्त्री. मैत्री.

गलणे अक्रि. झरणे; पाझरणे; गळून पडणे; सुटणे; नाहीसे होणे : 'हालवलें हीं न गलें । तें परब्रह्म ।।' – राज्ञा ८.१६.

गलत वि. १. अव्यवस्थित; घोटाळ्याचे; गोंधळाचे (कृत्य, वस्तू.) अनुचित; सदोष. २. बेशिस्त; गफलत्या; वेंधळा (माणूस). ३. बेपत्ता; हरवलेली. (क्रि. होणे) : 'दो मोती गलत....' – पेशव्यांची बखर. क्रिवि. १. वाट चुकून; आडवाटेने; आडरानी; गहाळ किंवा गडबडलेल्या स्थितीत. २. बाहेर किंवा आड बाजूला फेकलेला; जास्त झालेला किंवा निरुपयोगी म्हणून टाकलेला. [सं. गलित]

गलत वि. १. रद्द : 'सरदेशमुखीचा परवाना पहिले जाला होता तो गलत करून....' – इमं १७४. २. खोटे : 'पेंढारी यांची आवई उठली होती परंतु ते गलत वर्तमान.' – मइसा १०.२९९. ३. चुकीचे. [फा.]

गलत, गलत(ता)न स्त्री. १. अस्ताव्यस्त व गफलतीची भेसळ (पुस्तके, कागद यांची). २. चिवडाचिवड; अव्यवस्था; बिघडलेली स्थिती; चूक. ३. (पत्ते – गंजिफाचा खेळ) घोळ; गल्लत; पिसणी. (क्रि. करणे.) ४. नाश : वाटोळे; वाताहत. (कामकाज, उद्योगधंदा यांची.) [फा.]

गलतन, गलथन वि. संततीशिवाय मरणारा.

गलतनी स्त्री. तरवार म्यानाला अडकविण्याचा गोफ. [फा. गलता = तलवारीचे कातडी म्यान.]

गलतपत्र पहा : **गलितपत्र**

गलतान वि. १. आजारी. (व.) २. नालायक; निरर्थक; अयोग्य; अशक्त; मूर्ख; गयाळ (मनुष्य). ३. लेचापेचा; फुसका; कुचकामाची (वस्तू.).

गलतान वि. बेसूर; कर्कश; कर्णकठोर (गाणारा, गाणे, आवाज इ.).

गलती स्त्री. चूक; दोष; अपराध : 'नोकराच्या हातून गलती होण्याचा फार संभव.' – वज्राघात ११९. [फा.]

गलत्कुष्ठ न. ज्यात रोग्याचे अवयव हळूहळू क्षीण होऊन गळून पडतात असा महारोग; रक्तपिती. [सं.]

गलत्या वि. गाफील; गबाळ्या; विसराळू; नेहमी वस्तू हरवणारा; गलथान.

गलथकरी पु. गंजिफा खेळणारा.

गलथा पु. ओझे; सामान ठेवण्याची पिशवी; गठ्ठा; गड्डी : 'त्यांच्या कारकुनांनीं याचे दोन गलथे घेतले आहेत, ते देत नाहींत.' – पेद ८.२५.

गलथा पु. १. (स्था.) गुळगुळीत किंवा वक्र कड, कोर (पायऱ्या, कंगोरा, पुढे आलेला भाग, खुर्ची – टेबल इत्यादीचा); सांधलेला तुकडा; दर्शनी भाग; वर्तुळ केलेला, उलटलेला, मुरडलेला भाग (भिंत इत्यादीचा); शेवटास दिलेला गोल निमुळता आकार. २. (ल.) उत्तम ठेवणीची आणि वर्तुळाकार केलेली फरसबंदी. रस्ता.

गलथा पु. गचांडी; अर्धचंद्र. (क्रि. देणे.) – (तंजा.) [सं. गलहस्त]

गलथान जबडा.

गलथान वि. गबाळा; अव्यवस्थित; वेंधळा; निष्काळजी; गाफील.

गलथानपणा पु. गबाळेपणा; अव्यवस्थितपणा; बेसावधपणा; निष्काळजीपणा : 'नाटकाचा धंदा गलथानपणे केला की यासारखा पाताळांत नेणारा दुसरा नाहीं.' – मापु.

गलथेदार वि. गलथ्याच्या आकाराचा; गलथा केलेला (चौरंग, पाट इ.).

गलद(ध)ट पहा : **गळद(ध)ट**

गलदूम स्त्री. वर पाय करून हातावर चालणे. (क्रि. करणे, टाकणे, चालणे.)

गलन न. १. वितळणी; आटणी. २. गळती; द्रव; पाझर; स्राव. [सं.]

गलनाल पु. घशातून जठरापर्यंत अन्न, पाणी इत्यादी नेण्यासाठी असलेली मांसल नळी; अन्ननलिका. (बे.)

गलनीय वि. आटण्याजोगे; प्रवाही करण्यास किंवा द्रवण्यास योग्य; द्राव्य.

गलप पु. आक्रमण; मोठा दंगा [फा. गलब, इं. गॅलप] (वाक.) **गलप ठोकणे** – १. धावून, दौडत जाऊन हल्ला करणे. २. घेरून टाकणे : 'दरमजल सावनुरास जाऊन फुरद्यावर छापा घालून गलप ठोकला....' – मदरू २.५.

गलपट्टा पहा : **गलाबन**

गलपाणी पु. मुलांचा गोट्यांचा एक खेळ : 'मुले गलपाणी खेळू लागली आहेत.' – गार १२७.

गलपोजी पु. खेडवळ नाटकातील सूत्रधार. (बे.)

गलफ न. अभ्रा; आच्छादन. पहा : **गलेफ** (वा.) **० होणे –** अंमल बसणे; वर्चस्व प्रस्थापित होणे : 'सारांश, चहूंकडे चहूं राज्यावर इंग्रजांचा गलफ जाला!' – ऐलेसं ७२९५.

गलफ(फा)टणे अक्रि. १. गैरविल्हे लागणे; हरवणे; थांग न लागणे; सांडणे. (वस्तू.) २. रस्ता चुकणे, आडरानात जाणे; बहकणे. ३. सुचेनासे होणे; गोंधळणे (संकटादी कारणांमुळे). केव्हा केव्हा सकर्मकही उपयोग करतात. [सं. ग्लै.]

गलफ(फा)टा, गलफ(फा)डा पु. घोटाळा; धांदल; घोळ; तारांबळ; घालमेल; घोळंकार; बहकण्याची, हरवण्याची, गहाळ होण्याची परिस्थिती (मनुष्य, प्राणी, वस्तू यांची.) (वा.) **गलफाट्यात पडणे –** गोंधळून जाणे.

गलबत न. जलमार्गाने प्रवास करण्याचे साधन; नौका; तारू; जहाज; पडाव, मचवा. डोलकाठी असलेले कोणतेही जहाज. (क्रि. हाकारणे.) [पोर्तु.] (वा.) **० धड्यावर घेणे –** पावसाळ्याआधी गलबते काठावर ओढून त्यांना तेलपाणी देऊन, आच्छादन घालून ती नारळीपौर्णिमेपर्यंत ठेवणे: 'गुराब गलबतें धड्यावरी घेणे, इत्यादिक कार्ये पर्जन्या आलाकडेस (पर्जन्य पडावयाच्या आंत) समुद्रास तुफान जाहाले नाही तों अगोदर करावे.' – पेद ३३.७.

गलबल–ला स्त्री. पु. १. गलका; गडबड; आरडाओरडा : 'स्नानदान देवपूजा गलबलित अगदीच अंतरली ।' – ऐपो ३०८. २. घाबरेपणा (भयादिकामुळे). ३. गफलत; गोंधळ; घालमेल (काम, हिशेब यांची). ४. हुल्लड; दंगल. [ध्व.]

गलबलणे अक्रि. १. घाबरणे; भिणे. २. तारांबळीत, गोंधळात, गडबडीत असणे. ३. गडबडणे; घोटाळणे. ४. घाबरणे; बेचैन होणे; अस्वस्थ होणे; हादरणे; जीव कालवणे. [सं. गद्, वद्]

गलबला पु. कोलाहल; आरडाओरडा; गोंधळ; गडबड : 'करू नका गलबला अगदी । लागली झोप मम बाळा ।' – वाग्वैजयंती.

गलबलाट पु. १. मोठी गलबल; आरडाओरड. २. घोटाळा.

गलबलीत वि. विस्कळीत; अव्यवस्थित : 'तिचा (कवितावधूचा) ओंचा पदर फार टेकटेकीचा नसतो किंबहुना गलबलीत असतो.' – आ प्रस्तावना ८.

गलबल्या वि. १. बोभाट्या; गडबड माजविणारा. २. गोंधळ्या; अव्यवस्थित; भ्रमिष्ट; गफलती.

गलबा पु. १. गलका; गोंगाट; आरडा; गवगवा; कलकलाट. २. हल्ला : 'गलबला उठेल.' – मइसा ८.४३५६. ३. जोर; धामधूम : 'शिखांचा गलबा भारी.' – दिमरा.

स्त्री. गडबड : 'तयारीची गलबा दाखविली म्हणजे येणेकडून श्रीमंत संतोष मानितील.' – मइसा २.१०.८१. [फा.]

गलमिशा–शी, गलमुची–च्छी, गलमूच्छ, गलबूच्छ, गलशप स्त्री. अव. कल्लेमिशा. पहा : **गलकल्ला**

गलमुगीर वि. उद्धट; बेमुर्वत; आग्रही : 'वरातदार गलमुगीर जाले तर बेमुलाहिजा बाहेर घालणें....' – पेद ३.४९.

गलमुच्छा वि. मिशांची जाड टोके गालांवर वळवलेला.

गलरोटी स्त्री. नीलगाय.

गलशुंडिका स्त्री. १. अन्नमार्ग; गळा; अन्नाची नळी; गळघाटी. २. पडजीभ; लोळा; घशातील शुंडाकृती गाठ; घशात मधोमध लोंबणारा मांसल अवयव. [सं.]

गलसल वि. निरुपयोगी; कुचकामी : 'लोकांचा जमाव तेथें पावलिया उपरी तेथें फौज आहे त्यापैकीं गलसल सबर.... जे कोणी येतील त्यास निरोप देऊन खासे दोनशे स्वारानसी राहाणें.' – पेद ३३.१६६.

गलंगती, गलंक्ती, गलंतकी स्त्री. कांबळा, घोंगडी किंवा इतर वस्त्र याला धावरे टाके घालून व मुरडून बनविलेली कामचलाऊ थैली, पोते, पडशी. [सं. गलंतिका]

गलंगा पु. गळती; गळणे.

गलंड न. गळू; केसतूड; आवाळू; गाठ; बेंड : 'चामखिळ गलंडें मसें ।' – दास ३.६.५०. [सं. गलगंड]

गलंडणे उक्रि. कलंडणे; लवंडणे. (व.)

गलंभ पु. स्त्रियांचे स्तन : 'कोरिलिया पुतळियांचे गलंभ ।' – रंयोवा १०.८८३.

गलाई स्त्री. वितळण्याचे काम.

गलागोटा पु. गल्लागोटा; दाणागोटा : 'तुम्ही कोणाच्या आधारें न बैसता, गुरेंढोरें गलागोटा असेल तो घेऊन जाणें.' – पेद २६.१८५.

गलगोला धान्य व दारूगोळा.

गलाटा पु. गोंधळ; बिघाड; अस्ताव्यस्तपणा. पहा : **गल्हाटा** : 'येथील विसंच फौजेचा गलाटा....' – पेद ५.६०.

गलाफ, गॉलफ, गॉलाफ पु. हंडी; झुंबर. (गो.) [पोर्तु.]

गलाफ पहा : **गलेफ** : 'उरुसातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कबरीला गंधाचा लेप लावून तिच्यावर गलाफ चढविणे हे होय.' – जीसे ३८३.

गलाबन पु. लोकरी गळपट्टा.

गलाला पु. घोट : 'बहु मृगजल देखौनि डोलां । थूंकिला अमृताचा गीलितां

गलाला ।' – राज्ञा ९.६०.

गलास पु. १. काचेचा पेला. २. (ल.) पेटलेली वात आत ठेवलेले काचेचे पेले : 'चवतर्फा लाविले गलांसे जिकडे तिकडे उजाले ।' – पला ४.२७. ३. फुलपात्र; पेला : 'सोन्याचा गलास ठेऊन....' – ऐरापुप्र २.१४९. [इं. ग्लास]

गलांकुर पु. घशातील गाठी मोठ्या होणे, सुजणे. [सं.]

गलांड पहा : **गलंड** : 'तेथ गलांडें राहावें।' – जै ४९.१०१.

गलांड(डा)वात पु. गळू उद्भवण्यास कारण होणारा वात.

गलांब न. लहान गलबत. (हेट.)

गलि(ल)च्छ, गलीच वि. घाणेरडा; मलीन; ओंगळ. [फा. गलीज]

गलित वि. १. पडलेला; सांडलेला; फेकलेला; गळलेला : 'भक्षोनिया शुष्क गलीत पाला।' – नगर ५६. २. वितळवलेले, पाघळविलेले; पातळ (रस) केलेले. ३. (ल.) खंगलेला; सुकलेला; क्षयी; ऱ्हास किंवा खराब झालेला; नि:शक्त [सं. गल्]

गलितकुष्ट न. पु. वाहणारे कोड; रक्तपिती : [सं.]

गलित-चक्षु-क्षू पु. अश्रू (आसवे) पाझरणारा, वाहणारा डोळा. [सं.]

गलितपत्र न. १. झाडाचे गळलेले पान. २. (ल.) फार वार्धक्याने किंवा रोगाने नि:शक्त झालेला माणूस. ३. (ल.) पदभ्रष्ट, अधिकारच्युत, सत्ताहीन माणूस. [सं.]

गलितपात्र पहा : **गलितपत्र** ३

गलितयौवन वि. तारुण्य संपून गेलेला; उतारवयाचा; म्हातारा. [सं.]

गलितेंद्रिय वि. इंद्रिये किंवा ज्ञानेंद्रिय काम देत नाहीत असा. [सं.]

गलि(ली)म, गलिमाई पहा : **गनीम, गनिमाई** : 'मुलुख सरंजामास देऊन केली कायम गलिमाई।' – ऐपो ४२१.

गली स्त्री. १. पहा : **गल्ली.** २. पहा : **गल.** ३. खळी; खाच : 'आज एकादशवर्षेपर्यंत। गरत गलींत पिचला योगीनाथ।' – नव १७.७४.

गलीब पु. गनीम; शत्रू : 'तुम्ही आमची जमीन वाहावी मुल्कात गलीब येईल तो आम्ही मारू.' – पाक्षज्ञाइ खं १.२८.

गलीम वि. शूर; धाडसी : 'चिमण्या दिसतात गरीब पण खरोखर असतात गलीम.' – सोबत १०५.

गलु(लो)ते न. पाठीवर झालरीवजा कापड सोडलेले बंदांचे लहान मुलांचे टोपरे; एक प्रकारची कुंची.

गलुंगा वि. गुबगुबीत : 'गलुंगे गेंद तयारीत...' – प्रभाकर (मला १५५).

गलूफी वि. बनावट : 'कागदपत्र दाखविला तो गलूफी दिसून आला.' – बाबारो २.१५. [फा. गिलाफ = झाकण, खोळ]

गलू(लो)ल स्त्री. खडे मारायची कमान; गोफण : 'केवळ कुणी मदनाचे गलोले प्राणपक्षि विंधिती।' – प्रला २३६. [फा. गलूल]

गलू(लो)ल, आगीच्या ज्वालांचा समूह. [फा. गलील]

गलू(लो)ल स्त्री. लोंबता अवयव, अंग (बकरीच्या गलस्तनासारखा). [फा. गलील]

गलेपटी-ट्टी, गल्लेपटी, स्त्री. १. कर; सरकारी पागांकरिता भुसार धान्यावर बसविलेली पट्टी; धान्यवसुलीवरील कर : 'गलेपट्टी दर खंडीस रुपये ४ प्रमाणें.' – मसाप २.१७८.

गलेफ पु. १. गवसणी; पिशवी; अभ्रा; खोळ (रजई, उशी, खुर्ची, कोच, पुस्तक इत्यादीची) : 'वर गलेफ हिरवा जरतार।' – होला १६०. २. पिराच्या कबरेवर घालण्याचे, झालर लावलेले वस्त्र; प्रेताचे वस्त्र : 'तंटा सुरू झाल्यावर त्याच्यावरील गलेफ उचलून पहातात तो त्याखाली फुलांचा ढीग !' – हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचे प्रयत्न. [फा. गिलाफ]

गलेलठ्ठ वि. १. अतिशय लठ्ठ; अवजड; फार मोठा; स्थूल (पोळ, बैल). २. लठ्ठंभारती; दांडगा, धष्टपुष्ट पण अक्षरशत्रू (माणूस).

गलेलोट वि. गल्ल्याकुच्या फिरल्यामुळे पुष्कळ अन्न मिळून लठ्ठ बनलेला. (माण.) पहा : **गलेलठ्ठ**

गलोब पु. गळाठा; दुर्दशा : 'ते समई नाश जाला... तेव्हां फार गलोब जाला.' – बोधले बखर ३.३५४.

गलोरा पु. गालगुच्चा; गालाला घेतलेला चिमटा; गालोरा. (क्रि. घेणे, धरणे, उपटणे.) [सं. गल = गाल]

गलोल पु. जमाव; सैन्य; समुदाय : 'सभोती फौज पन्नास हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले.' – पाणि बख २९.

गलोला पु. तोफेचा गोळा : 'अग्निचा गलोला दत्ताजीराव जाधव चालिला।' – ऐपो २.२३. [सं. गोल]

गलौघ पु. घटसर्प. [सं.]

गल्गला पु. चोपडा दोडका. (झाडी)

गल्गला, गल्गाल्ता वि. ओलेचिंब.

गल्बला पु. गलबला; कोलाहल; जोराचा वादविवाद : 'ज्ञान गोष्टीचा गल्बला।' – दास ६.१०.५४.

गल्याढा स्त्री. गलांडा; गंडमाळा :'ती. राजश्री शेवरावजीच्या गळ्यास गल्याढा जाला तेणेंकरून दोन मास हैराण जाले.' – पेद ४२.३२.

गल्ल स्त्री. गोट्या, विटीदांडू इ. खेळातील गल, खाच. पहा : **गल**

गल्ल पु. गाल : 'ओले गल्ल प्राज्य प्रेमाश्रु भरें करुनिया डोले।' – मोभीष्म १०.९८. [सं.]

गल्ल पु. व्याघ्रादी क्रूर पशूच्या गळ्याभोवतालचे केस. (गो.)

गल्लचूर्ण न. गालाला लावण्याची पूड, पावडर : 'कमांडर इन् चीफच्या तुऱ्यानें व मडमांच्या गल्लचूर्णानें... ख्रिस्ती धर्मास अपूर्व शोभा येऊन...' – नि ३४७.

गल्लत स्त्री. भेसळ; अयोग्य रीतीने केलेली सरमिसळ. पहा : **गलत** : 'म्हणुनी फिरून नानांनी उलटी मारूनी केली गल्लत।' – ऐपो २९५.

गल्लशष्प पु. गालमुच्छ; गालमिशी. [सं.]

गल्ला पु. १. धान्य; दाणागोटा; प्रत्येक प्रकारचे धान्य. २. धान्याचा साठा (मण, खंडी या प्रमाणात). ३. पीक; उत्पन्न. पूर्वी शेतसारा किंवा त्याचा काही भाग गल्ल्याच्या (धान्याच्या) स्वरूपात भरत असत. [फा.] [द्रा. गल्ले]

गल्ला पु. १. व्यापारी, सराफ यांची पैसे ठेवण्याची पेटी किंवा लहानसा खळगा. २. पैसे ठेवण्याचे भांडे. ३. रोकड; रक्कम; साठलेले पैसे;

रोजच्या विक्रीचे पैसे. ४. मजुरांना वाटायचा पैसा.

गल्ला पु. घोड्याच्या पायाचा (सुंभावरचा) रोग. – अश्वप २.२७३.

गल्ला पु. गलका : 'एकच गल्ला उडाला.' – श्रीयो २.७३.

गल्लाकटुबाण धान्याच्या स्वरूपातील महसूल.

गल्लाखरीदी स्त्री. गावाने विकत घेतलेल्या सर्व धान्यावरील पट्टी, कर.

गल्लाभरू वि. कला इ. बाबतीत हिणकस पण ज्यामुळे निश्चित प्राप्ती होते असा (चित्रपट, नाटक, धंदा इ.).

गल्ली स्त्री. बोळ; आळी; लहान रस्ता : 'अमंगळ गल्लीकुश्चळ।' – नव १६.१२०. [हिं. गली]

गल्ली पहा : **गल, गल्ल**

गल्लीकुची स्त्री. १. आळी, बोळ, बिदी यांना व्यापक संज्ञा. २. आडगल्ली. [हिं. गल्ली + फा. कुचाह]

गल्लीकुचीचा वि. फारसा प्रसिद्ध नसलेला; गावंढळ; अडाणी; असभ्य (मनुष्य, काम, गोष्ट, वस्तू).

गल्लूखडा पु. गोफणीचा दगड; गलोलीने मारायचा दगड : 'येईल माझा भिल्ल नि मारील गल्लूखडा।' – जसा १२४.

गल्लेकरी पु. भुसारी; वाणी; मोदी.

गल्वा पु. गालगुंड.

गल्हाटणे अक्रि. १. रोग वगैरेंनी अशक्त होणे; गळाठणे. २. सावकारीत तोटा आल्याने दारिद्र्य येणे. पहा : **गलवटणे, गळहाटणे**

गल्हाटा पु. गळाठा; अस्ताव्यस्त समुदाय, अव्यवस्था इत्यादी कारणांनी झालेली दुर्दशा. पहा : **गळहाटा**

गल्हेरी स्त्री. गॅलरी; सज्जा : 'आजूबाजूच्या खोल्यातील लोकांस किंवा पुढच्या गल्हेरीतून हिंडणारांपैकी कोणासही माझ्या हाका का ऐकू येऊ नयेत?' – मी १६.

गव स्त्री. १. पकड; चिमटा; अडकण (पक्ष्याच्या पंजाची, नखे-बोटे यांची). २. हाताची कव; वेंघ; मिठी. ३. ताकद; आटोका.[सं. कव]

गव स्त्री. १. ऐन वेळ; योग्य प्रसंग, काळवेळ, संधी. २. फुरसत; अवसर; रिकामी किंवा सोयीची वेळ. ३. भरती ओहोटीची वेळ. ४.काही व्यापाऱ्यांची सांकेतिक खूण.

गव स्त्री. पत; अब्रू; विश्वास (व्यापारात).

गव स्त्री. १. गुप्तपणा : 'तयाहि साक्षित्वाची गंव। सांपडे केंवी।' – सिसं १.९४. २. मतलब. (को.) (वा.) ० **गाठणे –** मुद्यास हात घालणे; मर्म हाती घेणे : 'जरी हे गंव गाठतील तर यांचे ते पातशह आहेतच.' – हिंद खंड १.६७. ० **लावणे –** फायद्याची वस्तू सापडणे; अदृश्य निधी सापडणे.

गव स्त्री. वळसा; सभोवती चक्कर : 'तत्राप फौजेस गव घालून हरिपंत तात्या दादासाहेबांचे मागें लागले.' – भारतवर्ष पंतप्रधान दुसरी शकावली ६३.

गव पु. गहू. (गो.)

गव स्त्री. महत्त्व. (व.)

गवई पु. गायक; गाणारा; गवय्या.

गवख–खे न. (प्र.) गवाक्ष. खिडकी; छिद्र; गुहा : 'जळतया गिरीच्या गवखा। माजीं द्यापती पतंगाचिया झाका।' – ज्ञा ११.४२५. [सं. गवाक्ष]

गवगव स्त्री. आरडाओरडा; गलबल; गडबड; कलकल. [ध्व.]

गवगव ओढ; जरुरी; अपेक्षा; चणचण.

गवगव स्त्री. खाज; कंडू.

गवगवचे अक्रि. भुकेने व्याकूळ होणे. (गो.)

गवगवणे अक्रि. कुजबुजणे; हलक्या आवाजात अनेकांनी एकदम बोलणे : 'या त्यांच्या संबंधात जिकडेतिकडे गवगवणाऱ्या आरोपांचा त्यांनी विचार करावा.' – आमासे १००.

गवगवा पु. १. पहा : **गबगब.** २. गडबड : 'असो ऐकोनि गवगवा। द्वारी आली शांभवा।' – कथा २.१०.९३. ३. बोभाटा; परिस्फोट; हाकाटी; डंका; प्रसिद्धी. (क्रि. होणे.) (वा.) ० **करणे –** (एखादी गोष्ट) सगळीकडे बोलत सुटणे; बभ्रा करणे.

गवग्वशी वि. भरलेला – बदलापूर ४०.

गवछा पु. अंगोच्छा; अंगपुसणे. (प्रयाग)

गवठ पु. अंगलट; अंगाची ठेवण : 'दोहीमध्यें मुलीचा गवठ आणि सगूण हेच.' – पेद २०.२२.

गवठ्या पु. पाटील; खेडेगावात राहणारा. (छत्तीसगडी)

गवठ्या महाजन मठ्ठ; मूर्ख. (व.)

गवण स्त्री. गव्हाण; गोठ्यातील गुरांना चारा टाकण्याची जागा; गोठ्याचा मध्यभाग. (गो.)

गवणे सक्रि. प्राप्त होणे; लाभणे; सापडणे; आटोक्यात येणे : 'ना गवे देखोनि गृध्ररावो। इंद्र इच्छी मित्रभावो।' – मुआदि ६.१०.१.

गवत न. १. तृण. याचे पुष्कळ प्रकार आहेत. पवनी, गोंडवळ, कुसळ, मारवेल, वरवेल, सुरी, कुंधा, काशा, काऊस, तिखाडी, कर्डू, शिपी इ. २. घास; चारा; ज्या वनस्पतीच्या मुळ्या व पाने सर्व प्रकारची जनावरे खातात ती वनस्पती. [सं. गौअत्त]

गवतकटाई स्त्री. १. गवत कापण्यास परवानगी मिळण्याची पट्टी, कर. २. सरकारी पागाकरिता गवतखरेदीचा खर्च भागविण्यासाठी बसवलेला कर. ३. गवत कापण्याची मजुरी. ४. (सामा.) गवतकापणी.

गवतकापी वि. (निंदार्थी) लोणीकापी, धार नसलेला (तलवार, वस्तरा यांची धार बोथट असल्यास त्याला म्हणतात.).

गवतकाप्या पु. अडाणी न्हावी, शिपाई, कामकरी व त्याचे हत्यार, शस्त्र.

गवतचराई स्त्री. कुरणातील चरणावळ; चरण्याचे भाडे.

गवतर न. गोमूत्र : 'गाईच्या गवतराची अंगनी झाली गंगा।' – जामामा ८२.

गवतशी स्त्री. पेंढ्याची एक काडी. (को.)

गवत(ता)ळणे अक्रि. (को.) १. गवताने आच्छादित होणे (नवीन केलेली पाळ, शेत, गवताची हुंडी). २. गवत किंवा रानझाडाने गुदमरणे, खुरटणे (पिकांची वाढ).

गवताचा उंट गवत्या टोळ; नाकतोडा. याचे पंख सरळ असून हा काळोख्या रात्री झिग झिग करीत हिंडतो.

गवतारू वि. गवताने शाकारलेले : 'एक गवतारू खोप रहायातें।' – केक १५.

गवताळ वि. सपाटून गवत उत्पन्न होणारी; विपुल गवत असलेली (जमीन).

गवती चहा पातीचा चहा. हा हिरवा व खरखरीत असून यांचे सुवासिक तेल काढतात. हा तापात घाम येण्यासाठी देतात. पाती कढीत घालतात.

गवती जमीन गायरान; गवताची जागा.

गवतुरी स्त्री. १. हरळी. २. एक खेळ.

गवत्या वि. १. गवताविषयी. २. गवतकाप्या; अडाणी.

गवत्या गोमाजी (तिरस्कारार्थी. एक कल्पित विशेषनाम) अलबत्या–गलबत्या माणूस; कोणीतरी अप्रसिद्ध, गल्लीकुचीतील माणूस; भलतासलता, अनोळखी, क्षुद्र, गफलती; गवतकाप्या मनुष्य; गवत्या.

गवनसार क्रिवि. सोयीस्कर; किफायतशीर; गवसार.

गवना पु. गर्भाधानाचा विधी. (व.) [हिं.]

गवय पु. गवा; रानबैलाची एक जात : ‘गवय, मंडप, हस्ती, शूकर, रेडा, सरूप इ. जनावरांस अनूपवासी म्हणतात.’ – अश्वप २.७.[सं. गो.]

गवय्या पहा : **गवई**

गवर,गवराई, गवरणी स्त्री. गौरी; गौर. (गो.व.)

गवर, गवरी पहा : **गोवरी.** (वा.) **गवऱ्या मसणात जाणे –** मृत्युकाल जवळ आलेला असणे.

गवरणे अक्रि. गहिवरणे; आठवण काढून रडणे. (व., तंजा.)

गवरव पु. वरमातेचा आहेर.

गवराई स्त्री. १. बायको. २. स्त्री.

गवला पु. एक सुगंधी वनस्पती; कापूरचिनी; कोशफल. पहा : **गव्हला**

गवली स्त्री. तार ओढून काढण्याची सोनाराची पकड, चिमटा. (खा.)

गवल्यो पहा : **गव्हला**

गवशा वि. फुकट सापडलेला; उचललेला; खर्च केल्यावाचून किंवा प्रयत्नावाचून मिळालेले.

गवशा वि. १. ठेवलेला (लग्नाशिवाय राखलेला पुरुष किंवा स्त्री); जार; रखेली. २. मिळालेला; हाती आलेला (पोरका, बाप नसलेला पोर.).

गवशा वि. काहीतरी मिळवावे या अपेक्षेने आलेला; लाभेच्छू.

गवस पु. १. (क्व) शोध; तपास; ठाव; चौकशी. (क्रि. लागणे, लावणे.) २. संधी : ‘आला दिवस किती करू नवस गवसेना गवस।’ – प्रला २०४. [सं. गवेषण]

गवसगाढव पु. टोणपा; मूर्ख माणूस.

गवसणी–नी स्त्री. १. खोळ; अस्तर; वेष्टण; आच्छादन; झाकणी; आच्छादनाची पिशवी (तरवार, ढाल, तबला, सतार, पालखी इत्यादीची) : ‘जयांचें चित्त गवसणी। व्यापका मज ।।’ – ज्ञा ९.१९३. २. व्याप्ती; समावेश. [क. गवसणिगे = झाकण, खोळ इ.] (वा.) ० **करणे –** (राज्यास) आपल्या आवरशक्तीत ठेवणे. ० **घालणे –** १. ताब्यात आणणे; आटोक्यात आणणे; कह्यात आणणे. २. झाकण घालणे : ‘घालितु आला लोडाची गवसनी।’ – शिव ९७९.

गवसणी पोळी, गवसणीची पोळी उकडपुरणाची केलेली कणकेची पोळी; तांदळाची उकड पुरणासारखी भरून केलेली कणकेची पोळी. ही आमरसाबरोबर खातात. (को.)

गवसणे अक्रि. १. सापडणे; मिळणे; आढळणे : ‘इच्छी आलिंगाया कर्णातें अन्य कांत गवसेना।’ – मोकर्ण ७.६. २. मनात येण्याजोगे, धरण्याजोगे असणे. ३. एखाद्याच्या कचाटीत सापडणे, हाती लागणे : ‘गवसलाच असा खग भासला।’ – र २१.

उक्रि. १. शोधणे; धुंडाळणे; २. गोळा करणे; गुंडाळणे; आवरणे; एकत्र करणे (एखाद्या वस्तूचे सर्व भाग).(वा.) **गवसाळा करणे** पकडीत घेणे; छाप पाडणे : ‘पादशहानजीक गाठोळीच्या बळें व गवसाळा करून साकल्ये जाहीर करावे...’ मइसा ८.४३.[सं. गवेषण]

गवसणे उक्रि. १. आच्छादन घालणे; कवटाळणे : ‘कीं संध्यारागें गवसलें।’ – ऋ २१. २. आश्रयाखाली आणणे : ‘आतां याचेनि बळें गवसलें। हें दुर्ग जैसे पन्नासिलें।’ – ज्ञा १.११६. २. व्यापणे : ‘कांतेचे मुख रम्य जें गवशिलें कोपाश्रु बिंदूत्करें।’ – वैराग्यशतक श्लो. ९३. [का. गवसणिगे = खोळ]

गवसना क्रि. दांडा मुठीत धरता येणे. (झाडी.)

गवसविणे उक्रि. १. शस्त्र म्यानाबाहेर, गवसणीतून काढणे. २. (ल.) सरसावून घेणे : ‘ऐसे बोलोनि पापमती। खड्ग गवसवूनि आपुलें हातीं।’ – ह २५.२२.

गवसार क्रिवि. १. (वेळेच्या दृष्टीने) फायदेशीरपणे. पहा : **गव.** २. (सामा.) नफ्याने; फायदेशीर.

गवळ पु. दुपाखी घर; मांगर. (गो.)

गवळट पु. (तिरस्कारार्थी) गवळी.

गवळण स्त्री. गवळ्याची बायको; गवळ्याचा धंदा करणारी स्त्री. [क. गोल्लति] (वा.) **गवळण घालणे –** दिवाळीत शेणाच्या बाहुल्या तयार करणे : ‘खेड्यातील मुली दिवाळीत आपल्या घरापुढे गवळणी घालीत.’ – माआ ८९.

गवळण स्त्री. १. कोष्टी पक्षी. हा धान्य खातो. २. कोळी किड्यासारखा एक किडा. [क. गवुळि = पाल]

गवळणकालो पु. कलावंतिणीकडून देवळात दाखविले जाणारे श्रीकृष्णाचे नाटक. (गो.)

गवळदा पु. शेतातील देवांना दाखविलेला नैवेद्य. (कु.)

गवळदेव पु. गुरे व गुराखी यांची संरक्षण देवता. (कु.)

गवळवाडा पु. गावातील गवळी वस्तीचा भाग; गवळी आळी.

गवळहाट पु. गवळ्यांच्या वस्तीचा भाग. पहा : **गवळवाडा**

गवळा पु. सोवळे नेसणारा पुजारी, भगत : ‘अग मी बायाचा गवळा पिवळी शेवती बायांना।’ – घाश्रलो १४५.

गवळा वि. पांढरे ठिपके अंगावर असणारा (बैल). पहा : **गव्हळा**

गवळी पु. १. गुराखी, खिल्लारी यांची एक जात व त्या जातीतील व्यक्ती. हे गायी, म्हशी पाळून दूधदुभत्याचा धंदा करतात : ‘सहसा व्रजांत गाठुनि बहु ताडुनि करूनि बद्ध–भुज गवळी।’ – मोविराट ३.२. २. गावठी, साधाभोळा माणूस. (गो.) [क. गौळिग] [सं. गोपाल]

गवळीक स्त्री. गवळ्याचा धंदा : ‘आनेलु गवळिक करितु। मेंडुरुवांची।’ – क्रिपु ६६.

गवळे पु. अव. दैवज्ञ ब्राह्मणातील मुंज झालेली लहान मुले.

गवंड–डी पु. न. स्त्री. गोवंड; डोंगरावर चरणाऱ्या गुरांचा रस्ता; गुरांच्या पायांनी मळलेली वाट; नदीची दरड (रस्ता असलेली); जंगल किंवा टेकडीवरील चरण्याची जागा. (को.) दोन्ही बाजूंना कुंपणे असून मधून गेलेला गुरांचा रस्ता; पांदण. (व.)

गवंडा पु. गव्हाचा भुस्सा. पहा : **गव्हांडा**

गवंडी–ड्या पु. दगड, विटा, चुना, माती, सिमेंट वगैरे साधनांनी बांधकाम करणारा, घर बांधणारा कारागीर; विटा रचणारा.

गवंद स्त्री. १. रानोमाळ उगवणारी एक वनस्पती; गवत. २. गर्दी; दाटी.

गवा पु. रानटी बैल; रानरेडा. याचे कपाळ रुंद, अवयव लांब व भरदार, डौलदार वशिंड, बाकदार व आखूड शिंगे व सशक्त स्नायू असतात. याच्या शिंगाच्या नक्षीदार वस्तू होतात. [सं. गवय:]

गवा पु. ठसा, शिक्का किंवा छाप याला शाई लावण्याचा कापडी चेंडू, बोळा. [फा.]

गवा पु. गुहा, घळ.

गवाण पु. झरोका; साणे. (माण.)

गवाण पहा : **गव्हाण** : 'सकाळी गवाणीतील गवत न् आगरातील झाप यांची शेकोटी करून आम्ही बसत असू.' – एल्गार ५.

गवाणी स्त्री. गाताडी; गुरांना खाण्यासाठी जेथे चारा घालतात ती जागा. पहा : **गव्हाण** (कु.)

गवादी स्त्री. गव्याचे शिंग. याच्या टोकाला गायमुख बसवून त्यातून शंकरावर अभिषेक करतात.

गवादी, गवांदी स्त्री. १. अन्नछत्र : 'कृष्णउद्धव संवादीं। होईल परब्रह्म गवादी।' – एभा ५.५६७; 'जयाने घातली मुक्तीची गवांदी।' – तुगा ५४२. २. मेळवण : 'निंदास्तुतीची होय गवादी।' – भाए १८५.

गवान पु. सरळ व सुरेख केस. (गो.)

गवाय स्त्री. साक्ष. (गो.)
पु. साक्षीदार. [फा. गवाह]

गवार–री स्त्री. एक प्रकारची शेंगभाजी; बावच्या. या झाडाच्या शेंगांची भाजी करतात. त्या वाळल्या म्हणजे आतील दाणे जनावरांना घालतात. पहा : **गोवारी**

गवार वि. गावंढळ; खेडवळ; मूर्ख. पहा : **गव्हार** [हिं.]

गवारनिवार न. १. सैन्याबरोबर बाळगलेले लुटारू पेंढाऱ्यासारखे लोक. २. कचरा; बाजारबुणगे. ३. असमर्थ; लढाईला निरुपयोगी : 'गवारनिवार त्यासही निरोप दिला पाहिजे.' – ऐलेसं ३२४९.

गवारपाट पु. जाड पानांची केतकी.

गवारी पु. गुराखी; गुरे हाकणारा, राखणारा : 'गाईचा गवारी म्हशीचा खिल्लारी।' – बा ९३.

गवालंभन न. मधुपर्काच्या किंवा आतिथ्याच्या वेळचा एक विधी : 'यज्ञदान गवालंभन।' – गुच १२.९४.

गवावणे सक्रि. गमावणे : 'तैसे नरदेह पावोनी गवाविलें।' – स्वादि ६.४.६८.

गवासणे सक्रि. सापडणे. (को.) पहा : **गवसणे**

गवाही पु. साक्षीदार. [फा.]

गवाळा पु. पोथ्यापत्रांचा गळाठा; गबाळ. पहा : **गाबाळ**

गवाळी स्त्री. भिंत व वळचण यामधील मोकळी जागा. (व.)

गवाळी आसन न. लोकरीचे आसन.

गवाळे न. १. सोवळे, उपकरणी, देव ठेवण्याचे लोकरीचे वस्त्र किंवा पिशवी; बासन : 'माळा गवाळीं आसनें।' – दास २.७.८२. चंबूगबाळे असाही शब्द येतो. २. बोचके; सामानसुमान (गो.). (वा.) ० **आटोपणे, आवरणे –** १. पळ काढणे; निसटून जाणे. २. कामावरून काढला जाणे; स्थानभ्रष्ट होणे. ३. मरणे. **गवाळ्यात घालणे, टाकणे –** ताब्यात घेणे; थैलीत टाकणे; मुठीत ठेवणे.

गवाळेचवाळे न. (व्यापक रीतीने) सामानसुमान; चीजवस्तू; बोचके.

गवाळ्या वि. १. गवाळे नेणारा. २. ज्याच्यापाशी गवाळे आहे तो.

गवाक्ष पु. न. १. वारा व प्रकाश येण्यासाठी घराला ठेवलेले भोक; लहान खिडकी; जंगी; धारे; झरोका; साणे : 'मग माहार्णवगवाक्षें। रिघोनि ठेला।।' – ज्ञा ११.६१. २. बैलासारखे डोळे असणारे एक माकड. ३. (ल.) गव्याचे शिंग : 'गवाक्ष नव्हे हाड।' – तुगा ३४२. [सं.]

गवाक्षजाल न. जाळीदार खिडकी; जाळी.

गवाक्षप्रसाधन न. गिऱ्हाईक आकर्षित करण्यासाठी दुकानाच्या दर्शनी भागात केलेली वस्तूंची आकर्षण मांडणी.

गवांद स्त्री. भागी; भागीदारी. (खा.)

गवांदी स्त्री. हेटाळणी.

गवांदी स्त्री. मिश्रण : 'मीळे मुनीची मांदी। तरि निंदास्तुतिची होय गवांदि।' – उगी १८५.

गवांदी स्त्री. भागीदारी.

गवांद्या वि. भागीदार; वाटेकरी; सोबती; भिडू. (खा.)

गवी स्त्री. १. लोहाराचा चिमटा; सांडस इ. पहा : **गावी–वी** २. दरोडा घालण्याची कुऱ्हाड व कंगट्टी (घरफोडीचे एक हत्यार). दरोडा घालण्यापूर्वी यांची पूजा करतात. (कैकाडी)

गवी स्त्री. सरकारी अधिकाऱ्यांनी केलेली जमाबंदी किंवा सोडलेले हुकूम मान्य न करणाऱ्या गावकऱ्याची जूट.

गवी स्त्री. गव; हातांची कव; मिठी; पकड; खेव; झेप : 'समय पाहून त्वरित धाऊन येऊनया गवीं गवून स्वधनु घेऊन जाई हो।' – होला २२. (वा.) **गवेस येणे –** तावडीत सापडणे : 'सेवकांचे गवेस आलियावर कार्य करावयासी चुकत नाहीं.' – पेद २२.२८१.

गवी स्त्री. १. गुहा : 'मग चंद्रगिरीगवींत हरुषत।' – दावि १०१. २. आतून पोकळ असलेली धान्याची गरी, उडवी. (माण.) ३. डोंगरातील गायरान. [क.]

गवेची स्त्री. खड्डा.

गवेषण–णा न. स्त्री. गवसणी; शोध; तपास; चौकशी; तलास अन्वेषण: 'ते तुमतें न देखोन। करितील वो गवेषण।' – रास १.५४९. 'येऊनि नरदेहाप्रती। कर्त्याची गवेषणा जे करिती।' – एभा ७.२४९. [सं.]

गवेंडा पु. शिताफळासारखे एक रानटी झुडूप.

गव्य वि. गाईसंबंधी; गाईपासून झालेले (दूध, दही, तूप इ.) जसे :- पंचगव्य. न. गोरस. [सं.]

गव्हर वि. गावंढळ; अडाणी. पहा : **गवार**

गव्हर न. १. गुहा; दरी; कंदरा; गुंफा; विवर : 'जैसा सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासुनी।' – आसी ६३. २. (ल.) हृदगत; गूढ अर्थ; अभिप्राय; अंतरंग : 'वेदाचें गव्हर न कळे पाठकां। अधिकार लोकां नाहीं येरा।' – तुगा २५१४. [सं.]

गव्हर–रू पु.गहिवर : 'जो अें दु:खाचा पुरूं। तों सांगितां गव्हरू। सावरेना ।।' – शिव १०३.

गव्हरणे अक्रि. विवरण करणे; गूढार्थ सांगणे : 'पंचमीं गव्हरिलें। योगतत्त्व ।।' – ज्ञा १०.२५.

गव्हला पु. एक सुगंधित द्रव्य; प्रियंगू; यांचे झाड लहान असून सुवासिक तेले, उटणे, उदबत्ती वगैरेसाठी उपयोगी असते. हा तुरट व शीतल असून वांती, दाह व पित्त यांचा नाशक आहे. [सं. गंधकला]

गव्हला पु. १. बोटवा; दुधात भिजविलेल्या गव्हाच्या पिठाची किंवा सपिटाची दोन बोटात वळून केलेली लांबट वळी. याची खीर करतात. २. गव्हाच्या रुचीचे एक फळ. [क. गवुलि] [सं. गोधूम वलयम्]

गव्ह(व्हा)ळा–ळ्या वि. १. गव्हाच्या रंगाचा. २. गव्हासारखे ठिपके असलेला (साप, जनावर) : 'वय नूतन हातीं निऱ्या चालणें चपळ जशी नागीण गव्हळी।' – होला ८७. ३. गव्हाच्या पिकास योग्य (शेत जमीन). ४. गदरलेले; पक्व दशेस आलेले; पिवळे जर्द (फळ.) [सं. गोधूम]

गव्हा, गव्हाई स्त्री. साक्ष; साक्षीदार. पहा : **गवाय** (व.) [फा. गवाह]

गव्हाई स्त्री. पळापळ; पांगापांग : 'त्यावरी विलायती गव्हाई झाली.' – फडतरे चऱ्होलीकर महजर.

गव्हाई वर्षभराच्या सेवेपोटी हंगामात द्यावयाचे धान्य. (अहि.)

गव्हाची माळ स्त्रियांच्या गळ्यातील गव्हासारख्या आकाराच्या मण्यांची माळ; एक अलंकार. – (तंजा.)

गव्हाण–णी स्त्री. १. गाताडी; गुरांना चारा घालण्यासाठी केलेली जागा. २. गोठ्यात गुरे उभी राहण्याची जागा व भिंत यांच्या दरम्यान घातलेले आडवे लाकूड, किंवा तुराट्याचे कूड. यामुळे वैरण गुरांच्या पायांखाली येत नाही. (व.) [सं. गवादनी]

गव्हाण–न न. पांगळ्याच्या हातातील टेकण.

गव्हान न. आश्रयस्थान : 'हिंडतां गव्हानें गा शिणलों येरझारी।' – तुगा ३४९. [सं. गव्हार]

गव्हार–रू वि. मूर्ख; अडाणी. पहा : **गवार** : 'गव्हारू निद्रासुखें। घर जळत असे तें न देखे–' – ज्ञा १३.७४२.

गव्हार वि. दंगेखोर; लुटारू : 'झाशीहून कूच करोन पुढें जावें तों बातमी आली की, १०–१२ कोसांवर गव्हार २–३ हजार जमा झाले आहेत...' – ऐलेसं २७८७.

गव्हार न. अंतरीचे गूज; अंतर्गत हेतू : 'त्याचे गव्हार स्वामीनी चित्तांत आणून अंगिकार करावा निमित्त की पूर्वापार स्वामीचे पदरीचे आहेत.' – पेद.

गव्हार न.पु. गुरांचा कळप. (अहि.)

गव्हारी पु. गुराखी : 'गव्हाऱ्यांनी बाप्पाजींच्या राखीव खपांत चारणीस घातलेली जनावरें रानाच्या आडोशाला नेली.' – सराई ५.

गव्हारी पु. (ठाकूर लोकात) नवरा मुलगा लग्नमंडपात शिरण्यापूर्वी हातात काठी धरून उभे राहणारे दोन मुलगे. – बदलापूर १४८.

गव्हाळ–ळी वि. पहा : **गव्हळा** २,३ : 'गव्हाळे तैसेचि शंखपाळ। विषधर सारखेचि व्याळ।' – गीता १.३६९.

गव्हांडा पु. गव्हाचे कूट, कुटार. पहा : **गवडा** (व.)

गव्ह्या वि. गव्हाच्या पोळीचा पाहुणचार करण्यास योग्य (पाहुणा).

गस्त, गस्ती स्त्री. १. रात्री संरक्षणार्थ काढलेली फेरी; रखवाली; जागल; फिरता पहारा : 'देती गस्तीवर गस्ती।' – ऐपो १६९. २. जागल करीत फिरणे; पहारा करणे. ३. जागल करणारे शिपाई किंवा पहारेकरी : 'फिरे काळ गस्ती।' – दावि २१६. [फा. गस्त]

गस्त न. १. दोन खांब किंवा तुळवटे यामधील जागा; खण; सोपा. २. गावातील एका भागाची व्याप्ती; पेठ; वॉर्ड. (को.) [फा. गश्त]

गस्त भोवळ; चक्कर; घेरी. (व.)

गस्तकरी पु. गस्त घालणारा शिपाई; पहारेकरी.

गस्तंगर, गस्तगिरी न. स्त्री. फेरी; व्यापाऱ्याची फेरी; उत्पन्न पाहून दरदाम इ. समजून घेण्याकरिता गावोगावी किंवा बाजारात घातलेली फेरी; व्यापार पाहण्यासाठी फिरती.

गस्तंगीर पु. गस्तंगर करणारा, फिरता व्यापारी.

गहजब पु. १. कडेलोट; हद्द; परमावधी. (क्रि. होणे.) २. टीका; निंदा : 'वर्तमानपत्रांतून गहजब चालला होता.' – दुर्दम्य. ३. आरडाओरडा : 'आकाश कोसळले असा गहजब वयातीतांकडून पूर्वापार करण्यात येत असे.' – नकावा ९९. ४. जुलूम; हाल. ५. कठीण प्रसंग; संकट. [अर. घझब] (वा.) ० **ओढवणे, गुदरणे, येणे –** संकट कोसळणे; भयंकर परिस्थिती निर्माण होणे. ० **करणे, मांडणे –** जुलूम करणे; हैदोस घालणे.

गहजर पहा : **गजर**

गहजरी स्त्री. जोराचा तडाखा; महत्संकट; जिवावरची पीडा. गजब शब्दाबद्दलही योजतात. (क्रि. गुदरणे, होणे.)

गहजोरी स्त्री. मस्ती; बदमस्ती; जबरदस्ती; मूठमर्दाई; दंगा : '... पारगाऊकरी यैसी गहजोरी केली.' – शिचसाखं २.११७.

गहदम क्रिवि. वेळोवेळी; एकसारखा; सतत.

गहन वि. १. बिकट मार्गाचा, वाटेचा; जाण्यास, पोचण्यास अवघड; दुर्गम (नदी, रस्ता, अरण्य, डोंगर). २. दुर्ज्ञेय; जाणण्यास अवघड; समजायला कठीण (शास्त्र, ग्रंथ, काव्य) : त्यांचा अर्थ न कळे गहन। अज्ञान जनां कलियुगीं।' – भवि २.१. ३. गाढा; जाडा : '(जोतीराव) हे कवी आहेत, इतिहासज्ञ आहेत, मोठे गहन भाषापंडित आहेत.' – नि ४५८. ४. दुर्घट; दुष्कर : 'तें याग अथवा दानें। तपादिकें ही गहनें।'

– ज्ञा १७.४०६. ५. थोर; श्रेष्ठ : 'परमगहन अति सुशील, सत्य उपाय, सत्य अंतरीं। सूर्यवंशीचा राव जसा हरिश्चंद्र अयोध्यापुरीं।' – ऐपो २१९. ६. अमानवी. [सं.]

गहन न. १. संकट : 'मा पडिलिया गहन कवण तयाचें।' – ज्ञा ८.६३. २. अरण्य. [सं.]

गहनगति–ती वि. गूढ; अगम्य; खोल; गुप्त मार्गाचे.
स्त्री. गूढ व्यवहार, रस्ता, मार्ग; अगाध लीला. [सं.]

गहनबुद्धि–द्धी वि. खोल, गाढ बुद्धीचा, कल्पनेचा. [सं.]

गहना, गहिना, गहनागाठा पु. १. किडूकमिडूक; दागिने; अलंकार (व्यापक अर्थी). २. (सामा.) दागिना; भूषण; अलंकार : 'खुशालिनें घातला ग अंगावर फार गहिना।' – प्रला १४३. [हिं. गहना]

गहरेपणा पु. दृढता; सांद्रता : 'तुमच्या दृष्टींत मला प्रेमळपणाचा ओलावा दिसे, पण विचारी गहरेपणा कधींच दिसला नाहीं.' – काढा.

गहवर न. रहस्य; गूढ : 'तेथचे कृपागहवर। कवणा कळे।' – ज्ञाप्र ३०.

गहं पु. गहू. (गो.)

गहाण न. १. तारण; कर्ज देताना ते वसूल होईल किंवा नाही यासाठी विश्वासार्थ जो माल (दागिना, घर, जमीन) घ्यायचा तो. २. (कायदा) कर्ज फेडले जाईल किंवा दिलेले वचन पुरे होईल अशाकरिता माल तारण देणे : 'कर्जानें घेतलेली रक्कम फेडण्यासाठी किंवा इतर आर्थिक जबाबदारी पार पाडण्यासाठीं तारण म्हणून जेव्हां स्थावर मिळकतीवरील एखादा मालकी किंवा इतर हक्कसंबंध (इंटरेस्ट) मालक दुसऱ्या इसमाला तबदील करून देतो तेव्हां त्या व्यवहारास गहाण अशी संज्ञा आहे.' – घका २९. [हिं. गहना] (वा.) ० **डुलणे** – कराराप्रमाणे फेड न झाल्यामुळे गहाण ठेवलेली वस्तू सावकाराच्या मालकीची होणे : 'जेष्ठअखेर रुपये देऊ यैसा वायेदा करतात, नाहीं तर गहाण डुले, याप्रमाणें करार आहे.' – वै ३.८. ० **लहाण करणे** – कर्जाची रक्कम व्याज धरून तारण ठेवलेल्या मालमत्तेपेक्षा जास्त झाली तर गहाणदाराला ती मालमत्ता देऊन व्यवहार संपवणे.

गहाणखत–चिठ्ठी–पत्र–रोखा न. स्त्री. पु. १. ज्या पत्राने गहाण टाकलेल्या मिळकतीचा कबजा सावकाराला देण्यात येतो ते. २. विद्यमान किंवा पुढील कर्जाबद्दल एक मनुष्य स्वत:च्या मिळकतीवर दुसऱ्याला काही हक्क उत्पन्न करून देतो असा लेख; ऋणको व धनको या दोघांमध्ये झालेला, पैसे व त्याबद्दल गहाण पावल्याचे कबुलीचा लेख.

गहाणदार वि. तात्पुरते गहाण धारण करणारा; ज्याच्याकडे गहाण आहे तो (इसम).

गहाणवट क्रिवि. गहाणात; गहाणासारखी.
वि. गहाण ठेवलेली (वस्तू).

गहाणाचा व्यापार, रोजगार गहाणावर पैसे कर्जाऊ देण्याचा धंदा; सावकारी.

गहाळ, गाहा(ह)ळ वि. १. नष्ट; हरवलेला; गैरविल्हे लागलेला; गमावलेला; चुकलेली (वस्तू, प्राणी). २. गफलती; गोंधळी; अव्यवस्थित; विसराळू (मनुष्य, काम). (क्रि. होणे.)[सं. गाह् = लपणे]

गहि स्त्री. १. पहा : **गई.** २. गईच्या समीपचा प्रदेश. ३. सोनाराचे एक हत्यार. ४. क्षमा.

गहिगट न. कुसुंब्याचा खाली उतरलेला गाळ, रेंदा; गरगट. (वा.) ० **काढणे** – जबर मार देणे; भीतीने लेंड्या गाळायला लावणे. ० **जमणे** – परस्परांशी, एकमेकांशी दृढ मैत्री जमणे.

गहि(ही)न–ण वि. गरीब; दीन; सात्त्विक; थंड; धिम्मा; शांत; सौम्य; दयाळू सालस; क्षमाशील (माणूस). [सं. गहन]

गहि(ही)र वि. गंभीर : 'निनादें अति गहिरे।' – ज्ञा १.१४६.

गहिरणे अक्रि. गहिवरणे; दु:खी होणे : 'माहा जीव गेला। कशी गहरे साऱ्या रात भरजरीचा पदर। भिजला सवा हात।' – वलो ६८. (व.)

गहिरा वि. १. गडद; दाट; पक्का; जबर; चांगला खुललेला (रंग). २. खोल; दाट; निबिड; गाढ (पाणी, पीक, जंगल, छाया, झोप). ३. गर्द रंगाने रंगविलेले (वस्त्र). ४. मोठा; उंच; कडाक्याचा (आवाज, स्वर) : 'भाट गर्जती गहिरावचनीं।' – भारा बाल ७.५५.[सं. गभीर]

गहिरी नजर मनात भरणारी, हृदयाला चटका लावणारी नजर, दृष्टी.

गहिल वि. गहिवरलेले; सद्‌गदित : 'किती आगय घालू माझ्या गहिल मनाले।' – दपा १.१५. (व.)

गहिला, गहिल(रा)दा वि. वेडा; गैरशिस्त; अज्ञानी; अडाणी. [सं. गहिल]

गहिल्ले वि. घेतले : 'दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे–' काव्यालय १५३.१०.

गहि(हिं)वर पु. प्रेम, शोक–दु:खादी विकारांच्या अतिरेकाने रडे येण्यापूर्वी कंठ दाटून येण्याची अवस्था; कंठ दाटणे; हुंदका; मनोविकारांचा उमाळा : 'मग अत्यंत उद्वेगला। न धरत गहिंवरू आला।' – ज्ञा १.२६९. [सं. गव्हर] (वा.) ० **करणे** – शोक करणे : 'त्यास दैवहीन आम्ही दु:ख देण्याकरिता जन्मास आलो, असा गहिवर केला.' – शिप्रब १११. ० **घालणे** – शोक करणे; छाती पिटून रडणे : 'त्यो काय मेलाय व्हय गहिवर घालायला?' – बनगर ७३.

गहिवरणे अक्रि. गहिवर येणे; कंठ दाटून येणे; सद्गदित होणे (आनंद, दु:खादिकांमुळे) : 'पडुनि गळां गहिवरल्या सीतेच्या कन्यका तशा गमल्या।' – मोरा १.४६१.

गहिवरी वि. रडे आणणारे : 'गाई करून गहीवरी कवन।' – प्रला ११.

गहिस वि. १. जड; भारी : 'जें हळुवट ना गहिंस। जें चिवळ ना सपोस।' – एभा ३.६७९. २. प्रचंड : 'प्रळयकाळीं अति गहिसू। अगाध उथळे जळोल्हासू।' – एभा ३.१७४.

गहिसपण न. मूर्खपण : 'आणि मेलिया तरी रडती। परि असतें जात न गणिती। गहिंसपणें।।' – ज्ञा ९.५१३. [सं. गर्विष्ठ, ग्रामकर:]

गहिसर, गहिसरा पहा : **गइसरा**

गहिसास वि. अडाणी; अज्ञानी; मंद : 'जें कां कडाडां आणि गहिंसासा। नीच नवा तूं किं।।' – राज्ञा ११.९७.

गही–ह्या स्त्री. पु. समुद्राची मोठी लाट.

गही स्त्री. छपराची खालची बाजू; वळचणीची गळी; पागोळी : 'माहा जीव गेला। जन बैसले कहीचे। वाट पाहातां कोणाची। वेळू उपसा गहीचे।' – वलो ६८. (व.)

गहीन वि. गहन; कठीण : 'आणा घालती गहीन तात्याबाची बहीण...' घाश्रलो १३६.

गहीन न. १. अरण्य. २. संकट : 'वडीलपन्नाला किती चालू मी गहीन।' – जामामा २१९.

गहुला, गहुळा पहा : **गव्हला**

गहू पहा : **गवा** (पशू)

गहू पु. एक धान्य. हे धान्य फार पौष्टिक आहे. [सं. गोधूम] (वा.) **गव्हाची कणीक करणे –** श्रम कमी करण्याच्या प्रयत्नात श्रमाची वृद्धी करणे (कुणब्याने उलटून फसविल्याची वेताळाची एक जुनी कथा आहे तिजवरून).

गहू पु. तळहातावरचे एक शुभ मानले गेलेले गव्हाच्या आकाराचे चिन्ह : 'या पोरीच्या हातावर गहू नाही. हिला कांहीं कोणत्या गोष्टीत यश यायचं नाही.' – पलको ८३. [सं. गोधूम]

गहूगिळ्या वि. मुकस्तंभ; मूगगिळ्या.

गह्यर पु. गहिवर : 'तरि दुखे दाटत असे गह्यरू।' – उगी १४६.

गह्यारा वि. खूप, भरपूर : 'बरं ताई, मले गह्यरी कामं आहे.' – कंदील. (अहि.)

गह्याटणे अक्रि. थकणे; क्षीण होणे; गळाठणे; 'बुढा वज्जर गह्याटला... बेमार होता का?' – धग २१०.

गळ पु. १. मासे धरण्याचा लोखंडी आकडा; गरी : 'परी तयामाजीं गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये।' – ज्ञा २.२१४. २. विहिरीत पडलेली वस्तू वर काढण्यासाठी एका लोखंडी कडीला पाचसहा आकडे (हूक) अडकवलेले असतात ती कडी. ३. नवस फेडण्याच्या बगाडाचा आकडा. हा वाघ्या, मुरळी किंवा नवस फेडणारा हे आपल्या पाठीत अडकवून घेतात : 'केले गळाचे नवस।' – दास २.६.२९. ४. फाशीचा फास; आकडा. [सं. गल = दोरी] (वा.) ० **काढणे –** (चर्मकार) जोड्याच्या सगळ्याचे तुकडे करणे. ० **घालणे –** १. भीड घालणे; अत्याग्रह करणे. २. जबरदस्ती करणे. ० **घेणे –** ओळकंबणे. ० **टाकणे –** लालूच दाखवणे. ० **टाकून पाहणे –** १. उद्योग, प्रयत्न करणे; ठाव घेणे. २. अंदाज घेणे; अजमास घेणे. ० **टाकून बसणे –** लालूच दाखवून एखादी व्यक्ती केव्हा वश होते याची वाट पाहत राहणे. ० **टोचणे –** शरीरात लोखंडी हूक अडकवून देवाचा नवस पूर्ण करणे. **गळाला, गळी लागणे –** १. कोंडमारा होणे; फास लागणे (दाव्याच्या आवळण्याने वासराला). २. (ल.) यातनेत पडणे, गुंतणे; फासात अडकणे (अपेक्षा, आशा, लालूच इत्यादीच्या). ३. न झेपेल इतक्या मोठ्याने ओरडण्यामुळे त्रास होणे. **गळास, गळी देणे –** १. फाशी देणे (माणसाला). 'कोड्याळचा किल्लेदार महमंदअली कुमदान यास टिपू यांनी गळास दिले.' – दिमरा ३७१९. २. (ल.) मोठ्या संकटात, क्लेशात घालणे.

गळ स्त्री. विनवणी : 'तिच्यादेखत एकदा त्याचें लग्न झालं पाहिजे म्हणून त्यांची एवढी गळ.' – पलको ४५.

गळ न. दमेकऱ्याची धाप; कण्हणे; कुंथणे; दमा. (राजा.)

गळ स्त्री. स्राव; पाझर; सतत प्रवाह (दुखऱ्या डोळ्यातील पाण्याचा, क्षतातील पुवाचा); पडझड; गळती (जोराच्या वादळाने फळे किंवा मोहोर यांची). [सं. गल] (वा.) ० **लागणे –** एकसारखे पडत राहणे.

गळ स्त्री. गोट्या खेळण्याची गली, खाच. पहा : **गल** [सं. गर्ता]

गळ पु. शिमग्याच्या दुसऱ्या दिवशी भरणारी जत्रा, उत्सव. (ना.)

गळ पु. गळा. पहा : **गल** [सं. गल्ल]

गळकघटक क्रिवि. गटागट : 'गळकघटक पाणी गिळल्याचे...' विभूत ११४.

गळकंथा पु. गळ्यात घालण्याची कफनी.

गळका वि. गळणारा; पाझरणारा; फुटका.

गळखंड पु. गळाच्या ज्या भागाला आमिष लावतात तो भाग : 'जैसा गळखंडाचिये भेदीं। न शके मीन आपण।' – कथा ४.१५.४०.

गळखुटी स्त्री. नाठाळ जनावराच्या एका पायाला व गळ्याला बांधायची दोरी. (व.)

गळखोडा पु. (कुस्ती) प्रतिपक्षाच्या गळ्याभोवती पायांचा विळखा घालण्याचा डाव.

गळगट न. अंगावरून लपेटून, गळ्यामागे गाठ बांधण्याचा धोतराचा भाग.

गळगनेर न. लग्नाआधी नवऱ्या मुलाला किंवा नवऱ्या मुलीला बोलावून देतात तो उपाहार; केळवण : 'गळगनेर बाई करते माही माय।' – राके ८१.

गळगळ क्रिवि. उतावळीने खाताना किंवा पिताना होणाऱ्या आवाजासारखा; गटागटा; ढसाढसा. [ध्व.]

गळगळघाशी वि. खाण्याला पुढे पण कामाच्या वेळी अंगचुकारपणा करणारा; भोजनभाऊ; ऐतखाऊ.

गळगळा क्रिवि. रडकुंडीस, काकुळतीस येऊन; गयावया करून (प्रार्थिणे, मागणे.). (क्रि. येणे.)

गळगळाट पु. रेलचेल, भरपूर; तुडुंब. [गळणेचे द्वि.]

गळगळी स्त्री. काकुळत; गयावया : 'गळगळीचा स्वर.' – श्रुति गु ८८.[ध्व.]

गळगळीत वि. १. पचपचीत; बेचव; पाणचट (पक्वान्न). २. पुळपुळीत; निरर्थक; अर्थबोध न होणारे. ३. (सामा.) गुळगुळीत, मऊ व तजेलदार. ४. सैल; विस्कळीत. (गो.)

गळगळीत वि. काठोकाठ; भरपूर; तुडुंब.

गळगळॉ पु. गुटी; काढा, अर्क. (गो.)

गळगंड न. गंडमाळा; गळ्याच्या मांसग्रंथींची वाढ (आवाळू, वाळूक इ.). [सं. गलगंड]

गळगा पु. गळती.

गळगुं(गूं)ड न. १. गाय किंवा बैल यांची मानेखालची पोळी. २. अजागलस्तन. ३. गळ्याखालची गाठ; गलांड.

गळगोटी पहा : **गळगुंड** १

गळग्रह पु. पहा : **गलग्रह.** १. मानगुटी धरणारा पुरुष; डोईजड माणूस. २. (ल.) फार त्रास देणारा; विनवणी किंवा बळजबरी करून पाठ पुरविणारा माणूस; जिगजिग लावणारा भिकारी; तगादेदार; धरणेकरी; वेठीला धरून कामे करून घेणारा. ३. (नियमितपणाच्या अभावी, अविश्वासाने) थांबविणारा, अडथळा आणणारा, हरकत किंवा प्रतिबंध करणारा, खोळंबविणारा माणूस. ४. लोढणे; खोडा; प्रतिबंध; फास. ५. आग्रह; जबरी. (क्रि. घालणे.) ६. गळ्याला येणारी सूज; गळा धरणे. ७. एक प्रकारचा चिमटा (तापलेली भांडी उतरवण्याचा). ८. (ज्यो.) एक दुष्ट ग्रह. [सं. गलग्रह]

गळघाटी स्त्री. १. गळ्यापुढचे हाड; घाटी; मणका; घसा. (गळा श्वासनलिका व अन्नमार्ग यांच्यासह) २. बैलाच्या गळ्यातील घंटा.

गळचढाव पु. न. फाशी : 'अपाजीराव यांस गळचढाव केले.' – ऐलेसं ३९६९.

गळचं(चो)डी स्त्री. १. मान. (क्रि. धरणे.) २. गचांडी; अर्धचंद्र (क्रि. देणे.).

गळचिपी स्त्री. १. मानगुटी धरणे; गळा दाबणे. २. (ल.) खोटी; तहकुबी; आशेत लोंबकळत ठेवणे. ३. पिच्छा; अति आग्रह; तगादा; खणपटी; पाठपुरावा. (क्रि. धरणे, आवळणे, करणे, लावणे.)

गळचुटी-ट्या, गळेचट्या, गळचोट्या स्त्री. १. गळघाटीची सूज. (क्रि. बसणे, येणे, फुगणे, होणे.) २. (निंदार्थी किंवा सूचकतेने) श्वास किंवा अन्ननलिका. (क्रि. भरणे, धरणे, चेपणे, फोडणे.) ३. अजागलस्तन. ४. (क्व.) बैलाच्या मानेखालची पोळी.

गळचुबा पु. (बडोदे) बायकांच्या चिंचपेटीप्रमाणे पुरुषांच्या गळ्यातील एक अलंकार.

गळचेपी स्त्री. १. पहा : **गळचिपी.** २. कोंडमारा; दडपणे; न जुमानणे; फेटाळणे : 'सरकार लोकांच्या हक्कांची गळचेपी करते.' – के. २७.५.३०. ३. जे करावेसे वाटते ते करू न देणे; स्वातंत्र्य दडपून टाकणे; अन्याय, दुःख, तक्रारी इ. व्यक्त करण्यास मनाई; मुस्कटदाबी : 'सरकारचे नवे नवे कायदे लोकांची अधिकाधिक गळचेपी मात्र करीत आहेत.' – दुर्दम्य २.५.

वि. गळ्याला दोन भोवरे असलेला. हे अशुभचिन्ह समजतात. (माण.)

गळछडी पहा : **गळदांडी** : 'मी गळछडी घेऊन मासे मारण्याचे निमित्त करून बसू लागलो.' – आआशे २१९-२०.

गळजोट-ड पु. जीवश्चकंठश्च मैत्री : 'बाह्य इंद्रियांची चडफड। शमेसि करावा गळजोड।' – एभा २५.५४.

गळण न. गरळ; सापाचे विष. (गो.) [सं. गलन]

गळणी स्त्री. १. गळती; पाझर; स्राव. २. चाळण; गाळणे; नरसाळे.

गळणे अक्रि. १. झरणे; पडणे; ढळणे (सुटून, उकलून, मोठा होऊन); वरून खाली पडणे. (फळे, फुले भिंतीचा गिलावा). २. ठिबकणे; पाझरणे; वाहणे (पाणी, दाणे इ. जिन्नस). ३. वाहणे; पाझरणे (भांडे, नाव इ.). ४. निचरणे; लस वाहणे (बरबरीत व्रण, क्षत); वाहणे; झिरपणे (पू). ५. क्षीण होणे; अशक्त होणे : 'हिंडे वनोवनीं तो अन्नावांचूनि बहु गळाला हो।' – मोवन ४.१०४. ६. रोडावणे; हाडकणे. ७. गमावणे; खचणे; नाश पावणे. ८. नाहीसे होणे; अंतर्धान पावणे; मालवणे : 'सुर असुर तई मी बैसवी वेगळाले। सहजरिपु तरी ते भाव त्यांचे गळाले।' – वामन, बालक्रीडा ५१. ९. घालविले जाणे; नापसंत होणे. १०. कमी होणे; उणावणे. ११. खचणे; गमावणे; तुटणे; मृतप्राय होणे (धैर्य, विश्वास, आशा) : 'त्यावरि पांडुसुतांतें दूरुनि पाहुनि भये गळाले हो।' – मोशल्य ३.७३. १२. थकणे : 'एक स्वव्यसनीं सहाय हय जो होता सखा तो गळे।' – मोकृष्ण २३.५७. १३. ढळणे; चळणे : 'निज व्रतापासुनि त्या गळाल्या।' – सारुह १.६९. १४. वितळणे (धातू इ.). १५. कचरणे; कांकू करणे (माणसाने). १६. सुटणे; विसरणे (विषय, मुद्दा.) १७. रेतस्खलन होणे; खळणे. १८. फाटणे; जीर्ण होणे; न्यूनता असणे (पुस्तकात पानांची). [सं. गलन]

गळतंतू पु. गळसरी; जानवे : 'गळतंतुवत भजन हो।' – दावि १७७.

गळती स्त्री. १. अभिषेकपात्र; देवावर अभिषेक करण्याचे, तळाशी छिद्र असलेले धातूचे किंवा मातीचे भांडे : 'कीं त्या भूलिंगास निर्मळा। गळत्या लाविल्या अधोपंथी।' –पांप्र ४.१२३; ज्यातून पाणी गळत असते असे कोणतेही पात्र. २. देवावरील पाण्याची संतत धार; अभिषेक. ३. ठिबकणी; पाझरणी; पाघळणी : 'तापार्तांची गळती जी पासुनि अमृतबिंदु शीतल गळती।' – मोरा १.३४२. ४. गळ (डोळ्याला लागणारी). ५. पहा : **गळते.** (वा.) **० लागणे** – १. पाणी गळणे. २. संख्या कमी होत जाणे. 'राष्ट्रीय शाळेलाही गळती लागली.' – माजी २३२. ६. झुरणी; निचरा; स्खलन; पतन.

गळती स्त्री. (जोराच्या वाऱ्याने झाडावरून) फळे पडत राहणे. [सं. गल्]

गळती स्त्री. गड्डे वजन करण्यासाठी ज्यात लोंबकळवितात तो सरफास (दोरीचा इ.). [सं. गल्]

गळते न. गळण; पाझरण; ठिबक; बुळकी; भोक; ज्यातून गळते ते छिद्र. (वा.) **० काढणे –** गळणे बंद करणे; भोक बुजविणे.

गळदगे वि. ओढायला कडक असलेली (विडी).

गळद(ध)ट वि. १. कोडगा. २. छांदिष्ट; बेफाम व गाफिल.

गळदंड पु. गळ्यातील साखळी, हार : 'रिते कुंजर गळदंडीं।' – एरुस्व ७.५६.

गळदं(दां)डी स्त्री. जिला गळाची दोरी बांधली आहे अशी काठी : 'गळदांडीने नदीचे मासे मारण्याचा...' – पांका ९७. 'तो त्या तळ्याला, त्यातील माशांना, हातातील गळदंडीला शिव्या घालीत बसे.' – गणूराया ४३.

गळपट स्त्री. गफलत; नजरचूक; भूल; भ्रम; दृष्टिदोष.

क्रिवि. १. बळकट; घट्ट; गच्च. (क्रि. बांधणे, आवळणे, धरणे.) २. ठासून; चेंदून; कचकावून. (क्रि. भरणे.)

गळपट स्त्री. गळा; मान : 'थोरल्या बहिणीचा नवरा आला नि त्याची गळपट पकडून ओरडला...' – चिताक ३४.

गळपटणे अक्रि. गहाळ होणे; अनेक वस्तूंत एखादी वस्तू मिसळल्याने ती सापडेनाशी होणे : 'नटश्रेष्ठचे मूळ हस्तलिखित सामानातच कुठे गळपटले होते.' – नटश्रेष्ठ ३.

गळपट्टा पु. १. चारसहा बोटे रुंद व तीन हात लांब विणलेले, गळ्याभोवती बांधायचे लोकरीचे वस्त्र. २. कुत्र्याला साखळी बांधण्यासाठी त्याच्या गळ्याभोवती घातलेला चामड्याचा पट्टा.

गळपट्टी स्त्री. १. कॉलर : 'ज्या बहाद्दरांनी इंग्रजी पाटलून... इंग्रजी गळपट्टी वगैरे सुधारणेची सामग्री आपलीशी करून टाकली.' – नि ९१३. २. (कुस्ती) जोडीदाराच्या गालफडाच्या खालून आपल्या हाताच्या पुढील भागाने त्याच्या गळ्यावर पट्टी बांधून (दाब देऊन) त्याला चीत करणे.

गळपत्तर वि. गळून गेलेला; थकलेला. (व.)

गळपाते न. मोटेचे जू. (व.)

गळपेंडे–ढे न. खुंट्याला बांधलेल्या जनावराच्या दाव्याला जोडलेला गळबंद. हा चामड्याचाही असतो.

गळफटणे–विणे, गळफाटणे उक्रि. १. गुंतागुंत करणे; घोटाळा माजवून एकमेकांत गुरफटविणे (दोरा किंवा त्याच्या जाळ्यात एखादी वस्तू); गोवणे; गुंतविणे; घोटाळ्यात घालणे. २. (ल.) हरविणे; सांडणे; गमावणे; पाडणे. [फा. गफलत]

गळफ (फा) टा पु. गुंतागुंत; घोटाळा; अव्यवस्थित किंवा गुरफटलेली स्थिती (वस्तू, प्राणी, माणसे यांची).

गळफटा पु. १. गळफास; २. संकट; अडचण : 'गाफलीनें (गाफिलीनें) गळफट्यांत आल्यास कामीं पडणार नाहीं.' – होकै १६४.

गळफाशा वि. हट्टी; अत्याग्रही (भिकारी).

गळफास पु. १. सरफास; गळ्याला घातलेला फास; फाशी देण्याचा फास. २. जीव जावयाजोगा दोरीचा वेढा (गुरे इ. च्या गळ्याला). (क्रि. देणे, घालणे.) ३. एक डाव. डाव्या हाताने मान धरून उजव्या हाताच्या बोटांनी प्रतिपक्षाचे नरडे दाबणे. [सं. गल+पाश] (वा.) **गळफास घेणे –** स्वतःच्या मानेला फास लावून लोंबकळणे; मरणे; जीव देणे; आत्महत्या करणे. **गळफास देणे –** दुसऱ्याच्या गळ्यास फास लावणे; मारणे.

गळफासणे अक्रि. गळ्याला फास लावणे, लागणे.

गळबटणे पहा : **गळपटणे** : 'कुठं गळबटलं असेल पसाऱ्यात.' – गागो ४०.

गळबळीत वि. १. मनाचा मोकळा; सरळ बुद्धीचा, सलगीचा; भला; निष्कपट (मनुष्य इ.). २. ढिला; सैल; भोंगळ; गैदी; गबाळ (मनुष्य, पोषाख, कृत्य, कार्य इ.).

गळबळीतपात्र न. गबाळ माणूस.

गळबंद पु. १. खोगिराचा पुढील बंद. २. दोर (गुराला दावणीला बांधायचा). पहा : **गळपेंडे.** ३. गळ्याभोवती विशिष्ट तऱ्हेने बांधायची पट्टी; नेकटाय : 'मोजे, बूट, गळबंद इत्यादिकांसंबंधीही विशिष्ट पद्धत ठरली असल्याने...' – सासं २.२१२.

गळमोडी स्त्री. मान मोडणे 'आवर्तू गळमोडी मारुनि बका धात्री घडी पूजिली.' – गस्तो ७७.

गळवट–णा–णी, गळवंड वि. क्रिवि. गळ्यापर्यंत भरलेले; काठोकाठ भरलेले (भांडे); तोंडोतोंड; भरपूर; तुडुंब.

गळवटी, गळवडशी स्त्री. मानेखालची पोळी. पहा : **गळगोटी**

गळवणी न. गाळलेले, गळलेले, झिरपलेले पाणी.

गळवळ स्त्री. फूस; हालचाल; खळबळ.

गळवज्ञा येणे काकुळतीला येणे; गयावया करणे : 'गळवज्ञा येऊन आजीच विचारीत होती.' – किरिस्ताव ७१.

गळवाहा गळाठा; दुर्दशा.

गळश्चकंठश्च, गळस्यकंठस्य न. जिवलग मैत्री; दृढ स्नेह; जीवश्चकंठश्च.

गळस वि. मांसल.

गळसट न. कफ अथवा श्लेष्म्याची तार, चिकटा.

गळसर–री पु. स्त्री. १. गळ्यात बांधायचा मणी. २. चार ते आठ पदरी काचेच्या किंवा सोन्याच्या मण्यांचा हार; एक दागिना. ३. एकपदरी हार : 'गळसरी दुसरी न धरी गळां।' – वामन, रुक्मिणीविलास १३. ४. सौभाग्यालंकार; मंगळसूत्र; काळ्या पोतीचा सर : 'सुगंधामाजी कस्तुरी। कीं अलंकारांत गळसरी।' – भवि २.२०७. ५. एक दागिना. यात घागऱ्याचे मंगळसूत्र, पदक इ. असून दोन बाजूंना गिन्या किंवा पुतळ्या ओवतात. तसेच बिलोरी, काळ्या–हिरव्या पोतेचे सर असतात. हा दागिना फक्त सौभाग्यवती स्त्रिया घालतात. (कु.) ६. (ल.) वेढा; वेष्टन : 'असो त्या सिंधूच्या पैलपारीं। कुशद्वीपाची गळसरी।' – कथा ६.३.६९. [सं. गल + स] (वा.) ० **बांधणे –** लग्न लावणे; सौभाग्यचिन्हांकित करणे : 'कीं माझा पिता दिनकर। तो हा जाणे विवाहविचार। त्याचे विचारें गळसर। बांधीन तुमचा।।' – कथा ५.१३.१५७.

गळसरणे अक्रि. उलणे; तडकणे; भेगा पडणे (ओल किंवा थंडीपासून पायांची बोटे इ.).

गळसा पु. गळफास.

गळसुजी स्त्री. गुरांचा एक स्पर्शजन्य रोग.

गळसु(सो)री, स्त्री. गळघाटीची सूज. पहा : **गळचुट्या** (क्रि. बसणे, येणे, फुगणे, होणे.) : 'गळसुट्या गंडमाळा मुरुम।' – स्वानु २.५.७; 'गळसोट्या आणि जीभ झडे।' – दास ३.६.३६.

गळसूत्र न. (विनोदाने) १. गळघाटी. २. गळ्यातील दोरा.

गळहाटणे अक्रि. गळफटणे; गलित होणे; कंठात प्राण येणे. पहा : **गळहाटणे**

गळहोड–डी स्त्री. गळ्याची शपथ : 'तुम्ही सप्त पूर्वजाचे सुकुर्त स्मरौन बोला म्हनौनु सेपथ वा गळहोड देवाचे घातले...' – मइसा २०.२१८.

गळंगा पु. १. गवत, कडब्याची ताटे, पाने इत्यादींचा अस्ताव्यस्त पडलेला कचरा; अडगळ; गळाठा; पसारा (कागद, वस्त्रप्रावरण इ.चा); गाळसाळ; चोथा. (क्रि. पडणे, होणे.) २. (ल.) गोंधळ; घोटाळा : 'प्रत्ययाविण गळंगा होये। अनुमानज्ञानें।।' – दास १०.१०.९. ३. (ल.) खरेखोटे. [सं. गल्]

गळंगा वि. ढिला; सैल; खिळखिळा; सैल बांधलेले, आवळलेले, जखडलेले. [सं. गल्]

गळंगा पु. १. मडके. २. (ल.) मनुष्यदेह : 'गळंग्यामधील जगज्ज्योति।

चेतेल कोठे?' – दास १९.२.५.

गळंत न. १. एखाद्या अक्षराचा, शब्दाचा किंवा वाक्याचा संक्षेप करतेवेळी त्याचे पहिले अक्षर लिहून पुढे पूज्य लिहितात ते. (क्रि. घालणे). २. ज्याकरिता पूज्य घातलेले आहे ते गाळलेले वाक्य, शब्द इ. वि. संक्षेपाने सोडलेले; गाळलेले; वर्ज्य केलेले; गहाळ; नष्ट (वाक्यातील शब्द, शब्दातील अक्षरे). (वा.) ० **करणे** – गिळणे; गट्ट करणे.

गळा पु. १. घसा; कंठ; मानेचा पुढील भाग व आतील मार्ग. २. (गायन) सूर; आवाज; कंठ. ३. घागर, बाटली, मडके इ. चा. काठ; मान; तोंड व पोट यांच्यामधील आकुंचित भाग. ४. (सतार) दांडीचे आरंभस्थान. [सं. गल्] ० **उघडा असणे** – गळ्यात कोणताही अलंकार (विशेषत: मंगळसूत्र) नसणे. ० **ओरडून पडणे** – मोठ्याने शोक करून कंठाला मिठी मारणे. ० **कफणी घालणे** – आपल्या-सारखा निकाल लावून घेईपर्यंत वैतागाने फकिरासारखे राहणे : 'त्यावरी तुम्ही वतनाची खबर ऐकोन वतनाकरिता गळा कफणी घालून दरबारास गेलेती.' – राखं ३.५५. ० **काढणे** – मोठ्याने रडणे. ० **कापणे** – १. फसविणे; ठकविणे; विश्वासघात करणे. २. उमेद खचवून नाश करणे. ३. ० **कापणे** – (शिंपी) गळ्याचे कापड बेतणे. **(केसाने) गळा कापणे** – वरून मैत्री दाखवून आतून विश्वासघात करून नुकसान करणे. ० **गुंतणे, अडकणे** – अडविले, बांधले जाणे; एखाद्या अडचणीत गोवले जाणे. ० **गोवणे** – १. प्रतिबंध करणे; अडकविणे; एखाद्याचे हातपाय बांधणे (जुलमाने, वचन इ. घेऊन). ० **गुंतविणे** – अडकविणे (त्रासदायक कामकाजात). ० **घालणे** – (चर्मकार) जोड्यावर रेशीम भरणे (रेशीम भरण्याचा एक प्रकार). ० **घोटणे** – जीव घेणे; मारून टाकणे. ० **जाणे** – फाशी जाणे. ० **ताणून, तांगडून बोलणे** – फाडफाड, खरडून, मोठ्याने बोलणे. ० **तापणे, सुटणे** – कंठातील कफ इ. जाऊन टिपेला जाण्याइतका स्वर मोकळा होणे. ० **दाटणे** – गहिवरणे; उमाळ्याने घसा दाटणे (दु:ख, माया इ. मुळे) : 'तथ्यप्रभूक्त परिसुनि धर्माचा गहिवरे गळा दाटे।' – मोशांति ६.४२. ० **धरणे** – १. घसा बसणे (रोग, आंबट, तिखट, खवट इ. पदार्थामुळे). २. थांबविणे; खोटी करणे; हरकत आणणे (बोली, करार यात बेमानपणाने वागून).३. वाचा बसणे; आवाज नष्ट होणे; निरुत्तर होणे. ४. ताब्यात घेणे : 'त्वदगुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा।' – भक्तमयूरकेका ५८. ० **निवळणे** – (गायन) फुटलेला आवाज चांगला होणे. ० **पडणे** – आळ घेणे : 'गळां मोतीं असोन निवाडें। लोकांचिया गळां पडे।' – ह २१.२२९. ० **पडणे, फुटणे, बसणे** – आवाज घोगरा होणे, चिरकणे. **गळा, गळी पडणे** – १. मानेला मिठी मारणे : 'गेलों गृहासि माता धांवुनियां माझिया गळां पडली।' – मोअनु ६.६८. आलिंगन देणे. २. गळ घालणे; निकड लावणे; तगादा लावणे; सक्तीने पाठ पुरविणे. ३. अन्यायाने दोषारोप करणे. ४. शिव्या देत अंगावर तुटून पडणे. ५. एखाद्याच्या अंगावर भार घालणे; लोढणे होणे; फार भीड घालणे; विघ्नासारखे होणे. ६. वाईट सवय, खोड लागणे. ० **पिंजणे** – गळा सोलवटणे; आवाज चिरकणे (वांती होऊन किंवा गाताना). ० **बसणे** – १. आवाज नीट न उमटणे, न सुटणे. २. मानेत बसणे; थबकट किंवा चपटा होणे (भांडे). ० **बांधणे** – आळा घालणे; हातपाय बांधणे, अडकविणे. **गळा, गळी बांधणे** – १. सक्ती करणे; घेण्यास भाग पाडणे. २. अन्यायाने दोषारोप करणे; आळ घेणे; कलंक लावणे. ० **भरणे, भरून येणे** – गहिवरणे (मनोविकारांमुळे) व त्यामुळे आवाज कंपित होणे; गुदमरणे; श्वास कोंडणे : 'असुहृदुदासीनाचे भरले भरतिल न अन्य काय गळे।' – मोमीष्म ११.११९. ० **मढणे** – गळ्यात बांधणे; एखाद्याच्या अंगावर जबाबदारी टाकणे : 'बाकीचे वायेदे मुदत लेहून घ्यावी, रुपये त्याच्या गळा मढावे, निशा करून घ्यावी.' – हिंगणे दप्तर २.१३. ० **मोठा करून रडणे** – भोकाड पसरणे; मोठ्याने रडणे. ० **लागणे** – (संगीत) आवाज चांगला लागणे; सूर लागणे. ० **सुटणे** – १. संकटमुक्त होणे. २. आवाज मोकळा होणे. ३. पाठ पुरविणे; हट्ट घेणे (मूल, तगादेदार, काम घेणारा.) ४. मोठ्याने ओरडणे, डरकणे. ० **सोडविणे** – (खाटीक). १. धडापासून मान वेगळी करणे, कापणे : 'केली हल्ला मर्धी शिरला सोडवी गळा कानड्याचा।' – ऐपो ३९२. २. एखाद्याला पेचातून मुक्त करणे. **गळे कापून नेणे** – मुंडकी कापून नेणे : 'काही गळे कापून नेले म्हणोन वर्तमान आहे.' – ऐलेसं ३०१२. **गळ्याखाली उतरणे** – १. गट्ट करणे (लाच, लुच्चेगिरीचा पैसा इ.). २. स्वाधीन होणे; पदरात पडणे. **गळ्याचा लाखोटा होणे** – घसा बंद होणे, कोंदणे; गुदमरणे. **गळ्याची आण, शपथ, गळ्याचेण** – गळ्याची शपथ वाहणे, घेणे. **गळ्याची फुंकणी होणे** – घसा घोगरा होणे, बसणे. **गळ्यात असणे** – भार पडणे (काळजी, काम, खटपटी इ.चा); अवलंबून असणे. **गळ्यात गळा घालणे** – सलगीने वागणे; दुसऱ्याच्या कंठाला मिठी मारणे. **गळ्यात गोणी येणे** – १. अडचण, दु:ख यांचे असमंजस उपायांनी निरसन करीत असता उलट जास्त अडचणीत येणे. (जसे : – एखाद्या बैलाने पाठीवरील ओझे लोटून देण्याचा प्रयत्न केला असता ते मानेवर येऊन जास्त ओझे होणे.). २. नुकसानी, तूटबूड अंगावर ओढून घेणे. **गळ्यात घालणे** – एखाद्याच्या इच्छेविरुद्ध जबाबदारी त्याच्या अंगावर टाकणे; माथी मारणे : 'जेव्हा तुम्ही हे माझ्या गळ्यातच घातले तेव्हा माझा बेइलाज.' – मासंवा २.१८२. **गळ्यात घोंगडे, लचाड येणे** – (डोईवरचे घोंगडे घसरत घसरत गळ्यात आले म्हणजे जीव गुदमरतो त्यावरून) संकट गुदरणे. **गळ्यात टाकणे** – पहा : **गळ्यात घालणे. गळ्यात तंगड्या घालणे** – एखाद्याची लबाडी ओळखून त्याचीच फजिती होईल असे करणे. **गळ्यात तंगड्या, पाय येणे** – सुटण्यास कठीण अशा अडचणीत जास्त गुरफटले जाणे. **गळ्यात धनुष्य घालणे** – (प्राचीन पद्धत) पराभव करणे व पराभव केल्याची खूण : 'घालुनि धनुष्य कंठीं धरिला धरि गारुडी जसा अहितें।' – मोकर्ण १४.६७. **गळ्यात धोतर घालणे** – स्वत:चे म्हणणे सिद्ध करण्यासाठी एखाद्यावर सक्ती करणे. **गळ्यात पडणे** – हिताहिताची, रक्षणाची,

पोसण्याची, कर बजावणीची, निस्तरण्याची इ. जबाबदारी अंगावर येणे. **गळ्यात बांधणे –** आग्रहाने देणे; स्वीकारण्यास भाग पाडणे. गळ्यात मारणे. पहा : **गळ्यात घालणे. गळ्यात माळ असणे, घालणे, गळ्यात माळखंड घालणे –** १. शिस्त दाखवून काम सोपविणे, हवाली करणे; व्यवहार गळ्यात टाकणे. २. वराने वधू किंवा वधूने वर पसंत करणे, वरणे (माळेचा उपयोग लग्नात होतो यावरून). ३. वारकरी संप्रदायाची खूण आणि विठ्ठलाचा प्रसाद म्हणून तुळशीची माळ गळ्यात घालणे; वारकरी होणे. **गळ्यात येणे –** अंगावर येणे, बेतणे (धंदा, कारभार, काळजीचे कार्य). **गळ्यातला ताईत, तन्मणी –** अत्यंत लाडका, प्रिय. (क्रि. करणे, मानणे, मोजणे, बाळगणे, बनणे, होणे.) : 'तूं नवऱ्याच्या गळ्यातला ताईत.' – विवि ८.२.३०. **गळ्यात लोढणे अडकविणे, बांधणे, घालणे, गळ्यात धोंड बांधणे –** अडचणीत आणणे; कठीण काम करण्याचा प्रसंग आणणे : 'राष्ट्रीय पक्ष हा कांहीं जुन्या पक्षाच्या गळ्यांत लोढणें बांधण्यासाठीं निर्माण झालेला नाहीं.' – लोटिकेले. नको असलेले काम करायला सांगणे; एखाद्याच्या मुक्त संचारावर बंधने येतील अशी बाब त्याच्या माथी मारणे. **गळ्यात हात घालणे, टाकणे –** १. आलिंगन देणे. २. मन अनुकूल करणे, वळविणे; दादा–बाबा करणे. लाडी गोडी लावणे. **गळ्यापर्यंत येणे –** सहनशक्तीची परमावधी होणे (कष्ट, पीडा, दुःख यात). **गळ्याला दोरी, फास, रसायण, तात लागणे –** एखाद्या कार्याकडे ओढ लागणे, त्याविषयी अतिशय चिंता लागणे; पेचात असणे; संकटात पडणे : 'आग्रह करूनि लावू कोणेकाच्या गळ्यां कशी तात।' – भक्तमयूरकेका २. **गळ्याला लागणे –** एखादे काम केलेच पाहिजे अशा अवस्थेला येणे : 'गळ्याला लागलेली पोर एकदाची कशीतरी उजवावी.' – परिहरि १७. **गळ्यावर, गळ्यात गाणे म्हणणे –** सुरेलपणे शास्त्रीय पद्धतीने व मनमोकळेपणाने गाणे. **गळ्यावर बोलणे –** वरवर बोलणे; विचार न करता भाषण करणे. **गळ्यावर सुरी ठेवणे, गळ्याला नख लावणे –** जीव घेण्याची भीती घालणे; अत्यंत संकटात घालणे : 'कां नख न लाविलें जननी।' – मोउद्योग ११.२३. **गळ्याशी गळा मिळविणे –** १. (गायन) दुसऱ्याच्या सुराशी आपला सूर मिळविणे. २. गळ्यात गळा घालणे. **गळ्याशी येणे, गळ्याशी पाणी लागणे –** नुकसानीची बाब होणे, परमावधीला पोहोचणे. **गळ्यातील कफनी काढणे –** मनासारखा निकाल होईपर्यंत त्राग्याने दीनवेष धारण केलेला असेल (पागोटे बांधण्याचे सोडून देणे, श्मश्रू न करता दाढीडोई वाढविणे इ.) तो सोडणे : 'आपण बादशाहीवर नजर देऊन आमचे गळ्यांतील कफनी काढावी.' – ऐलेसं ७४८८.

गळाकाटू वि. १. गळ्याच्या एका बाजूवर भोवरा असलेला (घोडा). २. गळेकाटू; गळेकापू.

गळागोठा पु. घोळका; गर्दी; दाटी (भांडण इत्यादींच्या वेळची).

गळाट वि. गळ्याबरोबर. (व.)

गळाठणे अक्रि. १. अतिशय थकवा येणे; गलितगात्र होणे. २. पुढे सरकू न शकणे; थांबणे : 'बाकीचे सगळे मध्येच कोठे ना कोठे गळाठले.' – स्मया ३७६. ३. गोठणे; बंद पडणे : 'गळाठली होती तुमची चळवळ.' – आआशे. ४. भेदरून जाणे; शक्ती नाहीशी होणे : 'बापलेकांचे पायच गळाठले.' – ऊन १२१. ५. गोंधळणे; गडबडणे : 'गाडदी इतके गळाठून गेले की त्यांच्या हातून कसलीच कृती व हालचाल होईना.' – निसं १७५.

गळाठा पु. १. गोळा; चोळामोळा; गोंधळ; गाळसाळ. (वा.) ० **होणे –** निकाल लागणे; शक्ती क्षीण होणे; कर्तृत्व नाहीसे होणे : 'इतर ब्रह्मचाऱ्यांचा या वयात अगदी गळाठा झालेला आढळून येतो.' – आप्रदि ४३२. २. गठ्ठा; ढीग : 'नुसता विळा फिरवून खरडला तर एक मोठा गळाठा जमून येतो.' – आआशे २८१. ३. तांडा; जमाव; गर्दी : 'त्यांच्या जागी जो गळाठा कॉंग्रेसमध्यें शिरला...' – जुआ ८२. ४. पसारा : 'सर्वांचे जेवून झाले म्हणजे त्याच गळाठ्यात ती जेवणार.' – माचू ५४२. ५. गवत, कडबा इ. चा कचरा : 'परंतु फार काळापासून खेड्यात तळावर गळाठा राहत आला आहे.' – गांगा १४९.

गळाठी स्त्री. १. गुंतागुंत; भानगड; अडचण. (को.) २. भानगडीची परिस्थिती.

गळाणी स्त्री. गडबड.

गळाबंद वि. गळ्यापर्यंत बटने असलेला (कोट, शर्ट इ.).

गळाल न. (फळांचा) रस.

गळाळा पु. १. मधुर रसाची धारा : 'कृष्णदास मुद्गलासी श्रीरामरसें गळाळे येती।' – सप्र. १६.३०. २. घोट; घास : 'निवालिया विषोदकाचा गळाळा।' – ज्ञा ८.१४७.

गळांड–डा न. पु. गळू. पहा : **गलांड**

गळांत पहा : **गळंत**

गळित वि. गाळलेले; दुर्लक्ष केलेले; मागे टाकलेले : 'सारांश हे दोन्ही मतलब आमचे गळित करून दिल्हे.' – मइसा १०.१०३.

गळित वि. पु. ब्रह्मचर्यापासून ढळलेला.

गळीतकुष्ट न. झडविणारे, घटविणारे, वाहणारे कोड; महारोग. पहा : **गलितकुष्ट, गलत्‌कुष्ट**

गळी स्त्री. टीप; किनरी, तिपदरी गळा; बारीक स्वराचा गळा (आवाज). वि. खड्या सुराचा; टिपेचा; तिपदरी; तिप्पट उंच चढण्यास योग्य.

गळीत न. १. तेल निघणारे धान्य; ज्यापासून तेल निघते असा पदार्थ; तेलकट (आत तेल असणारा) पदार्थ. २. रस निघणारी वस्तू (ऊस वगैरे). वि. १. गळलेले; पडलेले; सांडलेले. २. ज्याची पाने गळाली आहेत असे (झाड). ३. फाटलेले; खराब झालेले (पुस्तक). ४. गाळलेला; पाझरलेला; ठिबकलेला (प्रवाही पदार्थ). [सं. गलित]

गळीव वि. गळलेला; पडलेला; झिरपलेला. पहा : **गळणे**

गळीवसुकड–खड, गळीसुकड–खड स्त्री. पूर्ण पिकून माडावरून खाली गळलेला नारळ.

गळुंगा पु. कचरा; गळाठा. पहा : **गळंगा**

गळू पु. बेळगावकडील एका जातीचा हलका बांबू. [क. गळे]

गळू न. मोठा फोड; करट; गलांड; केस्तूड; बेंड; उठाणू.

अवधाण; आवाळू; फिसके. [सं. गल् = गळणे]

गळूबंद पु. बायकांचा ठुशीसारखा गळ्यातील एक दागिना. (बडोदे)

गळेकापू, काप्या, काटू वि. गळा कापणारा; विश्वासघातकी; दगलबाज. (ल.) कसाई.

गळेकापू स्पर्धा तीव्र स्पर्धा; शेंडी तुटो वा पारंबी तुटो अशी चढाओढ.

गळेपडू वि. १. स्वत:चे काम करून घेण्यासाठी बळेच दुसऱ्याच्या खनपटीस बसणारा; छळवादी (भिकारी, धरणेकरी). २. दुसऱ्यावर खोटा आळ घेणारा; असा माणूस करीत असलेला (धंदा). ३. कुंभाडी; बालंटी (भाषण). ४. गळ्यात पडणारे; अटळ (काम, व्यवहार).

गळेफोड स्त्री. घसाफोड; त्रासदायक व निष्फळ आरडाओरड; खरडपट्टी, उपदेश, विवरण, शिक्षण इ.

गळेबंद पु. गळोटी; नेकटाय.

गळेबाज वि. सुरेल, मधुर कंठाचा, सुराचा (गवई).

गळेलठ वि. पहा : **गलेलठ्ठ**. १. लठ्ठ गर्दन, मान असणारा. २. आडवातिडवा सुटलेला; गबदूल पण मूर्ख (माणूस).

गळोगदी स्त्री. बगाड; गळवगदी; नवसाचा गळ. पहा : **बगाड**

गळोटी-ठी स्त्री. गळपट्टी; नेकटाय. पहा : **गळेबंद**

गळोष्टी स्त्री. मुठीच्या (खोगराच्या) उराठीपासून मानेवर जाणारा कासरा, दोर (बैलाचा). चढणीच्या वेळी मूठ बळकट करण्याकरिता हा बांधतात.

गळ्या पहा : **गळीवसुकड**

गळ्हाटणे उक्रि. १. गळाठा, अव्यवस्थितपणा, गोंधळ होणे. २. हरवणे; गमावणे. ३. (आजारीपणामुळे) झिजणे; क्षीण होणे; थकणे; दमणे : 'मुख्य हुजुरात... ते अगदी गळ्हाटोन हुजुरात असे नावमात्र अवशिष्ट राहिले होते.' - मराआ ५.

गळ्हाटा-ठा पु. १. गवत, कडबा इ.चा गळंगा; पाचोळा. २. पदार्थ किंवा कामकाजाचा घोटाळा, घालमेल, गोंधळ. ३. दुर्दशा; चिवडाचिवड; रेंदा. ४. थकवा; अशक्तता. (माळवी) ५. दीर्घ परिश्रमाचे व तुंबलेले काम. (ना.) ६. अफाट, अवजड, अनावर खाते, तांडा, स्वारी.

गळ्हांग(घ)ती स्त्री. गळ्यातील घोंगडी किंवा पासोडी काखेखालून आणून तिची केलेली खोळ. (क्रि. घालणे, बांधणे.)

गंगकड क्रिवि. दक्षिणेकडे. (व.)

गंगकोनी वि. गंगेकडून; गोदावरी नदीच्या बाजूने; उत्तरेकडून : 'वारं सुटयेल सुटलं गंगकोनी।' - लोले ३८.

गंगथड-डी स्त्री. गोदावरीच्या काठचा प्रदेश किंवा तीर. [सं. गंगातट]

गंगमुखी वि. गोदावरी नदीकडे तोंड केलेले; उत्तरेकडे तोंड केलेले.

गंगमोहरा-री, क्रिवि. गोदावरीकडे, उत्तरेकडे (गोदा व कृष्णा यामधील). याचप्रमाणे पुढील दिशावाचक शब्द रूढ आहेत - राखेसमोहरा = (राक्षसांच्या दिशेकडे) = दक्षिणेकडे. खाली-खालता-खाललाकडे = पूर्वेकडे, वर-वरता - वरलाकडे = पश्चिमेकडे इ.

गंगरणे अक्रि. चढून जाणे; गर्व होणे. (कु.)

गंगलेय सोनसांवर.

गंगा स्त्री. १. गंगा (भागीरथी) नदी; तिचा दैवी अवतार (देवी); नदी देवता. २. गोदावरी नदी : 'गंगातीरास येऊन रहावे.' - ऐलेसं २६२३. ३. (सामा.) पवित्र नदी : 'भवताली एक गंगा झुळझुळ वाहे।' - देप ९८. ४. पवित्र कार्याकरिता घेतलेले पवित्र नदी, झरा, कुंड यातील पाणी. [सं.] (वा.) **० घेणे, उचलणे -** गंगेची शपथ घेणे. **० मनाला घालणे -** मन निर्मळ करणे; रुखरुख घालवून टाकणे; केलेला अपराध कबूल करून विवेकाची टोचणी बंद करणे. **० यमुना वाहणे -** रडे येणे; डोळ्यातून पाणी येणे. (दोन्ही डोळ्यातील अश्रुधारा वाहून गंगा-यमुना नद्यांप्रमाणे एकत्र मिळतात यावरून). **आळशावर गंगा लोटणे, येणे -** आपोआप फायदा होण्याची संधी येणे. **वाहत्या गंगेत हात धुणे -** दुसरा मनुष्य एखादे पुण्यकृत्य करीत असताना त्याला थोडासा हातभार लावून त्याच्या पुण्यात वाटेकरी होणे; कोणाचे नुकसान न करता सहजगत्या होण्यासारखा आपला फायदा करून घेणे; संधीचा फायदा घेणे. **गंगेतील पाणी गंगेत सोडणे -** ज्या ठिकाणाहून घ्यायचे त्याच ठिकाणाला नम्रभावाने अर्पण करणे. उपकार फेडताना हा वाक्प्रचार योजतात. **गंगेस-त घोडे नाहणे -** आरंभलेले महत्कृत्य शेवटास जाणे; भगीरथ प्रयत्न करून कृतकृत्य होणे (महाराष्ट्रातील घोड्यांना पेशव्यांनी गंगेच्या म्हणजे भागीरथीच्या आसपासचा प्रांत जिंकून तिचे पाणी पाजले व मराठी साम्राज्य स्थापिले यावरून) : 'एकदाचा हा कोश संपविला म्हणजे गंगेस घोडे न्हायले.' - शास्त्रीको.

गंगागोत न. ग्रामपंचायत; जातगंगा (वादाच्या निकालासाठी जमलेली).

गंगाजम्नी वि. १. ज्याचा एक बाजूचा काठ एका रंगाचा व दुसऱ्या बाजूचा दुसऱ्या रंगाचा असतो असे (धोतर इ.). २. भिन्न व विसदृश वस्तूंचा समागम किंवा संयोग; मिश्र; संकरज : 'परस्परविरोधी असे - इंग्रजी मराठी विचार एकत्र करून गंगाजम्नी पुस्तक करण्यापेक्षा... नवीनच पुस्तक लिहिणे बरे.' - विकारविलसित.

गंगाजळी स्त्री. १. गंगा किंवा दुसऱ्या पवित्र नदीचे पाणी ठेवण्याचे पात्र. २. मोठा खजिना; कायम शिलकीचा खजिना; ज्या शिलकीला कधी हात लावायचा नाही ती शिल्लक (शिंदे सरकारच्या खजिन्याला गंगाजळी असे नाव आहे) : 'पैशानें गच्च भरलेली गंगाजळी हातीं लागलीं.' - संभाजी. ३. चलनी नोटा वटविण्याकरिता वेळेवर उपयोगी पडावा म्हणून ठेवलेला रोकड किंवा सोने यांचा साठा. ४. भविष्यकालीन खर्चासाठी किंवा नुकसानभरपाईसाठी स्वतंत्रपणे ठेवलेली रक्कम.

गंगाजळी स्त्री. शपथक्रिया; हातावर गंगोदक घेऊन शपथ घेणे : 'बाजीराव साहेबांची आणि राजश्री नानांची गंगाजळी फाल्गुन शु. २ स जाहली.' - ऐलेसं ४८७५.

गंगाद्वार न. १. त्र्यंबकेश्वरी असलेले गंगा प्रगट होण्याचे ठिकाण; गोदावरीचे उगमस्थान. २. हरद्वार (या ठिकाणी गंगा हिमालयावरून सपाट प्रदेशावर खाली उतरली आहे.).

गंगापाट-ठ पु. घोड्याच्या छातीवरील लांब केसांची गोम. ही शुभ मानतात. हिची काही लक्षणे वाईट असतात.

गंगापुत्र पु. (गंगेमुळे यांची उपजीविका होते म्हणून) १. काशी क्षेत्रातील पंड्या; गंगेवरील अधिकारी ब्राह्मण. २. एक हलकी ब्राह्मण जात. हे आपल्याला कनोजी म्हणवतात. हे गंगातीरावर पंड्येगिरी किंवा शेती करून राहतात.

गंगापूजन न. १. काशीयात्रा करून गावी आल्यावर बरोबर आणलेल्या गंगेचे पूजन करून ते तीर्थ आप्तेष्टांना देण्याचा विधी. २. सिंहस्थ–कन्यागतात श्राद्धविधीनंतर गोदावरी–कृष्णा नदीचे केलेले पूजन.

गंगाप्रदक्षिणा स्त्री. त्र्यंबकेश्वरी गोदावरीला उजवी घातलेली प्रदक्षिणा; गोदावरी–प्रदक्षिणा.

गंगाप्रवाह पु. १. गंगेचा प्रवाह, ओघ. २. गंगेच्या ओघात सोडणे (मृताच्या अस्थी, राख किंवा देवावरचे निर्माल्य).

गंगाभागीरथी स्त्री. वयस्क विधवा स्त्रीला पत्रात लिहिण्याचा मायना.

गंगाभेट स्त्री. तीर्थक्षेत्री गेल्यावर तीर्थाचे प्रथम दर्शन घेण्याचा विधी.

गंगामाती, गंगामृत्तिका स्त्री. गोपीचंदनासारखी गंगाकाठची पांढरी माती.

गंगालय पहा : **गंगाळ** : ‘गंगालयें उष्णोदकानें भरून ठेवीत आहेत.’ – मंजु ८.

गंगावणे अक्रि. आवाज करणे; गुंगूं करणे; गोंगावणे. [सं. ङु]

गंगावतरण न. ज्याप्रमाणे हिमालयातून गंगा भरतखंडात मोठ्या प्रयासाने आली त्याप्रमाणे अत्यंत परिश्रमाने घडून येणारी गोष्ट; दुस्साध्य गोष्ट : ‘हिंदुस्थानच्या लष्करीकरणाचे गंगावतरण लो. टिळकांच्या प्रयत्नामुळे आज हिंदुस्थानावर येत आहे.’ – के १०.६.१९४१. [सं.]

गंगावती स्त्री. निरगुडी वनस्पती; निरगुडीचा पाला : ‘म्हणौनि बोल जऱ्ही गंगावती। तऱ्ही स्वीकाराल कीं।।’ – ज्ञा ९.१४.

गंगावन न. तार्तरी किंवा नेपाळ देशातील वनगाईच्या शेपटीचे काळे केस; कृत्रिम केस. स्त्रियांचे केस तोटके असले तर हे केस लावतात.

गंगावनी सडका हत्तीच्या कानांपासून पायापर्यंत लोंबणाऱ्या लांब माळा. (बडोदे)

गंगावळ पहा : **गयावळ**

गंगावार वि. गंगानदीच्या अलीकडे : ‘अहमदखान बंगशाचा मुलुक गंगापार नाहीं, गंगावार आहे.’ – पेद २७.२४०. [सं.]

गंगासागरी वि. रंगीत (काळे, तांबडे) काठाचे (धोतर, पातळ इ.).

गंगाहोर गंगेच्या पुरातील पाण्याने वाहून आलेली माती, गाळ इ.

गंगाळ न. घंगाळ; गोलाकार तोंड असलेले स्नानाचे, धुण्याचे किंवा पाणी ठेवण्याचे, धरण्यासाठी कड्या असलेले धातूचे पात्र. [सं. गंगालय]

गंगाळटोप पु. शिरस्त्राण : ‘दुसरे बाणें सीरिचा गंगाळटोप पाडिला।’ – मग ३९.

गंगाळपोते न. बराच डगळ व मोठा अंगरखा; ऐसपैस कपडा.

गंगिरी स्त्री. नागवेल.

गंगेरी पान विड्याच्या पानांची एक जात. ही पाने काळसर असतात : ‘तबकीं भरोन गंगेरी पानें।’ – नव २०.१०१.

गंगोत्री स्त्री. १. गंगेचे उगमस्थान. हे गढवालमध्ये आहे. २ (ल.) कोणत्याही मोठ्या चळवळीची, विचाराची सुरवात, उगम.

गंगोत्री स्त्री. वीत, दीडवीत उंचीचे व तांबूस फुलांचे एक झुडूप. ताप आला असता याचा रस अंगाला चोळतात.

गंगोत्साह पु. गंगेच्या आराधनेसाठी पुराण, कीर्तन, ब्राह्मणभोजन इ. करणे; उत्सव करणे; गंगेचा उत्सव. [सं.]

गंज पु. स्त्री. ढीग; रास; उडवे; ढिगारा; गंजी; संचय (धान्य, गवत, लाकूड, गठ्ठा इत्यादीचा) : ‘दिल्लीत माईना मुडदा गंज पडला।’ – ऐपो ११३. [सं. गञ्ज]

गंज वि. पुष्कळ; फार; गडगंज. (व.) [फा.]

गंज पु. १. पेटी; पूड; धोकटी; वेष्टन; नळकांडे (गणिताची यंत्रे, लेखनसाहित्य, फण्या, कुंचे, वस्तरे, पान, पात, मळसूत्र, वाटे इ. ठेवण्याची पेटी. पान, सुपारी, चुना इ. ठेवण्याचे पुडे). २. हत्यारे, सामान ठेवण्याची पेटी.

गंज पु. पेठ; हाट; बाजार. सामान्यत: हा शब्द दुसऱ्या एखाद्या शब्दाशी जोडून येतो. जसे :– दारागंज, पहाडगंज, प्रतापगंज इ.

गंज पु. (सोनारी) घुंगरू, कर्णफुले इत्यादींच्या ठशांची पट्टी. (खा.)

गंज पु. १. पाणी साठविण्याचा तांब्याचा मोठा हंडा. २. एक उभट भांडे. ३. पातेले; बोगुणे (उभट). (व.)

गंज पु. १. तांब; जंग (लोखंडावर चढणारा); कीट. २. (ल.) कलंक; डाग. [सं. गंजन]

गंज पु. एकत्र आणलेला जमाव : ‘सरकारच्या तोफा येऊन पोचल्या. शत्रूचा गंज होता तेथे लागू झाल्या.’ – ऐलेसं १७८१.

गंजज वि. खूप; पुष्कळ. (अहि.)

गंजणे अक्रि. १. (शाप.) ऑक्सिजनच्या प्रभावामुळे धातूच्या (सामान्यत: लोखंड) पृष्ठभागावर ऑक्साइडचा थर जमण्याची क्रिया; गंज चढणे; कीट चढणे.

गंजन न. नाश.

गंजनी स्त्री. एक प्रकारचे गवत. (कर.) [क.]

गंजा पु. टक्कल पडण्याचा रोग. [हिं.]

वि. टकल्या. [हिं.]

गंजाड वि. गडगंज; पुष्कळ; भरपूर. (व.)

गंजाड वि. गांजेकस; विचित्र वागणारा; भंगड.

गंजाडा वि. गांजाचे व्यसन असणारा : ‘गंजाडा बाप चिलमीच्या गुंगीत गावात फिरे.’ – बाब ५३.

गंजाण न. एक प्रकारचे गवत. पहा : **गंजनी** (बे.)

गंजि(जी)फा स्त्री. अव. खेळण्याच्या (विशेषत: दशावतारी, वाटोळ्या १२०) पत्त्यांचा जोड. (क्रि. खेळणे.) : ‘गंजीफा सतरंज चोपड नवें तें नर्दही सांग जे।’ – सारु ह. [का.]

गंजिफिया, गंजीफा पु. दारूगोळा : ‘पन्नास तोफा व पंचवीस गंजिफियाच्या गाड्या…’ – भाब ९. [फा. गंजीफा = दारूचे कोठार]

गंजी स्त्री. लहान रास; गंज; ढीग (गवत इत्यादीचा).

गंजी पहा : **चौघडा**

गंजी स्त्री. एकत्र, समाईक वहिवाट, उद्योगधंदा; भागी. (व.)

गंजी स्त्री. अंधारकोठडी : 'सत्याग्रहींना गंजीमध्ये ठेवण्यात आले.' – के ९.३. १९३९.

गंजी स्त्री. कांजी; भाताची पेज. (बे.गो.)

गंजी पहा : **गंज**

गंजी स्त्री. दुकान : 'साट्याच्या गंजीवर धावे काशीची नजर ।' – वलो ११२.

गंजीकोट वि. १. गंजीकोट (जिंजी) गावचा (पैसा). २. प्रचंड; विशाल; असंख्य; विपुल; प्रशस्त.

गंजीखाना पु. १. (कडबा, गवत इत्यादीच्या) अनेक गंजी ठेवण्याची जागा, आवार. २. (ल.) अडगळीची खोली; रोज न लागणारे सामान ठेवण्याची जागा.

गंजीफ स्त्री. गंजिफांच्या डावातील एक पत्ता. [फा. गंजीफा]

गंजीफरास–फ्राक पु. बाह्यांचा किंवा बिनबाह्यांचा, अंगाबरोबर बसणारा, सदऱ्याच्या आत घालायचा कपडा; बनियन. [इं.]

गंजीवटकन–ण न. आढ्यता; दिमाख; मग्रुरी; ताठा; गर्व; वृथाभिमान. (क्रि. काढणे, मोडणे.)

गंजु(जो)ली स्त्री. लहान पातेले.

गंजूर पु. वखार; खजिना असलेली जागा. [फा.]

गंजेटी–डी वि. गांजेकस; गांजा ओढणारा. (ना.)

गंज्वल स्त्री. गांधील माशी.

गंठण न. सोन्यात गाठवलेले मंगळसूत्र; गाठवलेला दागिना.

गंठवा पु. १. सोन्याचा मणी. २. गंडा, हळकुंड व घोंगडीची दशी बांधलेले कच्चे सूत. [सं. ग्रंथी]

गंठीछोड्या पहा : **गठीछोड**

गंड पु. (मानस). १. तीव्र भावनाबंधामुळे एकत्रित आलेल्या व निरोधनामुळे अबोध झालेल्या कल्पनांचा समूह. २. पाहिजे तसे वागता न आल्यामुळे मनात सुप्तावस्थेत असणारी आणि माणसाच्या वागण्यात जिचा प्रभाव दिसून येतो अशी तीव्र भावना : 'घरात आईवडिलांचे न जमणे, सावत्रआई किंवा सावत्रबाप असणे अशा परिस्थितीतही मुलांच्यात वेगवेगळे गंड निर्माण होतात.' – शोमा ६१. जसे :– न्यूनगंड, अहंगंड.

गंड पु. १. तोंडाची कानशिलासह एक बाजू; गालफड; गाल : 'श्रीकुंडलमंडित गंडललित बाहुरम्य सरळ ।' – रामजन्म कटिबंध २ (शिवरामकविकृत). २. हत्तीचे गंडस्थल. ३. (ल.) जोर; उग्रता; वेग; आवेग; झपाटा (रोग, पाऊस, वादळ, खरूज यांचा). ४. (ल.) गर्व; आढ्यता; अहंकार; फुशारकी. (क्रि. मोडणे, जिरवणे.) [सं.]

गंड पु. (ज्यो.) विष्कंभादी सत्तावीस योगांतील दहावा योग. [सं.]

गंड पु. १. पुरुष. २. मुख्य नायक; वीर, समर्थ पुरुष. [सं. गण्ड, क. गंड = पुरुष]

गंड पु. काही विशिष्ट धंदेवाइकांस तिरस्कारार्थी त्यांच्या नावाच्या शेवटी जोडायचा प्रत्यय. जसे :– न्हावगंड, तेलगंड, बाणगंड इ.

गंड न.पु. गळू; केसतूड : 'तुझें माथा शृंग पूर्ण तीक्ष्ण । तुज ऋष्यशृंग अभिधान । आमुचे हृदयीं गंडें तीक्ष्ण । गंडऋषि जाण आम्हांसि म्हणती ।' – भारा बाल २.३०. [सं.]

गंड वि. उनाड; द्वाड : 'दोन गंड पोर हाईत.' – खळाळ २८.

गंड न. गंडांतर; मृत्युभय : 'षोडश वर्षांतिक गंड समजोनि ।' – आमा ३४.

गंडकी स्त्री. १. नेपाळात उगम पावणारी एक पवित्र नदी. २. गंडकी नदीतील शिळा; शाळिग्राम, मूर्ती; सोने पारखण्याची कसोटी : 'रत्नपारखियांच्या गांवीं । जाईल गंडकी तरि सोडावी ।' – ज्ञा १३.३२०.

गंडखोल पु. घोड्याचा गळा; गडखोल.

गंडगूळ पहा : **गळगुंड**

गंडगोपाळ पु. दांडगट माणूस; गुंड : 'एऱ्हवी गर्वाने गरजणारे गंडगोपाळ...' – पोत १०६.

गंडगोळ स्त्री. १. उखळी तोफ; गरनाळ. २. लाकडी गाठाळ ओंडा. ३. (ल.) गिड्डा व धट्टाकट्टा माणूस; बेडौल व जाड आणि मोठी वस्तू.

गंडजोग्या वि. आळशी; मद्दड; बशा.

गंडणे उक्रि. फसणे; बनवला जाणे. 'लोकांनी त्याला जन्मभर गंडवलं आणि तो गंडला.' – गाबा १३.

गंडभेर, भैरव, भैरी पु. १. एक प्रकारचा काल्पनिक पक्षी. २. गेंडा.

गंडमंडल न. चेहऱ्याची एक एक बाजू मिळून होणारे मंडल.

गंडमाळ–ळा स्त्री. अव. गळ्याला गाठी होण्याचा एक रोग; कफ, मेद हे दूषित होऊन काख, खांदा, मान, गळा व अंडसंधी या ठिकाणी सावकाश पिकणाऱ्या गाठी होतात. [क. गंडमाले]

गंडमृग पु. गेंडा.

गंडरामी स्त्री. नेहमी पुरुषात वागणारी, पुरुषी कारभार करणारी स्त्री. [क.]

गंडरी स्त्री. तिरपीट; त्रेधा; गडबड; हबेलंडी. (गो.)

गंड(डे)री स्त्री. १. सोललेल्या उसाचे (जोंधळ्याचेही) पेरे, कांडे, तुकडा, करवा (तोंडात मावण्याइतका). २. लुगडे इ. वस्त्राच्या पदरावरील तीन चार पट्टे किंवा फुल्या अगर अशा तऱ्हेचा काठ. ३. लहान तुकडा; झिलपी (लाकडाची, धातूच्या कांबीची).

गंडवर्ध फुगणे; सुजणे.

गंडस वि. (अशिष्ट) १. अनैसर्गिक कृत्य, विपरीत संभोग करवून घेणारा. २. (ल.) दुबळा; निर्बळ; गांडू.

गंडस पहा : **गोंडस**

गंडसगोळा पु. टेंगूळ; उठाणू; अवाळू; गाठ; गोळा (शरीरावरील किंवा कापूस भरलेल्या रजई इ. वरील).

गंडसूचीकरण न. (नृत्य) पाय सूची करून त्याच पायाच्या बाजूचा भाग उंच करणे, उजवा हात वक्ष:स्थलावर ठेवणे व डावा हात वक्ष:स्थलाच्या बाजूला वाकडा करणे.

गंडस्थळ न. गाल किंवा मस्तक (हत्तीचे) : 'गंडस्थळीचें तेज अधिक। लखलखीत दोन्हीं भागीं ।' – व्यं ६५.

गंडस्फाटन न. कपाळमोक्ष; कपाळ फुटणे : 'आमची पाचाची धारण बसली; गंडस्फाटनच जाले' – पेद ३२.१९३.

गंडा पु. १. चौकडी; चारांचे परिमाण (कवड्या, पैसे यातील). चार कवड्यांचा एक गंडा होतो. गंडा हे पूर्वी चलन होते व हिशोबात त्याचा

उपयोग करीत. २. (मंडई) चौपट संख्या.

गंडा पु. घोड्याच्या स्वारीचे सामान; खोगिराचे एक उपकरण.

गंडा पु. १. वस्ताद, गुरू (गायन, नृत्य, मंत्र, जादू यांचे) शिक्षणारंभी आपल्या चेल्याच्या किंवा शिष्याच्या उजव्या हाताच्या मनगटाला (किंवा बोटाला, गळ्याला) जो दोरा बांधतात तो. (क्रि. घालणे, करणे, बांधणे). २. घोडा, बैल इ. च्या गळ्यात बांधलेली काळ्या सुताची (तिच्यात आणखी काही वस्तू किंवा अलंकार घातलेली) दोरी. ३. भूतबाधा, रोग इ. नाहीसे करण्यासाठी मनगटाला किंवा पायाच्या घोट्याला बांधायची अभिमंत्रित दोरी. ४. काशीच्या काळभैरवाचा, प्रसादाचा, काळ्या रेशमाचा मनगटात बांधायचा दोरा. (वा.) ० **घालणे, चढविणे** – १. भारविणे, भुलविणे, फूस लावणे; मोह किंवा भुरळ घालणे. २. (सामा.) ठकविणे; फसविणे; झुलविणे; पैसे काढणे. ० **बसणे** – नुकसान होणे; फटका बसणे : 'आता बसला का न्हाई गंडा ?' – भुज ४१.

गंडानाडा, गंडादोरा पहा : **गंडा** ३.

गंडापट्टा पु. घोड्याच्या डोक्यावरील व गळ्यातील अलंकार : 'गंडापट्टा गेंदजोड्या रेशमी फुंदणी लाऊन तिला।' – पला ४.२१.

गंडार स्त्री. सोंगाचे भजन; लळित. (व.)

गंडारणे अक्रि. (तारुण्याचा) उन्माद येणे. (कु.)
[क. गंडा = शक्ती, बल; नवरा, समर्थ पुरुष]

गंडारणे पहा : **गंडा घालणे**

गंडासा पु. अश्मयुगात वापरात असलेले दगडाचे एक हत्यार.

गंडांत पु. (ज्यो.) अनिष्ट काल; ग्रहदशा; कुयोग.

गंडांतर न. अपमृत्यू; जिवावरचे दुखणे; भयंकर धोका; अघोर अरिष्ट; निकट आलेले संकट; अशुभसूचक भावी घटना; भयदायक दशा; आपले अस्तित्वच नाहीसे होते की काय अशी भीती उत्पन्न करणारे संकट. (क्रि. येणे, जाणे, चुकणे, टळणे, वारणे, निवारणे, उडणे) : 'तंव द्वादशवर्षी मृत्युचिन्ह। गंडांतर थोर होतें।' – शिली ११.१५७.

गंडिका स्त्री. (वै.) चेतापेशीचा गुठळीसारखा समूह.

गंडिया, गंड्या पु. १. षंढ; हिजडा; नपुंसक. २. गांड्या; एक शिवी. ३. (निंदेने) अपराक्रमी, दुर्बळ माणूस.

गंडियेरी स्त्री. गंडेरी; उसाचा करवा. पहा : **गंडरी** : 'ले रे संगीत गुलाब गंडियेरी।' – संगीत घोटाळा ८.

गंडी स्त्री. लहान चंबू. पहा : **गिंडी**

गंडी स्त्री. कसोटीचा दगड : 'रत्नपारिखियाचां गावीं। जाईल गंडी तरि सोडावी।' – राज्ञा १३.३१९.

गंडू पु. दर्प; गर्व.

गंडूष पु. १. चूळ; घोट; गुळणा. (क्रि. घेणे.) २. चूळ खुळखुळणे. (क्रि. करणे.) [सं.]

गंडूषपात्र न. तस्त; पिंकदाणी. [सं.]

गंडे न. बियाणे : 'हळदीचे निघालेले गंडे म्हणजे बेणे घरी आणून...' – गार १२५.

गंडेरी, गंडोर, गंडोरी पहा : **गंडरी**

गंडेरी गोफ फुल्यांच्या आकाराचा गोफ : 'लाल पदर आम्हीं हातीं धरितो। गंडेरी गोफातें विणितो।' – मसाप २.३०.

गंडेरीदार वि. गंडेरी नक्षी (काठ, पदर) असलेला.

गंडेरी पदर जरीच्या आडव्या दोन पट्ट्या आहेत असा पदर, गंडेरी पट्टी.

गंडोरी पु. (माळी) खाली, वर पाने व इतर फुले आणि मध्ये गुलाबाचे फूल असलेला हाराचा भाग. अशा हाराला गंडोरी हार म्हणतात.

गंडोरी पु. (ओतकाम) समईच्या खांबाच्या वरचा व खालचा भाग.

गंडोरी हसळी स्त्री. (सोनारी) गळ्यात घालायच्या साध्या हसळीप्रमाणेच परंतु जिच्या मधल्या मूठभर जाड भागावर खांची पाडून अष्टपैलू आकाराच्या मण्यासारखी रांग केलेली असते अशी हसळी.

गंढारणे अक्रि. सर्वच्या सर्व उलथून पडणे; ढासळणे; कोसळणे (विहिरीच्या बाजू, इमारत, खाण).

गंढार(ळ)णे अक्रि. १. नासाडी होणे; बुडणे (पीक, उत्पन्न, धंदा). २. फसणे; नाश पावणे; बिनसणे; मोडणे; चुराडा होणे; ढासळले जाणे (मनुष्य, मसलत, बेत). ३. अंग झडणे; रोडावणे; चोपणे (वार्धक्याने, रोगाने). ४. माघार घेणे; भीतीने काढते घेणे (वादात); बोबडी वळणे; कचरणे; खचणे; दुर्बलावस्था येणे. ५. (वादादिकांत) थकणे.

गंतव्य न. १. जाणे; पळणे; गमन; पळ : 'दोघांविरहित सर्व जनीं। शीघ्र गंतव्य करावें।।' – जे १०.३४. (क्रि. करणे). [सं. गम् = जाणे] २. जाण्याचे ठिकाण.

गंतीचा वि. क्षुल्लक.

गंताड्या वि. १. अव्यवस्थित. २. घाणेरडा.

गंतुक न. (वन.) लैंगिक प्रजोत्पादक कोशिका.

गंतुकाम वि. १. गमन करण्याची इच्छा झालेला; जाऊ इच्छिणारा; गमनेच्छू. २. (ल.) आसन्नमरण : 'विश्वासराव गोळीचे जखमेनें कार्य होऊन गंतुकाम...' – होकै २७. [सं.]

गंथडी पहा : **गंगथडी**

गंथड्या वि. नाचणीच्या गुणविशेषांनी युक्त.

गंदकी स्त्री. १. घाण; कचरा. २. (ल.) घोटाळा : 'एकदां मागील गंदकी वारून पुढें ठीक करून टाकून घेणें आहे.' – मइसा ३.१४१.
[फा. गंदगी]

गंदलकी, गंदवल स्त्री. न. १. बसावयाच्या पाटाच्या खालच्या टेकण्याच्या दोन पट्ट्या; खूर. २. दरवाजा, झडप इत्यादींच्या फळ्या जोडल्यानंतर मजबुतीसाठी त्यांना आडव्या ठोकलेल्या पट्ट्या, दांडकी.

गंदि–दी स्त्री. दुर्गंध; घाण : 'तंव भाजिलेया मनुष्याची गंदि। भेदली तेयां।' – क्रिपु ४२.१०५.

गंदवल एकमेकांना छेदणारे पाय असणारी तिवई.

गंध पु. १. वास (चांगला, वाईट); सुवास किंवा घाण : 'मी पृथ्वीच्या ठायीं गंधु।' – ज्ञा ७.३४. २. सुवास; परिमळ; परिमळद्रव्य. ३. चंदनकाष्ठ; खोड. [सं.] (वा.) ० **नसणे** – (वासदेखील नसणे) अगदी अस्तित्व नसणे, काही ज्ञान नसणे (एखाद्या गोष्टीचे) : 'तिच्या

माहेरी इंग्रजीचा कीं नवीन कसला गंधदेखील नाहीं.' – पकोघे.

न. १. (चंदन, रवा, अगरू, केशर इत्यादीचा) कपाळावर किंवा शरीरावर लावलेला टिळा किंवा उटी. २. उगाळलेल्या चंदनाचा देवपूजेत वापरायचा लेप. (वा.) **गंधफूल करणे –** १. पूजा करणे. २. (ल.) फजिती करणे, खरडपट्टी काढणे.

पु. अंगराग उटी : 'गंध आर्द्रचि असो अनुसूया । दे असा वर न जीस असूया ।' – वामन लोपामुद्रा संवाद १८.

गंधक पु. १. एक खनिज द्रव्य, उपरस; अधातुरूप ज्वालाग्राही रासायनिक मूलद्रव्य; धातुवैरी. २. एक विशेष मिश्रण (औषधीसंबंधी). [सं.]

गंधकाचे फूल गंधकाला आच देऊन त्याची केलेली भुकटी.

गंधकाडी स्त्री. गंधक लावलेली काडी, आगकाडी.

गंधका(ना)म्ल न. गंधकाचा तेजाब; सल्फ्युरिक ॲसिड. सर्व रासायनिक क्रियाकारकांत फार उपयोगी. हे फार दाहक आहे.

गंधकाष्ठ न. सुवासिक लाकूड; चंदनाचे खोड.

गंधकिसल न. उपयुक्त व गुंगी आणणारे द्रव्य.

गंधग्राही वि. (वै.) नाकातील अगर तत्सम वास जाणणाऱ्या (पेशी व पेशीसमूह).

गंधन न. सल्फोन; गंधक ज्यामध्ये आहे अशा रसायनांचा वर्ग. यातील काही रसायने महारोग व क्षयरोग यांच्या उपचारपद्धतीत वापरतात.[इं.]

गंधप्रतिमा स्त्री. (शिक्षण) वास घेण्याशी संबंधित असलेली प्रतिमा.

गंधफुल्ली स्त्री. सुगंधी कळी.

गंधबीड–वीड न. पादेलोण; काळे मीठ; बीडलवण.

गंधमार्जार न. जवादी मांजर. [सं.]

गंधमोरी स्त्री. घाण पाण्याची मोरी, गटार : 'मग गल्लीकुची गंधमोरी । जाऊनी तेथें वस्ती करी ।।' – नव १३.६०.

गंधरस पु. विशिष्ट झाडापासून निघणारा औषधी चीक; रक्त्याबोळ; हिराबोळ. [सं.]

गंधराघोळ पु. धिंगाणा; गोंधळ. (कर.)

गंधराज पु. एक फुलझाड; शेवंती. [सं.]

गंधर्व पु. १. एक उपदेव; स्वर्गातील गायक; सुरगायक. हे स्वर्गात राहून प्रमुख देवांच्या सभेत गायन करतात : 'धनपति सभेत गुह्यक, राक्षस, गंधर्व, अप्सरा, त्र्यक्ष ।' – मोसभा १.४२. २. (ल.) गानवादनपटू. ३. अदृश्य पुरुष. [सं.]

गंधर्वगायन, गंधर्वगान न. १. गंधर्वांचे गाणे. २. स्वर्गीय गाणे. ३. अत्यंत मधुर व आलापदारीचे गाणे. [सं.]

गंधर्वनगर न. १. गंधर्वाचे शहर; दिसते न दिसते व एकाएकी अदृश्य होते किंवा असंभाव्य स्थानी आढळते असे अंतरिक्षस्थ किंवा मांत्रिक शहर : 'गगनीं गंधर्वनगर जैसें ।' – विपू ३.४४. २. हवेत प्रकाशकिरणांच्या वक्रगतीने उत्पन्न झालेला. भूलोकावरील शहरे, बागा वगैरेंचा देखावा; आकाशातील ढगाच्या आकृतीवर होणारा नगरादिकांचा भास : 'गंधर्वनगरींचीं ठाणीं । घेतली देऊनि चिंतामणी ।' – एभा २.२२६. ३. (ल.) छाया; आभास; मिथ्याभास; काल्पनिक अथवा मिथ्या गोष्ट : 'कीं गंधर्वनगरींचे सैन्य ।' – ह १३.२६.

गंधर्वपूजा स्त्री. सन्मानाने एखाद्यास बोलावून आणून मग त्याची भोसडपट्टी काढून त्याला मार देणे. [सं.]

गंधर्वभुवन पहा : **गंधर्वनगर** : 'न रचिता गंधर्वभुवन । उठी जैसे ।।' – ज्ञा १८.४२९.

गंधर्वविद्या–वेद स्त्री. पु. संगीतविद्या; गायनकला; गाण्या–बजावण्याची कला.

गंधलकी, गंधवल स्त्री. पहा : **गंदलकी**

गंधलोलक पु. (मानस.) सहा प्राथमिक गंध दाखवणारी लोलकाकृती.

गंधवादी पु. सुगंधी द्रव्यांचा व्यापारी; गंधी : 'गंधवादी : धूपी : मागतेयांसि देति' – लीचपू २८.

गंधवान वि. सुवासिक; चांगल्या वासाचे. [सं.]

गंधवार्ता स्त्री. (वासाने बातमी) यत्किंचित ज्ञान; मागमूस. (क्रि. नसणे.) : 'याची मला गंधवार्तासुद्धा नाहीं.' – चंद्र १७८. (वा.) **० लागू न देणे –** १. कळणार नाही अशी व्यवस्था करणे. २. कानावर जाऊ न देणे.

गंधशस्य न. एक उपरत्न, याचा रंग पांढरा, लाल किंवा लालसर पांढरा असतो. हे रत्न प्रचारात नाही.

गंधा वि. घाणेरडे; दुर्गंधी; वासट. हा शब्द समासात येतो. [फा. गंदा = वासट]

गंधाकाडी स्त्री. १. चंदनाचा तुकडा; चंदन. २. उदबत्ती. (गो.)

गंधानिळ पु. सुगंधी वारा : 'उठिला मदगंधानिळीं ।' – ज्ञा १७.६.

गंधाबिरुजा–बेरोजा पु. राळ; सुरूच्या झाडाचा चीक; एक वनस्पतीद्रव्य. याला उग्र व कडू वास असून औषधे व रोगण यांच्या कामी हा उपयोगी आहे. [फा. गंधाबीरोझा]

गंधार– गांधार पु. (संगीत) मूलभूत सप्तस्वरातील तिसरा स्वर; सा रे ग म प ध नी या स्वरांपैकी ग हा स्वर. [सं. गांधार]

गंधाली स्त्री. अत्तराची पेटी : 'कर्नाटकातून बुक्केफरोज आला होता. त्याच्याकडून ही गंधाली विकत घेतली.' – श्रीयो २.२८१.

गंधाक्षत–ता स्त्री. १. धार्मिक कृत्याच्या प्रारंभी यजमानाने उपाध्यायाच्या कपाळी लावायचे गंध व अक्षता. २. (शुद्ध व पवित्र लोक यांचा उपयोग नेहमी करतात त्यावरून) शुद्ध व पवित्र सहवास, संबंध.

गंधाक्षतवर्जन न. मिलाफ, एकजूट, बरोबरीचे दळणवळण यास प्रतिबंध, अडथळा.

गंधाक्षतवर्ज्य वि. प्रतिबंध इ. करायला योग्य.

गंधा:पान्तु पु. (ल.) मार; ठोक.

गंधिकाळिक स्त्री. गंज व काळेपणा : 'सांगे पितळेची गंधिकाळिक । जें फिटली होय निशेख ।' – ज्ञा ४.६४.

गंधी स्त्री.पु. १. सुगंधी द्रव्ये विकणारा; आतारी. २. औषधे विकणारा; गांधी.

गंधी कर्बिल कॅर्बालिकाम्ल व गंधकित यांच्या संयोगाने तयार झालेले द्रव्य, हे विषावर गुणकारी आहे.

गंधे पु. अत्तराचा व्यापार करणारा.

गंधेल न. चंदनी अत्तर, तेल. (गो.)

गंध्या वि. १. पहा : **गंधी २.** २. घाणेरडा; घाण्या; ज्याच्या अंगास घाण येते असा (माणूस). [सं. गंध]

गंपा पु. टोपले.

गंबार पहा : **गवर** १ : 'सुवर्णनाणी म्हणून गंबार, मोहरा...' – श्रीयो ४९२.

गंबेरी स्त्री. विड्याची पाने किंवा फुले ठेवण्याची करंडी.

गंभारी शिवणझाड.

गंभीर वि. ज्याचा परिणाम अत्यंत अनिष्ट होईल असा (बनाव, घटना इ.).

गंभीर वि. मोठा; प्रतिष्ठित; घरंदाज : 'नवरी साजती गंभीराची ।' – राके ११४. [सं.]

गंभीर वि. १. खोल, अगाध (समुद्र, नदी). २. शांत, सोशीक, भारदस्त; जरबी; धीरांचा. ३. विचारशील; विवेकी. ४. आतल्या गाठीचा. ५. घन, घौस, उद्दाम.

गंभेरी स्त्री. निंब वृक्षाची जात : 'फणस गंभेरी ।' – वह १३६.

गंमत, गंमतजंमत स्त्री. १. सुखासमाधानाचे कालक्रमण; मौज; चैन. २. करमणुकीची, चैनीची वस्तू, विषय, व्यापार, साधन. ३. चेष्टा; थट्टा. [सं. गम् = जाणे]

गंमत स्त्री. दंडारीतील प्रसंग. [फा.]

गंवईचे लोक पु. अव. खेडवळ, गावंढळ लोक. (काशी)

गा संबोधन (बहुधा काव्यात) अरे! अग : 'चाला, गा राउत हो भणतिले ।' – शिव ५६१. [सं. 'अगा'चे संक्षिप्त रूप]

गाइजणे उक्रि. गाणे; म्हणणे : 'तुझीं लीलां नामें गाइजेसी ।' – दाव ४२५ [सं. गै]

गाई–गाऊ स्त्री. अंगाई; जो जो. (वा.) ० **करणे –** (लहान मुलाच्या भाषेत) झोपणे.

गाईगुजी स्त्री. अव. गुरेढोरे : 'गाईगुजी जोगवू लागल्या आहेत.' – जैत २९.

गाईघाटा पु. सर्व लहानथोर जनावरे : 'दिवाळसनादिशीं मी का ओवाळी गाईघाटा ।' – जामामा २४४.

गाईचा गोहोरा कृतघ्न; खाल्ल्याघरचे वासे मोजणारा.

गाईर स्त्री. १. गारभीच्या शेंगेतील बी (कागद इ. घासायला व मऊ करण्यास उपयोगी). (राजा). २. (ल.) गळवातील गाठ किंवा कठीण भाग. ३. प्रौढ कुमारिकेच्या स्तनातील काठिण्य किंवा गाठ; स्तनात प्रथम येणारी गाठ. ४. अंड्यातील पिवळा बलक.

गाईर स्त्री. शेणखळी; शेण साठवण्याची खाच.

गाउ पु. चार कोसांचे अंतर : 'रीधपुर प्रांती दीढा गाउवा कांटसरे ।' – गोच १. [सं. ग्राम]

गाउ(ऊ)ली : स्त्री. लडिवाळपणे गायीला म्हणतात (माय–माउलीप्रमाणे रूप) : 'गुरूचि शिष्यवांसुरांसि कामधेनु गाउली ।' – निमा १.३६.

गाऊडी वि. गावंढळ.

गाऊल न. १. नफा; फायदा; किफायत; कमाई. २. श्रमविरहित किंवा अकल्पित फायदा; भूमिगत धनाचा लाभ; घबाड. (क्रि. सापडणे, लागणे.)

गाक(ख)र, गागरा पु. बट्टी; उखरी; निखाऱ्यावर भाजलेली – गव्हाच्या कणकेची – जाड दामटी. (क्रि. घालणे, पाडणे, करणे.) पहा : **खाकर** [हिं. गाकर]

गाकरी स्त्री. तांदळाच्या पिठीची किंवा कणकेची दामटी.

गाखर पु. फुफाटा; निखारा.

गागजणे पहा : **गागणे**

गागणे अक्रि. १. ओरडणे; मोठ्याने बोलणे; गर्जना करणे : 'हळुच तिस म्हणे हे गागसी कां गव्हारे ।' – सारुह ४.७२. २. मोठ्याने बोलावणे; हाक मारणे. ३. त्रासणे. [सं. गर्ज]

गागर्यॉ वि. तोतरा. (गो.) [पोर्तु.]

गागर स्त्री. घागर; मातीचा घडा.
वि. ढेरपोट्या. (व.)

गागरा पु. धूळ; कचरा; धुरळा. (व.)

गागाचार्य–दीक्षित–भट्ट पु. (मूळचा गागाभट्ट हा अति विद्वान पंडित असून त्याने शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक केला होता त्यावरून). (ल.) दिखाऊ, ढोंगी विद्वान; अकटो–विकट पंडित.

गागाभट्टी स्त्री. १. गागाभट्टाने लिहिलेला धर्मशास्त्रावरील ग्रंथ. २. (ल.) विद्येचे अवडंबर; अकटोविकट पांडित्य; पोकळ पांडित्य. ३. गप्पीदास.

गागावणे अक्रि. रागाने आरडाओरड करणे; खेकसणे. पहा : **गागणे**

गागाळी स्त्री. गाऱ्हाणे; तक्रार; फिर्याद; कागाळी. (को.)

गागी–गूगे धनिष्ठा (जोशाला कुंडली दाखवल्यास तो काहीतरी बडबड करीत जातक पाहतो त्यावरून) काहीतरी बोलून दुसऱ्याला घाबरवणे; स्वत: गोंधळणे, गांगरणे. (क्रि. करणे)

गाज पु. गाजावाजा; भयंकर आवाज; ओरड. (गो.) [सं. गर्ज]

गाजणे अक्रि. १. वाजणे; आवाज होणे; गर्जना करणे; गरजणे; गागणे (मेघ, पडघम, नगारा) : 'तो गाजत असे अद्‌भुत ।' – ज्ञा १.१२६. २. दुमदुमणे; घुमघुमणे; प्रतिध्वनी होणे; नाद निघणे (वाद्ये इत्यादींचा) : 'आम्ही गाजत वाजत गेलों शिबिरासि विजय साधूनी ।' – मोभीष्म १०.११८. ३. जगजाहीर होणे; प्रसिद्ध असणे; सर्वांना माहीत असणे. ४. डौल मिरविणे : 'कां रुपेंवयसा माजा । आथिलेपणें कां गाजा ।' – ज्ञा ९.४३२. [सं. गर्जन]

गाजतवाजत क्रिवि. वाजंत्री वाजवत; समारंभाने : 'गाजतवाजत मिरवणूक मोटारीतून चालली.' – ऐको १.१०६.

गाजने न. गर्जना; गडगडाट; मोठा आवाज : 'हों काज विजूसि वाजतुसे दांतोरा । मिसें गाजनेयाचेनि ।' – रुस्व ४३८.

गाजर न. एक कंद; हा लांबट, निमुळता, तांबूस रंगाचा असतो. हा खाद्य म्हणून वापरतात. [सं. गृंजर] (वा.) **गाजरासारखा होणे –** रागाने तांबडालाल होणे. **खुषीत गाजरे खाणे –** मनात मांडे खाणे; शेखमहंमदी करणे; मूर्खपणाने आनंद मानणे; मनोराज्य करणे.

गाजरपारखी–ख्या पु. गाजराची परीक्षा करणारा; अकलेचा खंदक; शुंभ; दीडशहाणा माणूस; मूर्ख; खरी परीक्षा नसणारा मनुष्य (कुत्सितार्थी) : 'आम्हा पुरुषांची जात अशी गाजरपारखी आहे.' – कीचकवध.

गाजरमुटके पु. अव. गाजरांच्या कीसात मसाला घालून तो डाळीच्या पिठात मिसळून तळलेले गोळे.

गाजरसुंब स्त्री. नरम, नाजूक खूर (घोड्याचा).

गाजरा वि. गाजरासारखा तांबूस व नरम (घोड्याचा खूर).

गाजरा तीळ पु. १. कारळा तीळ (गाजराच्या पदार्थात याचा मसाला घालतात म्हणून). २. गाजराच्या रंगाचा तीळ (शरीरावरील).

गाजविणे उक्रि. १. वाजविणे; गर्जना करणे; आरोळी मारणे; डरकाळी फोडणे. २. प्रसिद्ध करणे; डांगोरा पिटणे. ३. (विशिष्ट नामांशी संयोग होऊन) मोठी, प्रतापी, कीर्तिमान कृत्ये करणे; प्रसिद्धीला आणणे. (वा.) **गाजवून वाजवून करणे –** एखादे कृत्य उघडपणे व प्रसिद्धपणे करणे.

गाजा पु. १. आरडाओरड. (राजा) २. ढग (बालभाषा).

गाजावज्य न. गजबज; गडबड; गोंधळ : ‘गाजावज्यही न धरावें।’ – ज्ञा ४.३१.

गाजावाज–जा–जी पु. स्त्री. १. गाणे; गायनवादन. २. (ल.) कीर्ति; प्रसिद्धी. ३. गवगवा; बोभाटा. बभ्रा; अगाजा; अवडंबर.(वा.) **गाजावाजा होणे –** बोलबाला होणे; लोकांच्या कानावर जाणे.

गाजी पु. लावा पक्ष्यांची किंवा लाहूर पक्ष्याची एक जात.

गाजी–झी वि. १. धर्मवीर; धर्मसंरक्षक. २. शूर; योद्धा; पराक्रमी; महत्कृत्ये करणारा : ‘एखादा आढळे गाजी।’ – दास १९.८.५. [फा.]

गाजीनणे अक्रि. पहा : **गाजणे** : ‘गगनु गाजीनिले।’ – दाव ७०.

गाजीमर्द पु. १. शूर; वीर इ. २. (कौतुकाने) घोडा. [फा.]

गाज्या पु. तरवारीच्या पात्याच्या एका विशिष्ट भागाचे नाव : ‘बोलण्यामध्यें कज्या होऊन आबास गाज्याची व पुतळीची अशा दोन जखमा तलवारीच्या लागल्या.’ – ऐलेसं ५८८४.

गाझा पहा : **गरजा**

गाट उकिरडा; शेणखड्डे. (अहि.)

गाटा पु. हत्ती.

गाटा पु. १.पाणी धरून ठेवणारे, चिखल होणारे शेत. २.चिखल; गारा. (व.)

गाटा–टी–ट्या वि. हट्टी; दुराग्रही; खोड्या करणारा; हेकड; हटेल.

गाटे क्रिवि. हटवादाने; हट्ट धरून.

गाटेगीळ वि. कधी न चिडणारा; शांत; मुखस्तंभ. (व.)

गाटेगोटे पु. अव. १. दगडगोटे. २. (ल.) मूर्ख, अडाणी लोक : ‘फार माजले गाटेगोटे।’ – अफला ६५. [गोटाचे द्वि.]

गाठ स्त्री. १. तिढा; अढी; गुंडाळा; वेटोळे; गुंतागुंत इत्यादी. २. झाडाचे टेंगूळ; लाकडातील गट्टा, गुळुंब. ३. बोरू, ऊस यांच्या दोन पेऱ्यांमधील सांधा. ४. (ल.) शरीराचा गोल मांसल भाग; पोटरीतील बेडकी. ५. बिनतोंडाचे (आंधळे) गळू; केसतूड; सूज; अवधाणा; बेंड (प्लेगच्या आजारात बहुधा सांध्यात गाठ येते). ६. (अव.) कपाळावरील आठ्या. ७. बेंबीभोवतालची ग्रंथी किंवा काठिण्य. ही प्राण व अपान या दोन वायूंच्या संयोगाने बनते असे म्हणतात. ८. पैशाचा कसा, थैली (मूळात पैसे ठेवून वस्त्राला मारलेली गाठ). ९. (ल.) बंधन; आळा; बेडी; अर्गळा. १०. अढी; पूर्वग्रह : ‘त्याजविषयीं जर आपल्या मनांत गांठ आहे तर.’ – नि १४९. ११. फास; सरकफास. [सं. ग्रांथे] (वा.) **० घालणे, ठेवणे –** १. लक्ष ठेवणे; दृष्टी पुरविणे; मनावर घेणे. **० घालणे –** १. भेटणे; एकत्र येणे; समोरासमोर येणे. २. चढाई करून जाणे; सामना घेणे : ‘घालीन गांठि त्यातें, मी कीं मारील तो मला आजी।’ – मोकर्ण २०.२१. **० घेणे –** भेटणे. **० तोडणे –** दूर जाणे; अंतर पाडणे : ‘त्यांची गाठ पडली, तेव्हा सोशीत (शत्रूचा गोळीबार सोशीत) गाठ तोडीत तीन कोस लष्करपावेतो आले.’ – ऐलेसं ३१२०. **० पडणे –** १. खरे काय ते पक्के करणे. ‘आता देतो म्हणाला, आता नाही म्हणता; तेव्हा आम्हास गाठ पडत नाहीं.’ – ऐलेसं २६८८. २. भेट घेणे. **० सुटणे –** भांडवल कमी होणे. **गाठीस करणे –** साठविणे; राखणे; शिल्लक ठेवणे. **जन्माची गाठ –** विवाहसंबंध; हिंदू लोकात एकदा लग्न झाले म्हणजे ते मृत्यूपर्यंत टिकते असे समजले जात असे. **सात गाठी देऊन ठेवणे, सात गाठीपलीकडे ठेवणे –** केव्हाही खर्च न करण्याच्या उद्देशाने साठविणे. **० देणे, ० मारणे –** गाठ तयार होईल असे करणे. **गाठीला असणे –** साठवलेला पैसा जवळ असणे. **गाठीला लावणे –** पैशाला पैसा जोडणे; पैसा साठवणे. **गाठीस असणे –** १. हुकमात किंवा ताब्यात असणे; जवळ असणे. २. शिलकीस ठेवलेला असणे; संग्रही असणे (पैका इ.).

गाठ स्त्री. तिसऱ्या महिन्याचा गर्भ.

गाठ स्त्री. सामना; भेट; मुलाखत; दृष्टादृष्ट; उत्तरप्रत्युत्तर.

गाठ स्त्री. १. कामकाजाचा संबंध; व्यवहार; प्रसंग. (क्रि. घालणे, असणे, होणे.) २. परिणामाचा भविष्याशी बसलेला ताळा, मेळ; गोष्टींचा मेळ, कालैक्य; समकालिकत्व. ३. एकवाक्यता; संगती; संबंध; मेळ. ४. सोय; सवड.

गाठ स्त्री. नेहमीच्या सवयीचे अन्न खाण्याची तीव्र इच्छा. (क्रि. लागणे.)

गाठचा–ची–चे वि. जवळचा; स्वत:च्या कशातील, थैलीतील; पदरचा, कडोसरीचा. (वा.) **० वाहणे –** स्वत:चा पैसा (शिलकी) खर्च करणे.

गाठडी स्त्री. गाठोडे. पहा : **गठडी**

गाठण स्त्री. १. गुंतवणी; वीण (कुंपणाच्या काट्यांची, बांबूचा तट्ट्या, साट, ताटी इ. ची०); छपराच्या ओमण, रिफाड इत्यादींची बांधणी (कृती व काम दोन्हीही). २. गाठ मारलेली स्थिती किंवा गाठीचे काम. (क्रि. देणे, मारणे, बांधणे, सोडणे, सुटणे, तुटणे इ.)[सं. ग्रंथन]

गाठणे उक्रि. १. ऐन वेळी जाणे; अवचित धरणे किंवा अडविणे; ऐन संधी साधणे व पकडणे. २. (ल.) आकळणे; वश करून घेणे; वठणीवर आणणे; कह्यात आणणे. (वा.) **गाठून बसणे –** डांबून बसणे; वेठून बसणे; ठाम बसणे : ‘यास्तव गोवलचे कोटात गाठून बसलो.’ – पेद ३.१५.

गाठणे उक्रि. १. मिळविणे; संपादणे : ‘सर्वत्र तू यशस्वी त्वद्दासें यश सुखेचि गाठावें।’ – मोसभा १.६८. २. संपविणे; साधणे; पोहोचणे (प्रवास, मजल, मुक्काम, गाव). मुक्कामाला पोचणे; भरभर जाऊन

पुढे गेलेला माणूस, वाहन इ. जवळ पोचणे. ३. ताब्यात आणणे; कबजा घेणे (देश, प्रांत यांचा). ४. भेटणे; भिडणे; सन्मुख होणे.

गाठदाम, गाठसोडवण पु. स्त्री. लग्नात वधूवरांच्या पदरांची गाठ सोडविण्यासाठी वधूच्या बहिणीला दिलेले बक्षीस; करवलीचा मान.

गाठभेट स्त्री. भेट : 'दोघांच्या गाठीभेटी होत राहिल्या.' – पडछाया १४६.

गाठलणे अक्रि. गाठी मारून पक्का करणे : 'दावी गाठलून (बैलाला) मांडवात गच्च बांधला.' – गोता १३५.

गाठले न. १. मुले किंवा स्त्रिया यांच्या गळ्यातील पुतळ्यांची, रत्नांची किंवा मण्यांची साधी माळ; एक अलंकार. यात पुतळ्या, वाघनखे, पदके इ. ओवलेली असतात. २. मंगळसूत्र; गंठण; डोर्ले. (व.) ३. साखरेची गाठी; साखरेच्या पुतळ्यांची माळ. (कु.) [सं. ग्रंथिल]

गाठलेमाठले न. ब्राह्मणात प्रसूतीनंतर तिसऱ्या दिवशी कच्च्या सुताला हळद लावून पिवळे करून त्याला काळ्या घोंगडीची दशी व निर्गुडीचा पाला बांधून तो दोरा मुलाच्या गळ्यात बांधण्याचा प्रकार, विधी.

गाठव(वे)ल न. देवाचा नवस फेडताना एकमेकांच्या पदरांना गाठ मारून पूजा करणारे जोडपे; वोहर. हा प्रकार जत्रेच्या वेळी दृष्टीस पडतो. (गो.)

गाठविणे उक्रि. १. गाठीने सांधणे; जोडणे; गाठ देणे; गाठ मारणे; गाठळणे (दोरी, सूत इ. नी.). २. गाठीने बंद किंवा सुरक्षित करणे; दोरीत ओवून हालेनासे करणे (माळेतील मणी इ.). ३. एखादा दागिना वगैरे रेशमाने पटविणे (पटवेकरी). [सं. ग्रथन]

गाठसर्पळी स्त्री. गाठी गाठी असलेली सोन्याची साखळी. (गो.)

गाठ (ठा) (ठे) ळ वि. १. गाठी असलेले; गाठीचे (लाकूड). २. (ल.) मांसल; धष्टपुष्ट.

गाठळगुंजट–ठळ वि. गाठीगाठींचा.

गाठळणे अक्रि. फुगून घट्ट होणे : 'हातापायांवरच्या शिरा फुगल्या होत्या, जागजागी गाठळल्या होत्या.' – बनगर ९.

गाठा एकी.

गाठा पु. १. खंडोबाच्या भक्ताच्या गळ्यातील रूप्याची हसळी किंवा कडे : 'गळा गाठा हिंडे द्वारीं।' – तुगा ४१६. २. सोन्याची साखळी असलेला कानातील एक अलंकार. (कु.) ३. (ल.) पिंजरा : 'पुंसा लावोनि बांधिजे गांठा।' – ज्ञा १३.२३४. ४. गोल तळीव पदार्थ. [सं. ग्रंथि] (वा.) ० **फोडणे –** वाघ्यामुरळ्यांच्या लग्नात गुरव एक कवड्याची माळ मुलीच्या गळ्यात घालतो तो विधी.

गाठागाठ स्त्री. तडजोड; समजूत : 'यावरून फरासीस यांतून फुटून इंग्रजास मिळाले असतील तर थोडके मुद्यावर गाठागाठ करून घ्यावी असें असेल.' – मशियांका २८७.

गाठाळलेपणा पु. संकुचित वृत्ती; जुने संस्कार.

गाठिवन पु. नागरमोथा : 'गाठिवना मालती मृणाळें। असोख वा बनें बकुळें।' – रुस्व ५४१.

गाठी स्त्री. भेट; एकरूप होणे : 'ते गुरुशिष्याची गोठी। पदपिंडाची गांठी।' – ज्ञा ३.२७२.

गाठी स्त्री. १. पहा : **गाठले** २. कातकरणीच्या गळ्यातील पोत. ३. खारीक, खोबरे, लवंगा, जायफळ इ. ची माळ; गाठले (मुलांचे). ४. होळीच्या सणातील गळ्यात घालायची साखरेच्या पदकांची माळ. ही होळी–पाडव्याला मुलांना देतात.

गाठी स्त्री. १. अळवाच्या पानांची सुपारीएवढ्या गाठींची दह्यातील भाजी; अळूवडी. (राजा.) २. दाण्यांची भाजी. (गो.) ३. मूग इ. कडदणांची पातळ भाजी. (गो.) ४. फरसाणमधील हरभरा डाळीचा एक पदार्थ.

गाठी स्त्री. १. बंधन. २. गुज. ३. भेट; मेळ. ४. अढी : 'वारेयानि वालुवे गांठि। केहिं आहे।' – राज्ञा १३.१०९२.

गाठी स्त्री. अहंकार; आढ्यता.
वि. हट्टी. [सं. ग्रंथि]

गाठीकि(चि)राईत, गाठेकि(चि)राईत, न. एक प्रकारचे चिराईत.

गाठीचा ताप (वै.) खाकेत वा जांघेत गाठ होऊन येणारा ताप; ग्रांथिक सन्निपात; उंदराच्या अंगावरील दूषित पिसवांमुळे येणारा ताप; प्लेग.

गाठीचा दाम–मान पहा : **गाठदाम, गाठसोडवण**

गाठीव वि. गाठलेले; गाठींनी कायम केलेले.

गाठुलीमाठुली स्त्री. अव. (बायकी) बाळंतिणीच्या ५ व्या दिवशी सुईण व बारशाच्या दिवशी घरच्या स्त्रिया मुलाच्या हातापायांना व कमरेला जे दोरे बांधतात ते. पहा : **गाठलेमाठले** [गाठलेचे द्वि.]

गाठूर पु. घोड्याचा एक रोग; टाचरू. – अश्वप २.२६०.

गाठे–ठी न. स्त्री. कानातील अलंकार. पहा : **गाठा** २. (गो.कु.)

गाठेविटप अक्रि. कंटाळा, वीट येणे.

गाठोडी–ळी स्त्री. लहान गाठोडे; गठडी.

गाठोडे–ळे न. १. गाठ; गट्ठा; बोजा; बोचके (गाठ मारलेले, वस्त्रात बांधलेले कापड इ. चे). २. (ल.) पुंजी; भांडवल; मालमत्ता; संपत्ती; डबोले; ऐवज; द्रव्य; गुप्त धन. ३. नागपंचमीच्या दिवशी केलेले उकडीचे दिंड (एक पक्वान्न). [सं. ग्रंथ् = रचणे] (वा.) **० आटोपणे, ० गुंडाळणे, ० बांधणे –** १. आवरणे; आखडणे; बंद करणे (व्यापार, धंदा, कामकाज). २. पळून जाणे; निघून जाणे. ३. मरणे. **० होणे, ० जमणे –** लठ्ठ, गबर, श्रीमंत होणे.

गाठ्या पु. १. पहा : **गाठा** १, २. २. भाजीकरिता केलेली अळवाच्या पानाची गाठ. ३. सुमारे नऊ इंच लांबीच्या कांडसर वेलीचे (ताण्याचे) नाव. ४. सुमारे तीन इंच उंचीची एक वेल.

गाठ्याळ वि. १. गाठाळ; गाठळ : 'गांठ्याळ वेळू वेळुजाती।' – मुआदि १७.१०४. २. (ल.) आतल्या गाठीचा; खोल मनाचा : 'कपटी कुटिळ गाठ्याळ।' – दास २.३.२३. [सं. ग्रंथिल]

गाड न. फट. (व.)

गाड स्त्री. रोष; गैरमर्जी : 'आपणावरी फारसी गाड आहे.' – पेद २११.

गाड(डी)उतार पु. नदीतून गाडी जाण्याचा रस्ता.

गाडग–गे–ला–ले पु. न. लहान मडके : 'तंव गरळ वमिले उरगीं। ते पडिले गौळणीचें गाडगीं।' – कथा २.१५.४१. [सं. घट]

गाडगाड पु. गडगडा.

गाडगुलांव वि. लठ्ठ व ठेंगू. (गो.)

गाडगूड स्त्री. न. १. (तोफा, बंदुका, मेघ यांचा) गडगडाट; धडधडाट. २. पोटातील गुरगुर, कुरकुर. ३. (ल.) काळजी; चिंता; धस्स होणे (पोटात या शब्दाशी जोडून योजना). [ध्व.]

गाडगूल न. लहान गाडगे, मडके. (गो.)

गाडगे न. सुगड; सुरई.

गाडग्यालवंड पाऊस घरातील गाडगीमडकी वाहून जातील असा मुसळधार पाऊस : 'ते दिवशीं पाऊस मनस्वी लागला. कोण्हाचे मडकें मडक्यांत राहू पावलें नाहीं, गाडग्यालवंड पाऊस.' – पेद.

गाडण न. चिखल; दलदल. (ना.) [सं.गाढ]

गाडणे उक्रि. १. (खड्ड्यात) पुरणे; मातीआड, भूमिगत करणे. २. मूठमाती देणे. ३. (ल.) (न भिता एका जागेवर) पाय रोवणे; ठाकणे : 'म्हणून गाडून उभे राहिले.' – भाब ८०. [सं. गर्त]

गाडतक हानाव (नाविक) पहिल्याने काहीसा तिरपा नंतर सरळ व पुन्हा तिरपा असा सांधा जोडणे. हा हानाव फार मजबूत असतो. (को.)

गाडद पु. पहारा; चौकी : 'मामा यांजकडील गाडद आहे.' – ऐलेसं ४९७८.

गाडदी पु. शिपाई; पायदळातील शिपाई; विशेषत: शरीरसंरक्षक शिपाई; पहारेकरी. पेशवे, इतर सरदार व राजे यांच्याजवळ असे गाडदी असत. यात परदेशीय व मुसलमान यांचा विशेष भरणा होता. [पोर्तु. गार्दा]

गाडली पु. वि. संरक्षक; राखणदार; पहारेकरी : 'सबब माणसे गाडली ठेविली. कालपासून इकडे पेंढारी नि ।। शिंदे याची आवई दाट उठली.' – मइसा १०.५१६.

गाडली–ले स्त्री. न. लहान गाडी. (प्रां.)

गाडवन बैलगाड्यांचा समूह. (अहि.)

गाडवाट स्त्री. गाडीचा रस्ता; गाडीवाट.

गाडहत्यारी वि. मोठे धारकरी; शूर; मर्द; तरवार (भाला) वगैरे शस्त्रांनी जवळून लढणारे : 'आधीच गनीम यांचे कच्चे दील; गाडहत्यारी निढवले तरि झाडास बांधले तरि झाड घेऊन जातील.' – भाब ९.

गाडा पु. १. ओझे नेण्याची गाडी; पेटी किंवा चौकटीखेरीज गाडी : 'म्हणे मी गाढा जुंपिलों होतो।' – पंच १.२६. २. चाकाचा घेर; रहाटाचा वृत्ताकार अंश. ३. कडे, वेढे, सांगाडा, वलय (ढोल, तंबूर, डफ, चाळण, नथ इ. चा). ४. चाक. – (तंजा.) ५. धमनी; शकट; सारवट गाडी. (वा.) **चालत्या गाड्याला खीळ घालणे** - चालू काम बंद पाडणे, अडविणे. **गाड्यावर नाव नावेवर गाडा** (कधी नाव गाड्यावर घालून नेतात तर कधी गाडा नावेवर घालून नेतात त्यावरून) १. कामाची अलटापालट; अदलाबदल; चक्रनेमिक्रम. २. दैवाची उलटापालट किंवा फेरा; हलकटाची भरभराट व सज्जनांची पडती वेळ. **संसाराचा गाडा –** आयुष्यातील एकंदर व्याप; कामकाज; खटाटोप; आटापीट; संसारासंबंधी खटला; प्रपंच, पसारा. (ओढणे)

गाडा पु. समूह : 'सिंधूची सीव न मोडे। पाणीपणा सळु न पडे। जरि मोडून गाडे। तरंगाचे ।।' –अमृ ७.२६१.

गाडानाडा पु. व्याप, संसार, प्रपंच, पसारा. पहा : **गाडा** [गाडाचे द्वि.]

गाडाभर वि. १. गाड्याच्या भरतीचे (ओझे). २. (ल.) पुष्कळ (सामान); अफाट. (वा.) **गाडाभर अब्रू वाहणे –** अब्रू मुळीच नसणे.

गाडी स्त्री. १. माणसे बसायचा व साटा किंवा पेटी असलेला लहान गाडा; धमनी; रथ; शकट; वाहन. २. (मोटेच्या विहिरीची) लाट, चाक. ३. कप्पा; कप्पी; कप्पीतील चाक, फिरकी. (राजा.) ४. नथ, डफ, इ. चे कडे, सांगाडा. ४. गाडीभर माती. (क्रि. घालणे) (व.) पहा : ५. **गाडा** ३. ६. (ल.) आगगाडी, सायकल, मोटार. (वा.) ० **सुटणे** – सपाट्याने तोंडपाठ म्हणणे.

गाडीउतार पहा : **गाडउतार**

गाडीचकार स्त्री. गाडीचा रस्ता : 'पावसाळ्यात गाडीचकार बंद असते.' – आआशे २०३.

गाडीचे चाक (हे उलटसुलट फिरते यावरून) दोन डगरींवर हात ठेवणारा; विशेषत: आपल्या चाकराच्या कोणत्याही कामात दोष काढणारा धनी.

गाडीतळ पु. बाजाराच्या वाटेवर, प्रवासाच्या मुक्कामात गाड्या सोडण्याची मोकळी जागा : 'शेदोनशे बैलगाड्या येतील... त्यांच्यासाठी कुठं गाडीतळ आखून द्यायला हवा.' – स्मगा २५२.

गाडीभराई स्त्री. गाडीत माल भरण्याची मजुरी.

गाडीवान, गाडेकरी पु. गाडी हाकणारा.

गाडु पु. लहान मडके; गडू; बोळके; गुणगी : 'जमेदार याजकडे संक्रांतीचे खण व मडकी व घट गाडु...' – मसाप २.१७५.

गाडुली स्त्री. पांगुळगाडा.

गाडे न. पैज; हौड; पण (सोंगट्या, जुवा या खेळात).

गाडे न. १. लहान गाडा, गाडी. २. व्यवहार; काम; घडामोड : 'व्यापाराचे गाडे। मोडतांही अपाडे।' – अमृ ९.२१. ३. माळका एकामागून एक येणे, जाणे; चक्र. (वा.) ० **चालणे** – निर्वाह होणे : 'माझे गाडे कसेही चालेल.' – माजी ५०९.

गाडेकारू पु. डेरे देण्याचे काम करणारा फरास : 'भणओनि ते गाडेकारू होंडी।' – शिव ५६८.

गाडे गाडे भिंगोरे – भिंगोऱ्या, गाड्या गाड्या भिंगोऱ्या अंगाभोवती गिरक्या मारण्याचा मुलांचा एक खेळ.

गाडेबगाड न. गळ टोचून घेऊन गाड्यावरील खांबाला लोंबकळत फिरण्याचा नवस फेडण्याचा एक प्रकार.

गाडेराव पु. अव्यवस्थित, घरातील, स्वत:च्या कारभाराची दाद नसणारा, वेंधळा माणूस.

गाडेसोनाऱ्या पु. एक प्रकारचा वाघ; ढोऱ्या, बिबट्या हे आणखी दोन प्रकार. (बे.)

गाडोरा–रे गांडोरा, गाडोरा–रे, गांडोरा–रे पु. न. इमारतीचा पाया, पायातील भर किंवा पायशोधनी : 'जळां शोधुनि गाडोरे।' – भाए ४८९; 'कीं फोडोनि आम्ही गांडोरा घातला।' – ज्ञा ११. [सं. गड्]

गाड्डी पु. पहा : **गारुडी** (गो.)

गाड्या वि. गाडणारा; पुरणारा.

गाड्याला जुंपलेला कामाचा रगाडा पाठीमागे असणारा; नेहमी कामात गुंतलेला.

गाढ वि. १. गडद; स्वस्थ; भरपूर (झोप). २. निबिड; घन (काळोख). ३. अत्यंत; दाट; घोर (अज्ञान). ४. गर्द; दाट; घनघोर (जंगल). ५. घट्ट; मजबूत; दृढ; गच्च; भरपूर : 'रसें गाढीं वरी ढिलीं ।' – ज्ञा १७.१२८. ६. आवळ; तंग; बळकट : 'शस्त्रें सुटतील गाढीं ।' – एरुस्व ७.७४. [सं.]

गाढ वि. १. मोठा; पुष्कळ. २. शूर; पराक्रमी; खंबीर : 'मानवी वीर गाढा ।' – मुवन १०.४९. ३. उत्कृष्ट; अप्रतिम : 'तुझें सौंदर्य देखोनि गाढें ।' – ह १.३०. [सं.]

गाढणे सक्रि. कसणे; घट्ट करणे : 'तैसें नितंबावरी गाढिलें। पीतांबरू झळके।। ' – ज्ञा ११.२२१.

गाढमूढ वि. अतिशय गडद; घोर; स्वस्थ; प्रशांत (झोप) : 'येक ते गाढमुढीं पडिले। सुषुप्तिमधें ।' – दास १८.९.१९. [सं.]

गाढव पु. उकिरड्यावरील एक पांढरा किडा; कसर; वाळवी.

गाढव पु. न. १. घोड्याच्या वर्गातील एक लहान प्राणी; रासभ; खर; गद्धा. २. (ल.) मूर्ख मनुष्य.

गाढवलोळ धुळवड.

गाढवाचा खरारा पु. मूर्ख, टोणपा मनुष्य. [सं. गर्दभ] (वा.) **गाढवाचा नांगर फिरविणे** – एखाद्याच्या घरादाराचे किंवा वतनवाडीचे वाटोळे करणे. एक जुना शिक्षेचा प्रकार. गुन्हेगाराचे घर जमीनदोस्त करून त्याचे शेत करीत.

गाढवी दगड, धोंडा ओबडधोबड दगड.

गाढहत्यारी वि. मोठे धारकरी; शूर; मर्द; तरवार, भाला इ. शस्त्रांनी लढणारे.

गाढा–डा वि. १. गाढ; घट्ट; दाट (पातळ पदार्थ). २. दांडगा; मजबूत; बळकट; घटमूट (शरीर) : 'तैसा भुजोनि जो गाढा। परिग्रहो ।' – ज्ञा १८.१०६२. ३. गर्द. [सं. गाध, गाढ]

गाढा वि. १. शूर; पराक्रमी : 'रूपें कर्कशें कोपला वीर गाढा ।' – राक १.१५. २. प्रवीण; तरबेज; सखोल; पक्का; बाका; निष्णात; पटाईत. २. थोरवी; विपुलता : 'दंतीं म्यां देवदंती धरूनि मुरडिला शैल कैलास गाढा ।' – आसी ३२. ४. खोल मनाचा; गुपित न फोडणारा.

गाढिका स्त्री. १. प्रौढी; ऐट; पुरुषार्थ; बढाई; पराक्रम : 'कोकिळा मंगळ–रागु कवतिके। गाति गाढिकासी ।'– नरुस्व ७५१. २. थोरवी; विपुलता. ३. दृढता; बळकटपणा : 'म्हणोनि आसनाचिया गाढिका ।' – ज्ञा ६.३६४. ४. प्रिय मैत्रिण : 'विश्वास विकार गाढिका। सवें चालताती ।' – नरुस्व ३८५. ५. गाथण; पुतळ्यांची, रत्नांची किंवा मण्यांची साधी माळ : 'पाराची गाढी तुटली व्ह माय...'–लोसामा ४.११. [सं. गाध]

गाढे वि. भक्तिपूर्वक केलेले; कळकळीचे; दृढभावदर्शक : 'ऐसें करितां स्तवन गाढे ।' – मुआदि २.१३३. पहा : **गाढा**

गाण स्त्री. डोंगरातील पाण्याची जागा; उथळ विहीर; डबके; पोखरण.

गाण–णी पु. १. गवई; बंदा (जात); देवळी; गायक. (गो.) २. नायकिणीचा साजिंदा. (को.) [सं. गान]

गाणपत्य वि. गणपतीचे उपासक; गणपतीचा भक्त : 'गाणपत्य म्हणती गणेश। तो जाण द्वारकाधीश।' – ह ३४.१७८. [सं.]

गाणावाणा पु. गाणे व वानणे; गानवर्णन : 'घेऊनि गीतार्थ उगाणा। ज्ञानिये जें विचक्षणा। ठाकती तें गाणावाणा। गीतेचा तो लाहे ।।' – ज्ञा १८.१५२७.

गाणी वि. गाणारीण; गायिका; गानी : 'जेथें सरस्वतीसारखी गाणी ।' – कालिका ४.९.

गाणीक वि. गायक; गाणारा.

गाणीक – व न. १. गायनचातुर्य : 'गाणीव जाणीव शहाणीव। वोंवाळूनि सांडावी सर्व ।' – एभा ११.७३८. २. गाणे : 'बहिरीयापुढें हृषीकेशा। गाणीव करा ।।' – ज्ञा ११.१५७.

गाणे उक्रि. १. काव्य गळ्यावर म्हणणे. २. कवन, गायन करणे; काव्यात वाखाणणी, गुणवर्णन करणे. ३. प्रशंसा करणे; वाखाणणे; स्तवणे : ४. (ल.) एकच एक सूर लावणे; जपमाळ घेणे; पिरपीर चालविणे, लावणे : 'जें प्रथम गात होता गाणें अद्यापि तेंचि खळ गातो ।' – मोशल्य ३.७४. [सं. गे = गान]

गाणे न. १. गायन; गीत (ध्रुपद, ख्याल इ.) म्हणणे. २. तत्संबंधी ध्रुपद इ. पद, कवन. ३. (ल.) (पोरासोरांची) पिरपीर; टुरटूर; भुणभूण. ४. लांबच लांब, कंटाळा येण्याजोगे कृत्य, कहाणी; कथा; रडगाणे. (क्रि. गाणे, गात बसणे.) ५. (ल.) काम, कारभार, व्यवहार, देणेघेणे इ. चे खटले, प्रकरण. ६. घडून आलेली गोष्ट, प्रसंग, वेळ. [सं. गे = गान] (वा.) **० लावणे** – एकसारखी पिरपिर करणे.

गाणेबजावणे न. गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे; गायनवादन; (सामा.) संगीत.

गात–ते न. खाट, पलंग यांच्या चौकटीची चार लाकडे : 'तेव्हां पलंगाचें तडतडी गात ।' – अफला ७७. [सं. गात्र] (वा.) **आडवे गात न उभे गात** – अनिश्चित व असंदिग्ध कृत्य, भाषण, वर्तन.

गात(ता)डी स्त्री. १. गव्हाणी; गव्हाणीचा दांडा, फळी. २. गाभाऱ्या (देवाच्या मूर्ती) पुढील लाट, आडवे लाकूड; अडवण. ३. (ल.) गर्द ढगांची रांग, ओळ. (क्रि. जमणे, धरणे, करणे, मोडणे, विरणे). ४. हातमागावरील लाकडी लग.

गाता वि. गाणारा; गायक : 'पोवाडा गात्याला उद्राण ऐकत्याला घडी पुण्य ।' – ऐपो ६३. [सं. गातु]

गाताडा वि. १. स्वच्छंदी; अडेल; दुराग्रही. २. मूर्ख; मंदधी; जडबुद्धी.

गाताडी–ड्या स्त्री. लाकूड; दांडा : 'राजावळीचे गांवांतून गाताड्या आणून त्याचा ताफा बांधाला.' – वसमो. [सं.]

गात्र न. १. अवयव; अंग : 'नाडीतें सोडवी। गात्रांतें बिघडवी ।' – ज्ञा ६.२१९. २. (शाप.) काटा; सोंड; शिंग (गोगलगाय इ. प्राण्यांना स्पर्शज्ञान होण्यासाठी असणारा अवयव). [सं.]

गात्रभंग पु. गात्राला आलेली अशक्तता; अवयवाची बधिरता; विकलता : 'नको जाऊ देऊं भंगा। गात्रें माझीं पांडुरंगा ।' – तुगा ११९८. [सं.]

गात्रीयंत्र न. ब्रह्मवीणा; गायनयंत्र : 'गात्रीयंत्राची मिळनी। सप्तें स्वरां गुंफितु वेणी ।' – शिव ४४.

गा (गां) थन स्त्री. विशेषत: काजू किंवा मासे यांची माळ. (गो. कु.) [सं. ग्रथन]

गाथा स्त्री. १. कविता; धार्मिक काव्य; काव्यसंग्रह. २. प्राकृत; छंदरहित रचना; साधे गद्य. ३. पूर्ण वाक्य. ४. गप्पा; भाकड कथा; गटारगप्पा. (क्रि. सांगणे, कुटणे). ५. हकीगत : 'सांग तो मज सविस्तर गाथा।' – आपू २. ६. आर्या : 'गाथा म्हणजे आर्या गीति तियेहुन विशेष नादवती।' – छंर १२४. [सं. गै = गाणे]

गाथा पु. १. गुंतागुंत; घालमेल; गोंधळ. २. सुरकुतलेली, चुरगळलेली स्थिति; जपणूक, निगा नसणे : 'विषयाचा काय गाथा। अनुचित कीं सखया।' – राला ४४.

गाथा पु. अभिमान.

गाथागोवा–वी पु. स्त्री. १. घोटाळा; घालमेल; गुंतागुंत. २. (विशेषत:) धांदल; तारांबळ; गडबड : 'जन्म हेंचि अकारण। गाथागोवी।' – दास ३.१.४.
वि. व्यर्थ.

गाथिक वि. १. कथा, कहाणी, चरित्रे, गोष्टी इ. सांगणारा. २. गाथा किंवा गद्य रचणारा.

गाद स्त्री. १. भातावरील रोग. २. तळ्यातील लव्हाळे. ३. गादमाशी.

गादचे क्रि. भुकेने घेरी येणे. (गो.)

गादणे अक्रि. जमणे : 'तुंब वाहतां गादलें उदक। तो जाहला क्षीर समुद्र।' – नरुस्व ८२७.

गादणे अक्रि. १. गढूळ, मलिन होणे; पीडणे; माखणे : 'महामळें मन होतें जें गादलें। शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें।।' – तुगा २०७२. २. शेत तणाने खराब होणे. (व.) [सं. कर्द]

गादणे, गांदणे उक्रि. गांजणे; पीडा देणे.
अक्रि. रोगाने पछाडणे; पीडा पावणे; पीडित होणे : 'जे अवृष्टीचेनि उपद्रवें। गादलें विश्व आघवें।' – ज्ञा १३.२२२. [सं. गद]

गादयेकार पु. गुत्तेवाला; गुतेकार. (गो.)

गादरगुदर वि. मांसल; गुटगुटीत. (ना.)

गादला–ली वि. मलिन; मळकट.

गादा–धा, गादारेडा पु. समुद्रातील देवमाशाच्या जातीचा एक मोठा मासा. 'त्याने काकाला पाण्यात फिरणारा गादारेडा दाखवला.' – शेलूक १४५.

गादा पु. राड; चिखल; रेंदा; खळमळ (बहुतेक गढूळ दाट द्रवपदार्थासंबंधी; माती मिसळलेले पाणी, तूप इ.). [हिं.]

गादा पु. भातजमिनीचा तुकडा. (बे.)

गादा पु. फळातील गर.

गादाड वि. दलदलीची (जमीन). (गो.) पहा : **गादा**

गादाडा पु. भांड्याच्या तळास लागलेली घाण.

गादापादा पु. चोळामोळा; सुरकुतलेली स्थिति (कागद, कापड यांची). [गादाचे द्वि.]

गादावणे अक्रि. अजीर्ण होणे; पोट बिघडणे.

गादिजणे अक्रि. लिप्त होणे; गुंतून पडणे. पहा : **गादणे** : 'अगा आकाश के नाही। हें न रिघेचि कवणे ठायीं। परि कायिसेनी कहीं। गादिजेना।।' – ज्ञा १३.११२०.

गादी स्त्री. १. कापूस इ. भरून शिवून झोपण्यासाठी तयार केलेली खोळ, पिशवी. २. जनावराच्या पाठीवरील खोगीर. ३. मऊ भाग (हाताचा, जोड्याचा); ढुशा, टिका यांचा तळचा रेशमी विणलेला भाग. [क.गादि]

गादी स्त्री. प्रख्यात पुरुषाचे आसन, स्थान, दर्जा, अधिकार, पद, राज्य, संस्थान, सिंहासन. [क.गद्दिगे] (वा.) ० **चालवणे** – पूर्वीचेच धोरण, धंदा चालू ठेवणे. **गादीला पाय लावणे** – १. राजाविरुद्ध बंड करणे; राजद्रोह करणे. २. वरिष्ठांशी उद्धटपणे वागणे, उपमर्द करणे. **गादीवर गोष्टी सांगणे** – गर्विष्ठपणे भाषण करणे.

गादी स्त्री. कागदाचे दहा दस्ते; गड्डी.

गादी स्त्री. १. दारूचे दुकान. २. पानाचा ठेला. (गो.)

गादीची चाकरी, नोकरी राज्याची (राजाची नव्हे) सेवा.

गादीची दौलत राज्याचा (राजाचा नव्हे) खजिना.

गादीतंबाकू स्त्री भुसारी, वाणी व किरकोळ व्यापारी याचे दुकान. (राजा.)

गादीहुजूर क्रिवि. सिंहासनासमोर, राजासमोर.

गाद्याळ वि. तणाने खराब झालेले (शेत.). (व.)

गान न. गाणे; गायन (कला किंवा गाण्याची क्रिया). [सं. गै]

गानलिपी स्त्री. (संगीत) गाण्यातील चीज, स्वर व ताल वगैरे लिहिण्यासाठी तयार केलेली चिन्हमालिका.

गानवी स्त्री. बोलणे; भाषण.

गानश्रेढी स्त्री. १. (संगीत) गायनासंबंधी स्वरमालिका, स्वरमेलनाच्या चढउतारासंबंधी अक्षरपंक्ती. २. (गणित) पहा : **गायनश्रेढी** [सं.]

गानी स्त्री. गाणारीण; गायिका : 'आळती गानी सरस्वती।' – शिव ५१. [सं.]

गापटी स्त्री. (नाविक) पसरलेला कातळ; खडक.

गाफल–ली वि. १. बेसावध; बेभान. २. जड; सुस्त; मूर्ख; निशाखोर; झिंगट; दारूने धुंद झालेला. ३. निष्काळजी; आळशी; बेफिकीर.[फा.]

गाफलाई स्त्री. बेसावधपणा : 'गाफलाई जाहली.' – मदरू २.९.८.

गाफली, गापली स्त्री. मेलेल्या किंवा फरार मालकाची जमीन.

गाफिली, गाफीलगिरी स्त्री. गैरसावधपणा; गाफलाई : 'हे गाफिली कार्कुनापासून जाहली.' – वाड–बावा २.८६; 'शिपाई लोकांचे व घोड्यांचे सामान सरंजाम कसे आहेत ते वरचेवर पहात जाऊन दुरुस्त ठेवण्यास कदापि गाफीलगिरी करीत जाऊ नये.' – ऐस्फुले ५४.

गाब, गाभ पु. १. गर्भ. (गो.) २. अतिशय कोवळे फळ. (कु.)[सं. गर्भ]

गाब(भ)डी, गाब(भ)डे स्त्री. न. १. भोक, खड्डा, चीर बुजविण्या–आच्छादण्यासाठी लावलेला तुकडा, पुस्ती, जोड, ठिगळ. २. (नाविक) झिरपे; भोक; छिद्र. [क. गब्बरिसु]

गाबडी शेट अडाणी; अनभिज्ञ.

गाबडे न. एक शिवी (मूळ अर्थ गर्भपात) : 'आयला गाबडं झोप बी येऊ देत न्हाई.' – पेरणी ७२.

गाबणे सक्रि. मासे धरणे. (गो.)

गाबणॉ वि. (ल.) श्रीमंत; पैसेवाला; गाभणा. (गो.) [सं. गर्भ]

गाबती–दी, गाबीत–द पु. महाराष्ट्रातील मासेमारी करणारी दर्यावर्दी जात.

गाब(बा)ळणे उक्रि. १. गमावणे; सांडणे; गळफटणे; हरवणे; गैरविल्हे लागणे. २. भेसळ करणे, होणे; अव्यवस्थित ठेवणे (कागद, वस्तू); गोंधळ होणे; गुरफटणे.

गाबळणे अक्रि. डागळणे; डाग पडणे. (कर.)

गाबागाब वि. गप्प; चिडीचिप : 'पोरं सारी भिऊन गाबागाब झाली होती.' – ऊन ३७.

गाबागुबी स्त्री. १. (सामान्य किंवा परस्पर) बुकलाबुकली; धक्काबुक्की; कुटाकुटी; कुंदाकुंदी. (क्रि. करणे, होणे.) २. (ल.) लाचलुचपत; दाबादाबी; हरामखोरी; दगलबाजी. [ध्व.]

गाबाळ वि. बावळट; अडाणी : 'तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचे। येरा गाबाळाचे नोव्हे काम।' – तुगा.

गाबाळ न. पु. १. गळाठा; चोथा; घाण; केरकचरा; गाळ : 'आणिक नका कांहीं गाबाळाचे भरी। पडों येते थोरी नागवण।' – तुगा २७१६. २. जुनाट, फाटक्यातुटक्या, निरुपयोगी वस्तूंचा ढीग, रास (रद्दी, कसरीने खाल्लेल्या कागदांची, पुस्तकांची). ३. उसाचा वाळलेला पाचोळा; चोयट्या. ४. बिनलढाऊ लोक : 'पेंढार वगैरे गाबाळ झाडून देशास लावून द्यावें.' – ऐलेसं २९९०.

गाबाळ पु. नारळाच्या शेंड्यापासून फुटलेले तंतू, शेंडी. (को.)

गाबाळ न. खोटेनाटे : 'सत्य आम्हा मनीं। नव्हों गाबाळाचे धनी।' – तुगा २९०७.

गाबाळगुबाळ पहा : **गाबाळ**

गाबाळग्रंथ पु. १. फाटकातुटका कसर लागलेला ग्रंथ, पुस्तक. २. अनेक पुस्तकातून घेतलेल्या पानांचे बांधीव पुस्तक; रद्दी कागदाचा ढीग; वेच्यांचे पुस्तक; खर्ड्याचे पुस्तक : 'ज्या लक्षावधी लोकांस बायबल हे केवळ गाबाळ ग्रंथ वाटतें...' – नि ४२०.

गाबाळ मुद्रा अजागळ किंवा मूर्ख चर्या, चेहरा; भोंगळ मुद्रा, सुरत.

गाबा(भ)ळी स्त्री. माशाच्या पोटातील अंड्यांची जाळी. (कु.)

गाबाळी–ळ्या वि. अव्यवस्थित; निष्काळजी; गैदी; अजागळ : 'रामदास म्हणे अवघेची गाबाळी।' – रामदास, स्फुट अभंग ५.

गाबाळो वि. १. जुनाट व उरला सुरला; जीर्ण व फाटका; चिरलेला व विदारलेला इ. २. निरर्थक.

गाबी पहा : **गाभी**

गाभ स्त्री. दोन टेकड्यातील मोठी खिंड. (राजा.)

गाभ पु. १. गर्भ (विशेषत: पशूंचा). २. मध्य; गाभा. [सं. गर्भ] (वा.) ० **सांडणे, टाकणे** – १. विणे; गर्भ पडणे. २. पूर्ण काल होण्यापूर्वी विणे.

गाभट (ड) णे अक्रि. गाभ सांडणे; गर्भपात होणे.

गाभडा वि. पूर्णत्वास आलेले; दळदार; गाभुळलेला; पाडाचा; पिकण्यास आलेला; गुरंभा (आंबा, चिंच).

गाभण–णा–णी वि. १. गर्भार; गर्भिणी; गर्भाने युक्त (घोडीशिवाय इतर पशू). २. उघड न केलेली, मोघम ठेवलेली (गोष्ट). (क्रि. ठेवणे). [सं. गर्भिणी] (वा.) (एखाद्याच्या पुढे) ० **गाभ टाकील** – उग्र; भयानक; जाज्वल्य अशा पुरुषाविषयी योजितात.

गाभणे अक्रि. गाभण होणे (गाय, म्हैस इ.).
न. (ल.) गुप्त गोष्ट; मोघम ठेवलेला मजकूर.

गाभरू पु. उनाड पोर. (व.)

गाभसांड पु. गर्भपात (जनावरासंबंधी योजतात). (क्रि. करणे, होणे).

गाभळणे पहा : **गाभुळणे**

गाभळी स्त्री. माशांच्या अंड्यांचा समुदाय. (गो.)

गाभा पु. १. मगज; गर; गर्भ; नार; पोटातील अंश (लाकूड, ताटे, मुळे यांच्या). २. मोना; कोका; ताडक (ताडवृक्षाचा अथवा केळीचा). ३. बोखा; शेंडा (ताड, नारळी यांचा). ४. पागोट्यातील बताणा, आतील भाग; पागोट्याच्या आतील लहान पागोटे; फडके. ५. (ल.) मर्म; रहस्य; मतलब; सार : 'बुद्धीचिया जिभा। बोलाचा ना चाखतां गाभा।' – ज्ञा ७.२०७. ६. मध्य; गर्भागार (देऊळ इ. चा). [सं. गर्भ]

गाभागोभा पु. हरकत; प्रतिबंध; अडथळा : 'जैसी जळींची प्रतिमा। जळनाशीं बिंबा। येतां गाभागोभा। कांहीं आहे।' – ज्ञा १८.१३६५.

गाभाटणे अक्रि. १. गाभटणे; अकाली प्रसवणे (पशूंचे). २. अपूर्ण राहणे.

गाभार–रा पु. १. ज्यात मूर्ती असते तो देवळाचा आतील भाग. २. माजघर; अंतर्गृह : 'जो संतोषाचा गाभारां।' – ज्ञा ४.१०७. ३. (ल.) मनोगत ; 'तैसें जया अखरा। भेटती गाभारां।' – अमृ १०.२८. [सं. गर्भागार]

गाभारणे अक्रि. अपूर्ण राहणे.

गाभाळ, गाभाळणे पहा : **गाबाळ, गाबाळणे**

गाभिण स्त्री. सगर्भ जीव : 'गाभिणी उकढलीं। पुटां माझि।।' – राज्ञा १३.२२७.

गाभि(भी)ण पहा : **गाभण–णी** : 'कर्म कर्ता काय ऐशी। त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली।।' – ज्ञा १८.९७१. [सं. गर्भिणी]

गाभिणे–ले वि. १. फदफदलेले; किडे पडलेले : 'शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो।।' – ज्ञा १७.१५९. २. फुगलेले.

गाभी स्त्री. गाभ; गर्भावस्था.

गाभी पहा : **गाबडी**

गाभुट(ड)णे, गाभोट(ड)णे अक्रि. १. पहा : **गाभटणे.** २. पाडास येणे; गुरंभळणे. पहा : **गाभुळणे**

गाभुटा पु. (चर्मकारी) तळाच्या बाहेरच्या बाजूला बसविलेल्या सागळेच्या तुकडास दिलेला जोड. (क्रि. धरणे.)

गाभुडणे क्रि. गर्भपात झालेल्या स्थितीत असणे.

गाभुळणे, गाभोळणे अक्रि. १. पाडाला लागणे; मगज भरून परिपक्व होण्याच्या स्थितीला येणे; गुरंभळणे (फळ). २. उमळणे; उतणे; सडीला लागणे (आंबा इ.). ३. जनावराचा गर्भपात होणे. (व.)

गाभूळ, गाभोळ वि. दळदार; भरदार; मगजाचे (पाडाचे फळ).

गाभैवन न. सूक्ष्म अंकुर; गर्भातील पान : 'कां गाभेवनें वटु गिंवसवे।' – ज्ञा १०.७०. [सं. गर्भपर्ण]

गाभोळी स्त्री. १. धान्याचे भरीव कणीस. २. माशाच्या पोटातील गर्भ. (कु.)

गामचाल स्त्री. घोड्याची गती, चाल; सरळ व एकसारखी (सात्रक) चाल; डौलदार, छानदार, दिखाऊ तुर्की चालीचा एक प्रकार. याला संस्कृतमध्ये धौरितक म्हणतात.

गामच्छोडा पु. पेशवाई व आंग्लाई यांच्या दरम्यानच्या काळात प्रवाशांना लुटणारी एक जात.

गामा किरण (भो.) किरणोत्सारी मूलद्रव्याच्या अणुगर्भातून उत्सारित होणारे अतिशय लघु तरंगलांबीचे व अतिभेदक किरण.

गामायगौराय स्त्री. सोम्यागोम्या; फालतू माणूस; कोणीतरी : 'अरे मी चवदा चवकड्याचा राजा रावण, मला कसें नाहीं पत्र पाठविलेंस? आणि गामायगौराय इत्यादिकांना पत्रें पाठवून मला कसें नाहीं पाठविलेंस?' – दशावतार मसाप २७.

गामी वि. जाणारा; गमन करणारा. (समासात) आकाशगामी, पाताळगामी. [सं. गामिन्]

गाय स्त्री. १. धेनू; दूध देणारा, माणसाळलेला, चार पायांचा एक सस्तन प्राणी. २. (ल.) गरीब. ३. (ल.) स्वभावाने गरीब, सात्त्विक, अनाथ, दीन माणूस. [सं. गो.] (वा.) **० गोवणे** – आक्षेपित, अयोग्य स्थळी मुलगी देणे. **० चिखलात अडकणे** – अडचणीत, पेचात सापडणे. **गायवाना करणे** – काकळूत करणे. (व.) पहा : **गयावया करणे**. **० होणे** – दीन, दुबळा होणे; (दुर्दैवाने, दुखण्याने) रंजीस येणे : 'उगिच अबोला धरिला। कांहीं भिउन असावें हरिला। झालें मी गाय।' – प्रभाकर. **गायी पाण्यावर आणणे** – रडू आणणे. **गायी पाण्यावर येणे** – डोळे पाण्याने भरणे : 'गाइ पाण्यावर काय म्हणुनि आल्या?' – बी कवी. **गायीचा खूर तिखट –** अनाथाचा वाली ईश्वर. **गायीने माणीक गिळणे** – जेथे फार मोठा तोटा सोसल्यावाचून किंवा पाप केल्यावाचून बूड भरून येत नाही तेथे योजतात. **गायीवासराची ताडातोड करणे** – नातेवाइकांत भेद करणे; त्यांचा संबंध तोडणे (विशेषत: मायलेकरांची ताटातूट). **गायीवासराची भेट करणे** – जवळचे आप्त, स्नेही, नातेवाईक भेटविणे; त्यांना एकत्र आणणे. **गायीसारखा हंबरडा फोडणे** – मोठ्याने कळवळून आक्रोश करणे (मुलाने, बाईने) **गायेदू(धू)म पिटणे –** गुरासारखे उधळणे; पिटीत नेणे.

गाय स्त्री. १. एका जातीचे काळ्या रंगाचे झुरळ; २. एक पक्षी.

गाय पहा : **पारी**

गाय स्त्री. एक वनस्पती; लहान इंद्रावण; कडूवृंदावन. [सं. गो]

गायक वि. गाणारा; विशेषत: व्यावसायिक गवई. [सं. गै = गाणे]

गायकगण, पु. गाणाऱ्यांचा समूह; गाणारी मंडळी.

गायकी स्त्री. १. गुरूपासून मिळवलेले निरनिराळ्या रागांतील चिजा म्हणण्याचे ज्ञान; संपादन केलेल्या गाण्यात जास्त भर घालून वाढवलेले ज्ञान; गाण्याचे कसब. २. गाण्याची पद्धत. ३. गायनाचा व्यवसाय.

गायकी–क्या वि. गुरे राखणारा; गुराखी : 'उगड गायक्या गाईना वाडा।' – एहोरा ३२.

गायगुजी स्त्री. गाय किंवा तसेच एखादे जनावर : 'कोणी गायगुजी दारी उभी राहिली, तर तिच्या डोक्यात काठी घालतात...' – स्मगा ३३४.

गायचाळा पु. लहान मुलांचा एक खेळ.

गायणा–णी–नी स्त्री. गाणारा, गाणारीण. पहा : **गानी**

गायतुरी स्त्री. गायत्री. (गो.)

गायतोंड्या–डा वि. लाजाळू; भित्रा.

गायत्री स्त्री. गाय : 'गायत्री विकोनी पोट जे जाळती। तयां होय गती यमलोकीं।' – तुगा २४२४.
वि. गाईसारखा गरीब; निरुपद्रवी; साधा. [सं.]

गायत्री, गायत्री मंत्र स्त्री. १. वेदातील एक मंत्र. ॐ भू: भुव: स्व: तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो न: प्रचोदयात्। – सूर्य स्तुतीच्या या मंत्राचे महत्त्व व प्रभाव मोठा मानतात. २. एक वैदिक छंद, वृत्त. या वृत्ताची प्रत्येक चरणात आठ अशी २४ अक्षरे व ३ चरण असतात : 'गायत्रीछंद जे म्हणिजे।' – ज्ञा १०.२८२.

गायदंड स्त्री. कोबीचा गड्डा.

गायदुम स्त्री. हातावर शरीराचा तोल संभाळून पाय डोकीवर आणून हातावर चालत जाण्याची कसरत.

गायदूम वि. गोपुच्छासारखा निमुळता.

गायन न. मानवनिर्मित ध्वनीतून केलेली सुरांची आकर्षक मांडणी; पद, गाणे, अभंग इ. तालासुरावर म्हणण्याची क्रिया. [सं. गै = गाणे]

गायनश्रेढी स्त्री. (गणित) ज्या श्रेढीतील जवळजवळची तीन पदे घेतली असता पहिल्या व दुसऱ्या पदातील अंतर आणि दुसऱ्या व तिसऱ्या पदातील अंतर या दोन अंतरांचे जे गुणोत्तर तेच गुणोत्तर पहिल्या व तिसऱ्या पदाचे असते ती श्रेढी. उदा. १२, १५, २० ही तीन पदे. यात तीनपंचमांश हे गुणोत्तर सारखे आढळेल.

गायनाखे वि. १. निर्लज्ज. (गो.) २. अर्धकच्चे.

गायपारख स्त्री. गुरांची परीक्षा किंवा वैद्यकी.

गायपारखी पु. गुरांचा परीक्षक किंवा वैद्य.

गायब वि. गईब; हरवलेला; नष्ट, गत, गुप्त. (क्रि. होणे.) [फा. गैब]

गायबाना क्रिवि. परस्पर; अपरोक्ष. [फा.]

गायमुख न. पाणी वाहून नेण्यासाठी लाकडाचे किंवा दगडाचे केलेले गाईच्या तोंडाच्या आकाराचे साधन.

गायर पु. शेण साठविण्याचा खड्डा; गार. (कु. गो.)

गायरट न. (निंदार्थी) गाय.

गायरा पु. गुराखी.

गायरान न. १. गोचार; गुरेचराई; कुरण. २. नापीक, माळ जमीन.

गायरू न. १ (निंदार्थी किंवा लडिवाळपणे) गाय. पहा : **गायरट**. २. (ल.) सौम्य, गरीब, निरुपद्रवी माणूस. ३. वयात आलेली गाय. (गो.) ४. अगदी लहान जातीची कोकणी गाय. (बे.)

गायवट न. (चर्मकारी) गौचर्म; गाईचे कातडे.

गायवाडा पु. गोठा.

गायवाणा वि. केविलवाणा : '(त्यांचा) गायवाणा चेहरा पाहून...' – सामा (सराई) १५०.

गायवान वि. बावळट : 'सत्या, मेल्या तू असाच गायवान.' – पडरे १२४.

गायंडोळ पहा : **गांडमांडूळ** (गो.)

गायंडोळी स्त्री. आतडी. (गो.)

गाया पु. खड्डा; घरटे : 'रानडुकरांनीं गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्रदर्शन होऊं नये म्हणून तोंडे खुपसून बसण्यासाठी गाये केलेले आहेत.' – बलवंत ९.९.१९३५.

गायीचा गोरा, गोहरा, पुत्र, बाळ, मूल, बाप १. वासरू; बैल. २. (ल.) मूर्ख,टोणपा, ढ मनुष्य. ३. (ल.) कृतघ्न माणूस. ४. (ल.) गांगरलेला माणूस; वेडा.

गार स्त्री. १. एक कठीण पांढरा दगड; गारगोटी : 'कां रत्नें म्हणौनि गारा। वेंचि जेवीं।।' – ज्ञा ९.१४८. २. आभाळातून पाणी गोठून पडणारा खडा. ३. (ल.) जडजवाहीर, रत्न इ. [सं. ग्रावन्]

गार स्त्री. १. खड्डा; खाच : 'गारींत निघाले जीवें जीत।' – रावि १९.१२१. २. (ल.) पोट. ३. (विणकाम) माग उभा केला असेल त्या जागी चाळाच्या पावड्या दाबण्यासाठी व पाय खाली सोडण्यासाठी केलेला खड्डा. ४. झाडाचे जाळे : 'पूर्वाभिमुख गारिसि कोहळी धाइ घालणे।' – ऋ १२६. [सं. गर्ता]

गार वि. १. थंड; फार थंड (पाणी इ.). थंड शब्दाबरोबर उपयोग : थंडगार = अतिशय गार : 'आणि भावार्थु पडे गार।' – ज्ञा ६.१३४. २. अतिशयत्व दाखविण्यासाठी हिरवा या शब्दाबरोबर उपयोग. जसे : – हिरवागार = दाट, गडद हिरवा. (वा.) ० **करणे** – पराभूत करणे; एकदम चकित करून सोडणे. ० **पडणे** – शरीराचे उष्णतामान कमी होणे. ० **बसणे** – शांत व थंड बसणे (वाईट किंवा भलतेसलते काम केल्यावर). ० **होणे** – १. संतुष्ट होणे; तृप्त होणे (हेतू सिद्ध झाल्यानंतर). २. निरुपायास्तव स्वस्थ राहणे. ३. अतिशय आश्चर्य वाटणे. ४. पराभूत होणे, खजील होणे.

गार स्त्री. १. अंड्यातील बलक; २. अंडकोष.

गार स्त्री. घोरपड. (गो.)

गार अ. कर्ता, करणारा या अर्थी फारसी प्रत्यय. हा समासात येतो. जसे :– खिदमतगार; कामगार. [फा.]

गारगोट–टी पु. स्त्री. गार; पांढरा वाटोळा दगड; चकमकीचा धोंडा.

गारट वि. १. थोडासा गार, थंड (हवा, पाणी, वस्तू). २. केवळ गार (कमी किंवा जास्त नव्हे – खारट, आंबट, तुरट यासारखा प्रयोग). ३. फारच थंड.

गारट(ठ)णे अक्रि. १. थंडीने गोठणे; थिजणे (वस्तू). २. थंडीने किंवा इतर कारणाने बधिर, जड होणे; बहिरावणे (शरीर, अवयव). ३. दडस, निबर, कठीण होणे (थंडीमुळे न पिकलेला आंबा किंवा गळू). ४. नरम येणे; उत्साह नाहीसा होणे.

गारटे न. खड्डा; खळगा.

गारठणक वि. अतिशय गार : 'विसापूरच्या तलावावरून येणाऱ्या गारठणक वाऱ्यामुळे...' – डाली ५६.

गारठा पु. १ कडाक्याची थंडी; हवेतील अति गारवा. (क्रि. पडणे.) २. अतिशय थंडपणा, गारवा (पाणी इ. चा).

गारढोण वि. अतिशय थंड : 'पाणी थंडीत गारढोण व्हायचं.'– अदेशी १२.

गारणे अक्रि. थंड पडणे; शांत होणे : 'सभामंडपाचे देखोनि बर्वेपण। कैलासु गारैला आपण।' – नरुस्व १०२४.

गारती स्त्री. नाश : 'सदाशिवराव कार्यकर्ते, लेकीन गरूर मोठा या सबबाने गारती जाहली.' – ऐटि ३.१७.

गारद क्रिवि. वि. १. पुरलेल्या, बुडलेल्या, ग्रासलेल्या स्थितीत. २. नष्ट; समूळ नाहीसा झालेला; उद्ध्वस्त; फस्त; ठार : 'जनकोजी शिंदे गारद जाले.' – इमं २९६. [फा. गारत] (वा.) ० **करणे** – १. ठार मारणे : 'माणसं गारद करायला मृत्यूला सोपं झालं.' – फकिरा १२०. २. (एखाद्याचा) काही जोर चालणार नाही असे करणे; निरुत्तर करणे. ० **होणे** – १. ठार होणे; मरणे. २. किंमत न राहणे; प्रतिष्ठा खलास होणे.

गारद पु. गारदी; कवायती फौज : 'दहा हजार अरब व गारद असे जमा करून आपण व गायकवाड असे मिळोन श्रीमंतांनीं महीचा घांट धरिला.' – ऐलेसं २२८३.

गारदाई स्त्री. १. गारद्यांचा दंगा, बंड. २. (ल.) गोंधळ; दंगा; गलका; गर्दी; धिंगामस्ती. ३. नाश; नुकसान; खराबा; बिघाड.

गारदी पहा : **गाडदी** : 'ते गारदी निष्ठूर, त्यांजला दया कोठून? इच्छारामपंत गाईच्या आड पडला असतां, गाईसुद्धा गारद्यांनीं इच्छारामपंतास ठार केलें.' – पेब ९१.

गारप न. कलमी आंब्याचे झाड.

गारपगार–री–ऱ्या पु. १. मंत्रतंत्राने गारांचा पाऊस पाडणारी किंवा गारापासून संरक्षण करणारी एक जात : 'थंडीनें मेले लोक उठविले गारपगाऱ्यांनीं भुत।' – ऐपो ४०१. पिकांना नुकसानी पोहचू नये म्हणून काही खेड्यातून गारपगारी ठेवलेला असे. २. (ल.) ढोंगी; लबाड; ठक; 'हरि ऐसा गारपगारी मर्दुनया काल खगारी।' – प्रला १६. ३. वाममार्गी; मांत्रिक.

गारपीट स्त्री. गारांचा वर्षाव; गारांचा पाऊस : 'सुरगुजा येथें गारपीट होऊन ३४ इसम ठार झाले.' – के ७.४.१९३९.

गारपेटी स्त्री. शीतपेटीयंत्र, शीतपेटी; रेफ्रिजरेटर.

गारफी वि. कलमी : 'एखाद्या गारफी आंब्याला मोहर कमी आला तर...' – सोबत ७५.

गारबी, गारंबी, गारभी स्त्री. १. एक वेल. २. तिचे बी.

गारभांड–डे न. चापाची बंदूक; गारेच्या चापाची बंदूक. 'गंजिफियाच्या वगैरे गारभांडी व बंदुकांचा मार ऐसा जाला कीं...' – भाब ६३.

गारमणी स्त्री. गारगोटी.

गारवट पहा : **गारट**

गारवट, गारवंठा–डा, गारिवठा–डा पु. थंडपणा; गारठा. (हवा, पाणी इ. चा). (क्रि. पडणे.) पहा : **गारठा**

गारवा पहा : **गारठा**

गारवेल स्त्री. निळसर फुलांची सदैव हिरवी पाने असणारी वेल : 'ही वेल

(गारवेल) मांडवावर किंवा कुंपणावर सोडण्यास फार सोयीची...' – वनश्री ९४९.

गारशेल वि. काहीसा दळदार व पिकलेला; गदरलेला (आंबा, फळ).

गारसणे अक्रि. १. गारांनी नासाडी होणे. २. थंड होणे (वस्तू, पाणी). [सं. कार, कारियस]

गारसणे अक्रि. गदरणे; पिकू लागणे (फळ); गाभुळणे.

गारसा वि. गारोळा; घारा (डोळा इ.). (व.)

गारा पु. १. गिलावा; चिखल; सरबरीत मिश्रण (गिलाव्यासाठी केलेले पाणी, माती, गवत, चुना, शेण इ. चे). २. खड्डा. (ल.) पातळ व घट्ट अन्नाचे बरबट.

गारा पु. अंगावरचे मांस; चरबी.

गारा पु. रानात वाघ आहे की नाही हे पाहण्यासाठी एखादे जनावर बांधणे.

गारा पु. गाडा.

गारा पु. (संगीत) एक राग. गायनाची वेळ सार्वकालिक.

गाराणे पहा : **गाऱ्हाणे** : 'प्रधान प्रजा तें अवसरीं । मज सांगती गाराणीं ।' – एरुस्व १.७९. [सं. गर्हणा]

गाराफ, गार्फ न. कलमी आंब्याचे झाड. (कु. गो.) [इं. ग्राफ्ट]

गारीगडदल–र पु. खाचखळगा; खड्डा; उंचसखल भाग : 'जैसें आंधळें चांचरोन पडे । गारीं आणि गडधरीं ।' – दास १.३७. – (तंजा.)

गारी(रे)गार वि. १. थंड; तृप्त; समाधानी : 'माणसाचा आत्मा गारीगार होतो.' – आआशे १४. २. थंडगार, गारेगार. (वा.) ० **करून टाकणे** – दुसऱ्याला आवडेल असे बोलून, वागून त्याला अतिशय खूष करणे.

गारुड न. सर्पाच्या विषावरील उताराचा मंत्र. पहा : **गारूड** [सं.]

गारु(रो)डी पु. १. सापाचे विष उतरवणारा मांत्रिक; सर्प बाळगून त्यावर पोट भरणारा : 'हें जाणोनि ऐसी प्रौढी । जो दृष्टिसवेंचि विष फेडी । तो धांवया श्रीहरी गारुडी । पातला कीं ।।' – ज्ञा २.७२. २. जादूगार; नजरबंद करणारा : 'गारुडी नाहीं ऐसा एकू। जो भारीं जाणें पूर्वडंकू।' – शिव ८१०. [सं. गारुड]

गारुळा, गारो(ऱ्हो)ळा वि. घाऱ्या डोळ्यांचा : 'मिशाचे आकडे, गारुळे डोळे...' – एहोरा ८०.

गारुंडा, गारोठा–डा पु. अतिशय गारवा, गारठा (हवा, पाणी इत्यादीचा).

गारूड न. १. जादू; इंद्रजाल; नजरबंदी. २. कपट; लपंडाव; डावपेच; छक्केपंजे; जादूटोणा. [सं. गारुड]

गारो पु. भारताच्या उत्तर व ईशान्य प्रदेशांतील आदिवासींची जमात.

गार्जप अक्रि. १. कीर्ती पसरणे. (गो.) २. मोठा नाद होणे. [सं. गर्ज्]

गार्टर पु. मोजेबंद; पायमोज्याचा बंद; पायमोजा बांधायची पट्टी. [इं.]

गार्ड पु. १. आगगाडीवरचा मुख्य अधिकारी. २. रखवालदार; रक्षक; शिपाई. [इं.]

गार्फेली वि. कलमी आंबे लावणारा.

गाऱ्या गाऱ्याभिंगोऱ्या पहा : **गाडे गाडेभिंगोऱ्या**

गार्हपत्य पु. श्रौतकर्मातील एक प्रमुख अग्नी. पहा : **पंचाग्नी** [सं.]

गाऱ्हाणे न. १. कागाळी; तक्रार; दुसऱ्याचा अपराध सांगणे. (क्रि. सांगणे, करणे, गाणे, देणे.) २. प्रार्थना; दुःख निवेदन; विनंती; विनवणी (देवाची, मूर्तीची). (क्रि. घालणे, करणे.) [सं. गर्हणा] (वा.) ० **बोलणे** – शत्रूचा नाश व्हावा म्हणून देवाला करण्यात येणारा नवस.

गाल पु. कपोल; तोंडाच्या दोन्ही बाजूंचे मांसल भाग. [सं. गल्ल] (वा.) ० **घडणे** – (उद्धटपणाबद्दल) शिक्षा करणे. ० **निपटणे,** ० **बसणे** – गाल खोल जाणे; तोंड चापट होणे (दुखणे, उपवास यांनी). ० **फुगणे** – १. राग येणे. २. गर्वाने अंध होणे : 'न तुजपुढेंचि पराचें गर्वभरें गाल वा लवहि फुगती ।' – मोशल्य १.६३. ० **फुगविणे** – १. फुरंगटणे; रागावणे; २. फुगणे; शेखी, बढाई मारणे. ० **रंगवणे, गालात बसविणे, गालात देणे** – थोबाडीत मारणे; गाल (मारण्याने) लाल करणे. **गालात बसणे** – थोबाडीत मिळणे. **गालावर गाल चढणे, येणे** – (चांगल्या खाण्यापिण्यामुळे) चेहरा गुबगुबीत होणे.

गालकल्ला पु. गालावरील मिशांचा गुच्छ; कल्ला.

गालकुचा–च्चा पु. गालावरील खळी.

गालगुच्चा पु. गालाला घेतलेला चिमटा; गाल ओढणे. (क्रि. घेणे, धरणे.)

गालगुडदे, गालगुंड न. स्त्री. (वै.) गालात लहान गाठी होऊन त्या फुगून होणारा रोग; गालाचा रोग; गालफुगी : 'मी सगळ्यांना उजव्या गालफडाला गालगुडदे झाल्याचे सांगत होतो.' – पोपट २२.

गालगुंडा पु. चपराक; थोबाडीत मारणे. (को.)

गाल गोंजारणी रागावलेल्याची आर्जवे, सांत्वन; मनधरणी. (क्रि. करणे.)

गालचिंबा वि. गालफडे बसलेला; खप्पड.

गालठे न. अव. (निंदार्थी) गाल.

गालडी, गालोडी स्त्री. १. तोंडाच्या कोपऱ्याजवळील गालाची खळी. २. गाल फुगविल्याने पडलेली खळी.

गालदोडी स्त्री. १. माकडाच्या गालातील पिशवी (माकड यात खाद्य भरून ठेवते); गालफड. (क्रि. भरणे, फुगविणे). २. पहा : **गालडी** २

गालन न. १ वितळविणे. २. संधान; निस्सारण करणे, (दारू) गाळणे. ३. चाळणे; छानणे; गाळून काढणे. [सं.]

गालप पहा : **गालब** : 'याजवरील इभ्रत बहुत गालप पडली आहे.' – पेद २४.

गालपट न. (रागाने, निंदार्थी) गाल; थोबाड.

गालफट–ड न. १. गालाची (बाहेरील) वाटी; गाल असलेली जागा. २. गालपट. ३. गाल फुगवून तोंडात केलेली पोकळी; गालाची आतील जागा : 'वानराचें ठेवणें। गालफडां भरावे चणे।' – भाराकिष्किंधा १३.१०६.

गालफुगा–गी, गालफे पहा : **गालगुंड**

गालफुगाऊ वि. जाडेजाडे शब्द वापरून छाप पाडणारा; प्रतिष्ठित : 'असा आभास काही लोक आजकालच्या शास्त्रातील मोठमोठे गालफुगाऊ शब्द वारंवार उच्चारून उत्पन्न करीत असतात.' – ससावा ३.५२३.

गाल(ली)ब वि. वरचढ; जोरदार; शिरजोर : 'इंग्रजांवर टिपू गालब' – ऐलेसं ८.४४०७; 'रात्रीचे ठायीं विषप्रयोग करून अखंड दंडायमान

व्हावें ही शरम गालीब जाली.' – इंम २९२. [फा.]

गालबता स्त्री. वर्चस्व; वरचढपणा : 'उभयतांवरील गालबता संपादिली.' – पेद २.१६. [फा. गालिब]

गालबोट न. दृष्टीची बाधा होऊ नये म्हणून (मूल, नवरदेव, नवरी इ.च्या) गालांवर काजळ किंवा कुंकू यांची लावलेली टिकली. (वा.) **० लागणे** –चांगल्या गोष्टीला कमीपणा येणे : 'सुशोभित राजधानीला ठिकठिकाणी वाळत घातलेल्या कपड्यांमुळे गालबोट लागते.' – अशी ही ३५.

गालमिशी पहा : **गलमिशी** : 'या सर्वांना शोभून दिसणारे पांढरेशुभ्र केस आणि गालमिशा...' – व्यंमाक ५९.

गालवाद्य न. गालांवर बोटे ठेवून डमरूप्रमाणे (शंकरापुढे) आवाज करण्याचा प्रकार : 'जिकडे तिकडे 'शंभो हरहर' शब्दांचा व दक्षप्रजापतीचे गालवाद्यांचा घोष होत आहे.' – मंजुघोषा ५. [सं.]

गालविंधा पहा : **गालगुच्चा** (क्रि. घेणे.)

गाला पु. दोन खांबातील अंतर.

गालाचा ढोपर पुढे आलेले गालाचे हाड.

गालि–ली स्त्री. शिवी; अपशब्द. (क्रि. देणे.) [सं.]

गालिचा पु. सुती कापडावर मऊ लोकर लावून केलेली मुलायम सतरंजी; चित्रविचित्र रंगीत नक्षीचे उंची आसन; चित्रवर्ण ऊर्णावस्त्र. [फा. कालिचा]

गालिचा पु. लिफाफा; पाकीट (पत्राचे).

गालिच्याचा बूट देखणा, छानछोकी, पण कामाला निरुपयोगी माणूस; छानछबेला; अलबेला माणूस; (गालिच्यावरचे विणलेले फूल जसे निरुपयोगी त्याप्रमाणे) दिखाऊ, ऐदी माणूस.

गालिप्रदान, गालिप्रयोग न. पु.शिवीगाळ; निंदा; अपशब्द.: 'मी त्याजवर गालिप्रयोग करुहि लागलो.' – नि ९७.

गालीकुपास पहा : **गाळेकंपास** (कु.)

गालीगलोची स्त्री. शिवीगाळ; निंदा (क्रि. करणे). [गालीचे द्वि.]

गालीब वि. बळकट; समर्थ : 'स्वामीचे हस्त गालीब आहेत. कोणाच्याने काय होणे आहे?' – पेद ३३.७८.

गालीब मगलूब जयअपजय.

गालुशी स्त्री. १. गालउशी; लहान गिर्दी. २. (ल.) स्तन : 'तुझ्या वक्षाच्या मऊ मऊ गालुशीवर मस्तक ठेवताच त्यांनी सगळा शीण शोषून घेतला.' – संन्यख ८९.

गालुंडा पु. झोडून झालेल्या भाताच्या पेंढ्याची पेंढी, जुडी. (रायगड)

गालो पु. दालन. (कु.)

गालो(ल्हो)रा पु. गालगुच्चा : 'एक उगेच गालोरे घेती।' – अफला २६.

गाव पु. न. १. वस्तीचे ठिकाण; ग्राम; मौजा; खेडे; देहे; पत्तन; कुग्राम. २. (व्यापक) नगर; शहर. ३. गावातील वस्ती; समाज. ४. आश्रय. ५. (दोन गावामधील अंतरावरून) चार कोस; योजन; चार ते नऊ मैल अंतर : 'मारीचातें प्रभु शत गांवें पुंखसमीरें उडवी।' – मोरा १.१९९. (समासात) गावकुलकर्णी, गावचांभार, गावन्हावी, गावभट इ. याप्रमाणे बारा बलुत्यांच्या नावापूर्वी गाव हा शब्द लावून सामासिक शब्द होतात व त्या शब्दावरून त्या त्या बलुतेदाराच्या एक वर्षाच्या कामगिरीवरील हक्काचा बोध होतो. [सं. ग्राम] (वा.) **० मारणे** – लुटणे; खंडणी बसविणे : 'दौड करून गांव मारूं लागले.' – पया १८८. **त्या गावचा नसणे** – दुसऱ्यावर ढकलणे; टाळणे (काम); त्या कामाशी आपला अर्थाअर्थी काही संबंध नाही असे दर्शविणे. **गावानावाची हरकी देणे, सांगणे** – (तू कोठून आलास, तुझे नाव काय आहे सांग इ.) ज्याच्या अंगात भूतसंचार झाला आहे अशा मनुष्याला (भुताला किंवा झाडाला) विचारतात. यावरून पाहुण्याला आपण कोठून आलात इ. नम्रपणे विचारणे. **गावाला जाणे** – १. जवळ नसणे. २. (ल.) निरुपयोगी असणे. जसे :– माझे हात काही गावाला गेले नाहीत. (जवळच आहेत, वेळ आली तर तुला रट्टा मारतील.) **गावी नसणे** – पूर्ण अभाव असणे; अज्ञानी असणे; दरकार नसणे; खिजगणतीत नसणे.

गावआकार, आकारणी पु. स्त्री. गावचा हिशेब; हिशेबाचा तक्ता.

गावआखरी क्रिवि. गावालगत, गावाशेवटी, गावालागून. (व.)

गा(ग)वई स्त्री. १. सरकारी जुलुमामुळे आपले गाव सोडून दुसऱ्या गावी केलेली वस्ती. २. सरकारी हुकुमाची अमान्यता; सरकारी अटींना प्रतिरोध (साऱ्यात सूट, तहकुबी इ. मिळविण्यासाठी गावचे सर्व लोक हा उपाय अमलात आणीत असत).

गावकबुलात स्त्री. १. वहिवाटदार खोताने गावातील जमिनीचा सारा भरण्याबाबत दिलेली कबुली. (को.) २. गावातील गावकऱ्यांनी वहीत किंवा पडित जमीन कोणती ठेवावी याबद्दल केलेला निश्चय, ठराव.

गावकर पु. १. गावातील वृत्तिवंत. २. गावच्या शुद्रातील देवस्त्रीच्या मानपानासंबंधातील एक अधिकारी. (राजा). ३. भूतबाधा नाहीशी करणारा, देवकी करणारा माणूस; धाडी. ४. गावचे लोक; रहिवासी; गावात घरदार शेतभात असणारा : 'गावकर म्हणती हो पेटली आग।' – दावि ३५०. ५. पाटील; खोत; पुढारी. (कु. को.) ६. कुणबी–वाड्याचा व्यवस्थापक; कुणबी. (रत्नागिरी)

गावकरी पु. १. गावात ज्याचे घरदार आहे असा त्या गावचा रहिवासी; गावात राहणारा. २ शेतकरी.

गावकंटक वि. गावगुंड; गावाला त्रास देणारा. [सं. ग्रामकंटक]

गावकी स्त्री. १. गावाच्या संबंधीचा हरएक अधिकार (अंमल इ.); गावचा कारभार. २. गावसभा; त्या सभेत झालेले ठराव. ३. गावचा विचार; गावकरी व पुढारी यांनी एकत्र जमून केलेला विचारविनिमय. ४. वतनदारांचा गावाबाबतचा परस्पर संबंध व त्यांचा समाईक अंतर्बाह्य व्यवहार. [सं. ग्रामिक] (वा) **० घेणे, भरवणे** – गावातल्या लोकांची सभा भरवणे : 'आणि दुसऱ्याच दिवशी देवीच्या देवळाशी गावकी घेतली.' – एल्गार ९; 'ते शमवायला चारी गावांची गावकी भरवायची वेळ येते.' – एल्गार ९.

गावकुचा(टा)ळ वि. गावातील निंदक, टवाळ; लोकांची निंदा करणारा.

गावकुटारी वि. ज्यामुळे गावाचे नुकसान होईल असा : 'पण गावकुटारी भानगडी मात्र यथामति, यथाशक्ति चालू आहेत.' – गांगा ६०.

गावकुठार वि. १. गावातील लोकांवर संकट आणणारा (चहाडी, वाईट कर्म इ. करून); गावभेद्या; कुऱ्हाडीचा दांडा. २. गावातील सामान्य

लोक : 'दिल्लीतील वाणी, बकाल, बायकादेखील गावकुठार (हे) लष्करच्या लोकांस मारूं लागले.' – भाब १६०.

गावकुंप,गावकूस पु. न. १. गावाच्या भोवतालचा तट. २. (ल.) वस्त्राचा (रंगीत) काठ (धोतरजोडा, शेला इ. चा रेशमी, कलाबतूचा).

गावकोस न. जमीन मोजण्याचे एक जुने स्थूल परिमाण. गाय हंबरली तर तिचे हंबरणे जिथवर ऐकू जाईल तेवढे जमिनीचे अंतर.

गावक्या वि. गावंढळ; बावळट : 'गावाला गेला राघू गावक्या होऊं नग।' – लोले २०६.

गावखर न. गावाची सीमा, हद्द; सीमाप्रदेश; परिसर.

गावखर्च पु. (जमीनमहसुली) गावचा (धार्मिक समारंभ, करमणूक इ. चा) खर्च; पंडित, गोसावी, फकीर इत्यादींना द्रव्य, शिधासामुग्री इ. देतात त्याचा खर्च.

गावखंडी स्त्री. खंडणी : 'वसई प्रांतांतून संभाजीला गावखंडी मिळाली.' – वसमो.

गावखाते न. १. पोलीस; कुलकर्णी इ. गावकामगार लोक. २. गावचा हिशेब.

गावखारी स्त्री. गावालगतची शेती.

गावखिडकी स्त्री. गावकुसवाची दिंडी.

गावखुद–र्द वि. नष्ट, निष्प्रभ; महत्त्वशून्य : 'हे सर्व गावखुर्द होऊन या प्रसंगीं वृद्धापकाळीं त्यास श्रीमंतांचा ओळंबा आला.' – इसंहोकै १२.

गावखुरास क्रिवि. गावानजीक; जवळपास.

गावगत स्त्री. गावासंबंधीचे काम; गावचे काम; गावात उत्पन्न होणारे काम : 'त्याजला पेशव्यांनीं पत्र करून दिल्हे कीं, तुझें गावगतीचे काम तुझें तूं कर.' – राद १९.

गावगन्ना क्रिवि. दर गावाला; गावोगाव; प्रत्येक गावाकडून – गणिक.

गावगप्प स्त्री. गावात उठलेली अफवा.

गावगरॉ वि. गावठी. (गो.)

गावगाई–यी स्त्री. नगरभवानी; भटकभवानी; स्वैरिणी, आळशी; गविष्ट स्त्री.

गावगाडा पु. गावातील सर्व प्रकारचे (तंटे, प्रकरणे, बाबी इ.) कामकाज; गावचा कारभार; गावकी. (क्रि. हाकणे, चालविणे, सांभाळणे.)

गावगावंढे न. गावे; खेडी (व्यापक अर्थी).

गावगिरी वि. गावात उत्पन्न झालेले; तयार केलेले; गावराणी; गावठी.

गावगुंड–डा पु. १. गावचा म्होरक्या. २. विद्वानास आपल्या हुशारीने (वास्तविक विद्या नसता) कुंठित करणारा गावंढळ. ३. जादुगारांची मात्रा चालू न देणारा पंचाक्षरी; गारुड्याला त्याच्याच विद्येने जिंकणारा : 'जेवी गारुडीयाचें चेटक उदंड। क्षणें निवारीत गांवगुंड।' – जै २४.९. ४. गावात रिकाम्या उठाठेवी करणारा, त्रासदायक माणूस; मवाली; सोकाजी; फुकट फौजदार; उडाणटप्पू.

गावगुंडकी स्त्री. १. गावगुंडाचा कारभार; गावकी. २. (ल.) फसवेगिरी; लबाडी.

गावगुंडांचा खेळ पंचाक्षरी किंवा जादूगार यांच्याशी गावगुंडांचा चढाओढीचा सामना; मुठीचा खेळ.

गावगुंडी स्त्री. १. ग्रामदेवतांना नैवेद्य दाखवून सर्व मानकरी व गोरगरीब यांना प्रसाद वाटणे. २. गावात दांडगाईने किंवा जबरदस्तीने वागणे; लोकांना उपद्रव अगर त्रास होईल असे वागणे; नसत्या उठाठेवी करणे.

गावगोहन पु. सबंध गावातील गाई एकत्र असलेला कळप. (व.)

गावगौर स्त्री. सबंध गावात भटकणारी स्त्री; गावभवानी : 'पोरीबाळीसुद्धा हिणवून पुरेसें करतील कीं, या गावगौरीला हें भिकेचें वाण कुणी वाहिले म्हणून ?' – पुण्यप्रभाव.

गावघेणी स्त्री. दरोडा; हल्ला : 'समुद्राचे पाणी सातवा दिसी करील गावघेणी।' – भाए ६९.

गावचलण–णी–नी वि. गावात चालणारे (नाणे).

गावचा डोळा गावचा वेसकर, महार, जागल्या.

गावचा लोक गावातील कोणीतरी; कोणास ठाऊक नसलेला; परका; अनोळखी.

गावचावडी स्त्री. १. गावातील सरकारी कामकाजाची जागा; चौकी. २. (ल.) गावातील रिकामटेकड्यांचे कुटाळक्या करण्याचे ठिकाण.

गावजागा गावठाण.

गावजान्या–ण्या वि. गावदेवतेला वाहिलेले (मूल).

गावजेवण, जेवणावळ, भोजन स्त्री. न. १. गावातील सर्व लोकांना घातलेले जेवण. २. गावातील स्वजातीला दिलेली मेजवानी.

गावजोशी पु. गावातील वृत्तिवंत जोसपण करणारा; गावपुरोहित.

गावझाडा पु. गावातील (शेत इ.) जमिनींचा कुळकर्ण्याने तयार केलेला वर्णनपर तक्ता; कुळकर्णीदप्तर.

गावझोळ वि. गावात भटकणारा : 'जा अभ्यासास बैस गावझोळा.' – सनई ७.

गावझोंड पु. १. सर्व गावापासून कर्ज काढून नागविणारा. २. गावातील खट्याळ, खाष्ट माणूस; गावाला त्रास देणारा माणूस.

गावट(ठ)विणे उक्रि. १. समावेश करणे; अंतर्भूत करणे, होणे. २. धरणे; पकडणे.

गावठण–ठाण न. गावातील वस्तीची जागा (अस्तित्वात असलेली किंवा उजाड झालेली); आईपांढर. [सं. ग्राम + स्थान]

गावठा, था पु. १. गावचा एक वतनदार. २. खेडवळ; गावंढळ. [सं. ग्राम + स्थ]

गावठी–ठू वि. १. गावचे; स्थानिक. २. गावंढळ; खेडवळ. ३. (विशेषत: गावठू) रानटी; खेडवळ (माणूस, चालरीत). [क. गावटि]

गावडमोट स्त्री. पाटलाला द्यावयाची मोट (कणसांची). (माण.)

गावडा पु. १. मीठ, कात तयार करणारी कोकण, गोव्यातील एक जात व त्यातील व्यक्ती. २ एक क्षुल्लक गावकामदार; धनगरातील एक मुख्य अधिकारी. ३. गोव्यातील एक कुणबी जात. [सं. ग्रामकूट]

गावडी–डे, गाभाडे स्त्री. न. १. गाय (लडिवाळपणे किंवा कुत्सितअर्थी). २. गाय (सामान्यपणे). (खा.)

गावडुक्कर पु. १. डुकराची एक जात; गावातच राहणारे डुक्कर. २. (ल.)

गावातील अनिष्ट गोष्टीत पुढारीपण करणारा.

गावडेगजाल स्त्री. अर्थशून्य बडबड. (कु.)

गावढळ, गावढे पहा : **गावंढळ, गावंढे**

गावणगे गावचे अधिकारी किंवा सावकार, सधन लोक.

गावणुकग पु. गावचा प्रमुख.

गावणे अक्रि. १. सापडणे; आढळणे (हरवलेली वस्तू). २. मिळणे; प्राप्त होणे (इच्छित वस्तू, हेतू). ३. भेटणे; गाठ पडणे; मिळणे. ४. पकडला जाणे; हातात सापडणे; कह्यात येणे. [सं. ग्रह = घेणे]

गावणे अक्रि. १. गाणे म्हणणे; गाणे. (व.) २. सदासर्वदा म्हणणे; जपमाळ घेणे; घोकत राहणे. (को.) [सं. गै.]

गावथळ पहा : **गावठण**

गावदी वि. अडाणी; मूर्ख; टोणपा; ढ. [सं. गो]

गावदेवता–देवी स्त्री. गावची संरक्षक देवता; ग्रामदेवता. [सं.]

गावधणे न. गावची गुरे.

गावधे न. १. झोपडी. २. दुसऱ्या गावातले काम.

गावधोंड स्त्री. १. गावावर बसविलेली जबरदस्त खंडणी. २. (सामा.) गावावर आलेले संकट, अरिष्ट.

गावनिसबत इनाम निरनिराळ्या प्रासंगिक खर्चाकरिता किंवा सरकारी खर्चाकरिता काढलेल्या सार्वजनिक कर्जाच्या फेडीसाठी गावकऱ्यांनी गहाण ठेवलेली जमीन.

गावनिसबत मिरास जिचा मालकीहक्क सर्व गावकऱ्याकडे मिळून आहे अशी जमीन.

गावनेमणूक स्त्री. गावखर्चाकरिता तोडून दिलेला पैसा.

गावपडीत न. गावातील बिन लागवडीची, पडीत जमीन.

गावपण न. ग्रामसभा; गावकी : 'गांवपण मांडलिया वायसें।' – सिसं ८.१५७. (गो.)

गावपाणोठा–था पु. गावच्या नदीवरील किंवा तळ्यावरील पाणी भरण्याची जागा; पाणी भरण्याचे सार्वजनिक ठिकाण.

गावपाहणी स्त्री. गावातील पीक किंवा शेतजमीन यांची पाटलाने केलेली पाहणी, मोजणी; (सामा.) गावाची सर्व दृष्टीने पाहणी.

गावबलांडा पु. गावातील बालंट; उचापती; कुरापती; त्रास : 'बेवीस वर्षे चाकरी सेवा कोणी केली चाकरीचे गावबलांडे सोसले.' – मइसा ३७८.

गावबंदी वि. गावात वस्ती करून असलेला (फिरस्ता नव्हे.).

गावबैल पु. (पोळ्याच्या दिवशी) पाटलाचा बैल. हा सर्व बैलांच्या पुढे असतो. हा पाटलाचा एक मान आहे.

गावभवानी स्त्री. भटकभवानी; चवचाल (स्त्री).

गावमहार पु. गावच्या चाकरीवर असलेला वतनदार महार.

गावमामा पु. १. गावातील शहाणा माणूस. २. गावकऱ्यांच्या जिवावर चरितार्थ चालविणारा व सर्वांशी मिळूनमिसळून असणारा माणूस (उपहासात्मक).

गावमावशी स्त्री. गावातील कुंटीण; (सामा.) वयस्क व स्वैरिणी स्त्री.

गावमुकादम पु. अव. गावचे सारे श्रेष्ठ वतनदार.

गावमुकादमी स्त्री. वतनी ग्रामव्यवस्था.

गावमुकासे पुअव.धिंडवडे : 'काढा माझे काय गावमुकासे काढायचे असतील ते.' – गणपत ८९. (क्रि. काढणे)

गावमेव्हणी स्त्री. गावातील वेश्या.

गावम्हसन न. गावातील स्मशान; मसणवटा.

गावरस न. गावातील घाणेरडे पाणी; लेंडी नाला; लेंडे आहोळ : 'हां गा गांवरसें भरलें। पाणी पाठीं पाय देत आलें।' – ज्ञा १६.२५.[सं. ग्रामरस:]

गावरान न. १. गाव त्याच्या आसपासचा प्रदेश, जमीन. २. गावची व आसपासची लोकसंख्या. ३. (नाविक) नैर्ऋत्येकडील वारा; गावाकडे येणारा वारा. (कु.)

गावरान–नी–णी वि. १. स्थानिक; गावठी; घरगुती; रानवट (भाजी, पदार्थ इ.). २. गावाकडचा; खेडवळ.

गावली स्त्री. गाय (लडिवाळपणे माय, माउलीप्रमाणे). पहा : **गावडी –डे** न. उपटलेल्या हरभऱ्याच्या डहाळ्यांची लहान जुडी, पेंढी.

गाववर्दळ स्त्री. गायरानाखेरीज गावच्या दिमतीस असलेली इतर जमीन.

गाववसाहत–वसात स्त्री. १. गावची वस्ती. २. गावचा वसलेला भाग. ३. गावची लोकसंख्या.

गाववहीत न. गावची लागवडीखालची जमीन.

गाववाला पु. एकाच गावचा, गावाकडचा माणूस.

गाववेस स्त्री. गावाच्या तटाचा मोठा दरवाजा.

गाववेसकर पु. गावाच्या वेशीवर पहारा करणारा पाळीचा महार. याच्याकडे गावाचे निकडीचे काम सोपविलेले असे.

गावशाई स्त्री. खडबडीत चपटे मोती.

गावशीव स्त्री. १. गाव किंवा गावे (यांना सामान्य संज्ञा); नावगाव वगैरे माहिती. २. गावाची सीमा, हद्द. (वा.) ० **माहीत नसणे –** एखादे स्थळ पूर्णपणे अपरिचित असणे.

गावशीवचा वि. गाववाला : 'मी म्हटलं गावशीवचा माणूस आहे म्हणून जेऊ घातलं.' – कोसला २७२.

गावस पु. क्षत्रियांची एक जात. (गो.)

गावसई स्त्री. १. गावच्या भुताखेतांना दरसाल द्यावयाची ओवाळणी, बळी (नारळ, कोंबडे इ.). २. एकूणएक गाववस्ती; गावकरी; अखिल ग्रामस्थ. ३. भगत सांगेल ते सात किंवा नऊ दिवस गावातील यच्चयावत माणसांनी बाहेर जाऊन राहणे.

गावसमाराधना पहा : **गावजेवण**

गावसवाशीण–सवाष्ण स्त्री. १. (गोंधळ, मोहतुर इ. प्रसंगी) पाटील किंवा चौगुला याच्या बायकोला म्हणतात. २. (ल.) गावची वेश्या.

गावळ वि. साधीभोळी : 'कशी फाडूं गावळ गुजरी नवी चंद्रकळा कुसरी।' – गोस्त्री ८३.

गावळी क्रिवि. गावोगाव; सर्व गावातून : 'जेवी निळहारयांची नासे निळी। तो मिथ्यामात उठवी बायकोळी। ते देशीं विस्तारें गावळी। सांचा सारिखी।' – ज्ञाप्र ६२७.

गावंडा–ढा वि. अडाणी; खेडवळ.

गावंढळ–ढाळ–ढ्या, गावंढा वि. १. खेडवळ; मूर्ख; रानवट; अडाणी : 'खंती करिती कर्माची । ते गावंढे गा ।' – ज्ञा ३.१४५. २. खेड्यात राहणारा; शेतकरी.

गावंढे न. लहान खेडे, गाव; शेतकऱ्यांची वाडी; शेतवाडी : 'मला माझे गावंढेंच बरें.' – इसापनीती (छत्रे). [सं.]

गावंढेकर वि. खेडवळ; गावंढ्या : 'तेथे कोणी गावंढेकर कुणबी बसला होता.' – नि. १४९.

गावंदर–री स्त्री. गावालगतची जागा.

गावंधणे न. गावची गुरे : 'गोवारी गावंधणे वेटाली ।' – राज्ञा १८.१७२.

गावंधे न. १. वाडी; खेडे. २. दुसऱ्या खेड्यातील कामकाज.

गावा पु. पुन्हा पुन्हा बोलून दाखविलेली इच्छा, ध्यास; एकाच गोष्टीची जपमाळ; अट्टाहास; घोष. (क्रि. गाणे, लागणे, (संपला असल्यास) मोडणे, सरणे, संपणे, आटोपणे.) (को.) [सं. गै]

गावा पु. जथा; गट; संघ; घडण : 'माणूस विश्वासूक पुरातन राज्यांतील येका गाव्याचे आहेत याचा संग्रह खामखा असावा.' – पेद ३०.२३५.

गावा–वी पु. स्त्री. (कारागिरी) धातूची तार ओढण्याचे हत्यार, चिमटा.

गावाई स्त्री. गुंतागुंत; घोटाळा : 'येथ उपदेशामाजि गावाई ।' – ज्ञा ३.२१.

गावार न. मूर्ख; अजाण. पहा : **गव्हार** : 'परि दर्पणाचेनि आधारें । एकचि करुनि दूसरें । मुख पांति गावारें ।' – राज्ञा १५.२४३.

गावार न. गावजेवण.

गावाळी स्त्री. अफवा; गावगप्पा : 'ते देसीं विस्तारें गांवाळी साचासारिखी ।' – ज्ञाप्र ६२६.

गावी स्त्री. (नाविक) परभाणाच्या वर डोलकाठीच्या कळशीजवळचे (बहुधा मोठ्या गलबताला लावण्याचे) शीड : 'गावी परबान जाया झालें.' – थोमारो ९.२३६.

गावीक वि. सार्वजनिक; गावचे (शेत, पाणी, खर्च, पट्टी इ.). (राजा)

गावुंडगो वि. गावात राहणारा. (गो.)

गाशा पु. खोगिराचे आच्छादन किंवा बिछायत; वरील अंगास सकलातीचे किंवा बनातीचे निरनिराळ्या रंगाचे तुकडे व आतील अंगास खारवे असे शिवून केलेले दुहेरी वस्त्र; पातळ गादी.[फा.] (वा.) **० गुंडाळणे –** १. जाण्यासाठी आवराआवर करणे; आपले सामानसुमान गुंडाळून चालते होणे; पळून जाणे : 'पुण्यातले लोक चांगले व्यवहारज्ञ आहेत, ते आपल्या हातीं लागणार नाहींत अशी खात्री होताच स्वामींनीं तेथून आपला गाशा गुंडाळला.' – नि. २. मरणे. **० टाकणे –** अंथरूण पसरणे (स्वार खोगिरावरचा गाशा निजावयास घेतात त्यावरून) : 'इकडे स्वारांनींही आपापल्या भाकरी खाऊन ते आतां गाशा टाकून विश्रांती घेत उघड्या पटांगणात पडले होते.' – स्वप ९५.

गास पु. १. कसू, बांध. २. खाटेचे गात, बाजूची लाकडे. (व.)

गासडी स्त्री. गठ्ठा; गाठोडे; मोठा बोजा. पहा : **गठडी, गठाण**

गासलापूर करणे सक्रि. (काहीतरी चोरून, उपटून) पळून जाणे.

गासिबानह जबरदस्त.

गाह जमाव. पहा : **गाहा**

गाहन न. बुडी; शिरकाव. [सं. गाहते]

गाहमापी पु. खोली अजमावण्याचे उपकरण.

गाहा पु. १.जमाव; २. तयारी; स्थान धरणे : 'तुम्ही आपले फौजेनिशी गाहा करून असणें.' – शारो १.५.

गाही स्त्री. चिमटा. पहा : **गावी**

गाही, गाहीदार पहा : **ग्वाही, ग्वाहीदार** : 'गाही दिधली वेदानें ।' – देप ८३.

गाळ पु. १. गदळ; मळ; घाण; केरकचरा. २. चिखल; रेंदा; राब; रबडी. ३. एखाद्या पदार्थातून गाळून किंवा निवडून चांगला अंश काढून घेतल्यावर राहिलेला अवशिष्ट भाग; वगळ. ४. साका; तळाशी राहिलेला भाग, अंश. [सं. गल = गळणे]

गाळ स्त्री. पठार; मोठे मैदान. (गो.)

गाळ–ळी स्त्री. शिवी. पहा : **गाली.** (क्रि. देणे.) : 'ऐसिआं देतां गाळी ।' – शिव ८७२. [सं. गालि] (वा.) ० **बसणे –** १. काळिमा लागणे. २. शिव्या खाणे.

गाळके न. टिपकागद. (कु.)

गाळण न. १. गाळण्याची वस्तू. २. (ल.) थकवा; ग्लानी; दुर्दशा; गलितावस्था (दुखणे, दगदगीचे काम यामुळे आलेली). ३. तुच्छता; तिरस्कार; अव्हेर; अनादर.

गाळण न. १. भांबावलेली स्थिती; घाबरेपणा; त्रेधा. २. अस्ताव्यस्तपणा; अव्यवस्था; नासधूस (गैदीपणामुळे कामाची किंवा पदार्थाची). (वा.) ० **उडणे –** घाबरगुंडी होणे; धैर्य नाहीसे होणे; गर्भगळित होणे. ० **होणे –** भीतीने गांगरून जाणे.

गाळण न. गाळणे; द्रव पदार्थ ज्यातून गाळतात ते वस्त्र किंवा पात्र.

गाळणा स्त्री. (क्र.) भीतीने उडालेली त्रेधा, गोंधळ; पळ काढण्यासारखी स्थिती; गाळण उडणे.

गाळणावळ स्त्री. गाळण्याचाळण्याची मजुरी.

गाळणी स्त्री. १. चाळणे; गाळणे; शोधणे. २. स्वच्छ करणे; गाळ काढणे; साफ करणे (विहीर, तळे). ३. (सोनारी) मूस. (कु. गो.) ४. नरसाळे; गळणी. पातळ पदार्थांतील केरकचरा काढून टाकण्याकरिता वापरायचे वस्त्र किंवा छिद्रयुक्त पात्र.

गाळणे उक्रि. १. वस्त्रातून किंवा छिद्रयुक्त पात्रातून ओतून चाळणे; स्वच्छ करणे. २. (ल.) रद्द करणे; बाजूला टाकणे; परतविणे; घालविणे; वाटेला लावणे. ३. ढाळणे (अश्रू, केस, पिसे). ४. घालणे (अंडी). ५. वर्जणे; वगळणे; टाकणे (माणूस, वस्तू, गोष्ट). ६. अंग काढून घेणे. ७. शुद्ध करणे; चकचकीत करणे (धातूचे जिन्नस विस्तवात घालून). ८. यंत्रात दाबून पिळून काढणे; तेल, अर्क काढणे (गळिताचे धान्य, बी यांचे). ९. मळ, गाळ काढणे (विहीर, तळे, धरण यातील) : 'प्राज्य प्रीतिद झालें सुहृदांला गाळिलें जसें आज्य ।' – मोसभा ७.३. १०. (अवसान हातपाय इ. शब्दास जोडून) धीर सोडणे; कच खाणे; खचणे. ११. रस करणे; वितळविणे; पातळ करणे. [सं. गालय]

गाळ (ळा) णे न. चाळणी; गाळणी.

गाळपेरा वि. धान्य पेरण्यालायक बनलेल्या गाळाच्या (जमिनी) : 'सरकारी तलावातील गाळपेरा जमीन ३५ एकर लागवडीकरितां खंडाने देणें आहे.' – के ९.९.१९४१.

गाळवट, गाळवी वि. रेंदा, दलदल, चिखल असलेली किंवा नदीचा गाळ वाहून आल्यामुळे तयार झालेली (जमीन).

गाळवंड न. गाळवट जमीन.

गाळवी वि. गाळ सारून बनलेली (जमीन.).

गाळ (ळी) शिवी स्त्री. निंदा; शिव्या; शिवीगाळ (क्रि. करणे, देणे).

गाळसाळ पु. रेंदा; चिखल; कचरा. [गाळचे द्वि.]

गाळंकार पु. दुखण्यामुळे आलेली स्थिती; गाळण. (गो.)

गाळा पु. १. मळ; गाळ; रेंदा; गाळल्यानंतर राहिलेला साका. २. नदीला पूर येऊन गेल्यानंतर काठावरील झाडांना अडकून पडलेला पातेरा, केरकचरा; चिखल; मळी. ३. स्वच्छ पिंजलेला कापूस.

गाळा पु. १. खण; बहालातील जागा. २. चौकट इ. च्या गर्भाचे प्रमाण. ३. इमारतींच्या दोन भिंतीमधील भाग; खोली; दुकान.

गाळागाळ स्त्री. १. वर्जन; वगळणे; टाकणे. २. नाकबुली; नकार. ३. (ल.) वेचणे; निवडणे. [गाळचे द्वि.]

गाळाची माती (भूगोल) पुराबरोबर वाहून आलेली माती.

गाळी (ळि) प्रदान न. शिव्या देणे : 'समर्थ समर्थांसी (श्रीरामास) गाळिप्रदानें समर्पिती।' – सप्र ३.७.

गाळीखोर, गाळ्यारा वि. शिवराळ; शिव्या देणारा.

गाळीत न. गाळण्याचे वस्त्र.

गाळीव वि. १. गाळलेले; चाळलेले; वेचलेले; स्वच्छ केलेले. २. निवडक; निवडून घेतलेले. ३. (ल.) उत्कृष्ट; चांगले. ४. (ल.) पक्का; बिलंदर; अट्टल; लबाड (लुच्चा, शठ, वेडा). (निंदार्थी).

गाळीव मूर्ती, वस्तू सर्व दुर्गुण एकत्र असलेला (माणूस); अट्टल सोदा.

गाळेकंपास पु. (सुतारी) गळ्याचे आतून व बाहेरून माप घेण्याचा कंपास; कैवार. (को.)

गाळेखेरे न. अव. गोट्या उडविणे व झेलणे (लहान मुलांचा एक खेळ).

गाळोटी स्त्री. गाळवंड जमीन. (व.)

गाळाँ पु. रेशमी पातळ; वधूची रेशमी साडी (दैवज्ञ); वधूवस्त्र. (गो.)

गांग न. गंगेचे पाणी : 'कां बोध सांडूनि गांग।' – ज्ञा १४.३५३. वि. गंगेचे; गंगेसंबंधी : 'आतां निर्वाळूनि कनकें । भरिला गांगेंपीयूखें।' – ज्ञा १६.१९७. [सं. गंगा]

गांगउडा पु. गर्दी; घोटाळा. पहा : **गांगरडा** (व.)

गांगरडा, गांगर्डा पु. आरडाओरडा; कोलाहल; गलबला. [ध्व.]

गांगरणे, गांगारणे, गांगावणे, गांगणे अक्रि. भीतीने घाबरणे; गोंधळणे; सुचेनासे होणे; अवधान सुटणे; पेचात पडणे; दिङ्मूढ होणे.

गांगरपट्टी स्त्री. गडबड; धांदल; तारांबळ; घोटाळा : 'त्यांची सोळा आणे गांगरपट्टी उडाली व त्यांची पुरी फजिती झाली.' – विद्याभिवृद्धि १६०.

गांगा वि. पांढरा; तांबूस छटा असलेला पांढरा; शेपटीखाली व तोंडावर तांबडा बाकी सर्व पांढरा – घोड्याचा रंग : 'शुद्ध श्वेत निर्मळ। त्र्या वर्णाचे केवळ। ते गांगे घोडे।' – गीता १.७८४. [सं. गंगा]

गांगो पु. गाव व गावातील गुरे यांचे रक्षण करणारी एक देवता; ग्रामदेवता. (राजा.)

गांज स्त्री. ओरखडा. (गो.)

गांजणी, गांजणूक स्त्री. १. जाचणूक; त्रास; छळ; गांजणे : 'वाटे त्या धरितील तूज तरुणी, होते मला गांजणी।' – आकं ८. २. गांजल्यामुळे होणारे दुःख.

गांजणीचे गवत एक प्रकारचे मसाल्याचे गवत.

गांजणे उक्रि. १. चैन पडू न देणे; छळणे; जाच करणे; यातना देणे. २. खनपटीला बसणे; निकड लावणे; सक्तीने पाठ पुरविणे. अक्रि. जाच, छळ, त्रास, होणे, सोसणे; गांजणूक काढणे : 'आडले गांजिले पीडिले संसारीं। त्यांचा तूं कैवारी नारायणा।' – तुगा ८८३.

गांजवा पु. एक औषधी मूळ; काष्ठौषधी.

गांज(जि)वा पु. पिशवीसारखे जाळे (फळे वगैरे नेण्याचे) : 'मोहरी पावा गांजिवा पाटीं।' – निगा १७. पहा : **गजबा**

गांजा पु. भांगेच्या झाडाची वाळलेली फुले, शेंडे, मंजिऱ्या, तुरे. [सं. गंजिका]

गांजा पहा : **गांजवा, गांझा**

गांजील, गांजीलमूस पु. गांधीलमाशी. (गो.)

गांजूल न. कुलूप उघडण्याचे (किल्लीशिवाय) एक हत्यार. (गो.) [पोर्तु.]

गांजेकस वि. गांजा ओढण्याचे व्यसन असणारा; गंजेटी.

गांजो–झी पु. १. पक्ष्याच्या शरीरातील अन्नाची पिशवी, कोठा. २. माणसाच्या पोटावरची कातडी. (गो.) ३.पहा : **गांझा**

गांज्या पु. तलवारीच्या मुठीच्या मागे असलेले वाकडे, लांब, शोभेचे टोक.

गांझा पु. गांजवा; गांजा; आंबे इ. झेलणीने गोळा केल्यानंतर ते ठेवण्याचे जाळे; हारा; झेला; सारणी. [फा. गझना]

गांड स्त्री. १. गुदप्रदेश; ढुंगण. २. मलद्वार; बृहती; बोचा. ३. मागची अथवा खालची बाजू; बूड अथवा तळ (वस्तूचा). [सं. गुद] (वा.) ० **गुडाखू होणे** – भीतीने दबून बसणे; थंडी, पेटके वगैरेंनी आखडले जाणे. ० **जड होणे** – गर्विष्ठ बनणे; शेखी चढणे. **गांडतोंड हाती धरणे** – बाहेरख्यालीस किंवा खाबूपणास प्रवृत्त होणे, सोकावणे; बदफैलीपणा व अविश्वास ह्या दोन्ही गोष्टी करणे. ० **फाटणे** – भीतीने गांगरणे; लेंड्या गाळणे; गर्भगळित होणे. ० **फाडणे** – कडक शब्दात दम देणे; भेदरून जाईल इतका दम देणे. ० **मारणे** – १. गुदमैथुन करणे. २. बृहती तंतरणे. ० **वळणे, गांडीवर रेघ ओढणे** – मागे सरणे; नाकबूल करणे. ० **वाकडी करणे** – नामोहरम होणे; माघार घेणे; तोंड चुकवणे. **गांडीचे गरगट होणे** – पादडले जाणे; भूस पडणे; दमणे; थकणे. **गांडीत सुंठ फुकणे, गांडीत काड्या घालणे** – १. एखाद्याला उत्तेजन देणे; भर, फूस देणे. २. (ल.) शिक्षा, फजिती करणे; पराभव करणे. **गांडीवर घाव घेणे** – कामकाजात फजीत होणे; अपमानाने मागे सरणे; पराभव पावणे. **गांडीस हात पोचणे** – वडील मंडळींच्या ताब्यातून सुटून स्वच्छंदाने वागण्यास मोकळे होणे.

गांडकणी स्त्री. गोणीच्या मागचा पट्टा; लेंडी.

गांडगमाऊ वि. बेअकली; मूर्ख; नालायक.

गांडगुडघा–घी, गांडगुंडा स्त्री. पु. गांडीवर गुडघ्याने मारलेला ठोसा. (क्रि. देणे, मारणे, बसणे.) (वा.) **गांडगुडघी मारणे –** फजिती करणे; ढुंगणावर गुडघे मारणे : 'कोथळा किल्ला फत्ते करून हसमखानास गांडगुडघ्या मारून काढून दिला.' – मसाछोब ४१.

गांडगुलामी स्त्री. मानहानीची खुशामती; फार हांजीहांजी.

गांडगोटा पु. पाण्याच्या अभावी गांड पुसण्यासाठी वापरला जाणारा दगड.

गांडचोळणा पु. चड्डी.

गांडजोरा पु. (अशिष्ट) मागून दुजोरा; अनुमोदन; फूस; (क्रि. देणे.)

गांडपिटकी स्त्री. १. ढुंगणावर ढुंगण आपटणे. २. खेळीमेळी; दाटमैत्री.

गांडपुशा वि. हलकट; नीच; क्षुल्लक; य:कश्चित.

गांडपोते न. जाडेभरडे वस्त्र. (कु.)

गांडबोला पु. ढुंगणावर आलेले गळू; व्रण; क्षत.

गांडभरू वि. (निंदावाचक) संपत्तिमान; द्रव्यवान; धनवान; श्रीमंत.

गांडमणी पु. गुह्य गोष्ट : 'राग नको धरूं मनीं। गांडमणी सांगतों।।' – तुगा ३००३.

गांडमस्ती स्त्री. श्रीमंतीचा माज.

गांडमांडूळ–महाडूळ पु. काडू; लाल रंगाचा, दुतोंडी, पावसाळ्यात उत्पन्न होणारा उरोगामी किडा.

गांडमैत्री, गांडमैत्रिका पहा : **गांडपिटकी** २

गांडमोडी इरले माणूस वाकले असता दुमडून ढुंगण झाकले जाईल अशा पद्धतीचे इरले.

गांडमोडी मुंगी मुंगीची एक जात. ही चालत असता हिचे ढुंगण मोडल्यासारखे दिसते.

गांडर स्त्री. एक वनस्पती; वीरण; नीरतर.

गांडरग स्त्री. खोटा अभिमान, अहंकार; रिकामा तोरा, ताठा; बढाई.

गांडर दुर्वा एक वनस्पती.

गांडराऊ–वू पु. गांडू; गांडभरावू; गंड्या.

गांडवळ पु. न. काडू. पहा : **गांडमांडूळ** (को.)

गांडसुकाळ–ळा–ळ्या पहा : **गांडराऊ–वू**

गांडा पु. उसाचा एक प्रकार.

गांडा वि. १. खराब; बेढब; वाईट. (व.) २. वेडा; खुळा. [गु.]

गांडापूर न. गुदद्वार : 'गांडापूर वाहू लागलें।' – एभारूड.

गांडाळ वि. (अशिष्ट) १. मोठे कुल्ले किंवा ढुंगण असलेली; पृथुजघना. २. जारिणी; व्यभिचारी (स्त्री.).

गांडीखालचे घोडे उपजीविकेचे साधन (नोकरी, व्यापार, धंदा वगैरे).

गांडीव पु. १. अर्जुनाचे धनुष्य : 'तेथ बेंबळ हातु गेला। गांडिवाचा।।' – ज्ञा १.१९७. २. (सामा.) धनुष्य. [सं.]

गांडू–ड्या वि. १. (शिवी) गंडस; गांडमराऊ; षंढ; नपुंसक; गांड सुकाळा. २. दुर्दैवी; हतभागी; कुचकामाचा; नीच प्रतीचा; हलका. ३. नामर्द; भित्रा; असमर्थ.

गांडू(डो)ळ न. काडू; दानवा. [सं. गण्डोल]

गांडेचिरी पु. झांझडा; एक प्रकारचा मासा.

गांढे वि. दुर्बल; कमकुवत. पहा : **गांढ्या**

गांढेपण न. दुबळेपणा; भित्रेपणा; गांडूपणा : 'काय देवा नेणों आलें गांढेपण।' – तुगा १२९०.

गांढ्या वि. (निंदार्थी) गंडिया; गांडू; हतभागी; कपाळकरंटा. पहा : **गांड्या**

गांढ्याळ वि. भित्रा; दुर्बल; गांढ्या : 'देव गांढ्याळ देव गांढ्याळ। देखोनियां बळ लपतसे।' – तुगा ३७००.

गांथण–न स्त्री. कूड, साट इ. ची बांधणी; गुंफण, वीण; गुंतण (कुंपणाच्या उभ्या काठ्यांची); छपराची ओमण; वीण व कृती दोन्ही. [सं. ग्रथन]

गांथणे उक्रि. १. गाथणीने बांधणे; विणणे; गुंफणे; गुंतविणे. २. ओवणे; माळ करणे. (गो.) [सं. ग्रथन]

गांध स्त्री. (लहान) फोड; गाठ; टेंगूळ; आवाळू (मुंगी, माशी, गांधील माशी, गोमाशी इ. च्या दंशापासून किंवा पित्तापासून झालेले).(क्रि. उठणे) [सं. गंधाली]

गांधट, गांधाड न. मोठी गांध, गाठ (गांध याचे विस्तारित रूप).

गांधणी स्त्री. गांधीलमाशी. पहा : **गांधीण**

गांधर्व न. गायन; गाणे. [सं.]

गांधर्व लग्न, विवाह १. वधूवरांच्या परस्पर संमतीने झालेले लग्न; प्रीतिविवाह. पहा : **अष्टविवाह** : 'विवाह तंव बहुतापरि। पिशाच गांधर्व आसुरी।' – एरुस्व ४.४२. २. (कायदा) स्त्री व पुरुष यांनी परस्परांवर प्रेमाने मोहित होऊन केलेला सांकेतिक विवाह. ३. पाट; म्होतूर.

गांधिक वि. गंधकयुक्त.

गांधी पु. गंधी; औषधी द्रव्ये विकणारा; औषधविक्या. [सं. गांधिक]

गांधीटोपी स्त्री. खादीची घडीची पांढरी टोपी. महात्मा गांधींच्या नावावरून हे नाव पडले.

गांधीण–ल, गांधीलमाशी स्त्री. कुंभारीण माशीसारखी दिसणारी माशी. ही चावल्याने गांध उठते. या मधमाशांसारख्या टोळ्यांनी पोळे करून राहतात. यातही नर, माद्या व कामकरी माशा असतात.[सं. गंधोली]

गांधीवाद पु. महात्मा गांधींनी सांगितलेले राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान : 'गांधीवाद म्हणून एक स्वतंत्र विचारपद्धती आहे.' – विचार.

गांधेल न. गांधीलमाशी : 'गांधेले म्हणती आमुचे घर।' – दास १.१०.४२.

गांभीर्य न. १. मनाची शांती, स्थैर्य, गंभीरता; भारदस्तपणा. २. खोली; ओंडी (पाणी, आवाज, सूर यांची). ३. भयकारकता; चिंताजनक स्थिती. [सं.]

गिअर पु. इंधनाच्या वापरात वाढ न करता वेगामध्ये वाढ करण्यास मदत करणारी स्वयंचलित वाहनातील यंत्रणा.

गिग्गी स्त्री. लहान दुबेळके; मेढ. (कर)

गिचका, गिचगिचीत वि. मऊ आणि चिकट; चिकचिकीत; मोकळा नव्हे असा (शिजविलेला भात). [ध्व. गिच्]

गिचगिंदा पु. एकत्र कालविलेला, सरसरीत, खाण्याचा पदार्थ; काला; बोडण. [क. गिज.]

गिचमिट–ड स्त्री. १. किजबिड लिहिलेली अक्षरे, चित्रे, आकडे, आकृती, गोष्ट; न वाचता येणारे लिखाण; खरडणे; कुत्र्यामांजराचे पाय. २. खरडलेला, चिताड कागदाचा तुकडा.
वि. १. ओरबाडलेले; ओरखडलेले; चिडबिड लिहिलेले, ओबडधोबड केलेले (लिखाण, काम). २. गोंधळाचे; भरमसाट; भरकटलेले (भाषण). [क. गीचु = खरडणे, ओरखडा]

गिचमिडणे अक्रि. पसारा करणे; इकडेतिकडे वाटेल तसे टाकणे : 'गाद्यांच्या वळकट्या, धोतरे, शर्ट अशा वस्तूंनी ही खोली गिचमिडलेली असते.' – व्यंमाक २५५.

गिचाड न. १. गर्द झाडी; दाट अरण्य. २. घनता; दाटी (अरण्य, झाडी इ. ची). पहा : **गचाड**

गिच्च क्रिवि. गच्च; दाट; गर्द; खेटून; गर्दीने. (क्रि. होणे, भरणे, घालणे, लावणे, लागणे.) पहा : **गच्च**

गिच्च पहा : **गिचगिचीत**

गिच्चदाटी स्त्री. निबिडदाटी; गर्द; चेप; गर्दी.

गिच्ची स्त्री. (भोवऱ्याचा खेळ) भोवऱ्याच्या खेळात एक भोवरा दुसऱ्या फिरत्या भोवऱ्यावर आपटून तो तसाच फिरत ठेवणे. पहा : **गुच्चा** [क.]

गिजगड स्त्री. घासाघीस : 'हैदराचे वकील आपाजीराम श्रीमंतासी गिजगड करीत होते.' – पेठे दभा २.२०.

गिजगोळा वि. लगदा; डिचका. (कर.) पहा : **गिचका** [क. गिजटी = सपक व चिकट चवीचा.]

गिजबिज स्त्री. दाटी; गोंधळ. [का. गिजिबिजि]

गिजबि(वि)जले न. काचेच्या व सोन्याच्या मण्यांची माळ; गळसरी.

गिजबिटणे अक्रि. खरडणे : 'गोप्या पोरानं... बिल गिजबिटलं.' – मक १९६०.९९.

गिजबिड–मिड पहा : **गिचमिट**

गिजरा वि. घारा. (व.)

गिजविजले न. गळ्यातील एक प्रकारची माळ.

गिटकडी–कारी स्त्री. (संगीत) गळ्यातील कंप; कोणताही स्वर वाजवीत असता त्याच्या मागच्या व पुढल्या चार स्वरांना झटका देऊन उत्पन्न केलेला मिश्र स्वर.

गिटकळी, गिटंगळी पहा : **गटकळी, गटंगळी**

गिटपिट स्त्री. दुसऱ्याला न कळेल असे आपसातील हळू हळू बोलणे : 'तुम्ही दोन... अधिकाऱ्यांना सार्वजनिक जागेत गिटपिट करताना ऐकलेत...' – दोहस ६०. (क्रि. करणे)

गिटार न. एक तंतुवाद्य.

गिट्टी स्त्री. दगडाची बारीक खडी : 'ते चुन्याच्या निर्मितीसाठी आणि रस्त्यावर गिट्टी म्हणून पसरण्यासाठी वापरण्यात येतात.' – भाख ४४.

गिट्टा पु. खेळताना मारायची मोठी गोटी वगैरे. पहा : **घट्टा**

गिडगाप पु. हलक्या जातीचा जोंधळा : 'जोंधळा उमाप आला होता, पण तो काही नेहमीचा गिडगाप, डुकरी, शाळू असला नव्हता.'– उअं २०.

गिडगिडिया–आ पु. वाद्यविशेष : 'सुपरिवारें जय वाद्यें राय गिडगिडिआ गौमुखे भेटी।' – धउ ४७. पहा : **गिडबिडी** [ध्व. गिड]

गिडगिडी स्त्री. (सोनारी) करणीसारखे एक हत्यार; याने भांड्याच्या किनारीवर तोड्याच्या आकाराची गोलाई मारतात.

गिडगि(बि)डी स्त्री. एक वाद्य : 'मुखवातें सनया रसाळ। गर्जती ढोल गिडबिडी।' – ह २२.२७. [ध्व.]

गिडगे न. ससाणा. (गो.)

गिडबिड क्रिवि. डवराच्या आवाजाप्रमाणे (आवाज करणे.) [ध्व.]

गिडबिडणे अक्रि. खरडणे; ओरखडणे; रेखाटणे. [क. गीचु, गिचबिड]

गिडबिडीत वि. गिचमिड; खरडलेले; चिरखोड्या ओढलेले.

गिडमंग्या पु. झाडावरील एक प्रकारचा खेळ; सूरपारंब्या (बे.) [क.]

गिडंगी स्त्री. दारूचे दुकान. (प्रां.)

गिडी स्त्री. खाली रुंद पोट व वर अरुंद मान अशा आकाराचे भांडे; चंबू.

गिड्ड–ड्डा वि. ठेंगणा; खुजा. २. ठेंगणा व जाड; थपकट व बळकट.[क.]

गिड्डबावले वि. ठेंगू. (गो.)

गिण पु. कंपयुक्त, अनुनासिक आवाजदर्शक शब्द. [ध्व.]

गिणगिण–णा क्रिवि. १. गुणगुणत; गात; आवाज करीत. २. नाकातील आवाजाने; गोंगावत. [ध्व.]

गिणगिण स्त्री. १. नाकात बोलणे. २. गुणगुण; गाण्याचा, वाजण्याचा आवाज. ३. भुणभुण; रडरडून मागणे. [ध्व.]

गिणगिणणे अक्रि. १. नाकात बोलणे; गेंगाणा, नाकातील असणे. (शब्द, आवाज). २. गुणगुणने; गाणे; गोंगावणे (चिलट, घुंगुरटे).

गिणगिणा–णीत वि. क्रिवि. १. सानुनासिक; नाकातील (उच्चार). २. अस्पष्ट; गुळगुळीत. ३. गात; गुणगुणत (डास).

गिणगिणाट पु. (गिणगिणचा अतिशय) १. गुणगुणाट; गोंगाट; सर्वांचा मिळून मोठा आवाज (माशा, मच्छर, भुंगा यांचा). २. खणखणाट; घणघणाट; मोठा गोंगाट. ३. लांबचा व अस्पष्ट गोंगाट (विद्यार्थी किंवा लोकसमूह यांचा). ४. गिल्ला; त्रासदायक बडबड; कलकलाट. ५. लोकांची गुणगुण, कुरकूर.

गिणगिण्या वि. गेंगाणा; नाकात बोलणारा. [ध्व.]

गिणणे सक्रि. गणणे; मोजणे. [सं. गण्]

गिणमिणचे, गणमणचे अक्रि. सांगितलेले ऐकणे; दाद घेणे. (गो.)

गिण्णाठे न. पायलीचा ३२ वा भाग; अर्धे चिपटे; कोळवे. (गो.)

गितस (सा) ई स्त्री. एक लहान व सरळ वाढणारे झुडूप.

गि (गी)द–ध न. गिधाड : 'घारें गिदें बहुतीं येकमेकांथे झोंबती।' – क्रिपु ३३.१५.

गिद–दा पु. वजनाचे एक माप.

गिद(दा)वा पु. घराच्या धाब्यावर पसरण्याची (विटांच्या भट्टीतील) माती, चुरा; विटकरांची पूड.

गिदळून क्रिवि. खदखदून; खिदळून : 'तेव्हा ती गिदळून हसली व म्हणाली...' – आआशे ३१.

गिदा वि. फळातील गर. (झाडी.)

गिदाडा पु.१. केरकचरा; घाण. (ना. व.) २. अपमान. (झाडी.) वि. घाणेरडा.

गिदार न. शिंप्याचे अंगुस्तान. (गो.) [पोर्तु.]

गिदी स्त्री. नफ्याचा भाग; हिस्सेरशी.

गिदीवारी स्त्री. कागदपत्रांची पाहणी. –(तंजा.)

गिधण न. एक औषधी वनस्पती.

गिधाऊ पु. डोळ्यातील पू, चिपडे इ. (खा.)

गिधाड न. मृत जनावराचे मांस खाणारा पक्षी; गरुडवायले. [सं. गृध]

गिधाडीमशीन न. (मुद्रण) छापण्याचे एक यंत्र; कोलंबियन हँडप्रेस.

गिनती स्त्री. मोजदाद. [हिं.]

गिनी स्त्री. पूर्वी इंग्लंडात चालणारे एक सोन्याचे नाणे. आता हे चलनी नाणे नसून फक्त हिशेबी आहे. याची किंमत २१ शिलिंग ठरलेली आहे. [पोर्तु. गिने]

गिनीघास न. उष्ण प्रदेशात वाढणारे एक गवत : 'दीडशे वर्षापूर्वी आफ्रिकेतील उष्ण प्रदेशातून आणून येथे रूढ केलेले हे (गिनीघास) गवत आहे.' – वनश्री ४२४.

गिन्ना पु. खरवस; चीक (दुधाचा). (कर.) [क. गिण्ण]

गिन्ना क्रि. जुमानणे. (झाडी.)

गिन्नी स्त्री. भारतात चालणारे एक जुने धातूचे नाणे. याची किंमत एक आणा होती.

गिन्यानी वि. शहाणा; ज्ञानी : 'कोंबडा गिन्यानी उतार पडे याच्या कानी।' – जसा २०.

गिबत स्त्री. निंदा; चहाडी. (व.) [फा. गीबत]

गिम न. अळवाची एक जात.

गिमवस स्त्री. १. उन्हाळ्यात बाहेरून पाणी देऊन तयार केलेले (नाचणी, भात यांचे) शेत. २. अशा तऱ्हेचे पीक, धान्य. [सं. ग्रीष्म]

गिम(म्ह)वा पहा : **गिमवस** २

गिमावणे अक्रि. उन्हाळ्यातील त्रासाने (चारा, पाणी यांच्या अभावाने) मलूल होणे, सुकणे, रोडावणे (पशू); उन्हाळा बाधणे. (राजा. कु.)

गिमाळा पु. उन्हाळा : 'आपदेचा मोडवा भंगला। आला आनंदु गिमाळा।' – ख्रिपु २.५२.४८. पहा : **गीम**

गिरकन–कर–दिनी–दिशी क्रिवि. गरगरा; गरगर (भोवरा इ. वाटोळे फिरणे). [ध्व.]

गिरकणे अक्रि. गोल गोल फिरणे. [क. गिरी = फिरणे]

गिरका पु. १. कापसातील सरकी काढण्याचे यंत्र, जीन. २. फेरी; चक्कर; गिरकांडा. पहा : **गरका**

गिरकावणी स्त्री. अतिशय वेगाने एका बिंदूभोवती फिरवणे, घुसळणे यासाठी वापरायचे साधन. : 'दुधातले ओषट गिरकावणीने बाजूला काढल्यावर...' – वनश्री ९.

गिरकांडा–डी, गिरकंडा पु. स्त्री. १. गरका; चक्कर; भोवरी; वेढा; फेरा; वळसा. (क्रि. देणे, मारणे; घेणे, घालणे.) २. भोवांडा; वाटोळा रस्ता; घेर. (क्रि. खाणे, घेणे, घालणे, (उलट) बसणे, पडणे.) ३. एखाद्या ठिकाणी जाऊन येणे; हेलपाटा. ४. (ल.) द्राविडी प्राणायाम; चर्पटपंजरी. ५. (ल.) गोंधळ; घोटाळा; गळफाटा. (क्रि. पडणे).

गिरकी स्त्री. १. पहा : **गिरकांडा** १, २. (क्रि. मारणे, देणे, खाणे, घेणे.) २. भोवंड; घेरी. (क्रि. येणे.) ३. (गाण्यातील) कंप; तान. (क्रि. घेणे.) ४. झपाट्यात गोल फिरण्याची क्रिया.

गिरके न. घेरी; घुरे; अपस्मार, फेफरे यांचा झटका. (क्रि. येणे.) पहा : **गिरगिरे**

गिरगटण न. दाट सारवणे; गिरगटणे. (व.)

गिरगटणे उक्रि. फासणे; सारवणे (भांडी, जमीन). (प्रां.) पहा : **गरगटणे** [क. गीचु = खरडणे, गिरू = ओरखडणे]

गिरगिटाविणे पहा : **गिरविणे**

गिरगिर–रा क्रिवि. गोलगोल; भोवताली (फिरणे, भोवंडणे). [ध्व.]

गिरगिरणे अक्रि. १. सभोवार फिरणे; गोलगोल फिरणे; वाटोळे भोवंडणे. २ गरगरणे; चक्कर, भोवळ येणे; फिरणे (डोके).[क. गिरिगिरितिरगु]

गिरगिर माथा एकमेकांचे हात धरून गोल फिरण्याचा मुलांचा खेळ.

गिरगिर मासा पु. गोल फिरून खेळण्याचा मुलींचा एक खेळ.

गिरगिराट पु. फिरणाऱ्या चाकाचा होणारा आवाज : 'त्याच्या सायकलच्या चाकांचा गिरगिराट वामनरावांच्या कानी आला.' – जांदि ३१.

गिरगिरी स्त्री. घेरी; मूर्च्छा; भोवंड. (क्रि. येणे.) : 'तशा संधी हाणी नर शर तयानें गिरगिरी।' – वामन विराट ७.१६९.

गिरगिरे–री न. स्त्री. १. खेळणे; लाकडी किरकिरे. २. हवेने फिरणारे कागदी भिरभिरे.

गिरगिरे न. एका खांबावर एक लहान लोखंडी कांब गरगर फिरवून खेळण्याचा जुगार. (गो.)

गिरगिंडा पु. १. माणसांचा गराडा; पहा : **गरका, गिरकांडा.** २. (ल.) भेसळ; मिसळ; खिचडी; काला (अनेक वेगवेगळ्या वस्तूंचा).

गिरगोट पु. उडता पतंग खाली पाडण्याकरता लहान दगडाला दोरा बांधून केलेले एक साधन. (ना.)

गिरचटणे उक्रि. जमीन, भांडी खसखसा घासणे; गिरगटणे. (प्रा.)

गिरजाघर न. चर्च. [पो. इग्रेजा]

गिरटी स्त्री. १. घिरटी; प्रदक्षिणा; वळसा; फेरी. (क्रि. घालणे.) २. फेरी; गिरकी; भोवरी. ३. (ल.) घिरट्या; येरझारा; जा ये; फेरे.

गिरड–प पु. मगज; गर. (गो.)

गिरण–णी स्त्री. कापसाचे सूत काढण्याचा, गठ्ठे बांधण्याचा, दळण दळण्याचा इ. कारखाना; सामान्यत: यंत्रावर चालणारा उद्योग.

गिरणगाव पु. गिरण्या व कारखाने असलेला शहराचा भाग.

गिरणूळ पु. स्त्री. खरजेवर वापरले जाणारे एक वनस्पतीचे मूळ.

गिरदनी स्त्री. उशी. (गो.) पहा : **गिरदी**

गिरदा स्त्री. खीर : 'आत शोभती गिरदाची वाटी।' – जसा ४९५.

गिरदा पु. १. हुक्याच्या खालचा लहान गालिचा, बैठक. २. गिर्दी; उशी. ३. घेरा; गराडा. [फा. गिर्दा]

गिरदार वि. मांसल, गर असलेले (फळ).

गिरदी स्त्री. १. लहान वाटोळी उशी. २. (ल.) ठेंगणीठुसकी, गुबगुबीत स्त्री. [फा. गिर्दा]

गिरपथा पु. घोड्याच्या शिरा आखडणारा एक वायुरोग; वात. – अश्वप २.१८२.

गिर (रि) फतार–दार, गिरफ्तार वि. १. अडकलेला; कैदी; बद्ध; बंदी. (क्रि. करणे). २. निमग्न : 'तोपर्यंत याच मनसुब्यांत गिरिफदार आहो.' – मइसा १.९७. ३. विवंचनामग्न; चिंतातुर. [फा.]

गिर (रि) फतारी–दारी स्त्री. १. अटक; कैद; बंदी; बंधन. २. विवंचना; काळजी; चिंता : 'आम्हांसारखे आहेत ते गिरफदारींत मग्न असतात.' – ऐलेसं १.३९. [फा.]

गिरब (बि) डणे अक्रि. १. माखले जाणे; लडबडणे; बरबटणे, २. खरवडणे.
उक्रि. माखणे; सारविणे (चिखलाने) : 'जैसें बाभुळीचें खोड। गिरबडूनि जाती सरड।' – ज्ञा १३.५६२. (व.)

गिरबडा पु. सारवण. (व.)

गिरबा(वा)ळणे अक्रि. ओलसर होणे; गारठणे; ओला होणे : 'सकाळच्या पारी हरी कशानं गिरबाळीला।' – जसा ४४९.

गिरबुजली वि. खुजी; ठेंगू (मुलगी). (गो.)

गिरबुजी स्त्री. पोफळीच्या झाडाच्या गाभ्यातून निघणारा चुरा : 'स्वामियाची अनुग्न्या न्हवे तरि। गिरबुजी पण न पडे भूमीवरि।' – क्रिपु ८.११४.

गिरबॉ पु. सामता. (गो.)

गिरभी स्त्री. पोफळीच्या किंवा सुपारीच्या झाडाच्या गाभ्यातून निघणारे शिंपूट, तुरा, कणीस. (राजा.) [सं. गर्भ]

गिरमाळ वि. डोंगरावरील नापीक, पठाराचा (प्रदेश).

गिरमि(मी)ट न. करार; मुदतबंदी (मजुरांची).

गिरमिटणे अक्रि.गोल गोल फिरणे : 'एकट्याच्या भोवती रात्र गिरमिटते.' – ध्रुपद ८१.

गिरमीट, गिर्मिट न. एक प्रकारचा सामता; भोक पाडण्याचे एक हत्यार.

गिरव, गिरवी, गिरो न. गहाण. [फा.]

गिरवणी स्त्री. अक्षरवळणी; घोटणी.

गिरवणे सक्रि. बाहेर काढणे; पकडणे : 'एक टोळ काटकीच्या शेव्याला बांधून ती बिळात घालून खेकडी गिरवताना ते दिसत.'– आआशे १७३.

गिरविणे उक्रि. १. वळविणे; कित्यातील अक्षरांच्या वळणावरून (शाईत न बुडविता) लेखणी फिरवणे; घोटणे. २. (कित्ता) (ल.) सारखे वागणे; बरहुकूम करणे.

गिरंदार–बार वि. श्रीमंत व तालेवार (मनुष्य).

गिरा पु. १. ग्रह. पहा : **गिऱ्हा.** २. भुतावळ. [सं. ग्रह]

गिरा–ऱ्हा पु. १. दीड तसूचे (गजाचा एकचवदांश किंवा एक सोळांश भाग) कापड वगैरे मोजण्याचे साधन : 'तोफ लांबी दहा गज दोन गिरे आली.' – मइसा ७.२६६. २. तुकडा. (व.)

गिरा पु. संकट : 'ग्रह उच्चटले शनि पालटले आता दूर येथोनि गिरा।' – ऐपो १९.

गिरा स्त्री. वाचा; भाषा; वचन; वाणी. [सं.]

गिरागोटा पु. व्याधी. (झाडी.)

गिराडा पु. अव. आयुष्य. (झाडी.)

गिराण न. ग्रहण. (चंद्र–सूर्य ग्रहण.) [सं. ग्रहण]

गिराणी स्त्री. १. संकट; ओझे; दु:ख; वाईट दिवस : 'लोकांस खर्चाची गिराणी फार आहे.' – मदबा १.७०. २. रुष्टता : 'मर्जीस गिराणी येईल.' – मइसा १०.२५३. ३. जेरी (क्रि. येणे); मेटाकुटी : 'किल्लेवालेहि गिराणीस आले आहेत.' – मदबा १.२०७. ४. महागाई; दुष्काळ : 'लष्करांत गिराणी फार म्हणून लोक बहुत हैराण...'– दिमरा २.१०[फा. गिरानी]

गिरामी वि. श्रेष्ठ; पूज्य; थोर; मोठी; फार. [फा.]

गिरावण, गिरवाण, गिरेवान न. अंगरख्याचा खांद्याचा भाग. [फा.]

गिरावळ स्त्री. अत्यंत रडके पोर. (राजा).

गिराशा पु. लुटारूचा धंदा करणारी एक रजपूत जात : 'तेथें गुजालसिंग म्हणोन गिराशा होता.' – भाब ३७.

गिराशी–सी पु. गुजराथेतील एक जमीनधारक जात. यांना मराठे, वाटमारे, लुटारू समजत असत.
स्त्री. गिराशांचा धंदा; वाटमारी. [सं. ग्रास]

गिराशीचा शिरस्ता घाटातील गिराशी (भिल्लासारखी वन्य जमात) संस्थानिकांना निर्धोक वाहतूकीसाठी जो कर किंवा पट्टी देतात ती.

गिरास पु. गिराशांचा धंदा; लूट. पहा : **गिराशी**
न. गिराशींची टोळधाड, समुदाय, टोळी (लुटण्यास निघालेली).
स्त्री. गिराशी लोकांचे वतन : 'गिरास पूर्वीप्रमाणे आम्ही घेत आलो त्याप्रमाणे महालकरी देत नाहीं.' – दुबारो ५.१६४.

गिरास पु. घास : 'देवानी चूळ आंजूळ घेतली. पहिला गिरास घेतला.' – आलो ४५.

गिरासपण न. १. लुटालूट. २. (ल.) स्वारी; शिकारी; मोहीम.

गिरि–री पु. पर्वत; डोंगर. [सं.]

गिरिकपाट न. डोंगरातील गुहा : 'दरेदरकुटें : गिरिकपाटें' – लीचपू १७.

गिरिकंदर–रा पु. स्त्री. डोंगर–पर्वतातील गुहा; दरीखोरी; कपार : विवर: 'कपी सांडिती युद्धसंग्राम भूमी। निघाले गिरीकंदरी वृक्ष गुल्मी।'– मुरामायण, युद्ध १६०.

गिरिगीता स्त्री. येशूख्रिस्ताचा पर्वतावरील उपदेश.

गिरिघोटी स्त्री. १. (मुलांचा खेळ) ओवळ्याभोवळ्या; आळ्यामाळ्या. २. गिर्की; फेरा; हेलपाटा. (क्रि. घालणे, करणे, लागणे.)

गिरिजन पु. डोंगराळ प्रदेशातील मूळ रहिवाशाचा वंशज.

गिरिजाघर न. चर्च. ख्रिस्ती धर्मीयांचे प्रार्थनामंदिर.

गिरिपिंड पु. (भूशा.) चोहोबाजूंनी विभंग अथवा वळी असलेला व मध्ये उठून दिसणारा मोठा डोंगर.

गिरिफ्तन मध्येच हिराऊन किंवा पकडून नेलेला.

गिरिबदार वि. गरीब; दरिद्री; संकटग्रस्त.

गिरिभ्रमण न. प्रवास.

गिरिरी, गिरी, गिरीगिरी, गिरिविरी स्त्री. मूर्च्छा; घेरी; चक्कर; भोवंड :

'तेणें घाए गिरिरी आली।' – शिव १०६६; 'आले शहरांतून गरकन झरकन आली पहातां मज गिरी।' – पला ४.२; 'गिरीविरी आणि अंधारें।' – दास ३.६.२६. [क. गिरी = फिरणे]

गिरिस्तन चिंताक्रांत : 'श्रीमंत दादासाहेबांची स्वारी या प्रांतीं आली त्यामुळे ते गिरिस्तन.' – ऐलेसं ९५७.

गिरी स्त्री. १. गिरकी; फेरा; वेढा; वर्तुळाकार भ्रमण : 'पांचचार गिऱ्या मारीत अगदीं दमून जमिनीवर बसतात.' – विछ १०. २. घेरी; मूर्च्छा.

गिरी पु. (दसनाम) गोसावी जातीतील एक शाखा; भेद : 'वाळकेश्वरातसुद्धा गिरी, पुरी, बैरागी लोकांची वस्ती आहे.' – विनाभा ७.

गिरीघोटी स्त्री. १. हेलपाटा; खेटा; २. झोका; फिरका.

गिरीफदार सचिंत किंवा गर्क.

गिरीबदारी स्त्री. चिंता; दीनस्थिती : 'त्याजकडे यास पाठवावे तरी हे आपले गिरीबदारीमध्ये फारच आहेत. यास्तव पाठविले नाहीत.' – पेद.

गिरीविरी पु. एक प्रकारचा रोग.

गिरेबाज वि. हवेत उडताना गिरक्या मारण्यास शिकवलेले (कबूतर).

गिरेबान स्त्री. गळपट्टी. [फा.]

गिरेस्तकाय स्त्री. श्रीमंती; ऐश्वर्य. (गो.)

गिर्कांडा–डी, गिर्की, गिर्गिर, गिर्टी पहा : **गिरकांडा**

गिर्गोट पु. १. सुतांची काटछाट. २. एक खेळ. (झाडी.)

गिर्द क्रिवि. भोवती; सभोवार : 'सर्व फौजा दिल्लीचे गिर्द जाऊन रसद बंद करावी.' – दिमरा १.२६६.

स्त्री. १. परिघ; घेर; सभोवतालचा प्रदेश : 'नवशें रुपयांचे जमेचा गाव झांशी गिर्दीत तजवीज करणें.' – ऐटि ३.५७. २. चौकी : 'अल्पिष्टनसाहेब यांणी शहराभोंवतीं गिर्द बसवून...' – मइसा १४.६४. [फा.]

गिर्दनवाई–ही स्त्री. १. (किल्लाकोट यांच्या) भोवतालचा प्रदेश; आसमंतातील भाग : 'गिर्दनवाईचे गांव लुटून उद्ध्वस्त केले.' – मइसा १४.२०. २. भोवतालच्या प्रदेशाचे संरक्षण. [फा.]

गिर्दनवाजी पु. गस्तकरी; किल्लेकरी : 'गिर्दनवाजी गनिमाकडील अंताजी माणकेश्वर आहे त्यास पुसावें.' – भाब २०.

गिर्दवारी स्त्री. १. पहा : **गिर्दावरी.** २. मुशाफरी. (व.)

गिर्दाब पु. भोवरा. [फा.]

गिर्दावरी स्त्री. १. जमवाजमव : 'तूं बाहेर खेमे दाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी.' – मइसा ५.७८. २. बंदोबस्त. ३. जकातवसुली; जकात बंदोबस्त. [फा.]

गिर्दी स्त्री. १. लहान उशी; गिरदी. २. किल्ल्याच्या घेराचा प्रदेश. ३. गस्त; घरटी; पहारा. [फा. गिर्दा]

गिर्नी स्त्री. मूर्च्छा, भोवळ. (झाडी.)

गिऱ्या पु. ग्रह : 'तो सायबानं गगनात सोडलेला फिरता गिऱ्या!' – जैत ५४.

गिर्यारोहक पु. एक क्रीडा म्हणून पहाड, डोंगरकडे चढणारी व्यक्ती; डोंगर, पहाड चढण्याचा छंद असलेली व्यक्ती.

गिर्यारोहण न. डोंगर, पहाड इ. चढण्याचा छंद; एक साहसी क्रीडा. [सं.]

गिर्रेबाज वि. १. गिरक्या घेणारा. २. नखरेल; स्वत:कडे लक्ष वेधून घेणारी; तरतरीत व देखणी. [फा. गिरहबाज]

गिर्वड स्त्री. कटकट. (गो.)

गिर्वा–व्हां पु. ढालीचा एक प्रकार.

गिर्वीदगी स्त्री. १. निष्ठा. २. अगत्य; पाहुणचार : 'मर्दमाणूस लोकांस गिर्विदगी करून कित्येकांचे पारिपत्यच केलिया उत्तम आहे.' – ऐटि २.७१. [फा.]

गिऱ्हवाळ स्त्री. गिरावळ; गिऱ्ह्याची पीडा; भुतावळ. पहा : **गिऱ्हा** ३.

गिऱ्हा पु. १. जलग्रह; पाण्यातील पिशाच. २. राहू (चंद्राला ग्रासतो म्हणून); ३. ग्रहण. ४. रोडके, भुतासारखे पोर. ५. (ल.) त्रास; कटकट; पीडा (एखाद्याला लागलेली). [सं. ग्रह]

गिऱ्हाइकी–यकी स्त्री. १. धंदा; व्यापार; वर्दळ; वहिवाट (माल खरेदी–विक्री करणारांची दुकानावर). २. माल घेणारा वर्ग, लोक.

गिऱ्हाईक–यीक पु. न. माल खरेदी करणारा, सामान्यत: माल घेणारा वर्ग. [सं. ग्रह] (वा.) ० **मरणे –** गिऱ्हाईक पटविले जाणे. ० **मारणे –** आपल्याकडे गिऱ्हाईक ओढून घेणे, पटकविणे.

गिऱ्हाण न. ग्रहण. [सं. ग्रहण]

गिऱ्हाद वि. दारूने झिंगलेला. (गो.)

गिऱ्हावळ स्त्री. भुताची पीडा.

गिऱ्हे पहा : **गिऱ्हा, ग्रह**

गिऱ्हेपूजन न. लग्नाच्या वेळी केलेले ग्रहांचे (सूर्य व इतर ग्रह यांचे) पूजन, ग्रहमख; ग्रहशांती. [सं. ग्रहपूजन]

गिऱ्ह्या पु. भूत : 'एक गिऱ्ह्या बाटलीत भरून त्या जागेतल्या उंबराखाली पुरला होता...' – स्मगा २९.

गिलका पु गोंगाट; कल्ला; गलका : 'शंकरला बघताच सारे गिलका करून ओरडले.' – माणूस १८५.

गिलकारी स्त्री. चिखलमातीचे बांधकाम : 'मध्यें पुरवणीस गिलकारी व धोंडे घालून पुरवणी भरतो.' – वसमो. [फा. गिल = चिखल]

गिलकी–ची–के पहा : **घोसाळी, घोसाळे**

गिलके न. फाटक; दार; झापा (काठ्या–कामट्यांचा). (खा.)

गिलगिली वि. ओलीचिंब. (व.) [सं. गिल]

गिलगिलीत वि. १. बिलबिलीत; गलगलीत; थलथलीत (अधिक पिकलेले केळे इ.) २. मऊ आणि दबदबीत (राड, गाळ). पहा : **गिळगिळीत** [सं. गिल]

गिलचा पु. पठाणांची एक जात.

गिलबिले न. सरीसारखा एक दागिना; गिजबिजले. (गो.)

गिला वि. १. ओला. २. थुलथुलीत. ३. पांचट, ओशट. (झाडी.)

गिला–ल्ला पु. १. ओरडाओरड; गोंगाट; गडबड; गलबल : 'येथें कांहीं गिल्ला पडणार नाहीं.' – मराचिथोरा ३०. २. तक्रार; गाऱ्हाणे; फिर्याद; निषेध. (क्रि. करणे, सांगणे, येणे, पडणे, होणे.) : 'भटजीनीं नानाप्रकारे इकडील गिला दरबारात लिहिला आहे.' – ऐलेसं २.३२५. ३. हाकाटी;

नालस्ती; निंदा. (क्रि. सांगणे.) ४. रडगाणे (प्रपंचादी संबंधी). ५. दोष; ठपका : 'या गोष्टीचा गिला आम्हांकडे नाहीं.' – मइसा ७. [फा. गिला]

गिलाणी स्त्री. आर्जव; विनवणी : 'सावकारार्थत्र जातो नि गिलाण्यो करून दिवाळ्येसर वायदो करून येतो.' – मसाप २.२६९. (राजा. कुण.)

गिलावस स्त्री. पाणथळ जमीन : 'जमीन गिलावस व कडधन व सर्दभात येणेंप्रमाणें.' – समारो ४.६०. [फा. गिल = चिखल]

गिलावा पु. १. बांधकाम झाल्यावर ते गुळगुळीत व सपाट दिसावे म्हणून त्यावर दिलेला माती, चुना, सिमेंट इ. थर, लेप : 'तिच्या आतल्या भिंती तर गुळगुळीत गिलावा केलेल्या होत्या.' – व्यंमाक १३. २. लिंपण; सारवण; मुलामा (देणे, चढविणे). [फा.]

गिलाशिक्वा पु. तक्रार; कागाळी : 'न जाणो, पूर्वी खोजीमकुली खानांहीं गिल्ला–शिक्वाही आमचा काय लिहिला असेल.' – मइसा ६.६०२. [हिं.]

गिलास पु. ग्लास; पाणी पिण्याचा पेला (काच, धातू इ. चा).[इं. ग्लास]

गिलि(ली)ट न. मुलामा; पाणी (चांदी, पितळ इ. धातूला दिलेले); लेप. [इं. गिल्ट]

गिलेगुजार, गिळूगिर वि. १. दुखावलेला. २. रुष्ट : 'हे वृत्त शहाजीस समजल्यावर बहुल गिलेगुजार आहेत.' – दिमरा २.२३. [फा.]

गिलेगुजारी स्त्री. १. रुष्टता. २. तक्रार : 'भवानी कुंवर ही दरबारास जाऊन खलबत करितात म्हणून बहुत गिलेगुजारीनें लिहिलें होतें.' – दिमरा २.२३. [फा.]

गिले(ली)फ पु. अभ्रा (उशी, लोड, तक्या इत्यादीवरील); आच्छादन. पहा : **गलेफ** [फा. गलेफ]

गिल्ली स्त्री. विटी. (व. ना. काशी) [हिं.]

गिवणे क्रि. शांत होणे.

गिवस पु. शोध : 'कीं संध्यासरोवरीं । सारसिचा गिवसू। करु आला सोनेयाचा सारसू।'– रुस्व ४७०.

गिळगिळीत वि. गळगळीत; काठोकाठ; घळघळीत. [सं. गल]

गिळगिळीत वि. ओलसर, बुळबुळीत, किळसवाणा स्पर्श असलेला : 'ओलातून वळवळतात त्या जिवाणूसारखा तो गिळगिळीत वाटू लागतो.' – गाणे ४३.

गिळगिळीत वि. गळगळीत; बेचव; पाणचट; नीरस. [सं. गल् = गिळणे]

गिळणे उक्रि. १. गट्ट करणे; गळ्याखाली उतरवणे. २. (ल.) शोषून घेणे; खाऊन टाकणे (पारा सोने शोषतो, भाकरी तूप शोषून घेते त्याप्रमाणे). ३. (ढग, राहू इत्यादीनी) ग्रासणे; व्यापणे; घेरणे : 'गौतमपत्नी गिळिली होती जे पापतापशापाहीं।' – भक्तमयूर केका ४. ४. लाच खाणे. ५. दाबणे; दडपणे; आत कोंडणे; आतल्या आत चेपणे (अश्रू, राग, दुःख). ६ (अपकार, अपमान, अपराध) सहन करणे; पोटात घालणे; प्रतिकार न करणे. ७. बळकावणे; लाटणे; लुबाडणे. [सं. गल् = गिळणे]

गिळंकृत वि. गिळलेले; लुबाडलेले; बळकावलेले (धन, पैसा, ठेव).

गिळंकृत कन्यादान १. नवऱ्या मुलाकडून पैसा घेऊन मुलगी देणे. (क्रि. करणे.) २. एखाद्या म्हाताऱ्याला मुलगी देणे (उद्देश हा की म्हातारा जावई वारल्यावर त्याच्याकडून मुलीला विकून घेतलेल्या पैशाखेरीज त्याच्या मालमत्तेवर गबर व्हावे.)

गिंट वि. दुहेरी सुताच्या विणीचे; भक्कम (लुगडे, कापड.) (कर.) [क.]

गिंडी स्त्री. १. खाली रुंद पोटाचे, लहान गळ्याचे व अरुंद, चंबूसारखे तीर्थ ठेवण्याचे भांडे. २. सतेले. ३. झारी. – (तंजा.) [क.]

गिंती स्त्री. गणती; मोजदाद : 'माणसांची गिंती ठेवणें इत्यादि सूचना देण्यांत आल्या.' – वि ४.९.१९३९.

गिंधी स्त्री. भूतकाळातील अप्रिय घटना : 'झालं गेलं पार पडीं। नको काढू आता गिंध्या।' – बगा ११२.

गिंध्यान स्त्री. गांधीलमाशी. (व.)

गिंध्यान स्त्री. एक औषधी वनस्पती. (व.)

गिंवसण स्त्री. उशीचा अभ्रा. पहा : **गवसणी** (गो.)

गिंवसणे पहा : **गवसणे** : 'जेंयां वेदांची आम्हा आशु। तेयां गिवसितां जाले सायासु।' – शिव ८३.

गिंवसु पु. विस्तार.

गी स्त्री. वाणी; वाचा; वचन : 'आठां पुत्रांतें दे राज्यें प्रभुवन करि सत्या गी।' – मोरा १.२०६. [सं.]

गीझर पु. (वि.) पाणी तापविण्याचे विजेवर, इंधनवायू (गॅस) वर, सौरशक्तीवर चालणारे साधन. [इं.]

गीडबीड–डे न. एक वाद्य. पहा : **गिरबिड** : 'दौडीची गीडबीडी दुटाळा।' – कृमुरा ६५.३०.

गीत न. १. गेय शब्दरचना : 'गीतभाटीव तो श्रवणीं। कर्णजपु।।' – ज्ञा १७.२९७. गीतांचे प्रकार दोन – गांधर्व व गान. २. गाणे; पद : 'सुखगीत नृत्य तेथें मजलाही तोच एक थारा हो।' – मोसभा १.३३. ३. गाणे म्हणणे; पद गाणे. ४. दळताना किंवा लग्नात म्हणतात त्या ओव्या. ५. पदाचा छंद, वृत्त; छंदोबद्ध गाण्यातील एक भेद.
वि. गायिलेले; म्हटलेले. [सं. गै = गाणे] (वा.) **नावे गीत गाणे –** कोणी आपले कल्याण केले असता त्याच्या अपरोक्ष त्याची स्तुती करणे. **गीत गाणे –** १. दुसऱ्याजवळ आपली सर्व हकीगत सांगणे; रडगाणे लावणे. २. तेच तेच सांगणे; एकच धरून बसणे.

गीतकार पु. गीते रचणारा; पद्यलेखक; गाणी लिहिणारा.

गीतमात–न न. स्त्री. गायनादि कला; गाण्याच्या (संगीतातील) मात्रा, अंतरा, नियम वगैरे.

गीतरचना स्त्री. विशेषत: चित्रपट, नाटक, ध्वनिमुद्रिका. इ. साठी चाल लावता येईल अशी गाणी लिहिणे : 'चालीवर गीतरचना करण्याचें हें बंधन...' – प्रभात १७.

गीतसाळ स्त्री. गायनशाळा : 'गीतसाळ करी कुडी। किन्नरांची।'–उगी २२.

गीतसुड पु. पोवाडा; विजयगान : 'तयाचा गाति गीतसुडु। किन्नर पर्वतीं।' – रुस्व २५८.

गीतस्वर पु. मधुर आवाज.

गीता स्त्री. तत्त्वविवेचनाचा पद्यात्मक संवादरूप ग्रंथ.

गीति–ती स्त्री. १. एक छंद; आर्येचा एक प्रकार; मोरोपंती आर्या. याचे चार चरण असून पहिल्या व तिसऱ्या चरणात प्रत्येकी मात्रा १२ व दुसऱ्यात व चवथ्यात १८ मात्रा असतात. २. गाणे; गीत. [सं.]

गीतोपयोगी नाद (संगीत) ज्या नादात अखंडता, स्पष्टता व माधुर्य हे गुण तसेच प्रमाणबद्धता असते तो नाद.

गीद–ध पु. १. गिधाड : 'करितां रामनामस्मरण। गीध भक्षण करूं न शके।' – भारा किष्किंधा १६.९०. २. घार. [सं. गृध]

गीधधार पु. गिधाडांचा समुदाय.

गीम–म्ह पु. उन्हाळा : 'आकाश तर गीमासारखंच तळपत होतं.' – रात्रकाळी २३५. पहा : **गिम** (राजा कु. गो.) [सं. ग्रीष्म]

गीमदिवस पु. अव. उन्हाळा : 'गीमदिवसांत मरतुकडी दिसणारी नदी...' – तोरण २७६.

गीर स्त्री. रेघ.

गीर पु. गर; मगज; दळ; गाभा; सार. पहा : **गर**

गीर पु. सोरटी बैल; काठेवाडी गाई बैलांची जात.

गीर अ. एक प्रत्यय; काम करणारा, कर्ता या अर्थी नामाला जोडून येणारा प्रत्यय. जसे :– दस्तगीर, तमासगीर. पहा : **गर, गार** [फा.]

गीर्दपाषाण पु. घोड्याचा एक रोग. हा पायाला होतो. – अश्वप २.२५८.

गीर्दपेश क्रिवि. आसपास; सभोवार : 'मौजे रीयाचे गीर्दपेश दाहा कोसांत पाणी नव्हतें.' – पेद २.१५. [फा.]

गीर्दवारी स्त्री. जकातवसुली; जकातबंदोबस्त : 'सबब बागाइतास गीर्दवारी बसविली आहे.' – समारो ६.२२७. [फा.]

गीर्वाण पु. देव; देवता.

स्त्री. न. १. भाषा, भाषण, बोलणे : 'बळिराम आणि जगज्जीवन। बोलती स्वर्गींचे गीर्वाण।' – ह १४.१८३. २. दैवी भाषा; देवभाषा; संस्कृत भाषा : 'गीर्वाण शब्द पुष्कळ जनपद भाषाचि देखतां थोडी।' – मोरोपंत स्फुट आर्या (नवनीत पृ. २५४). [सं.]

गीर्वाण–णी वि. ईश्वरी; दैवी; स्वर्गीय.

गीर्वाण न. अंगरख्याच्या मानेचा (वस्त्राचा) तुकडा. पहा : **गिरावण, गिरवाण**

गील पु. गर; मगज; दळ. पहा : **गीर**

गीळ, गिळ पु. गळ्याची एक बाजू. (गो.)

गुइरे न. गुवाचा कपडा.

गुखडी, गुखाड–डी स्त्री. सर्वजण शौचाला जातात ती जागा; हगीनदारी.

गुगल न. इंटरनेटच्या जाळ्यात सर्वात जास्त वापरली जाणारी आणि नेमकी माहिती कमीतकमी वेळात शोधून काढणारी यंत्रणा.

गुगुलिपीड गुग्गुळाच्या झाडापासून निर्माण होणाऱ्या गोंदापासून निर्माण होणारा पदार्थ. याचा उपयोग रक्तातील मेद कमी करण्यास होतो.

गुग(गु)ली गोलंदाजी (क्रिकेट) हळू पण फसवी गोलंदाजी; गिरकीबाज गोलंदाजी : 'गुगुली गोलंदाजीमुळें प्रसिद्धीस आलेले ऑस्ट्रेलियन गोलंदाज...' – के ४.२.१९४१.

गुगुपंजर न. एक औषध; डोळ्यात फूल पडल्यास त्यावरील औषध : 'गुगुपंजर लिंबाचे रसांत घालून लावावें.' – अश्वप २.१२१.

गुगुळनृत्य न. धनगराचा एक नाच : 'धनगरांचा केवळ नृत्याचाच – गुगुळ नावाचा प्रकार आहे.' – मलो १९.

गुगोबर पु. विष्ठा. (झाडी)

गुग्गल पु. दक्षिणेत लिंगायतांवर बसवीत असत ते कर.

गुग्गु(ग)ळ पु. लिंगायत लोकात विवाहापूर्वी करायचा एक विधी. दोन फुटक्या मडक्यात विस्तव घेऊन मिरवणूक काढतात व नंतर ते फोडून टाकतात. (क्रि. काढणे.) (वा.) **गुगुळ काढणे –** भेद काढणे.

गुग्गु(गु–गू)ळ पु. १. एक काटेरी झाड. याच्या चिकाचा धूप करतात. हा सुगंधी असतो. हे झाड औषधी आहे. २. गुगुळाचा चीक; धूप : 'जैं घे फुलागंधाचा गुगुळु।' – ज्ञा १७.२९८. [सं. गुग्गुलु]

गुग्गुळी स्त्री. हत्तीवेल.

गुघाण पु. १. गुवाची घाण, दुर्गंध; हगीनदारी. २. (ल.) अत्यंत दुर्दशा; अनिष्टावस्था; दैना. ३. घोटाळा; गैरव्यवस्था; गोंधळ (कारभार, संसार, वस्तू इ. चा). ४. नासाडी. (क्रि. होणे.)

गुचकी स्त्री. १. उचकी. (राजा.) २. गटांगळी : 'पोहणारचि गुचक्या खातो।' – दास १७.४.४. [ध्व.]

गुचकुला वि. लहान व गोंडस; चिमुकला. (को.)

गुच्चा पु. १. भोवऱ्यावर भोवरा मारून पडलेला अरीचा खोचा. (क्रि. मारणे.) पहा : **गिच्ची.** २. (ल.) पोचा; खोचा; खोलगा. ३. बुक्का; ठोसा; चिमटा. ४. आट्यापाट्याच्या खेळातील हुलकावणी. [क. गुच्चु]

गुच्चापाणी न. मुलांचा एक खेळ.

गुच्ची–च्छी पहा : **गुच्चा** १, २, ३.

गुच्छ, गुच्छक पु. १. झुबका; गोंडा; घड; घोस; गेंद; तुरा; गोटा (फुले, फळे, पाने वगैरेंचा) : 'झाला धीर परि परिम्लान सखा जातिपुष्पगुच्छक सा।' – मोभीष्म १०.९३. २. माळ; हार; कंठा. ३. जुडी; जुडगा; जमाव. ४. गवताची पेंढी. [सं.]

गुछली स्त्री. अंगठा व करंगळी याभोवती वेढून केलेली दोऱ्याची विशिष्ट आकाराची गुंडाळी.

गुज न. गुपित; गूढ; गुप्त गोष्ट; रहस्य; मर्म (हित, निज इ. शब्दाबरोबर प्रयोग) : 'हें जीवीचें निज गुज।' – ज्ञा ४.२८. [सं. गुह्य]

गुज न. माळ; हार : 'गुजें हीं मोत्यांचीं धरित निजकंठीं सुचतुरा।' – निमा ३.७०.

गुज पु. घोड्याचा एक रोग. हा गुडघ्याला होतो. – अश्वप २.२८८.

गु(गुं)ज न. संकट; कोडे : 'मातापित्यांवर गुज पडलें।' – वसा ४३. (क्रि. पडणे.) [क. गुंजु = गुंता होणे]

गुजगुज न. हळूहळू बोलणे; कुजबुज.

गुजगुज–जे न. गुजगुज, बुगबुग वाजणारे एक वाद्य (नंदीबैलासह येणारे पांगुळलोक वाजवितात ते) : 'गुजगुजें झांझ नगारा उपांग।' – स्वादि १०.२.४६. [ध्व.]

गुजगुज–जा क्रिवि. कुजबुजत; पुटपुटत.

गुजगुजीत वि. गोंडस, सुंदर.

गुजगोष्ट स्त्री. गुप्त गोष्ट; मनातील बेत; व्यक्तिगत अनुभूतीवर आधारित प्रसन्न शैलीत वाचकांशी हितगुज करीत लिहिलेला ललित निबंध; लघुनिबंध.

गुजगौप्य वि. न. गुपित; रहस्य.

गुजणे, गुजगुजणे अक्रि. कुजबुजणे; पुटपुटणे; हळूहळू बोलणे : 'आपणपयांचि गुजावे। दुजेनवीण।' – गीता १.३००१.

गुजर स्त्री. गुजरातमधील व्यापार, उदीम करणारी एक जात. [सं. गुर्जर]

गुजर पु. कसातरी होणारा उदरनिर्वाह; जोगवण; निर्वाह. पहा : **गुजारा, गुजराण** : 'तीनशे रुपये रोजांत गुजर होत नाहीं.' – दिमरा १.६१३.[फा.]

गुजरगुंडी स्त्री. 'खेळकोटा' – (तंजा.)

गुजर(रा)णी स्त्री. दागिन्यावर रेंघोतळीने काढलेली बारीक रेघ, नक्षी.

गुजरणी स्त्री. नकासदाराचे हत्यार.

गुजरणे अक्रि. १. गुदरणे; (दिवस, काळ) कंठणे; घालविणे : 'सहाचार महिनें तियें गुजरले पुण्यास येऊनी।' – ऐपो २७४. २. नाहीसे होणे (वैभव, संपत्ती, सौंदर्य). ३. मरणे. ४. ओढवणे; येऊन बेतणे; कोसळणे. (आपत्ती, संकट). [फा. गुजर]

गुजरणे उक्रि. १. ताब्यात देणे; स्वाधीन करणे; दाखल करणे (अर्ज इ.). २. कायम करणे; अधिष्ठित करणे (हुद्दा, जागा). [फा. गुजर]

गुजरध्वनि पु. घुमून उठणारा आवाज : 'भटोबासांचा भीक्षा शब्द गुजरध्वनि घोळिला उमटे' – स्मृस्थ २१९.

गुजरवा पु. (सोनारी) दोन वाट्या जोडून तयार केलेला भोक पाडण्यापूर्वीचा मणी; भोक नसलेला मणी. (क्रि. उठवणे, करणे.)

गुजराज पु. गुह्यांचा, रहस्यांचा राजा : 'गौप्य गुजराज उमजलासे हरि' – निगा १९०.

गुजराण–णी स्त्री. १. गुजर; गुजारा; कसातरी उदरनिर्वाह; कष्टप्रद उपजीविका : 'आमची गुजराणी चालेल.' – मइसा १३.९४. २. कालक्षेप. [फा. गुझरान]

गुजराण–णी न. स्त्री. नजराणा; भेट : 'शहानशहानीं मेहेरबानगी करून श्रीमंत प्रधानास जवाहीर, घोडें, हस्ती गुजरान केले.' – मइसा ६.५०५. [फा. गुजरान]

गुजराणणे सक्रि. प्रविष्ट करणे. पहा : **गुजरणे** : 'अर्जी तजवीज करोन गुजराणिली आहे.' – मइसा ८.२०२.

गुजरात–थ पु. गुजराती भाषक बहुसंख्य असलेले भारतातील एक राज्य. (वा.) ० **रीतीने रडणे** – खोटा शोक करणे. गुजराथी बायका छाती पिटून जसा आक्रोश करतात, तसा देखावा करणे.

गुजराती मेवा रायणी हे फळ.

गुजरी स्त्री तांबडे अंग व पांढरे पट्टे असलेले लुगडे : 'पैठण्यापितांबर गुजऱ्या शालु सजेले।' – प्रला २८.

गुजरी स्त्री. पायातील एक दागिना : 'चरणीं वाळे घागरिया। वाकी वर त्या गुजरिया।' – व्यं ५६.

गुजरी वि. गुजरासंबंधी (वस्त्र, वेष इ.).

गुजरी स्त्री. गुजर स्त्री : 'डुडीवर डुडी। चाले मोकळी गुजरी।' – तुगा २८७३.

गुजरी वि. १. गोजिरी. २. (ल.) दुष्ट; वाईट : 'भाऊ ग म्हणीतो घाल बहिणीला दूधभात। भावजय गुजरी म्हणती आज म्हशीने दिली लाथ।' – झोपाळ्यावरची गाणी.

गुजरी स्त्री. १. सायंकाळचा बाजार; सराफबाजार. (कर.) २. भाजीबाजार; मंडई : 'सायंकाळ गुजरीचा समय.' – शिदि २५१. [फा. गुझ्री]

गुजरीतोडी स्त्री. (संगीत) एक राग. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

गुजस्त वि. गुदस्त; गत; झालेले. [फा.]

गुजागर पु. टांकसाळीतील धातू गाळणारा. [फा. गुदाह्]

गुजायश स्त्री. जमाव; जमवाजमव : 'स्वारांची गुजायश चहूं महिन्यात नाहीं, हे जाणून तो दसऱ्यापावेतो दोहोकडील अमका जमाव दुवाबांत उतरावयाची सबब हीच.' – ऐलेसं ४३५४.

गुजार स्त्री. आदा; सोपवणूक; देणे. (क्रि. करणे) : 'तुम्ही आपले पंचसहस्रीचा जो जमाल कराल तो मशार्निलेसी गुजार करीत जाणें.' – मइसा १५.३७५. [फा.]

गुजारत–ती स्त्री. १. मध्यस्थी (माणसाची) : 'तेंही... निळो कृष्ण यांचे गुजारतीनें विदित केलें कीं...' – इमं १३१. २. (सावकारी) कायदेशीर विद्यमानता; समक्षता; साक्ष. ३. (जमाखर्च) खर्डा, कीर्द इ. त अमुकाचे गुजारतीने (कडोन, मार्फत याअर्थी) गुजारत अमुक असे लिहितात.

गुजारत(ती)वार क्रिवि. गुजारतीसह; कायदेशीर साक्षीसह. जसे :– गुजारतवार अर्ज्या – पावत्या – तपासणी – वसूल – पट्टी.

गुजारत(ती)हाय स्त्री. अव. (सावकारी) कायदेशीर साक्ष.

गुजारा पु. १. निर्वाह; कालक्षेप; योगक्षेम. (क्रि. करणे, होणे.) पहा : **गुजराण**. २. गत; हिशेब; पर्वा; पाड. (व.) [फा.]

गुजास्त स्त्री. स्वाधीन; सोपवणूक : 'माल गुजास्त करू.' – ऐलेसं ७.३५७२. (क्रि. करणे.) [फा.]

गुजी स्त्री. कालवड; वासरी; लहान गाय; गोजी.

गुझरान, गुझार, गुझारत, गुझरी पहा : **गुजराण इ**

गुटकन–र, गुटदिशी, गुटगुट पहा : **घुटकन**

गुटक (कु) ळी स्त्री. १. गचकळी; बुचकळी; गटंगळी; पाण्यात खालीवर होण्याची स्थिती (बुडणाऱ्याची). (क्रि. खाणे.) २. लहानशी ढेकर; गुचकळी; आवंढा; घशाशी येणे. [ध्व.]

गुटका पु. १. साधू, जादूगाराने दिलेली, तोंडात धरायची गोळी; गुटिका. २. लहान गोळी (औषधाची, बंदुकीची). ३. लहानसा घोट; घुटका. [सं. गुटिका]

गुट(टि)का पु. स्त्री. लहानसे बांधीव पुस्तक, पोथी.

गुटकुला, गुटुंगा, गुटुणा वि. ठेंगणाठुसका; आखूड पण मजबूत; गड्डू.

गुटगुटीत वि. १. वाटोळा; गरगरीत. २. लठ्ठ; पुष्ट (मूल, माणूस).

गुटमळणे, गुटळणे अक्रि.१. घुटमळणे; अडखळणे; आशंकणे; गोंधळणे. २. गमणे; रेंगाळणे; कुचराई करणे. ३. धरसोड करणे; काकू

करणे. पहा : **गुपटणे**

गुट(ठ)लांवचे सक्रि. १. चोरणे; लांबवणे. (गो.) २. गुंडाळणे.

गुटली स्त्री. लहान लाडू : 'मुलींना एक एक गुटली व एक एक चहाचा कप आणून दिला.' – स्मृचि ४८.

गुटली स्त्री. १. आंब्याची कोय. २. लेंडी. (झाडी.)

गुटा–ट्या पु. १. औताचा एक प्रकार. २. बीनफासेचा व बीन जानवळ्यांचा कुळव. (वाई)

गुटांवचे सक्रि. कापसातील सरकी काढणे. (गो.)

गुटिका स्त्री. १. औषधी गोळी. २. गोटी; बैदूल. पहा : **गुटका २** [सं.]

गुटिकापात पु. चिठ्ठ्या टाकणे; नशीब पाहणे. (क्रि. करणे.) [सं.]

गुटी स्त्री. लहान मुलांना उगाळून द्यायची घरगुती औषधे. [सं. गुटिका] [क. गुट्टी = मुलांना द्यायचे औषध]

गुटी स्त्री. फळ येणारे पण फूल न येणारे एक मोठे झाड.

गुटे(ठे)ल न. सुताची गुंजडी; बिंडा. (गो.)

गुटोळा वि. गोटोळा; वाटोळा; गोट्यासारखा; गोलाकार.

गुठण स्त्री. दोन्ही गुडघ्यांवर आडवा मारलेला वार.

गुठ(ठो)ळी, गुट(टो)ळी स्त्री. १. गोळी; गोळा (गोठलेले रक्त, दुधातील-दह्यातील कवडी, आमटीतील पीठ इ. चा). २. गोळा; गाठ (पिंजलेला कापूस, कापड यांची). ३. गाठ; गळू. ४. विष्टेचा खडा. ५. कठीण भाग (पुटकुळी, स्त्रियांच्या स्तनातील). ६. बी; आठोळी. [सं. ग्रंथिल]

गुठळेबाज वि. कामचुकार; अंगचोर.

गुठा–ठे–ठो न. पु. नांगरलेली शेतजमीन सारखी करण्याचे, डिखळे फोडण्याचे; जमीन साफ करण्याचे शेतीचे अवजार (औत). [क. गुट] (वा.) **० घालणे –** १. चुरडणे; फोडणे. २. तुडवून मळणे; चुरगळणे (वस्त्र इ.).

गुठाव(वि)णे उक्रि. नांगरलेली जमीन गुठ्याने सारखी करणे.

गुठेणी स्त्री. गुठा. (कु.)

गुठेफळी स्त्री. पहा : **गुठा** (राजा.)

गुट्टी स्त्री. गड्डी; जुडी : 'छोटीशी गुट्टी तिला मुलाबाळांची मिठ्ठी।' – एहोरा कोडी ८४.

गुड पु. गूळ. [सं.]

गुड पु. १. रास; गंज-गंजी (कडब्याची, गवताची). (व.) २. बंदिस्त ढीग. (खा.) [क. गुड्ड = डोंगर]

गुडगुड–डा क्रिवि. गुडगुड, घुडघुड, गुरगुर (पोटातील गडबड, वाळलेल्या नारळातील खोबरे, शेंगेतील दाणा, गुडगुडीतील पाणी याप्रमाणे) आवाज होणारे. [ध्व.]

गुडगुडणे अक्रि. गुडगुड असा (क्व. पोटात) आवाज होणे. [ध्व.]

गुडगुडा–डे वि. अंगापासून सुटून गुडगुड असा होणारा (आवाज) पु. न. सुकलेला, आत वाजणारा नारळ; गुडगुडे. (कु.) पिकून वाळल्यानंतर फळांच्या पोटातील अंश, गर. [ध्व.]

गुडगुडी स्त्री. धूम्रपान करण्याचे, तंबाखू ओढण्याचे एक साधन; हुक्का : 'गुडगुडीचें पाणी नव्हे मंदाकिनी।' – मध्व ४९९. [ध्व.] (वा.) **० बंद करणे –** जातीबाहेर टाकणे; वाळीत टाकणे.

गुडगुडीत वि. लठ्ठ; फोफशा. पहा : **गुटगुटीत**

गुडघा पु. १. पायाच्या मध्यभागावरील सांधा; जानू; ढोपर. २. (ल.) आधार; पाठिंबा; आश्रय. [सं. घोटक] (वा.) **० देणे –** आतून फूस किंवा पुष्टी देणे; फितूर करणे; अडचण उभी करणे : 'यांनींही बदनजर धरून अष्टभयास गुडघा देऊन बखेडा करितात याप्रकारचे वर्तमान आहे.' – पेदभा २९.१६९. **गुडघे टेकणे –** गुडघे टेकून बसणे; शरण येणे. **गुडघ्यात मान घालणे, गुडघ्यात मान घालून बसणे –** १. हताश, निराश होणे, असणे. २. दु:खी असणे. **गुडघ्यावर हात देणे, येणे –** १. गुडघ्यावर हात देऊन उठणे, चालणे; म्हातारपणामुळे वाकणे. २. दमणे; त्रासणे; मट्ट्यास येणे; मरगळीला येणे.

गुडघिल्यो क्रिवि. गुडघ्यावरून अट्टी मारणे. (को.)

गुडघी–गी स्त्री. १. गुडघ्यापर्यंतची विजार; चोळणा : 'गुडगी तंग वर कांचा जी।' – सला ३८. २. गुडघ्याला होणारा एक रोग.

गुडघी स्त्री. (कुस्ती) एक डाव. प्रतिपक्षाच्या गुडघ्याच्या वाटीवर व मागून गुडघ्याच्या लवणीत आपल्या डाव्या किंवा उजव्या पायाचा जोराने ठोसा मारणे.

गुडघी(घे)मेट स्त्री. १. (बैलगाडी) रेताड जमीन फुफाट्याचा रस्ता, चढण इ. ठिकाणी बैल पुढील पायाच्या गुडघ्याने चालतात त्याला म्हणतात. २. थकवा; थकून गुडघ्यावर बसणे : 'पिकलं पिकलं जन बोलत कुठं कुठं नंदी आलेत गुडघीमेटं' – ममा ९३. (क्रि. येणे)

गुडणे अक्रि. बेताला येणे; टेकीला येणे; संमुख होणे (मरणाला). (को.)

गुडणे पहा : **गुढणे**

गुडदा पु. गुर्दा; तरवारीसारखे पाते असलेली लोखंडी गदा [फा. गुर्ज]

गुडदा पु. केसांची विशिष्ट रचना. (कर.)

गुडदा पु. बकऱ्याच्या पोटातील एक खाण्यालायक मांसाचा गोळा.

गुडदाणी स्त्री. एक मासा; तेपडी.

गुडदा(धा)णी–नी, गुडधान स्त्री. चिक्की; गुळाच्या पाकात पाकविलेले चुरमुरे, दाणे, राजगिऱ्याच्या लाह्या वगैरेची मिठाई. [सं. गुड + धाना]

गुडदावणी स्त्री. पायाने चेचणे; तुडवणी; धुस्तावणी. (कु. गो.)

गुडदा(द–धा)विणे उक्रि. चेचणे; ठेचणे; तुडविणे; अस्ताव्यस्त करणे; सुरकुत्या पाडणे; चिरडणे; चुरडणे. पहा : **गुधडणे**

गुडदी स्त्री. बूच; बोळा; दट्ट्या; दडा; झाकण (आतील पदार्थ बाहेर पडू नयेत म्हणून दौत, बाटली इ. च्या तोंडावर बसवितात ते लाकूड, काच इ. चा तुकडा). [का. गुडस = बंद करणे]

गुडदू वि. ठेंगणा आणि जाड; गड्डू; गिड्डा व लठ्ठ.

गुडबुजे न. एक वाद्य : 'गीडबीडीं सावेरी। गुडबुजीं दुटाळा।' – कृमुरा ७७.२९. [ध्व.]

गुडरा पु. झाडाभोवतीचे कुंपण. (झाडी.)

गुडवे न. उडवे; गंजी. पहा : **गुड** (गो.) [क. गुडी]

गुडशस्त्र वि. मटन खाणारा.

गुडसी स्त्री. 'झोपडी' – (तंजा.)

गुडा पु. १. गुढीपाडवा. २. गुढीपाडव्याची गुढी. (व.)
गुडाका स्त्री. आळस; निद्रा; झोप. [सं.]
गुडाकू पहा : **गुडाखू**
गुडाखू स्त्री. १. गूळ, केळी इ. मिसळून केलेली तंबाखू. २. रोगट पिकाच्या पानांवर शिंपडायचा तंबाखूचा काढा. ३. (ल.) त्रेधा; तिरपीट; दुःखपूर्ण स्थिती; दुर्दशा. [सं. गुडक] (वा.) ० **काढणे** – खरडपट्टी काढणे. ० **वळणे** – घबराट होणे : 'परंतु त्या बिचाऱ्याची आतल्या आत गुडाखू वळली.' – भदि ३९२.
गुडार न. जाजम; झोऱ्या; पालपट्टे; तंबू (लहान). [क.]
गुडाल न. केंबळाचे लहान घर; खोपट. [क. गुडलु = केंबळाची झोपडी]
गुडीगार पु. चंदनाच्या लाकडावर नक्षीकाम करणारे. (व.)
गुडीगुडी वि. गुळमुळीत. [इं. गुड]
गुडीगुप वि. कोणाला कळणार नाही असा : 'आमच्या खोलीत तिने एक गुडीगुप अशी दुसरी खोली तयार केली.' – आआशे १८०.
गुडीगूप क्रिवि. गुपचूप : '(चिमणी) गुडीगूप पंख मिटून बसली.' – गांधारी ७०.
गुडीपाडवा पहा : **गुढीपाडवा**
गुडु(डू)प वि. गडद; गर्द; दाट (काळोख) : 'एथें गुडुप अंधार पडला.' – कम ३.९३.
न. अतिशय अंधार. [क. गुडुपु = लोखंडाची कांब] (वा.) ० **निजणे** – डोळ्यांवरून पांघरूण घेऊन स्वस्थ निजणे.
गुडुंब–बा, गुडूम न. गळू. पहा : **गुळुंब**
गुडूची स्त्री. गुळवेल; गरूळ. [सं.]
गुडॉ पु. पाणी उपसण्याचे साधन; तेढा; ओकती. (गो.)
गुड्डी स्त्री. बूच; गुडदी. (गो.) [सं. गूड]
गुड्डी स्त्री. गुप्त कारस्थान; कूट; कट. (गो.)
गुड्डी स्त्री. बाहुली. [हिं.]
गुड्डुलासाव न. कारस्थान. (गो.)
गुड्डु वि. १. ठेंगणा व जाडजूड; गिड्डा. २. पत्त्याच्या खेळातला गुलाम. [का. गुड्डु = मुलगा, शिष्य, खुजा]
गुढ न. मर्यादा; आवरण : 'अधोर्ध्व गुढें काढी।' – ज्ञा १८.७३९.
गुढ न. गुडघा.
गुढगा पहा : **गुडघा**
गुढगेमिठी स्त्री. पाय दुमडून, गुडघे पोटाशी घेऊन त्यांना घातलेला हाताचा विळखा : 'पण अमीन गुढगेमिठी देऊन बसला होता.' – सीए ५१.
गुढणे, गुंढाळणे उक्रि. व्याप्त होणे : 'जी भूतीं भूतळ मांडिलें। जैसें नक्षत्रीं गगन गुढलें।' – ज्ञा ११.२८६. झूल पांघरणे; पहा : **गुंडणे, गुंडाळणे** [सं. गुंठन]
गुढन न. कापणी केल्यानंतर धांड्यांच्या कणसांसह पेंढ्या बांधणे. (व.) [सं. गुंठन]
गुढ (ढा) र न. १. हत्तीचे खोगीर; कवच : 'एक हस्ती गुढर घालीत।' – उषा ८२०. २. हौदा; अंबारी : 'रत्न–चाकें सुवर्ण गुढार। माजी शोभला लक्ष्मीवर।' – मुसभा १.६५. ३. डेरा; राहुटी; पाल : 'जैसें होति गुढरूं। अनंगाचे।।' – शिव २९०. [सं. गुड = हत्तीचे कवच]
गुढा पु. १. कंबरेभोवती वस्त्र घट्ट राहण्यासाठी खोवतात तो वस्त्राचा भाग; कनवटी. (व.) २. देवकस्थापनेच्या वेळी मंडपाला बांधलेले फडके; मुहूर्तमेढीचे फडके. ३. पताका; झेंडा.
गुढा पु. दगड.
गुढार न. परचक्राला भिऊन गावकरी लोकांनी केलेले पलायन; दंग्यामुळे पळून आलेला मनुष्यसमुदाय.
गुढार न. कोडे; रहस्य; गुह्य गोष्ट : 'तुका म्हणे तूंचि निवडी हें गुढार।' – तुगा ९३७. [सं. गूढ]
गुढार न. १. पाल; खोप; झोपडी. पहा : **गुढर.** २. पालपट्टे; हाथरी; जाजम. (कर) [क. गुडार]
गुढारणे उक्रि. १. आच्छादणे; झाकणे. २. सज्ज असणे, ठेवणे; सजविणे : 'गाढा वीर गुढारल्या निजरथीं संमूढ आरूढला।' – आविश्वायज्ञ २५. ३. कवच, वस्त्र घालून सजविणे (हत्ती) : 'त्यामागे शमदमादि। मत्तांग गुढारले योगसिद्धी।' – स्वादि १०.२.५७. [सं. गुढ]
गुढाव पु. १. गौरव. २. गुह्य.
गुढी स्त्री. १. वर्षप्रतिपदेला उभारायचा ध्वज (आंब्याचा मोहोर, लिंबाचा टाहाळा, उंची वस्त्र, गाठी व एक भांडे यासह काठीला बांधून उभारतात तो). (त्यावरून) आनंदप्रदर्शनार्थ उभारलेली ध्वजा, पताका : 'तव आत्मा उभिताओ गुढी। रोमांचमियें।' – शिव ६०. २. देवाला काही प्रश्न वगैरे विचारायचे झाल्यास गोटी, फूल, तांदूळ वगैरे चिकटवतात व प्रसाद किंवा कौल मागतात ती. [क. गुडी] (वा.) ० **उजवी देणे** – विनंती मान्य करणे; अनुकूल कौल देणे. ० **डावी देणे** – विनंती अमान्य करणे; प्रतिकूल कौल देणे. ० **उभारणे** – प्रसिद्धी पावणे; कीर्तिवंत होणे; विजय मिळवणे.
गुढी स्त्री. १. देशांतराहून आलेली मृत्यूची बातमी. २. (सामा.) बातमी; वर्तमान; निरोप : 'विजयाची सांगे गुढी।' – ज्ञा १४.४१०.
गुढी स्त्री. १. अढी; दुमड; फासा (पिळताना दोरीला पडणारा). (क्रि. पडणे). २. सुरकुती; घडी (वस्त्राला पडणारी). [सं. ग्रंथि]
गुढी स्त्री. भगत घुमू लागला म्हणजे त्याच्यापुढे गहू, सुपारी, पैसे ठेवतात ती मांड. (खा.) (वा.) ० **परजावणे** – हातात गहू घेऊन विचारलेल्या प्रश्नांना भगत उत्तरे देतो त्याला म्हणतात.
गुढी स्त्री. खोपटी; झोपडी; पाल. पहा : **गुढर, गुढार** : 'गुढ्या घालुनिया वनीं राहूं, म्हणा त्यातें।' – प्रला १९.
गुढीकारू पु. निरोप्या; जासूद : 'गुढीकारु पुढें पाठविला।' – कालिका १७.२१.
गुढीपाडवा पु. वर्षप्रतिपदा; चैत्र शु।। १; एक सण. या दिवशी गुढी उभारतात. साडेतीन मुहूर्तांपैकी एक दिवस. शालिवाहन शकाचा वर्षारंभ या तिथीपासून होतो.
गुढे न. १. गावकऱ्यांनी काढलेला पळ. पहा : **गुढार** न. (क्रि. उठणे, पळणे.) २. आपले घरदार, मालमत्ता सोडून परागंदा होणारा माणूस,

कुटुंब. ३. दुसऱ्या गावी पिके कापण्यासाठी मदत करण्याकरता निघालेली शेतकरी लोकांची टोळी. ४. जमाव. [क. गुडी = जमाव]

गुढे न. १. गूड; न मळलेल्या धान्याची पेंढी, सुडी; कवळी; मळायच्या धान्याच्या पेंढ्या. २. कापणी; काढणी.[क. गुड्डे = रास, ढीग] (वा.) **गुढ्या काढणे –** फाल्गुन अमावास्येला बी पेरून, पाडव्याच्या दिवशी ते उकरून काढून त्या वर्षी कोणते पीक चांगले येईल याचा अंदाज घेणे.

गुढे न. कोडे; उखाणा. (क्रि. घालणे, सांगणे, उकलणे.) [सं. कूट]

गुढे न. (विणकाम) वशारन झाल्यावर शिल्लक राहणारा पांजणीचा भाग.

गुढे न. सखल जागेतील पाणी उंच जागी फेकण्याकरता उपयोगात आणली जाणारी त्रिकोणी संबळीच्या आकाराची टोपली. या टोपलीला दोन्ही बाजूंना मागेपुढे दोऱ्या बांधून त्या हातात धरून पाणी वर फेकतात.

गुढेकरी पु. पळून जाऊन आश्रयार्थ एके ठिकाणी गोळा झालेला जमाव : 'खंदकावरी गुढेकरी होते त्यांनीं वस्तभाव तों गावांत लावून दिलीच होती.' – पेद २८.२६६.

गुढ्याचा पाडवा गुढे झाल्यानंतरचा, पिके कापल्यानंतरचा दुसरा दिवस. ब्राह्मणाच्या तीन मोठ्या भिक्षेच्या दिवसांपैकी एक. दुसरे दोन दिवस म्हणजे दिवाळीचा पाडवा व राखी पाडवा – राखी पौर्णिमेनंतरचा दिवस

गुण पु. १. मनोधर्म किंवा पदार्थाचा धर्म; त्यातील बल; तेज; सत्त्व; अंत:स्थित धर्म; विद्या, कला, सत्य, शौर्य इ. धर्म : 'एवं गुणलक्षण।' – ज्ञा १७.१३१. २. (न्यायशास्त्र) रूप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथकत्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द, बुद्धी, सुख, दु:ख, इच्छा, दोष, प्रयत्न, धर्म. ३. उत्कृष्टता; योग्यता; व्यंगापासून अलिप्तता; निर्दोषता. ४. उपयोग; फायदा; नफा; फल; लाभ. ५. निघालेले फल, वस्तू, परिणाम, निपज; उत्पन्न. ६. (ल.) वाईट वळण; वैलक्षण्य. ७. प्रभाव; परिणाम : 'संपत्ति हें एका तऱ्हेचें मद्य आहे, तें आपला गुण केल्याखेरीज बहुधा सोडणार नाही.' – नि ५३. [सं.] (वा.) **० आठविणे** – (मृत, गैरहजर मनुष्याच्या) चांगल्या गोष्टी स्मरणे, त्यांचा उल्लेख करणे. **० उधळणे, पसरणे, पाजळणे, पाघळणे** – स्वाभाविक वाईट, दुष्ट स्वभाव बाहेर पडणे; वाईट गुणांचे आविष्करण करणे : 'पत्र पुरते झाल्यावर सदाशिवराव म्हणाले हे आपल्या मातोश्रींनी कसे गुण उधळले पहा!' – रंगराव. **० घेणे, देणे** – पिशाच्चादी बाधा न व्हावी म्हणून देवादिकांपासून कौल घेणे, देणे. **० दाखविणे, गुणावर येणे** – खरा स्वभाव दाखवणे. **गुणा येणे** – सगुण होणे : 'गुणा आला विटेवरी। पीतांबरधारी सुंदर जो।' – तुगा ७. **० येणे, गुणास येणे, पडणे** – १. लागू होणे; फळणे; सुधारणा होणे; इष्ट परिणाम होणे. २. चांगल्या रीतीने वागणे. **गुणाची माती करणे** – सदगुणाचा दुरूपयोग करणे.

गुण पु. १. (अंकगणित) गुणून आलेले फळ; गुणाकार. २. (समासात) पट; प्रमाण; गुणाकार. जसे : – अष्टगुण = आठपट; सप्तगुण इ. : 'शतकोटि गुणे तदधिक गमला शर निकर विखरितां पार्थ।' – मोभीष्म ३.५६. ३. (अंकगणित) गुणक. ४. (भूमिती) वर्तुळखंडाची ज्या. ५. परीक्षा उतरण्यासाठी ठरविण्यात आलेले संख्यांक. ६. वधूवरांचे घटित पाहण्याचे अंक. हे ३६ असतात; वधूवरांची पत्रिका किती प्रमाणात जुळते हे पाहण्यासाठी ठरविण्यात आलेले ३६ निकष. [सं.]

गुण पु. १. दोरी; रज्जू : 'हें कर्माचें गुणीं गुंथलें।' – ज्ञा १३.११०३. २. प्रत्यंचा; धनुष्याची दोरी : 'गेला लक्ष्मण किष्किंधेतें गुण जोडुनि चापातें।' – मोरामा १.५११. [सं.]

गुण पु. (व्याक.) संधी करताना वगैरे स्वराच्या रूपात होणारा फेरफार. (इ चा ए, उ चा ओ, ऋ चा अर्, ल चा अल्) [सं.]

गुण पु. उतार; कमीपणा (रोगाचा). [सं.]

गुण पु. दिव्याची वात : 'पैं गुण ते तुला खाय।' – ज्ञा १३.७२०. [सं.]

गुण पु. तोडगा; उपाय : 'अल्लीसाहेब याचें विशेष नाहीं, रानसटवाईचा फेरा आहे. गुण करून देतों म्हणून सांगून गुण करून देऊन गेला होता.' – ऐलेसं ४०७३.

गुणक, गुणकांक पु. (गणित) ज्या संख्येने गुणतात ती संख्या.

गुणक वि. १. हिशेब ठेवणारा; गणना करणारा. २. मध्य गुणक; विशिष्ट शक्तीचे, गुणाचे मान दाखवणारा वर्ण, जात. [सं.]

गुणकथा स्त्री. १. ईश्वराच्या गुणांचे कीर्तन, प्रशंसन. २. (सामा.) गुण, ईश्वरी देणगी, स्वधर्म इ. विषयी स्तुती.

गुणकप्रमाण न. (गणित) गुणाकाराने वाढणारे संख्येचे प्रमाण. जसे:– २. ४. ८. १६ इ. प्रमाण.

गुणकर, गुणकारक, गुणकारी वि. १. गुणावह; गुण करणारे, देणारे. २. परिणामी; प्रभावी.

गुणकर वि. गुणसंपन्न; बुद्धी, सुलक्षण, सद्गुण यांनी युक्त (मूल).

गुणकला स्त्री. गुणगान. [सं.]

गुणकली–ल्ली स्त्री. पु. (संगीत) एक राग. गानसमय प्रात:काळ. हा एक भैरवप्रकार आहे.

गुणकारिता स्त्री. (वै.) उपचार म्हणून परिणामकारक असणे, प्रभावी असणे (औषध इ.).

गुणकारी वि. प्रभावी; परिणामकारी.

गुणकी स्त्री. गुंडी; बटन; बिर्डे.

गुणगरुवा वि. पु. गुणांनी श्रेष्ठ : 'गोविंद गोपाळ गुणगरुवा वो' – ज्ञागा २१

गुणगहिना स्त्री. गुणवती व रूपवती स्त्री : 'जेव्हा जिवाला वाटेल तुमच्या आतां पाहिजे गुणगहिना।' – सला ६.

गुणगंभीर वि. चांगल्या गुणांनी युक्त. [सं.]

गुणगान न. गुणांचे स्तवन, स्तुती, गायन, प्रशंसा, प्रशस्ती; गुणकथा. (क्रि. करणे). [सं.]

गुणगुण स्त्री. १. गुं गुं आवाज; गिणगिण (डास, चिलट यांची). २. हळूहळू कोंडल्याप्रमाणे, दबून, अस्पष्ट बोलणे, वाचणे. ३. कुचकुच; कुजबुज. ४. वदंता; बातमी. [ध्व.]

गुणगुणणे अक्रि. १. तोंडातल्या तोंडात म्हणणे, गाणे, आलापणे; गुं गुं करणे; मनाशीच म्हणणे. २. ओठातल्या ओठात बोलणे; अस्पष्ट उच्चार करणे; पुटपुटणे. ३. नाकात बोलणे; गेंगाणे भाषण करणे. ४. निश्चित न समजण्याजोगे, मुळमुळीत बोलणे; रोखठोक न सांगणे. [ध्व.]

गुणगुणा पु. (प्राणि.) एक छोट्या आकाराचा पक्षी.

गुणगुणा पु. नाकाचा पडदा, भाग; घोणा. धक्का लागल्यास यातून रक्त वाहते. [सं. घोणा] (वा.) ० **फुटणे –** नाकातून रक्त वाहणे.

गुणगुणीत वि. १. सानुनासिक; नाकातील. २. अस्पष्ट; गुळगुळीत; गुणगुणल्याप्रमाणे (उच्चार).

गुणगुण्या वि. १. गुणगुणणारा; हळू, आपल्याशीच गाणारा. २. नाकात बोलणारा. ३. अस्पष्ट आवाज करणारा; पुटपुटणारा. ४. अस्पष्ट; हळू; नाकातला; अनिश्चित (भाषण).

गुणगुळे पहा : **गुंडगळे**

गुणग्रहण न. गुण ओळखणे; गुणाची पारख; गुणीजनांचा आदर करणे. [सं.]

गुणग्राम–निधी–पात्र–राशी–सागर; गुणाकर, गुणाची रास, खाण वि. सर्वगुणसंपन्न; सुलक्षणी; सद्‌गुणी; अनेककलाकोविद.

गुणग्राहक, गुणग्राही वि. गुणांचा भोक्ता, चाहता; गुणांचे चीज करणारा; गुणग्रहण करणारा; दुसऱ्याचे गुण ओळखून संतोष मानणारा. [सं.]

गुणघाती वि. गुणदूषक; निंदक; हेटाळणी करणारा. [सं.]

गुणजावली स्त्री. आदर्श.

गुणठेली स्त्री. अनेक गुण जिच्यात एकवटले आहेत अशी; गुणखनी : 'सुतारुण्यें तारुण्य गुणठेली ।' – आपू १०. [सं. गुण + स्था]

गुणणिका पहा : **गुण्णिका, गुंडिका**

गुणणे उक्रि. १. (ग.) गुण्य आणि गुणक यांचा गुणाकार करणे; संख्येची पट करणे. २. पुन्हा पुन्हा वाचणे व म्हणणे; पाठ करणे; गुंडिका करणे; घोकंपट्टी करणे. [सं. गुणन]

न. भ्रमराचा गुंजारव, गुणगुणणे.

गुणतः न. क्रिवि. गुणाप्रमाणे; गुणानुरोधाने. [सं.]

गुणत्रय न. सृष्ट पदार्थांचे सत्त्व, रज, तम हे तीन गुण, धर्म. [सं.]

गुणत्रयविरहित वि. सत्त्व, रज, तम या तीनही गुणाविरहित असा (ईश्वर); निर्गुण. [सं.]

गुणदोष पु. अव. चांगलेवाईट गुणधर्म; सुलक्षणे आणि कुलक्षणे.

गुणद्रव्य न. (वै.) रंगसूत्रे व प्रथिने यांच्या संयुक्त रचनेने बनलेला गुणसूत्रांचा घटक.

गुणधर्म पु. गुणलक्षण; गुणविशेष; स्वभाव (बरा, वाईट). पहा : **गुण** १

गुणन न. गुणाकार; मोजणी; गणना.

गुणनखंड पु. (ग.) ज्या संख्येने गुणावयाचे ती संख्या.

गुणनाम न. एखाद्या व्यक्तीच्या नावाऐवजी किंवा नावाला जोडून वापरला जाणारा शब्द. उपनाव. जसे :– बालगंधर्व.

गुणनिधान, गुणनिधी न. गुणांचा साठा; गुणखनी. पहा : **गुणग्राम** : 'त्याची कन्या चिद्रत्न लावण्यागुणें गुणनिधान ।' – एरुस्व ३.४६.

गुणनियंत्रण न. एखाद्या तयार वस्तूचा,नमुना वगैरे तपासून त्याचा दर्जा, गुणवत्ता नियंत्रित करणे.

गुणनीय वि. गुणण्यास योग्य.

गुणपत्रिका स्त्री. गुण नमूद करावयाची पत्रिका.

गुणपरिणामवाद पु. त्रिगुणात्मक प्रकृतीतील गुणांच्या विकासाने किंवा परिणामाने व्यक्त सृष्टी निर्माण होते असे मत (सांख्य मत).

गुणपंचक न. आधिभौतिक वस्तूंच्या पाच मूलभूत घटकद्रव्यांचा समुदाय (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश किंवा शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श).

गुणप्राहिकता स्त्री. गुण जाणण्याची वृत्ती.

गुणभूत वि. १. गौण; दुय्यम प्रतीचे. २. वरून, पासून निघणारे; अनुकल्पित.

गुणमाया स्त्री. त्रिगुणांनी युक्त असलेली माया : 'मुळीं झाली तें मूळ माया । त्रिगुण झाले ते गुणमाया ।' – दास ११.१.९.

गुणवचन–वाचक न. गुण दाखविणारे वचन, शब्द, विशेषण.

गुणवत्ता स्त्री. १. शिक्षण, अभ्यास, अनुभव इ. मुळे प्राप्त झालेला दर्जा; गुणविशेष; श्रेष्ठाश्रेष्ठता ठरवण्याचा निकष. २. लायकी; पात्रता.

गुणवंत–वान वि. गुणसंपन्न.

गुणविशेष पु. एखाद्या वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या ठायी असलेला खास गुण; विशेषत्वाने जाणवणारा गुणधर्म.

गुणविशेषण न. (व्या.) विशेषणाचा एक प्रकार. हा नामाचे गुण दाखवतो.

गुणवेल्हाळ–ळी वि. पु. स्त्री. गुणांनी आकर्षिलेला; मोहित; परितुष्ट.

गुणवैषम्य न. गुणत्रयाचे (सत्त्व–रज–तम) विषम मिश्रण.

गुणसूत्र न. (वै.) पेशीमधील आनुवंशिकतेशी संबंधित धाग्याप्रमाणे असलेले भाग.

गुणसूत्रचक्र न. (वै.) गुणसूत्रांचे पेशीविभाजनातील बदलांचे चक्र.

गुणसूत्ररचना स्त्री. (वै.) गुणसूत्रांचे आकारमान, संख्या इत्यादी दर्शविणारा आकृतिबंध.

गुणतु–ति–ती स्त्री. गुणांची प्रशंसा. [सं.]

गुणक्षोभ पु. सत्त्व, रज, तम या गुणांचे प्रमाण विषम होणे : 'मुलींची तुझी अतर्क्य माया । तिसी गुणक्षोभ जाहला साह्या ।' – एभा ६.७६.

गुणक्षोभिणीमाया स्त्री. माया; त्रिगुणाची साम्यावस्था मोडणारी माया. मूळ मायेतील गुप्त असलेले त्रिगुण जेव्हा स्पष्ट होतात तेव्हा तिला गुणक्षोभिणी म्हणतात : 'स्पष्ट होती संधी चतुरी । जाणावी गुणक्षोभिणी ।' – दास ९.६.६.

गुणज्ञ वि. गुणग्राहक; गुण किंवा योग्यता जाणणारा; रसज्ञ; मर्मज्ञ; चहाता.

गुणा पु. १. गाडीचा कणा, आस. २. सुतार, गवंडी यांचे एक हत्यार; गुण्या; काटकोन कसा साधावा हे बघण्याचे साधन.

गुणाकार पु. १. गुणांक; गुणनाचे फळ; गणिताचा एक प्रकार; गुणकांकाने गुण्यांकास गुणणे. याचे काही प्रकार :– कोष्टकी–धावरा–बैठा–विविध–गुणकार इ. २. गुणणे; गुणाकार करणे. [सं. गुण]

गुणाची वस्तु अलंकारिक रीतीने किंवा उपरोधिक रीतीने, खेळ्या, कारस्थानी, खोडील : 'आधी चिंतोपंत गुणाची वस्तू! यास्तव बाबास विनंती केली.' – ऐलेपाम्युप्र ८८.

गुणाढ्य वि. १. गुणसंपन्न. २. एक प्रसिद्ध कवी. बृहत्कथेचा कर्ता.[सं.]

गुणातीत वि. गुणांच्या पलीकडचा; निर्गुण (ईश्वर). [सं.]

गुणात्मक वि. १. संख्यात्मक भेदापेक्षा ज्यामध्ये गुणधर्माचा भेद लक्षात

घेतला जातो असा. २. गुणांशी संबंधित; गुणविषयक.
गुणानुवाद पु. गुणांची वाखाणणी; गुणकीर्तन; प्रशंसा. [सं.]
गुणार्थ पु. (तत्त्व) गुणवाचक अथवा गुणद्योतक अर्थ; सार्थ पदांच्या वस्त्वर्थ आणि गुणार्थ या दोन अर्थांपैकी एक. [सं.]
गुणावह वि. गुण देणारे; गुणकारक; परिणामी; प्रभावी (औषधी इ.).[सं.]
गुणांक पु. १. गुणाकार; सहगुणक. ५ क्ष यात ५ हा गुणांक आहे. २. (शिक्षण) दोन व्यक्तींमधील किंवा वस्तूंमधील सापेक्ष गुणवत्ता दर्शविणारा संख्यात्मक निर्देशांक.
गुणांकन न. (शिक्षण) १. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची किंवा मिळवलेल्या गुणांची करण्यात आलेली नोंद. २. वस्तूंची वा मालाची गुणाप्रमाणे वर्गवारी करणे.
गुणांकभागोत्री स्त्री. १. गुणाकार व भागाकार. २. (व्यापक) अंकगणित; गणित.
गुणांचे, गुणपात्र लेकरू (उप.) अट्टल लुच्चा; लबाड; सोदा.
गुणांबर न. गुणस्थान; स्वर्ग.
गुणांश पु. १. गुणकारीपणा; प्रभाव; सुपरिणाम. २. फळ; यश. [सं.]
गुणि (णी) जन–लोक पु. अव. १. गायक, वादक, नर्तक वगैरे लोक (सामुदायिक); कलावंत मंडळी. २. हिंदू कलावंतिणीच्या पोटची संतती; कलावंतिणीचा पुत्र. ३. सरवजा नावाचा लोकगायक.
गुणित वि. (ग.) गुणलेले. [सं.]
गुणिया वि. गुणसंपन्न : 'तै गुणागुणिया धरावी। सरोभरी कीं।।' – ज्ञा १८.१९.
गुणिया पु. १. गारुडी; पंचाक्षरी; मांत्रिक : 'आहे गुणिया देवरसी जाणता।' – सप्र १.३३. २. गुणी; गुणवान.
गुणी स्त्री. (कृषी) ठिपरी; नाडा व मोट यांना जोडणारे लाकूड. (बे.)[क.]
गुणी वि. १. गुणांनी युक्त; शास्त्र, कला यात पारंगत; निपुण; बुद्धिवान. २. मांत्रिक; गारुडी; पंचाक्षरी : 'तुझिया कपटाची झाडणी। करावया आलों मी गुणी।' – एरुस्व १२.९५. ३. (ल.) खोडकर, द्वाड.[सं.]
गुणी स्त्री. गुरांचा मानमोडी रोग.
गुणीक वि. गुणयुक्त : 'गुणीक वोजविले असतां।' – गीता १३.१७४.
गुणे शअ. गुण शब्दाचे तृतीयेचे रूप. १. मुळे; करिता; साठी : 'तृणाचें बुझवणें। आंदोळें वारेन गुणें।' – ज्ञा १३.५७०. २. आश्रयाने : 'कोठें तरी देउळाच्या गुणें। देव पहा।' – दास १७.१.१२. [सं. गुण]
गुणेस्त वि. सद्‌गुणी. (गो.)
गुणोत्तर न. १. (ग.) संख्यांची, दोन परिमाणांची पट, हिस्सा, प्रमाण; दोन संख्यांचा केलेला भागाकार किंवा भागाकाराने केलेली दोन संख्यांची तुलना. २. (ग.) दोन गणिती संख्यांमधील विशिष्ट प्रकारचा संबंध; परिमाण, संख्या अथवा आकार यांच्या बाबतीत दोन अथवा अधिक वस्तूंचा तुलनादर्शक संबंध. [सं.]
गुण्णिका स्त्री. आठवण राहण्यासाठी पुन्हा पुन्हा वाचणे, म्हणणे; घोकंपट्टी.
गुण्य न. जिला गुणायचे ती संख्या.
वि. गुणण्यास, गणण्यास योग्य. [सं. गुण् = मोजणे]
गुण्या पु. काटकोन्या; सुतार, गवंडी यांचे काटकोन बघण्याचे साधन. पहा : **गुणा**
गुण्यागोविंदे, गुण्यागोविंदाने क्रिवि. १. शांततेने; भांडणतंटा न करिता; मुकाट्याने; आनंदाने; स्वेच्छेने. २. मोठ्या स्नेहाने, ममतेने : 'गुण्यागोविंदें मला दहा वेळ पलंगावर पालवा।' – प्रला. ३. चांगल्या प्रकाराने, रीतीने.
गुण्यांक पु. (ग.) जिला गुणायचे असते ती संख्या. [सं.]
गुतका पु. गुंता; अडचण.
गुतका–गा, गुता पु. गुत्ता; मक्ता (विक्री, पुरवठा वगैरेचा) (को. गो.) : 'पाच सात हजार रुपये तूर्त... व सत्तावीस हजार.. येथील बाबतीचा गुतका जाला होता.' – पेद १०.५८; सर्व तऱ्हेचे मालकीहक्क.
गुतकुली पहा : **गुदगुली** : 'तंवं तंवं गुतकुलियां होती।' – शिव ६६६.
गुतके(गे)दार पु. मक्तेदार. (गो.) [क. गुत्तिगे = करार]
गु(गुं)तणे अक्रि. १. एकमेकात गुरफटले जाणे (दोरा); अडकणे : 'सूत सूतें गुंतलें।' – ज्ञा १८.१३०६. २. गुरफटणे; गुणफाटणे; अडचणीत सापडणे; मोकळेपणा खुंटणे. ३. गुंग असणे; गढून जाणे; अडकणे (कामात, उद्योगात – मनुष्य, पशु, वस्तू, जागा). ४. फसणे. [सं. ग्रथन] (वा.) **गु(गुं)ता काढणे –** अडचण दूर करणे; प्रश्न सोडवणे : 'एवढा गुता काढलास का मंग झालंच तुजं काम.' – पेरणी १४९.
गु (गुं) तवळ स्त्री. १. केस विंचरताना गळालेल्या केसांचा (गुंतवळांचा) गुजडा, समुदाय. २. (अव. प्रयोग) (ल.) तुरळक, थोडे वाढणारे खुंट. पु. १. डोक्याच्या केसातून गळलेला केस; गुंतवळीपैकी केस. २. गुंतागुंत (केस, दोरी इ. ची).
गुतविणे उक्रि. (ल. व शब्दश:) गुरफटविणे; गोवणे; अडकविणे.
गुता पु. दिवसाचे नेमलेले काम. (झाडी)
गुतापणे अक्रि. गुंतणे : 'उद्या आनि ह्याच कामात मला गुतापून पडावं लागलं.' – ऊन ७२. (वा.) **गुतापून जाणे –** एकमेकात मिसळणे; गुंता होणे : 'कोट होते, इजारी होत्या, सगळं होतं. एकमेकात गुतापून गेलं होतं.' – वळीव ४४.
गुतापा पु. गुंता : 'एक गुतापा बसावा नि आडकून पडावं...' – रैत ४१.
गुतामूत पहा : **गुंतागुंत**
गु(गुं)ताव, गुंतावा पु. १. गुंतविण्याचे साधन; बंधन. २. करार.
गुती स्त्री. गुंता; तंटा.
गुत्ता–त्ती पु. स्त्री. १. मक्ता; ठेका. पहा : **गुतका.** २. अड्डा; ठिकाण. ३. (ल.) (त्यावरून) दारूचे दुकान (मक्त्याने घेतलेले). ४. पहा : **गुता, गुंता** [क. गुत्तिगे = करार]
गुत्ता, गुत्तापा पु. गुंता; गुंतवळ : 'कुसुंब्या पागुट्याचा वाऱ्यानं झाला गुत्ता।' – जामो २८२; 'गुत्तापा आनी कसला हुतोय?' – रैत १०.
गुत्ती स्त्री. जाळे; सापळा : 'जवाहिऱ्या सरदार सश्याप्रमाणे गुत्तीत पकडला.' – राले २१६.
गुत्वा पु. मासे पकडण्याचे जाळे. (झाडी).
गु(गुं)थणे अक्रि. (प्रा.) पहा : **गुतणे.** १. ओवणे; गुंफले जाणे : 'देह तंव पांचांचें जालें। हें कर्माचें गुणी गुंथलें।' – ज्ञा १३.११०३.

२. अडकून पडणे; गुंतले जाणे.
उक्रि. ओवणे; माळ करणे; गुंफणे. [सं. ग्रथन]

गुथवागुथव स्त्री. (सामा.) गुंतागुंत; गोंधळ; गुंताडा. [गुथणेचे द्वि.]

गुद पु. अपानद्वार; पंचकर्मेंद्रियांपैकी पाचवे इंद्रिय; गांड; बोचा; मलद्वार : 'गुदमेंढाआंतौती। चारी अंगुळें निगुतीं।' – ज्ञा ६.१९५. [सं.]

गुद, गोद पु. हाडांच्या नळीतील द्रवपदार्थ, चरबी.

गुदगसाळ स्त्री. साळीचा एक प्रकार. (बे.) [क. गुदग = जाड]

गुदगुद–दा क्रिवि. खतखता (कढ, ऊत याच्या ध्वनीप्रमाणे). पहा : **गदगद, गदगदा**

गुदगुद–दी–ली स्त्री. १. (ल.) संतोषणे; हर्ष; आनंद; सुख; आनंदाची उकळी. २. कंड; आग; खाज (फोड, उष्णता इ. मुळे होणारी). ३. (ल.) फुरफुरी; सुरसुरी; कंडू (लढाई, भांडणतंटा इ. ची). (क्रि. मोडणे, जिरवणे.)

गुदगुदणे अक्रि. १. कढ येणे; खदखदणे (पदार्थ कढताना, ऊत येताना). २. कंड, खाज सुटणे (शरीर, अवयव यांस). [ध्व. गुदगुद]

गुदगुदली स्त्री. गुदगुली.

गुदगुली स्त्री. पोटाला, काखेत वगैरे बोटांनी हळुवार स्पर्श केल्यामुळे येणारे हसू, होणारा आनंद. (क्रि. करणे, येणे, सुटणे, वाटणे). पहा : **गुदगुद.** (वा.) **गुदगुल्या होणे –** मनातून संतोष वाटणे; मनातल्या मनात आनंद होणे.

गुदड पु. गाळसाळ, टाकाऊ रेशीम.

गुदडणे, गुदडा पहा : **गुधडणे, गुधडा**

गुदडा पु. गुडघा.

गुदद्वार न. गुद; अपानद्वार.

गुदभ्रंश पु. शौचाच्या वेळी अंग बाहेर येणे (अशक्ततेमुळे); एक रोग.

गुदम(मा–मु)रणे अक्रि. १. कोंडमारा होणे; दम, श्वास कोंडणे; श्वास बंद झाल्यामुळे घाबरणे; घुसमटणे. २. उबगणे; उकडणे (उन्हाने); गदमदणे; उकाड्याने जीव कासावीस होणे.

गुदम (मा) रा पु. कोंडमारा; जीव घाबरा होणे; कासाविसी; श्वासावरोध. (क्रि. करणे, होणे.)

गुदमस्ती स्त्री. मग्रूरपणा; शिरजोरी; उद्धटपणा; दांडगाई : 'त्यानें आपल्या गुदमस्तीनें हातची भाकरी घालविली.' – विक्षिप्त ३.९१.

गुदमैथुन न. अनैसर्गिक संभोग; गांड मारणे.

गुदरणे अक्रि. पहा : **गुजरणे**
उक्रि. प्राप्त होणे; ओढवणे (संकटादी). [सं. गुर्द]

गुदरणे सक्रि. १. (फिर्याद, तक्रार इ.) दाखल करणे : 'आगरकरांवर अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरायची तयारी करू लागली.' – दुर्दम्य २५३. २. हजर करणे : 'जरूर तितके महार कामावर आणून गुदरतात.' – गांगा ३४. [हिं. गुदरना]

गुदरणे अक्रि. १. लेपाटणे; बरबटणे; लिडबिडणे. (राजा.) २. (ल.) (दुर्गुणांनी, दुर्वर्तनांनी) कलंकित होणे; काळिमा लागणे. ३. काळजीग्रस्त होणे; गुंतणे; अडकणे (संसारात). [हिं. गुदरना]

गुदराण–णी न. स्त्री. पहा : **गुजराण–णी.** उपजीविका; निर्वाह; कालक्षेप : 'आणखी मास–पक्ष गुदराण करायाचे.'– ऐलेसं ७.३६१६. [फा. गुजरान]

गुदरोग, गुदांकुर, गुदार्ष पु. मूळव्याध.

गुदलना क्रि. आंबा मऊ करणे. (झाडी)

गुदलवला वि. मऊ केलेला आंबा. (झाडी)

गुदव्रण न. भगेंद्र.

गुदस्त–स्ता वि. १. मागचे; गत (वेळ, महिना, वर्ष). २. झाली गेलेली; होऊन गेलेली (गोष्ट). [फा. गुजस्ता]

गुदस्तबाकी स्त्री. (बंद केलेल्या खात्याची) राहिलेली बाकी.

गुदाज्गर पहा : **गुजागर**

गुदाम पु. वखार; तळघर; कोठार; माल, अडगळ साठविण्याची जागा. [पोर्तु. गुदांव]

गुदाम पु. (शिंपी) गुंडी; बटण.

गुदारा पहा : **गुजारा**

गुदारा पु. उकिरडा : 'तल्हाते भालि हाणौनि (विषयांचा) गुदारा करी : एरीसवा' – मूप्र २४६७.

गुदाळी स्त्री. प्रदक्षिणा; आंदाळी गुंदाळी = स्वत:भोवती गरगर फिरण्याचा मुलांचा एक खेळ. (गो.)

गुद्दलपेंडी स्त्री. वज्रमुष्टीचा खेळ.

गुद्दा पु. मुष्टिप्रहार; ठोसा; बुक्की. (क्रि. देणे, मारणे, लगावणे.)[क. गुद्दु]

गुद्दा पु. खणाळे; खणाचा तागा.

गुधडणे उक्रि. १. गुधड्या घालणे; पायाने तुडवणे; चोळामोळा करणे; चिरडणे; उलथापालथ करणे. २. (धसमुसळेपणाने, अव्यवस्थितपणे वापरून) खराब करणे; मळविणे; नासणे (कापड, वस्तू); ३. दामटणे; खुंदळणे; दपटणे (जनावर).
अक्रि. धुडगूस घालणे; दांडगाई करणे. [क. गुद्द]

गुधडा, गुधवडा पु. १. धुडगूस; चोळामोळा, धसफस. २. दांडगाई. (क्रि. करणे, घालणे, मांडणे.) ३. खुंदळणी; दामटणी; (फार कामाने झालेली) खराब स्थिती.

गुधाडी स्त्री. उकिरडा; घाण. (व.) पहा : **गुखडी**

गुना पु. १. सुरत; चेहरा; रंग. २. भार; जबाबदारी; पुढारीपणा : 'सर्व मसलतीचा गुना तुम्हांवर आला आहे.' – मइसा १२.७९.[फा. गूना]

गुनिया पु. गवंड्याचे हत्यार. (झाडी) [फा.]

गुनागोठी स्त्री. गुजगोष्टी : 'मग ते गुनागोठी कराय लागलं.' – आलो ४४.

गुनी वि. उपयुक्त.

गुन्यांव पहा : **गुन्हा** (गो.)

गुन्यांवकार वि. गुन्हेगार.

गुन्हा–ना पु. अपराध; अन्याय्य वर्तणूक; कायद्याचे उल्लंघन.[फा. गुनाह]

गुन्हापत्र न. दंडपत्र.

गुन्हेगार वि. अपराधी; दोषी; गुन्हा करणारा. [फा.]

गुन्हेगारी स्त्री. १. गुन्हा, अपराध करणे; कायद्याचे उल्लंघन करणे. २. दंड

(अपराधाबद्दल गुन्हेगाराकडून घेण्यात येणारा). ३. दंडापासून सरकारला होणारे उत्पन्न. [फा.]

गुन्हेगारीशास्त्र न. (समाज.) गुन्ह्यांचा, गुन्हेगारी वृत्तीचा, वर्तणुकीचा शास्त्रशुद्ध अभ्यास.

गुप, गुपचिप, गुपचुप–चूप क्रिवि. १. निमूटपणे; मुकाट्याने; हलकेच; निवांत. २. चोरून; लपून; नकळत. [सं. गुप, गुंफचुप]

गुपका पु. मारलेल्या जागेवर फिरेल असा भोवरा फेकणे.

गुपचीप न. दुधावरील साईच्या मिठाईचा एक प्रकार.

गुपचीपच्या वड्या साखरपाकाच्या वड्या. (व.)

गुपटणे अक्रि. १. बोलताना अडखळणे. २. धरसोड; कां कू करणे. ३. घोटाळणे; गोंधळणे; सुचेनासे होणे. [सं. गुप् + पट]

गुपट(त)मार–रा, गुपट(त)घाला बाहेर दृष्टोत्पत्तीस न येणारे दुःख; छपलेले, छपवावे लागणारे दुःख.

गुपित वि. गुप्त; लपवलेले.
न. गुप्त गोष्ट.

गुपित घाला – मारा पहा : **गुप्त घाला – मार**

गुपिस्त क्रिवि. गंजिफातील एक संज्ञा.

गुप्त वि.क्रि.वि. १. गुपित; अगोचर; दडवलेले; लपवलेले; चोरटे. २. संरक्षित; राखीव. ३. गूढ. (क्रि. ठेवणे, राखणे, होणे.) कोणालाही न कळेल असे. [सं. गुप् = १. रक्षण करणे. २. निष्ठा]

गुप्तखेचर पु. गुप्तपणे हिंडणारा.

गुप्तगोई स्त्री. गुप्त संभाषण; गुप्त चर्चा : 'दरम्यान गुप्तगोई झाली.' – आंघइ १४. [फा. गुफ्तगो]

गुप्त घाला–मार–रा १. गुपित घाला, मार; गुप्तपणे नाश, अपाय, छळ (मंत्र, कलह, मर्मभेद करणारी, चीड आणणारी भाषा इ. नी). २. एकदम, चोरटा घाला–हल्ला करणे (भूत, आजार, चोर, शत्रू यांनी). (क्रि. घालणे, मारणे, करणे, पडणे.)

गुप्तचर पु. एखाद्याला कळू न देता त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवणारा, वेषांतर करून हवी ती माहिती काढणारा; हेर : 'त्याच्या पाठलागावर असणारा तो गुप्तचर होता.' – स्मगा १९.

गुप्तचर विभाग आपण पोलिस खात्यातले आहोत हे कळू न देता गुन्हा शोधण्याचे काम करणारा पोलिस खात्याचा विभाग : 'पोलिसांकडून चौकशीचे काम काढून घेऊन गुप्तचर विभागाकडे ते प्रकरण सोपविले गेले आहे.' – ग्रामा १७५.

गुप्तदूत पु. हेर; गुप्तपोलीस; गुप्त रूपाने बातमी पुरवणारा; गुप्तचर. [सं.]

गुप्तधन न. १. जमिनीत पुरून ठेवलेले द्रव्य. २. (ल.) तप, विद्या, ज्ञान, गुण, चातुर्य, शहाणपणा इ. प्रत्यक्ष न दिसणारे धन.
वि. (ल.) विद्या, ज्ञान, चातुर्य यांनी युक्त (माणूस). [सं.]

गुप्तभाग पु. गुह्याग; ढुंगण किंवा पुढला भाग; गुह्य भाग. [सं.]

गुप्तरोग पु. (वै.) लैंगिक संबंधामुळे गरमी, परमा यांसारखा जननेंद्रियांना होणारा रोग.

गुप्तवार्ता केंद्र शत्रूच्या किंवा समाजद्रोही व्यक्तींच्या हालचालींविषयी हेरामार्फत माहिती गोळा करणारे केंद्र.

गुप्तहेर पु. शत्रूची किंवा प्रतिपक्षाची माहिती गुप्तपणे मिळवणारा माणूस.

गुप्ताऊ वि.क्रिवि. गुप्त; अप्रकटपणे : 'आन गुप्ताऊ माणूस दरम्यान आहेत त्यासी सांगोन वर्तमान आणवितों.' – पेदभा २७.८३.

गुप्तिया पु. हेर : 'मग गुप्तिये धाडू म्हणितले।' – रुस्व १७.

गुप्ती स्त्री. एक शस्त्र. हे बहुधा काठी, दंडुका, छत्री, कुबडी यांसारख्या वस्तूत लपवलेले असते. बाह्यरूपावरून आत शस्त्र असल्याचे लक्षात येत नाही : 'गुप्ती भाले असिलता।' – नव १२.१७१. [सं. गुप्त]

गुप्प क्रिवि. हळूच; नकळत. पहा : **गुप**

गु(गुं)फ स्त्री. गुंतवळ (शेंडी, वेणी, केस इ. ची). [सं.]

गु(गुं)फ(फा)टणे पहा : **गोफाटणे**

गु (गुं) फा स्त्री. १. लताकुंज; पर्णकुटी; फांद्यांची बनवलेली झोपडी : 'ऋष्यशृंग अति विकळ। आला तत्काळ गुंफेसी।' – भारा बाल २.१२. २. गुहा; दरी.

गु(गुं)फा स्त्री. गुंतागुंत : 'आवडीचा मंत्र सांगितला सोपा। जेणें नोहे गुंफा कांहीं कोठें।' – तुगा ४८७.

गुफेद पु. हलव्याचा एक प्रकार. (गो.)

गुफ्तार स्त्री. गोष्ट; भाषण; बोलण्याची तऱ्हा. [फा.]

गुबकणे उक्रि. कुदलणे; थकवणे; कुटणे; मारणे. पहा : **गवका**

गुबगुबणे अक्रि. लठ्ठ, जाडजूड होणे; फोपशा होणे. शरीरावरील चरबीची अधिक वाढ होणे. [सं. गुर्व] [का. गुबरु = जाड्य]

गुबगुबी स्त्री. गुब गुब असा आवाज करणारे चर्मवाद्य; डमरू : '(नंदीबैलाकडून होरा वदवितात) त्या वेळी ते गुबगुबी व घड्याळ वाजवितात.' – गांगा ८४.

गुबगुबीत वि. १. लठ्ठ; जाडजूड; मांसल; गुटगुटीत; गबदूल (माणूस, पशू). २. चांगले; भरदार (फळ). पहा : **गबगबीत** [अर.घबघब]

गुबडे, गुबी न. स्त्री. ढुंगण; कंबरडे. (व.)

गुबदार वि. भरगच्च; दाट.

गुबदुल वि. लठ्ठ; गुबगुबीत : 'पण दिवसेदिवस मांजर सुकू लागले. आणले तेव्हा कसे गुबदुल होते.' – स्मया २४६.

गुबर न. भ्रम.

गुबार गभर; एक प्रकारची तोफ : 'तोफांची व गरनाळांची गर्भछाट तोफा गुबारा समागमे होत्या त्यांची मार दिल्ही.' – मशियांका ४८०.

गुबार पु. १. मळ; धूळ : 'दिलांतील गुबार झाडून निघोन प्रांजळ व्हावें.' – मइसा ५.७५. २. संशय : 'बोलण्यांत कोणत्या गोष्टींचा पडदा व गुबार राहिला नाहीं.' – ऐलेसं ९.४.८४२. [फा.]

गुबा(भा)र–रा पु. १. अंतर्दाह; दुःख; तोंड बंद पण आत पू असलेली जखम. २. पोटात वारा धरणे; पोट गब्ब होणे; पोटाचा फुगारा, तटतटी, तणावा, फुगवटी (वायूमुळे). [सं. गुर्ब] [क. गुबरु]

गुबा(भा)र–रा पु. १. गुप्त द्वेष; मत्सर; हेवा. २. गुंगारा. (वा.) **० देणे –** पळून जाणे; गुंगारा देणे : 'त्यांनी मौन स्वीकारले. सोन्याने तर गुबाराच दिला.' – भदि १८०.

गुबा(भार)र–रा पु. १. ढगांचा जमाव. २. पाण्याचा संचय. (क्रि. धरणे.)

गुबा (भार) र–रा पु. ऊन; उष्णता; ताव; उष्णतेने होणारी स्थिती. (क्रि. देणे, घेणे.)

गुबारणे अक्रि. लढणे; कष्ट करणे : 'कोट पठाणाने कबज केला आहे. काही गुबारून मिळाला नाही.' – श्रीयो २.३५३.

गुबारणे अक्रि. आतील उष्णतेने कासावीस, घामाघूम होणे; उबगणे; फुगणे.

गुबारा पु. १. गोळे उडविण्याची तोफ; गरनाळ; गडगोळ. २. (दारूकाम) आकाशात उडविण्याचा दिवा, कंदील. यात स्पिरिटचा धूर किंवा साधा दिव्याचा धूर कोंडतात. ३. फुगा; वाताने फुगणे. [फा.]

गुबाल्या काढणे पिच्छा पुरवणे. (व.)

गुबी स्त्री. ढुंगण.

गुबीपिचकी स्त्री. औषधी ट्यूब (झाडी).

गुब्बा पु. भोवऱ्याच्या खेळात ज्याच्यावर डाव आला असेल त्याच्या भोवऱ्यावर आरीने मारलेला घाव.

गुब्रा वि. गुबगुबीत : 'हात तुझा तो गोंडस गुब्रा।' – ध्रुपद ३२.

गुम क्रिवि. शांतपणे; स्वस्थपणे; मुकाट्याने. (क्रि. बसणे, असणे.)[फा.]

गुम क्रिवि. चुकलेल्या, हरवलेल्या स्थितीत.
वि. नष्ट; हरवलेले; चुकलेले. (क्रि. होणे.) [फा.]

गुम न. टेंगूळ; फुगवटा; गुबारा. (व.) [हिं. गूमडा]

गुमकट पु. चाकाच्या तुंब्याला बसविलेल्या दोन्ही बाजूंच्या लोखंडी पट्ट्या. (बे.)

गुमगुम स्त्री. वदंता; वार्ता; बातमी; कुणकुण. [ध्व.]

गुमगुमीत पहा : **गुबगुबीत**

गुमज–ट–ढ पु. थडगे; मुकबरा. पहा : **घुमट** : 'नंतर सर्वत्रांनीं जाऊन माती दिली आणि गुमजही बांधिला.' – पया ४००.[फा. गुंबज – द]

गुमजा पु. (शोभेची दारू) स्वत:भोवती गरगर फिरणारे दुतोंडी बाण.

गुमटी स्त्री. वर घुमट असलेले अगदी छोटे देऊळ.

गुमठा–डा पु. पखवाजाच्या, मृदंगाच्या खोडाचा मधला फुगीर भाग. [हिं. गुमडा = उंचवटा]

गुमणे उक्रि. हरवणे. (खा.) [हिं. गुमाना]

गुमनघुसक्या वि. १. मुखस्तंभ. (माण.) २. (ल.) कपटी.

गुमर स्त्री. किल्मिष; किंतू : 'गतवर्षी निखालसता दिसत नाहीं. न कले काये मनांत गुमर आहे.' – पुद १.१३३.

गुमराइ स्त्री. गर्व : 'नासरजंग तारुण्य, फौज, तोफा व रिसाला बहूत यांजमुळे गुमराई वसत होती.' – हिंद खंड १.२२.

गुमशूद वि. (पत्रव्यवहार) गहाळ; हरवलेले; नष्ट झालेले : 'सनद गुमशूद झाली म्हणौनु इस्कील न करणें.' – मइसा २०.३५५. [फा.]

गुमा पु. मक्ता (जमिनीचा). (को.)

गुमा पु. एक फळ; तुंबा : 'ह्याला (तुंब्याला) शेतवड, शेतकुंभा व गुमा अशी ही नावे आहेत.' – फचि १०३.

गुमान न. १. मौन, मुक्काट : 'आता राखतां गुमान भलें बाई वो।' – तुगा १.३८०. २. घुमेपणा.

गुमान क्रिवि. मुकाट्याने; निमुटपणे. (कर.) पहा : **गुम**

गुमान वि. तृप्त; थंड; गप्प; शांत.

गुमान पु. १. पर्वा; खातर; क्षिती; खिजगणती. (क्रि. नसणे, धरणे, करणे.) : 'एकमेकां गुमान। न धरिती पैं।' – सिसं ३.१०९. २. वहीम; संशय; किंतू : 'श्रीमंताकडील सूत्र आलीजाहाकडे असेल ऐसा गुमान येथें आहे.' – मइसा ५.५३. [फा.] (वा.) **गुमानात ठेवणे, राखणे –** मोघम, अनिश्चित ठेवणे; स्पष्ट न करणे, न सांगणे.

गुमान पु. १. गर्व; ताठा : 'उदास वृत्तीच्या गुमानें। उठोन जातो।' – दास १५.२.१८. २. आधिक्य.

गुमान पु. विचार; मत.

गुमानी वि. १. अहंकारी; गर्विष्ठ; बढाईखोर : 'धरूं धाविला निर्दयत्वें गुमानीं।' – किंद्रौपदी ११. २. बेगुमान; बेपर्वा; बेफिकीर.

गुमानी स्त्री. संशय : 'तेव्हां त्यांस सरकारचा आश्रा अशी गुमानी येऊन...' – मदरू २.१३७.
वि. संशयी; संशयित.

गुमानीत न. गुह्य. (गो.)

गुमास्त(स्ते)गिरी स्त्री. १. गुमास्त्याचे काम; मुतालिकी; एजंटाचे काम. २. प्रतिनिधित्व : 'नामाजी लांडा पुणेहून गुमास्तगिरी देऊन कार्यात मावळास पाठविला.' – इंम ५६.

गुमास्ता पु. १. मुनीम; प्रतिनिधी; मुखत्यार; कारभारी; अडत्या; बातमीदार; मुतालीक : 'प्रधान यांचे गुमास्ते व आमात्याचे वगैरे यांणीं काम तूर्त करावें.' – मराचिस ८. २. (कायदा.) कोणत्याही व्यवहारात प्रतिनिधी म्हणून मोबदला देऊन नेमलेला मनुष्य, एजंट. ३. (वतन कायदा) वतनी नोकरीचे काम करण्याकरिता नेमलेला बदली इसम.
वि. पाठविलेला. [फा. गुमाश्ता]

गुमास्ता कायदा दुकानातील नोकरवर्गाचे कामाचे तास, वेतन इ. संबंधीचा कायदा.

गुरकणी स्त्री. १. गर्जना; गुरगुर; डुरकावणी (हिंस्रपशूंची). २.माणसाने तसा केलेला आवाज. ३. (ल.) धमकी; रागाचे बोलणे. [ध्व.]

गुरकणे, गुरकाव(वि)णे उक्रि. १. गर्जना करणे; गरजणे; गुरगुरणे; डरकाळी फोडणे. २. भेडसावणे; धमकावणे; आरडाओरडा करून दबविणे; धाक दाखविणे; डोळे वटारणे. [सं. गृ = शब्दे] [ध्वनि.]

गुरका पु. रागाचा झटका; घुस्सा. (क्रि. येणे.)

गुरका–क्या वि. गुरकावणारा; अरेराव; दांडगा; मोठ्याने आरडाओरड करणारा; खमक्या; मस्त.

गुरकावणी स्त्री. दुसऱ्याने घाबरावे, दबले जावे म्हणून गुरकणे; डोळे वटारणे; धमकावणी; डरकावणी.

गुरकी, गुरकाई स्त्री. १. गुरकणी. पहा : **गुरकावणी.** २. डोळे वटारणे; रागाने पाहणे.

गुरखा पु. नेपाळचा रहिवासी.

गुरखी पु. गुरे राखणारा; गोवारी. पहा : **गुराखी** [सं. गोरक्षक]

गुरखीटाळा पु. (चर्मकार) टाळ्याच्या वरच्या चामड्याचा भाग.

गुरग (गु) टणे, गुरंगुटणे उक्रि. शरीर अवगुंठित करणे, कपड्याने झाकणे; गुरफटून घेणे; बुरखा घेणे; सर्व अवयव झाकतील असे पांघरूण घेणे.

गुरगु(गू)ज पु. १. गदा; लोखंडी सोटा. २. फकिराजवळ असणारी (साखळ्या लावलेली) लहान गदा. हिने तो स्वत:ला मारून घेऊन भिक्षा मिळवितो. [फा. गुर्ज]

गुरगुटी स्त्री. गुंडाळी. (क्रि. करणे.)

गुरगुटीत, गुरगुट्या, गुरगुऱ्या वि. मऊ (भात) : 'तूपमेतकुटाचा गुरगुटीत भात आपण तिला देत आहोत.' – रथ १३९.

गुरगुडी, गुर्गुडी पहा : **गुडगुडी** : 'आधी लागे सवय बिडिची मागुनी गुर्गुडीची ।' – अर्वाचीन ३८८.

गुरगुर–री स्त्री. १. आरडाओरडा; टुरटुर; डुरडुर; गुरकणी. २. पोटातील, घशातील घरघर आवाज.

गुरगुर–रा क्रिवि. १. गुरगुरत; गुरकावीत. २. टुरटुरत; कुरकुरत.

गुरगुरण–णी स्त्री. गुरकणी; घुरघुरणे; गुरगुरणे.

गुरगुर(रु)णे अक्रि. १. गुरगुर करणे; घुरघुरणे; गुरकणे; गुरकावणे; अंगावर येणे : 'अपमान असा करितां पाहे तो वीरसिंह गुरुगुरुनी ।' – मोउद्योग १२.६०. २. मांजराप्रमाणे ओरडणे; म्यांव करणे. ३. (पोटात) गुरगुर आवाज होणे. ४. (घशात) घरघर आवाज होणे. ५. क्रोधाविष्ट होणे. अरेरावी करणे. [क. गोर्रु = पोटात होणारा आवाज]

गुरगुराट पु. अतिशय मोठा गुरगुर आवाज; एकदम सर्वांची गर्जना.

गुरगुरावणे अक्रि. १. गर्जना करणे; अंगावर ओरडणे (माणसाच्या). २. डोळे वटारणे; धमकावणे.

गुरगुरीत वि. १. टवकारलेले; वटारलेले; गुरकावणारे (डोळे). २. फुगलेली; वर उचलून आलेली (पुरी, पोळी, भाकरी, गुरोळी). ३. फुगलेले; सुजलेले (शरीरावयव).

गुरगून, गुरदा पु. साखळ्या लावलेला सोटा; गदा; भिक्षेकऱ्याचे हत्यार. पहा : **गुरगूज**

गुरघुस स्त्री. घूस व मांजर यांची गर्जना; गुरम्यांव.
क्रिवि. गाढ; शांतपणे; घोरत (झोप). (क्रि. करणे, निजणे.) [ध्व.]

गुरचरण स्त्री. १. गायरान; गुरे चारण्याची जागा; गोपचार. २. त्याबद्दल दिलेले पैसे.

गुरचराई स्त्री. चरणावळ, गुरे चरण्याच्या परवानगीबद्दल कुरणाच्या मालकाला दिलेला पैसा.

गुरज पु. गुर्ज; गदा. [फा.]

गुरजी स्त्री. कुत्र्याची एक जात. [का. गुर्ज = लांडगा]

गुरठाण न. गुरे बांधण्याची जागा.

गुरथळ–ळी स्त्री. १. चेंदामेंदा; चुरगाळा; गुधडा. पहा : **गुधडणे** २. (सामा.) अव्यवस्था; गोंधळ. (क्रि. घालणे, लावणे, मांडणे.)

गुरदंड पु. (चारणीकरिता) डोंगरावरील गुरे जाण्याचा मार्ग.

गुरदा पु. गदा; पहा : **गुरगूज** [फा. गुर्ज]

गुरदा पु. मूत्रपिंड. [फा. गुर्दा]

गुरदा पु. पातळ वाटोळी चपाती, आरोळी.

गुरप (फ–फा) टणे उक्रि. १. गुंतागुंत होणे, करणे; गुंतवणे; जाळ्यात सापडणे, अडकणे (दोरा, पदार्थ इ. फेऱ्यात). २. गळफटणे; गोंधळणे; भांबावणे. ३. गहाळ होणे, करणे; गमावणे.[सं. गुर + पट्=विदारणे]

गुरप (फ–फा) टा पु. घालमेल; गोंधळ; गळफटा; गुंतागुंत; अव्यवस्थित घालमेलीची, गडबडलेली स्थिती (वस्तू, माणूस इ. ची). (विशेषत: अलंकारार्थी पंचमी विभक्तीत योजतात. जसे :– गुरपट्यात पडणे).

गुरबी स्त्री. चिमणी. (बे.) [क. गुब्बी]

गुरमय स्त्री. गूळ आणि गरम मसाला घालून केलेली पोळी. 'कर गुरमय रोट्या, लेक बहिनाई आली ।' – बगा. (अहि.)

गुरमळणे अक्रि. १. गुरगुणणे; मुळमुळणे; पुटपुटणे; चाचरत, अस्पष्ट बोलणे. २. गुटमळणे; गोंधळणे; कांकू, अळंटळं करणे. ३. गमणे; रेंगाळणे; वेळ दवडणे.

गुरमा–मी, गुरमाई पु. स्त्री. १. मस्ती; आवेश; ताठा; धुंदी; ऐट कैफ, (तारुण्य, विद्या इ.ची) : 'प्रहर दिसा रविवारीं सर्व आले आरब गुरमीस ।' – ऐपो ३९८. २. जेवणानंतर किंवा औषधाने होणारी जळजळ, आग. ३. रागाचा झटका. ४. जागरणाने होणारी डोळ्यांची जळजळ, लाली.

गुरमाळणे अक्रि. पेंगुळणे; झोप येणे : 'तोंडातला उष्ण विडा चघळता चघळता त्याचा डोळा गुरमाळला.' – सीए १२४.

गुरव पु. एक ब्राह्मणेतर पुजारी जात किंवा त्या जातीतील व्यक्ती; विशेषत: शंकराची पूजा करणारी जात; एक बलुतेदार; गावच्या देवाचा पुजारी. वाजंत्री वाजविणे, द्रोण पत्रावळी लावणे इ. कामेही हा करतो. (निंदार्थी) गुरवडा. [क. गोरव = भिक्षेकरी, धनगराचा उपाध्याय]

गुरवकी स्त्री. गुरवाचा धंदा (देवपूजादीकर्म), हक्क, वृत्ती वगैरे.

गुरवडा पु. गोड वडा : 'केण्या फुगे गुरवडे...' – निसं २७०.

गुरव(वा)डा पु. गुरे बांधण्याची जागा; गोठा.

गुरवपुंज पु. शेतकऱ्याकडून गुरवाला देण्यासाठी सरकारने वसूल केलेला – घेतलेला – हक्क; गुरवाचा धान्यातील वाटा, बलुते.

गुरवळी, गुरळी स्त्री. १. एक पक्वान्न; गुळाची पोळी; साखरपुरी; गुळवरी : 'अनारसे फेणिया गुरवळिया ।' – जै ९४.५२. [गुळवरी वर्णव्यत्यासाने] २. 'तोंडातील अवकाश'–(तंजा.)

गुरवा–वी वि. श्रेष्ठ, धीर, मोठा : 'अर्जुना हे गुरवी भक्ती ।' – ज्ञा ९.२२८. [सं. गुर्वी]

गुरवार वि. गरोदर. (कु. गो.)

गुरवासय पु. गुरव लोकांची वस्ती, वाडा. (गो.)

गुरवी वि. गुरवासंबंधी (पान, पत्रावळ इ.).

गुर (रा) ळा–ळी पु. स्त्री. चूळ; गुळणा : 'उदकांमधें सांडी गुरळी ।' – दास २.१.६४. [ध्व.]

गुरंगुटी स्त्री. पाय पोटाशी घेऊन झोपण्यासाठी केलेले शरीराचे गाठोडे : 'झोंपले अजून करून गुरंगुटी ।' – स्त्रीजी १.६८.

गुरंजणी स्त्री. गुरगुरणी; गर्जना. (गो.)

गुरंजणे पहा : **गुरगुरणे** (गो.)

गुरंभळणे अक्रि. गोडसर होणे; गाभुळणे (पेरू, आंबा इ.); पिकायला येणे.

गुरंभा–भी वि. पाडाचे; गदरलेले; गाभुळलेले (फळ).

गुराखी–ख्या पु. गोवारी; गुरे राखणारा; गोपाल. [सं. गोरक्षक]

गुराब–व, गुराबा–वा स्त्री. १. एक प्रकारची नौका : 'स्वर्वल्लि मंडपींच्या भवसिंधूंतील बा गुराबा ज्या।' – मोउद्योग १३.१७३. २.गलबत ठेवण्याची जागा. [फा.]

गुराळ पहा : **गुऱ्हाळ**

गुरिंदा पु. बातमी देणारा : 'कमाविसदारानें पुष्कळ गुरिंदे म्हणजे बातमी देणारे हाती धरून शोध चालविला होता.' – दुर्दैरं १३१.

गुरु फोड, व्रण, करट.

गुरु वि. गरोदर : 'संबंधु जाला : गुरुविणी जाली' – दृपा ९४.

गुरु–रू पु. १. मंत्रोपदेशक. २. धार्मिक उपाध्याय; धार्मिक संस्कार इ. करणारा. ३. उपनयन संस्कारामध्ये गायत्री मंत्राचा उपदेश करणारा. ४. शास्त्रे इ. शिकविणारा; विद्यादाता : 'सकोप दिसती गुरु क्षणभरीच जे तापले।' – केका ८८. ५. (ल. निंदार्थी) फूस, भर, प्रोत्साहन देणारा, वाईट मसलत देणारा माणूस. ६. पिता; बाप; पूज्य, वडील माणूस : 'गाति जनमेजया तव गुरुच्या आश्चर्य मरण जननाचें।' – मोअश्व ४.८०. ७. बृहस्पती; देवांचा गुरु : 'वृत्रारिप्रति वदला गुरु ज्या या भद्रधामनीतीतें।' – मोसभा ६.७०. ८. (सामा.) शिक्षक; मास्तर; आचार्य. [सं.]

गुरु–रू पु. सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह. दर तेरा महिन्यांना एक राशी अशी याची गती आहे. याच्या अस्ताचा काल मंगलकार्याला वर्ज्य मानतात. गुरु सिंह राशीत असला म्हणजे सिंहस्थ व कन्याराशीत असला म्हणजे त्यास कन्यागत म्हणतात. [सं.]

गुरु–रू वि. १. जड; लठ्ठ; वजनदार. २. मोठा विस्तृत : 'हा गुरु मार्गुय गा।' – गीता १३.२२२. ३. पचण्यास जड (पदार्थ). ४. दीर्घ; द्विमात्र (स्वर). ५. कठीण; अवजड; भारी (वस्तू). ६. आदरणीय; मान्य; पूज्य. [सं.]

गुरु–रू पु. (संगीत) दोन मात्रांचा काल. [सं.]

गुरुकिल्ली स्त्री. १. खुबी; मख्खी; शक्कल; कळ, मर्म (कुलंगड्याचे); गूढ उकलण्याची युक्ती : 'प्रकरण जरा जड आहे, पण तुझ्यापासून तिला नरम करण्याची गुरुकिल्ली आता शिकलोच आहे.' – त्राटिका. २. न समजणारे, खोल, गूढ लिखाण, प्रबंध, मंत्र (गुरूने सांगितल्याखेरीज न समजणारे). ३. (सामा.) गूढ; कठीण गोष्ट, शंका.

गुरुकुल न. १. गुरूचे कुटुंब. २. गुरुगृही राहून विद्याध्ययन करण्याची प्राचीन आश्रमपद्धती. [सं.]

गुरुकुल पद्धती १. प्राचीन काळी गुरुकुलामध्ये उपयोगात आणली जाणारी शिक्षणपद्धती. २. प्राचीन गुरुकुलपद्धतीला अनुसरणारी शिक्षणपद्धती. उदा. कांगडी येथील विद्यापीठात ह्या पद्धतीचा उपयोग करून शिक्षण देण्यात येते.

गुरुकोष्ठ न. मोठ्या आकाराचे कवच.

गुरुक्रम पु. गुरुपरंपरागत, अधिकृत शिक्षण. [सं.]

गुरुखूण स्त्री. गुरूने दिलेला मंत्र.

गुरुगम्य वि. केवळ गुरुपासूनच प्राप्त होणारे; गुरुमुखातूनच कळणारे; जे समजून घेण्यासाठी गुरूची आवश्यकता असते असे; दुर्बोध; गहन (श्लोक, वचन, ग्रंथभाग). पहा : **गम्य** : 'कां गुरुगम्य हन ठाय।' – ज्ञा ६.४५९. [सं.]

गुरुगुरु पु. पोटातील आवाज. [का. गोरु]

गुरुगोडी स्त्री. गुडगुडी : 'गुरुगोडीची आग पडिली.' – पेद ४०.१०९.

गुरुघंटाळ वि. १. मोठा आवाज करणारा; वाचिवीर; ओरडणारा : 'तरी त्यास संकलनकार म्हणून हिणविण्यास हे गुरुघंटाल तयारच.' – प्रतिभा ३.१२. २. अवडंबर माजविणारी. (को.)

गुरुज–झ पु. एक तीक्ष्ण हत्यार : 'रफई फकीर गुरुजाने भोसकून घेण्याची किंवा मानेतून सुलतानी घालण्याची जरब देऊन पैसे काढतात.' – गांगा ९३.

गुरुजबारदार पु. गुरुज हे हत्यार बाळगणारा सरकारी भालाइतासारखा शिपाई: 'गुरुजबारदार दोघेजण व हजार स्वार दिल्हे आहेत.' – देव १४.४३.

गुरुजी पु. १. गुरु; शिक्षक; आचार्य; पुरोहित. २. शिक्षक किंवा त्यासारखी पूज्य व्यक्ती यांना लावण्यात येणारा सन्मानसूचक शब्द. जसे :– सानेगुरुजी.

गुरुतल्पग, गुरुतल्पी पु. १. गुरुपत्नीशी गमन करणारा. २. (ल.) मातेसमान स्त्रीशी गमन करणारा; महापापी; नीच. [सं.]

गुरुत्व न. १. (भौ.) पृथ्वीच्या मध्याकडे पडण्याचा पदार्थाचा कल. २. जडत्व; वजन. ३. मोठेपणा; थोरपणा : 'तोषेचिना शार्ङ्गधरू। गुरुत्वासीं।' – ज्ञा १६.२६. ४. गुरुपणा.

गुरुत्वबल न. (भौ.) (पृथ्वीच्या) गुरुत्वाकर्षणामुळे उत्पन्न होणारे बल.

गुरुत्वमध्य पु. गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदू; ज्या बिंदूसभोवती पदार्थाच्या सर्व भागांचे कोणत्याही स्थितीत समतोलन होते तो बिंदू.

गुरुत्वशून्य वि. मुळीच वजन नसलेले. [सं.]

गुरुत्वाकर्षण न. विश्वातील वस्तूंचे परस्पराकर्षण; एक जड पदार्थ दुसऱ्याला आपणांकडे ओढतो अशी स्थिती; पृथ्वीमध्याकडे ओढण्याची शक्ती. [सं.]

गुरुदक्षिणा स्त्री. शिक्षण संपल्यानंतर शिष्याने गुरूस द्यावयाची देणगी, संभावना; शिकण्याचे द्रव्य. [सं.]

गुरुद्रोह पु. गुरूचा द्वेष; गुरूचा विश्वासघात. [सं.]

गुरुद्वार न. शिखांच्या गुरूंनी स्थापन केलेले मंदिर; (सामा.) शिखांचे मंदिर. [सं.]

गुरुपकड स्त्री. (मल्लखांब) मल्लखांबावर उडी मारून दोन्ही पाय मल्लखांबाच्या एका बाजूला नेऊन पोटरीच्या पकडीत मल्लखांब धरून मारायची उडी.

गुरुपीठ न. गुरूचे वास्तव्याचे स्थान; गुरूची गादी; गुरूचे अधिष्ठान. [सं.]

गुरुपुत्र पु. १. गुरूचा मुलगा. २. साधुसंतांमध्ये वाढलेला व त्यांच्याप्रमाणे वागणारा; सत्पुरुषाने उपदेश केलेला; साधू; शिष्य; गुरूअनुगृहीत. [सं.]

गुरुपुरुष पु. नवरा; पती : 'व्रतोपवास करावा। गुरुपुरुष निरोपाने।' – गुच ३५.८७. [सं.]

गुरुपुष्ययोग, गुरुपुष्यामृतयोग पु. एक चांगला योग. गुरुवारी पुष्य नक्षत्र आले असता होणारा योग. हा अमृतसिद्धियोग होय. [सं.]

गुरुपूजा स्त्री. १. कार्यारंभी राशीला गुरु प्रतिकूल असल्यास करायची बृहस्पतीची पूजा. २. आषाढ शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी करतात ती आपल्या गुरूची पूजा. [सं.]

गुरुपौर्णिमा स्त्री. आषाढी पौर्णिमा. या दिवशी आपला मंत्रोपदेशक गुरु, संन्यासी इ. ची पूजा करतात. [सं.]

गुरुप्रचीती स्त्री. १. गुरूची पारख, गुणदोषपरीक्षा. २. गुरूचा अनुभव येणे.

गुरुप्रसाद पु. १. गुरूची कृपा. २. गुरूच्या आशीर्वादाचे फल (विद्या, कौशल्य, भरभराट इ.). ३. (ल.) भांग; अफू; तंबाखू. [सं.]

गुरुबल न. स्वराशीस गुरू या ग्रहाचे आनुकूल्य असणे. जन्मलग्नकुंडलीत हा ग्रह दोन, पाच, सात, नऊ या स्थानी असलेला शुभ मानतात व या काली गुरुबल आहे असे मानतात. [सं.]

गुरुबंधू पु. १. एकाच गुरूचे दोन किंवा अनेक शिष्य, त्यांचे परस्परांशी नाते. २. सहाध्यायी. ३. स्वतःच्या गुरूचा पुत्र. [सं.]

गुरुमंत्र पु. १. गुरूने सांगितलेला धार्मिक उपदेश; गुरूने उपदेशिलेला मंत्र. २. (ल.) बरावाईट सल्ला; मसलत; गुप्त शिकवण (बहुतेक वाईट अर्थाने). (क्रि. देणे, शिकविणे, सांगणे, म्हणणे.) [सं.]

गुरुमार्ग पु. गुरूने उपदेशिलेल्या मंत्रासंबंधी जपादी विधी; गुरूने दाखवलेला परमार्थाचा मार्ग. [सं.]

गुरुमुख न. अध्ययनाच्या प्रसंगी गुरूच्या मुखांतून वाक्य निघणे; प्रत्यक्ष गुरूचा उपदेश, शिकवण. [सं.]

गुरुमुखी स्त्री. शिखांच्या धर्मग्रंथाची लिपी. ही देवनागरीवरून बनली आहे.

गुरुरी स्त्री. ताठा; गर्व; मस्ती; गुर्मी; जोर : 'जुनरकर मोगलानेंही आपले ठाई गुरुरी आणली आहे.' – पेद ३.१४७. [फा. गुरूर]

गुरुलघुविचार पु. १. लिहिण्यात, मुख्यतः पद्यात ऱ्हस्वदीर्घ स्वरांचा काळजीपूर्वक विचार; ऱ्हस्वदीर्घाकडे लक्ष. २. बारीक, खोल विचार; सर्व बाजूंनी विचार.

गुरुवती स्त्री. महत्त्व; मोठेपणा; विस्तार : 'ग्रंथ गुरुवतीचा ठावो।' – ज्ञा १.३३.

गुरूवागवेषणा स्त्री. गुरूचा शोध.

गुरुवार–दिन पु. बृहस्पतीचा वार; (रविवारपासून) आठवड्यातील पाचवा दिवस; बृहस्पतवार.

गुरुवृत्त न. मोठे वर्तुळ, मंडल. [सं.]

गुरुशिक्षा स्त्री. १. अभ्यासाविषयी गुरूने लावून दिलेले नियम; गुरूची शिकवण. २. नियम वगैरे मोडल्याबद्दल गुरूने दिलेले शासन. [सं.]

गुरुसंप्रदाय पु. १. पहा : **गुरुमार्ग.** २. विशिष्ट गुरूच्या शिष्यांचा आचार, परंपरा वगैरे. [सं.]

गुरुसांडोवा पु. गुरुत्याग : 'ऐसे गुरुसांडोवा करिती' – तसा ९३५.

गुरुळा स्त्री. चूळ; गुळणी : 'मीचि होईन सागळा। करूं सुईन गुरुळा।' – ज्ञा १३.४१९. [ध्व.]

गुरु(रो)ळी पहा : **गुरवळी, गुरळी**

गुरू न. चतुष्पाद प्राणी; जनावर; गाय; बैल; म्हैस; ढोर. इ. [सं. गोरुप]

गुरू पु. १. गोवर, देवी या दुखण्यात वाहणारे फोड. न वाहणाऱ्या फोडांना 'मुकागुरु' म्हणतात. २. फोड; व्रण; करट : 'पायास गुरु जाहला म्हणून ऐकिलें.' – ऐलेसं ३८५६. [का. गुरुळे]

गुरूची कढाई शीखांचा लंगर; गुरूद्वारातील भोजनालय.

गुरूचे सीख जुन्या ऐतिहासिक पत्रांतून कित्येक वेळा 'गुरूचे शिख' असा शिखांचा उल्लेख केलेला आढळतो. गुरु नानकाच्या पंथाचे ते गुरूचे शीख – शिष्य : 'गुरुचे सीख आपल्या मुलखास गेले.'– पेदभा २९.१०५.

गुरूढोरू–र न. गुरू; गवत खाणारे, शिंगे असणारे जनावर.

गुरूप–ब वि. गुडुप; गडद; अंधारलेला; दाट (अंधकार). [क. गुडुपु]

गुरूळ पु. शेताच्या बांधाला खेकड्याने पाडलेले भोक. यातून शेतातील पाणी वाहून जाते. (को.) [क. गुरुळे = खळी, भोक]

गुरेढोरे, गुरेवासरे न. अव. गाई, बैल, म्हशी इ. लहानमोठ्या जनावरांसाठी वापरण्यात येणारी व्यापक संज्ञा.

गुरोडा पु. १. जनावरांचा गोठा; गायवाडा. २. (निंदार्थी) गुरू.

गुरोनी स्त्री. १. गुळाचे द्रावण. २. चूळ. (झाडी)

गुर्की स्त्री. वचक; दाब : 'लांगेलुंगे कवि भेदरले अवघ्यावर त्याची गुर्की।' – होला १८. पहा : **गुरकी**

गुर्गटा पु. कोळी; किडा. (गो.)

गुर्गजा, गुर्गू स्त्री. पु. गदा; लोखंडी सोटा. [फा. गुर्ज]

गुर्गलॅत न. थंड पाण्याचा माठ; मातीची घागर. (गो.) [पोर्तु.]

गुर्ची स्त्री. लढण्याचे एक हत्यार : 'रा. पां. न. पटवर्धन यांनी दादासाहेब ओंकार संग्रहातील गुर्ची नावाचे हत्यार दाखविले.' – मं षष्ठ सं. वृ. ५.

गुर्ज पु. एक हत्यार : 'त्यांच्या हाती लोखंडी – गुर्ज – एक गदेसारखे हत्यार...' – स्मगा २१७.

गुर्जर पु. गुजरात राज्य व त्यातील रहिवासी. पहा : **गुजर** [सं.]

गुर्जरी स्त्री. १. गुजराती स्त्री. २. (ल.) सुंदर स्त्री : 'अशि अनंतगुण गुर्जरी।' – राजो (मला) १५१.
वि. गुजराती पद्धतीचे, ढंगाचे.

गुर्झब पु. काठी; दंड : 'प्रवेशद्वारावर सोन्याचे गुर्झब हाती घेतलेले गुर्झबदार उभे होते.' – स्वामी २४६. [फा.]

गुर्झबदार पु. दरबारातील चोपदार; दंडधारी.

गुर्दा पहा : **गुडदा, गदा** : 'बारा हजार गुर्दा।' – ऐपो ४४. [फा. गुर्जा]

गुर्बत स्त्री. नम्रता; अजिजी; काकळूत : 'इंग्रेज गुर्बत दाखवून काबू साधण्यास चुकणार नाहीत.' – दिमरा १.५४.

गुर्मी पहा : **गुरमी**

गुर्मोत्या पु. भाताची एक जात. (झाडी)

गुर्राविणे अक्रि. १. चिडणे : 'अन् एका डोळ्यानं (शेठ) वामनकडे गुर्राऊन बघत होता.' – बाविबु ६. २. गुरगुर करून अंगावर येणे. पहा : **गुरकावणे** (व.) [ध्व. गुरु]

गुर्री स्त्री. १. राग. २. डूख. (झाडी)

गुर्रेबाजी स्त्री. गुर्मी : 'आणि अनावर तांबुसताजी, गौरपणाची गुर्रेबाजी ।' – ध्रुपद ५१

गुर्वचार पु. गरोदरपण; गर्भारपण. (गो.)

गुर्वार, गुर्विणी वि. गरोदर; गर्भार. (गो.) पहा : **गरवार**

गुर्वी स्त्री. लेख्यशाला; हस्तलिखित ग्रंथांचे संग्रहालय.

गुर्सेल स्त्री. कोहळ्याची खीर. (झाडी)

गुऱ्हाळ न. १. ऊस गाळण्याचा चरक; ऊस गाळण्याचे यंत्र. २. चरक असलेली जागा ३. गूळ तयार करण्याचा कारखाना (यंत्र, इमारत इत्यादी सर्व उपकरणांसह). ४. ऊस गाळण्याचा, गूळ करण्याचा धंदा, काम. ५. (ल.) लांबलचक हकीगत, भाषण; कंटाळवाणे भाषण; चऱ्हाट : 'पण श्रीमंतांचे गुऱ्हाळ आवरेना त्याला ते काय करणार ।' – ऐलेसं [सं. गुर + आलय] (वा.) **एरंडाचे गुऱ्हाळ –** कंटाळवाणे, निरर्थक बोलणे; ज्यातून काही निषन्न होत नाही असे बोलत राहणे. ० **लावणे –** बडबडत बसणे; चऱ्हाट लावणे : 'मी आपला काहीतरी गुऱ्हाळ लावीत असतो.' – कलंदर ४१०.

गुल पु. दंगा; गडबड; आवई; आरडाओरडा : 'दोन प्रहराप्रमाणे जेवणाचा गुल उडाला.' –मस्थि [फा.]

गुल क्रिवि. पसार; गायब : 'तेवढ्यात हे गुल.' – ऑक्टोपस १७. (क्रि. करणे, होणे.)

गुल पु. फूल. [फा.]

गुल पु. १. दिव्याची काजळी; कीट. २. आगकाडीला लावलेले फॉस्फरस व गंधक यांचे पूट. ३. हुक्यातील कोळशाचा गोळा, विस्तव; चिलमीतील जळालेला तंबाखू. (वा.) **० देणे –** मोठ्या खिळ्याचे डोके तापवून त्याने वाटोळा डाग देणे. 'पोटास गुल दिलें होतें त्यांतून पू निघत असतो.' – ऐलेसं २५५०. [फा.]

गुलअनार पु. १. डाळिंबाचे फूल; अनारकली : 'सखे गुलअनार गुलचमन निशिचा रमण तसा गोजिरा तुझा मुखवटा ।' – होला १०४. २. डाळिंबी रंग. ३. एक झाड. पहा : **गुलनार**

वि. डाळिंबी रंगाची (शालजोडी, वस्त्र इ.). [फा.]

गुलकणे अक्रि. खुषीत रंगेलपणे, मनापासून, मोकळेपणाने हसणे. [ध्व.]

गुलकंद पु. एक लेह; गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या व खडीसाखर यांचे मिश्रण; गुलाबाचा मुरंबा.

गुलकाडी स्त्री. आगकाडी.

गुलकातरी स्त्री. दिव्याची काजळी काढण्यासाठी वापरतात ती कातरी.

गुलकावणी स्त्री. हुलकावणी; ढोंग; फसवणूक; मायावी भाषण, व्यापार, रोख, झोक, आव. (क्रि. दाखविणे, करणे.)

गुलकाविणे उक्रि. १. हुलकावणी दाखविणे; फसविणे. २. आरडाओरड करून दबावणीने घाबरे करणे; गोंधळविणे. ३. (मान शब्दाबरोबर प्रयोग) ओवाळणे; हलविणे; चेष्टेने मान मुरडणे. पहा : **घुलकाविणे**

गुलकी स्त्री. स्वच्छंदी, रंगेल हास्य; दयापूर्ण हास्य; सरल हास्य. (क्रि. येणे, टाकणे, मारणे.)

गुलकेश पु. कोंबड्याच्या तुऱ्याप्रमाणे असलेले फूल.

गुलखैरा–रु पु. एक चिनी–इराणी फुलझाड.

गुलगलबा पु. गोंधळ; दंगा; आवई : 'बाजूचे सरदार फौज यांणीं आपलाले मिसळीस चालावे, गुलगलबा कांहीं एक होऊं नये.' – थोशामच ७२.

गुल(लू)गुल(लू) क्रिवि. हळूहळू; कानाला गोड लागेल अशा प्रकारे; हलक्या स्वरात (प्रेम, रहस्य इ. च्या गोष्टी बोलणे.). [ध्व.]

गुलगुल गव्हाच्या पीठाची गोड भजी. (आकाराने मोठी) 'तुझ्या नाकाची ठेवन भज्या गुलगुल्यावानी ।' – बगा.

गुलगुला पु. भुमका; आवई; 'सेनाखासकेल फौजबंदी करून गुजरात प्रांतीं जाणार यैसा चहूंकडून गुलगुला उठला आहे.' – हिंदखं १.१२९.

गुलगुलित वि. गोड, प्रेमळ, मधुर (आलाप).

गुलगुलीत वि. १. जाड; लठ्ठ; गुबगुबीत; गोंडस (शरीर). २. मऊ व दबणारी (उशी, गादी). ३. फुगलेला आणि मऊ (भात). ४. (सामा). फार मऊ (पदार्थ).

गुलगुलेत पु. पाण्याचा खुजा. (गो.)

गुलगेंद पु. फुलांचा गुच्छ : 'संगीन कुच भरदार, सजिव सजदार, गुलगेंद उसासले ।' – प्रला ११३.

गुलच (चि) नी, गुलाचीन स्त्री. फुलाची एक जात; गुलदावरी.

गुलचमन न. फुलबाग : 'सखे गुलअनार गुलचमन' – होनाजी (मला) १४३.

गुलचांदणी स्त्री. एक फूल.

गुलचिमणी स्त्री. पिवळ्या पोटाची चिमणी (पक्षी).

गुलछडी, गुलजाफिरी गुलछबू–ब्बू स्त्री. पु. एक प्रकारचे फूल; निशिगंध. [फा.]

वि. मोहक चेहेरा असलेला (माणूस); रंगेल. [फा. गुलेशब्बू]

गुलजार : वि. १. नाजूक; सुंदर; मोहक; रमणीय. २. टवटवीत; प्रफुल्ल. ३. संपन्न; ऐश्वर्ययुक्त : 'बाच्छाई तक्त गुलजार दिसे रंगबहार पुण्याची वस्ती ।' – होला १७८. ४. आबाद : 'महाल उंडणगांव वगैरे महाल गुलजार दिले.' – मइसा ८.२१२. [फा.]

गुलटोप पु. एक फुलझाड व त्याचे फूल : 'पर्यातक गुलटोप गुलगुलित जळीं कमळणवावरी ।' – प्रला १५५.

गुलटोप पु. कबुतराची जात.

गुलडा पु. १. (विणकाम) ताण्याच्या अलीकडची शेघटे ज्याला बांधलेली असतात ते बैलीवरील आडवे लाकूड. ताण्याची दुसरी टोके जुंपणी अथवा जुंपणे याला बांधलेली असतात. गुलडा आणि जुंपणी यांनी ताणा ताणला जातो. २. बैलीच्या डोक्यावरील आडवी दांडी. हिच्या प्रत्येक टोकाला एक लांब पेंढके – पेंढ–पेंढी असते. ही सुताऱ्याला (गुलड्याशी समांतर असणाऱ्या काठीला) स्थिर राखते.

गुलतुरा पु. शंखासुर नावाचे फुलझाड. याला पिवळ्या व तांबड्या रंगाची झुपकेदार फुले येतात. फुलाला वास नसतो (व.) : 'डवना मरवा गुलतुरा । वाळागीर पडदे आणवा ।' – पला ४.२२.

गुलदस्त पु. १. फुलांचा गुच्छ; झेला. २. गंजीफांतील एक संज्ञा. चार चार पानांचा एक एक दस्त. पाने वाटताना एक दस्त तसाच न पाहता

ठेवून शेवटी तो लावतात. [फा.]

गुलदस्ता पु. १. फुलपात्र; फुले ठेवण्याचे भांडे. (माळवी) २. पुष्पगुच्छ. (वा.) **गुलदस्तात ठेवणे –** १. राखून ठेवणे. २. लपवून ठेवणे; गुप्त राखणे : 'पण तें सध्यां गुलदस्तांतच राहू देणें बरें.' – नपुक १८.

गुलदान न. १. फुले ठेवण्याचे पात्र; फुलदाणी. २. पेटलेला तोडा न विझता ठेवण्याची लोखंडी पेटी. ३. कात्रीने दिव्याची काजळी काढून ठेवण्याचे पात्र.

गुलदार वि. फुलांची नक्षी काढलेला : 'नित्य नवा पोषाक रंगी गुलदार...' – भाइसमंत्रै वर्ष २० अंक १.२६.

गुलदावदी–री–ली स्त्री. एक फूल व त्याचे झाड : 'शरीर सुकुमार कीं गुलदावरी।' – प्रला ११०.

गुलनार पहा : **गुलअनार**

गुलप (फ) णे अक्रि. १. कष्टाने उच्चारणे; बोलताना अडखळणे; चाचरणे. (को.) २. पायात पाय अडकतील असे चालणे; पायांना आळेपिळे देत चालणे. ३. पहा : **गुरफटणे**

गुलपरी, गुल्परी स्त्री. सुंदर स्त्री.

गुलफूल न. गोजिव्हा.

गुलबकावली स्त्री. एक पांढरे सुवासिक फूल.

गुलबदन वि. गुलाबाच्या फुलासारखा सुंदर देह असणारी (स्त्री.).[फा.]

गुलबदन पु. १. तापत्यातील (रेशमी वस्त्र) एक भेद, प्रकार; एक प्रकारचे कापड : 'दाविली कंचुकी गुलबदनी।' – प्रला १४९. २. एक रंग.

गुलबस–क्षी स्त्री. सायंकाळी फुलणारे एक फुलझाड. याची फुले पांढरी, तांबडी, जांभळी वगैरे अनेक प्रकारची असतात : 'छतें आरशांचीं बशिवलीं रंग गुलबासी।' – प्रला ९२.

न. या झाडाचे फूल.

वि. या फुलाच्या रंगाचे. [फा. गुलेअब्बास]

गुलमखमल पु. स्त्री. एक फुलझाड व त्याचे फूल; गेंद.

गुलमस पु. रानटी पांढरे फूल व त्याचे झाड.

गुलमाल क्रिवि. गायब; बेपत्ता. (क्रि. करणे, पळविणे.)

गुलमुच्छा स्त्री. अव. गालमिशा; गालावरील राखलेले केस : 'गुलमुच्छा होत्या त्या वरच्या बाजूस चढविलेल्या.' – सूर्योदय १४७.

गुलमेख स्त्री. एक प्रकारचा खिळा; गाठदार खिळा. हा लहान असून याचे डोके पसरट असते. [फा.]

गुलमे (में) धी, गुलमेहंधी स्त्री. मेंदीचा एक प्रकार व त्याचे फूल.

गुलमोहोर पु. १. एक फुलझाड. २. (शोभेची दारू) दारूच्या झाडाचा एक प्रकार.

गुलवणे सक्रि. इकडून तिकडे नेणे; झुलवणे : 'गुलवत गुलवत त्याने प्रेक्षकांचे लक्ष दुरून येणाऱ्या एका मोटरबोटीकडे वेधले.'– जात्यांदे २१९.

गुलसान स्त्री. बंदुकीत घालण्याची शिशाची गोळी. (गो.) [फा. गुल = गोळी]

गुलहवस, गुलहौस स्त्री. ऐषआरामाची आसक्ती; चैनबाजी. [फा.]

गुलहंसी, गुलहवसी, गुलहौशी–सी वि. चैनबाज; ऐषारामी; आंबटशोकी; विषयी; हौशी; आनंदी व खर्चिक. [फा. गुलहवस]

गुलंकार (गो.) पहा : **गाळंकार**

गुलाई स्त्री. (गवंडी काम) गोलाई; कोपऱ्याच्या बाहेरील भिंतीचा गोल भाग : 'दरजा भरलेले सांधे स्पष्ट दिसून दरजा सारख्या जाडीच्या असून चपट्या गुलाईच्या किंवा घोटणीच्या असाव्या.' – मॅरेट ७९. [हिं.]

गुलाट अढी (मल्लखांब) मल्लखांबाकडे पाठ करून उभे राहून उलटी मारून पायाने मल्लखांबाला विळखा घालणे.

गुलाटचक्र न. एकमेकांच्या अंगावरून चक्राप्रमाणे गुलांच्या मारण्याची कसरत.

गुलाडी स्त्री. (विणकाम) करवतीकाठाचे विणकाम करण्याचे यंत्र; चाळा. [फा. गुल = फूल]

गुलाब पु. १. एक फुलझाड. हा गुलाबी, पिवळा, पांढरा इ. रंगाचा असतो. फुलांपासून अत्तर काढतात व गुलकंद तयार करतात. २. या झाडाचे फूल. ३. गुलाबपाणी व अत्तर : 'गुलाबशिसे, उत्तमसे तीन चार पाठविलेत तर बरें होतें.' – ब्रच २५३. [फा.]

गुलाबकंद पु. गुलकंद : 'गुलाबकंद वजन पक्के एक शेर पाठविला तो घेणे.' – ब्रच १२९.

गुलाबचक्री, गुलाबछकडी, गुलाबपाक स्त्री. साखरेच्या पाकातील गुलाबाची मिठाई.

गुलाबछकडी स्त्री. १. चटकचांदणी स्त्री. २. एक प्रकारचे गाणे.

गुलाबछडी स्त्री. खडीसाखरेची कांडी.

गुलाबजांब पु. न. मैद्यामध्ये तूप व खवा मिसळून तुपात तळून नंतर जिलबीसारखी पाकात मुरत टाकून केलेली मिठाई.

गुलाबदान–णी न. स्त्री. गुलाबपाणी ठेवण्याची व ते शिंपडण्याची लहान झारी. [फा. गुलाब्दान]

गुलाबदान स्त्री. (पांढऱ्या रंगाच्या) द्राक्षाची एक जात.

गुलाबपाणी न. गुलाबाच्या फुलापासून तयार केलेले सुगंधी पाणी. हे पानसुपारीच्या वेळी अंगावर शिंपडतात.

गुलाबपाश पु. गुलाबदाणी. [फा.]

गुलाबशकर स्त्री. रेवडी; गुलाबपाक : 'गुलाब–शकरीच्या वड्या सुमारे पन्नास पाठविल्या त्या पावल्या.' – ऐलेसं १२.६६३६.

गुलाबशेवते न. सोन्याचे गुलाबाचे फूल; एक दागिना. (गो.)

गुलाबाचे फूल रंगेल व्यक्ती.

गुलाबी स्त्री. एक लहान झुडूप.

वि. गुलाबविषयक; गुलाबासारखा (रंग, वास, अत्तर).

गुलाबी अत्तर गुलाबाच्या फुलांपासून काढलेले अत्तर.

गुलाबी चंदन गुलाबासारख्या वासाचे चंदन; चंदनाची एक जात.

गुलाबी जांब, जाम एक फळ; रायजांभूळ. [फा.]

गुलाबी झोप पहाटेची, थंड वेळेची झोप.

गुलाबी थंडी सौम्य प्रकारची, सुखावह थंड हवा; पहाटेची थंडी.

गुलाम पु. १. बटकीचा मुलगा; दासीपुत्र. २. कामासाठी विकत घेतलेला माणूस; दास. ३. (ल.) लुच्चा; वस्ताद; ठक; चोर; हरामखोर; सोदा.

४. पत्त्यातील गुल्ल्या; गुलम्या. ५. (कौतुकाने) हुशार लहान मुलगा. ६. चंगकांचन गंजिफातील सहावा रंग. [फा.]

गुलामगिरी, गुलामी स्त्री. १. दास्य; गुलामाप्रमाणे राबणे; गुलामवृत्ती; गुलामाप्रमाणे खुशामत. २. सोदेगिरी; शाठ्य; हरामी; लुच्चेगिरी. ३. गुलामांचा व्यापार. ४. (ल.) हांजी हांजी; खुशामत. ५. पारतंत्र्य, परकीय सत्तेखाली असणे. (क्रि. करणे.)

गुलामजादा पु. (शिवीगाळ) हरामखोर; लुच्चा; लबाड.

गुलामपिच(स)णी स्त्री. (पत्त्यांचा खेळ) प्रथम पाने वाटताना एक एक उताणे पान टाकून ज्याला प्रथम गुलाम येईल त्याने करायची पिसणी.

गुलामसत्ती स्त्री. पत्त्यांच्या खेळातील एक प्रकार.

गुलार पु. एक झाड : 'वड, पिंपळ, गुलार... या झाडांचाहि खूप प्रसार या पर्वतप्रांतावर असून...' – रूरा ३१.

गुलाल पु. १. एक रंग; तांबडा रंग दिलेले पीठ; बाजरी, नाचणी इ. चे पीठ. २. सुरंजी, पतंगी इ. लाकडाच्या पाण्याने रंगवून तयार केलेली पूड. मंगलप्रसंगी, उत्सवात, देवतांच्या जन्मोत्सवात व जेवणावळीच्या वेळी रांगोळीत व विशेषत: शिमग्यात याचा उपयोग करतात. [हिं.]

गुलाल स्त्री. न. एक फुलझाड व त्याचे फूल. पहा : **गुलबासी**

गुलालगोटा पु. गुलाल भरलेला गोळा. पातळ काचेच्या, लाखेच्या, अभ्रकाच्या गोळ्यात गुलाल भरून तो अंगावर फेकल्यावर तो गोळा फुटतो व गुलाल पडतो. शिमग्यात असे गोळे अंगावर फेकीत असत : 'गुलालगोटे शिवाय ठिवले निरनिराळे अंबारींत।' – ऐपो १९९.

गुलाल चिकवे लुगड्याचा एक प्रकार, वाण.

गुलालधारी बायकांच्या हातात घालावयाच्या बांगड्यांचा एक प्रकार.

गुलालबार न. कनाती पडद्यासारखे एकप्रकारचे कुंपण किंवा बाड. मुसलमान बादशहाच्या खास डेऱ्यासभोवार असे कुंपण असे.

गुलाला, गुल्लाला पु. एक फुलझाड.

गुलालाटू पु. (मल्लविद्या) कुस्तीचा एक डाव.

गुलाली वि. १. गुलालाच्या, गुलालासारख्या रंगाचे (वस्त्र). २. गुलालाचा, गुलालासारखा (रंग).

गुलावा पु. भुलावा; गुंगीचे औषध : 'घरामधीं उंदीर झाले गुलावा देते मी त्याला।' – धाश्रलो ९२.

गुलांडी स्त्री. झुकांडी : 'गुलांडी देऊन पळाली.' – गोता ११९.

गुलिका स्त्री. (वै.) पुटकुळी; उंचवटा.

गुलिस्तान न. बाग. [फा.]

गुली स्त्री. तांबडे प्रवाळ. (प्रां.)[हिं. गुल्ली = तांबड्या प्रवाळाची एक जात]

गुली स्त्री. हुलकावणी : 'पाऊस कवा पडायचा, कवा न्हाई, अशा नुस्त्या गुल्याच दाखवत हुता.' – रैत १५०.

गुलुच्छ पु. (वन.) फुलोऱ्याचा एक प्रकार. सर्वसाधारण फुले कमीजास्त लांबीच्या देठामुळे एकाच पातळीत येतात.

गुलुंगा पहा : **कुलंगा, कुलुंगा**

गुलुली, गुलेल स्त्री. गलोल; गोफण. (व.) [हिं. गुलेल]

गुल्फ पु. 'गलबला' – (तंजा.)

गुल्फ पु. पायाचा घोटा : 'गुल्फद्वय धरिजे।' – ज्ञा ६.१९७. [सं.]

गुल्फसंधि–धी पु. (वै.) पायातील घोट्याच्या भागातील सांधा.

गुल्बांग, गुलबांग पु. भुमका; आवई; बोलणे; कंडी : 'बेदरास येण्याचा गुल्बांग दाट होता.' – मइसा ७.११२. [फा.]

गुल्म पु. न. विशिष्ट संख्येचा व रचनेचा सैन्यविभाग, तुकडी; तीन सेनामुखांची तुकडी (सेनामुख = ३ हत्ती, ३ रथ, ९ घोडे व १५ पायदळ). [सं.]

गुल्म पु. न. गुंतागुंतीचे व दाट किंवा पसरणारे झुडूप. तृण, वृक्ष, लता व गुल्म हे वनस्पतिक्षेत्रातील मोठे वर्ग आहेत. [सं.]

गुल्म, गुल्मवात पु. न. १. प्रकुपित वातादी दोषाने कोठ्यात उत्पन्न होणारा गोळ्यासारखा एक रोग. वायगोळा. कुशी, हृदय, नाभी, बस्ती ही त्याची स्थाने आहेत. २. पाणथरी. ३. ग्रंथी; गाठ. ४. गोळा; गळू; गरस. [सं.]

गुल्मोदर पु. उदर रोगाचा एक प्रकार. [सं.]

गुल्ल न. अतिशय गुंगी; कैफ. (गो.)
वि. कैफाने उल्लू झालेला; धुंद.

गुल्ल–गुल्ली पु. स्त्री. गलबला : 'तत्त्वांचा गल्बला जेथें। निवांत कैचें असेल तेथें। याकारणें गुल्लिपरतें। कोणियेकें असावें।' – दास १३.५.२४. [ध्व.]

गुल्लडाग पु. तापवलेल्या खिळ्याने, मुद्रेने दिलेला डाग, चोचा; गुल : 'गुल्लडागांची जांचणी।' – दास ३.७.३४.

गुल्ला पु. चुकांडा; झुकांडी (क्रि. मारणे, देणे). (व.)

गुल्ली स्त्री. १. (काशी) बिटी; इटी. २. (ओतकाम) धातूचा चूर पुन्हा वितळून त्याची ओतलेली चपटी वाटोळी चकती. [हिं.]

गुल्ली स्त्री. लहानसा ढीग, गंज. (व.)

गुल्ली स्त्री. हलकल्लोळ; गडबड.

गुल्ल्या पु. पत्त्यातील गुलाम. (ग्रामीण.)

गुल्शन पु. बाग; उद्यान. [फा.]

गुल्हेर वि. शेंदरी; डाळिंबी (रंगाचे).

गुल्हेर न. उंबराचे फळ.

गुवलणे उक्रि. वापरणे. (व.)

गुवाड पहा : **गुखडी** (राजा.)

गुवाड पु. घाणेरी. (बे.)
वि.१. घाणेरडा; ओंगळ, गूघाण. (कु. गो.) २. (ल.) कमी किमतीचा.

गुवेर न. भुयार : 'गुवेरी पाषाणु चडाविला' – कला १५.

गुवेरे न. (लहान मूल किंवा आजारी माणूस यांच्या) विष्टेने भरलेले वस्त्र.

गुसपणे अक्रि. गोंधळणे; गुंतणे. (गो.)

गुसपागोंधळ पु. गोंधळ; गुंतागुंत. (गो.)

गुस (सु) ल स्त्री. आंघोळ. पहा : **घुसळ** : 'आराम होऊन गुसल केली.' – पया ४६७. [फा. गुस्ल]

गुसलखाना पु. न्हाणीघर; स्नानघर. [फा.]

गुसी स्त्री. खड्‌ग.

गुसुलखाना पु. गुप्त सल्लामसलत करण्याचे किल्ल्यावरील स्थान.

गुस्सा पु. राग; क्रोध; कोप. [फा.]

गुहा स्त्री दरी; कंदरा; घळ; कपार; डोंगर-पर्वतातील बीळ; गुफा. [सं.]

गुहाडी (व.) पहा : **गुधाडी**

गुहासय वि. पु. गुहाश्रयी, गुहेत राहणारा : 'भणौनि गुहासय समाधी : माजिं रेगे' – ज्ञाप्र ८५७.

गुहिक पहा : **गुह्यक** : 'हटक देशिचा गुहिकु।' – रुस्व २१४.

गुहिरा पु. १. सरड्याच्या जातीचा एक प्राणी. हा इच्छेला येईल त्याप्रमाणे रंग पालटतो : 'कीं गुहिरिया सरडाचे नाना रंग।' – स्वानु १३.२.९७. २. एक विषारी साप. (व.)

गुहिरा वि. कुचकट स्वभावाचा. (व.)

गुहिऱ्या-रा वि. १. विषारी. २. दाट; घन रंगाचा : 'गोरीला लागे पान। नाग गव्हळ्या गुहिऱ्या। बाऱ्या चालूं द्या दोहिऱ्या।।' – वलो ४८. (व.)

गुह्य न. १. गुप्त गोष्ट, वर्तमान; गूढ तत्त्व. २. जननेंद्रिय; उपस्थ; योनी; शिश्न; भग.

वि. १. खाजगी; एकांताची; आडवळणाची (जागा). २. गुप्त; गूढ; प्रच्छन्न (कृत्य, कारभार, गोष्ट). [सं. गुह् = लपविणे. गुह्यम]

गुह्यक पु. यक्ष. [सं.]

गुह्यर पु. एक प्रकारचा सरडा : 'जैसा जैसा घडे संग। तैसे गुह्यराचे रंग।' – दास १३.७.१७.

गुळकी-खी-खे स्त्री. न. १. (शिंपी) गुंडी; बिरडे; बटन. २. (दावे इ. च्या) बिरड्यात अडकविण्याची गाठ. ३. बिरडे व गाठ (एकत्र मिळून). ४. स्त्रियांचे एक शिरोभूषण; वेणीत किंवा अंबाड्याच्या वर घालायचे अग्रफूल. (कु. राजा.) [सं. गोलक]

गुळखे न. १. गोंधळ; लचांड. (गो.) २. अपुरे. (गो.) [सं. गोलक]

गुळगुळथापडी, गुळथापडी स्त्री. १. (लहान मुलाला निजविण्यासाठी हळू हळू थोपटणे) गोड गोड भाषण, वर्तन; नरमनरम शब्द. २. गुळगुळीत, संदिग्ध किंवा मोघम भाषण; गुळूमुळू बोलणे. ३. समजूत पाडणारे, वळवणारे, अनुकूल करून घेणारे भाषण, वर्तन; युक्तिप्रयुक्ती.

गुळगुळा वि. मऊ, सपाट व गोड : 'बचनागी गुळगुळा लागे वोठीं। प्राण नाशी रिघोनी पोटी।' – मुआदि ३४.७९.

गुळगुळीत वि. साफ, मऊ व चकचकीत; नितळ; सफाईदार; खाचखळग्यांविरहित; खरखरीत नव्हे असा.[सं. गुल = गोल] (वा.) ० **करणे** – उलटीसुलटी (हजामत, खरडपट्टी) करणे.

गुळच (ची-म) ट वि. थोडेसे गोड; गोडसर : 'येक्या संगें तें कडवट। येक्या संगें तें गुळचट।' – दास ११.७.१६.

न. गूळसाखर वगैरे गोड पदार्थ.

गुळणा-णी पु. स्त्री. १. (चूळ भरण्यासाठी घेतलेले) तोंडभर पाणी; घोट. (क्रि. घेणे.) २. (पाण्याची, रक्ताची) टाकलेली चूळ. (क्रि. होणे, टाकणे.) ३. तोंडात येणारे पित्त; तोंडातील व्रण. (क्रि. येणे.) ४. तोंड खुळखुळणे, धुणे; चूळ भरणे. (क्रि. करणे.) [ध्व.] (वा.) ० **धरणे** – १. गुप्त ठेवणे. मिठाची गुळणी धरणे असा प्रयोग रूढ आहे. गुळणी धरल्यावर बोलता येत नाही यावरून. २. न बोलणे; तोंड दाबून धरणे. ० **सोडणे** – गुह्य फोडणे. **तुपादुधाच्या गुळण्या टाकणे** – संपत्तीत लोळणे, न्हाणे.

गुळण्णा पु. गुळाचा गणपती. (गो.)

गुळत्र, गुळत्रय न. गूळ, राब, काकवी यांचा समुदाय : 'मद पारा गुळत्र।' – दास १५.४.१५.

गुळध (धि-धु) वा, गुळधा पहा : **गूळधवा**

गुळब-बा, गुळंभ पहा : **गुळुंब-भ**

गुळभात पु. लग्न ठरल्यावर पाहुणे मंडळींसाठी करावयाचे भोजन. (कुण.)

गुळभेलीवत वि. अल्पकाल सुखदायक; क्षणभंगुर; तात्पुरते सुख देणारा.

गुळमट, गुळंबट वि. १. पहा : **गुळचट** १. २. आंबटसर. (गो.)

गुळमट वि. स्पष्ट, निर्भीड नसलेला; गुळमुळीत : 'कार्यकर्ते गुळमटच अभिप्राय देतील.' – सासिं २६.

गुळमटणे अक्रि. १. (आंबा, चिंच इ.) गोडसर होणे. (राजा.) २. अस्पष्ट बोलणे; घुटमळणे.

गुळमु (म) ळणे अक्रि. १. गुणगुणणे; तोंडातल्या तोंडात बोलणे. २. बोलण्यात अडखळणे; घुटमळणे; कां कू करणे. [ध्व.]

गुळमुळीत वि. मुळमुळीत; असंदिग्ध; अर्धवट; अस्पष्ट; तोंडातल्या तोंडात (भाषण इ.).

गुळमेख स्त्री. मोटेच्या खालच्या चाकाची कण्याची अरी.

गुळवणी, गुळे(ळो)णी, न. १. गूळमिश्रित पाणी. २. गुळाच्या पाण्याचे कालवण (पुरणाच्या पोळीशी खाण्यासाठी). यात कधी थोडे पीठही घालतात. (कु. व.)

गुळवणे सक्रि. गुळाच्या पाकात घोळणे : 'गुळवलेले ते खोबरे खायला फार खमंग लागे.' – मापु.

गुळवरी, गुळोरी स्त्री. एक खाद्य, पक्वान्न. पहा : **गुरोळी** : 'मांडा साखरपांडा गुळवरी।' – एभा २७.२९०.

गुळवा-वी-व्या, गुळावा, गुळ्या, गुळरांध्या, गुळहारी वि. गूळ तयार करणारा.

गुळवा पु. गुळातला एक खाद्यपदार्थ : 'घारगे गुळवे दहिवडे।' – रामदास मापु.

गुळवेल स्त्री. एक कडू वेल; गरुडवेल; गरूळवेल. (को.) ही वेल औषधात फार उपयुक्त व महत्त्वाची असून तुरट, कडू, उष्ण, वीर्योद्दीपक व ज्वरनाशक आहे. बहुतेक सर्व रोगांवर ही उपयोगी पडते. [सं. गुडूची]

गुळशी (शे) ल, गुळशेले न. तांबडा भोपळा उकडून त्यात दूध व गूळ घालून केलेली खीर. (व.)

गुळहार, गुळार पहा : **गुऱ्हाळ**

गुळ(ळा)ळा पु. गुळणा; चूळ : 'गुळळा कीजे राउळें। आरोगणांतीं।' – ऋ ८४. [ध्व.]

गुळंकरी पु. वेगवेगळ्या ठिकाणांहून गोळा झालेल्या माणसांपैकी एक :

'तो महुद गावी गेला. त्याच्यासारखे बरेच गुळंकरी तेथे जमले होते.' – बनगर १२२.

गुळंब, गुळम–मा–मी, गुळा (ळी) म न. पु. वाडगे; पितळेची मोठी वाटी. (गो. कु.) २. न. जेवण्यासाठी वापरात असलेले काशाचे पात्र. (बे. गो.)

गुळंब–बा पु. एक पक्कान्न. गुळाच्या पाकात शिजवलेल्या आंब्याच्या फोडी; गुळाचा मुरंबा.

गुळाचा गणपती, गणेश १. आळशी; मंद; गलेलठ्ठ; अचळोजी. २. होयबा; बुळा; दुर्बळ; शेणाचा पो.

गुळांफो पु. शिजवलेला, पाणी मुरलेला भात. (कु.)

गुळी न. अव. खाडीतील चिखल : 'बांधाची भोकें नजरेस येतांच तेथें गुळीं म्हणजे खाडींतील चिखल व दगड घालून बंद केलीं तर मग त्यात पाणी शिरत नाहीं.' – केळआत्म ५१.

गुळी स्त्री. नीळ (झाड व त्यापासून होणारा पदार्थ). [गु. गळी]

गुळी स्त्री. १. शौचाच्या वेळी बाहेर येणारा मलाशय. (क्रि. उतरणे.) २. गोळी; गुटिका; लहान लाडू. (गो.कु.) (वा.) ० **होणे –** थरकाप होणे. (गो.)

गुळी न. १. वाल इ. द्विदल धान्याच्या मळणीनंतर निघालेले गुरांना घालायचे भूस. २. शेंगांची टरफले, झाडाचा पाला, वेलाचे तुकडे इ. मिळून झालेले गुरांचे खाणे. (को.)

गुळी, गुळीसाखर स्त्री. तांबडट, भरड अशी एक प्रकारची साखर; गुळासारखा रंग असणारी एक प्रकारची साखर.

गुळीतोळ पु. निळीच्या एक मण उत्पन्नावर घेतला जाणारा एक रुपया कर.

गुळु दंगा.

गुळुळा–ळी पु. गुळणी.

गुळुंब–बा, गुळूम न. पु. १. गरस; गाठ; फोड; गळू. २. झाडास येणारी आवाळूसारखी गाठ. ३. बांडगूळ; परोपजीवी वनस्पती. [सं. गुल्म]

गुळू पु. दंगल; कट : 'हर्काबादवाल्यांनीं अकबरपुरच्या जमिनदारास चिठ्या लिहिल्या कीं तुम्ही गुळु करून ठाणें उठवून देणें म्हणजे आम्ही येतो.' – पेद २.१३२. [फा. गुलु = गळा]

गुळे न. (क.) दुष्काळामुळे किंवा दंग्यामुळे परागंदा झालेला गाव, वस्ती. (राजा.) पहा : **गुढार, गुढे** [का] (वा.) ० **येणे** – पेंढार येणे. (बे.) **गुळ्यास जाणे –** आश्रयार्थ जाणे : 'शत्रूची फौज आली तेव्हा अनागुंदी प्रांतांत गुळ्यांस कोपळचे लोक गेले…' – ऐलेसं ७६६. **गुळ्यास लावून देणे –** आश्रयार्थ कोठेतरी पाठविणे : 'अनेगुंदी व कनकगिरी संस्थानिक यांनी मुलेंमाणसें गुळ्यास लावून दिली… कनकगिरी अगदीं ओस आहे.'–ऐलेसं ४०९६.

गुळेकरी पु. परागंदा; गाव सोडून जाणारी व्यक्ती : 'फिरंग्याच्या हल्ल्याची बातमी अगोदर फुटली असल्यामुळे लोक भीतीनें गुळेकरी बनून पळून गेले.' – वसमो.

गुळेरस पु. नारळाचे दूध व गूळ घालून बनवलेले पिठाच्या गोळ्यांचे एक पक्कान्न. (हेट.)

गुळ्ये न. मासे पकडण्याच्या जाळ्याला वजनासाठी लावलेली चपटी कडी. (को.)

गुळ्ळव्वा स्त्री. १. आषाढातील मंगळवारी करण्यात येणारी कर्नाटकातील ब्राह्मणेतरांची गौरपूजा. २. (ल.) फलकल मारून बसणारी स्त्री.

गुंग वि. १. बेभान; मूढ; धुंद; जड; निपचित (ज्वर, झोप, दुःख, नशा इ.नी.). २. गर्क; तल्लीन; निमग्न (एखाद्या विद्येचा अभ्यास, व्यासंग यात). ३. थक्क; आश्चर्यचकित; मोह पावून परावृत्त; स्तंभित (शास्त्रातील कठीण अंश पुरतेपणी मनात न आल्यामुळे इ.). ४. एखाद्या विषयात एकतानता झाल्यामुळे इतर व्यवसायात अनासक्त, विरक्त [फा. गुंग = तल्लीन, मूक]

गुंगणी स्त्री. गुंगी; झापड (झोप, नशा वगैरेची). पहा : **गुंगी**

गुंगणे अक्रि. १. गुंग करणे; घुमणे; गुणगुण करणे (गांधीलमाशी, भुंगा, भोवरा, जोराने फेकलेला घोडा, गोळा वगैरेंनी) : 'गुंगल गोळे येती छणाछण।' – ऐपो २२३. २. (ल.) हुं हुं हुं असे हळू गाणे; मोठा आवाज न करता तोंडातल्या तोंडात गाणे म्हणणे. [ध्व.]

गुंगणे अक्रि. १. धुंद, जड, मूढ, सुस्त होणे (मूर्च्छा, नशा, झोप यांनी). २. मागे लागणे; भुलणे; वेडावणे. ३. हळूच जाणे; निसटणे; सटकणे. ४. तल्लीन, गर्क होणे; भान विसरणे; निमग्न असणे. ५. गुंग होऊन डुलू लागणे; थक्क होणे.

गुंगविणे सक्रि. १. गुंग करणे; मूढ, मुग्ध, जड करणे. २. गुंगु करायला लावणे. ३. (ल.) एखादी वस्तू पळविणे. ४. (मुलांच्या खेळात) जेरीला आणणे. [गुंगणे प्रयोजक]

गुंगारणे अक्रि. १. सूं सूं करीत जाणे (गोफणगुंडा).२. फसवून फरारी होणे; पळून जाणे; पसार होणे; लबाडीने नाहीसे होणे (गोफणीच्या दगडाप्रमाणे). ३. गुंगीत, धुंदीत, अमलात असणे (औषध, दारू वगैरेच्या). ४. डोळे जड, सुस्त होणे (औषध, झोप यामुळे).[ध्व.]

गुंगारा पु. गुं गुं आवाज; गुणगुण. २. गोफणगुंड्याचा आवाज. [ध्व.]

गुंगारा पु. १. फसवून पळणे; फरारी होणे; फसविणे. (क्रि. देणे, मारणे.) २. (सामा.) नजर चुकवून जाणे; निसटणे.

गुंगावणे पहा : गुंगणे १, २, ४.

गुंगी–ग्या वि. गुंगीत असलेला; गुंगलेला.

गुंगी स्त्री. १. सुस्ती; जाड्य; धुंदी; बेहोशी; झापड (झोप, ताप, दुःख, दारू यामुळे आलेली). (क्रि. येणे, चढणे.) २. भूल, बेशुद्धी (औषधाने येणारी).

गुंगुरडे, घुंगुरडे न. मच्छर, डास, कीटक वगैरे. [का. गुगड]

गुंघाटा पु. गोंगाट; गलबला; आवाज : 'आस्वलें दिवाभीतें सायेळ्या। देती गुंघाटे किंकाळ्या।' – होला ११४. [ध्व.]

गुंज पु. १. कट; 'तिला आपल्या गुंजांत घेतां कामां नये.' – विवि १०.९.२१०. २. जमाव : 'मोंगलाची गुंज बळावली म्हणजे भारी पडेल.' – पेद १.५२. [का. गुंजु]

गुंज न. स्त्री. बिंडा. पहा : **गुंजडा**

गुंज स्त्री. १. एक औषधी वेल, वनस्पती. पाने बारीक व लांबट असतात. गुंजेच्या तांबडी व पांढरी अशा दोन जाती आहेत. तांबडी गुंज विषारी असते. २. गुंजेचे बी. याने सोने वगैरे जोखतात. ३. एक वजन, परिमाण, एका तोळ्याचे ९६ गुंजाभार वजन असते. [सं.] [का. गुंजा]

गुंज, गुंजट न. लाकडाला आलेले टेंगूळ; गाठ. [का. गुंजु.]

गुंज स्त्री. जमाव; जथा; जूट. (वा.) ० **उखळणे –** जमाव उधळणे : 'कळेल तैसे साहित्य करून तेथून गुंज उखले तो अर्थ केला पाहिजे.' – पेद ३.१४६. ० **फोडणे –** १. संशयनिवृत्ती करणे. २. जमाव फोडणे : 'भेटून गुंज फोडून मग दिल्लीकडे येतो.' – पेदभा २९.२५१. ० **बांधणे –** जमाव करणे : 'हफीज कार्तिकमासी गुंज बांधोन दक्षणियांसी जुजणार.' – हिंगणेदभा २.५४.

गुंजट–गुंजार वि. गाठाळ (लाकूड); गुंजाट.

गुंजडा–डी–डे, गुंजारडी पु. स्त्री. न. गोळा; बिंडा; रीळ (फीत, दोरा, दोरी इ.चा). [क. गुंजु]

गुंजडा–डी, गुंजवडा–ला, गुंजाडा स्त्री. पु. वर गुंजा डकवलेला मेणाचा गोळा, गुंडी, चेंडू.

गुंजणे अक्रि. गुं गुं करणे; घोंगावणे (मधमाशी); गुंजारव करणे.[सं. गुंजन]

गुंजलाडू पु. गुंजा चिकटवलेला लाडू : 'द्राक्षलाडू गुंजलाडू।' – वेसीस्व ८.११५.

गुंजवला पु. १. एक वनस्पती. २. चिबुडाच्या जातीचे वाटोळे फळ.

गुंजा स्त्री. अव. पुष्पकोश गळून पडल्यावर राहणारा बीजकोश : 'झाडांना बार फुटतो व मग त्यांच्या गुंजा बाजूनें फळे धरतात.' – पाण.

गुंजा पु. १. गुंज. २. मोदकासारखा एक पदार्थ. (झाडी)

गुंजा स्त्री. 'बुंदी' – (तंजा.)

गुंजाइशी, गुंजाईश–ष–स, गुंजाएस १. उत्पन्न; ऐपत : 'दिवाणाने गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात.' – सभासद २५. २. फायदा. पहा : **गुंजावीस** [फा. गुंजाइश]

गुंजाइशी, गुंजाईश–ष–स, गुंजावीस, गुंजाएस स्त्री. १. सवड; जागा. २. अवसर. ३. त्रुटी. (वा.) **गुंजाईस ठेवणे –** लपवून ठेवणे. [फा. गुंजाइश]

गुंजायश–ष स्त्री. पहा : **गुंजावीस.** १. उपयोग : 'स्वारांची गुंजायश चहू महिन्यात (बर्सातीच्या) नाहीं.' – मइसा ८.४३५४. २. प्राप्ती; नफा. (व.) [फा. गुंजाइश]

गुंजारव पु. १. भुंग्याचा गुं गुं असा आवाज : 'प्रदक्षिणा ते अवघे तिलाहो धरूनि गुंजारव घेति लाहो।' – वामन, वेणुसुधाप्रसंग २, श्लो ३. २. गोड आवाजातले गुणगुणणे : 'मधुकर वन वन फिरत करी गुंजारवाला।' – मानापमान.

गुंजावणे अक्रि. लालभडक होणे : 'अन्याबाच्या डोळ्यातून रक्त भरून ते गुंजावत चालले होते.' – सीपो ३३.

गुंजावा पु. बिंडा; गुंडाळी (सूत, दोरा यांची) : 'सुताचा गुंजावा करी शुद्धला।' – वसा ५८. [क. गुंजु = गुंता]

गुंजावीस स्त्री. पहा : **गुंजाईस, गुंजायश.** १. दोष; अपुरेपणा; व्यंग कसर. २. चूक; तफावत. ३. व्यत्यय; अंतर; कसूर (चाकरी, उद्योगधंदा, काम इ. मध्ये). ४. कूस; बाकी. ५. खोच.

गुंजावीस स्त्री. १. उत्पन्न; नफा; मिळकत; लाभ (धंदा, व्यापार यात). २. बेकायदेशीर नफा; खादगी. ३. उपयोग.

गुंजासी वि. लाभकारक; फायद्याचा : 'हसनाबाद व निलगे हे दोन्ही महाल चांगले गुंजासी आहेत.' – पेद २५.२९५. [फा. गुंजाइश]

गुंजाळ वि. लालभडक : 'त्या पक्ष्याचा तो पांढरा रंग... बारीक गुंजाळ डोळे...' – गणूराया ९८.

गुंजाळी स्त्री. गुंतागुंत.

गुंजी (गो.) पहा : **गुंज**

गुंजुला–लॉ पु. १. गुंजवला. पहा : **गुंजडा**. २. बसलेल्या माणसांचे कोंडाळे, कडे (को.) ३. जमाव; घोटाळा. (गो.) [क. गुंजु]

गुंज्या पु. तिळाची करंजी. (झाडी)

गुंठा पु. एक चौरस साखळीभर जमीन; जमीन मोजण्याचे एक माप; एक चाळीसांश एकर किंवा १२१ चौरस यार्ड; ३३ फूट लांब–रुंद जमिनीचा तुकडा. [क. गुंटे]

गुंड पु. १. वाटोळे भांडे; हंडा; गंज : 'तेव्हां ठेवी चुलीवर गुंड पाण्याचा राही तत्क्षणी।' – अफला ५६. २. (ल.) खरडा; मोत्याचा पुढे आलेला भाग, गाठ. ३. वाटोळा दगड; गुंडा; गोटा. (सामा.) घडीव दगड : 'वरि यमनियमेंसीं गुंड घडिले।' – स्वादि ७.३.५४. ४. गोळा (लोखंडी, दगडी). ५. लाकूड, कोळसा मोजण्याचे ५६ पौंडी वजन. (तंजा. मद्रास) [क.]

गुंड पु. तोफेचा बार.– (तंजा.)

गुंड पु. (विणकाम) हत्त्या नावाच्या चौकटीखालचे लाकूड.

गुंड वि. १. मवाली, समाजकंटक. २. वस्ताद; कावेबाज; धूर्त. ३. चतुरस्त्र; हरहुन्नरी; हुशार; तरबेज.

गुंडगडगी स्त्री. लिंगायतांच्या गळ्यातील लिंगाची पेटी. [क.]

गुंडगळे–गाळे–गुळे, गुंडगे–गी, गुंडगोळे न. लहान गुंड; गुणगळे; मातीची गुंडगी : 'एक थाळी, लोटा–फुलपात्र, गुंडगोळे ही पितळेची... भांडी...' – चंद ३५. २. (ल.) ठेंगू, ठुसका माणूस.

गुंडणे उक्रि. १. बांधणे; गुंडाळणे; वळकटी करणे; लपेटणे : 'तया गुंडलिया प्रकाशा। क्षेत्रज्ञु नाम ।।' – ज्ञा १४.७९.

गुंडणे अक्रि. गोत्यात येणे; गंडवले जाणे.

गुंड(डे)री स्त्री. ब्राह्मीसारखी एक वनस्पती. (गो.)

गुंडळा वि. गोल अंगाचा; गुटगुटीत.

गुंडळी–ळे, गुंडाळे स्त्री. न. गुंजडी; गुंडाळा; वळकटी; बिंडा; एकावर एक वेढून केलेला गोळा (कागद, कापड, दोरी इत्यादीचा).

गुंडा पु. १. वाटोळा, मोठा गोटा, दगड : 'जैसा पर्वतावरौनी वोहटलिं गुंडा लोटित तयांसि तळवटा। यावया वेळ न लगे तैसा।' – चक्रधर, सिद्धांतसूत्रें पू. ५२. २. (ल.) मोठा गुंड; एक भांडे : 'दोंच घागरीचा गुंडा नित्य घ्यावे।' – रामदासी २.३५. ३. (बांधकाम) माठीव चौरस दगड; चिरा; मोठी खांडकी. ४. (कुंभारी) मडक्यांना आकार द्यायचा

दगड. हा मडके घडविताना मडक्याच्या आतील बाजूला धरून बाहेरून लाकडी पट्टीने ठोकतात. ५. जोत्याचा मधला थर; बेंदरीच्यावर पायाशी ओळंब्यात बांधलेले दगडी काम. ६. (कुंभारी) चाकाचा मधला ठोकळा. याच्यावर मातीचा गोळा ठेवून त्याला आकार देतात. ७. बिंडा; गुंडी; गुंजडी (सूतदोऱ्याची). [क. गुंडु]

गुंडा वि. १. धूर्त हरहुन्नरी, हरकामी माणूस.अतिशय शहाणा, हुशार : 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिही लोकीं झेंडा।' – तुगा. २. (वाईट अर्थानेही योजतात) सोदा; ठक. [क. गुंड]

गुंडाळणी स्त्री. उसाची पाती उसाभोवती गुंडाळण्याचे काम; ऊसबांधणी.

गुंडाळणे उक्रि. १. वळकटी करणे; (दोरी इत्यादीने) लपेटणे; वेष्टणे. २. एकत्र गोळा करणे. ३. आवरणे; आटोपणे; बंद करणे, (उद्योग, कामधंदा). ४. (सामा.) व्याप्ती कमी करणे. ५. आच्छादणे; वेढणे. अक्रि. १. गुंडाळले जाणे. २. (पंचप्राण एकत्र आल्यामुळे) मरणे. [सं. गुंठ = वेष्टणे] (वा.) **गुंडाळून ठेवणे –** न जुमानणे; बाजूला सारणे : 'प्रसंग पडला म्हणजे युक्तिवाद गुंडाळून ठेवणारी सुधारक मंडळी दृष्टीस पडते.' – लोटिकेले ४.१३८.

गुंडाळणे उक्रि. १. पराजित करणे; कुंठित करणे; निरुत्तर करणे. २. हाताखाली घालणे; बळकावणे; काबीज करणे (परका देश, माल इ.).

गुंडाळा–ळी–ळे पु. स्त्री. न. १. वळकटी; रुळी; भेंडोळे; बिंडा; बंडल (कागद, कापड, दोरा इ.चे). २. गाठोडे; गाठ. ३. (विशेषत: गुंडाळे, निंदार्थी) वेडेवाकडे गुंडाळलेले पागोटे, रुमाल. ४. दोऱ्याची गुंतागुंत व त्याचा गोळा; कसेतरी अस्ताव्यस्तपणे एकत्र बांधणे; सटरफटर मालाचे बोचके : 'ईश्वरें मोठें सूत्र केलें। मनुष्यमात्र गुंतोन राहिले। लोभाचें गुंडाळें केलें। उगवेना ऐसें।।' – दास १७.२.३०. ५. फेरा; भोवती फिरविणे; हात (पट्ट्याचे) : 'पट्ट्याचा गुंडाळा मारिला।' – ऐपो १९. ६. (ल.) गोंधळ; गुंतागुंत.

गुंडाळी फलक गुंडाळी करता येण्यासारखा कॅनव्हास कापडाचा फळा.

गुंडिका स्त्री. घोकंपट्टी; संथा; पुन्हा पुन्हा वाचणे व म्हणणे; घोकणे; उद्धोष : 'तिनें जशी कांहीं पत्राचीं पाठांतरें किंवा गुंडिकाच केल्या.' – नवलपूरचा संस्थानिक, प्रकरण ५. [सं. गुणनिका]

गुंडिणे क्रि. (वस्त्रांनी) सजविणे.

गुंडी स्त्री. एक वनस्पती; जाफरीची गुंडी.

गुंडी स्त्री. १. लहान गुंड, भांडे; लहान चरवी; कासंडी. [ते. क.] २. बिरड्यात अडकवण्याची गोळी, गाठ; बटन (अंगरखा, कोट यांचे). ३. पेंढी (पेंढा, गवत इ. ची). (को.) ४. बिंडा; गुंडा; गुंडाळा (दोरा, सूत इ. चा). (को.)

गुंडी स्त्री. युक्ती : 'तरस मरावा म्हणून मेटकऱ्यांनी ही गुंडी केली.' – वामा ४३. [क. गुंड.] (वा.) **० घालणे, देणे –** म्हशीने पान्हा सोडावा म्हणून तिची शेपटी तिच्या योनीत घालणे.

गुंडीचा विडा केळीच्या सोपटाने बांधलेले दोन विडे, पट्ट्या. (बडोदे)

गुंडीदार वि. गुंडी असलेला (अंगरखा). पहा : **आंगरखा**

गुंडूरलावा पु. होला. (झाडी)

गुंडे न. चेंडू; गोळा; बिंडा; पिंडा (सूत, सुंभ, दोरी वगैरेचा). (कु.)

गुंडेरी स्त्री. गंडेरी; उसाचे करवे : 'कोणी उसाची गुंडेरी चोखतात.' – सामा २००.

गुंडो पु. वरवंटा; दगडधोंडा. पहा : **गुंडा** (कु.)

गुंडोरा पु. गुंडाळे. (झाडी)

गुंढल स्त्री. गुंडी. (गो.)

गुंढा पु. १. दगड. २. मर्यादा : 'कर्मा अकर्माचे गुंढे। घातले दोहिं कडे।' – राज्ञा १३.४८.

गुं(गु)त स्त्री. गुंतणे. पहा : **गुंता** : 'या सेताची गुत सिलक असेल त्याची किंमत...' – मसाप २.१७७. [सं. ग्रथित]

गुंतणु(णू)क स्त्री. (क्व.) अडवणूक; गुंतागुंत; गोंधळाची, घोटाळ्याची स्थिती.

गुंतणे अक्रि. १. अडकणे; अडणे; एकमेकात अडकणे. २. (ल.) एखाद्या व्यक्तीच्या मायेत अडकणे. [सं. गुंत] (वा.) **गुंतत बोलणे –** अडखळत, घुटमळत बोलणे; अडखळणे.

गुंतले न. गुंता; गुंतागुंत; गुंताड–डा : 'तूटे बंधमोक्षाचें गुंतलें एथ।' – राज्ञा १८.३१७.

गुंतवण स्त्री. बांधला जाणे; एखादे काम, व्यवसाय इत्यादीत अडकणे.

गुंतवणूक स्त्री. कारखान्यात, उद्योगधंद्यात पैसा घालणे : 'त्यामुळे भांडवल गुंतवणुकीस पैसा उपलब्ध झाला.' – कर १२.

गुंतव(वि)णे सक्रि. मन कामात घालणे; अडकवणे : 'थोरल्या बंधूंच्या बरोबर दौलतीच्या कामात ते आपलं लक्ष गुंतवत होते.' – राऊ १५.

गुंतवळा पु. गुंतागुंत : 'अनेक प्रश्नांच्या गुंतवळ्यात...' – ही वाट २२.

गुं(गु)ता, गुं(गु)ताडा, गुंतोळा पु. १.अनेक वस्तू एकमेकीतून सहज वेगळ्या करता येणार नाहीत अशा प्रकारे मिसळणे. २. शेंडी, वेणीतील गुंतवळ, ३. गुंतागुंती (केस, दोरा इ.); गुंतलेली स्थिती.

गुं (गु) ता, गुंतारूता पु. १. अटकाव; अडथळा; खोटी; प्रतिबंध. २. (ल.) अडचण; हरकत; नड : 'ह्यामधिं कांहीं गुंता नाहीं.' – ऐपो ३२. ३. (ल.) सुतक. [क. गुत्त] (वा.) **गुंतुन पडणे –** सुटका न होणे; अडकून राहणे; हातातले काम टाकून जाता न येणे.

गुं (गु) ता–ड पु. न. (भात, सावा, हरीक वगैरेचे) मळणीनंतरचे तृण, गवत, कचरा. १. (भात, सावा, हरीक वगैरेचे) मळणीनंतरचे गवत, कचरा. २. शिवऱ्यावरून आयंडा काढला व बुंध्याची दोरी सोडून शेंड्याला बांधून तो हलवला की खाली पडतात त्या भाताच्या बारीक पाती.

गुं (गु) ता पु. ब्याद; लचांड. (ना.)

गुं (गु) ता पु. लढा; तंटा.

गुंतागुंत स्त्री. १. गुंता; गुंताड. २. गळफाटा; घोटाळा; गोंधळ; घोळ.

गुंतापणे अक्रि. गुंतणे. (बे.)

गुंतावळ स्त्री. सहज न समजणारी गोष्ट; किचकट गोष्ट; गुंतागुंत : 'केवढ्या नात्यांची गुंतावळ...' – लपव १०९.

गुंताळा पु. गुंतागुंत.

गुंती स्त्री. १. प्रतिबंध; अडचण; गुंता; बंधन : 'ज्ञानदेवा सार सांवळिये मूर्ति निवृत्तीनें गुंति उगविली।' – ज्ञागा १४६. २. गरज. ३. (ल.) ओढा; पाश : 'ज्यांची तुज गुंती। ते तों मोकलिती अंतीं।' – तुगा २६८०. (वा.) ० **पाडणे** – अडचण आणणे; संकटात ढकलणे : 'मग बोले प्रभावती। त्वांचि मजसी पाडिली गुंती।' – कथा १.५.२१४.

गुंथाडे न. गुंतागुंत. पहा : **गुंताडा** : 'तत्त्वांचें गुंथाडें जालें।'– दास ९.७.२१.

गुंद, गुंदणी न. स्त्री. भोकर; गोंधण; सेलवट; एक झाड. [गु. गुंदी]

गुंधाळा पु. एक प्रकारचे भांडे; गुंडा.

गुंपणे पहा : **गुंतणे** : 'गुंपले नुगवे मन चरणीं।' – गीता १.८३.

गुंपा पु. बंधन; गुंतागुंत : 'आवडीचा मंत्र सांगितला सोपा। जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें।' – तुगा १.३६९.

गुंपिरे न. जाळे; सापळा : 'तरि दाहीक हें संसारें। सर्वे मांडिलेंसे जे गुंपिरे।' – राज्ञा १८.९५१.

गुंफण स्त्री. वेणी; विणणे; वीण; वळणे.

गुंफणी स्त्री. १. गाठण; गाथण; गोवणी; ओवणी. २. वेणी; वीण.

गुंफणे सक्रि. १. माळेत एकत्र आणणे; गाठणे; माळ करणे; गोवणे. २. वेणी घालणे; वळणे. ३. जोडणे; जुळणी करणे; रचणे.[सं. गुंफ]

गुंफणे अक्रि. घोटाळ्यात पडणे; गुंतणे : 'ऐसें विचारतां विचक्षण। गुंफोनि ठेले।।' – ज्ञा ४.८२.

गुंफा स्त्री. १. लताकुंज; पर्णकुटी; फांद्यांची बनवलेली झोपडी : 'ऋष्यशृंग अतिविकळ। आला तत्काळ गुंफेसी।' – भाराबाल २.१२. २. गुहा; दरी. ३. गुंतागुंत : 'आवडीचा मंत्र सांगितला सोपा। जेणें नोहे गुंफा कांहीं कोठें।' – तुगा ४८७. (वा.) **गुंफेत ठेवणे** – मूठमाती देणे; समाधी देणे. [सं. गुहा]

गुंफा पु. मुलांचा एक खेळ.

गुंफाई सुतापासून, लोकरीपासून वस्त्र विणण्याची पद्धत.

गुंफाटणे उक्रि. घाईघाईने उरकणे; बिघडवणे; चालढकल करणे; वरवर करणे. पहा : **गोफाटणे**

गुंफिरा–रे पु. न. गुंताडा; गुंतागुंत; जाळे : 'परी चोज हें धनुर्धरा। जे एवढा हा गुंफिरा।' – ज्ञा १४.२८४.

गुंबज–द पु. घुमट. [फा. गुंबद]

गुंसाई पु. १. गोसाई; गोसावी; साधू; हरिदास. पहा : **गोसावी**. २. देऊळ, मठ इ. चा मुख्य; महंत.

गू पु. १. विष्टा (मनुष्याची); हाग. २. धातूचा गंज; मळ. ३. डोळ्यातील पू, मळ. ४. (ल.) दारू. [सं.] (वा.) **गूकाडी करणे** – १. काडीने गू चिवडणे. २ (ल.) एखाद्याचे दोष पुन: पुन्हा उच्चारणे. ३. (ल.) अतिशय त्रास देणे. ४. (ल.) अतिशय अपकीर्ती करणे. ५. (ल.) नासवणे; बिघडवणे; खराब करणे. (वा.) ० **चिवडणे** – वेडे होणे; बावचळणे. ० **जाळणे** – १. अंगातील पिशाच्च जाण्यासाठी अंगात येणाऱ्यापुढे विष्टा जाळण्याचा प्रयोग. २. एखाद्याला अगदी खिजविणारे, अपमानाचे, चिडविणारे कृत्य करणे. ० **जाळून धूर घेणे** – वाईट कृत्य करून त्याचा आनंद मानणे, त्याची मौज करणे, पाहणे. **गुवावरून ओढणे** – अतिशय फजिती, अपमान करणे; छीथू करणे.

गूघाण स्त्री. वाईट परिस्थिती. (वा.) ० **करणे** – नासणे; बिघडणे. वि. वाईट; त्याज्य.

गूज न. गुप्त गोष्ट; गुह्य. हित, निज या शब्दांशी जोडून उपयोग. पहा : **गुज** : 'बरें पाहतां गूज तेथेचि राहे।' – राम १५५. [सं. गुज]

गुजबेरी स्त्री. (वन.) एक प्रकारचे फळ.

गूड–ढ न. १. कणसासकट बांधलेली पेंढी, जुडी (जोंधळा, बाजरी वगैरेंची). २. गंजी; ढीग; रास; सुडी. (खा.) ३. कडब्याची वगैरे उंच व देवळाच्या शिखरासारखी रचलेली गंज. (व.) पहा : **गुड** [कर. गुड्ड = डोंगर, गुडी = देऊळ]

गूढ न. १. कूट; कोडे. २. ग्रंथातील, लेखातील कठीण स्थळ; मेख. ३. पेच; पंचाईत. ४. गुप्त गोष्ट; गुह्य : 'म्हणौनि आघवींचि गूढें। जें पाऊनि अति उघडें।' – ज्ञा ८.१३५२.
वि. १. गहन; दुर्ज्ञेय; दुर्बोध; अगम्य (विद्या, शास्त्र) : 'तया हा परमार्थ गूढ।' – ज्ञा ३.१७९. २. खोल; गुप्त; अज्ञात (काम, गोष्ट.) [सं.] (वा.) ० **वाटणे, दिसणे, पडणे, गूढात पडणे** – विचारात पडणे; कोडे, पेच पडणे.

गूढ अर्थ पु. १. पुरलेला ठेवा; भूमिगत द्रव्य : 'गूढ अर्थसंचयाच्या भ्रमाने कोणी... घरांतील जमीन ठोकठोकून पहावी...' – नि ७९६. २. गुप्त गोष्ट, हेतू, अभिप्राय.

गूढगुंजन न. गहन, कूटात्मक पण भावगर्भ असे काव्य; ज्याचा अर्थ फार खोल आहे व ज्यामध्ये अधिक अर्थ गर्भित आहे असे लेखन; कल्पना.

गूढचार पु. गुप्त बातमीदार; हेर; गुप्त पोलीस.

गूढज, गूढपुत्र, गूढोत्पन्न पु. १. (कायदा) हिंदूधर्मशास्त्राप्रमाणे बारा पुत्रांपैकी चौथा. २. बेबाप्या; बापाचा पत्ता नसलेला.

गूढजत्रू वि. फोपशा; लठ्ठनिरंजन (ज्याच्या खांद्याचे हाड मांसात गुप्त झाले आहे असा). [सं. जत्रु = खांद्याचा सांधा]

गूढणे सक्रि. समाविष्ट होणे; व्यापणे : 'दर्पु कामक्रोधीं गूढला।' – ज्ञा १६.३९६.

गूढणे अक्रि. गुप्त राहणे : 'जैसें नक्षत्रीं गगन गूढलें।' – राज्ञा ११.२८१.

गूढलेखन न. सांकेतिक भाषेतील लेखन.

गूढवाद पु. (तत्त्व) गूढवादाच्या धारणा आणि अनुभूती; ईश्वर आणि अंतिम सत्य ह्यांचे ज्ञान, मन आणि इंद्रिये यांच्या पलीकडचे असून ते चिंतनाने किंवा आत्मदृष्टीने प्राप्त होऊ शकते अशी धारणा व शिकवण.

गूढ विद्या स्त्री. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणण्याची विद्या.

गूढशक्तिवाद पु. (तत्त्व.) काही गूढशक्तींच्या मदतीने निसर्गाचे नियंत्रण करता येते अशी श्रद्धा.

गूढसाक्षी पु. (कायदा) गुप्त साक्षीदार.

गूढस्थल स्त्री. कैद; बंदीखाना : 'समक्ष बोलणे व्हावे ते झाले म्हणजे दादासाहेब गूढस्थलीहून निघणार.' – ऐलेसं १७७१.

गूढस्मृति–ती स्त्री. (वै.) अल्प स्मृतिभ्रंश; काही वेळाने आठवणे. [सं.]

गूढार्थ पु. समजायला कठीण असे ग्रंथ, लेख इत्यादीतील भाग. वि. दुर्ज्ञेय; दुर्बोध. [सं.]

गूत–थ १. गुंतागुंत; तिढा; गाठ : 'दीर्घकाळ ग्रथित (मराठी भाषेची) तिची जी गूत ती हाती घेऊन तिचे पदर सोडवून काहीतरी उकलण्याच्या धोरणात आणून बसवावी.' – दामभाव्या प्रस्ता. २१.२. अव्यवस्थितपणे पडलेले, तुडवलेले गवत; गुरांनीच खाण्याजोगे झालेले गवत. (को.) ३. भाताण्याचा पेंढा बांधताना त्यातून खाली पडणारे भाताण्याचे लहान लहान तुकडे. ४. गुंतवळ. [सं. ग्रथित]

गूत स्त्री. गाठ, टेंगूळ.

गूथ स्त्री. सूज. (व.)

गूद पु. १. कंडू; खाज; आग (क्रि. येणे, सुटणे) २. (ल.) जोर; भर; चढ (रोग, साथ, पाऊस इ. चा).

गून, घून वि. कुबडा; पोक आलेला. – (तंजा). [क. गूनु = पोक]

गूम वि. नष्ट; गहाळ; गुप्त : 'इनामतीच्या सनदा अलाहिदा आपल्यापाशीं आल्या होत्या त्या फित्रतीकरितां गूम जालिया.' – वाडसनदा १४०. स्त्री. गुप्त गोष्ट. (गो.) [फा. गुम]

गूमसूम गुपचूप : 'चिंधी तंबाखूची गुळणी तोंडात असल्यासारखी बसून राहिली गूमसूम.' – जैत ७४.

गूमाणूस पु. घाणेरडा, अव्यवस्थित माणूस.

गूल पु. जरीची वीण. (गो.) [फा. गुल = फूल]

गूल स्त्री. १. दंगल; आरडाओरडा; गलगा : 'तीन रोज उपवास लश्करांत गूल एकच जाहाली.' – पेद २०.१७६. २. (ल.) बोभाटा; प्रसिद्धी; जाहीरपणा : 'रात्रींच गूल झाली असती तर फार वाईट होतें.' – बाळ २.१२७. [फा.]

गूलखिळा पु. मोठ्या दरवाजात ठोकता येणारा रोंदाचा खिळा.

गूलगलबा पु. दंगा; बखेडा : 'खंबायतकर मोगल उगेच सरकारचे महाल खाऊन गूल गलब्याचे वेळेस हे शैत्य होतात.' – ऐटि १.८०.

गूलडाग पहा : **गुल्लडाग**

गूळ पु. उसाचा रस आटवून केलेला घन पदार्थ; साखरेचा कच्चा प्रकार, अवस्था. [सं. गुड] [क. गुळ] (वा.) **० करणे –** उपहास, निंदा करणे. **० देणे, हाती देणे –** १. लालूच दाखवणे; लाच देणे. २. फसवणे; भुरळ घालणे; झुलवणे; तोंडावर हात फिरवणे. **गूळपुऱ्या वाटणे** – हौस पुरवणे.

गूळकैरी स्त्री. गूळ घालून केलेले बिनमोहरीचे आंब्याचे लोणचे. (व.)

गूळखोबरे न. १. गूळ आणि खोबरे यांचा खाऊ. २. (ल.) निव्वळ फसवणूक; लाच; लालूच : 'गूळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनासि बाळक वळावा।' – मोउद्योग ७.९. ३. (ल.) पोकळ भाषण, वचन. (वा.) **० देणे –** लालूच दाखविणे.

गूळदगड, गूळधोंडा पु. १. गुळाच्या ढेपेत सापडणारा दगड : 'गुळासारिखा गुळदगड। परी तो कठिण निचाड।' – दास ८.५.४७. २. (ल.) ढोंगी, कपटी मनुष्य.

गूळध (धा–धि–धु–धे) वा, गूळदेवा, गूळधावी पु. केवळ तांबडा नव्हे, केवळ पांढरा नव्हे असा मिश्र रंग; गुळी रंग. वि. अशा रंगाचा (मोती इ. पदार्थ.).

गूळधानी वि. लालसर; गुळधवा रंगाचा (मोती).

गूळपापडी स्त्री. १. एक पक्वान्न; गुळात पाकवलेल्या रव्याच्या वड्या. २. गुळाच्या पाकात भाजलेली कणीक वगैरे घालून केलेले लाडू. (राजा.) ३. (ल.) एखाद्याने मागे अपराध करून समक्ष गोड गोड, कपटी भाषण करणे; गुळगुळ थापडी. [क. गुळ्वापटि]

गूळपीठ न. एकमेकांचा दाट स्नेह; मेतकूट; एकी; सलोखा; एकविचार.

गूळमारी स्त्री. उसाच्या प्रत्येक मळ्यापाठीमागे साडेबावीस शेर गूळ असा घेण्यात येत असे तो कर.

गूंडणे सक्रि. आच्छादणे; गुंडाळणे : 'गूंडूनि घेतला पटीं। रत्नदीपु ।।' – राज्ञा १३.१००५.

गृध्र पु. १. गिधाड. २. (उप.) वृद्ध मनुष्य. गिधाडाला फार आयुष्य असते यावरून. [सं.]

गृध्रव्यूह पु. गिधाडे आपल्या भक्ष्याभोवती ज्याप्रकारे वेढा घालतात तशी सैन्यरचना : 'गृध्रव्यूह सैन्य रचावे। गृध्रास देखून स्वभावे। गरुड नये त्या स्थळीं।' – जे १२.९३.

गृध्रावलीनक न. (नृत्य). पाय थोडा गुडघ्यात वाकवून पाठीमागे पसरणे व दोन्ही हात पुढे पसरणे.

गृह न. घर; सदन; आलय; आगर; मंदिर; मकान. [सं.]

गृहकच्छप पु. कासवाच्या पाठीच्या आकाराचा दगडी पाटा, खल.

गृहकलह पु. भाऊबंदकी; घरगुती तंटा; यादवी; अंतःकलह.

गृहकार्य न. (शिक्षण). १. पहा : **गृहपाठ.** २. पालकांनी मुलांवर टाकलेली जबाबदारी व त्यांना करायला सांगितलेले काम.

गृहकृत्य न. घरातील दैनंदिन कामे.

गृहखाते न. देशातील किंवा राज्यातील अंतर्गत सुव्यवस्था, कायद्याची अंमलबजावणी इ. कारभार पाहणारा सरकारी विभाग.

गृहछिद्र न. १. कुटुंबातील दोष, व्यंग, उणेपणा; खाजगी वाईट गोष्टी; वर्मेकर्मे. (क्रि. काढणे, बोलणे.) : 'श्रीमंतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हे जवळजवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदित असतें.' – नि २. (ल.) घरातील फूट, भेद, बेबनाव; ज्यामुळे तिऱ्हाइताचा शिरकाव किंवा फायदा होईल अशी घरातील गुप्त, नाजूक गोष्ट.

गृहजात पहा : **गृहदास** २

गृहजीवशास्त्र न. पाकक्रियादी संसारातील गोष्टींची माहिती.

गृहदास पु. १. घरातील चाकर, गुलाम. २. (हिंदुकायदा) दासीपुत्र.

गृहनौका स्त्री. शिकारा, हाऊसबोट.

गृहपाठ पु. शाळेतील शिक्षकाने विद्यार्थ्यांना घरी करायला दिलेला अभ्यास.

गृहपाल पु. खानसामा; कोठावळा; वाकनीस.

गृहप्रवेश पु. १. नववधूने सासरी प्रथम प्रवेश करणे. २. नव्याने बांधलेल्या घरात राहायला जाणे.

गृहभंग पु. घर, कुटुंब, पेढी, मंडळी इ. ची फूट; वाताहत; नाश; मोड; घरादाराचा सत्यानाश. [सं.]

गृहभूमि–मी स्त्री. घराची जागा.

गृहभेद पु. १. यादवी. पहा : **गृहकलह.** २. गृहछिद्रे, घरातील बिंगे कळण्यासाठी घरात भांडण लावणे. ३. घरफोडी; दरोडा. [सं.]

गृहभेदी वि. १. घरात, कुटुंबात भांडणे लावणारा, उत्पन्न करणारा; घरभेद्या. २. घरातील बिंगे माहीत असणारा. ३. चोर; दरोडेखोर.

गृहमंडन न. घराची मांडामांड करणे; घर सुव्यवस्थित राखणे; सुशोभित, अलंकृत, सज्ज ठेवणे.
वि. घरातील कर्ता पुरुष; घराला भूषणभूत असा माणूस; घराचा अलंकार. [सं.]

गृहमंत्रि–त्री पु. १. गृहखाते ज्याच्याकडे असते असा मंत्री; देशातील, राज्यातील शांतता आणि सुव्यवस्था यांची जबाबदारी सांभाळणारा मंत्री. २. (ल.) घराची जबाबदारी सांभाळणाऱ्या गृहिणीला थट्टेने म्हणतात. [सं.]

गृहरत्न न. (ल.) मुलेबाळे. [सं.]

गृहलक्ष्मी स्त्री. घरातील कर्ती सुवासिनी स्त्री.

गृहविच्छेद पु. कुटुंब निर्वंश होणे– करणे; वंशक्षय; कुलक्षय. [सं.]

गृहविज्ञान–शास्त्र न. गृहिणीस उपयुक्त असलेल्या सर्व गोष्टी शिकविणारे शास्त्र. उदा. पाकशास्त्र, गृहसजावट, गृहव्यवस्थापन इ.

गृहशांति–ती–शुद्धि–द्धी स्त्री. घराच्या शुद्धीकरणाचा धार्मिक विधी; वास्तुशांती; भुतेखेते, विटाळ, रोग इ. च्या नाशासाठी केलेला धार्मिक विधी. [सं.]

गृहसचिव पु. (राज्य.) गृहखात्याचा चिटणीस.

गृहसंपत्ति–त्ती स्त्री. १. गृहसौख्य; घर चांगले असण्याचे सौख्य. २. मोठा घर खटला; मोठे कुटुंब; मोठा परिवार.

गृहस्थ पु. १. घरबारी; घरसंसार असणारी व्यक्ती; गृहस्थाश्रमी; चार आश्रमांपैकी दुसऱ्या आश्रमातील व्यक्ती (संन्यासी, अरण्यवासी नव्हे). २. सपत्नीक; सहकुटुंब; कुटुंबवत्सल; प्रापंचिक. ३. कोणताही माणूस, इसम, व्यक्ती. ४. भिक्षुक नव्हे तो. ५. कुलीन; सभ्य; भला.

गृहस्थगिरी–पणा, गृहस्थाई, गृहस्थी पु. स्त्री. १. माणुसकी; सभ्यता; भलेपणा. २. गृहस्थवृत्ती; गृहस्थाचे कर्तव्यकर्म, आचरण; घरसंसार.

गृहस्थधर्म पु. गृहस्थाश्रम; गृहस्थाची कर्तव्यकर्मे, वर्तन, वागणूक : 'श्रीकृष्ण म्हणे सूता सर्वांत गृहस्थधर्म सन्मत रे।' – मोउद्योग ३.२३.

गृहस्थाश्रम पु. चार आश्रमांपैकी दुसरा आश्रम. पहा : **गृहस्थधर्म**

गृहस्थी वि. गृहस्थाविषयीची (रीत–भात, वेष, भाषण, डौल, बाणा इ.).

गृहस्थी अक्षर सुबोध, ठसठशीत, ऐटबाज अक्षर; व्यवहाराला योग्य असे लेखन.

गृहस्थी कावा–खर्च १. घरगुती खर्चाचा बेतबात; टापटीप. २. घराची आर्थिक, पैशासंबंधी नीट व्यवस्था; मितव्यय.

गृहस्थी बाणा १. गृहस्थाची वृत्ती; गृहस्थ धर्म. २. टापटिपीची, व्यवस्थितपणाची वागणूक.

गृहस्थी बेत पहा : **गृहस्थी बाणा**

गृहांगना, गृहिणी स्त्री. धरधनीण; घर मालकीण; पत्नी; बायको.

गृहीत वि. १. धरलेले; पकडलेले; घेतलेले. २. मनात धरलेले; समजलेले. (क्रि. धरणे.)

गृहीत न. (शिक्षण.) सर्वसामान्यत: स्वीकृत करण्यात आलेला व तर्काला पायाभूत असणारा सिद्धांत अथवा नियम; स्वत: सिद्धतत्त्व.

गृहीतक न. (तर्क.) एखादी गोष्ट सिद्ध करण्यासाठी किंवा प्रत्ययाला आणून देण्यासाठी एखादी अन्य गोष्ट सत्य असल्याचा पूर्वदावा; शास्त्रीय, तात्त्विक व्यवस्थेसाठी स्वीकारलेली काही पायाभूत तत्त्वे.

गृहीतकृत्य न. १. (तत्त्व). युक्तिवादाकरिता स्वीकारलेला प्रस्ताव; तथ्ये किंवा घटना यांचा संदर्भ देऊन एखादी गोष्ट सिद्ध वा असिद्ध करण्याविषयीची उपपत्ती. २. मानलेले तत्त्व; ज्याला पुरावा नाही पण जे सोयीस्कर म्हणून स्वीकारले आहे असे तत्त्व : 'साऱ्या व्यक्ती समान आहेत हे समाजसुधारणेच्या मुळाशी असलेले गृहीतकृत्य होय.' – चिलेसं (प्र) ३३.

गृहीततत्त्व न. (तर्क.) तार्किक प्रणालीतील असिद्ध आधारविधान.

गृहोद्योग पु. पापड, लोणची इ. संसारोपयोगी वस्तू तयार करण्याचा व्यवसाय.

गृह्य वि. १. घरगुती; खासगी : 'सार्वजनिक गणेशोत्सव वैयक्तिक किंवा गृह्य उत्सव नाहीं.' – के १९.८.४१. २. पाळीव; माणसाळलेले.[सं.]

गृह्यसूत्र न. गृहस्थाने करायच्या घरगुती धार्मिक कर्मांची माहिती ज्यात सूत्ररूपाने दिली आहे असा हिंदू धार्मिक वाङ्मयाचा एक भाग. आश्वलायन, कौषितकी व शांखायन ही ऋग्वेदाची गृह्यसूत्रे आहेत.

गृह्याग्नि–ग्नी पु. प्रत्येक त्रैवर्णिकाने लग्नानंतर किंवा वेगळे बिऱ्हाड केल्यानंतर निरंतर पाळायचा अग्नी. विवाहानंतर वधूसह गृहप्रवेश करतेवेळी ज्या अग्नीवर होम करायचा असतो तोच अग्नी पुढे निरंतर जतन करून ठेवायचा असतो व त्यावर नित्य सकाळ–संध्याकाळ होम करायचा असतो. [सं.]

गे उद्गा. १. 'अगे' या संबोधनाचे संक्षिप्त रूप : 'तो गे ! तोचि राम सर्वत्र पाहे।' – राम २००. २. म्हशीला बोलावण्याचा शब्द. (व.)

गेचक, गेचकळ न. १. झाड, खुंट यांचे बेचके, बेळके. २. हात, पाय यांच्या दोन बोटांमधील जागा; बेचकी.

गेचु(चो)डी स्त्री. (व.) पहा : **गोचीड**

गेज पु. माप; मापण्याचे साधन; (आगगाडीसंबंधी) आगगाडीच्या दोन रुळांमधील कमीजास्त अंतर. [इं.]

गेज, गेजमाळ स्त्री. गौरीला, देवाला वाहायची कापसाची माळ; वस्त्र; कापसाळे; सूतपुतळी. यात मध्ये थोडासा कापसाचा पुंजका, नंतर वातीप्रमाणे बारीक, नंतर पुन्हा पुंजका अशा प्रकारे पेळू घेऊन वळतात. मधल्या वातीसारख्या बारीक भागाला हळद–कुंकू लावतात.[क. गेज्जे]

गेजग्लास पु. (यंत्र) बॉयलरमधील पाणी व वाफ बरोबर दाखवणारी नळी; गेजचेंबर. [इं.]

गेट न. १. दार; फाटक (बंगल्याच्या आवाराचे, बाहेरचे). २. चौकी; देवडी. ३. पोलिसचौकी. [इं.]

गेट(ठ)ण न. बैलाच्या गळ्यातील वळलेला दोर, पट्टा. याला ठोकडा किंवा घाट बांधतात. यावरून घाटपट्टा असेही म्हणतात.

गेटम पु. न. १. जाडेभरडे लोकरीचे जाजम; रग; ब्लँकेट : 'मांजिष्ट भोजिष्ट धारिवट। गेटम जातीचे पटनिघोट।' – मुसभा १५.२२०. २. सुताचा झोऱ्या; बोऱ्या; तढव; सुताडा. (खा. व.) [हिं. गीटम]

गेठा पु. कंबर व पाय यांना (गुडघ्याखाली) उपरणे गुंडाळून बसण्याची पद्धत. (क्रि. मारून बसणे.) पहा : **जेठा**

गेठा–टा पु. १. बैलाच्या गळ्यातील रंगीबेरंगी मण्यांची अगर कवड्यांची माळ. २. कानातील एक दागिना. 'कानीं घालुनी गेठे हो।' – मध्व ३९. ३. खंडोबाच्या गळ्यातील चांदीचा एक अलंकार. पहा : **गाठा, गाठ्या** (खा. व.) (सामा.) चांदीचा एक दागिना. हा अलंकार जेवताना कानावर ठेवावा लागतो : 'महार पोरग्याचे गळ्यात गेठे।' – अफला ६६.

गेठू पु. लग्न इ. वेळी मांडवाच्या मुहूर्तमेढीला (त्यात सुपारी, हळकुंडे घालून) बांधायचे फडके. (व.)

गेड पु. १. जाड लाकडाचा तुकडा. २. उसाचा पेरावयाचा तुकडा.

गेडना क्रि. तुकडे करणे. (झाडी.)

गेडमिळे न. स्त्री. (विणकाम) मागावरील ताणाच्या खाली (वहीच्यापुढे) असणाऱ्या अडसराची दोन टोके ज्यात बसवतात ते दोन उभे खुंट.

गेड (डू) र पु. एक मासा. (को.)

गेडी स्त्री. १. पाळ, बंधारा. २. पायांची मांडी. ३. चुंबळ ४. बैठक. (झाडी).

गेडीवडा पु. मुलांचा एक खेळ.

गेडे वि. विषम संख्या. उदा. १, ३, ५, ७ इ. (कु.).

गेडेफडे न. १. लहान मुलांचा एक (एकीबेकीचा) खेळ. २. पहिल्याने मुलगा व मग मुलगी असा जन्मानुक्रम. (कु.)

गेणा पु. पायाच्या बोटातील चांदीचा एक अलंकार. (गो.) [क. गणिके = बोटाचे पेर]

गेणी स्त्री. एक मासा. याची लांबी पंधरा ते वीस फूट असून याच्यापासून निघणारे तेल गलबताच्या अवजारांच्या टिकाऊपणासाठी लावतात.

गेणी स्त्री. कर; शेतसारा; भाडे : 'सोडवीन भकसोनी अपराधू। माझी गेणी देती तरी।' – ख्रिपु २.४२.७७. [का.]

गेत न. गेळ. (गो.)

गेताडपट्टी स्त्री जोराची चपराक. (ना.)

गेनमाळ टाकणे भगतपणाची दीक्षा देणे. गुरुभगत या वेळी शिष्याच्या गळ्यात फुलांची माळ घालतो. (खा.)

गेना पु. तांदळात न कुटता राहिलेला भातकणय; भातगोटा.

गेम स्त्री. १. खेळ; डाव. २. खेळ पुरा होण्याची मर्यादा. (वा.) **० करणे –** एखाद्याला दुसऱ्याकरवी मारणे. [इं.]

गेय वि. गाण्यासाठी व प्रशंसा करण्यासाठी योग्य.

गेयपद्य न. (सं.) गायनास योग्य असे गीत किंवा पद्य. साहित्य आणि संगीत या दोनही गुणांचा मिलाफ असलेले गीत.

गेयशा स्त्री. जपानमधील नृत्यगायन करणारी कलावती स्त्री.

गेर स्त्री. पु. लोकक्षोभ; बंडाळी; दंगा. (को.)

गेर पु. तुकडा; पेरे. (व.)

गेर न. अति कोवळी सुपारी. (कु.)

गेरवट वि. गेरूच्या रंगाचे; तांबूस : 'ते (धोतर) गेरवट रंगावर येत चाललं होतं.' – बाविबु २५६.

गेरवा, गेर्वा पु. १. थंडी वगैरेमुळे धान्यावर पडणारा तांबेरा रोग; गव्हावर पडणारा एक रोग. २. संकट. ३. खेप.

गेरवा वि. तांबूस.

गेरी अ. जवळ. (गो.)

गेरी स्वारी; दंगा; बंडावा.

गेरुंडी स्त्री. (सुतार) खुणा करण्याचे, पाणी ठेवण्याचे पात्र; खाचेचा ठोकळा; गेरूचे भांडे.

गेरू, गेरवा पु. १. काव; तांबडी माती. २. विटकरीची भुकटी; पाटीवर घालण्याची तांबडी धूळ. ३. (सुतारी) लाकडावर खुणा करण्यासाठी तयार केलेले (कसलेही) तांबडे पाणी. [सं. गैरिक]

गेल स्त्री.१. उडी : 'गेल घेतली थोर मर्कटें। लंका दग्ध केली कपटें।' – कृमुरा ३.३.८९. २. चेष्टा.

गेल पु. विजय; विजयोन्माद.

गेला वि. (जाणे याचा भूतकाळ) १. गेलेला; संपलेला; गत झालेला (काळ, दिवस इ.). २. मेलेला; मृत. (व.) [सं. गत]

गेला वि. मोडका.

गेलाबाजार क्रिवि. किमानपक्षी; निदान; कमीतकमी.

गेलामेला वि. १. मेलागेला; नष्ट. २. काही झाले तरी; केव्हाही, निदान.

गेशा पहा: **गेयशा**

गेह न. घर; गृह; वस्ती; राहण्याचे ठिकाण : 'प्रभो तुज जसे तसे मतिस गेह भासे वन।' – केका १०५.

गेहात्यय पु. घरदार, आप्तसंबंधी यांचा त्याग.

गेहात्ययदेहात्यय संन्याशाने केलेला घरादाराचा व शरीराचा त्याग.

गेहेपटू वि. घराचा हुशार; घरात फक्त वाकबगार पण बाहेर कुचकामाचा; घरचा देशपांड्या (बाहेर भित्रा.).

गेहेपंडित वि. पंडित, शहाणा; अरेराव; घरचा काळ; घरपंडित. [सं.]

गेहेप्रगल्भ वि. जेथे विशेष गरजच नाही तेथे धाडस, चपळाई वगैरे दाखवणारा; घरशूर. [सं.]

गेहेमेही वि. (घरात मुतणारा) घरबशा; घरकोंबडा. [सं.]

गेहेशूर पु. घरात शूर; बायकात शौर्याच्या गप्पा मारणारा पण बाहेर भित्रट, शेंदाडशिपाई. [सं.]

गेळ न. १. बेचके; दोन बोटातील भाग. पहा : **गेचक** १. २. दुभागलेल्या खुराचा एक भाग; दोन भागातील अंतर; नांगी.

गेळ–ळा–ळी, गेळफळ स्त्री. पु. न. एक झाड व त्याचे फळ. या झाडाला दोन बोटे लांबीचे काटे असतात. याचे फळ सुपारीएवढे असते. याचा गळवावर लेप लावला तर ते पिकते. [सं. गालब.]

गेळंदी स्त्री. तांबड्या रंगाची खेकडी. (जुन्नर.)

गेळा पु. लहान तोंडाचे वाटोळे भांडे; तेल वगैरे ठेवण्याची किंवा पाणी पिण्याची झारी, खुजा; सुरई.

गेळी स्त्री. लहान गेळा.

गेळी स्त्री. खुराचा भाग. पहा : **गेळ** २

गेळी स्त्री. वेळू, बांबू (को.).

गेंगडी स्त्री. वेंगडी; हातपाय लटपटणे; भयग्रस्त स्थिती; घाबरगुंडी. (व.)

गेंग(गा)णे अक्रि. नाकातून बोलणे. [सं. ङु.]

गेंगाणा–ण्या, गेंगणा वि. १. नाकात बोलणारा (माणूस). २. सानुनासिक, नाकातील (उच्चार).

गेंगाणेपण न. नाकातून बोलण्याची सवय.

गेंगा(ग)रणे अक्रि. १. पडशामुळे, थंडीमुळे नाकातून बोलणे. २. त्रेधा – तिरपीट उडणे; गांगरणे; अतिशय घाबरणे. [ध्व.]

गेंजी स्त्री. कोंबड्याचा तुरा : 'गेंजी नराची ताठ व मादीची पडलेली व डोकें मोठें असतें.' – ज्ञाको क ७६६.

गें(गे)झट, गें(गे)झा वि. अतिशय लोचट, हट्टी, दुराग्रही, चेंगट (माणूस).

गेंडकणे अक्रि. गदरणे; पाडाला येणे, लागणे (आंबा, फळ).

गेंडरू, गेंडुर गांडूळ. [सं. गंडोल]

गेंड्या वि. बारीक.

गेंडा पु नाकावर शिंग असणारा, जाड व टणक कातडीचा एक वन्य पशू. [सं. गंड]

गेंडा पु. जनावराच्या गळ्यातील गोंडेदार दोर. पहा : **गेठण, गेठा** २. (व.)

गेंडोर पु. गाणारा किडा. (झाडी.)

गेंद पु. १. तुरा; झुबका; गोंडा (फुलांचा). २. पुष्कळशा पाकळ्यांचे फूल (झेंडू, बटमोगरा इ. चे). मात्र अशा फुलाचे नाव गेंद शब्दाच्या पुढे जोडतात. जसे :- गेंदमोगरा, गेंदकाटेशेवंती इ. ३. झेंडूचे फूल. ४. घोड्याच्या लेंडीवरील रेशमाची किंवा चांदीची फुले किंवा मुदा. ५. बायकांच्या पायातील चौथ्या बोटातील मोगऱ्याच्या फुलाच्या आकाराचा चांदीचा दागिना. यात वाळूचे बारीक खडे असल्यामुळे चालताना त्यांचा आवाज होतो. ६. (ल.) गेंदेबाज वस्तू. उदा. स्त्रियांचे स्तन : 'रुंद छातिवर बूंद गेंद जणू गुलाब बहरामधीं फुलती।' – प्रला ११३. ७. गोळा; गोलसर पदार्थ. [सं. गेंदुक = कंदुक]

गेंद पु. चेंडू.

गेंदगेंद शिवागेंद मुलींचा एक खेळ.

गेंदजोडी स्त्री. घोड्याच्या शेपटीवरील गेंदभूषणांचा समूह. पहा : **गेंद** ४ : 'जीन भिडविला घोड्याला गेंदजोड त्याला।' – ऐपो ४३१.

गॅझि(झे)ट न. १. वर्तमानपत्र. २. राजपत्र. [इं. गॅझेट]

गॅमा किरण (रेडियमसारख्या किरणोत्सारी) मूलद्रव्यांच्या अणुकेंद्रातून फेकले जाणारे, 'क्ष' किरणापेक्षाही कमी तरंगलांबीचे किरण (विद्युतचुंबकीय तरंग).

गॅरेज न. १. मोटार ठेवण्याचा तबेला. २. मोटारी दुरुस्त करण्याचे तसेच त्यांची विक्री करण्याचे ठिकाण.

गॅलन पु. द्रव पदार्थ मोजण्याचे परिमाण; ४.५५ लिटर धारणक्षमता असलेले माप. [इं.]

गॅल(ले)री स्त्री. सज्जा; वरील मजल्याचा किंवा माडीचा भिंतीच्या बाहेर आलेला पुढील स्वतंत्र भाग. [इं.]

गॅस पु. १. पदार्थाची घन, द्रव या विरहित एक वायुरूप अवस्था; वायुरूपी पदार्थ. २. इंधन म्हणून वापरला जाणारा खनिज वायू. [इं.]

गँगरीन काही कारणाने शरीरातील रक्तपुरवठा खंडित झाल्यास त्या भागातील पेशी निर्जिव होण्याची स्थिती.

गै, गैगोळा पहा : **गई, गईगोळा**

गैगुदर स्त्री. दुर्लक्ष; चालढकल : 'दाणे मागितले तुम्ही गैगुदर करिता.' – पेसाप ६३.

गैदी–बी, गैबती–त्या, गैबान्या वि. १. ढिला; नेभळा; गबाळ्या; अजागळ; बावळा; अव्यवस्थित. २. आळशी; टोणपा. पहा : **गावदी** [फा. गइब]

गैदीपणा पु. गचाळपणा; आळस व अस्वच्छपणा.

गैब–प, गैबत–ती वि. क्रिवि. १. गुप्त; न दिसणारा; गायब; अदृश्य : 'गैबचि होऊनि जाती।' – दावि २९५; 'त्यातच गैबत जाले. त्यांचा मुर्दा देखिल दृष्टीनें कोणी देखिला नाही.' – भाब ६३. २. नष्ट; गहाळ. [फा. गइब, गइबत]

गैबत ईर्षा; पराक्रम.

गैबति १. देशाची अवस्था. २. दूर राहून नोकरी.

गैबती स्त्री. धूपारतीचा तेलाच्या भांड्यासह बुदलीवजा दिवा. (राजा.)

गैबती वि. अलाहिदा; फालतू; कुणीतरी; अपरिचित; भलताच. (गो.)

गैबती स्त्री. गैरहुजूर नोकरी; मालकाच्या सन्निध न झालेली, न होणारी नोकरी.

गैबी वि. १. गुप्त; गूढ. २. निनावी.

गैबी आवाज पु. आकाशवाणी; दैवी, गुप्त संदेश.

गैबी खबर–वर्तमान–वार्ता–बातमी गुप्त, गुपित बातमी; चोर बातमी.

गैबी फकीर पु. गुप्त सामर्थ्यामुळे चमत्कार करणारा फकीर, गोसावी.

गैबी माणूस पु. तोतया.

गैबी वाद्य आकाशवाद्य : 'विचित्र गैबीवाद्य वाजीनलीं।' – सप्र २०.६८.

गैर अ. निराळेपणा, भिन्नपणा दाखवणारा परंतु सामान्यत: अभाव किंवा अन्यथाभाववदर्शक अरबी अव्ययशब्द किंवा प्रत्यय. विशेषत: हिंदी, उर्दू शब्दांबरोबर याचा मनसोक्त उपयोग करतात. या शब्दाचे पुढील काही अर्थ होतात – १. इतर; अन्य : 'गैर पथकें येऊन मोर्चेबंदी केली आहे.' – मइसा १२.१२५. २. अयोग्य; अन्यायाचा; अप्रशस्त : 'हे तुम्ही गैर केलें.' – मदरू १०६. ३. (नामाच्या, विशेषणाच्या प्रारंभी जोडल्यास) अवास्तविक, उलट; विपरीत. ४. विना; वाचून. [फा.]

गैर स्त्री. परचक्र, लुटारुंची धाड; प्रजेने असंतोषामुळे केलेला दंगा.

गैरअदबी स्त्री. असभ्यता; अपमान; अनादर : 'गैर अदबी बोलला सबब पातशहा यास राग येऊन डोळे काढिले.' – मदरु २.७०.

गैरअदा वि. रद्द; न पटलेले : 'शिंदेकडील वरात आली तर मग गैरअदाही व्हावयाची नाहीं.' – ऐलेसं १०.५२.७९.

गैरअब्रू स्त्री. अप्रतिष्ठा : 'गैरअब्रू फारशी न करणे.' – वाडबाबा २.७५.

गैरअमली वि. परस्वाधीन; दुसऱ्याचे : 'चार लक्षाचे भरतीस अमली महालांपैकी बेरीज कमी आल्यास गैरअमली महाल आहेत त्यांपैकी भरतीस कमाल आकाराचे बेरजेचा महाल लावून देणे.' – मइसा १०.३२१.

गैरआबादी वि. उजाड; बेचिराख.

गैरकारी स्त्री. भलतेच काम; अयोग्य काम.

गैरचलन स्त्री. १. चलनाचा अभाव; चलन नसणे. २. (क्र.) गैरवर्तन; बदचाल.

गैरचाकर वि. बडतर्फ : 'जखमी जहाले त्यांस गैरचाकर करून जागिरा तगीर करविल्या.' – जोरा ७५.

गैरजप्त वि. गैरअमल; गैरकबजी; परस्वाधीन : 'गैरजप्त देश साधावे.' – चित्रगुप्त ११०.

गैरत स्त्री. १. चहाडीचुगली, तक्रार. २. पराक्रम, शौर्य.

गैरत स्त्री. लज्जा; भीड : 'हल्लीचे शिकस्तेची गैरत आणि शरमंदगी नबाबास फार जाली आहे.' – मइसा ५.१९. [फा.]

गैरदस्त–स्ती वि. सरकारसाऱ्याची सूट असलेली (जमीन).

गैरबर्दार वि. बहार नसलेला; फळहीन : 'पोफळी गैर–बर्दार, शेंडे वाळलेल्या आहेत.' – मइसा ११.७९.

गैरबूज स्त्री. दुर्लक्ष; अनास्था : 'जुनीं माणसें ही कणसाला महाग त्यांची गैरबुज रे ।' – ऐपो ५१.

गैरमजुरा क्रिवि. (हिशेब) मजुरा (वजा) टाकल्याशिवाय, वजावट न करता.

गैरमर्जी खप्पा मर्जी.

गैरमाकूल वि. १. अयोग्य; अनुचित. २. मूर्ख; अडाणी; गैर; वाईट : 'कार्वारास खलेल करणें हें गैरमाकूल गोष्टी आहे.' – मइसा १८.३३. क्रिवि. मूर्खपणे : 'लोक गैरमाकूल आम्हांस न कळत वर्तले तरी त्याची बद्‌लामी आपणांवरी न ठेवावी.' – मइसा ८.१०.

गैरमिराशी वि. वंशपरंपरा मालकी नसलेला : 'मातकदीम मिरासी खरी जाहली. काणव मजकूर गैर मिरासी मुतालीक ऐसे जाहले.' – इऐ ५.१०२.

गैररजावंद वि. नाराज; नाकबूल : 'तो क्रियेस गैररजावंद जाहला.' – वाडशाछ १३२. [फा.]

गैररहा–रीत स्त्री. बदचाल; अयोग्य रीत; वाईट आचरण.
वि. बदचालीचा : 'भुजंगराव याची वर्तणूक गैररहा दिसते.' – ऐलेसं ११.५७७६.

गैरराबता पु. १. बंदी; मनाई; खंड (मार्ग, मिळणे, येणे–जाणे, वहिवाट, चाल यांमध्ये) : 'नाना फडणीस लष्करातून आल्यापासून गैर – राबता बहुत करूं लागले. कोणाचीच गाठ पडत नाहीं.' – ऐलेसं ८.४१५१. २. वहिवाट, चाल यांमध्ये अनभ्यास; अपरिचय; वळण नसणे.

गैरवाकब वि. अडाणी; बिनमाहीतगार : 'गैरवाकब गोऱ्या अधिकाऱ्यांचे रिपोर्टावरून अधिकारी फडाफड बर्तर्फ होतात.' – लोहिवा ७५. [फा. गैरवाकिफ]

गैरवाका पु. खोटी किंवा बनावट गोष्ट; गैरसमजूत; लबाडी : 'ऐसा गैरवाका सांगितला.' – मइसा. ८.५२.
वि. वेडावाकडा. [फा.]

गैरवाजवी वि. अप्रायोजक.

गैरविलग क्रिवि. आडबाजूला; आडवळणी.
वि. (विलगसाठी चुकीने योजलेला) न मिळणारा; न जुळणारा.

गैरविल्हईस–विल्हे–विल्हेस क्रिवि. योग्य ठिकाणाच्या विरुद्ध जागी; भलतीकडे. (वा.) **गैरविल्हेस लागणे, पडणे –** १. दुसरीकडे किंवा चुकीच्या ठिकाणी लागणे; क्रमवार नसणे. २. योग्य ठिकाणाहून गहाळ होणे; गमावणे. ३. गोंधळ होणे, अव्यवस्थित असणे.

गैरसनदी वि. १. बेसनदशीर; सनदेने अधिकृत नसलेले. २. जादा मंजुरीशिवाय : 'गैर–सनदी खर्च करावयाची सरकारची आज्ञा नाहीं.' – ऐलेसं ५.२३५३.

गैरसमजूत स्त्री. उलट, चुकीची समजूत; चूक.

गैरसाळ वि. १. खोटसाळ; सरकारी टाकसाळीतून न पाडलेले, इतर ठिकाणचे म्हणजे हिणकस, कमी किंमतीचे (नाणे) : 'गैरसाळ तामगिरी। कोणी नवी मुद्रा करी।' – दास १०.८.१४. (त्यावरून) खोटा; बनावट; लबाडीचा. २. (ल.) बेशिस्त; अनभ्यासी; गावंढळ; अडाणी (माणूस); अयोग्य; अनुचित (वर्तन). ३. अशिष्ट; अडाणी; हलका; राकट; बेडौल; गावडी. [फा.]

गैरहिसा (शे) बी वि. अव्यवस्थित; बेहिशेबी.
क्रिवि. अन्यायाने.

गैरहुर्मत स्त्री. अप्रतिष्ठा; बेअब्रू.

गैरा–री वि. १. अशक्त; मंद; मूर्ख; गयाळ; खुळा (माणूस). २. कुचकामाचे; कवडीमोल; क्षुद्र (वस्तू). ३. भलता; अपेक्षेप्रमाणे नसलेला (पदार्थ).

गैरात वि. १. गैदी; अव्यवस्थित; बेपर्वा. २. मंद; मूर्ख. पहा : **गैरा–री**

गैरात पु. वरकड, इतर लोक. [फा.]

गैराद वि. हंगामी; नवे आलेले; इतर; कायम नेमणूक नाही असे : 'याखेरीज गैराद हशम व मवास यांची फौज ४०००, याप्रमाणे फौजेचा कट्टा...' – चित्र १४.

गैरादा वि. अप्राप्त; न मिळालेले; वसूल न झालेले : 'बाकी दोन लाख अकरा हजार रुपये राहिले ते हाली सरकारांतून गैरादा करून गायकवाडावर वराता जहाल्या.' – पेद ३९.२७. पहा : **गैरअदा** [फा. गैर + अदा]

गैरांव पु. कोळ्याचे जाळे; जळमट; घेरू; घेरोसा. (गो.)

गैरी स्त्री. दंगा; लढाई : 'आम्हाकडणे झाली गैरी।' – ऐपो २११.

गैरी स्त्री. १. अन्याय. २. गुन्हा; दुर्वर्तन : 'ज्याकडेस गैरी लागेल त्यापैकीं मसाला होनु एक देणें.' – सासंइ ८८. (वा.) **० करणे –** वाईट वर्तणूक, दुर्वर्तन करणे.

गैऱ्हा वि. खूप, भरपूर. (अहि.)

गैवार वि. गावंढळ; अडाणी : 'शान्यानं वागोल्या गैवाऱ्यानं हाकलल्या।' – राके ३४३.

गैशा पहा : **गेयशा**

गैसास स्त्री. १. मिंधेपणा. २. मूर्खपणा : 'परि असतें जींत न गणिति। गैसासे पै।' – राज्ञा ९.५०८.

गैंब पु. गुरांनी केलेल्या नासाडीची नुकसानभरपाई करून देणारे खाते. (गो.) [पोर्तु.]

गो उद्गार. अगो; अगे. (बंगालीतही हे संबोधन आहे.) : 'असे कायगो करतेस?' – कफा १. (को.)

गो स्त्री. १. गाय. २. बैल (पशू). समासात – गाईपासून झालेले; गाईसंबंधी (दूध, चामडे, मांस इ.) : 'अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें।' – ज्ञा २.१८४. [सं.]

गो पु. इंद्रिय; वाचा.

गोई स्त्री. मैत्रीण (झाडी).

गोईबाई वि. नामर्द; बुळा; दुर्बळ. (व.) पहा : **गउबाई**

गोकटी, गोकनळी स्त्री. (वाघ गोकटीस बसतो त्यावरून) मान; गळा; बोकांडी (क्रि. धरणे, फोडणे, फुटणे, बसणे). (राजा.) (वा.) **० धरणे –** अडविणे; कुचंबविणे; दुःखद स्थितीत तिष्ठत ठेवणे. **गोकटीस बसणे –** मानगुटीला बसणे; पिच्छा पुरवणे; खनपटीला बसणे. **(शेत) गोकटीस येणे –** पीक पोटरीस येणे; कणसात दाणे भरगच्च भरणे.

गोकरा पु. लाकूड-शेणीचा चुरा. (बे.)

गोकरू पु. सुकलेले शेण. (झाडी.)

गोकर्ण–गोक्रण न. १. मुलाला दूध पाजायचे (गाईच्या कानाच्या आकाराचे) बोंडले. २. एक वेल व तिचे फूल. ३. दांड्याचे सारपात्र; कावळा. याचा आकार गोकर्णासारखा असतो. (तंजा.)
पु. गाईचा कान. (सं.) (वा.) **गोकर्णात येणे –** संपुष्टात, गोकुळात येणे; संपणे; दरिद्री होणे.

गोकर्णिका, गोकर्णी स्त्री. एक प्रकारचा लगाम.

गोकर्णी स्त्री. निळ्या पांढऱ्या रंगाची; गाईच्या कानासारखी फुले असणारी वेल.

गोकाकी वि. तांबूस; कावेचा : 'माझ्या बाळाबाई गोकाकी रंग खासा।' – लोले २२.

गोकु(कू)ल–ळ न. १. श्रीकृष्णाचे लहानपणीचे वसतीचे गाव. २. गोकुळाष्टमीला नंद, यशोदा, गोप–गोपी, गाईवासरे वगैरेंची पूजा करण्यासाठी केलेली मातीची चित्रे. ३. (ल.) उत्तान, स्वैर क्रीडा. (क्रि. माजवणे). ४. (ल.) मुलेबाळे; मुलाबाळांनी भरलेले घर : 'माझ्या घराचे गोकुळ भरले आहे.' – कोउ २७. (वा.) **गोकुळात येणे –** १. संकोचित होणे; संपुष्टात येणे; संपणे. २. आटोक्यात येणे (व्यवहार). विश्वव्यापी कृष्णपरमात्मा ज्याप्रमाणे गोकुळाच्या मर्यादेत आला त्याप्रमाणे.

गोकोश पु. जमीन मोजण्याचे एक माप; गाईच्या हंबरण्याचा टप्पा; गोरुत; दोन कोसांचे अंतर.

गोक्क न. पाटबंधाऱ्यातील भगदाड; भोक. (बे.)

गोख न. १. पोट. २. मध्यभाग; मध्यवर्ती लोक : 'कैसा न्हवता प्रलयाचा वेलु। गोखां तूंचि मांडला कालु।' – राज्ञा ११.३८४. पहा : **गोखा.** ३. झरोका. [सं. गवाक्ष]

गोखडा पु. १. सज्जा. २. कोनाडा; झरोका; गोखला : 'कंवरणीजी गोखड्यांतुनी। बघा जरा तर हळूंच ढुंकुनी।' – भा. रा. तांबे कविता, भाग २.

गोखडी स्त्री. गाई उभ्या राहण्याची जागा; गोठण : 'गिलच्यानीं गोखडींत दहा-पांच बैरागी सत्पुरुष होते तेहि बसले ठिकाणीं लंबे केले.' – भाब २८.

गोखणे उक्रि. १. घोकणे; पाठ करणे. २. तेच तेच पुन्हा म्हणणे, सांगणे; गाणे गाणे; रडगाणे लावणे.

गोखमा पु. १. गुराखी. २. (ल.) गावंढळ; खेडवळ; नांगऱ्या.

गोखरू, गोखरूचे झाड पु. १. जमिनीवर पसरणारी एक वनस्पती व तिचे फळ; सराटा. ही फळे फार औषधी आहेत. २. पालखीच्या इलाख्याच्या (गोंड्याच्या) शेवटी लावलेला लहान गेंद. ३. (चर्मकार) बुटाच्या उंच तळाला लागणारा खिळा. [सं. गोक्षुर]

गोखरू पाटली–बांगडी जिच्यावर गोखरूची आकृती आहे अशी स्त्रियांची सोन्याची पाटली वा बांगडी : 'उगीच नाही हातात गोखरू पाटल्या पडत.' – धाधो ९९.

गोखरे, गोखरेण–ड न. गुरांनी खाऊन शिल्लक राहिलेले, गुरांच्या पायाखालचे, निरुपयोगी गवत. (को.)

गोखला १. कोनाडा. २. गवाक्ष; खिडकी; वातायन; जाळी; झरोका. पहा : **गोख, गोखडा** [सं. गवाक्ष]

गोखा क्रिवि. मध्यंतरी; मध्ये : 'कैसा नव्हता प्रळयाचा वेळु। गोखा तूंचि मिनलासि काळु।' – ज्ञा ११.३८९.

गोखा स्त्री. झरोका; खिडकी : 'अलीकडे श्रीमंतांची प्रकृत हुशार आहे. छ. १ रोजीं चाफेखणावर दिवाणखान्यांत गोखेंत येऊन बसले होते.' – ऐलेसं ७८८१.

गोखा–खी स्त्री. फळे, फुले काढण्याची शेंड्यास आडवी कामठी बांधलेली उंच काठी; शेकाटा; आकडी; गरकू. (कु.)

गोखातु अ. मध्येच.

गोखाना पु. १. सरकारी किंवा एखाद्या मोठ्या माणसाचा गायवाडा; गुरांचे खाते. २. गायठाण; गोठा.

गोखी स्त्री. वेडी; मूर्ख : 'माजु मोडैल वो गोखिए' – शिव ६९१.

गोगणे अक्रि. रागाने, दुःखाने धुमसणे; कुरकुरणे.

गोगलगाय स्त्री. १. जठरपादवर्गातील एक कीटक. हिचे शरीर मांसल, थंड, नरम असून वर कवच असते. हिला दोन शिंगे असतात व त्यांच्या शेवटी डोळे असतात. २. (ल.) सौम्य; गरीब; कष्टाळू–प्राणी, माणूस. ३. एक प्रकारची खुबडी; पाण्यातील प्राणी.

गोगा–का पु. घोटाळा; गोंधळ; गडबड; अस्ताव्यस्त स्थिती : 'त्यासी तेथील प्रकार पाहिला तर सारा गोगा होता म्हणून उठोन आलों.' – पेद २९.४७. [ध्व.]

गोगो पु. मुलांचा द्यायचा गोड खाऊ : 'तुला गोगो पाहिजे ना?' – आआशे १२६.

गोगोपाणी न. (मुलाशी बोलायच्या भाषेत) दारू : 'लहान मुलांना बोंडलेभर गोगोपाणी पाजून झोपवीत असत.' – सांज ४६.

गोग्दा पु. खड्डा.

गोग्रास पु. १. जेवायला बसण्यापूर्वी गाईसाठी राखून ठेवलेला अन्नाचा नैवेद्य. २. गाईसाठी भिक्षा. [सं.]

गोघाट गोंगाट; कल्ला. (अहि.)

गोच स्त्री. खोच; खोमा. (क्रि. मारणे) (प्रां.)

गोचका पु. १. घसा. (व.) २. पानाचे पूड. ३. उचकी (विशेषतः शेवटची).४. लचका (मांस, मैदा यांचा हाताने, तोंडाने तोडलेला.). (क्रि. तोडणे, घेणे, काढणे.)

गोचका, गो (गु) चकुला वि. लहान; चिमुकला, ठेंगू पण सुंदर (मूल).

गोच (चि–ची) ड–डी स्त्री. पु. १. अष्टपाद वर्गातील जीव. कुत्रा, गाय, म्हैस यांच्या अंगाला चिकटून राहणारा लहान किडा : 'मग बसल्याबसल्या मी त्याच्या कानातल्या गोचड्या काढी.' – वळीव १३४. २. (ल.) लोचट माणूस.

गोचमाडणे अक्रि. भर येणे; गच्च भरणे (पिकाने, फळांनी झाड). (माण.)

गोचर वि. १. दृश्य; माहीत; प्रकट; प्रत्यक्ष : 'पैं जीवाचिया बोधा गोचर जो हा धांदा।' – ज्ञा १५.३४६. २. ज्ञानेंद्रियांना समजेल असा; समजणारा; संवेद्य; मूर्त; दिसणारा : 'जैसा जनामाजि खेचरू। असतू चि जना नव्हे गोचरु।' – राज्ञा ५.९८. [सं.]

गोचर न. (ज्यो.) जन्मराशिपासून द्वादश राशींच्या ठिकाणी सूर्यादी ग्रहांचा वर्तमान संचार. [सं.]

गोचर न. गुरांची चरायची जागा.

गोचरशास्त्र न. (तत्त्व.) १. ज्ञानेंद्रियांच्याद्वारे वस्तुजात जाणण्याचे, आकलन होण्याचे शास्त्र. (तत्त्वज्ञानातील एका सिद्धांतानुसार मनुष्य ज्ञानेंद्रियांच्याद्वारे वस्तूचे केवळ व्यक्तरूप जाणू शकतो. तिचे मूलस्वरूप जाणू शकत नाही). २. इंद्रिय–प्रत्ययवाद. [सं.]

गोचर्म न. १. गाईचे कातडे. २. (ल.) जमीन मोजण्याचे एक माप. गाईच्या चामड्याइतकी जमीन. (गाईच्या कातड्याची वादी काढून तिने वेष्टिलेली जमीन एका माणसाने राजापासून मागून घेतल्याची एक गोष्ट आहे त्यावरून) तीनशे फूट लांब व दहा फूट रुंद या मापाचे क्षेत्र (यातील धान्य एका माणसाला एक वर्ष असा हिशोब आहे.). [सं.]

गोची स्त्री. पंचाईत.

गोच्या पु. भृंगराज, एक पक्षी. (झाडी).

गोज पु. खटला; प्रकरण; व्यवहार; तंटा. (गो.)

गो (गों) ज न. एक प्रकारचे कारल्याचे पंचामृत, तोंडी लावणे. (को.) २. उडदाच्या पिठाचे डांगर. (व.) [क. गोज्जु]

गोजका, गोजकुला पहा : **गोचका, गोचकुला**

गोजडी स्त्री. गोधडी; कंथा. (गो. कु.)

गोज (जि) रा–रे, गोजिरवाणा वि. नाजूक आणि सुंदर; सुकुमार व लहान; सुरेख; देखणा : 'तुका म्हणे गोजिरीया विठोबा। पाया पडो द्या।' – तुगा ५. [क. गुजुरु = लहानपणा]

गोजरू, गोजी न. स्त्री. (प्रेमाने किंवा तिरस्कार करतेवेळी योजना) कालवड; वासरी.

गोजावणे सुंदर दिसणे : 'आवडीच्या वालभे गोजावले गोजिरे' – ज्ञागा २०७.

गोजिव्हा स्त्री. एक वनस्पती; गोजवान पाथरी; दवली. [सं.]

गोजी वि. गोजिरवाणी; लाडकी; आवडती : 'आथर बाई खालीं। सवाण सतरंजी। गेली मांडीवर झोंपी। माही सोनुकली गोजी।' – वलो ८०.

गोज्जणे सक्रि. शिंपडणे; शिंतडणे (पाणी वगैरे). (बे.)

गोझरू न. वासरू.

गोट पु. (फाटू नये, झिजू नये किंवा शोभा यावी म्हणून) वस्त्राच्या बाजूला घातलेली मुरड किंवा लावलेला काठ, किनार (वस्त्राचा, जोड्याचा इ.). [क. गाट्टु]

गोट पु. जमीन नांगरताना चुकून मध्ये राहिलेला, न नांगरलेला तुकडा; भाग. (खा.)

गोट, गोटा–टे, गोटेस शअ. जवळ. (चि.)

गोट–ठ पु. हातसर; बायकांच्या हातातील गोल बांगडी; सलकड्यासारखा धातूचा एक दागिना. [का. गोट्टु = मर्यादा, सीमा]

गोट–ठ पु. १. घेरा; वेढा. (क्रि. घालणे, देणे.) २. सैन्याची छावणी, तळ, कंपू; तळाचा एक भाग. ३. एकाच ठिकाणची, एकाच पक्षाची, बाजूची मंडळी जमण्याचे किंवा राहण्याचे ठिकाण. [क. गाट्टु = मर्यादा, सीमा, आश्रय स्थान.] (वा.) **गोटात घालणे –** मागे हटविणे; छावणीपर्यंत मागे रेटणे : 'त्यास शिकस्त करून बरे वजेन गोटांत घातला.' – हम २७३.

गोट(ठ)गणती स्त्री. ठाणबंद घोड्यांची मौजदाद : 'गोट गणतिला तमाम जमले।' – ऐपो २००.

गोट(ठ)गस्ते पु. १. लष्कराच्या गोटाची व्यवस्था ठेवणारा अंमलदार. २. राजवाड्यात होणाऱ्या नित्यनैमित्तिक कामगिऱ्यांची सर्व व्यवस्था पाहणारा अधिकारी; दरबार, स्वाऱ्या वगैरेविषयींची व्यवस्था ठेवण्याची कामगिरी याच्याकडे असे. (बडोदे).

गोटगीळ वि. आपला अपराध कधीही कबूल न करणारा. (व.)

गोटदार वि. शोभेची किनार असलेला : 'खाकी रंगाची गोटदार चंची उघडून...' – पेरणी ३७.

गोटफोडी स्त्री. दोन मिशांचा मासा.

गोटमार–री पु. स्त्री. १. दगडफेक; गोट्यांचा वर्षाव. (ना.) २. (विनोदाने) इंग्रजी बोलणे. ३. एक खेळ. यात गोट्यांची फेक व पळसाचा झेंडा सर करणे हे प्रकार असतात. (ना.)

गोटली, गोटी आंबा स्त्री. लहान जातीचा आंबा.

गोटा पु. १. गोलसर, वाटोळा दगड. २. बैदूल (दगड, लाख, लाकूड इ. चा). ३. (ल.) कणसातील धान्याचा दाणा; डाळीचा दाणा. ४. सुका नारळ; पूर्ण वाळलेला व खडबड वाजणारा, करवंटीपासून सुटलेला नारळ. ५. वजनाचा दगड. (व.) ६. निंदा–तिरस्कारवाचक प्रत्यय. उदा.

तेलगोटा, माळगोटा इ. ७. (ल.) मूर्ख मुलगा; ठोंब्या, नर्मद्या; दगड.

गोटा वस्तऱ्याने केस काढून गुळगुळीत केलेले डोके. (क्रि. करणे.) [क. गोट्ट = बाठा, कोय] (वा.) ० **मारणे –** (चर्मकार) चामडे घोटणे.

गोटा पु. कलाबतू; चांदीची, सोन्याची जर. [हिं.]

गोटा पु. फुलांचा लहान गुच्छ. [सं. ग्रंथ]

गोटा पु. भिलावा; बिब्बा. (व.)

गोटा पु. स्थान; अवस्था.

गोटागुंता पु. (गोटा म्हणजे धान्याचा दाणा यावरून) सुतळीचा तोडासुद्धा : '... याउपरी स्थलांतर करणें ढील न करणें. गोटागुंताहि घरा नसो देणें.' – चंचूद १२९.

गोटाड–ळ, गोटाडी वि. दगडाळ; खडकाळ (जमीन). (व.)

गोटाळे न. दगड; लहान भांडे (तेलासाठी). (व.)

गोटी स्त्री. १. लहान गोटा; गोळी. पहा : **गोटा** १, २. २. तालमीतील उचलण्याचा मोठा वाटोळा दगड. ३. देवळातील कौलाचा दगड. पहा : **उचला.** ४. (ल.) मजबूत व बांधेसूद, गुटगुटीत शरीर. ५. रुप्याचा गोळा (जर वितळवून केलेला). ६. वाटोळा व लहान आंबा. ७. खराब झालेली चांदीची तार. ही आटवून चांदी काढतात. ८. मुलांच्या खेळातील काचेची किंवा गारेची गोल वस्तू. [क.गोलि]

गोटी स्त्री. अंडकुळी. (वा.) **गोट्या कपाळात जाणे –** १. छातीत धडकी भरणे; भयंकर भीती वाटणे : 'आजूबाजूला सगळी पोलीस कंपनीच! म्हणजे आमच्या गोट्या कपाळातच गेल्या.' – वासू १२५. २. शिरा ताणून आक्रस्ताळेपणाने बोलणे.

गोटीदार–बंद वि. गुटगुटीत : 'गोटीदार बांधा...' – नाता १३७.

गोटुल न. आदिवासी जमातीतल्या तरुण मुलामुलींचे सामुदायिक शयनगृह.

गोटु(टो)ळा वि. १. गोल; गोलसर; गोट्याच्या आकाराचा. २. (ल.) मजबूत व आडव्या अंगाचा; ठेंगणा व पिळदार (माणूस, पशु).

गोटू न. तंजावरकडील एक वाघ. – (तंजा.)

गोटो पु. शिजलेले (भाताचे) शीत; भातगोटा. (गो.)

गोठ पु. निवासस्थान : 'विजयो वसे समुद्राचा गोठीं ।' – रुस्व २७८.

गोठ, गोठगणती पहा : **गोट, गोटगणती**

गोठ स्त्री. गोष्ट. (खा.) [सं. गोष्ठी]

गोठघोळणी स्त्री. (सोनारी) गोठ (दागिना) तयार करण्याचे हत्यार.

गोठ(ठा)ण–णी न. दुपारी सावलीसाठी पाण्याजवळ झाडाखालती बसण्याची गुरांची आखर, जागा; गोठा : 'पशु पीडती पर्जन्यें । गळती गाईंची गोठणें ।' – मुसभा ३.७९. [सं. गोष्ठ, गोस्थान] (वा.) ० **घालून बसणे –** सभेत अस्ताव्यस्त बसणे.

गोठण न. द्रवावस्थेतून घनावस्थेत जाणे.

गोठणबिंदू पु. (भौ.) ज्या तापमानाखाली एखाद्या द्रव्याचे घनपदार्थात रूपांतर होते ते तापमान. ते वितळणबिंदूएवढे असते.

गोठणक्षरण न. (भूशा.) हिमानी क्रियेने होणारी खडकांची झीज व धूप.

गोठणे अक्रि. १. दृढ किंवा घट्ट होणे; थिजणे; आटणे (जमीन चोपून, शाई इ. वाळून, दूध इ. उकळून, पातळ पदार्थ थिजून) : 'ज्याच्या भयें गोरस नित्य गोठे ।' – सारुह १.६१. २. गोळा होणे; एकत्र होणे : 'तों शिळा गोठल्या सर्वही ।' – ह २५.१२३. ३. (भौ.) द्रवपदार्थाचे तापमान कमी झाल्यामुळे त्याचे घनस्थितीत रूपांतर होणे. [सं. गोष्ठ]

गोठमात स्त्री. गोष्ट; हितगुज; विचारविनिमय. (व.)

गोठला न. एक फूल. (गो.)

गोठले न. (शरीररूपी) गाठोळे.

गोठवण स्त्री. मांडणी; व्यवस्था. (बडोदे)

गोठवणे सक्रि. १. थिजवणे. २. आहे तसाच ठेवणे; बदल होऊ न देणे : '... आपली जी लढावू विमाने आहेत त्यांना घासलेट टाकावे लागते. म्हणून सरकारने ते गोठवले आहे.' – साअसा १००.

गोठवणे सक्रि. (भौ.) द्रव पदार्थाचे तपमान कमी करून त्याचे घनस्थितीत रूपांतर करणे.

गोठवलेली मत्ता (शाव्य.) ज्या मालमत्तेचा वापर व उपयोग करण्यास कायद्याने बंदी केली आहे अशी मालमत्ता.

गोठविणे सक्रि. व्यवस्थित लावणे.

गोठळी पहा : **गुठळी**

गोठा पु. शेतातले घर : 'अशा प्रकारची शेतात एकदोन घरे असली तर त्यांना ...[क.कोट्टगे] कोठा, गोठा किंवा पडळ म्हणतात.' – गांगा २.

गोठा पु. मुलींचा एक खेळ.

गोठा–ठो पु. गुरे बांधण्याची जागा; जनावरे ठेवतात ती जागा.[सं. गोष्ठ]

गोठापाणी न. सकाळी गोठा झाडणे, गुरांचे शेण, मूत काढणे वगैरे गोठ्यातील व्यवस्थेचे काम (क्रि. करणे.)

गोठावणे, गोठाव(वि)णे सक्रि. गोठाणात गुरे एकत्र करणे. गोठ्यात गुरे घालणे.

गोठी स्त्री. वासरांचा लहान गोठा. (को.)

गोठी स्त्री. १. गोष्ट; कथा : 'गोठी सांघेति श्रीकृष्णाचियां । विरहिणीसी ।' – शिव २८५. २. कामकाज; कारभार; विषय; मुद्दा. (क्रि. करणे.) [सं. गोष्ठी]

गोठुले न. गाठोडे. पहा : **गठळे, गठडी**

गोठु(ठो)ळा पहा : **गोटुळा**

गोठु(ठो)ळी स्त्री. १. डिखळ; गोळा, गोळी. पहा : **गुठळी.** २. साखरेच्या पाकातील तिळांचा हलवा; तिळगूळ.

गोठूल न. विश्रांतिगृह : 'नाचता नाचता थकल्यावर पहाटे विश्रांती घेण्यासाठी ती दोघे गोठूलमध्ये जाऊन झोपतात.' – राके ६२१.

गोठोळा पु. मेंढा : 'जालासी गोठोळा धनगरांसी' – नागा १८५४.

गोठोळा वि. कामचुकार.

गोड न. १. षडरसांतील मधुर रस. २. मीठ. (व. खा.) ३. (वै.) पथ्याला अनुसरून मधुर किंवा साखरेने युक्त असा पदार्थ.

पु. गूळ. (गो. को.)

वि.१.मधुर; स्वादिष्ट. २. सुवासिक. ३. मंजूळ; सुंदर; साजिरे. ४. मृदू. ५. सौम्य. ६. सुखकारक; संतोषदायक. ७. नीटनेटके; नियमित; योग्य; चांगले; शुद्ध (भ्रष्ट नसलेले) जसे :–गोड–प्रयोग–उदाहरण वाक्य–कवन इ. ८. चांगले; सुरस, चवदार. – (तंजा.) ९. शुभदायक;

मंगलकारक. १०. 'सत्त्वाचा गोड जाहला अंत।' – विक ८. [सं. गुड] (वा.) ० **करून घेणे, मानून घेणे –** कसेही असले तरी गोडीने, चांगल्या हेतूने स्वीकारणे; मान देणे; अव्हेर न करणे. **दिल्हे घेतले गोड –** मिळून मिसळून वागणे चांगले. ० **न वाटणे –** प्रकृती बरी नसणे : 'आज सुतार गावी गेला, उद्या त्याला गोड वाटेनासे झाले...' – घरदार ६.

गोड पु. १. तंगडी; पाय. (काशी). २. औरस (लग्नाच्या स्त्रीची) संतती.

गोडगस्ता पु. पाटलाच्या हाताखालील एक गावकामगार. गावात कायकाय गोष्टी होतात त्या तो पाटलाला सांगतो. पहा : **गोठगस्ते**

गोडगस्ती पु. जकातीकडील एक अंमलदार.

गोडघाशा–खाऊ वि. १. सदा गोड खायला पाहिजे असा; गोड गोड खाण्याची आवड असलेला. २. चोखंदळ; मिजासी.

गोड घास १. जेवणाच्या शेवटी खाण्यासाठी ठेवलेला आवडत्या पदार्थाचा घास. २. सुग्रास; मिष्ट भोजन. ३. अप्रिय, दु:खद गोष्टीचा शेवट गोड करणारा मुद्दा, प्रकार.

गोड जेवण, तोंड १. वधूपक्षाने वरपक्षाला अथवा वरपक्षाने वधूपक्षाला दिलेली मेजवानी. २. मृत माणसाचे सुतक धरणाऱ्या नातेवाइकांना आणि इष्टमित्रांना सुतकाच्या चौदाव्या दिवशी (सुतक फिटल्यावर) मुख्य सुतक धरणाऱ्याने दिलेले जेवण. ३. पक्वान्नाचे जेवण.

गोड दोडकी स्त्री. घोसाळी; घोषक यांची पांढऱ्या फुलाची एक जात.

गोडनिंब पु. कढीनिंब. (व.)

गोडरी वि. आंबट नसलेली. (झाडी.)

गोडरे वि. गोड; गोडसर : 'बायकां गोडरें प्रिय अन्न।' – गीता २.१७५.

गोडली स्त्री. जनावरांच्या नखीला होणारा रोग.

गोडवण पदार्थ गोड करणारी वस्तू.

गोडवणी स्त्री. गोडे पाणी : 'हिंग पडतांचि रांजणी। गोडवणी होय हिंगवणी।' – भारा बाल १०.३६.

गोड (डा) वणे सक्रि. १. गोड करणे, होणे; खारट, आंबट नाहीसे करणे (जमीन, पाणी, फळे इ.). २. मिठी बसणे (गोड पदार्थ खाल्ल्याने जिभेला). ३. गोडी लागणे; लुब्ध होणे; लालचावणे. ४. पाड लागणे; पिकणे (फळ).

गोडवा, गोडा वि. १. सापेक्षतेने गोड; विद्यमान पदार्थात – गोष्टीत अधिक, विशेष गोड. २. (ल.) कोरा; असडा; अस्पष्ट; कोवळा इ. ३. ताजे (पाणी, खारट नव्हे असे); क्षारयुक्त नसणारे; मधुर. ४. बिनखारवट; क्षार, लोणा नसणारी (जमीन). ५. गोडे (तीळ, कारळे यांचे तेल). ६. सात्त्विक; सुस्वभावी; सौम्य (माणूस). ७. जिते; जिवंत (मांस – मुरदाड, मृत नव्हे असे). ८. सौम्य (खाजऱ्या, उष्ण, तिखट नव्हेत अशा सुरण इ. भाज्या). ९. निर्विष (साप.). १०. कोमल; नाजूक; रोगाला बळी पडणारे (शरीर, अवयव). ११. नदीतील, गोड्या पाण्यातील (मासा). १२. खारवणातील नसलेले; गोड्या जमिनीत तयार केलेले (भात). १३. जिव्हाळ्याचे; नाजूक; मर्माचे (अंग, जांघ, बस्ती अंड इ.). १४. खारट नसलेला (दाणा–धान्यातील). १५. शुद्ध; नेकजात; भेसळ रक्ताचा नसलेला (मराठा).

गोडवा, गोडा वि. १. बिन काटेरी; किड्यांना प्रिय (झाड, वनस्पती). २. मऊ; नरम (लाकडाचा नारावाचून बाहेरचा भाग). ३. मादक नसणारी (हरीक, खडसांबळी इ. वनस्पतीतील प्रकार).

गोडवा पु. १. गोडपणा. २. स्तुती. ३. आकर्षकपणा; निरागसता. (वा.) **गोडवा, गोडवे गाणे –** १. प्रशंसा करणे; अवास्तव स्तुती करणे; नावाजणे. २. (ल.) कुरकुर करणे; निंदा करणे.

गोडविणे सक्रि. समुद्राजवळची खारी जमीन चिकण माती टाकून लागवडीसाठी योग्य करणे; क्षार काढून टाकणे.

गोडवी, गोडी स्त्री. भूक व तोंडाला रुची असल्याने जेवण्यासंबंधीची इच्छा; रुची.

गोडवे सामान, गोडी फौज गोडे सामान; बंदुका, तोफा इत्यादी साधनांनी न लढता तरवार, भाला इत्यादी साधनांनी लढणारी पायदळाची किंवा शिलेदारांची फौज : '... पलटण तोफखान्याचे तोंडावर न येतां बाजूनें गोडवे सामान पाहून डावे बाजूस आंबोजी इंगळे मुकाबल्यावर उठावणी केली.' – ऐको भा २ पा. ५४.

गोडशे न. मिठाई. (गो.)

गोडसाण स्त्री. गोडी (गो.).

गोडसाण वि. सरळ; सुरेख (केस). (गो.)

गोडं (डां) बी स्त्री. १. बिब्याची बी (ही शैत्यावर देतात). २. काजू बी.

गोडा पहा : **गोडवा**

गोडाउन न. गुदाम; माल साठवून ठेवण्याची जागा. [इं.]

गोडा एरंड सुरती एरंड.

गो (गों) डाळी स्त्री. गोंडाळ गवत : 'कऱ्हवेळु, मारवेळु गोंडाळी।' – गीता २.५२.८६.

गोडावणे क्रि. गोडी लावणे.

गोडांबा पु. भरपूर मधुर फळे येणारी आंब्याची एक जात.

गोडिर–रा–सा वि. गोड; गोडसर : 'कीं सेवितां चराचरा। माझा स्वामि गोडिरा।' – ऋ ७४; 'निर्गुणा उपजवी। गुण गोडिसे।' – ऋ ७७.

गोडि (डु) ळणे अक्रि. गोड, पक्व होणे (फळे, फणस, केळी). (राजा.)

गोडी स्त्री. १. गोडपणा; मिष्टता; सुवासिकपणा; मधुरता; चांगुलपणा. २. चव; रुची. ३. नामीपणा; रुचकरपणा (पक्वान्नाचा). ४. सौम्यता; मृदुता; मधुरता (भाषणाची). ५. चटक; लज्जत; आवड : 'नीच दास्यत्वाची गोडी।' – दास २.७.३०. ६. सख्यभाव; मैत्री. ७. कैफ नसलेली (दारू). (गो.) [सं. गुड] (वा.) ० **लागणे –** आवड उत्पन्न होणे; एखादी गोष्ट परत परत करावीशी वाटणे. **गोडीस चढणे –** गोड होत जाणे; पिकणे. **गोडीस पडणे –** मानवणे; पसंत पडणे (औषधी, काम). **गोडीस येणे –** १. पुन्हा सख्य, मैत्री होणे. २. चटक लागणे; शौकी बनणे.

गोडीगुलाबी स्त्री. १. मैत्री; रहस्य; भलेपणा. २. मौज; आनंद; खेळीमेळी. ३. सामोपचार; मनमिळाऊपणा. ४. अनुनय.

गोडी दारू शोभेची दारू : '... मिरवणुकीत गोडी दारू लावीत जावी.' – लेख १३५.

गोडीळ, गोडूस–ळ वि. १. गोडसर. २. गदरलेले (फळ).

गोडुर्ली स्त्री. बारीक वांगी येणारी रानटी वनस्पती. (झाडी).

गोडे न. गोड कालवण; गुळवणी (गूळ, नारळ, दूध यांचे).

गोडे न. झाडाच्या खोडाच्या गाभ्यावरचा कोवळा भाग; नार सोडून इतर भाग. (वा.) ० **करणे –** रान काढणे. (बे.)

गोडे काष्ठ ज्येष्ठमध. (गो.)

गोडे हत्यार भाला, तरवार वगैरे : 'गोड्या हत्यारानें लोकांचा टिकाव कसा होईल.' – वसमो.

गोड्डु वि. वांझ. (कर.) [का. गोड्डु]

गोड्या पु. धान्यातून दारू काढून घेतल्यानंतर राहिलेला चोथा. [का. गोड्डु = नीरस, शुष्क वस्तू]

गोड्या वि. १. गोडघाशा; गोडखाऊ. २. पक्वान्नांचा शोकी; मिष्टान्नप्रिय.

गोड्यादेवी स्त्री. अव. बळी न घेणाऱ्या देवी; ज्यांना बळी, हत्या लागत नाही अशी देवता.

गोड्यान वि. गोडसर (झाडी).

गोण स्त्री. १. पोते; कोथळा; थैला; बारदान; बोरी; गोणी (गोणपाटाची केलेली, दाणे साठविण्याची). २. (ल.) ओझे; संकट; भार (काम, काळजी यांचा). [क. गोणी] (वा.) ० **घालून बसणे –** हट्ट धरून बसणे.

गोणगोठ गोणी; गाठोडे; ओझे : 'कोठून गोणगोठ येते त्याचा हासील मात्र...' – पेद ३१.९७.

गोणता पु. गोणपाटाचा किंवा ताडांच्या पात्यांचा विणलेला, बैलावर लादण्याचा गोण, पोते.

गोणताट न. तागाचे, गोणाचे कापड; गोणपट; तरट. पहा : **गोण**

गोणती स्त्री. गोणपाटाची लहान पिशवी. (राजा.)

गोणते–टे न. गोण; पोते. (खा. व.)

गोणपट–पाट पु. न. तरट. पहा : **गोणताट**

गोणा पु. १. मोठा गोण; गोणी; मोठा थैला, पिशवी, पोते. २. रस्त्यावरील वाळू, गाळ इ. नेण्यासाठी केलेले ओबडधोबड विणीचे तरट. ३. बांबूची किंवा वाळुंजीची विरळ विणलेली पाटी (कावडीत, बहंगीत नेण्यासाठी). ४. गाढवावरची गोण (दगड, विटा, कौले, माती इ. नेण्याची). ५. तढव; जाड पण पीळ नसणाऱ्या सुताचे दणकट जाजम; सुताडा. (ना.) [का. गोणी]

गोणापाळणा पु. नवस फेडताना द्यायच्या पाळणे वगैरे वस्तू : 'याला गोणेपाळणे बांधीते बाळाच्या नवसाचे।' – बा ९८.

गोणी स्त्री. १. तरट; गोणपाट. २. पोते; गोण; कंठाळी : 'रचोनी गोण्या कनकपट सकळीं।' – नव २५.६. ३. (ल.) भार; ओझे; संकट. पहा : **गोण** २. [क.] (वा.) ० **गळ्यात येणे, पडणे, मानेवर येणे, मानेवर पडणे –** पहा : **गळा.** ० **दंडावर, मनगटावर देणे –** एखाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्यावर भार, संकट, जिकीर, काम इ. लादणे; भार घालणे; अवघड काम सांगणे : 'मी धर्मस्थापनेसाठीं युगायुगाचे ठिकाणीं संभवत असतो अशा प्रकारचें विधान केलेस, त्या वेळेस तें करण्याविषयी तुझ्या दंडावर कोणी गोणी दिली होती ?' – काळ. ० **पाठीवर घालणे –** एखाद्यावर ओझे, काम बळेच लादणे. ० **मनगटावर येणे, पडणे –** जिकिरीचे काम इ. एखाद्याच्या अंगावर येणे, पडणे.

गोणी स्त्री. वजनमापाचे एक परिमाण. गुळाचे सहा रवे; बत्तीस पायली धान्य.

गोणी लोट (कुस्ती) एक डाव. प्रतिस्पर्धी पाठीवर असताना त्याला ढुंगणाखालून हात घालून आपल्या अंगावरून मागे फेकून चीत करणे.

गोणे पु. अव. गोंडा : 'महालक्ष्मीचे पालख्येक रेसमाचे गोणे।' – धालो ४८. (को.)

गोत न. सहायक वर्ग; साथी. [सं. गोत्र]

गोत, गोतगंगा, गोतप(पा)त, गोतवळ–ळा न. स्त्री. पु. १. भांडण, बहिष्कार इत्यादीच्या चौकशीसाठी जमलेली जातीची सभा, पंचायत; जातीचे कोर्ट; निवाडाकचेरी. २. (सामुदायिक) एकत्रित झालेली जात; सबंध जातकुल; गोत्रज. ३. (सामुदायिक) नातेवाईक मंडळी; सगेसोयरे; भाऊबंद : 'सांडून सर्वहि गोत।' – दास २.१.९. ४. नाते. ५. आलुतेबलुते. ६. (पेशवाईतील) धार्मिक किंवा सामाजिक अपराधाच्या चौकशीसाठी किंवा दत्तक, वाटणी, वतन इत्यादींचा निर्णय देण्यासाठी भरणारी गावातील सरकारी कामगार, वतनी अधिकारी, आलुतेबलुते व प्रतिष्ठित माणसे यांची न्यायनिवाडा करण्याची सभा. या सभेने दिलेला निवाडा सरकारही सहसा फिरवीत नसे. [सं. गोत्र] (वा.) ० **मिळणे –** १. एकत्र जुळणे, जथणे. २. मिसळणे; संयोग, एकजीव होणे. ३. एकमत होणे; जुळणे (मुद्दे, गोष्टी). ४. सख्य होणे. ५. पूर्वापर गोष्टींचा संबंध जुळणे.

गोतकाशी स्त्री. काशीगोत; गोतगंगा; गोतातील पंचमंडळी : '...त्यापासून अंतर पडिलें. आम्ही गोतकाशी आहो.' – ऐसंसाखं ४.६४.

गोतघोडा पु. १. अगम्यगमन करणारा माणूस. २. अशिक्षित, अक्षरशत्रू असे मोठे मूल; पोळ; म्हशा. ३. कुटुंबातील शुंभ, ढ माणूस.

गोतदंड पु. सर्व जातीला केलेला दंड : 'सदरहु कलमेप्रमाणे गोतदंड असावा.' – आंपव्य १७.

गोतप (पा–बा) त, गोताई स्त्री. १. जातिबहिष्कृत, गुन्हेगाराला शुद्ध करून पुन्हा जातीत घेण्याच्या वेळेचा संस्कार; प्रायश्चित्ताचे जातजेवण. २. जातसभा; पतिताला आपल्या पंक्तीला घेऊन जात त्याला पावन करते तो विधी.

गोतपत्र न. वंशावळ.

गोतपुड्या स्त्री. अव. देवप्रतिष्ठा. (खा.)

गोतमहजर पु. गोतसभेने दिलेले निकालपत्र, निकाल; थळपत्र.

गोतमुख न. जातीचे पुढारी व प्रतिनिधी यांचे म्हणणे : 'पायरीवर आलेल्यांचा न्याय जिजाबाईंनी गोतमुखाने सोडविलेला पहात होते.' – श्रीयो १.५२.

गोतर पु. गव्हाच्या काडांचा भुस्सा.

गोतरचाटा पु. नवरीने नवऱ्याच्या गोतातील मंडळींबरोबर केलेला अल्पोपहार. हा विधी वरात निघण्यापूर्वी नवरीच्या घरी होतो. (कु.)

गोतरणी पु. स्त्री. गोतसभेची आमंत्रणे करणारा. (कातकरी) पहा : **गोतारणा**

गोतसभा स्त्री. जातीतल्या लोकांची सभा : 'गोतसभा बोलावून गोतमुखाने न्याय करीत.' – श्रीयो २.२९७.

गोता–त पु. स्त्री. १. आचका; गचका; हिसका; झोका (पतंग, वावडी यांना दिलेला). (क्रि. खाणे, मारणे, देणे.) २. बुचकुळी; बुडी (पक्ष्याने मारलेली). ३. (ल.) संकट; अडचण; विघ्न; पेच. ४. तोटा; नुकसान; धक्का; तोट्याची बाब (क्रि. खाणे, बसणे). ५. थाप; फसवणूक; ठकवणूक. (क्रि. देणे.) ६. व्यर्थ येरझार; हेलपाटा. (क्रि. खाणे, बसणे.) [का.] (वा.) **गोत्यात आणणे –** संकटात किंवा निष्कारण खर्चात आणणे, घालणे. **० देणे –** धोका देणे, फसवणे. **गोत्यात येणे –** संकटात सापडणे, अडकणे.

गोताई स्त्री. जातिभ्रष्ट झालेल्या शूद्राने परत जातीत येण्याचे वेळी करण्याचे प्रायश्चित्त.

गोताई स्त्री. १. गोतसभा; ग्रामसभा. २. पहा : **गोतपत** १

गोतापा पु. गोता; गुंतावा. (कर.)

गोतारणा पु. १. गोत जमविण्याचा हक्क असणारा इसम. (आगरी) २. ठाकरातला प्रमुख. पहा : **गोतरणी**

गोतावळ–ळा–ळे, गोताळा स्त्री. न. पु. गोत; गोतसभा; गोतगंगा.

गोतांबील स्त्री. १. शरीरसंबंध न होणाऱ्या जातीतील परस्पर शरीरसंबंध झाल्याने होणारा वर्णसंकर; सबगोलंकार; जातीजातींची सरमिसळ. २. सर्वांनी एका पात्रात जेवणे : 'का सवें बैसोनि नारी। गोतांबील करी।।'–ज्ञा १७.१६०. ३. (ल.) पंचभेळ; खिचडी; सरभेसळ; गोंधळ.

गोतिया पु. गोतावळा; गोत्रज : 'आपले कोणी भाऊबंद दाईज गोतिया उभा राहिलियाने त्यास आपण समजाऊनू.' – शिचसाखं ५.१७१.

गोती स्त्री. पहा : **गोता**

वि. नात्याचे; गोतासंबंधी. (राजा.)

गोतीशेरॉ, घोटीशॅरॉ पु. सहस्रमुळी (एक वनस्पती). (गो.)

गोत्र न. १. कुटुंब; जात; कूळ; वंश; घराणे : 'ऐसें गोत्रचि दोहीं दळीं। उदित जालें असे कळीं।' – ज्ञा १.१८४. २. वंश – कुलस्थापक; वंशाचा मूळ ऋषी (अत्री, कौंडिण्य इ.) ३. गोतावळा; नातेवाईक. पहा : **गोत.** (समासात) गोत्र–वध–हत्या–संबंध–विचार–घटित. [सं.] (वा.) **० उतरणे, ० जमणे, ० येणे –** लग्न जुळवण्याच्या वेळी परस्पर घराण्यातील गोत्रांचा मेळ बसणे; संबंधास अनुकूल असणे. **० मिळणे –** १. एकमेकांशी पटणे; जुळणे; जुडणे. २. मिसळणे. **गोत्री लागणे –** १. एखाद्या कुटुंबात दत्तक जाणे. २. (ल.) एखाद्याच्या नादी लागणे; चटावणे. ३. कक्षेत, आटोक्यात येणे (व्यवहार).

गोत्रकुठार–कुदळ पु. १. अगम्यागमनी; स्वगोत्रज स्त्रीशी गमन करणारा. पहा : **गोतघोडा** १. २. गोताचा काळ.

गोत्रकोल्हाळ पु. वि. गोत्रात, कुळात कल्होळ माजवणारा.

गोत्रज, गोत्री वि. १. स्वतःच्या गोत्रातला; संबंध असलेला; नात्याचा : 'हे येर येरे आघवे। गोत्रज आमुचे।।' – ज्ञा १.२०७. २. (समाज.) एकाच गोत्रात जन्मलेले; एकाच ऋषिवंशातले. (सं.)

गोत्रनाव न. अभिधान (पर्याय); नामनिर्देश; उल्लेख; अर्थबोध.

गोत्रपुरुष, गोत्रबंधू पु. एकाच गोत्रात उत्पन्न झालेला मनुष्य; स्वतःच्या गोत्रातला पण पिढ्या तुटलेला दायाद. (कायद्यात हे शब्द एकाच सामान्य गोत्राच्या दायादांना लावतात). [सं.]

गोत्रहत्या स्त्री. १. गोत्रजाचा वध. २. (विनोदाने) आपल्याच भिडूची सोंगटी मारणे. [सं.]

गोत्रैक्य न. समान गोत्र. (लग्नाच्या वेळी विचारात घेतात.) [सं.]

गोथवड स्त्री. चाळीसारखा गोठा, दावण; ठाण; कोटंबा. (को.)

गोथा वि. धुरा धारण करणारा; पुढारी; सेनापती; खासा.

गोथिक कमान (स्था.) गोल आकाराची कमान.

गोद स्त्री. १. कूस. २. स्त्रीचे ओटीपोट. ३. मांडी. (झाडी).

गोद–दी स्त्री. १. बंदराच्या ठिकाणी जहाजे उतरण्यासाठी केलेली सुरक्षित जागा; खाडीचे पाणी आत येईल अशा बेताची गलबते बांधण्याची जागा. ही चारी बाजूंनी बंद असते व उघडझाप करता येईल असे हिला समुद्राच्या बाजूला दार असते. २. साठवण; वखार. ३. धक्का.[हिं.]

गोदई स्त्री. गर्भाधानसमयी मुलीला माहेराकडून पलंग, बिछाना, विड्याचे तबक इ. मिळणारे सामान; गर्भाधानाचे साहित्य. (व.)

गोदई स्त्री. गोधडी; वाकळ; कापडाचे तुकडे एकत्र करून शिवलेले पांघरूण: 'गाईवरी गोदया लादील्या ग लमानानं।' – जामामा ३०२.

गोदड वि. खरबरीत (पित्तातिशयामुळे होणारी); राठ; पुळ्या आलेली (कातडी).

गोद(ध)ड, पु. गोसाव्यांच्या १८ पंथांपैकी एक पंथ. हे लोक गोधडी पांघरतात. पहा : **अखाडा**

गोदडशाई वि. १. गोदडपंथी. २. ठिगळांचा; तुकड्यांचा; गोधडीसारखा (कपडा). ३. अव्यवस्थित; भोंगळसूत्री (काम, कारखाना).

गोदडी–ड्या, गोदडपंथी–बावा वि. गोदड गोसाव्यासंबंधी–सारखा; गोदडशाई.

गोद(ध)डी स्त्री. १. थोडासा कापूस आत असलेली किंवा अनेक कापडाचे तुकडे एकावर एक एकत्र शिवलेली पासोडी; वाकळ; रजई. २. (ल.) फाटलेले, ठिगळ दिलेले, लावलेले वस्त्र; बोथरी. ३. गोवर, घामोळे इत्यादीने भरलेले अंग.

गोदडी आंबा ज्याची साल गोदडीसारखी जाड असते असा आंबा.

गोदडी निंबू, लिंबू चकोत्र्याप्रमाणे असणारे (जाड सालीचे) लिंबू.

गोद (ध) डे न. (निंदार्थी) गोधडी.

गोदण स्त्री. गव्हाण; गुरांपुढे वैरण टाकण्याची जागा. (बे.)

गोदन न. लहान गोठा. (माण.)

गोदन पु. १. कार्तिक शु. १. २. दिवाळीतील अंगणीचा शेणाचा ढीग (झाडी). ३. गोंदण.

गोदरी समाज, समुदाय.

गोदरी स्त्री. १. मोकळी, पडीत जागा : 'बिदी गोदरीया झाडिति' – लीचपू ३. २. मोकळ्या जागेवर भरलेला बाजार : 'गोदरी भरली

देखिली' – लीचपू ३०२.

गोदवेल स्त्री. भाताची एक जात.

गोदंती हरताळ एक पिवळे विषारी द्रव्य. याचे भस्मही करतात. हे वैद्यकांत उपयुक्त असते : 'गोदंती हरताळाविशी एक दोन रोज शोध केला.' – ऐलेसं ५१५४.

गोदा पु. १. खिळा इत्यादीने तापवून दिलेला वाटोळा डाग. २. गादी, लेप यांच्यातून आरपार नेलेल्या दोऱ्याच्या गाठींचा (टाक्यांचा) वरचा भाग, डोके.

गोदा पु. काठीने ढोसणे; फटका : 'बैल अगदीच संथ चाललेले पाहून दशानं पराणी काढली नि एकेकाला एकेक गोदा दिला.' – लादि २७.

गोदा पु. घरटे. [ते. गोदे]

गोदान, गोप्रदान न. ब्राह्मणाला गाईचे दिलेले दान : 'प्राचीन काळीं गाय दान मिळणें सोपें होते, पावली मिळणें कठीण, पण हल्लीं चार आण्यांत गोप्रदान.' – गांगा १४४.

गोदान न. सोळा संस्कारांपैकी व समावर्तनाच्या वेळीचा संस्कार. [सं.]

गोदाम पहा : **गुदाम**

गो (गौ) दिव्य न. गाईचे शेपूट हातात धरून साक्ष देण्याचा एक जुना शपथेचा प्रकार.

गोदी स्त्री. (कुस्ती) एक डाव. समोरून अगर मागून प्रतिस्पर्धाचा पाय व त्याच बाजूचा हात आपल्या हाताच्या पकडीत घट्ट धरणे.

गोदी पहा : **गोद**

गोद्री, गोदरी स्त्री. गुखडी; गावाजवळची शौचाची जागा; उकिरडा. (व.)

गोद्री स्त्री. १. दोरीचा पाळणा. २. कूस. [फा.]

गोद्री, गोदरी स्त्री. गुजरी; मंडई; बाजार. (व.)

गोध–धू पु. दोरीने हात सोलटू नये म्हणून धनुर्धाऱ्याने घालायचा हातमोजा.

गोधड–डी स्त्री. शेंगा येणारी, दुभत्या जनावरांना उपयुक्त अशी एक वनस्पती. (वाई).

गोधडी, गोधडी आंबा, गोधडे पहा : **गोदड**

गोधडी स्त्री. दुलई; वाकळ; कंथा; रजई. [हिं. गुद्री]

गोधन न. गुरेढोरे किंवा त्यांच्या रूपाने संपत्ती : 'धन्य तीं गोधनें कांबळी काष्ठीका।' – तुगा २०८.

गोधवड स्त्री. गुरे बांधण्याकरिता गाताडी वगैरे तयार करून केलेली जागा.

गोधंता पु. पळसाच्या फुलांचा रंग. (व.)

गोधा स्त्री. घोरपड. [सं.]

गोधा पु. धक्का; फटका : 'शेणवलीला जावांचे गोधे खात बसली असती.' – रथ २१५.

गोधांगुली–ळी, गोधा स्त्री. धनुर्धाऱ्याचे अंगुस्तान. हे घोरपडीच्या चामड्याचे असून धनुष्याच्या दोरीपासून इजा होऊ नये म्हणून डाव्या हाताला गुंडाळलेले असते : 'जरासंध पाहे हस्त विलोकून। तों देखे गोधांगुळीचिन्ह।' – ह ३३.७५. [सं.]

गोधुलुक स्त्री. सांज; संध्याकाळ : 'मग वैराग्याची गोधुलुक।' – राज्ञा १८.१०१९.

गोधूम पु.गहू. [सं.]

गोधूमपाठ पु. सायंकाळचा पाठ; प्रार्थना.

गोधूल, गोधूल मुहूर्त स्त्री. १. सायंकाळचा (गुरे रानातून परत घरी येत असताना त्यांच्या चालण्याने उडालेली धूळ दिसते तेव्हाचा) काळ. २. सूर्यास्तापूर्वीची व नंतरची तीस पळे यामधील काळ. हा लग्नास शुभ मानतात. गोरज मुहूर्त.

गोधूल–ळ लग्न १. गोरज मुहूर्तावर लागलेले लग्न. पहा : **गोधूल**. २. सूर्यास्तसमयी उदय पावणारी राशी, लग्न.

गोधूलिक वि. गोधूलसंबंधी (कार्य, लग्न-मुहूर्त).

गोधूळ–ळी पहा : **गोधूल**

गोनचवळी स्त्री. लांब शेंगा येणारी चवळी; ढांग चवळी. (व.)

गोना पु. गोणपाट; तरट. (चांदा) पहा : **गोण, गोणा**

गोन्नी स्त्री. 'बारिक भोकरें, नरवळी'. – (तंजा.)

गोन्या पु. खत भरण्याचे गोणपाटाचे झोळ्यासारखे शिवलेले साधन. (अहि)

गोप पु. एक प्रकारचे गवत; नागरमोथा.

गोप पु. गुराखी, गवळी जात, त्या जातीतील व्यक्ती : 'पूजिति सांग नगा ती रीति। सुखाचीच गोप सांगन गाती।' – मोकृष्ण २४.७. [सं. गो + प]

गोप (पी) चंदन न. १. द्वारकेकडील गंधासारखी अंगाला लावायची माती; गोपमाती. या मातीच्या गंधात मुद्रा बुडवून टिळे लावतात. २. (ल.) सर्वस्वी नाश; बेचिराखी; राखरांगोळी (देशाची).

गोपचार पु. गायरान; गोचरण.

गोपचिळी स्त्री. गप्प राहणे : 'तोंडून कधी चकारशब्द नाही सगळी गोपचिळी.' – कोउ २७.

गोपटे न. अव. कुंपणाला पडलेली भगदाडे. (साष्टी.)

गोपद न. १. गाईचे पाऊल. २. गाईच्या पावलाचा मार्ग, खूण. ३. आत पाणी भरलेली गोपदाची खूण, डबके.

गोपद्म न. रांगोळीने काढली जाणारी गाईची पावले. गोपदचिन्ह. [सं.]

गोपन न. १. गुप्त राखणे; लपवणे; छपवणे. २. राखणे; ठेवणे; रक्षणे; संरक्षण. संगोपन हा शब्द रूढ आहे. [सं. गुप् = गुप्त ठेवणे]

गोपनी स्त्री. ठेव; ठेवणी; जपणूक; 'लुगडं घेतीयीलं दोनी पदार गोपनीचं।' – राके २४०.

गोपनीय वि. छपविण्यास, रक्षण्यास योग्य; गुप्त ठेवण्यास आवश्यक असलेले. हा शब्द सरकारी कागदपत्रे इ. च्या संदर्भात विशेषेकरून वापरण्यात येतो. [सं.]

गोपनीयता स्त्री. गुप्तता; फुटणार नाही, उघड होणार नाही असे ठेवणे.

गोप (पु) र न. रांगोळीचा एक प्रकार.

गोपरू पु. एक प्रकारची बांगडी.

गोपवाडा पु. गवळीवाडा : 'जो नांदवी उत्कट गोपवाडे।' – सारुह १.७८.

गोपा पु. १. (तान्ह्या मुलाला लडिवाळपणाने म्हणतात) तान्हे मूल (गोप = श्रीकृष्ण यावरून). २. गर्भाधानाच्या दिवशी जिचा गर्भाधान संस्कार असतो त्या स्त्रीच्या हातात मुलाप्रमाणे कुंची वगैरे घालून द्यायचा नारळ किंवा कपड्यांचा गुंडाळा. ३. लग्नात नवरानवरीच्या अंगावर किंवा

इतर प्रसंगी पाहुण्यांच्या अथवा जमलेल्या मंडळींच्या अंगावर मुलाचे मूत म्हणून ज्यातील रंग शिंपडतात तो वस्त्राचा गोळा, बदका. (क्रि. मुतवणे.) ४. मुलाचे नाव ठेवताना पाळण्याच्या खालून व वरून बायका कुंची घातलेला वरवंटा अथवा नारळ एकमेकींच्या हातात देतात तो. ५. ज्याला स्वत:ला खेळता येत नाही किंवा हालचाल करता येत नाही, असे मूल; लोळागोळा.

गोपानशी–सी स्त्री. सज्जाच्या खांबाखाली येणारा तुळईचा शेवट; छपराचा वासा; छप्पर : 'गोपानशीला अगणीत मोतीं।' – सारुह ५.२०.[सं.]

गोपायिता वि. रक्षक; रक्षण करणारा. [सं.]

गोपाल–ळ पु. १. गुराखी; गुरे पाळणारा. २. राजा. ३. भगवान श्रीकृष्ण. ४. एक जात व त्या जातीतील व्यक्ती; डोंबारी. हे मनगटाने दगड फोडतात, मोठाली वजने उचलतात व कसरतीचे खेळ खेळतात. हे लोक गावकऱ्यांची गुरे राखोळीला घेतात.

गोपालवृत्ति–त्ती स्त्री. पशुपालनाचा धंदा. [सं.]

गोपाष्टमी स्त्री. कार्तिक शुद्ध अष्टमी. श्रीकृष्णाचा गाई चारण्यास नेण्याचा पहिला दिवस म्हणून या दिवशी त्यांची व गाईची पूजा करतात.[सं.]

गोपाळ पु. खाडीतून येणारे मासे पकडून त्यावर उपजीविका करणारा : 'भरतीच्या वेळी गोपाळ मासे मारण्यासाठी बुड्या घेऊ लागले.' – इंधन ११.

गोपाळ पु. महारांच्यामधील साधू.

गोपाळकाला पु. गोकुळाष्टमीच्या उत्सवाच्या व श्रीकृष्णाच्या इतर उत्सवाच्या शेवटी करायचे खेळ, द्यायचा प्रसाद, जेवण वगैरे; गोकुळाष्टमीच्या पारण्याच्या दिवशी दहीहंडी फोडून तिच्यातील वाटण्यात येणारा प्रसाद.

गोपाळी क्रिवि. गोरजकाळी; गोधूललग्नी.

गोपिका, गोपी स्त्री. गोपालस्त्री; गवळण : 'तुझे कथिति गोपिका विविध तीस बोभाट ते।' – केका ८६. [सं.]

गोपित वि. (प्र.) गुपित. १. गुप्त; झाकलेले. २. राखलेले; संरक्षण केलेले.

गोपिपी पु. एक लहान काळा पक्षी.

गोपी स्त्री. एक पक्षी : 'नाचण, बाणघोषा... गोपी यांच्या करमणुकीच्या कार्यक्रमात आवणी आटोपली.' – आआशे ३६५.

गोपुच्छ पु. बाणाचा एक प्रकार. [सं.]

गोपुच्छयति–ती स्त्री. (संगीत) गायनारंभी विलंबित, मध्ये मध्य व अंती द्रुत अशी लयीची गती असणे. [सं.]

गोपुर न. १. गावच्या वेशीवरील, देवळाच्या प्राकारावरील, राजवाड्याच्या महाद्वारावरील मजलेदार, नक्षीदार किंवा मूर्ती वगैरे काढलेली इमारत. ही द्राविडी शिल्पपद्धती दक्षिण हिंदुस्थानात रूढ आहे : 'एक चढले माडिया गोपुरीं।' – एरुस्व ६.१७. २. अशा तऱ्हेची वर इमारत असलेले महाद्वार, वेस इ. ३. (सामा.) महाद्वार; वेस; ४. स्त्रिया चैत्रात भिंतीवर काढतात ती चित्रे. ५. गोपुराकार विशिष्ट रचना. (कर.) [सं.]

गोपुर न. नागरमोथा गवत.

गोप्ता वि. पु. रक्षक : 'या दोहींचा अभिमानी गोप्ता' – विसिं ४६६.

गोप्य वि. १. गोपनीय; लपविण्यास, छपविण्यास योग्य, अवश्य किंवा शक्य अशा बाबी. २. गुप्त : 'तुका म्हणे माझ्या वडिलांचें ठेवणें। गोप्य नारायणें न करावें।' – तुगा १२९८. [सं.]

गोप्य न. एक प्रकारचे गहाण (तांब्याची भांडी इ. सांसारिक वस्तू).

गोप्रदान न. १. पहा : **गोदान**. २. (थट्टेने) शिव्या.

गोप्रसव पु. वाईट नक्षत्रावर जन्मलेले मूल गाईच्या तोंडापुढे धरतात. असे केल्याने ते गाईचे मूल होऊन अशुभापासून मुक्त होते. अशा मुलाला गोप्रसव म्हणतात.

गोप्रसवशांती–ति स्त्री. कुयोगी जन्मलेले मूल गाईच्या मुखातून जन्मले अशी भावना धरून कुयोगदोषनार्थ करायची शांती. [सं.]

गोफ पु. १. गळ्यात घालायचा किंवा कंबरेला बांधायचा एक दागिना (सोने, चांदी, वळीव रेशीम यांचा). २. विणलेला चाबूक, दोरी, बंद; चांगला वळीव जाड दोरा. ३. कंबरेचा करगोटा. ४. एक खेळ; निरनिराळे दोरीचे पदर घेऊन अनेकजण टिपऱ्या खेळत, त्यांचा विणतात तो गोफ. पौराणिक नाटकातून कृष्णलीलेत असे गोफ गोप–गोपी रंगभूमीवर विणत असत : 'गोपालकृष्णा आतां आपण गोफ खेळूं.' – रासक्रीडा २१. [सं. गुंफ]

गोफण–णे, गोफीण स्त्री. न. दगड मारण्यासाठी दोरीचे, चामड्याचे, रबराचे विशिष्ट प्रकारच्या आकृतीचे असलेले साधन; दगड भिरकाविण्याचे साधन; एक हत्यार : 'हातीं घेवोनि गोफणा।' – कथा ६.१९.५३. [सं. गुंफनम]

गोफण स्त्री. (मल्लखांब) दोन्ही हातांची बोटे एकमेकात अडकवून लांबून मल्लखांब गोफणीसारखा धरून मारायची उडी.

गोफणगुंडा–गोटा पु. १. गोफणीतून मारायचा दगड. २. (ल.) हुशार, चुणचुणीत माणूस.

गोफणणे उक्रि. गोफणीने फेकणे, मारणे; गोफण मारणे : 'एकें चिंतामणि गोफणिला। तो येऊन अंगणांत पडिला।' – ह ४.२१.

गोफणफळ न. (वन.) आतील स्फोटक यंत्रणेमुळे बिया दूरवर फेकल्या जाण्याची अंतर्गत योजना असलेले फळ.

गोफा पु. १. घोटा (पायाचा). २. खोपा; बुचडा (वेणीचा).[सं. गुल्फ]

गोफा (फा) टणे सक्रि. १. गुरफटणे; धरणे; पकडणे; गुंतवणे; ओढून घेणे (भाषणात). २. पेचात घालणे; गोंधळविणे : 'अवघ्या मिळोनि गौळणी। गोफाटली नंदराणी।' – ह ७.१५९. ३. भुलविणे; चकविणे; फशी पाडणे. ४. वेठ वारणे; गडबडगुंडा करणे; कसेतरी, अपुरतेपणी करणे (तोकड्या सामग्रीने, पैशाने). (को.) ५. भागविणे; निर्वाह करणे. ६. वेष्टणे; वेढणे.

अक्रि. १. श्वास कोंडणे; दम छाटणे; गुदमरणे. २. घुटमळणे.

गोफाटणे सक्रि. झुगारणे. पहा : **गोफणणे**.

गोफाटा पु. संकट; पेच; अडचण; घोटाळा; पंचाईत (फक्त सप्तमी विभक्तीत प्रयोग). (क्रि. घालणे, सापडणे, पडणे.)

गो(गु)फ्तगो स्त्री. संभाषण; बोलाचाली : 'त्याउपर बहुत गोफ्त–गो जाली.' – मइसा २०.३८. [फा. गुफ्तगू]

गोबड न १. गुरांच्या शेणामुताचा राडा; खत. पहा : **गोबर**. २. ब्रह्मघोटाळा; खिचडी.

गोबडणे अक्रि. घाणीने, राडीने लिडबिडणे (भांडे, वस्तू, जागा).

गोब (बो) र पु. १. राख, गुरांचे शेण इ. (कु. गो.) २. खत.

गोबर गॅस मुख्यत: जनावरांच्या शेणामुतावर काही प्रक्रिया करून मिळणारे इंधन, ऊर्जा.

गोबरहारी (वाणा) पहा : **गौडारीवाणी**

गोबरा वि. १. मोठ्या पोटाचे; बेडौल दिसणारे; फुगीर (भांडे, मडके). २. (निंदेने) बसकट, चापट चेहऱ्याचा; फुगीर चेहऱ्याचा. ३. (व्यापक) विद्रूप; बेडौल; कुरूप (माणूस). ४. एक मोठा मासा. (गो.) पहा : **गोब्रू** [क. गुबरु]

गोबरागणेश पु. गुबगुबीत व वाटोळ्या अंगाचा माणूस (गणपतीसारखा).

गोबरा गुबगुबीत फुगीर; वर आलेला; वाटोळा : 'बसलेली गालफडे गोबरी गुबगुबीत दिसू लागायची.' – इंधन २०.

गोबराळ स्त्री. केळीची एक जात.

गोबरी वि. काथाचा प्रकार. (झाडी.)

गोबरेला वि. विद्रूप; कुरूप; बेडौल : 'तें कोपऱ्यातील गोबरेल्या चेहऱ्याचें – कार्टे –' – मक १९५९.

गोबस्तान वि. गाईसारख्या छातीचा (घोडा). (दिसण्यात खराब परंतु खोडी नाही असा). – अश्वप १.१०४.

गोबा पु. गोळा; मोठा घास.

गोबा पु. शिंदीला बांधलेले मडके. (झाडी)

गोबाडणे सक्रि. १. शेणाने, घाणीने माखणे (भांडे, वस्तू, जागा); सारवणे. २. एकत्र करणे; मिसळणे; गोंधळ उडविणे.

गोबी–भी स्त्री. कोबी (भाजी). (माळवी)

गो (घो) बे न. अचानक लाभ; घबाड; सापडलेला गुप्त ठेवा; नशिबाची रेषा उमटणे; डबोले. (क्रि. येणे, सापडणे, मिळणे, हातास लागणे).

गोब्रा पु. राखी रंगाचा मासा. हे मासे दिवाळीच्या सुमाराला पकडतात. (को.) पहा : **गोबरा**

गोब्राह्मण पु. १. गाय आणि ब्राह्मण. २. (ल.) अगदी साधाभोळा, गरीब ब्राह्मण.

गोभ न. शिंदी धरण्यासाठी शिंदीच्या झाडाला टांगलेले मडके. (व.)

गोभी स्त्री. एक औषधी वनस्पती; पाथरी. [हिं.]

गोम स्त्री. १. पुष्कळ पायांचा एक किडा; गोंब; घोण : 'गोमीस पाय बहुत, एक पाय मोडला तरी उणें पडत नाहीं.' – भाब ८२. २. घोड्याच्या बहात्तर खोडींपैकी एक; शेपटीकडे रोख असलेल्या परतलेल्या केसांची रेष, भोवरा. हे अशुभ चिन्ह मानतात. ३. सरळ केसांची गोमाकार रेषा; डोक्याकडे रोख असलेली गोम. ही शुभ मानतात, पण डोक्यावर असेल तर अशुभ. (ल.) दोष; ऐब; व्यंग; खोड; गुणामध्ये एखादी उणीव. ४. किनारीतील गोमेसारखी नक्षी. ५. (ल.) खुबी; मर्म; सार; गुह्य. [का. गोमु = अश्वदोष]

गोम पु. गोंद. (गो.) [पोर्तु.]

गोमकार पु. घुमाघुम असा आवाज : 'सकाळच्या पारी रविबाईची गोमकार।' – लोले ४६.

गोमगाटा पु. गोंधळ; आरडाओरडा : 'येवढ्या गोमगाट्यात त्यो कशाला बाहिर ईल ?' – जाण २९६.

गोमगाला पु. दंगा; मस्ती; गडबड; गोंगाट; गलबला. (कर.) [ध्व.]

गोमचिवळ पु. न. दोन फाट्यांच्या शेपटीची काळसर चिमणी.

गोमजी पहा : **गोमा, गोमाजी**

गोमटा पु. विणकामासाठी ओव्या, वह्या तयार करण्यासाठी केलेला पाच पेडी दोरा. पहा : **ओवी**

गोमटा वि. १. गोड; सुंदर; चांगले; मनोहर : 'कां जें या जगीं तुजपरतें। गोमटेचि नाहीं।' – रास १.९६५. २. सुरूप; सुंदर (वर्ण, रंग); गोऱ्या वर्णाचा.

गोमटी स्त्री. एक प्रकारची काचेची बांगडी.

गोमटी स्त्री. मान. (गो.)

गोमटे न. १. चांगलेपण; सुरेखपण : 'गोमटें काय शब्दाचें। एकेक वाणूं।' – अमृ ६.११. २. चांगली गोष्ट; सत्कृत्य : 'दु:खरूपता पापमूलता अनित्यता ए तिन्हीं नव्हेति तरि संसारावाचौनि आणिक कांहीं गोमटे असे।' – चसू ३७. (वा.) **० करणे –** गौरव करणे; परामर्श घेणे; लाड पुरविणे : 'तुम्ही संताजी घोरपडे कैलासवासी याजपासी पूर्वी येकनिष्ठपणे सेवा केली त्याणी लेकपणे तुमचे सर्वस्वें गोमटे करून चालविले.' – पेद ३१.८५.

गोमपठाडी स्त्री. १. मोठी गोम. २. (ल.) मोठा दोष; मुख्य मर्म, खुबी.

गोमय न. गाईचे शेण. [सं.]

गो–मसूरिका स्त्री. गायीच्या सडांना येणाऱ्या देवी. [सं.]

गोमा पु. १. इच्छित वस्तूविषयी उदासीनपणाचे किंवा नावडतेपणाचे ढोंग दाखवणे; ज्याविषयी उत्तम माहिती आहे त्याबद्दल अज्ञान असल्याचा बहाणा. (क्रि. करणे, लावणे.) २. मोठेपणाचा डौल; आव. ३. ढोंग; बतावणी.

गोमागणेश पु. आढ्यतेखोर माणूस.

गोमा गणेश पितळी दरवाजा (मोगली अमलातील एका चतुर भिक्षेकऱ्याच्या गोष्टीवरून. हा पितळी दरवाजा नावाच्या वेशीवर बसून मालावर बेपरवाना जकात घेई) आढ्यतेखोर; अधिकार नसताना बडेजाव सांगणारा.

गोमागणेशी वि. बेकायदा; अनधिकृत : 'ते शिरजोर होईपर्यंत राजांनी त्यांच्याकडे कानाडोळा केल्याने तेही कालावधीने गोमागणेशी इनामदार झाले.' – गांगा २७.

गोमाजी, गोमाजी कापशा पु. १. उद्धटपणे पृच्छा करणाऱ्याला उत्तरादाखल योजलेले काहीतरी नाव. २. कोणीतरी, अलबत्यागलबत्या, अगदी अप्रसिद्ध, क्षुद्र माणूस; ३. लुडबुड्या; लांडा कारभार करणारा. ४. (सरकारी हिशेब) एखाद्या अब्रूदार पण शेतसारा न भरलेल्या माणसाबद्दल हे टोपणनाव घालतात. या माणसाच्या साऱ्याबद्दल पाटील जबाबदार असतो. ५. पूर्वी एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला त्यावरून.

उदा. तुम्ही कोण मोठे गोमाजी कापशे लागून गेला? = तुम्ही कोण मोठे बाजीराव?

गोमाजी ना तिमाजी कोणीतरी फालतू; ज्याचे नाव सांगायची गरज नाही असा कोणीतरी.

गोमाजी सोमाजी अलबतेगलबते; साळकोजीम्हाळकोजी; वाटेल ते लोक (तिरस्कारार्थी).

गोमाशी–सी स्त्री. घोडे, गाई वगैरेंच्या अंगावरील एक मोठी माशी; माशीची एक जात.

गोमांस न. गाईचे मांस. शपथेसारखा किंवा निषेध दाखवताना याचा उपयोग करतात. कारण हिंदूंना गोमांस अगदी निषिद्ध आहे. (वा.) ० **खाणे–** अत्यंत निषिद्ध निंद्य–गोष्ट करणे. **गोमांसाप्रमाणे असणे –** अतिशय त्याज्य, निषिद्ध असणे.

गोमिसळा पु. एक पक्षी : 'भंवरासारिखे काळे : होति सपक्ष गोमिसळे'– मूप्र १७७३.

गोमीकाठ पु. गोमेसारखी वीण असलेला वस्त्राचा काठ.

गोमीकाठी वि. गोमीच्या विणीचे काठ असलेले (लुगडे, धोतर इ.).

गोमीच न. घोड्याची एक खोडी, व्यंग. घोड्याच्या कपाळावरील एक अशुभ चिन्ह. दोन भोवरे जोडणारी केसांची रेषा, चिमटा, पहा : **चिमूट**

गोमुख न. १. तीर्थ वगैरे पवित्र पाणी खाली पडण्यासाठी बांधलेले किंवा बनवलेले दगडी किंवा धातूचे गाईचे तोंड. २. एक प्रकारचे गाईच्या तोंडासारखे फुंकून वाजविण्याचे वाद्य : 'तों वाद्यें शंखभेर्यादी पणवानक गोमुखें ।' – वामन गीतासमश्लोकी १.१३. [सं.]

गोमुखव्याघ्र पु. १. दिसण्यात गाईसारखा सौम्य पण अतिशय क्रूर असा वाघ. २. गाईचे कातडे पांघरलेला लांडगा. ३. (ल.) वरून गरीब पण आतून लुच्चा माणूस. [सं.]

गोमुखासन उडी (मल्लखांब) पाठीवर गोमुखाप्रमाणे मारायची उडी.

गोमुखी वि. गरीब; गाईसारखा शांत. [सं. गोमुख]

गोमुखी वि. पुढे अरुंद व मागे रुंद होत जाणारी (आकृती) : 'आमचा वाडा पुढे अरुंद व मागे रुंद होत गेलेला होता. म्हणजे गोमुखी होता.' – शंशिं ९७.

गोमुखी स्त्री. गाईच्या तोंडासारखी काटकोनी जपमाळेची पिशवी. हिच्या आत हात घालून जपाची माळ ओढतात : 'काय मौन धरुनिया गोमुखिला जाळिसी ।' – राला ८७.

पु. एक प्रकारच्या नवसात नियम केल्यामुळे हात न लावता तोंडाने अन्न उचलून जेवणारा माणूस. (को.) [सं.]

गोमूत्र, गोमतेल न. गाईचे मूत. हे पवित्र मानतात व ते अपवित्र वस्तूंवर शिंपडून त्या पवित्र करतात. [सं.]

गोमूत्रवायु–यू पु. एक नत्रयुक्त वायू. [सं.]

गोमूत्रिका स्त्री. दोन्ही चरण सारखे असलेला श्लोक. [सं.]

गोमूत्रिकान्यायगुणाकार पु. (ज्यो.) गुणाकाराचा एक प्रकार.

गोमूत्रिकाबंध पु. काव्याचा एक प्रकार. याच्या द्वितीय चरणात पहिल्या चरणातील बहुतेक अक्षरे येतात.

गोमेटी–ठी स्त्री. एक वेल. या वेलीचे फळ तोंडल्यासारखे पण दोडक्या–प्रमाणे कर्वेदार आणि पिकल्यावर मधासारखे गोड असते. (को. गो.)

गोमेद पु. न. १. एक रत्न; वैडूर्य. याचा रंग गोमूत्रासारखा असतो. हे रत्न राहूला प्रिय आहे. २. शिवधातू; शिलेमणी. हा चुनखडीचा पोटभेद आहे. हा फार कठीण असल्याने या धातूचे रसायनशाळेतील खलबत्ते, छत्रीच्या मुठी, सुऱ्या इ. वस्तू करतात. यावर रंग देता येतो. [सं.]

गोमेध पु. ज्यात गाईची विधिपूर्वक हत्या करण्यात येते असा यज्ञ. [सं.]

गोयडी पहा : **गोधडी** (गो.)

गोयडॉ पु. दांडू (गो.).

गोयप पु. लाकूड कातण्याचे हत्यार. (कु.)

गोयला पु. सरपणाची मोळी, आखूड भारा (दोन हात लांबीचा). (को.)

गोया उभ.अ. म्हणजे; जणू काय : 'जे ये समयीं आपलें येणें गोया करामत जाली.' – मइसा १.१८८. [फा.]

गोया स्त्री. अव. मैत्रिणी.

गोयाबा पु. मंद, आळशी; मूर्ख, अडाणी माणूस; गरीब, बावळा माणूस.

गोयेटी स्त्री. एक औषधी वनस्पती : 'गोयेटीचे मूळ सहा मासे उगाळून...' – फचि ७४.

गोयॉ स्त्री. गुराख्यांचा लांब स्वर, हेल, हरळी. (गो.)

गोर पु. गौरव; मान :'अवधिया दिला गोर। मजकरे पाहीना।'– तुगा १.२२६.

गोर स्त्री. गळा; मान : 'राहिना घरीं कधीं गोर गोंविली मज गाईचीं।' – पला ८० ब.

गोर पहा : **गोवर** (रोग)

गोर पु. गुजरातील ब्राह्मणेतरांचा उपाध्याय. [सं. गुरु]

गोर पु. प्रेत पुरण्यासाठी केलेला खड्डा. (अहि.)

गोर कप(फ)ण (प्र.) गोर कफन; मूठमाती; उत्तरक्रिया; प्रेतसंस्कार : 'गोर – कपणेची साहित्यें करून त्याचीं सार्थकें केलीं.' – भाब १०७.

गोरख पु. १. गुराखी; गुरे राखणारा. २. गोरखनाथ; गोरख (कानफाटे) संप्रदायाचा आदिपुरुष. [सं. गोरक्ष]

गोरखगांजा पु. तागाच्या किंवा भांगेच्या बुटाप्रमाणे बुटे येणारी औषधी वनस्पती.

गोरखचाळा, गोरखसाखळी पु. स्त्री. १. भोवती कड्या असलेला लोखंडी गज. हा गज गोसाव्यांच्या हातात असतो. २. (ल.) संबंधांची गुंतागुंत; परस्परावलंबन (अनेक आंतरविवाहांनी कुटुंबीयात, परस्पर जामीनकीने गावकऱ्यात; कुंपणात, काटेरी झुडपात).

गोरखचिंच स्त्री. १. एक प्रकारच्या चिंचेचे झाड व फळ. फळातील गीर पित्तशामक, रुचकर व पथ्यकारक असतो. २. गोरक्षी नावाचे झुडूप.

गोरखी पु. गुराखी; गुरे (गाई) पाळणारा : 'कवळाचिया सुखें। परब्रह्म झालें गोरखें।' – तुगा १८१.

गोरखी स्त्री. मंडप; मांडव : 'हजरतीनी किल्लाचे दरवाजियानजिक मोठी गोरखी दहा हजार खासा बसावयाची उभी केली.' – शिप्रब ५०.

गोरगरीब पु. अव. गरीब व दरिद्री माणसे; गरीब लोक; अनाथ; गरजू;

भणंगभिकारी: तळागाळातील समाज.

गोरज पु. गाईची धूळ : 'गोरजें डवरला मुखचंद्र ।' – ह १८.६२. पहा : **गोधूल**

गोरजमुहूर्त पहा : **गोधूलमुहूर्त**

गोरजी पु. जैनांचा ग्रामगुरू. (को.) [सं. गुरु]

गोरटा वि. गोरा; गोऱ्या रंगाचा (माणूस); गोरा (रंग); सुंदर; सुरेख.

गोरटी स्त्री. १. सुंदर, गोरी स्त्री. २. स्त्री; बाई : 'तों मथुरेच्या गोरटी। ज्यांची केवळ प्रपंचदृष्टी ।' – ह २१.२२.

गोरटेला वि. साधारण गोरा. [सं. गौर]

गोरण स्त्री. गव्हाणी; गुरांना चारा घालण्याची जागा.

गोरब–बे न. कंबरेखाली न मुरडलेले, सरळ राहणारे इरले (खोळीच्या आकाराचे). (कु. बे.) [क. गोरबु]

गोरबंद पु. घोडा, उंट यांच्या खोगिराचा पुढील बंद.

गोरव न. गौरव; मोठेपणा : 'जें निगर्वाचें गोरव। निर्गुणाची जाणिव ।' – राज्ञा ८.१९२.

गोरवीकटगी स्त्री. (गोरवीची काठी) माकडीच्या (तेलकट) झाडाची मशालीसारखी उपयोगात आणायची फांदी. प्रवासी किंवा जासूद रात्रीच्या वेळी हिचा उपयोग करीत असत. [क.]

गोरस पु. गाईच्या दुधापासून होणारे दही, लोणी, तूप इ. पदार्थ. [सं.]

गोरस पु. गुरांच्या पोटात क्वचित आढळणारा पदार्थ. (झाडी).

गोरस (सा) ण–न न. (चर्मकारी) कातडे मऊ होण्यासाठी व कमाविण्यासाठी चुरडलेल्या एरंड्या, दही, हळद व ताक यांचे मिश्रण. (क्रि. देणे, लावणे, चोळणे.)

गोरसणे गाईच्या तुपाने अंग चोळणे : 'तीए (लेकरूवे) तैसीचि गोरसिजती : ते गोरसणे एथ दाखवा' – लीचपू ३८६.

गोरसणे अक्रि. साफसूफ करून, खतमूत घालून पेरण्यासाठी तयार करणे (शेतजमीन); मशागत करणे.

गोरसमया स्त्री. दूधवाली. (घा.)

गोरसामली स्त्री. शेंगा येणारे, गोड गरात काळ्या बिया असणारे मोठे झाड.

गोरक्ष, गोरक्षक पु. १. गुराखी. २. गुरांची रक्षक देवता. ३. नाथपंथातील गोरखनाथ नावाची एक प्रसिद्ध व्यक्ती.

गोरक्षण न. कसायापासून गाय वाचविणे; गोपालन; गोवंशाची जोपासना.

गोरक्षवटी स्त्री. पारद, लोह, ताम्र ही तीन भस्मे समभाग घेऊन त्यांना रिंगणीच्या फळाच्या रसाच्या एकवीस भावना देऊन केलेली मुगाएवढी गोळी.

गोरा पु. १. गोरा माणूस. २. साहेब; इंग्रज; युरोपियन माणूस.
वि. १. उजळ; गौर (वर्ण); गोऱ्या रंगाचा. २. (क्व.) पांढरा; शुभ्र (तांदूळ, कापड). [सं. गौर]

गोरा, गोऱ्हा पु. गाईचा पाडा, खोंड, धांडा, वासरू.

गोरागोमटा, गोरा पावसा वि. गोऱ्या रंगाचा व सुंदर रूपाचा; देखणा.

गोराडू पु. कोनफळ; जमिनीत उत्पन्न होणारा भाजीचा एक कंद. हा कंद भाजून, उकडून उपासाला खातात.

गोराडू वि. लापण (जमीन); दुंबा.

गोराण–णी स्त्री. दलदल किंवा खाडीचा किनारा या ठिकाणी होणारे एक झाड. याच्या सालीचा उपयोग कातडी कमावण्यासाठी होतो. या झाडाच्या अर्काचा उपयोग कपड्यांना तपकिरी रंग देण्यासाठी होतो.

गोराभुरक वि. गोरा व किंचित भुरका; तांबूस गोरा.

गोरामाजा पु. पांढरे मायफळ; मायफळाची एक जात.

गोरामोरा वि. चेहरा उतरलेला; चर्या पालटलेला; प्रेताप्रमाणे किंवा कागदाप्रमाणे पांढरा फटफटीत (भय इ. नी). [क. मोरे = तोंड.]

गोराळ न. तेल ठेवण्याची दगडी. (चांदा)

गोरांजन न. १. पहा : **गोरोचन**. २. ईश्वरप्राप्तीसाठी स्वत:ला अग्नीत जाळून घेणे; अग्निकाष्ठे भक्षण करणे : 'करोत तपादिसाधनें। कोणी साधोत गोरांजनें ।' – तुगा २६२१.

गोरिला पु. एका जातीचा वानर.

गोरी स्त्री. खड्डा : 'एका गोरीत बसतील तितकी मढी गाडली जाऊ लागली.' – फकिरा १२०.

गोरी स्त्री. गोवरी; राबाकरिता शेणाचे वाळवलेले डिखळे.

गोरी स्त्री. पाडी. (झाडी)

गोरी स्त्री. प्रेत; चिता : 'तुम्ही साहेबकामावर खर्च जाला तर देशमुखीचा सिका तुमचे गोरीवर ठेवू हा निशा समजोन तुम्ही खुशाल जाणे.' – शिचसाखं ५.१७.

गोरी पु. १. फासेपारधी : 'की गोरियाचें गायन ।' – रावि २.२२. २. (ल.) फासेपारध्याचे गाणे : 'कां गोरीचिया भुली । मृग व्याधा दृष्टी न घाली ।' – ज्ञा १३.७४०. पहा : **गौरी** [सं. गृ.]

गोरु–रे न. ढोर, गुरू : 'गोरू खडबडी बाहिरी ।' – भाए ३९४. (राजा. गो.) [सं. गोरूपम]

गोरूव न. गोवत्स.

गोरोचन–ना न. स्त्री. गोवर्धन. हे द्रव्य पिवळे असून गोमूत्रापासून किंवा कुपित्याच्या रूपाने गाईच्या ओकण्यापासून तयार होते, किंवा गाईच्या डोक्यात उत्पन्न होते. याचा रंग पिवळा असतो. हे रंगकाम, चित्रे, औषधे यात उपयोगी आहे : 'गोरोचनापरिस गौर असे गणावे ।' – र ६. वाजीकरण किंवा स्त्रियांना मोहविण्यासाठी गोरोचनाचा उपयोग होतो अशी लोकसमजूत आहे. [सं.]

गोरोब–प पु. गर्भ; मगज; नार. (गो.) [सं. गर्भ]

गोर्वट वि. कमी वयाचा (बैल).

गोऱ्हवाडी स्त्री. गुरांचा गोठा, गुरवाडी.

गोऱ्हा पु. चार वर्षे वयाचे गाईचे वासरू; खोंड. (गो.) [सं. गो.]

गोल पु. १. गोलक; वर्तुळाकार, वाटोळी, वर्तुळस्तंभाकार, वरवंट्यासारखी वस्तु; गोळा. २. मंडळ; वर्तुळ; परिघिवृत्ताकार आयत. ३. कृत्रिम गोल; वर्तुळ. पहा : **खगोल, भूगोल, दृग्गोल**. ४. गोलदार दांडा, वासा; चरकावर केलेला गोलदार दांडा. ५. वर्तुलत्व; लंबवर्तुलत्व. ६. (चेंडू दांडू खेळ) लाकडी चेंडू. ७. सैन्याची एक रचना : 'चौफेर बांधुनी गोल ।' – संग्राम ६०. ८. राशिचक्रमंडलाचा एक भाग किंवा

अर्ध. ९. (विणकाम) वशारन्याच्या सांधीच्या कैचीत घालण्यासाठी उपयोगी अशी सागवानी अडीच ते तीन हात लांबीची वाटोळी काठी. १०. गोळा, तोफेचा गोळा. ११. लगदा; लद्दा; खराडी. [सं.] (वा.) ० **बांधणे –** सैन्याची वर्तुलाकार मांडणी करणे : 'भाऊसाहेबांचा व सर्वांचा विचार की दिल्लीच्या रोखे गोल बांधून जावे.' – भाब १२६.

गोल पु. फुटबॉलच्या किंवा हॉकीच्या खेळात प्रतिस्पर्धी संघावर मात (गोल) करण्यासाठी हद्दीवरील दोन खांबामधील ज्या रेषेतून चेंडू घालवावा लागतो ती रेषा; डाव. (क्रि. करणे.) [इं.]

गोल पु. नक्षीदार काठ, पदर (पागोट्याचा).

गोल पु. घोळ; थवा; जमाव; कळप; झुंड.

गोल पु. लोंढा; झोल; डोंब (आगीचा).

गोल पु. फुलांचा गुच्छ, झुबका, गोटा. पहा : **तुरा**

गोल पु. नदीतील एक मासा.

गोल स्त्री. लाकडाची नाल. (झाडी)

गोल पु. गोफ, करगोटा यांच्या पदराची एक तार (सोने, चांदी यांची).

गोल (ळ) क पु. ब्राह्मण विधवांच्या संततीचा वंश, जात; जारजवर्ग. कुंडगोलक व रंडगोलक असे गोलकात दोन भेद आहेत. कुंडगोलक म्हणजे नवरा असलेल्या (मुख्यत्वे ब्राह्मण) स्त्रीची अनौरस संतती व रंडगोलक म्हणजे (ब्राह्मण) विधवेची अनौरस संतती. [सं.]

गोलक न. पैसे ठेवण्याची व ते आत टाकण्यासाठी वर भोक असलेली बंद पेटी.

गोलक पु. १. गोलाकार घन आकृती. विशेषत: पृथ्वीची प्रतिकृती असलेल्या गोळ्याला हा शब्द वापरतात. एखादी वाटोळी वस्तू; गोळा. २. आतून पोकळ असलेली वस्तू. हा शब्द इंद्रियाला जोडतात. उदा. कर्णगोलक = कानाची पाळी. नासागोलक = बाहेरून दिसणारे नाक; नाकाची बोंडी.

गोलकल्प पु. ज्या गोलाच्या समोरासमोरच्या दोन बाजू चपट्या किंवा फुगलेल्या असतात तो.

गोलचवडशी स्त्री. (कासार) भांडे घडवताना ठोकठोकून, कमजास्त जाड असेल तेथे सारखे करण्याचा चौरस हातोडा.

गोलची स्त्री. १. (सुतारी) खांब वगैरे चौरस लाकडांच्या कोपऱ्याला गोलाकार देण्याचे हत्यार. याला गोलची रोखणही म्हणतात. (क्रि. मारणे.) २. (चर्म.) रेषा मारण्याचे हत्यार.

गोलजी पिंड पु. वनस्पती पेशींच्या द्रव्याचा एक घटक.

गोलटा पु. (इमारत) जाड, गोल पण आखूड वासा; जाड बुडख्याचा वासा.

गोलटी गाए स्त्री. गोगलगाय.

गोलथा पु. पोलादाचा एक प्रकार.

गोलदहा–दाड–दाडा–दोडा पु. एक मोठा सरळसोट वृक्ष. याचे फळ भाजून खातात. हे औषधी आहे.

गोलदंड पु. दंडाचा एक प्रकार. यात साधा जोर काढून हात न उचलता वर्तुळाकार फिरायचे असते.

गोलदानी स्त्री. बंदूकवाल्याच्या कंबरेला बांधलेले गोळ्या ठेवण्याचे शिंग.

गोलदार कांडपी; धान्य सडणारा.

गोलदार वि. १. वर्तुळाकार; वाटोळे. २. आकडेदार (मिशा). ३. मांसल; भरदार (हात, मांडी). ४. नक्षीदार पदराचे; जरीपदरी, लफ्फेदार. (पागोटे).

गोलपरिघ पु. महावृत्ताचा घेर, मर्यादारेषा.

गोलबाह्य वि. (शाप.) गोलाच्या पृष्ठभागाप्रमाणे बाहेरील बाजूने गोल; बहिर्वक्र.

गोलमापकयंत्र न. (शाप.) कोणत्याही गोलाची किंवा त्याच्या तुकड्याची त्रिज्या आणि एखाद्या पदार्थाची जाडी काढण्याचे यंत्र.

गोलमाल पु. गलबला; गडबड; गोंगाट; गोंधळ; घोटाळा; आरडाओरड. वि. १. गुळगुळीत; मोघम. २. अव्यवस्थित. [हिं.]

गोलमिंद न. मासे पकडण्याचे जाळे. (को.)

गोलमेज परिषद एखाद्या गंभीर प्रश्नाची चर्चा करण्यासाठी, वाटाघाटीसाठी, सर्व संबंधित पक्षाच्या प्रतिनिधींची सर्वांना सारखेच महत्त्व आहे हे दर्शविण्यासाठी साधारणपणे गोल मेजाभोवती भरणारी सभा : 'लंडनमधील गोलमेज परिषदेने रेखाटलेले भावी स्वराज्याचे चित्र...' – गालेसं ७.

गोलरक्षक पु. फुटबॉल, हॉकी इ. खेळात प्रतिपक्षाने चेंडू आपल्या गोलाच्या पार करू नये यासाठी ठेवलेला खेळाडू. गोल राखणारा.

गोलसर स्त्री. बकुळीचे झाड. (ना.)

गोलसर–वट वि. थोडे गोलाकार; साधारण गोल.

गोलंकारी वि. मोघम; गुळगुळीत : 'असे गोलंकारी बोलणे होई.' – खर्डे १०६.

गोलंदाज पु. १. तोफ डागणारा; तोफची; गोळा फेकणारा. २. क्रिकेटमध्ये फलंदाजाला बाद करण्यासाठी यष्टीच्या रोखाने चेंडू फेकणारा. [फा.]

गोलंदाजी स्त्री. १. तोफ डागण्याचे काम; तोफांची सरबत्ती. २. क्रिकेटमध्ये फलंदाजाला बाद करण्यासाठी यष्टीच्या रोखाने करण्यात येणारी चेंडू फेकण्याची क्रिया.

गोला पहा : **गोल्या**

गोला पु. बांबूची ताटी.

गोला पहा : **गोळा**

गोला पु. चंपा, रास्ता व त्यांच्यामध्ये असलेले मुख्य सैन्य या सर्वांना मिळून असलेली संज्ञा.

गोलाई स्त्री. १. गोलपणा; स्थूलता; गुबगुबीतपणा : 'माझ्या शरीराला जी गोलाई आली ती आजमितीपर्यंत कायम आहे.' – माभू ७. २. परीघ. [हिं.]

गोलाकार वि. गोलसर; वाटोळा.

गोलाकृति–ती वि. जिचा आकार गोल आहे अशी (आकृती, वस्तू).

गोलाची लंब संस्था विषुववृत्तावरून आढळणारी स्थिती. या ठिकाणी विषुववृत्त व त्याच्याशी समांतर जी वृत्ते आहेत ती क्षितिजावर लंब होतात.

गोलाची वक्रसंस्था जेव्हा एक ध्रुव क्षितिजाच्या वर आहे आणि एक क्षितिजाच्या खाली आहे तेव्हा विषुववृत्त व त्याच्याशी समांतर दुसरी

वृत्ते यांचे क्षितिजाशी पडणारे वक्रकोन.

गोलाटपा पु. नेमणूक; वसूल; जहागीर : 'त्यास निर्वाहाबद्दल गोलाटपा बेवीस गावचा द्यावा आणि गादी पुढे फत्तेखान, याचेच वंशाकडे चालावी' – शादवे ५५.

गोलाध्याय पु. गोलासंबंधी विवरण करणारा गणितशास्त्राचा भाग. भास्कराचार्याच्या सिद्धान्तशिरोमणीचा हा एक भाग आहे.

गोलाबारुद पु. दारूगोळा.

गोलाम न. फूल.

गोलाम न. कापूर : 'कुंकुम कस्तुरी चंदन पालवी । गोलामे परतौनि नवीं । हा लेपु सिर व्यथे लाविता देवी ।' – नरुस्व ५४२.

गोलार्ध पु. गोलाचा अर्धा भाग. उदा. पूर्व गोलार्ध, पश्चिम गोलार्ध.[सं.]

गोलां (ळां) गुल–ळ पु. एका जातीचे वानर; नीळ; काळ्या रंगाचे व गाईच्या शेपटीसारखी शेपटी असलेले वानर, माकड : 'पुढे चालती भार गोलांगुलांचे ।' – राक १.५२.[सं. गो = गाय + लांगूल = शेपटी]

गोलांगुल, गोळांगुळ वि. दुबळा : 'भ्रतार मानुनि गोळांगुळ । अव्हेरिती सर्वस्वें ।।' – मुआदि ९.२२.

गोलांट–टी–ठ, न. स्त्री. खाली डोके व वर पाय करून मारलेली उलटी उडी; कोल्हाटी. (क्रि. घेणे, मारणे.)

गोलांतर वि. आतून गोल; गगनाकृती; पोकळ गोलाच्या आतील भागाप्रमाणे असलेले; अंतर्वक्र.

गोली स्त्री. कोळपे, कुळव किंवा इतर काही आउते यांना लावलेला आकडा, लोखंडी बाकदार गळ.

गोली, गोल्या स्त्री. पु. १. मातीची लहान घागर; कळशी. (कु. हेट)

गोली पहा : **गोलरक्षक**

गोलीय अंतर (भूमिती) गोलावरील दोन बिंदूंमधील अंतर.

गोले द्रव पदार्थ मोजण्याचे चार शेरी माप. (गो.)

गोलेवाला, गोल्या पु. गोल्याने तांदूळ सडण्याचा व्यवसाय करणारा माणूस.

गोल्या पु. खालच्या टोकाला वाटोळा दगड लावलेले मुसळ; दगडी मुसळ.

गोल्या स्त्री. सुतारी हत्यार; रोखणीचा एक प्रकार. (कु.)

गोल्या पु. १. कोळप्याच्या दात्यावरील आडवी लोखंडी पट्टी; कोळप्याच्या दिंडात बसविलेला भाग. दर दिंडाला असे दोन गोले असतात. २. दोन घडीव बाजूंचा, पायखाना व जिना यांना लावण्यात येणारा अर्धगोलाकार दगड.

गोल्हाट पु. १. पहा : **गोलांट.** २. औट पीठावरले योगशास्त्रोक्त स्थान. छातीच्या आतील पोकळीत जो उलटा प्राण आहे, त्यातील ज्ञानवृत्तीला इंद्रियावाचून स्वतःच्या स्वरूपाचा यथार्थ बोध होत नाही. अशा त्या प्राणवायू राहण्याच्या ठिकाणाला गोल्हाट म्हणतात : 'तिसरें जें कां गोल्हाट । तेज तत्त्वाचे मूळपीठ ।' – सिसं ७.२६२. पहा : **औट पीठ** : 'औटपीठें गोल्हाट म्हणती ।' – बोधवैभव (जगन्नाथ) २०. [सं. गोल + हाट]

गोल्हाटउल्हाट स्त्री. उलट्यासुलट्या उड्या; कोलांटी.

गोल्हार स्त्री. कळप; लेंढार : '(बायजा) यांना रात्रंदिवस राबविते अन् त्यांची गोल्हार पोसते.' – आआशे ४०.

गोल्ही स्त्री. १. दोन फासांचे कोळपे. (व.) २. कोळप्याच्या दातावरली आडवी लोखंडी पट्टी : 'दुसऱ्या कोपऱ्यात नांगराचा फाळ कोळवाच्या फाशी, कोळप्याच्या गोल्ह्या...' – जोफु २३८.

गोव–वा–वी स्त्री. पु. १. गुंता; अटकाव; अडथळा; गुंताड. २. (ल.) संकट; घोटाळा; बंधन : 'होती मृगजळें गोवी केली ।' – तुगा ७१५. ३. कायम गुंतविणे (एखाद्याला एखाद्या कामी, हुद्यावर).[सं. गोपय्]

गोवणी स्त्री. ओवण; गुंथन; जुळणी; जोडणी; गुंफण.

गोवणे उक्रि. १. गुंफणे; गुंथणे; ओवणे (मणी, फुले). २. गाठ देणे; गुंतविणे; बांधणे (केस, खुंट्याला पशू) : 'तो गोविला बाळक ऊखळ या ।' – सारूह १.७५. ३. गुंतविणे; अडकविणे; घालणे (शाळेत मूल किंवा उमेदवारीत, विवाहात, उद्योगात माणूस). ४. अडकविणे; बांधून घेणे (रोखा, वचन यांनी) : 'वचनीं गोवून वायुकुमरा । नाथ मछिंद्रातें मागीतलें ।' – नव १९.७६. ५. गुरफटविणे; पेचात पाडणे : 'जे थोरथोरांसी गोवी । जाणपणे ।।' – दास १.३.२३. ६. भाषणात गुंतविणे, पकडणे. ७. लक्ष वेधणे; गुंतविणे; अवधानात धरून ठेवणे. [सं. गुंफ]

गोवन पु. गुरांचा कळप.

गोवत्स द्वादशी आश्विन वद्य द्वादशी. गायीच्या पूजेचा दिवस; वसुबारस.

गोवध पु. १. गाईची हत्या. २. वाचेची हत्या : 'आखारी तव गोवधु । पुढारा अनृतवादु ।' – अमृ ७.२७८.

गोवपा स्त्री. गाईच्या आतड्यावरील आवरण. सामान्यतः गाय, बैल यांच्या चरबीला व हाडातील मगजालाही म्हणतात. [सं.]

गोवर पु. १. शेणी; न थापलेले वाळलेले शेण, वाळलेल्या शेणाचा चुरा. २. गाईने खाल्ल्यानंतर उरलेला चारा, गळाठा. ३. राब. (को.) ४. उकिरडा. (हेट.) [सं. गोर्वर]

गोवर–रे पु. न. अंगावर देवीसारखा पण लहान पुरळ येणारा एक रोग. हा विशेषतः लहान मुलांना होतो. (क्रि. येणे, निघणे, मावळणे, चिरमुटणे, कानपणे, बाहेर पडणे इ.). [सं. गोवर्ण] (वा.) ० **पोटी पडणे –** गोवर बाहेर न पडणे. यामुळे पोटात उष्णता राहते.

गोवरकोंडा पु. गोठ्यातील केरकचरा; शेणमूत.

गोवरा पु. गोऱ्हा. (वा.) **गुरांचे गोवरे होणे –** हतबल होणे; गांगरून जाणे; दीन होणे : 'परंतु तमाम लोकांची हिंमत हरली. गुरांचे गोवरे जाहाले.' – भाब १३८.

गोवरी स्त्री. १. वाळलेल्या शेणाची थापटी; शेणी. पहा : **गोवर** २. शेणखत. (कु.) ३. राब भाजण्यासाठी वाळवलेला शेणगोळा. (वा.) **गोवऱ्या मसणात जाणे–** वृद्धपण येणे; मरण जवळ येणे; वय होणे. **गोवरीची आग** – गोवरी जाळली असताना वर राख दिसते, परंतु आत विस्तव असतो. यावरून गुप्त परंतु भयंकर वैर.

गोवर्धन पु. १. मथुरेजवळची टेकडी. इंद्राने पाडलेल्या पावसापासून गोकुळाच्या रक्षणार्थ श्रीकृष्णाने या टेकडीला करंगळीवर धारण केले व हिच्याखाली गोकुळातील सर्व माणसे व पशू सुरक्षित राहिले. २. कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या (बलिप्रतिपदेच्या) दिवशी वल्लभसंप्रदायी

लोक भात, शेण, भाजीपाला वगैरेंचा गोवर्धनासारखा पर्वत करून ज्याची पूजा करतात तो. (वा.) **गाईच्या तोंडे गोवर्धन निवडणे –** पंचायत वगैरे प्रकरणी ज्याचा विषय त्याच्याच तोंडाने वदवून निवाडा करणे.

गोवर्धन पहा : **गोरोचन**

गोवर्धनदेवी स्त्री. गोस्तनदेवी : 'रयत लोकांच्या वगैरे मुलांस गोवर्धनदेवी काढण्याबद्दल अजम सूसराग्रीन साहेब दाक्तर याजकडील कारकून आले आहेत.' – पेद ३१.१५७.

गोवर्धनी गाय जिच्या गोमुत्रात, कुपित्याच्या रूपाने ओकारीत किंवा जिच्या डोक्यात पिवळ्या रंगाचे द्रव्य तयार होते – अशी गाय.

गोवलरू न. गवळ्याचा मुलगा : 'असंख्याते वासरूएं। तेतुलींचि गोवलरूएं।।' – वह १०४.

गोवसा पु. नवस.

गोवळ, गोवळगोठा पु. गोशाला; गायवाडा; गोठा. (को.)

गोवळ–ळा, गोवाळ–ळी पु. १. गुराखी; गवळी : 'उगला राहे न करी चाळा। तुज किती सांगों रे गोवळा।' – तुगा १२९. २. वयाने मोठा पण पोरकट माणूस; दुधखुळा (निंदार्थी). (राजा.) [सं. गोपाल]

गोवळगाथा पु. घोटाळा; भानगड; गोंधळ; घोळ; गबाळग्रंथ.

गोवळजेणे क्रि. घुसळणे.

गोवळे न. भूत.

गोवं (व) ड–डी पु. स्त्री. जंगल किंवा डोंगरावरील जनावरांची चरायला जायची पाऊलवाट; गायवाट. (वा.) **गोवंडास लागणे –** सरळ रस्त्यास लागणे; चालीला लागणे (माणूस, काम).

गोवाइ स्त्री. गुंतागुंत. : 'येथ उपदेशामाजि गोवाइ।' – राज्ञा ३.११.

गोवागुंता पु. अडचण; गुंता ; 'मातबरहि हुशारीनेच आहेत. गोवागुंता ठेविला नाहीं.' – ऐलेसं ४८५९.

गोवाड पु. गुरे कोंडण्याची पटांगणातील जागा. (झाडी).

गोवार न. शेण; शेणखळा : 'श्राद्धीं कष्टी होय सांगतां ब्राह्मण। गोवार मागून सावडीतों।' – तुगा ४२९६.

गोवार न. गुंतवणूक : 'काय करिसी आणिकां देवांची गोवारें' – ज्ञागा ९९८.

गोवारी स्त्री. भाजीची शेंग; गवारी; एक झाड व शेंग.

गोवारी पु. गुराखी; गवळी : 'तव गाई आलिया रात्रीं। कच नाहीं आला गोवारी।' – कथा १.५.८२.

गोवाल पु. अव. गंगावन; गाईच्या शेपटीचे केस.

गोविंद पु. १. गुराखी; २. भगवान श्रीकृष्णाचे एक नाव. [सं.]

गोविंद पु. १. कावळीच्या झाडाचे फूल. २. एका जातीचा कावळा. (को.)

गोविंदफळ, गोविंदे न. किंकिणी; वाघटे. तोंडात टाकल्यावर हे फळ 'गोविंद, गोविंद' म्हणते अशी कल्पना आहे.

गोविंदमणी पु. तांबड्या काचेचा मणी.

गोविंदविडा पु. गोंदविडा; खाली चौकोनी बैठक असून चारी बाजूंनी वर निमुळता होत जाऊन वरच्या बाजूला कोन असलेला विडा. हा विडा आठ पानांचा असतो.

गोविंदी स्त्री. वाघंटीची वेल.

गोवी पु. हेरिंग वर्गाच्या माशासारखा एका जातीचा मासा.

गोवी स्त्री. गोता; अडचण; पाश.

गोवी स्त्री. गुंतवणूक.

वि. अवघड.

गोवे न. १. अर्धवट घट्ट झालेले दूध; अदमुरे दही. २. मृदू, भोळा, सहज वळणारा व उदार धनी.

गोवे न. १. चांगल्या मिळकतीचा, बैठा रोजगार. २. श्रमाशिवाय चांगल्या गोष्टी मिळण्याचे साधन. ३. घबाड; ध्यानीमनी नसलेला लाभ, फायदा; मोठा फायदा, नफा (क्रि. सापडणे.) : 'भावें उगवीसी गोवें बोलसि निज भाव।' – देप (आरती)

गोवे न. परांची; माळा; मचाण.

गोवेकरीण स्त्री. गोव्यातील वेश्याव्यवसाय करणारी स्त्री : 'महाराष्ट्रात गोवेकरीण ह्या शब्दाचा अर्थ विशिष्ट प्रांतातील वेश्या असा आहे.' – राले ९४.

गोवेगिरी स्त्री. केळीची एक जात. या जातीचे केळे वनकेळीसारखे असते, परंतु साल जाडीला कमी असते.

गोवेल पु. स्त्री. एक वेल. ही वेल गुरांना विषकारक असते असे म्हणतात. भारे बांधण्याच्या कामी हिचा उपयोग होतो.

गोव्या वि. निष्काळजी व अव्यवस्थित; ढिला व गयाळी; गोंधळ्या व विसराळू; गबाळी; गैराती. (कु.)

गोश (ष) पेच पु. १. कानावरून बांधलेली टापशी; थंडीच्या दिवसात कानावरून बांधतात तो रूमाल, उपरणे; कानपट्टे. २. एक शिरोभूषण : 'चिमणा गोशपेच त्यावरी कलगी झळके फार।' – मध्व ३६. [फा. गोश = कान]

गोश(ष)माल–ली, गोश्माल–ली, गोस्माल स्त्री. १. कानउघाडणी; कानपिळणी; शिक्षा : 'आम्ही हराम खोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हांस परिच्छिन्न गोश्माली करावी.' – ऐस्फुले ४९. २. चोरटा हल्ला; 'भोवतें हिंडून गोषमाल देऊन त्यांचा मुलूख मारून धुंदी करावी.' – मराचिथोशा ५७. [फा.]

गोश(ष)वारा, गोशेरा, गोश्वा (ष्वा–स्वा) रा, गोसारा पु. १. संक्षिप्त टाचण, हकीकत, सूची. २. सारांश; निष्कर्ष; अभिप्राय; तात्पर्य. ३. चिठ्ठ्यांवरून तयार केलेली खेड्यातील जमिनीबाबत थोडक्यात माहिती. [फा. गोश्वारा]

गोशा–षा–सा पु. १. धनुष्याचे टोक. २. कातकऱ्याच्या धनुकलीची मूठ. ३. वस्त्राचा शेवट, टोक, पदर. [फा. गोशह]

गोशा–षा–सा पु. १. अंत:पुर; पडदपोशी; पडदा; बुरखा. २. आवरण; चिलखत; अंगत्राण. ३. परपुरुषापुढे तोंडावर बुरखा घेतल्याशिवाय स्त्रीने केव्हाही येऊ नये अशी चाल. (वा.) गोश्ता काढणे– घेरा पाडणे.[फा.]

गोशानि (न) शीन वि. १. एकांतवासी; निवृत्त. २. गोशा असणारी; पडद्यातील (स्त्री.).

गोशाला–ळा स्त्री. गायवाडा; पहा : **गोठा**

गोशेनशीन क्रिवि. गुप्तपणे : 'अशीं पत्रें सवाईसिंगांनीं राजास गोशेनशीन

लिहिलीं.' – जोरा १०६. [फा.]

गोश्गुजार वि. श्रुत; माहीत : 'अन्नाहे दोस्ती तुम्हांस गोश्गुजार करून ठेवितों हें निमित्य उलट येईल.' – मइसा ५.१६५. (क्रि. करणे)[फा.]

गोश्वारा पु. कर्णकुंडल : 'दोन गोश्वारे.' – दिमाश १.१०५ [फा.]

गोष गाईचा खूर.

गोष–श न. मांस; गोमांस : 'असिस्टंट बटलरला बाजारांतून गोष, अंडी, लोणी वगैरे आणण्यास त्यानें पाठवून दिलें.' – नपुक ३३. [फा. गोश्त]

गोषवारा पु. एखादे पुस्तक, पुस्तिका किंवा लेख ह्यातील मुद्यांचे सारवजा टिपण. [फा.]

गोषा पु. अंत:पुर; जनाना.

गोष्ट स्त्री. १. कथा; दंतकथा; आख्यान. २. (व्यापक) वाक्य; शब्द; पद; उच्चार; उल्लेख. ३. कृत्य; काम; प्रकरण; मुद्दा; बाब; व्यवहार. ४. वृत्त; वृत्तांत, घडलेला प्रसंग; विषय; घटना. ५. स्थिती; अवस्था; प्रकार. ६. (पुराव्याचा कायदा) ज्याचे ज्ञान इंद्रियांच्या योगाने होते अशी कोणतीही वस्तू किंवा वस्तूची स्थिती अथवा संबंध; मनुष्याच्या मनाची कोणतीही स्थिती. [सं. गोष्ठी] (वा.) **एक्या गोष्टीत –** एकदम; झटक्यास; सपाट्यास; चटकन. **० काढणे –** खोड काढणे; एखाद्या विषयाबद्दल बोलणे. **० जाणे –** एखाद्याकडून चूक होणे, प्रमाद घडणे. **० फोडणे –** गुप्त प्रगट करणे, जाहीर करणे. **० लपणे –** गोष्ट लोपणे. एखाद्यास माहीत न होणे. **गोष्टी खापलणे –** गप्पा छाटणे. **गोष्टी सांगणे –** १. बोलणे; संभाषण करणे; गप्पा छाटणे; वार्ता करणे : 'ठाव्या आहेत मला सांगा यथेष्ट गोष्टि अन्या या।' – मोउद्योग १३.३७. २. सबबी सांगणे; बयादी लावणे. (खा.)

गोष्ट पु. गोट; तळ : 'याप्रमाणें भाषणें होऊन चेतसिंगानें इंग्रजाचा निरोप घेतला व इंग्रजाचे गोष्टाबाहेर निघाला.' – पुअखभा २.३९.

गोष्टमात पहा : **गोष्ट** १

गोष्ट श्राद्ध न. १. अडचणीमुळे सर्वोपचारयुक्त श्राद्ध करण्यास सवड नसेल तेव्हा अनुकल्पाने केवळ शब्दाने केलेले श्राद्ध. २. (ल.) निव्वळ गप्पाष्टक, बडबड; निरर्थक गोष्टी.

गोष्टावाल स्त्री. एक रानटी वेल. (गो.)

गोष्टीमाता स्त्री. अव. १. विचारपूस. २. हालचाल (झाडी).

गोष्ठ पु. न. गोठा.

गोष्ठेशूर वि. घरातील शूर; घरगोहो. [सं.]

गोष्पद न. १. गाईचे पाऊल, पावलाचे चिन्ह. २. गोवंडी. ३. गोपदाइतके माप; गाईच्या खुराखाली समावेश होईल इतकी जमीन. ४. चिखलात उमटलेले व पाण्याने भरलेले गाईचे पाऊल : 'गज गोष्पदीं बुडाला हा दैवा सिंधु शोषिला मशकें ।' – मोद्रोण १.२३.

गोष्पदोपम वि. गाईच्या पावलाप्रमाणे ओलांडून तरून जाण्यास सुलभ; सहजसुलभ; क्षुद्र; सुगम.

गोस पु. नेसलेल्या वस्त्राचा कमरेवरील भाग : 'पीतांबर गोसे खोवियेला' नागा १९१.

गोस पु. बकऱ्याचे मांस. [फा. गोश्त]

गोस पु. तीन वितींचे माप. (गो.)

गोसमाल–माळी स्त्री.१. कान उपटणे. २. घोसबाळी.

गोसाई–वी पु. १. पावसाळ्यात दिसणारा एक लहान किडा; मृगातील किडा. याची वरची बाजू लाल मखमलीसारखीअसते. (ना.) २. बाजरीवरील एक किडा.

गोसामपण न. गोसाव्याचा धर्म, चाल, रीत.

गोसावण स्त्री. एक पक्षी : 'साळुंख्या व गोसावणी यांचे भांडण जुंपे.' – आआशे ३५४.

गोसावी पु. समर्थ; स्वामी; मालक; श्रेष्ठ. श्रीकृष्णाला उद्देशून या शब्दाचा वापर करतात : 'परि आणिक एक गोसांविया। मज संशयो असे साविया।' – ज्ञा ६.४३०. [सं. गोस्वामिन्]

गोसावी–मी–ई पु. १. ज्याने सांसारिक सुखांचा त्याग केला आहे असा योगी. यांची वस्त्रे भगवी असतात. यांपैकी काही मुंडन करतात. २. (ल.) घरदार, बायकापोरे नसलेला, त्यांचा त्याग केलेला माणूस; फटिंग. ३. हरिदास. ४. बैरागी. [सं. गोस्वामिन्]

गोसावी–मी–ई पु. १. (जुना पत्रव्यवहार) सन्मानदर्शक एक पदवी. २. नवरा; घरधनी : 'घरवाते मोटकी दोघें। जैं गोसावी सेजे रिघे। तें स्वामिणी जे।' – अमृ १.१३. [सं. गोस्वामिन]

गोसावी–मी–ई पु. १. शिटीसारखी वाजविता येणारी मातीची चिमणी. २. भुरकट रंगाची चिमणी (पाखरू).

गोसावी–मी–ई पु. तव्याला वर राख लावून त्यावर केलेली भाकर, गाकर.

गोसावीण–विणी स्त्री. धनीण; मालकीण : 'पैं जीवाचे कसीं उतरलीं। ते दासी कीं गोसावीण जाली।' – ज्ञा १८.९१२.

गोसावीपण न. १. प्रभुत्व. २. मालकी : 'जी जालेनि पाइकें आलें। तें गोसावीपण केवीं बोलें।' – ज्ञा १८.२२. [सं.]

गोसी स्त्री. एकमेकांना शोधणे; परस्पर आवड; 'आणि विषयइंद्रियां गोसी। स्वभावें तरि भूतासि।' – राज्ञा १४.९२.

गोस्टीखपाल्या–दलाल वि. गोष्टीवेल्हाळ.

गोस्त न. मांस. पहा : **गोष** [फा.]

गोस्तनदेवी स्त्री. गाईच्या सडातील गाठींच्या संपर्कामुळे दूध काढणाऱ्या माणसाला होणाऱ्या देवी.

गोस्तनी स्त्री. द्राक्षे.

गोह–हा–हो पु. १. नवरा, पती; घो : 'सुखें वोळंब दावी गोहो। माझें दु:ख नेणो पाहो।।' – तुगा २९५७. २. बाप्या; तरणाताठा, वयात आलेला माणूस; गोखमा. ३. वस्ताद; मारतापीर; मारक. ४. तोडीस तोड; शेरास सव्वाशेर; सवाई. [सं. गोध = पती]

गोहक पु. गहू (धान्य). (गोंडी)

गोहण स्त्री. गाताडी. पहा : **गव्हाण**

गोहण्या पु. गुराखी. (व.)

गोहन न. गाईचा कळप. (व.) [सं. गोधन]

गोहर पु. १. हुरहुर; काळजी. २. खोडी; चाळा; अवगुण. (ना.)

गोह (हो) रा पहा : **गोऱ्हा**

गोहरी वि. खोडकर; अवगुणी. (ना.)

गोहाडी स्त्री. हगणदारी.

गोही स्त्री. १. ग्वाही; साक्ष : 'गोहीवीण जाऊं नये। राजद्वारा।' – दास २.२.२०. २. साक्षीची जबानी. [फा. गुवाही]

गोहीदार पु. साक्षीदार : 'गोहीदाराचें जरी मोडूं तरी साहेबास गुन्हेगारी... देऊं.' – मइसा १८.३५.

गोहीभास पु. साक्षीपुरावा : 'देवप्रभु यासी घेऊ नेदी म्हणवून बोलिला या उपरी पूर्वपर मनास आणिता गोहीभास होये तोवरी अदबखाना ठेविले.' – शिचसाखं २.२९७.

गोहो पु. गलबताचा एक कर : 'दर गलबतास गोहो सुमार ५.' – पेद ३४.१९७.

गोहोडा पु. झाड. (झाडी.) [सं. घोटक]

गोहोत न. १. दाणा, कोंडा, पेंड वगैरे गुरासाठी शिजवलेले आंबोण, मिश्रण. २. (ल.) घोटाळा; गफलत, गोंधळ. (राजा.)

गोहोन पु. गुरांचा कळप.

गोहोपट पु. जमाव.

गोळ न. १. पहा : **गोल**. २. अंडे.

गोळ स्त्री. १. एक भाजी (वेली); घोळ. २. एक झाड. (गो.)

गोळ पु. गळ. (गो.)

गोळ न. 'पाप'. – (तंजा.)

गोळक पु. १. गर्भाचा गोळा. २. विधवेला झालेला मुलगा : 'पांडवांचें कुळ शोधितां निर्मळ। कुंठजार गोळक । बुद्धिकांसी' – नागा ८९२. ३. व्यभिचारातून जन्मलेल्यांची. [क.]

गोळक पहा : **गोलक** (वा.) **गोळकाचे सोवळे –** खोटे सोवळे. (गोळकांना सोवळ्याचा अधिकार नाही या समजुतीने).[सं. गोलक]

गोळकी वि. धेडगुजरी; गंगाजमनी : 'गोळकी भाषांतर.' – विकार वि.

गोळगोळ(ळं)की स्त्री. एक वनस्पती. (बे.) याला पिवळा धोमा म्हणतात. याची बोंडे लांबट असून ती वाळली म्हणजे घुळघुळ असा आवाज होतो. त्यावरून हे नाव पडले असावे.

गोळबा वि. आळशी; अजागळ; बावळट. (कु.)

गोळंकार पु. दुखण्यामुळे आलेली असहाय्य स्थिती; खोडाबिडी होऊन पडणे. (गो.)

गोळंकारी वि. वाकलेला; पोक आलेला (वार्धक्य, वात, अशक्तपणा यांमुळे); खोडाबिडी होऊन पडलेला.

गोळंबी स्त्री. पाण्यातील एक लहान प्राणी.

गोळा पु. १. गोल; गोलक; चेंडू. २. वर्तुळाकार पदार्थ; पिंड; भेला; डिखळ; रास. ३. जथा; जमाव; मेळा (मनुष्य, पशू, वस्तू यांचा). ४. (ल.) हातपाय नसलेला किंवा ते लुळे झालेला माणूस; पांगळा; निष्क्रिय माणूस. ५. (निंदार्थी) जेवण; भाकरतुकडा; पिंड; घास. ६. गर्भ; ७. नाकातील चांदीची वेसर (मोत्याऐवजी). ८. फळातील विशिष्ट नाव नाही अशा अठी, बी, गर, गर्भांश इ. ना लावतात. ९. लाडू; ढोकळा. (व.) १०. शरीरात येणारी मोठी गाठ. ११. तोफेचा मोठा गोळा. १२. साठा; समूह. १३. गोल आकाराचे भांडे; गुंड; गुंडा. (गो.) [सं. गोलक] (वा.) ० **करणे –** एकत्रित करणे. ० **गिळणे –** (लाच) खाणे. ० **टाकणे –** गर्भपात होणे. ० **देणे –** जेवणे; जेवायला देणे. ० **मारणे –** हडप करणे. ० **होणे –** १. गोळ्याप्रमाणे गात्रे एकत्रित होणे; हालचाल न होणे. २. एकत्र येणे, जमणे. **गोळेगावाला वेढा घालणे, पडणे –** जेवायला बसणे. **गोळ्यावर घालणे –** शिक्षेचा एक प्रकार. निरनिराळ्या वजनांचे तोफेचे गोळे वरखाली करायला लावणे.

गोळाक दिवप १. फाशी देणे. २. मुलाला घोडी (शिक्षा) देणे. (गो.)

गोळाक लावप हात बांधून टाकणे. (गो.)

गोळागुळ पु. एक प्रकारचा वानर. [सं. गोलाड, गूल]

गोळागोळी, गोळाबारी स्त्री. परस्पर (बंदुकी-तोफा यांच्या) गोळ्यांचा भडिमार; तोफेचा मोठा भडिमार.

गोळाफेक स्त्री. ठरावीक वजनाचा गोळा फेकण्याचा खेळाचा एक प्रकार.

गोळा (ळी–ळे) बेरीज स्त्री. १. (अंकगणित) ठोक बेरीज किंवा तेरीज. २. (ल.) तात्पर्य; सारांश; निष्कर्ष; मथितार्थ. (वा.) ० **करणे –** (हिशेब) लबाडीने काही बाबी दाबून किंवा खोट्या लिहून ठोक बेरीज किंवा तेरीज देणे; सरासरी बेरीज करणे; अंदाजे बेरीज करणे.

गोळाभर वि. पोटभर; भूक शांत होण्याइतका.

गोळाभाजी स्त्री. पीठ लावून किंवा तांदळाच्या कण्या घालून केलेली भाजी.

गोळामेळाने क्रिवि. एकत्र; वर्तुळात; गोल : 'कुणी गोळामेळाने बसून पेटवलेली चिलीम फिरवू लागले.' – बाब १२०.

गोळार मारप फाशी देणे. (गो.)

गोळिंब, गोळीम पहा : **गोळंबी**

गोळी स्त्री. १. (सामा.) लहान गोल वस्तू; लहान गोळा; गोलक; गोटी. २. पिस्तूल, बंदूक इ. तून उडविली जाणारी वस्तू. ३. चोळमटलेल्या कपड्यांचा लहान ढीग, रास. ४. बैदूल. (ना.) ५. लहान तांब्या, घागर, बिंदली. (गो.) ६. खाडीतील चिखलाचा वीतभर लांबी-रुंदी-उंचीचा गोळा. या गोळ्याचा बांध टिकाऊ असून त्यावर नाचणी चांगली होते. [सं. गुलिका] (वा.) ० **घालणे, झाडणे, मारणे –** पिस्तूल-बंदुकीची गोळी मारणे. ० **चढविणे –** मादक पदार्थाची गोळी खाणे. **आडून गोळी मारणे –** स्वत: पुढे न होता दुसऱ्याकडून इष्टकार्य घडवून आणणे; अप्रत्यक्षत: काम करून घेणे. ० **लागणे –** १. माशी लागल्यामुळे वांती होणे. २. कार्य नेमके होणे; मात्रा लागू पडणे. ० **लागू पडणे –** काम यशस्वी होणे.

गोळी(ळ्या)चा टप्पा, गोळीमारणी बंदुकीच्या किंवा तोफेच्या गोळ्याचा मारा जेथपर्यंत जातो ते अंतर.

गोळीबंद वि. गोल : 'वा! आहेत (मोत्यांचे) दाणे नामी गोळीबंद बरं का!' – पलको ८७.

गोळीबंद वि. पाण्यात थेंब टाकल्यास ज्याची गोळी बनते असा (पाक).

गोळीबंद वि. मुद्देसूद; परिणामकारक : 'ठोस (मथळ्यांची) भाषा जेवढी स्पष्ट, नेमकी आणि गोळीबंद तेवढा वाचकांवरील वृत्तपत्रांचा परिणाम

वाढणार.' – भाअंव्य ६२.

गोळीबार पु. बंदुकीच्या गोळ्यांची फैर; बंदूक उडवणे.

गोळेकरी पु. गुळ्यातील मनुष्य; शत्रूच्या भयामुळे परागंदा होणाऱ्या टोळीतील मनुष्य : 'आम्ही माहुलीस जाऊन राहिलों. हळूहळू सर्व सामान नांदोशीहून आणलें व गोळेकराप्रमाणें रचून ठेवलें.' – प्रति आत्मच ६५.

गोळेगणित न. (ग.) गोळ्यांच्या राशीचे गणित; चढत्या उतरत्या राशीचे गणित. [सं.]

गोळणा स्त्री. विटी. (गो.)

गोळ्या, गोल्या पु. लहान मडके, घागर. (को.) [सं. गोल]

गोळ्या पु. पहा : **गोली–ल्या**

गोक्षुर पु. १. गाईचा खूर. २. गाईची पाऊलवाट; गोवंडी. [सं.]

गोक्षुर पु. गोखरू; सराटा. [सं.]

गोंग स्त्री. खोटी ओरड; खोटा आरोप; तोहमत : 'एखादा महार हाताशीं धरून त्याजकडून खोटीखरी बनावट शिवाशिवीची गोंग करून या पंचावर आणतां येईल.' – के ५.९.१९४१. [ध्व.] (वा.) ० **उठणे** – ओरडा होणे : 'पिंपरणीच्या बुंध्याआड उभा राहिलो आणि आवाज टाकणार तोच गोंग उठली.' – व्यंमाक ६१. ० **करणे** – आरडाओरडा करणे : 'गुराखी पोरांनी गोंग केली.' – आआशे ८८.

गोंगटा पु. ओरडा : 'गोंगटा ऐकून ते धावतच आले.' – माजीगा ६४.

गोंगणे अक्रि. गुंग् असा आवाज करणे; सणाणणे (तीर, हवाईबाण).[ध्व.]

गोंगर (रा) ण न. जेर होईपर्यंत द्यायचा मार; मारठोक, शिव्या वगैरे; बेदम मारहाण.

गोंगरणे अक्रि. गांगरणे; धांदरणे; घाबरणे.

गोंगल्ल न. गर्द झाडी. (गो.)

गोंगाट पु. १. गलका; बडबड; आरडाओरड. २. गो गो असा आवाज (माशी, बाण वगैरेंचा). ३. गुप्त गोष्टीची प्रसिद्धी; बोभाटा.

गोंगाणी स्त्री. माशांचा गुणगुण असा आवाज : 'उठली माशांची गोंगाणी।' – एरुस्व १४.६६. [ध्व.]

गोंगावणे अक्रि. १. गो गो असा आवाज करणे; घोंघावणे (माशा वगैरे). २. बाण, बंदुकीची गोळी वगैरेंनी विशिष्ट आवाज करणे. ३. बुक्क्यांनी मारले असताना गों गों असा आवाज काढणे. [ध्व.]

गोंज(जा)रणे सक्रि. १. अंजारणे-गोंजारणे; अंगावरून प्रेमाने हात फिरविणे (समजाविण्याकरिता, फसविण्याकरिता); कुरवाळणे; समजूत पाडणे. २. माया लावणे. (माण.)

गोंड स्त्री. न. १. पाणंद; गल्ली (गाव किंवा कुंपणातील). (को.) २. घोळ; खेंडुलकी; खिंड; अरुंद रस्ता; डोंगरातील गायवाट किंवा जनावरांची पाऊलवाट. [क. गोंदी]

गोंड पु. न. १. दाण्यावरचे टरफल; कचोळे; तुरमणे (काही वनस्पतींचे, नागली वगैरेचे). २. वर टरफल असलेले धान्य. (माण.)

गोंड न. १. मिऱ्यांचा घड; (राजा). देठासकट घड. (राजा) २. शेवाळ्या-प्रमाणे पाण्यावर येणारी झुबकेदार वनस्पती. पहा : **गोंडाळ**

गोंड पु. विंध्य पर्वतातील एक वन्य जात व त्या जातीतील व्यक्ती.

गोंड पु. गोठण. पहा : **गोवंड**

गोंडण न. धान्यावरचे टरफल. पहा : **गोंड**

गोंडली न. एक देशी नृत्य : 'हे गोंडली नृत्य म्हणजे आजच्या गोंधळाचेच प्राचीन रूप होय.' – लोक्षि २२.

गोंडवण–न (दोन कुंपणांच्या मधली) गल्ली.

गोंडवळ–ण पहा : **गोंडाळ**

गोंडवेल स्त्री. एक प्रकारची हरळी. (वाई)

गोंडस वि. १. सुंदर; आकर्षक; सुरेख; मोहक. २. हत्तीच्या सोंडेप्रमाणे मांसल व निमुळते.

गोंडा पु. १. गुच्छाप्रमाणे फूल; झुबका; तुरा (झेंडू इ. फुलांचा). २. घड; पुंजका; गोळा. ३. गेंद; झेला; झुबका; गूल; फुन्ना (पालखी, जनावराची शेपटी इत्यादींना गुच्छसदृश असणारा). ४. झेंडूचे फूल; मखमल. ५. पहा : **गुंडा**. ६. वेणीतील एक अलंकार : 'वेणीस जीचे विलसेत गोंडे।' – सारुह २.३२. [का. गोंडे] (वा.) ० **काढणे** – फसविणे, घात करणे. ० **घोळणे** – काही मिळेल या आशेने पुढे पुढे नाचणे; शेपूट हलविणे; खुशामत करणे; थुंकी झेलणे. ० **फुटणे** – १. (गुळाला, रसाला) कढणाऱ्या रसावर साय येणे. २. सूर्य उगवणे. ० **फोडणे** – १. (सूर्य) पूर्ण उगवणे; वर येणे. २. ठळकपणे प्रख्यात होणे; पुढे येणे (माणूस – बहुधा वाईट अर्थाने). ० **हालणे, झुलणे** – सतत काम चालू ठेवणे (उत्तेजनासाठी किंवा चेष्टेने म्हणतात). (को.)

गोंडाक वचप फुकट्यावारी जाणे. (गो.)

गोंडाळ न. पहा : **गोंड**. १. शेवाळ; झुबकेदार गवत. २. तळे, विहीर इ. च्या पाण्यावर शेवाळासारखी पसरणारी, पाणी शुद्ध राखणारी झुबकेदार वनस्पती; गोंडाळी : 'गोंडाळ सांडून नीर घेइजे।' – दास ६.५.१३. (को.)

वि. १. भरदार; भरगच्च; ठेचून भरलेले (कणीस). २. गोंडाळ शेवाळाने आच्छादलेली (विहीर इ.). ३. गुबगुबीत; गोंडस : 'दंड पाहून गोंडाळ हस्ती गंडस्थळीं धुळ घालून बसले।' – प्रला १३३.

गोंडी स्त्री. जोंधळा, बाजरी यांच्या दाण्यावरील टरफल. पहा : **गोंड** पु. न.

गोंडी स्त्री. १. पाणंद; गल्ली. (को.) २. मोठ्या रस्त्याला फुटलेला आडरस्ता; आडवाट. ३. गोवंडी; गायरस्ता. पहा : **गोंड** [क.]

गोंडी वि. गोंडा असलेले (फूल, झाड). (गोंडी-तगर-मखमल.)[क. गोंडे]

गोंडी स्त्री. पुंडाई; लुटारूपणा; बंडाळी : 'त्यानें देवरी प्रांते गोंडी करून गाव लुटून गांवास आगी देत होता.' – पेद २७.३.

गोंडीकुहरी–ली, गोंडीकुवली स्त्री. साधी कुइरी.

गोंडुरोंडू वि. सामान्य. (झाडी)

गोंडू न. भोक.

गोंडेरा–री–र वि. गोंडेदार; झुपकेदार (फूल-जास्वंद, झेंडू, तगर इ. चे).

गोंताड पु. तरट.

गोंद–ध पु. १. चीक; डिंक. हा बाभळ, खैर इ. झाडांच्या चिकापासून

निघतो. रंग, चिटे छापणे, चित्रे इ. कामी हा उपयोगी आहे. डिंकाचे लाडू फार पौष्टिक असतात. २. सरस; चिकट पदार्थ. [हिं.]

गोंदण-न-णी, गोधण-णी स्त्री. १. एक मोठे रानटी झाड. या झाडाला भोकरासारखी बारीक लाल फळे येतात. २. या झाडाचे फळ.

गोंदण-ले न. गोंदलेले चिन्ह : 'गालीं गोंदण नवें। जैशी वासंती सजली जाणा।' - धनुर्भंग ७१.

गोंद (ध) णे उक्रि. काटा, सुई यांनी टोचून वर पाने चोळून (अलीकडे रासायनिक द्रव्यांचा उपयोग करून) कातडीवर आकृती काढणे; अंगावर नक्षी काढणे (बायकात रूढ).

न. टोचून घेणे - पूर्वी अपराध्यांना गोंदण्याची एक शिक्षाही असे.

गोंददाणी-नी स्त्री. गोंद ठेवण्याचे पात्र; डिंकदाणी; डिंकपात्र.

गोंदरड स्त्री. गोठ्यातील केरकचरा, घाण. (राजा.)

गोंदरोग पु. (वन.) खोडातून अथवा वृक्षातून निघणारा डिंकासारखा स्राव.

गोंदवण न. गोंदण्याचे साहित्य व साधने.

गोंदविडा पु. नागवेलीच्या पानांचा एक विशिष्ट आकाराचा विडा. पहा : **गोविंदविडा**

गोंदळ-ळा पु. समुदाय; मेळा.

गोंदळी पु. पिशाच : 'कां साधूतें गोंदळी। संचरोनि सुये मेळीं।' - ज्ञा १३.१००९.

गोंदा पु. १. झेंडूचे फूल. २. वेणीतील एक अलंकार. (झाडी)

गोंदाई स्त्री. गोंदणीचे फळ : 'बया बया म्हणू बया साखर गोंदाई।' - तीसा ३१.

गोंदे पु. अव. चेंडू आपटून दोघांच्यामध्ये खेळायचा खेळ.

गोंध स्त्री. १. गुंतवळ. (राजा.) २. (ल.) गोंधळाचे, जिकिरीचे काम; भानगड. ३. अव्यवस्था, अस्ताव्यस्तपणा ४. देवीप्रीत्यर्थ गायन, नृत्य, कथा इ. ज्यात करण्यात येतात असा एक प्रकारचा नवसाचा किंवा पारंपारिक उत्सव.

गोंधण-णी स्त्री. एक झाड. पहा : **गोंदण-णी**

गोंधणे अक्रि. गुंतणे; गुंताडा होणे. पहा : **गोंधर(व)णे** [क. गोंदण]

गोंधर (व) णे अक्रि. १. गुंतले जाणे. २. अव्यवस्थित होणे; गैरविल्हे लागणे (पोथ्यांची पाने इ.). ३. गुरफटणे; घाबरणे; गोंधळणे.

सक्रि. गुंतविणे; अडकविणे.

गोंधवण वि. स्त्री. १. गुंतागुंत; गोंदरण. २. गुंतागुंतीचा गोळा; गुंतागुंत; गुंताडा. ३. गुंतलेली स्थिती.

गोंधळ पु. १. अव्यवस्था; अस्ताव्यस्तपणा; घालमेल (वस्तू, काम, हिशेब यात). २. अंदाधुंदी; घोटाळा; दगदग; त्रास. ३. धांदल; गडबड; तारांबळ : 'कां उपभोगाचे गोंधळ।' - दास २.५.२६. ४. धावाधाव; धावपळ; धामधूम. ५. देवाच्या कुलधर्मात देवाप्रीत्यर्थ गोंधळी लोकांकडून करायचे गाणे, नाचणे, कीर्तन, देवाचे भजन, स्तुती. घरातील कार्य निर्विघ्न पार पाडल्याबद्दल देवीची स्तुती व पूजा करण्याचा कुलाचार : 'वेदवाचा वरदायिनी। गोंधळ गाती इयेचा।' - मुआदि ४.१२८. ६. गडबडीचा, आरडाओरडीचा प्रकार; कोलाहल; धुडगूस. (क्रि. घालणे).[क. गोंधळो] : 'खर्चापुरतें दिलें असतें फेकून अन् म्हटलें असतें घाला गोंधळ.' - रंगराव.

गोंधळणे अक्रि. घाबरणे; त्रेधा उडणे; भांबावणे; घोटाळ्यात पडणे.

गोंधळलग्न पहा : **गोधूललग्न**

गोंधळी पु. १. देवीचा गोंधळ घालणारी जात व त्या जातीतील व्यक्ती. हे लोक गातात, नाचतात व कोठे कोठे वाद्येही वाजवतात. २. भिक्षेकऱ्याची एक जात. [का.गोंदलिग]

गोंधळी(ळू)क वि. गोधूलिक; गोरज (मुहूर्त). (चि. गो.)

न. सांजवेळ; सायंकाळ : 'मग वैराग्याची गोंधळुक । जे ज्ञानाभ्यासाचे वार्धक्य।' - ज्ञा १८.१०८५. [सं. गोधूलिक]

गोंधळ्या वि. १. घालमेल्या; धांदल्या; अव्यवस्थित (माणूस). २. धांदरट; गफलती; गोंधळलेला.

गोंधागोंध स्त्री. गुंतागुंत; गुंताडा.

गोंब-बी स्त्री. गोम; घोण. पहा : **गोम**

गोंबटा-टी-टे पहा : **गोमटा-टी-टे**

गोंयबाबू पु. गोव्यातील रहिवासी; गोवेकर. (गो.)

गॉटॉ पु. शिजलेला दाणा; दाटा. (गो.)

गॉठणां स्त्री. गुरांची रानातील दुपारची विश्रांतीची जागा; गोठाण. (गो.)

गॉड न. गूळ. (को. गो.)

गॉडान्न न. कुणब्यांचे गुळाचे एक पक्वान्न. (गो.)

गॉडॉ पु. कैफ नसलेले मद्य. (गो.) [सं. गोडी]

गॉत न. दुखण्याने, रोगाने बिघडलेले रक्त.

गॉपॉ पु. माडाची पोय फुटून न जाता सूर निघावी म्हणून तिच्या भोवती बांधायचा दोर. (गो.)

गॉब्रॉ पु. राखी रंगाचा एक मासा. (गो.)

गॉम न. गोंद; खळ. (गो.) [इं. गम]

गॉमार करचे कपडे खळीत घालून इस्त्री करणे.

गॉमॉ पु. मासे विकण्याचे माप. (गो.)

गॉल न. अंगरख्याचा गळा. (गो.)

गॉलभर वि. सैल. (गो.)

गॉलं न. पातळ पदार्थ मोजण्याचे ४ शेरी माप. हे मातीचे असते. (गो.)

गॉल्ल न. गर्द झाडी. (गो.)

गॉंधाड गांधट; मोठी गांध.

गौ स्त्री. गाय (पशू). पहा : **गो** [सं.]

गौकोश पहा : **गोकोश**

गौखाना पहा : **गोखाना**

गौघाती पु. गाय कापणारा; खाटिक : 'गो सोडवी पडिलया हाती : गौघाती काळाचीए' - सव ४२०.

गौड वि. गुळासंबंधी; गुळाचा. [सं. गुड]

गौड वि. गूढ जाणणारा. [सं.]

गौडबंगाल न. १. (गौड व बंगाल या भागात पूर्वी गारुडविद्या फार होत्या म्हणून). (ल.) गारुड; तंत्रमंत्र; जादूटोणा. २. (ल.) युक्त्या; मसलती;

हिकमती; लबाडी. ३. (ल.) गूढ; रहस्य; कूटरचना : 'गौडबंगाल रचण्यात त्याने (मोरोपंताने) आपला काळ घालविला.' – नि ७८९. ४. खोल डाव; कट करणे. ५. चमत्कार; अद्भुत घटना.

गौडबंगाली वि. १. गौडबंगाल, जादूटोणा करणारा. २. गौडबंगाल प्रदेशासंबंधी. ३. गूढ; न कळणारा.

गौडमल्हार पु. (संगीत) गायनातील एक राग. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

गौडविद्या स्त्री. मंत्रतंत्र; जादूटोणा : 'मनुष्यांची गौडविद्या। राक्षसांची वोडंबरी विद्या।' – दास १०.४.३४.

वि. सारस्वत ब्राह्मणाची जात. पहा : **सारस्वत**

गौडसारंग पु. (संगीत) हा राग कल्याण थाटातून उत्पन्न होतो. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

गौडा पु. पाटील, गावचा मुख्य अधिकारी. [क.]

गौडारीवाणी स्त्री. (संगीत) तानसेन हा गौड ब्राह्मण असल्याने त्याच्या म्हणण्याच्या ध्रुपद–पद्धतीस हे नाव पडले आहे.

गौडी स्त्री. गुळापासून काढलेली दारू. [सं. गुड]

गौडी स्त्री. (संगीत) एक रागिणी.

गौडीरीति–ती स्त्री. एक संस्कृत शैली; मोठमोठे समास असलेली रचना, लेखनशैली. [सं.]

गौण न. १. न्यून; अभाव; तुटवडा; कमीपणा. २. अपूर्णत्व; हीनता. वि. १. कमी प्रतीचा; हलक्या प्रतीचा; कमी महत्त्वाचा; अप्रधान. २. आनुकल्पिक; गौणभूत. ३. मुख्य नव्हे ते; दुय्यम : 'मूळबंधाचें लक्षण। वज्रासन गौण। नामयासी।।' – ज्ञा ६.१९९. [सं.]

गौणकल्प पु. १. मुख्य किंवा प्रधान नसलेला हेतू किंवा उद्देश. २. दुय्यम ध्येय; विकल्प; अनुकल्प; प्रतिनिधीत्व.

गौणपक्ष पु. १. कमजोर, खालच्या दर्जाचा, अप्रधान पक्ष, बाजू (वाद, गोष्टी, प्रमेय यांचा). २. गौण कल्प. ३. (सामा.) हलका पक्ष, बाजी.

गौणमुखन्याय पु. तारतम्याचा नियम (मुख्यामुख्य, मौलिक व अलंकारिक, प्रधान व अप्रधान यातील) मुख्य पक्ष संभवत असताना गौण अंगीकारू नये, या अर्थी वापरतात.

गौतमी स्त्री. गाय : 'कीं गौतमी देखता पंचानन। भयें कांपत चळचळा।' – भवि ९.१५७.

गौप्य वि. १. गोप्य; गूढ; गुप्त : 'परंतु गुज तें जाणावें। गौप्य आहे।' – दास ६.२.२०. २. गुप्त ठेवण्यास लायक; गुप्त गोष्ट, रहस्य. [सं. गोप्य]

गौप्यस्फोट पु. गुप्त गोष्ट बाहेर पडणे; एखादी गुप्त गोष्ट जाहीर करणे; रहस्य उघड करणे.

गौमासी, गौमुखी पहा : **गोमाशी, गोमुखी** : 'तुम्हां लागीनिलिआं गोमासिया। तरि वारां जा कां।' – शिव २१९.

गौर स्त्री. पार्वती; भवानी; देवी; गौरी. [सं. गौरी] गौर आणणे – हा एक कुळाचार असून यात (ज्येष्ठा गौरीची स्थापना करणे. भाद्रपद शुद्ध षष्ठीला किंवा सप्तमीला नदी अगर ओढा यांच्या काठचे पाच किंवा सात खडे पूजेसाठी आणणे. गौर आणणाऱ्या मुलीने घरी येताना तोंडात पाणी घेऊन मागे न पाहता मुक्याने ते खडे (= गौर) देवापाशी आणून ठेवायचे असतात व नंतर चूळ थुंकायची असते.) गाडग्यांची गौर उभी करणे – (तपेले किंवा तसले भांडे घेऊन त्याला नवे लुगडे नेसवून व वर मुखवटा किंवा खापराची वेळणी बसवून व दागिने घालून मूर्ती सजवणे.) गौर उतरविणे – (भाद्रपद शुद्ध षष्ठी – सप्तमीला गौर आणायच्या दिवशी दोरे घ्यायचे असतात. गणपती, कुमारिका व मुंजा मुलगा यांचे दोरे आठपदरी असतात व सवाष्णीचे आणि गौरीचे सोळापदरी असतात. याप्रमाणे दोरे घेऊन आठपदरी दोऱ्याला आठ व सोळापदरी दोऱ्याला सोळा अशा गाठी देऊन त्यात आघाडा, खोबरे, दूर्वा व रेशमी दोरा बांधतात. नंतर ते दोरे हळदीने पिवळे करून गौरीपुढे ठेवतात व त्यांची पूजा करून गळ्यात बांधतात. मग दहीभाताचा नैवेद्य दाखवून गौर (सुगड) एकीकडे ठेवतात.) गौर जागविणे – (गौरीच्या सन्मानार्थ जागरण करणे.) गौर जेवणे – (गौरीनिमित्य सासरहून माहेरी आलेली सवाष्ण जेवू घालणे. यावेळी गुळाची पोळी, गव्हल्याची खीर व करंज्या करतात.) गौर बसविणे (श्रावणाच्या पहिल्या शुक्रवारी एका सुगडात तांदूळ व हळकुंड घालून वर वेळणी झाकतात. मग त्यावर सोवळ्याचा खण किंवा चोळी घालतात.) गौर बोळविणे – ((ज्येष्ठा गौर) दहीभात, करंजी ही शिदोरी व पूजेचे सामान घेऊन, ज्या ठिकाणाहून गौरी (खडे) आणल्या त्या ठिकाणी जाऊन पूजा करून ओटी भरायची असते. त्यानंतर शिदोरी आणि गौरीचे खडे पाण्यात सोडायचे असतात व काठची वाळू घरी आणून ती सर्वत्र टाकायची असते.) गौर लिहिणे – (प्रथम सुगड व मातीची वेळणी यांना काव लावून ती वाळल्यावर चुन्याने नाक, डोळे, कान, तोंड इ. आकृती काढतात. शेवटी सुगडाच्या तोंडावर रंगवलेली वेळणी बसवतात.) इ. विधी प्रचलित आहेत.

गौर पु. खोल विचार; चिंतन : 'यांची हर एकविशीं गौर करीत जाणे.' – मइसा ३.२०५. [फा.]

गौर वि. मोठा : 'हा मीं गौरु हीनु पुरता।' – राज्ञा १५.७५९.

गौर पु. बंडखोर; गवार लोक; पुंड : 'कांहीं जाटाचे स्वार घेऊन गौर इद्रुखीस आले होते.' – पेद २३.२०.

गौर वि. १. गोरा; शुभ्र; निर्मळ; स्वच्छ; (माणूस, वर्ण, रंग–शरीराचा) २. तेजस्वी; कांतिमान.

गौरकाय पु. १. युरोपियन माणूस. २. गोरी व्यक्ती : 'गौरकाय व सरकार यांविषयींचें त्यांचे पक्षपातित्व लोकांच्या चांगले नजरेस आले.' – अमृ ७.२७१. [सं.]

गौरखर पु. रानगाढव.

गौरपरदास्त स्त्री. वास्तपुस्त; निगादानी : 'याची गौरपरदास्त करावी, याप्रमाणें नजमुदीखानांनीं सेवकास समागमें नेऊन नसीबयारखानास मिरविलें.' – पेद २८.२१. [फा.]

गौरफिकर स्त्री. मोठी काळजी : 'तो सुटेपर्यंत गौरफिकरची जरुरत आहे.' – श्रीयो १.४७६.

गौरमुख न. इंग्रज : 'त्याजवर कांहीं गौरमुख येणार असे वर्तमान आहे.'

– ऐलेसं ७०३४.

गौरव पु. न. १. मोठेपणा; भारदस्तपणा; मान्यता; सन्मान (काम, मनुष्य यांचा). २. वजन; योग्यता. ३. सत्कार; मान; आदर; पूजा. (क्रि. करणे, ठेवणे, राखणे). ४. डौल; थाटमाट; शोभा; बडेजाव; वैभव : 'काय हा आरंभरंभेचा गौरवु।' – ज्ञा ६.४६२. [सं.]

गौरव पु. वजन; गुरुत्व; जडपणा. [सं.]

गौरवग्रंथ पु. (ग्रंथ) एखादी व्यक्ती किंवा संस्था हिच्या सन्मानार्थ प्रकाशित करावयाचा ग्रंथ. या ग्रंथात त्या व्यक्तीचे किंवा त्या संस्थेचे कार्यकर्तृत्व यासंबंधीचे लेख प्रसिद्ध केले जातात.

गौरवण न. मोठेपणा देणे; सन्मान; सत्कार.

गौरव(वि)णे उक्रि. १. मानसन्मान करणे; मोठेपणा देणे; आदराने वागवणे; गौरव करणे. २. (ल.) अंगावर वस्त्र जळणे (जळणे शब्द अशुभ आहे म्हणून त्याऐवजी).

गौरवचिन्ह न. मानचिन्ह; बिल्ला; प्रशस्तिमुद्रा.

गौरववृत्ति स्त्री. सन्मान वेतन; विद्यावेतन-मानधन.

गौरवशाली वि. सन्माननीय; माननीय; आदरणीय; अग्रमानांकित; परमोत्कृष्ट; वैभवशाली.

गौरवी वि. गौरवयुक्त; आदरशील; सन्माननीय; सभ्य.

गौरवी स्त्री. गौरी.

गौरशी स्त्री. १. खोल चौकशी; बारीक तपास; सूक्ष्म परीक्षा : 'आमची गौरशी करून आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणुकेस हजीर आहों.' – ऐस्फुले ५२. २. (चुकीने) ऊर्जित; सर्फराजी; कौतुक; गौरव : 'आम्ही कामकाज केलें हें धनी दृष्टीनें पाहून गौरशी करील म्हणोन आस्था होती.' – पया १००.

गौरी पु. (संगीत) एक राग. याचे दोन प्रकार आहेत. औडुव-षाडव. वादी ऋषभ व संवादी पंचम. गानसमय सायंकाळ.

गौरी न. गायनाचा एक प्रकार; पारध्याचे गाणे : 'पारधी घाट वाये। साधावया गौरी गाये। तेथ हरिण लुब्ध होये। आइकावया।।' – ज्ञाप्र ७२०. पहा : **गौरी**

गौरी स्त्री. १. गौर; पार्वती; देवी; भवानी. २. ऋतू प्राप्त न झालेली अविवाहित मुलगी; कन्या; कुमारी. ३. देवीच्या पूजेचा भाद्रपद शुद्ध पक्षातील जागर व उत्सव. (क्रि. जागविणे.) ४. गौरवर्णाची स्त्री. [सं.]

गौरी स्त्री. अशुद्ध रक्तवाहिनी. [सं.]

गौरी स्त्री. शेणाची गोवरी, तिचा तुकडा, भुसकट इ. पहा : **गवरी, गोवरी**

गौरीचा पेंड भाद्रपदात शेताचे बांध घालण्यासाठी खणलेली माती. ही माती फार चिकट असते. या महिन्यात गौरीचा उत्सव असतो म्हणून हे नाव पडले.

गौरीचा हळवा नाचणीची एक जात.

गौरीचे डोह(हा)ळे चैत्रात पडणारी पावसाची बुरबुर.

गौरीच्या फण्या एक वनौषधी.

गौरीतृतीया स्त्री. चैत्र शुद्ध तृतीया.

गौरीफल न. एका काटेरी झुडपाचे खाण्यायोग्य फळ : 'गौरीफल नामक शाक किंवा क्षुप...' – वनश्री ७१२.

गौरीशंकर पु. १. एकमुखी रुद्राक्ष. २. कंठा; दाणे (मोती). ३. हिमालयाचे एक शिखर.

गौरीशंकर रुद्राक्ष जोडरुद्राक्ष.

गौरीह(हा)र पु. १. शिवपार्वती. २. वाङ्निश्चय झाल्यावर मंडपात वर येण्यापूर्वी वधूने जिची पूजा करायची ती पार्वती (आणि शंकर). कुंभारी चार बोळकी व एक कळस अशा चार उतरंडी चार बाजूंना व मागच्या बाजूला मधोमध आणखी एक उतरंड मांडायची असते. त्यांच्या मध्ये धुतलेल्या पाटावर धुतलेले तांदूळ ठेवून त्यावर ठेवण्यात येते ती अन्नपूर्णा; गौरीहाराचे साहित्य : 'मांडिला गौरीहार।' – वसा ४६. (वा.) **० पूजणे –** १. विवाहाच्या आधीचा एक विधी; गौरीहाराच्या वेळी मांडलेल्या देवीची पंचामृती पूजा करणे व लग्न लागेपर्यंत तिला कुंकुममिश्रित अक्षता वाहत राहणे. २. (ल.) शिवासारखा पती मिळावा म्हणून शिव-पार्वतीची आराधना करणे.**० सुतविणे –** गौरीहाराच्या प्रत्येक मडक्याच्या गळ्याभोवती सुताचे तीन फेरे घेणे.

गौल वि. गोड; मधुर : 'वछ तुझे अति आरुष बोल। परि अमृताहूनि दिसती गौल।' – स्वादि ६.१.२९.

गौल्य, गौलता स्त्री. १. रुची; गोडी: 'हां गा साकर आणि दूध। हें गौल्य कीर प्रसिद्ध।' – ज्ञा ३.२२६. २. मृदुता; माधुरी; मधुरता (भाषणात) : 'गौल्यता नाहीं वचनाची।' – दास १.५.१५. ३. गोड मिश्रण.

गौल्यता स्त्री. सुबकपणा; सुंदरता (आकृती, अक्षर यांची). [सं. गोल, गोलता]

गौवण स्त्री. गवसणी; शरीर : 'जे त्वगस्थिगौवण मूढां। स्थूलबुद्धि' – ज्ञा ९.१८२.

गौश्या वि. सापडलेले (अर्भक). (माण).

गौसणी, गौळण, गौळणवाडा, गौळा-ळी पहा : **'गव'मध्ये**

गौसायळ स्त्री. सायळ; अंगावर काटे असणाऱ्या साळूची (जनावराची) एक जात : 'गौसायळ सामर। या नाव आदिभूतिक।' – दास ३.७.८.

गौसी, गोसी स्त्री. परस्परसंबंध; साखळी : 'आणि विधयेंद्रियां गौसी। स्वभावें तंव भूतासीं।' – ज्ञा १४.९३.

गौहर पु. मोती. [फा.]

गौळ न. साठा : 'कीं ज्ञानाचें गौळ : सनादले' – मूप्र ३८५.

गौळ न. गुराखी : 'तुज गौळे राखिती हृषीकेशी। शेखीं वां गोकुळासीं रक्षिलें।' – एभा ५.१३.

गौळण स्त्री. झाडाच्या फांदीवर गवताचे लोंबते घरटे विणणारा प्राणी : 'गौळणीनें केला खोपा अवघड झाडावरी।' – लोसामा ५.२८४.

गौळवाडा पु. गाई, म्हशी सांभाळण्यासाठी बांधलेली जागा.

गौंड-डी पु. न. स्त्री. गुरांचा मार्ग. पहा : **गोवंड**

गौंडरी टोपी केवळ सलम्याचे, कलाबतूचे भरतकाम असलेली टोपी.

गौंडा पु. भिंत बांधणारा कारागीर; गवंडी.

गौंडुकी स्त्री. एक प्रकारचा कर. (गो.)

ग्याज स्त्री. न. बैलाच्या गळ्यातील घंटा किंवा ठोकडा (मधली लोखंडी

घंटा) जिच्यात बांधलेला असतो ती दोरी; बैलाच्या गळ्यातील घाट.

ग्यान पहा : **ज्ञान**

ग्यान, ग्यानदास न. गुन्हे करणाऱ्या लोकांचे घरफोडीचे (पळी, बत्ता यासारखे सहापासून अठरा इंच लांबीचे) एक हत्यार.

ग्यानबा पु. १. वारकरी लोक ज्ञानदेवांचा भक्तिभावाने उल्लेख करतात ते नाव. २. (ल.) सर्वसामान्य माणूस.

ग्यानबाची मेख अतिशय कठीण प्रश्न; मर्म.

ग्यारमी स्त्री. मुसलमानांना देण्यात येणारी खिचडी : 'खंडेराव महाराजांनीं प्रत्येक मुसलमानास ग्यारमी देण्याची पद्धत सुरू केली.' – ज्ञामं १.१.१९३६.

ग्यारंटी स्त्री. हमी; जामीनकी. [इं.]

ग्यारिसन पु. फौजबंद ठाणे; सैन्याचे ठाणे; बंदोबस्तासाठी फौज ठेवण्याचे ठिकाण; शिबंदी. [इं. गॅरिसन]

ग्यालन पु. पातळ, प्रवाही पदार्थ मापण्याचे एक कैली माप. हे सामान्यत: सहा मोठ्या बाटल्यांएवढे असते. सुमारे साडेचार लिटर. [इं. गॅलन]

ग्याली स्त्री. (मुद्रण) मुद्रापाट; ठसेपाट; ग्रथित मुद्रापात्र; स्टिकमध्ये जुळविलेला मजकूर, स्टीक भरल्यानंतर उतरून (काढून) ठेवण्याचे साधन. [इं. गॅली]

ग्यालीप्रुफ न. कच्चे मुद्रित; कच्चा छाप; शुद्ध करण्याचा छापील खर्डा; ठसेपाटाचा छाप. [इं. गॅली]

ग्र(ग्रं)थणे उक्रि. १. अर्थानुसंधानपूर्वक अनेक वाक्ये एकत्र गुंफणे, बांधणे, जुळवणे, रचणे (पद्य, कविता); ग्रंथरचना करणे; ग्रंथ संपादणे : 'जें मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं ।।' – ज्ञा १८.१७७०; २. गुंफणे; ओवणे (पुष्पादी). ३. एकत्रित करणे; जुळवणे. [सं. ग्रथन]

ग्र (ग्रं) थन न. गुंफण; जुडण; बांधणी; रचना : 'आणि माझें तव आघवें। ग्रथन येणेचि भावें।' – ज्ञा १३.३२९. [सं.]

ग्रथित वि. ग्रथन केलेले; गुंफलेले; जुळविलेले; रचलेले. [सं.]

ग्रसणे उक्रि. गिळणे; घेरणे; आच्छादणे; व्यापणे : 'तो ग्रसिला महामोहें। कालसर्पे ।।' – राज्ञा २.७०. पहा : **ग्रासणे**

ग्रसनी स्त्री. (वै.) १. घसा. २. इतर प्राण्यात तोंड व अन्ननलिका यांना जोडणारा भाग.

ग्रसनी गंडिका (वै.) घशाच्या भागातील चेतापेशीसमूह.

ग्रसित, ग्रस्त वि. १. गिळलेले; खाल्लेले. २. अक्षर, पद गाळून उच्चारलेले; गाळलेले. ३. (ल.) गिळंकृत केलेले; घालमेल, अफरातफर केलेले. ४. व्यापलेले. ५. हरवलेला; धरलेला; पीडलेला, त्रस्त झालेला अशा अर्थी समासात योजतात. जसे : – दुष्काळग्रस्त, पूरग्रस्त. [सं. ग्रस् = भक्षण करणे]

ग्रस्तास्त पु. ग्रहण असतानाच (ते सुटण्यापूर्वी) सूर्य किंवा चंद्र मावळणे.

ग्रस्तोदय पु. ग्रहण असताना सूर्य किंवा चंद्र यांचा होणारा उदय.

ग्रह पु. घेणे; स्वीकार; अंगीकार; धरणे. [सं.]

ग्रह पु. १. चंद्र किंवा सूर्य यांचे ग्रहण. (राहूकेतूकडून) २. सूर्याभोवती फिरणारा गोल (पृथ्वी, बुध, शुक्र, गुरु, मंगळ इत्यादींचा); ज्योतिषशास्त्राप्रमाणे हे ग्रह (सूर्यासह) नऊ आहेत. (सामा.) केंद्रस्थ, उष्ण व दैदीप्यमान पदार्थाभोवती फिरणारा, कमी उष्णतेचा परप्रकाशित गोल. ३. एक प्रकारचे पिशाच, गिरा : 'जैसा ग्रहातें पंचाक्षरी। अनुमानी कां।।' – ज्ञा २.८५. (यापासून ल.) व्याधी, उपाधी, पीडा इ.; तापदायक माणूस; खनपटीला बसणारा, पाठीला लागणारा इ. [सं.]

ग्रह पु. १. कल्पना; भावना; मत. २. उमज; समज; बुद्धी; अर्थग्रहण अर्थबोध; धारणा; समजूत. [सं.]

ग्रह पु. चिकाटी.

ग्रह पु. १. मगर; २. एक मोठा मासा; ग्राह : 'गज सरोवरीं ग्रहग्रस्त; स्त्रियांपुत्रीं सांडिला जीत।' – एभा १२.८५. [सं.]

ग्रह पु. (संगीत) १. तालाच्या आरंभाची मात्रा. अर्थात तालाची सम. २. भरतमुनींनी दिलेल्या जातिलक्षणाप्रमाणे गीतारंभी उठावणीला जो अंशस्वर असतो तो. याचे चार प्रकार आहेत : सम, अतीत, अनागत व विषम. [सं.]

ग्रहकुंडली स्त्री. पंचांगातील ग्रहांच्या दशा दाखविणारी आकृती.

ग्रहगणित न. ग्रहांच्या गतीविषयीचे गणित.

ग्रहगति–ती स्त्री. (ज्यो.) १. ग्रहांची गती. २. ग्रहांचा विशिष्ट परिणाम (मुख्यत्वे माणसाचे भविष्य पाहताना). [सं.]

ग्रहचार पु. सूर्य किंवा इतर ग्रह यांची गती, भ्रमण.

ग्रहजप पु. ग्रह प्रसन्न होण्यासाठी त्या ग्रहाच्या मंत्राचा करायचा जप.

ग्रहज्योतिष न. पत्रिकेतील ग्रहांच्या हालचालींवरून भविष्यकाळात घडणाऱ्या गोष्टी सांगणारे शास्त्र.

ग्रहण न. घेणे; स्वीकारणे; अंगीकार; आत्मसात करणे. उदा. विषयग्रहण; स्वादग्रहण इ. (क्रि. करणे). [सं.]

ग्रहण न. दोन आकाशस्थ गोलामध्ये तिसरा येऊन एक अदृश्य होणे. सूर्याच्या आड चंद्र आल्यामुळे किंवा चंद्रावर पृथ्वीची छाया पडल्यामुळे जे सूर्य-चंद्र बिंबाचे आच्छादन होते ते; पूर्ण (खग्रास), खंडग्रास व कंकणाकृती असे ग्रहणाचे प्रकार होत. सुमारे १८ वर्षे व १० महिन्यांनी पुन्हा तीच तीच ग्रहणे येतात. (वा.) **० लागणे** १. चंद्रसूर्याची बिंबे छायेने आच्छादित होणे. २. (ल.) संकटग्रस्त होणे. **० सुटणे** –१. ग्रहणाची स्थिती संपणे. ३. (ल.) संकटावस्थेतून मुक्त होणे : 'ग्रहण सुटले.' – लोटिकेले २.९८.

ग्रहणपट पु. कुंडली; जन्मपत्रिका : 'मग वाचिला ग्रहणपट। सत्यभामेचा ।।' – कथा ५.२.१७.

ग्रहणफळ न. ग्रहणकालाची फलज्योतिषावरून निघणारी भविष्ये.

ग्रहणशक्ति–क्ती, ग्रहणक्षमता स्त्री. विषय आकलन करण्याची शक्ती, पात्रता. [सं.]

ग्रहणशील वि. नवीन कल्पना, विचार इ. ग्रहण करण्यास, घेण्यास तत्पर.

ग्रहणशौच न. ग्रहणकाळात मानलेली अस्पृश्यता. [सं.]

ग्रहणी स्त्री. १. संग्रहणी; रक्तातिसार; रक्ती हगवण. २. लहान आतडे. ३. शरीरातील उष्णताप्रसारक व चैतन्योत्पादक भाग, धमनी.

ग्रहणीय वि. घेणे, स्वीकारणे, ताबा घेणे, पकडणे वगैरेंसाठी योग्य; ग्राह्य.

पहा : **ग्रहण** [सं.]

ग्रहदशा स्त्री. मनुष्यादिकांना प्राप्त होणारी शुभाशुभ फलसूचक सूर्यादी ग्रहांची दशा, दृष्टी, अवस्था, काल; वाईट काल.

ग्रहदान न. नवग्रहांना प्रसन्न करण्यासाठी ब्राह्मणाला द्यायचे दान.

ग्रहपीठ न. ग्रहमख करण्यासाठी नवग्रह देवता मांडण्याचा पाट, चौरंग.

ग्रहपीडा–बाधा स्त्री. १. प्रतिकूल ग्रह किंवा ग्रहयोग यापासून उत्पन्न होणारे दु:ख, दारिद्र्य आजारीपण इ. २. भूतपिशाचबाधा.

ग्रहबल न. विवक्षित राशीला ग्रहांची अनुकूलता (विवाह, उपनयन, मंगल कृत्य करण्याविषयी).

ग्रहमंडळ न. ग्रहगोल; सर्व ग्रहांचे चक्र.

ग्रहमुख–यज्ञ पु. ग्रहांना अनुकूल करून घेण्यासाठी ग्रहांच्या प्रीत्यर्थ करायचा यज्ञ; ग्रहशांती; नवग्रहांना उद्देशून करायचा होम; हा होम विवाह, मुंज व इतर शांतीच्या प्रसंगी करतात.

ग्रहमैत्री स्त्री. ग्रहांची परस्परांशी मैत्री; वधूवरांच्या पत्रिकांचा मेळ; पत्रिका जुळणे, पटणे. राशीचे स्वामी सात असल्याने, ज्या राशीत नवरी जन्मली आणि ज्या राशीत नवरा जन्मला, त्या दोन्ही राशींचा स्वामी एक असणे किंवा एकमेकांना अनुकूल असणे.

ग्रहमोक्षविचक्षण वि. (संगीत) ग्रह व न्यास यांचे नियम जाणणारा.

ग्रहयोग पु. शुभाशुभदायक ग्रहांचा योग, स्थिती.

ग्रहवैर न. १. ग्रहांचे शत्रुत्व. २. पत्रिका न जमणे.

ग्रहशांति–ती स्त्री. ग्रहमख; ग्रहयज्ञ; प्रतिकूल ग्रहाने पीडा देऊ नये म्हणून करायचे धार्मिक कृत्य.

ग्रहसाधन न. १. (कोष्टक, गणित किंवा दुर्बिण इ. यंत्रे यांच्या साह्याने) ग्रहदशेचा निश्चय; ग्रहांचे स्थळ व गती यांचे शोधन; ग्रहांचे वेध घेणे. २. ग्रहांची आराधना.

ग्रहसारणी स्त्री. अमुक ग्रह अमुक ठिकाणी आहे याचा निश्चय करण्याची गणिते किंवा कोष्टके; ग्रहसाधनाचे गणित.

ग्रहस्त–स्थ पु. ग्रहावर राहणारा. चुकीने 'गृहस्थ' = कुटुंबवत्सल या अर्थी वापरला जातो. (ग्रह + स्थ = ग्रहावर राहणारा. गृह + स्थ = घरात राहणारा; प्रापंचिक.)

ग्रहस्वर पु. (संगीत) प्रत्येक जातिगायनास ज्या विशिष्ट स्वरापासून सुरुवात करावी लागते तो स्वर.

ग्रहीता पु. घेणारा; स्वीकारणारा; जो घेतो तो; ज्याला मिळते तो.

ग्रंथ पु. १. अर्थपूर्ण वाक्यांची विशिष्ट प्रकारची संगतवार रचना; पोथी, पुस्तक (गद्य किंवा पद्य यांचे). २. (ल. व शब्दश:) गुंफणी; जुळवणी; जोडणी; संपादणी. ३. पुस्तक; भाग; अध्याय; परिच्छेद इ. ४. बत्तीस अक्षरांचे वृत्त किंवा वृत्ताची ओळ : 'व्यासकृत महाभारत लक्षग्रंथ प्रसिद्ध हा भारी।' – मोआदि १.९. (एका अनुष्टुभात ३२ अक्षरे असतात व अनुष्टुभालाही ग्रंथ म्हणतात त्यावरून ३२ ची संख्या). ५. (ल.) योजना; बेत; कट; मसलत : 'बाळोबा आणि भाऊ हा सगळा एक ग्रंथ आहे.' – अस्तंभा ९६. ६. प्रसंग; गोष्ट; हकीगत (व्यवहार इ. संबंधी). ७. पराचा कावळा; एवढ्याचे एवढे करणे; विस्तार. ८. अर्थ; संगती : 'त्यांनी राजीनामा कां दिला याचा ग्रंथ लावणे कठीण.' – के २७.५.३०. ९. अकांडतांडव; कुभांड. १०. स्मरणिका. [सं. ग्रथ् = रचणे] (वा.) ० **आटोपणे –** (काम) संपणे; (कार्य) नाश होणे; (माणूस) मरणे : 'पण आमच्या दुर्दैवानें सर्वच ग्रंथ आटोपला.' – भयंकर दिव्य. ० **करणे –** बाऊ करणे; क्षुल्लक गोष्टीला उगाच महत्त्व देणे. ० **लागणे –** अर्थ समजणे. ० **लावणे –** विशेष प्रसंगाने अथवा विशेषत: चातुर्मासात रामायण, महाभारतासारख्या मोठ्या ग्रंथाचे वाचन करणे; (ल.) एखाद्या विषयाची अनावश्यक दीर्घ चर्चा करणे.

ग्रंथकर्ता–कार पु. पुस्तक तयार करणारा, रचणारा कवी; लेखक.

ग्रंथदिंडी स्त्री. १. (विशेषत:) साहित्य सम्मेलन प्रसंगी महत्त्वाच्या ग्रंथांची पालखीतून काढलेली शोभा यात्रा. २. दिंडीपताका; प्रभात फेरी; मिरवणूक

ग्रंथन न. क्रि. ओवणे; विणणे; जोडणे; गोवणे; गुंफणे.

ग्रंथपंचक न. (ख्रि.) पवित्रशास्त्रातील पहिली पाच पुस्तके. ही मोशे याने लिहिल्याचे मानतात.

ग्रंथपाल पु. (ग्रंथ.) ग्रंथालयाचा प्रमुख अधिकारी. ग्रंथांची व्यवस्था ठेवणारी व ग्रंथालयाचा कारभार पाहणारी व्यक्ती.

ग्रंथप्रस्ताव पु. ग्रंथाचा प्रारंभ.

ग्रंथप्रामाण्य न. धार्मिक किंवा कायद्यांच्या ग्रंथात लिहिलेले प्रमाण, आधारभूत किंवा खरे मानणे : 'बुद्धिस्वातंत्र्याच्या ऐवजी ग्रंथप्रामाण्य... हे समाजनियमनाचे आधार होते.' – शिलेसं (प्र.) ३३.

ग्रंथरूपदर्शन न. (ग्रंथ.) ग्रंथांची पृष्ठे, चित्रे, नकाशे, आकार. माहिती.

ग्रंथसाहेब पु. शिखांचा धर्मग्रंथ.

ग्रंथसूचिकार पु. (ग्रंथ.) ग्रंथसूचीचा कर्ता, संकलक, संपादक. ग्रंथांची, वर्णक्रमानुसार यादी तयार करणारी व्यक्ती.

ग्रंथसूची स्त्री. पुस्तके, नियतकालिके, अहवाल इत्यादिकांची वर्णक्रमानुसार केलेली यादी.

ग्रंथायंत न. ग्रंथाचा मूलभूत हेतू किंवा ध्येय : 'आणि माझे तंव आघवें । ग्रंथायंत एणेचि भावें । जें तुम्ही संती होआवें ।' – ज्ञा १३.३२८.

ग्रंथालय न. १. ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके इ. वाचनासाठी किंवा अभ्यासासाठी जेथे ठेवली जातात असे ठिकाण. २. निरनिराळ्या प्रकारच्या पुस्तकांचा संग्रह. ३. चित्रपट, चित्रपट्टी, ध्वनिमुद्रिका, ध्वनिपट्टीका इत्यादींचा संग्रह.

ग्रंथालयशास्त्र न. (ग्रंथ.) ग्रंथालयांच्या व्यवस्थापनाचे शास्त्र.

ग्रंथिक वि. गाठीचा; ज्यात अंगावर गाठी उठतात असा (रोग).

ग्रंथिक संन्निपात ज्या तापात सांध्याच्या जागी गाठ येते असा ताप, ज्वर; प्लेग : 'मुंबईतील भयंकर साथीचा ताप ब्युबानिक फीव्हर किंवा ग्रंथिक सन्निपात...' – लोटिकेले १.१.५७४.

ग्रंथिका स्त्री. बरगडीचे हाड : 'मेरु शोभला निजपृष्ठीचा कणा। चौदा लोकेसीं ग्रंथिका जाणा।' – स्वादि ७.४.२०.

ग्रंथिमोचक पु. चोर; गाठोड्याची गाठ सोडून माल पसार करणारा.

ग्रंथिरस पु. (वै.) अंत:स्रावी ग्रंथीपासून निर्माण होणारे रासायनिक द्रव्य.

ग्रंथिरोग पु. अंगावर गाठी गाठी उठणारा रोग.

ग्रंथी, ग्रंथिका स्त्री. १. गाठ. २. लाकडावरील गाठ. ३. वेत, बोरू यांची गाठ, संधी, पेरे. ४. (ल.) शरीराचे सांधे. ५. बंधन; संबंध; नाते; लागाबांधा (लग्न इ. चा). ६. (ल.) घोटाळा; गुंतागुंत; गळफाटा; फासटा; गुंतविण्याचे, गोवण्याचे कोणतेही कारण. जसे : – मोह – माया – संशय – अज्ञान – ग्रंथी : 'मा मी विश्वेश्वरु भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे।' – ज्ञा १८.१४०४. ७. गळू; उठाणू; वाघणा. ८. (वै.) शरीरवाढीसाठी काही विशिष्ट द्रव्य स्राव निर्माण करणारा शरीरातील अवयव. [सं. ग्रथ् = बांधणे]

ग्रंथी पु. शिखांच्या धर्मग्रंथावर प्रवचन करणारी व्यक्ती.

ग्रंथी स्त्री गंड.

ग्रंथीवज्र न. पोलादाचा एक प्रकार.

ग्रंथोपजीवी वि. १. ग्रंथ लिहून (रचून) पोट भरणारा. २. ग्रंथ आचरणात आणणारा : 'आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें।' – ज्ञा १८.१८०१. [सं.]

ग्रा (गॅ) नाईट पु. एक प्रकारचा दगड. यात स्फटिक, चंद्रकांत व अभ्रक हे भिन्न भिन्न प्रमाणात मिश्रित असतात. हा दगड फार कठीण व टिकाऊ असतो. हिंदुस्थानात पुष्कळ ठिकाणी हा सापडतो. [इं.]

ग्रा(ग्रॅ)फाइट न. (भूशा.) कार्बनचा स्फटिकरूपातील अत्यंत मृदू प्रकार.

ग्राम पु. १. गाव; खेडे. २. गावातील प्रमुख किंवा माननीय माणूस. ३. अरेराव, कचाट्या, जरब बसविणारा, कचाटीत धरणारा माणूस. ४. जमाव; समुदाय : 'मुतेहिना ऐसा वागे। ग्राम कर्मेंदियांचा।' – यथादि ३.९२. (समासात) इंद्रिय – गुण – पुण्य – भूत – स्वर – ग्राम : 'इंद्रियग्रामावरी येणेंचि नाहीं।' – ज्ञा ५.१०५. [सं.]

ग्रामकंटक–कुठार पु. स्त्री. गावगुंड; गावची पीडा, ब्याद; दुष्ट माणूस.

ग्रामकी स्त्री. गावजोशी किंवा पाटील इ.चे काम; गावकी.

ग्रामकेसरी–सिंह पु. १. गावातील कुत्रे : 'ह्या ग्रामसिंहाचिया ठायीं। – ज्ञा १३.६८१. २. (उप.) भेदरट माणूस; गावात फुशारकी मारणारा.

ग्रामकोळ पु. गावडुकर : 'या ग्रामकोळाचा ठाइ। जैसा मिळणी ठाओ नाहीं।' – ज्ञा १३.६७९.

ग्रामखर्च पु. १. गावचा खर्च. २. फुकट किंवा विनाकारण खर्च; ज्याचा मोबदला नाही असा खर्च.

ग्रामचर वि. असभ्य गोष्टींची आवड असणारा.

ग्रामजाति स्त्री. वर्ज्यावर्ज्य स्वरांवरून ठरविलेला रागांचा विभाग : 'श्रुति स्वर ग्रामजाति – गमक।' – रुस्व ३४६.

ग्रामजोशी–ज्योतिषी पु. गावचा जोशी. हा पंचांग सांगणे, पत्रिका पाहणे, मुहूर्त काढणे इ. कामे करतो : 'आधीं होता ग्रामजोशी। राज्यपद आलें त्यासी। त्याचें हिंडणें राहीना। मूळ स्वभाव जाईना।।' – तुगा.

ग्रामज्य न. शरीरसुख; मैथुन; सुरत क्रीडा : 'ग्रामज्य आठवे चित्तीं।' – दास २.५.२८.

ग्रामणी पु. १. पाटील; गावचा मुख्य. २. (लौकिक) गावगुंड, चावट, वाईट, कुटाळ्या, पीडादायक माणूस; ब्याद : 'रामनामें विवर्जित ग्रामणीं बोलिजे तें ग्राम्य गीत।' – एभा ८.१६९. ३. गावचा महार. स्त्री. कुटाळकी; गावकी. पहा : **ग्रामिणी** : 'आनित्य ग्रामणी मस्ती सदा।' – दास २.३.६.
वि. मुख्य; श्रेष्ठ; प्रमुख.

ग्रामणी पु. ज्या व्यक्तीवर ग्रामण्य म्हणजे बहिष्कार घातला आहे अशी व्यक्ती : 'ब्राह्मण्य धर्म संस्थापक आपण आहा त्यापेक्षां जे असे ग्रामणी आहेत याची पुरी चौकशी जाहाल्याशिवाय मुक्तपत्र होऊं नये.' – मइसा २१.२२०. [सं. ग्राम]

ग्रामणीक न. हरामखोरपणा. पहा : **ग्रामणी, ग्रामिणी** : 'तरी जी पाहतां हेही ग्रामणिक दिसोनि येतसे कीं निष्टक।' – सादि १२.२.१०८.

ग्रामण्य न. १. मुख्यत: जातीसंबंधीचा किंवा इतर गावकीचा तंटा, खटला. २. बहिष्कार. ३. जातीच्या खटल्यासंबंधी चौकशीसाठी भरणारी ग्रामसभा; जातगंगा.

ग्रामत्रय पु. (संगीत) सप्तस्वरांतील मुख्य तीन अवधी. याचे प्रकार तीन. षड्जग्राम, मध्यमग्राम व गांधारग्राम. सात स्वरांचा समूह.

ग्रामथिल्लर न. गावातील लहानसे तळे, डबके.

ग्रामदान न. गावातील सर्व जमीन भूमिहीनांना वाटण्यासाठी देणे : 'भूदानानंतर विनोबांनी ग्रामदान चळवळ हाती घेतली.' – नौतेने २४५.

ग्रामदुर्गा स्त्री. गावची कुलदेवी, भवानी; ग्रामाधिकारिणी देवता.

ग्रामदेव–देवता–दैवत पु. स्त्री. न. १. ग्रामाधिकारी, ग्रामाधिकारिणी; गावचा कुलदेव, कुलदेवी. २. या देवतेच्या खर्चासाठी इनाम दिलेली जमीन, उत्पन्न, ग्रामदेवीची जमीन.

ग्रामधर्म पु. गावचे धार्मिक विधी, नियम, चालीरीती इ. परंपरेने चालत आलेला गावचा धर्म.

ग्रामनेत्र न. (ल.) महार; गावचा जागल्या.

ग्रामपशु–शू पु. माणसाळलेले जनावर. [सं.]

ग्राम पंचायत–सभा–संस्था स्त्री. गावची सर्व व्यवस्था पाहणारी संस्था; ग्रामस्वराज्य. राज्यशासनाच्या कायद्यान्वये गावच्या लोकांनी निवडून दिलेली विशिष्ट अधिकार असलेली संस्था.

ग्रामबिंदुटी स्त्री. खेड्यातील गल्ली, बिदी : 'तव ते गोधनें ग्रामबिंदुटी। अपार मौळी असती चव्हाटी।' – नव १३.११५.

ग्रामयाजक पु. गावचा उपाध्याय; ग्रामोपाध्याय.

ग्रामराज्य न. गावाचा कारभार गावानेच करणे : 'आजचे स्वतंत्र भारताचे अर्थकारण... ग्रामराज्य स्थापण्यास अनुकूल नाही.' – विचार १२७.

ग्रामलेखक पु. कुळकर्णी : 'ग्रामलेखक ते स्थळीं।' – निमा (आत्मचरित्र १.१०१).

ग्रामविकास पु. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने खेड्यांची सुधारणा.

ग्रामविखो पु. गावात सर्वांना उपलब्ध असणारा भोग.

ग्रामशिक्षण न. १. खेडेगावामध्ये राहणाऱ्या लोकांची परिस्थिती, गरजा व समस्या लक्षात घेऊन आखलेली शिक्षणपद्धती. २. खेडेगावातील अध्ययन–अध्यापनाची तत्त्वे आणि पद्धती यांचा विचार करणारे शास्त्र.

ग्रामसभा स्त्री. गावातील प्रतिष्ठित लोकांची विशेष कारणासाठी झालेली बैठक.

ग्रामसेवक, सेविका गावाच्या विकासासाठी शासनाने आखलेल्या योजनेत ग्रामीण स्तरावर काम करणारे स्त्री-पुरुष. यांना योग्य प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केले जाते. [सं.]

ग्रामस्त-स्थ पु. गावात राहणारा; गावचा रहिवासी; गावकरी.

ग्रामस्वराज्य पहा : **ग्रामराज्य**

ग्रामाचार पहा : **ग्रामधर्म**

ग्रामाधिकार-री पु. गावासंबंधी अधिकार; तो गाजविणारा माणूस, अधिकारी; गावकामगार.

ग्रामाधिपती-ति-ती पु. पाटील : 'ग्रामाधिपतिरूपें श्रीरघुवीरें जाण।' - सप्र २.३४. [सं.]

ग्रामिणी स्त्री. हरामखोरी; चहाडी इ. पहा : **ग्रामणीक**

ग्रामीण वि. खेड्यासंबंधीचा; खेड्यातील जीवनासंबंधीचा.

ग्रामीण भाषा खेड्यापाड्यात बोलली जाणारी, प्रमाणभाषेपासून वेगळी पण तिच्याशी संबंधित परंपरागत भाषा.

ग्रामीण विद्यापीठ ग्रामीण विभागाचा सर्वांगीण विकास हे ध्येय लक्षात घेऊन आवश्यक त्या ज्ञानशाखांच्या उच्च अभ्यासक्रमांची सोय असलेले ग्रामीण परिसरातील विद्यापीठ.

ग्रामीण साहित्य खेड्यातील लोकांच्या जीवनासंबंधीचे तेथील बोलीभाषेत केलेले लेखन.

ग्रामोद्योग पु. अव. १. यंत्रयुग येण्यापूर्वी गावातील कारागिरांकडून किंवा सामान्य लोकांकडून केला जाणारा सूतकताई, कापड विणणे यांसारखा धंदा : 'यांत्रिकीकरणाची झळ सर्वांत प्रथम ग्रामोद्योगांना लागली.' - भादा १९. २. ग्रामजीवनाला, तेथील स्थानिक परिसराला, तेथील साधनसामुग्रीला सुसंगत असे उद्योग. ज्या उद्योगाच्या विकासाला तेथे नैसर्गिक अनुकूलता असते असे पूरक वा सहायक होणारे उद्योग.

ग्रामोपाध्याय पु. गावचा उपाध्याय; ग्रामजोशी. पहा : **ग्रामयाजक**

ग्रामोफोन पु. फोनोग्राफ; ज्यात ध्वनिमुद्रण केलेली तबकडी फिरवून वाजवता येते असे यंत्र.

ग्राम्य वि. १. खेड्यात उत्पन्न झालेले किंवा गावासंबंधी. २. गावठी; गावराणी; गावंढळ; खेडवळ. ३. माणसाळलेला (पशू). ४. लागवडीने उत्पन्न केलेले (शेतीचे उत्पन्न). ५. प्राकृत व इतर देशी (भाषा). ६. अश्लील; अशिष्ट; असभ्य. ७. अतिशय विषयासक्त. [सं.]

ग्राम्यगीत न. १. अश्लील पद, लावणी, २. खेडवळ गाणे, पवाडा इ.[सं.]

ग्राम्यधर्म पु. संभोग.

ग्राम्यस्त्री स्त्री. वेश्या; रांड : 'ग्राम्यस्त्रियांचे संगतीं जाणें।' - एभा ८.१३९.

ग्राम्यालाप पु. १. खेडवळ गप्पागोष्टी. २. लावणी; शृंगारिक कविता.

ग्राव पु. १. धोंडा, दगड : 'मुखें फाडिती ताडिती ग्रावधोंडा।' - मुरामा, युद्धकांड ११४. २. मेघ. ३. पर्वत : 'ग्रावाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरी।' - वैराग्यशतक ६८. [सं. ग्रावन]

ग्रावस्तोता पु. सोमवल्ली वाटण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दगडाची प्रार्थना करणारा यज्ञातील सोळा ऋत्विजांपैकी एक : 'होता मैत्रावरूण पोता। अछावाक ग्रावस्तोता।' - मुआदि १०.७४. [सं.]

ग्रावा पु. दगड. [सं. ग्रावन]

ग्रास पु. १. घास; अन्न. २. गट्ट करणे; गिळणे. ३. ग्रहण किंवा ग्रहण लागलेला भाग. ४. राज्य, संस्थान, सरदारी वडील मुलाला मिळते म्हणून धाकट्या मुलाला इतमाम चालविण्यासाठी मिळतो तो ऐवज. ५. नाश : 'ग्रासातेंही ग्रासूनि पुरता।' - ज्ञा १५.५५०. [सं.] (वा.) **तोंडाचा ग्रास नेणे, काढणे -** काम पुरे होत आले असताना त्याचा नाश होणे, करणे; आयत्या वेळी कार्य बिघडणे, बिघाड करणे.

ग्रासणे सक्रि. १. गिळणे; गट्ट करणे. २. लाच घेणे; अफरातफर करणे. ३. (ल.) व्यापणे; आच्छादणे (ढगाने आकाश, राहूने चंद्र-सूर्य). ४. (ल.) गंजणे (एखादी धातू); एखाद्या पदार्थाने खाल्ली जाणे; (वाळवीने लाकूड, गंजाने लोखंड इ.); कीट होणे. ५. निरुत्तर करणे; कुंठित करणे; गतिहीन करणे. ६. नाश करणे : 'ना तरी अर्जुना मी काळु। आणि ग्रासिजे तो माझा खेळु।' - ज्ञा ११.४९१. ७. (काहींच्या मते) त्रासविणे; पिडणे; छळणे. [सं. ग्रास, ग्रसन]

ग्रासनलिका स्त्री. (वै.) गलनाल; घशापासून जठरापर्यंतची मांसल नलिका.

ग्राह पु. १. नक्र; मगर; सुसर. २. पाणहत्ती. ३. (सामा.) समुद्रातील कोणताही मोठा प्राणी, जलचर : 'गज करवडी महाग्राह।' - एरुस्व १०.८०. [सं. ग्रह]

ग्राह न. पछाडणारे भूत : 'जैसें ग्राहाते पांचाखरी। अनुमानी कां।।' - राज्ञा २.८५.

ग्राहक, ग्राही, ग्राहिक वि. १. धरणारा; घेणारा; स्वीकारणारा. २. (ल.) योग्य गुणग्रहण करणारा; चाहता. ३. ज्ञाता; जाणता. (समासात) गुणग्राहक-रसग्राहक इ. ४. गिऱ्हाईक; माल विकत घेणारा : 'ग्राहीक पातला परमनिका।' - मुआदि १८.१२९.

ग्राह (हि) की स्त्री. १. गिऱ्हाइकी. २. खरेदी : 'आतां सुखेसि जीविता। कैंचीं ग्राहिकी कीजेल पंडुसुता।' - ज्ञा १.४९७.

ग्राही वि. ग्रहण करणारा.

ग्राह्य वि. १. मान्य; कबूल. २. स्वीकारणीय; घेण्याजोगे (क्रि. असणे, धरणे.) ३. पसंत, संमत; उचित.

ग्राह्यांश पु. तथ्य; सार; मुख्य भाग; चांगला किंवा उपयोगी पडण्याजोगा अंश; तात्पर्यार्थ; मान्य करण्यासारखा भाग : '(ते) त्यातील ग्राह्यांश शोधून काढीत असत.' - निअ ४८.

ग्रांथिक वि. १. ग्रंथासंबंधी; ग्रंथात आढळलेले; लेखी. २. गुंफलेला; ओवलेला; रचलेला. [सं. ग्रंथ, ग्रथ]

ग्रीदाग्रीदी क्रिवि. पहाऱ्यापहाऱ्याने : 'राखणाईत ग्रीदाग्रीदी राखत होते।' - गोच ७४.

ग्रीबा पु. भोपळा : 'मातुळग्रामीं ग्रीबा खाववणें' - स्थापो ९१.

ग्रीवा स्त्री. १. गळ्याच्या पाठीमागील बाजू; (सामा.) मान. २. कंठ; गळा : 'उदासीन जातो ग्रिवा दाटताहे।' - राक १९५. [सं.]

ग्रीवाघंटा स्त्री. १. गळ्याची घाट, गळ्यावरील डेरा. २. घुमट ठेवण्यासाठी भिंतीवर बांधलेल्या गोल बैठकीचा आकार : 'उपरी सोळावा अध्यावो। तो ग्रीवेघंटेचा आवो।' - ज्ञा १८.४०.

ग्रीवास्थान न. खड्ग; तलवारीचा एक प्रकार. [सं.]

ग्रीष्म, ग्रीष्मर्तु–र्तू पु. ज्येष्ठ आषाढ असा दोन महिन्यांचा काळ; उन्हाळा : 'नातरी ग्रीष्मकाळीं सरिता । शोषूनि जाती समस्ता ।' – ज्ञा २.३५९.

ग्रूत न. १. काचा बसविण्याची लांबी. २. पिठाची खळ. (गो.) [इं.]

ग्रॅम पु. वस्तुमानाचे एकक; प्रमाणित किलोग्रॅमचा एकहजारांश भाग.

ग्रोस पु. बारा डझन; १४४ नग. [इं.]

ग्लादी स्त्री. काकुळती; दयेची याचना : 'तेवीचि ग्लादी करी'–लीचउ ५२४.

ग्लान वि. ग्लानीने युक्त; श्रांत; थकलेला; खिन्न; क्लांत; श्रमलेला (दुखणे, शोक, श्रम. इ. नी). [सं. ग्ले]

ग्लानता, ग्लानि–नी स्त्री. विनवणी; प्रार्थना, आर्जव; अजीजी : 'राघोबा पागे व राजाराम चोपदार यांणीं बहुत ग्लानता केली की, साहेब इचको बचाव करना.' – भाब ७२; 'या प्रसंगीं श्रीमंतांनी बहुत ग्लानी केली.' – होकै.

ग्लानि–नी स्त्री. १. घेरी; चक्कर. २. मांद्य; थकवा; शीण; सुस्ती; मांदगी. ३. खिन्नता; खंती : 'आयुष्य निमालें आंतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं ।।' – ज्ञा ९.५११. ४. क्लांती; श्रांतपणा. ५. उतरती कळा; दुर्बलता. [सं.] (वा.) **० होणे –** नष्टांश होणे, कमी होणे.

ग्लायडर न. सुकाणूवर चालणारे, इंधन न देता हवेमध्ये उडू शकणारे विमान. [इं.]

ग्लास पु. १. पेला (काचेचा, धातूचा). २. (ल.) दारू; मद्य. [इं.]

ग्लांती स्त्री. १. नम्रपणाची प्रार्थना; काकुळत; विनवणी : 'ग्लांति लिहिता वेळोवेळां ।' – एरुस्व ४.४४. २. दुःख; आक्रोश; पश्चात्ताप : 'वासना नदी माहांपुरी । प्राणि बुडतां ग्लांती करी ।' – दास ५.२.१३.

ग्लिसरिन न. एक औषध; पाक. तेले व चरबी यात सापडणारा शर्करांश, शोधन क्रियेने निराळा काढल्यावर हे द्रव्य तयार होते. हे चिकट, चवीला गोड, पातळ व जखमेला आरामकारक, थंडीने अंग फुटण्यावर गुणकारी. तसेच हवेत उडून न जाणारे असे आहे. [इं.]

ग्लूकोज न. (वै.) विशिष्ट प्रकारची साखर; द्राक्षजा; द्राक्षे व इतर अनेक फळे, मध इत्यादींमध्ये आढळते. मानवी रक्तातील आवश्यक घटक व ऊर्जेचा स्रोत.

ग्वड्डु वि. वांझ (जनावर). [का.]

ग्वळ्ळी स्त्री. तुरीचे टरफल. (बे.) [का.]

ग्वाड न. १. गूळ. २. गोड. (कु. बे.)

ग्वाही स्त्री. गोही; साक्ष; शपथेवर दिलेली जबानी; साक्षीपत्र : 'दुष्ट आचरण ग्वाही माझें मन ।' – तुगा १८५७; एखाद्याच्या चांगुलपणाबद्दल खात्री. (क्रि. देणे.)

पु. साक्षीदार. [फा. गुवाही]

ग्वाहीदार वि. साक्षीदार.

■ ■